प. श्रीटेंबेस्वामीमहाराजांचे पट्टशिष्य)

श्रीनृसिंहसरस्वती-चरित्र

माधि : शके १८४९, आश्विन व. ७)

निजदृशा भजतां भवकारणं परिहरन्विहरन्परधामनि ।
परमकारुणिको भगवान् यतिर्विजयते नरसिंहसरस्वती ॥

लेखक

शंकरस्वामी

(श्रीनृसिंहसरस्वतीचे चरणकिंकर)

– मिळण्याचें ठिकाण –

माधव आर्ट स्टुडिओ

आर्टिस्ट अॅण्ड फोटोग्राफर्स, रास्ता पेठ, पुणें २.

किंमत पांच रुपये

श्रीगुरु श्रीनृसिंहसरस्वती दीक्षितस्वामीमहाराज

निवेदन

जगांत आश्चर्यकारक अशा कांहीं गोष्टी घडतात. त्यांतीलच हें प. प. नृसिंहसरस्वतीचरित्र होय. हें चरित्र छापून होईल ही कल्पना स्वप्नांत-देखील गला शिवली नाहीं. कारण, लहानपणापासून शालेय शिक्षणाचा अभाव, सद्गुरूंचें नामस्मरण, त्यांचें सतत चिंतन, संन्यासवृत्तीनें भिक्षेवर उदरनिर्वाह व सर्व भार सद्गुरुमूर्तींवर अशी मनाची ठेवण, हें होय. फक्त गुरुप्रेमानें वेडेंवांकडें झालेलें लेखन छापणें शक्य कसें होणार !

साधारण लहानपणींच कोंकणांतून पायीं कोल्हापूरमार्गें नरसिंहवाडीस आलों. त्याला जवळ जवळ पन्नास वर्षें झालीं. तेथें प. प. वासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामीमहाराज यांचें दर्शन भाग्यवशात् झालें. त्याचा मनावर विशेष परिणाम होऊन त्यांचेपाशीं प्राथमिक संस्कृत अध्ययन झालें. त्यांचेच विचारें पुढें सांगलीस पुढील संस्कृत शिक्षणासाठीं कांहीं दिवस होतों. माझे सद्गुरु नृसिंहसरस्वती दीक्षितस्वामीमहाराज यांची आपल्या सद्गुरूंवरील म्हणजे प. प. वासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामींवरील एकनिष्ठ भक्ति, वैराग्यशील वागणूक, आचारविचारसंपन्नता, ज्ञाननिपुणता, सदयता इत्यादि त्यांच्या अनेक सद्गुणांमुळें मी त्यांचेकडे साहजिकच आकर्षिला गेलों व त्यांचा नम्र सेवक बनलों. हें टांचण करूनही दहा अकरा वर्षें झालीं. एक गुरुसेवा म्हणून सद्गुरूंचें चिंतन करीत भक्तिभावानें मनास येईल त्या प्रमाणें वेडेंवाकडें लिहीत सुटलों. यांत कांहीं माहिती ऐकीव, व बरीच माझा सहवास प्रत्यक्ष घडल्यानें पाहिलेली, विदित केली आहे. अर्थात् लेखनकला-विरहित असलेली अशी ही चरित्रकथा होय.

माझ्याबद्दल विशेष आदर असलेले सद्गुरुप्रेमी असे माझे परमस्नेही रा. रा. दिनकर गोपाळ देवधर– " मालक, माधव आर्ट स्टुडिओ, रास्ता पेठ, पुणें " यांच्यामुळें दोन तीन महिन्यांपूर्वी एका सुशील, संपन्न व गुरुप्रेमी व्यक्तींचा (अर्पण पत्रिकेंत त्यांचा उल्लेख आहेच) परिचय झाला. श्री-

दीक्षितस्वामीमहाराजांबद्दल त्यांचे मनांत अत्यंत आदर असून कांहीं नातलग संबंधही होता. बोलण्याचे ओघांत माझे मुखांतून सद्गुरुचरित्र लिहिल्याबद्दलचे उद्गार निघाले. तोंच सद्गुरुकृपेनें तें छापण्याबद्दल येणारा सर्व खर्च करणेचें त्यांनीं मनावर घेतलें व लगेच काम करणेस सुरुवात करणेबद्दल विनंतीही केली. त्यावेळीं निष्कांचन अशा मज संन्याशाला किती आनंद झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी. गुरुभक्तीस मजला विशेष साहय्य केल्याबद्दल मी त्यांचा अतिशय आभारी आहें.

शिष्याचें चरित्र म्हणजे त्याच्या गुरूंचे चरित्रांतील कांहीं भागच होय. अर्थात् श्रीनृसिंहसरस्वतीचें चरित्र हें श्रीवासुदेवानंद टेंबेमहाराजांचे चरित्रांतलाच एक भाग आहे असें दिसून येईल. या चरित्राबद्दल कांहीं सूचना करणें असल्यास व अधिक माहिती पुरविल्यास ती पुढील आवृत्तीचा सुयोग आल्यास त्यांत समाविष्ट करूं.

ज्यांनीं ज्यांनीं या सत्कार्यास सहाय्य केलें त्यांचे व छापखान्यांतील सर्व लोकांचे आम्ही अत्यंत आभारी आहों. शेवटीं सर्वसाक्षी परमेश्वराचें स्मरण करून हें निवेदन पुरें करतों. श्रीगुरुदेवदत्त.

आषाढ व. २, शके १८७६
तारीख १७-७-५४

श्रीनृसिंहसरस्वतीचरणकिंकर
शंकरस्वामी

कै. श्रीमंत माधवराव मोरेश्वर पंडित पंतआमात्य, हुकमत पन्हाह

जन्म : २९-११-१८५८ निधन : २३-७-१९२९

संस्थानाधिपति–गगनबावडा (कोल्हापूर)
कै. श्रीमंत माधवराव मोरेश्वर पंडित पंतआमात्य
हुकमत पन्हाह
यांच्या पुण्यस्मृतीस
त्यांच्या कन्या गं. भा. शांताबाई ऊर्फ लीलावतीबाई
पटवर्धन यांच्या सक्रिय सहानुभूतीनें
लेखकानें हा ग्रंथ अर्पण केला असे.

आषाढ व. २, शके १८७६
तारीख १७–७–५४

— शंकरस्वामी

अनुक्रमणिका

प्रकरण	विषय	पान
१	प्राथमिक शिक्षण व वैराग्य	१
२	श्रीवासुदेवांची भेट	१०
३	श्रीवासुदेवकृत हितोपदेश	२०
४	गृहस्थधर्माचरण व संन्यास	३२
५	सद्‌गुरुशोधार्थ गमन	४४
६	श्रीवासुदेवानंदांच्या पट्टशिष्यत्वाचा लाभ	५५
७	श्रीवासुदेवानंदांचा प्रेमसहवास	७१
८	सिद्धावस्था व उत्सव	८५
९	ईश्वरी सामर्थ्य	१०२
१०	योगिचर्येची पूर्वतयारी	१२२
११	योगिचर्या	१३९
१२	अमरापुरीं गमन	१६३
१३	गांवोगांवीं भक्तांकडून पूजा	१८१
१४	अमरापुरांत श्रीवासुदेवानंदस्थापना	२००
१५	बढणेरींत श्रीसीताराम-स्थापना	२२६
१६	श्रीगरुडेश्वरांत वास्तव्य	२४३
१७	सांगली येथें ज्ञानोपदेश	२७१
१८	श्रीअमरापुरक्षेत्रमाहात्म्यकथन	२९१
१९	कायर येथें नास्तिकाचा उद्धार	३१३
२०	उमरेडवास व काशीयात्रा	३३१
२१	श्रीक्षेत्र अयोध्यावास	३५०

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२६	१४	वतन	वर्तन
३२	१७	काळीं	स्थळीं
३८	१८	चिंतमाचें	चिंतनाचें
७७	१९	त्यांनीं	त्यांना
७८	१६	माउली	गाउली
१०३	२६	त्रमूर्ति	त्रैमूर्ति
१०४	२०	प्रभची	प्रभूची
१०५	३	वागं	वागूं
१२२	२	गणाविर्भाव	गुणाविर्भाव
१३३	२२	बलराम	नल, राम
१३४	३	पुजाऱ्यांना	पुजाऱ्यांनीं
१४१	१३	वासनाशा	वासनांचा
१४१	१८	उत्पादना	उत्पाटना
१५०	९	भायात्कसो	भयात्कंसो
१८४	२१	भक्तमनोरथपूर्वक	भक्तमनोरथ-पूरक
२३७	१	र्तीला	मूर्तीला
२५४	२८	माणें	प्रमाणें
३६४	२३	याजके	याजकेषु
,,	२४	गुणादयेषु शामवानेव	गुणाढ्येषु शमवानेव

प्रकरण १ लें

श्रीक्षेत्र नृसिंहवाडीच्या दक्षिण दिशेला शंकरापुरनामक एक पुराणप्रसिद्ध क्षेत्र आहे. हल्लीं त्याला "सदलगा" असें म्हणतात. वेधगंगा नांवाची नदी या क्षेत्रांतून वाहते. वैदिक ब्राह्मणांची वस्ती येथें फार आहे. या क्षेत्रांत श्री-नृसिंहसरस्वती दीक्षितस्वामीमहाराजांचे पूर्वज रहात असत. यज्ञ केल्या-कारणानें त्यांना दीक्षित ही पदवी मिळाली. ते दीक्षित पुढें श्रीदत्तमहाराजांचे एकनिष्ठ भक्त बनले. नरसोबाचे वाडीला येऊन दर शनिवारीं व प्रतिपौर्णिमे-ला श्रीदत्ताची महापूजा करण्याचा त्यांचा नेम होता. महापूजा जर द्रव्याच्या अडचणीमुळें एखादे वेळीं करतां आली नाहीं तर निदान श्रीदत्तपादुकांना ओलेत्यानें श्री-कृष्णेचें पाणी तरी न चुकतां घालायचें, प्रभुरायाची पालखी पहायची व पाहून दुसरे दिवशीं तीर्थ-अंगारा घेऊन परत सदलग्याला जायचें असा त्यांनीं अव्याहत क्रम चालू केला. दत्ताचें अखंड नामस्मरण करीत गृहस्थ-धर्म चालवून हरिभजनांत ते सर्वकाळ तल्लीन रहात. म्हातारे झाले तरी ते वाडीला शनिवारच्या वारीला पायीं चालत येत. पायांत पादत्राण घालायचें नाहीं असा त्यांचा वारी करण्याचे वेळचा नियम होता. वृक्षाखालीं सांवली घेत बसायचेंदेखील नाहीं, घरांतून निघाल्यावर वाडींतच विश्रान्ती घ्यायची अशा कटाक्षानें ते वारी करीत. पुढें पुढें ते वृद्धावस्थेमुळें चालतांना फार थकूं लागले. उन्हाळ्यांतल्या गरम धुरळ्यानें त्यांच्या पायांना ताप होऊं लागला, तरी ते वारी करीतच असत. मरेपर्यंत वारी सोडायची नाहीं असा त्यांचा पण होता. श्रीदत्तभगवंताला ते दीक्षितांचे श्रम पाहून भक्तांचा कळवळा आला. एकदां दीक्षित वारीला येतांना उन्हानें फार तप्त झाले होते. कृष्णापंचगंगेच्या संगमापर्यंत ते मोठ्या शिकस्तीनें आले. नऊ मैल वाट चालून थकलेल्या त्या

भक्तवर्याला पाहण्यासाठीं श्रीदत्तभगवान् श्रीनरसिंहसरस्वतीप्रभु आपण होऊन संगमावर गेले. तों तो भक्तराज थकला आहे व कृष्णापंचगंगासंगमांत स्नान करीत आहे असा त्यांना दिसला. ब्राह्मणरूपानें पुढें होऊन प्रभूंनीं त्याला विचारलें कीं, "काय हो दीक्षित! दत्तापुढें घाटावर स्नान करण्याचा तुमचा नेम असतां, आज येथें कां स्नान करतां?" त्यावर दीक्षित म्हणाले, "मी आज फार थकलों आहें व उन्हाच्या तापानें व्याकुळ झालों आहें. थंडाव्याकरितां येथें स्नान केल्यावांचून मला पुढें येणेंच होईना म्हणून असें केलें. पुन्हां घाटावर जाऊन स्नान करणारच आहें." दीक्षितांचें भाषण ऐकून प्रभूचे हृदयाला द्रव आला. त्याला भक्ताचे कष्ट सहन झाले नाहींत. भक्तापेक्षां तोच अधिक दुःखी झाला व म्हणाला, "दीक्षितोत्तमा! तुम्हीं आतां म्हातारे झालां करितां वारी बंद कां करीत नाहीं?" दीक्षित म्हणाले, "देह जोंपर्यंत ताब्यांत आहे, तोंपर्यंत त्याचेकडून काम घेतों. पराधीन झाल्यावर मग श्रीदत्तभगवंताचें चरणदर्शन मिळेल काय?" हें उत्तर ऐकून ब्राह्मणाचें स्वरूप टाकून भगवान् एकदम प्रगट झाले. त्यांनीं कारंजपुरांत अवतार घेतलेलें आपलें नरहरि म्हणजे नरसिंहसरस्वती यतीचें स्वरूप दीक्षितांना प्रत्यक्ष दाखविलें तें असें—

मृतविप्रसुतं व्यजीवयद्यउवंध्यां महिषीमदोहयत् ॥
स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान्मेस्तिपरावरागतिः ॥ १ ॥

पायामध्यें सुवर्णाच्या पादुका, हातांत दंडकमंडलु, गळ्यांत रुद्राक्षांची माळ कपाळीं भस्माचे त्रिपुंड्र, कटीला कौपीन व अंगावर छाटी त्यांनीं परिधान केली होती. प्रसन्न वदनानें कृपार्द्र दृष्टि उघडून त्यांनीं निजवासाला पाहिले व संगमांतले तीन गोटे हातांत घेऊन (संगमाचे प्रवाहांतून वर काढल्यासारखे दाखवून, स्वयें निर्माण केलेले ते गोटे) प्रभूंनीं भक्तापुढें धरले व म्हणाले "हे भक्तोत्तमा, ज्याचे दर्शनाला तूं दर शनिवार पौर्णिमेला येथें येतोस तेच आम्ही आहों बरें! हें घे तुला आमचें त्रैमूर्ति-स्वरूप आम्ही देत आहों. हीं तीन गोटे घे व आपल्या घरीं यांची पूजा करीत जा म्हणजे आमची वारी तुला तेथेंच घडत जाईल. इतःपर वाडीला आतां वारीकरितां येत जाऊं नको

तुझी वारी पुरी झाली. तुझ्या भक्तीचें फळ द्यायला तुझ्या वंशांत भक्तरूपानें आम्ही स्वतःच उत्पन्न होऊं व हेंच नरसिंहसरस्वती नाम धारण करूं'' असें सांगून प्रभू त्याचे समोर तो पहात असतांच गुप्त झाले. तेव्हां दीक्षितोत्तमांना जो आनंद झाला त्याला पारावारच नाहीं. प्रभुरायानें दिलेली त्रैमूर्ती घेऊन ते आपली यात्रा पुरी करून म्हणजे दत्ताची महापूजा पालखी वगैरे करून प्रसाद, तीर्थ, अंगारा घेऊन आनंदानें परत आपल्या गांवीं सदलग्याला गेले. तेव्हांपासून ते वाडीला यायचे बंद झाले. श्रीदत्ताच्या आज्ञेप्रमाणें घरींच त्रैमूर्तीचें पूजन करून तीर्थप्रसाद घेऊं लागले व भक्ति करीत राहिले.

यांच्याच वंशांतला एक पुण्य पुरुष कांहीं कालानें क्षेत्रवासार्थ श्रीनरसोबाचे वाडींत येऊन सहकुटुंब राहिला. त्याचा वंश पुढें तेथें वृद्धिगत झाला. त्या दीक्षित वंशवृक्षाचें फूलच असे श्रीलक्ष्मण दीक्षित शोभूं लागले. त्याच फुलांतून श्रीनृसिंहसरस्वती हें फळ निर्माण झालें. यांच्या जन्मानें दीक्षितवंश संपूर्ण उद्धरला गेला, तो कथाभाग पुढें येईल. लक्ष्मणशास्त्री हे महाभागवत होते. जसे ते आचारविचारसंपन्न असून पंचमहायज्ञ करणारे धर्मनिष्ठ ब्राह्मण होते, तसेच श्रीदत्ताचे प्रेमळ कीर्तनभक्त देखील ते होते. श्रीदत्ताच्या कट्टयावर मंदिरापुढें दक्षिणद्वारांत त्यांचें हरिकीर्तन नेहमीं चाले. कीर्तन श्रवण करून दत्तमहाराज त्यांच्यावर प्रसन्न असत. त्यांचा योगक्षेम प्रभु दक्षतेनें चालवीत. संकटकालीं स्वतः जाऊन त्यांचें रक्षण करीत. स्वप्नांत त्यांचेबरोबर बोलतदेखील असत. श्रीदत्ताला लक्ष्मणशास्त्री अतिशय प्रिय झाले होते. तशीच त्यांची भार्या श्रीअहिल्या हयादेखील मोठ्या धार्मिक होत्या. पतिसेवापरायण त्या असत. पतीच्या आज्ञेनें दत्तप्रभूला त्या प्रदक्षिणा घालीत, गुरुचरित्र श्रवण करीत. तें त्यांना लक्ष्मणशास्त्री वाचून दाखवीत असत. अतिथीअभ्यागताचें पूजन योग्य रीतीनें त्या करीत. कितीहि माधुकरी आले तरी सर्वांना आनंदानें माधुकरी वाढण्याची अहिल्याबाईंची पद्धत होती. आईबापांचे गुण पुत्रांत उतरतात या गोष्टीचा अनुभव लक्ष्मण दीक्षित व अहिल्याबाई यांच्या चरित्रावरून लक्षांत येतो. लक्ष्मण दीक्षितांची श्रद्धाभक्ति व अहिल्याबाईंची अतिथिभक्ति त्यांच्या पोटीं जन्मलेल्या नृसिंहसरस्वतींचे अंगीं परिपूर्ण होती. असतु. स्वधर्मपरायण व भगवद्भक्तिपरायण असे सन्मान्य दंपती जे

लक्ष्मण दीक्षित व अहिल्याबाई यांनाच आपले जनक-जननी करण्याचा निचश्य दत्तप्रभूंनीं वरदानानुसार केला. अहिल्याबाई गरोदर राहिल्या. त्यांच्या गर्भाशयांत नरसिंहसरस्वती गर्भरूपानें वाढूं लागले. तेव्हां त्यांना यथाकाल करण्याचे संस्कार लक्ष्मणशास्त्र्यांनीं केले. अहिल्याबाईंना गर्भगत पिंडाच्या स्वभावाप्रमाणें डोहाळे लागले. वैराग्य, भक्ति व ज्ञान या त्रयीचा उल्लेख त्या वरचेवर करूं लागल्या. निवृत्तिमार्गाची आवड त्यांना उत्पन्न झाली. विशेषेंकरून गुरुभक्तीच त्यांना फार करावीशी वाटूं लागली. गुरुमंदिर बांधावें, त्यांत गुरुमूर्ती स्थापावी व त्यांचे उत्सव अखंड करावेत अशी भाषा त्यांचे मुखानें केव्हां केव्हां निघालेली ऐकूं येत असे. या डोहाळ्यांवरून निवृत्तिनिष्ठ सद्गुरुभक्त असा सत्पुरुषच आपणांला पुत्र होणार, असा लक्ष्मणशास्त्र्यांनीं निश्चय केला. त्यांना या गोष्टीचा आनंदच झाला. कारण ते स्वतः प्रपंचांत असले तरी अंतरांतून निवृत्तिनिष्ठच होते. म्हणून तर परमेश्वरानें त्यांचे उदरीं वास केला.

नऊ महिने पुरे होतांच शके १७८८ प्रभवनाम संवत्सरांत चैत्र शुद्ध प्रतिपदेला अहिल्याबाई दिवसा दुसऱ्या प्रहरांत प्रसूत झाल्या. त्यांना मनमोहन स्वरूपाचा दिव्य बाळ झाला. श्रीनृसिंहसरस्वती दत्तप्रभु आपलें वरदान सत्य करण्यासाठीं अहिल्या-लक्ष्मणांचे पुत्र झाले. आमचे चरित्रनायक हेच होत. पुत्रजन्म होतांच जनकानें जातकर्मसंस्कार केला; आनंदानें सर्वांना साखर वांटली व पुत्रजन्म जरी प्रतिपदेवर झाला होता, तरी सकाळीं थोडीशी अमावास्या सूर्यानें पाहिली होती; म्हणून तद्दोषपरिहारार्थ लक्ष्मणशास्त्र्यांनीं वृद्धि फिटल्यावर शान्ती केली. त्यायोगें अमावास्येचा दोष निवारण झाला. पांचवी पूजन थाटानें झालें. बारावे दिवशीं मुलाला पाळण्यांत घातला. विधिपूर्वक सर्व कर्तव्य करून झाल्यावर सायंकाळीं मुलाचें नांव 'नारायण' असें ठेविलें. बारशाचा उत्सव करून सर्वांना भोजन, दक्षणा वगैरे दीक्षितांनीं दिली. पुत्रजन्मोत्सव मोठ्या आनंदानें केला. अहिल्या मातेनें सालंकृत नारायणाला स्तन्यामृतानें संतुष्ट केला. नारायण दिवसेंदिवस वाढूं लागला, तसतसा तो नाना कौतुकें दाखवून आईबापांना रमवूं लागला. जननी व जनक पुत्रलीला पाहून धन्यता मानीत. आठव्या वर्षी नारायणाचा व्रतबंधसंस्कार

करण्यांत आला. कांहीं दिवसांनीं प्राथमिक शिक्षणासाठीं लक्ष्मणशास्त्र्यांनीं नारायणाचे मावशीकडे त्याला ठेविला. इचलकरंजींत श्रीपादपंत कुलकर्ण्यांचे घरीं म्हणजेच मावशीचे घरीं श्रीनारायण दीक्षित विद्याभ्यासार्थ राहिले. आपलें ब्रह्मचारी आश्रमाचें आन्हिक कर्म करून ते विद्या शिकूं लागले.

विद्यार्थी अवस्थेंत असतांना नारायण दीक्षित मोठे खेळाडू होते. बुद्धिमान मुलांना अभ्यास करूनदेखील खेळावयाला पुष्कळ वेळ मिळतो. मंद बुद्धीच्या विद्यार्थ्यांनाच एकसारखी घोकंपट्टी करीत बसावें लागतें, तसें नारायणांना बसावें लागत नसे. एकदां शाळेचा नित्याचा अभ्यास ते करून घेत व नंतर मुलें जमवून नाना प्रकारचे खेळ सदा खेळत रहात. थट्टा–विनोद, मारामारी वगैरे अल्लडपणांत त्यांचा पहिला नंबर असे तसा शाळेंतदेखील पहिलाच नंबर असे.

बरेचसे मोठे झाल्यावर नारायण केव्हां तरी मुलांना बरोबर घेऊन इचलकरंजींतील नदीवर जाण्याचे रस्त्यावर खेळत रहात. त्याच रस्त्यानें आया-बाया पाणी आणीत असत. कौतुकी नारायण त्यांची चेष्टा करीत व त्यांना राग आणवीत. त्या रागावल्याशा दिसल्या कीं आपण मुलांना घेऊन पळून जात. एकदां एकाची सून मातीची घागर डोक्यावर घेऊन पाणी भरून घेऊन येत होती. नारायणांनीं तिला दिसणार नाहीं अशा बेतानें मागाहून तिच्या घागरीवर खडा मारला. घागरीला छिद्र पडलें. त्यांतून पाणी वाहूं लागलें. बाईची तनू भिजूं लागली. तेव्हां ती संतापून पोरांना शिव्या देऊं लागली. नारायण तिच्यापुढें गेले व तिच्या समाधानाच्या गोष्टी तिला शिकवूं लागले. तिच्याबरोबर आपणदेखील इतर मुलांना रागेजले व 'हीं पोरें फार द्वाड आहेत, यांना मी त्यांच्या आईबापांकरवीं शासन करवितों,' असें म्हणून त्या बाईला म्हणाले, "बाई! जा आतां तुम्ही दुसरी घागर घ्या व पाणी न्या. मी पाहतों कशीं मुलें तुम्हांला त्रास देतात तीं." बाई शांत झाली व घरीं गेली. नारायणांचें हें शिताफीचें करणें पाहून सवंगड्यांना फार कौतुक वाटलें. ते नारायण आपला मालक आहे असें मानून त्याचे म्हणण्याप्रमाणें वागूं लागले.

इचलकरंजींतील शिक्षण पुरें झाल्यावर श्रीनारायण हे वाडींतच कांहीं दिवस राहिले होते. अजून त्यांची विद्यार्थी अवस्थाच होती. तथापि वडिलांनीं त्यांचा विवाह करून दिला. लौकरच नारायण सपत्निक झाले. वाडींत असतांनासुद्धां ते फार अल्लडपणा करीत. वाळवंटांत मुलांबरोबर ते शर्यतीचे खेळ खेळत. आटयापाटया, खोखोचे खेळ, एकापुढें एकानें पळत जाणें, एकमेकांची पाठ शिवणें इत्यादि प्रकारें ते नेहमीं कृष्णेच्या तीरावर खेळत रहात. धांवत-पळत जाण्यामध्यें नारायण हे सर्वांपेक्षां चपळ होते. तसेच ते पोहण्यामध्यें निपुण होते. मारामारी करून दुसऱ्याला जिंकण्यांत ते पटाईत असत. कुरुंदवाडच्या मुलांची व वाडीकर मुलांची एकदां वाळवंटांत मारामारी झाली. नारायण त्यांत होते. त्यांनीं कुरुंदवाडच्या एका मुलाला खड्डा काढून मानेइतका वाळूंत पुरून ठेवला. तेव्हां बाकीचे त्याचे दोस्त पळून गेले. लहानपणीं नारायणांचा असा अल्लड स्वभाव होता.

अल्लडपणांतच अंतर्भूत होणारा शानशोकीपणादेखील नारायणांचे अंगीं त्या वयांत होता. त्याबद्दलचा इतिहास असा आहे कीं, मराठी शिक्षण पुरें करून नारायण इंग्रजी शिकण्यासाठीं मिरजेला राहिले होते. इंग्रजी शिकणारे विद्यार्थी बहुतेक फॅशनेबल पद्धतीनेंच वागतात. नारायणदेखील तसेच वागूं लागले. कॉलरीचा सदरा, त्यावर जाकीट, कोट, पाटलोण व खिशामध्यें घडयाळ असा त्यांचा पोषाख असे. घरीं असतांनासुद्धां ते धोतरें अगदीं परीटघडीसारखीं स्वच्छ नेसत. गंध कोरून लावीत व टापटिपीनें रहात. इंग्रजी शिकूं लागल्यापासून वर सांगितल्याप्रमाणें कपडेलत्ते ते करीत असत. मस्तकावर शेंडीच्या भोंवतीं घेरा जरा व्यवस्थित ठेवीत. इतकाच नूतनपणा त्यांचे आचरणांत होता. टाळू राखून शेंडीला अजिबात फांटा मात्र त्यांनीं दिला नव्हता व अपेयपान किंवा अभक्ष्य भक्षण ते करीत नसत. अगदीं जुन्या मंडळीच्या दृष्टीनें ते जरा पुढें गेलेले दिसत इतकेंच. सहवासी शाळाबंधूंप्रमाणें ते वागूं लागले होते. संगतीचा तो परिणाम होता म्हणा किंवा स्वाभाविकच ते तशी लीला करीत होते असें म्हटलें तरी कांहीं हरकत नाहीं. अस्तु.

तेजस्वी पुरुषांना सर्व शोभतें व सर्व करून दाखवितांहि येतें. जसें करून दाखवितां येतें तसें तें सोडूनहि देतां येतें. तेजस्वी पुरुष व सर्वसाधारण पुरुष या दोघांत फरक इतकाच असतो कीं, सर्वसाधारण पुरुष वाटेल तसा वागतो आणि त्या वृत्तींतच गढून जातो. त्याला ती वृत्ति सोडून देतां येत नाहीं आणि तेजस्वी पुरुष वाटेल तसा वागून त्यांत अलिप्त राहतो व प्रसंग आला म्हणजे ती वृत्ति तावडतोब सोडून देतो. एक बद्धच राहतो व दुसरा मुक्त होतो, असा दोघांत फरक आहे. नारायणांनीं सर्वसाधारण अशा आपल्या शोबत्यांपेक्षां आपला तेजस्वीपणा एके प्रसंगीं दाखवून आपल्या सर्व सवंगड्यांना चकित केलें. अशी गोष्ट झाली कीं, एके दिवशीं शाळामित्रांबरोबर नूतन पोषाख चढवून नारायण रस्त्यानें चालले होते. अभ्यासाचीं पुस्तकें वगैरे यांचे हातांत होतींच. इतक्यामध्यें पुढून शंकरशास्त्री नांवाचे सज्जन येत होते. त्यांनीं यांना त्या ऐटदार पोषाखांत अवलोकन केलें व विस्मित होऊन क्षणभर उभे राहून त्यांच्याकडे पाहूं लागले. त्यांनीं नारायणांना आपल्या जवळ हांक मारली व म्हणाले, "तुम्हीं कुठें राहणारे? व कोणाचे कोण आहां बरें?" शास्त्रीबुवांनीं त्यांना ओळखूनच असा प्रश्न केला होता. त्याचें उत्तर नारायणांनीं सरळच दिलें. "मी नरसोबाचे वाडींत राहणारा, लक्ष्मण दीक्षितांचा सर्वांत धाकटा मुलगा आहें." धाकटा मुलगा म्हणतांच शास्त्रीबुवांचे ध्यानांत आलें कीं हा बापाचा लाडका असला पाहिजे व म्हणूनच हा बापाला भीत नाहीं आणि वाटेल तसा वागतो. नारायणांना ते म्हणाले, "बाळा! तुझे वडील सनातन धर्माचे कट्टे भक्त आहेत व श्रीदत्ताचे देखील ते मोठे भक्त आहेत. असें असून त्यांचा मुलगा तूं, असा इंग्रजी पद्धतीनें वागतोस व इंग्रजी शिकतोस. तुला काय म्हणावें! हें तुला शोभतें ना! बाळा! वडिलांची व कुळाची कीर्ति अशानें दूषित होत नाहीं काय?" शंकरशास्त्री साहजिक रीतीनें असें बोलून गेले.

पण त्या साधुवचनाचा परिणाम असा झाला कीं, नारायणांची वृत्ति एकदम बदलली. त्यांनीं विचार केला कीं, आपल्या पित्याची किंवा आपल्या कुळाची अपकीर्ति व अधोगति करण्यासाठीं मी कांहीं जन्मलों नाहीं. या सत्पुरुषांचे म्हणण्याप्रमाणें मी गैरशिस्तच वागत आहें. हें वर्तन योग्य नव्हे. हें

दूषण आहे, भूषण नव्हे; असें मनांत म्हणून सडकेवर उभे असतांच त्या शास्त्रीबुवांसमोर नारायणांनीं अंगावरील सर्व फॅशनेबल पोषाख काढून गटारांत फेंकला, घडयाळ फोडून टाकलें, इंग्रजी पुस्तकें भिरकावून दिलीं व एक साधें धोतर नेसून ते शंकरशास्त्र्यांना म्हणाले, "आतां मी कसा दिसतों ?"

त्यावर ते शास्त्री चकितपणानें म्हणाले, "अरे बाळ! काय केलेंस हें! मला असें कळतें तर मी बोललोंच नसतों. तुझे बाबा तुला आतां रागें भरतील कदाचित्. मग रे पुढें कसें ?"

नारायण म्हणाले, "बाबांना तरी माझें वागणें कुठें आवडत होतें ? मीच असा वागत होतों. पण तुमचे वाक्यानें मनाला उपरति होऊन माझ्या मनानेंच मी हे सर्व फंद सोडले. बाबांना हें कृत्य पसंतच पडेल. मी आतां पुन्हां या भानगडींत पडणारच नाहीं. तें इंग्रजी शिकणें नको व हा असा शानशोकीपणाहि नको. माझा हा निश्चय पूर्ण झाला. 'ब्राह्मणाचा देह कृच्छ्र तपश्चर्या करून अनंत सुखाचा लाभ करून घेण्यासाठीं आहे' असें मला बाबा म्हणत असत तें भाषण आज फलद्रूप झालें.

नारायणांचा कृतनिश्चय पाहून शंकरशास्त्री संतुष्ट झाले. ते म्हणाले, "शाबास बाळा!! तूं पूर्ण विचारी मुलगा आहेस. शेवरीच्या कापसाला वारा जसा उडवून दूर नेऊन टाकतो तसा तूं विचाररूपी वायूच्या वेगानें आपलें आजपर्यंतचें संवयीचें सर्व वर्तन एकदम पार झुगारून दिलेंस, त्याला उडवून लावलेंस. मी नुसता निमित्तमात्र झालों. तुझ्या करारी व विवेकी स्वभावावरून आम्हांला तुळशीदासाची आठवण झाली. तोहि तुझ्याप्रमाणेंच नादिष्ट होता पण एकाएकीं त्यानें तुझ्याप्रमाणेंच सर्व नाद सोडून टाकला, भक्तीला लागला व ईश्वरी अवतार असें आपणांला म्हणवून घेता झाला. तुझादेखील प्रकार तसाच आहे. तूंदेखील भक्ती करून ईश्वरावतारच म्हणवून घेशील असें आम्हांला वाटतें." असें म्हणून शंकरशास्त्री नारायणांना आपल्या घरीं घेऊन गेले. कांहीं दिवस गेल्यावर मिरज सोडून नारायण दीक्षित आपल्या घरीं नृसिंहवाडींत येऊन राहिले. त्यांनीं शिक्षण संपविलें व

यावरोबर आपला अल्लडपणा, शानशोकीपणा, द्वाडपणा वगैरे सर्वच बाल्य-
वभाव झडझडून सोडून दिला. अश्व जसा अंग झाडून अंगावरील धुरोळा
उडवून स्वच्छ होतो तद्वत् नारायणांनींहि आपलें अंतरंग झाडून दुर्वृत्ति पार
उडवून दिल्या व स्वच्छ होऊन घरीं येऊन राहिले. यालाच म्हणतात
ाजस्वी पुरुष.

प्रकरण २ रें

"जल तेरा रंग कैसा । जिसमें मिलावेगा वैसा" या म्हणीप्रमाणें श्री-नारायण प्रथम जशी जशी मित्रमंडळी भेटली तसतसे वागले व नंतर 'दुःशकं किं धृतात्मनाम्' या वचनानुसार सर्वसंगपरित्याग करून ते मोकळे झाले. आपला नारायण विरक्त झालेला पाहून लक्ष्मण दीक्षितांना बरें वाटलें. तद्वत् त्यांना एक तऱ्हेनें आश्चर्यदेखील वाटलें. 'एकाएकीं नारायणाचा स्वभाव असा कसा पालटला बुवा!' असें ते मनांत म्हणाले. गिरजेतले नारायणांचे शाळासोबतीसुद्धां असेच म्हणाले होते. त्यांनादेखील दीक्षितांचें स्वभावपरिवर्तन पाहून नवल वाटलें. त्याप्रमाणें सर्वांनाच नवल वाटायला लावण्याला नारायणांनीं सुरुवात केली. ते कपडेलत्ते साधे वापरूं लागले. खाण्याच्या बाबतींत त्यांनीं नियमितपणा धरला. बोलणें बेताचेंच बोलूं लागले. सदा सर्वकाळ विचारग्रस्त असल्यासारखे ते घरांतील मंडळीला दिसत. नवीन मार्ग आक्रमण करण्याचे विचारांत ते निमग्न असत. ही गोष्ट कृष्णशास्त्री वष्ट यांना समजली. ते त्या वेळीं वाडींत शास्त्रशाळेचे अध्यापक होते. त्यांनीं नारायणांना आपल्या घरीं आणिलें व शास्त्राध्ययन करण्याचा उपदेश केला. तो नारायणांना पटला. संस्कृत शिकायला त्यांनीं सुरुवात केली. शास्त्रीबुवा त्यांची बुद्धिमत्ता पाहून खूष झाले. ते म्हणाले, "नारायण दीक्षित सर्व विद्यार्थिवर्गांत पहिला आहे. सांगितलेल्या शास्त्रीय विषयांतलें मर्म हा तत्काळ ग्रहण करतो; मोठा मर्मज्ञ आहे." कांहीं दिवसांनीं नारायण न्यायशास्त्र पढूं लागले. न्याय शिकविणारे गुरुजी दुसरे होते. कृष्णशास्त्री काव्य, व्याकरण सांगत. दुसरे गुरुजी गाडगीळ. हेसुद्धां नारायणांची

बुद्धि विशाल आहे असें म्हणत. दोन्ही शास्त्रगुरुजी नारायणांवर प्रसन्न असत. तेजस्वी पुरुषाचें तेज सर्वांवरच पडतें व सर्वच त्याला नांवाजतात.

श्रीनारायण शास्त्रव्युत्पन्न झाले. आतां यापेक्षां शास्त्र शिकण्याचें जास्त व्यसन नको असें त्यांनीं ठरविलें. विद्याभ्यसनापेक्षां हरिपादसेवनाचें महत्त्व त्यांना अधिक वाटलें आणि शास्त्राभ्यास त्यांनीं पुराच केला. उगाच नैमित्ताला शास्त्रीबुवांकडे ते आतां जाऊं लागले व गेल्या वेळीं बाकीच्या विद्यार्थ्यांनादेखील ते हरिभक्तीचे आगले विचारच पटवूं लागले. गंजिफा खेळण्याचा कांहीं विद्यार्थ्यांना नाद होता. श्रीनारायणांनीं त्यांत एक शक्कल काढली. गंजिफांचा सप्ता त्यांनीं मांडला व तो सात दिवस चालविला. विद्यार्थी मुलें तो पाहून चकित झालीं. पुन्हां नारायणांनीं सप्ता करण्याचें ठरविलें. त्याला मुलें कबूल झालीं. त्या वेळीं आपणांला अनुसरणाऱ्या मुलांना घेऊन नारायणांनीं गंजिफा सोडून श्रीगुरुचरित्राचाच सप्ता प्रत्येकाकरवीं करविला. आपणदेखील केला. आपल्या मताचे सर्व सोबती केले व हरिभक्तीकडेच त्यांना वळविलें. प्रल्हादाचे कृतीचा हा एक नमुना त्यांनीं आपल्या वागण्यांत दाखवून दिला व नंतर शाळा सोडून दिली. 'बहुत शास्त्राध्ययनबुद्धां अभिमान वाढविण्याला कारणीभूत होतें. कारणापुरतें आपणांला तें येऊं लागलें आहे, आतां तें पुरे' असा विचार त्यांनीं केला. कारण त्यांना प्रवृत्तीमध्यें पडायचें नव्हतें, भक्तीच अवलंबावयाची होती.

नारायण दीक्षित हे नृसिंहसरस्वती-दत्ताच्या वरानें जन्म पावलेले, त्याची विभूतीच होते. म्हणून त्यांचें सर्व वर्तन लोकांपेक्षां विलक्षणच असे. बाळपणींच्या वागण्यांत जशी त्यांची अलौकिकता होती तशीच प्रौढावस्थेंतील वर्तनांतसुद्धां ती होतीच. विवाह तर त्यांचा झालेलाच होता. रेंदाळकरांची कन्या ही त्यांची पत्नी होय. तिचें नांव वाराणशी होतें. सुशील व पतिप्रेमी अशी ती साध्वी होती. नारायण हे पूर्वसंस्कारानुरूप वैराग्यवृत्तीनें वागूं लागले. सर्वकाळ एकान्तवास करीत घरांतील एका खोलींत बसून रहात. चित्तप्रधान व ज्ञानप्रधान ग्रंथ वाचीत व त्यांतच ते रमून जात. वेळच्या वेळीं स्नान करणें, स्वतः आपलीं धोतरें आपण धुणें, आपणांला संध्येला लागणारें पाणी आपण आणणें, भस्म लावून संध्या करणें, गुरुचरित्र वाचणें, भोजनाचे

वेळीं मुकाट्यानें पानावर बसून आवडनावड न लावतां जेवणें व सर्वकाळ वेदेश्वरी किंवा एकनाथी भागवत खोलींत बसून वाचणें हा नित्यक्रम त्यांनीं चालू केला. तपस्वी स्वयंदास असतात तसे ते वागूं लागले. पूर्वीपेक्षां अगदीं निराळी वृत्ति त्यांनीं धरली. पूर्वीं स्नान करून कोरडें धोतर नेसतांना ते पहिलें ओलें धोतर सोडून पायानें लोटून देत असत. वाराणशी तें व्यवस्थित धुऊन वाळत घालीत असे. याचप्रमाणें अन्य व्यवहारहि चालत. तो आतां त्यांनीं सर्व सोडून टाकला. थट्टा, विनोद करीनासे झाले. लोकदृष्ट्या एकलकोंडेच बनले. त्यांचें हें वर्तन वाराणशीला मनांतून आवडत नसे. कारण पतीप्रमाणें ती कुठें विरक्त बनली होती? तिची इच्छा प्रपंचसुखावरच होती. इंग्रजी शाळा सोडून पति विरागी झालेले पाहणें तिला रुचेना. तिची आनंदवृत्ति मावळूं लागे. पण पतिव्रता ती काय बोलणार? एखादे वेळेस आपल्या मैत्रिणीशीं मात्र ती म्हणे, "यांनीं इंग्रजी विद्या उगाच सोडली. शिकून एखादा द्रव्यव्यवसाय करते तर नसतें का झालें! आतां धन कसें मिळेल?" इत्यादि. अल्प बुद्धीमुळें ती तसें म्हणे. असो.

नारायण एकान्तवासी जरी झाले तरी त्यांचे वडील लक्ष्मण दीक्षित जेव्हां जेव्हां उत्सवप्रसंगीं किंवा अन्य काळीं दत्तात्रेय भगवंतापुढें उभे राहून कीर्तन करीत तेव्हां त्यांचे मागें उभे राहून टाळ वाजवून त्यांची साथ कीर्तनांत ते करीत असत. गायन-वादन त्यांना चांगलें अवगत होतें. साथी करण्यापुरते नारायण बाहेर पडत. एरवीं सदासर्वदा एकटेच खोलींत वाचीत बसत. भोजनांत त्यांचें वैराग्य होतें असें पूर्वी सांगितलेंच आहे. त्या वैराग्याची त्यांची एक गोष्ट नवल करण्यासारखी आहे. ती थोडक्यांत सांगतों—

कोणे एके वेळीं कीर्तन करण्यासाठीं आमंत्रणावरून लक्ष्मणशास्त्री परगांवीं गेले होते. घरांत नारायण व त्यांची बहीण यमुना अशीं दोघेंच भावंडें राहिलीं होतीं. एकदां कोणता तरी एक सण आला. बाजार वगैरे करणें यमुनाबाईच करीत. कारण नारायण उदासीन बनलेले होते. सणाचे दिवशीं यमुनाबाईंनीं बाजारांतून कोंवळीं दोडकीं आणलीं (कोणी वाळकें आणलीं म्हणतात). सगळचा दोडक्यांची भाजी व खीर, भात, वरण वगैरे सर्व स्वयंपाक तयार

केला. जेवणारा पुरुष काय तो नारायणच, दुसरें कोणी नाहीं. नैवेद्य झाल्यावर नारायणाचें पात्र वाढून यमूताईनीं त्यांना भोजनाला बसविलें. नारायण भोजन करूं लागले. त्यांची भाजी संपलेली पाहून यमूताईनीं पुन्हां वाढली. ती नारायणांनीं लवकरच संपविली. यमुनेला वाटलें कीं, 'नारायणाला वोडकी फार आवडली म्हणून हा आज भाजी जास्त खात आहे. कधींसुद्धां जास्त भाजी न खाणारा आज ती आवडीनें खात आहे. तर, यालाच सर्व तयार केलेली भाजी वाढावी. जो आवडता पदार्थ, तोच पक्वान्न होय. नारायणाचा संतोष मी भाजीनेंच करीन; मला ती उरली नाहीं तरी चालेल ' असा बंधुप्रेमी यमताईनीं विचार केला व नारायणांनीं भाजी संपविली कीं पुन्हां त्यांनीं ती आणून वाढावी अशा क्रमानें सर्व भाजी बंधुरायाला वाढून संपवून टाकली. नमुन्यासाठीं दोन फोडी म्हणजे एक चार आंगळें लांबीचें दोडकें शिल्लक ठेवलें. नारायणांनीं खीर पहिली तेवढीच खाल्ली. भाजीच्या मेजवानीपुढें त्यांना जास्त खाण्याला ती आवडली नाहीं व सवडदेखील झाली नाहीं. भोजन आटोपलें. नारायण आपल्या ठिकाणीं गेले. यमुनाबाई जेवणाला बसल्या. नारायणाच्या प्रीतीची भाजी त्यांनीं प्रथमच सेवन करून पाहिली. तों त्यांना नारायणाच्या वैराग्याचें व भाजीचें ज्ञान एकदमच झालें. त्यांना भाजी जिभेला लावतांच उन्मळून आलें. त्यांची जीभ कडू झाली व मनदेखील तसेंच झालें. त्यांना जेवण सुचेना, कसेंतरी अर्धपोट भरून त्या उठल्या व हात धुऊन नारायणापाशीं अगोदर आल्या व म्हणाल्या, " नारायणा ! इतकी विषाप्रमाणें कडू जहर भाजी तूं कशी खाल्लीस बाळा ! ! " नारायण म्हणाले, " यमूताई, आपल्या आई केव्हां केव्हां कारल्याची भाजी करीत असतात. ती जशी मी खातों तशीच ही खाल्ली. " यमूताई म्हणाल्या, " धन्य आहे तुझी. मला नाहीं बा एक फोडसुद्धां गेली. अरे तूं ती खाल्लीस कशाला ? " नारायण म्हणाले, " प्रेमानें वाढलीस म्हणून. " " प्रेमानें वाढली म्हणून काय झालें ? टाकायची होती तशीच. " यमू म्हणाली. त्यावर नारायण म्हणाले, " कशानें तरी प्राणाची शान्ती करावयाची ती भाजीनेंच केली झालें. " यमूताई म्हणाल्या, " नारायणा ! तूं दिव्य पुरुष गला दिसतोस. अरे, तूं पहिली आपली रागरंगिता सोडून इतका विरक्त कां झालास ? " त्यावर श्रीनारायण

म्हणाले, " यमूताई, आपले बाबा कीर्तनांत नेहमीं सांगतात ना, कीं मनुष्य-जन्म दुर्लभ आहे. या शरीरानें जन्माचें सार्थक करणारें हरिभजनच करावें. प्रभुपदच एक सत्य आहे. बाकी सर्व वैभव मिथ्या आहे. हें बाबांचें उपदेश-वचन मनांत धरून मी राहिलों आहें. म्हणून माझ्या हातून तुला विपरित दिसेल असें वर्तन होतें व तुला त्याचें नवल वाटतें. " असो.

लक्ष्मण दीक्षित घरीं आल्यावर यमूताई यांनीं ही घडलेली सर्व गोष्ट त्यांना सांगितली. ती ऐकून त्यांना आपल्या पुत्राचें कौतुक व प्रेम वाटलें. ते म्हणाले, " यमुने ! आपल्या पूर्वजांची पुण्याई मोठी आहे. म्हणून नारायणाला नवीन पद्धत टाकून जुनी घ्यावी अशी बुद्धि झाली. वैराग्य आलें. आचारविचारावर श्रद्धा उत्पन्न झाली. शास्त्राभ्यास आवडला व तो सध्यां एकान्तवासांत सद्ग्रंथावलोकन व भजन करीत बसूं लागला आहे. मला या गोष्टीचा आनंद वाटतो. दीक्षितांचे कुळाला कलंक लावणारें वर्तन सोडून त्यानें कुळाचा उद्धार करण्याचा मार्ग धरला आहे. हा त्याचा उपक्रम मला पूर्ण पसंत पडला. श्रीवासुदेवशास्त्री टेंब्ये आतां वाडीला आले म्हणजे त्यांना मी म्हणणार आहें कीं, नारायणाला तुम्ही आपला शिष्य करून घ्या. " यमुनेचा व लक्ष्मण दीक्षितांचा असा संवाद झाला. नारायण आपल्या खोलींत स्वीकारलेला कार्यक्रम करीत होते. वेदेश्वरी वाचून, तींत श्रीरामचंद्राचा मोक्षप्राप्त्यर्थ चाललेला प्रयत्न व सद्गुरुभक्ती अवलोकून आपणदेखील तसाच प्रयत्न व गुरुभक्ति करावी असें त्यांना वाटत होतें. प्रयत्नाचे योग्य मार्गाला लायणारे योग्य सद्गुरु आपणांला भेटावेत, असा तीव्र हेतु त्यांचे चित्तांत उत्पन्न झाला. श्रीदत्तप्रभूला मनांत आठवून ते त्याच्याजवळ अनन्यभावानें हीच एक मागणी करीत राहिले कीं, ' प्रभुराया, तूं मला प्रत्यक्षपणानें गुरु-स्वरुपानें येऊन भेट दे. मजकडून सेवा घे. मला सन्मार्गाला लाव. भक्ती दे व माझा मनुष्यजन्म सफळ कर ' अशी मागणी करीत नारायण हे मुमुक्षु होऊन चातकाप्रमाणें गुरुदयाघनाची मार्गप्रतीक्षा करीत भजन करून त्याला हांका मारीत एकान्तवासी होऊन राहिले.

श्रीनारायण हे विवाहित झाले होते तरीपण ते स्त्रीचे ठिकाणीं आसक्त नव्हते. एकदां त्यांची वृत्ति जी पालटली ती कायमचीच पालटली. प्रारब्धानें

प्राप्त झालेल्या वस्तूवरसुद्धां ते प्रेम करीत नसत. मग प्रयत्नानें ते विषय-संपादणी कशाला करतील? सदासर्वदा भस्मानें अंग सुभूषित करून स्नान, संध्या, जप, गुरुचरित्रवाचन, वेदेश्वरी वगैरे वेदान्तग्रंथांचें अवलोकन व सद्-गुरुप्राप्तीची इच्छा इत्यादिकामध्येंच ते मग्न राहूं लागले. त्यांचे वडील त्यांना ही वृत्ति पाहून 'आमचा नारायण मुनी झाला आहे' असें कौतुकानें म्हणत. सज्जनांना सन्मार्गगामी मनुष्यच आवडतो. आपल्या नारायणाला वासुदेव-शास्त्री टेंब्ये यांच्या हवालीं केला पाहिजे असें ते यमुनाबाईशीं म्हणजे आपल्या मुलीशीं म्हणाले. वसिष्ठमुनि जसे रामाचे गुरु, तसे आमच्या नारायणाला वासुदेवशास्त्रीच गुरु योग्य आहेत. लक्ष्मणशास्त्री यमुनेला म्हणतात कीं तुला वासुदेवमहाराजांचा महिमा अजून माहित नाहीं; तो मी सांगतों तो ऐक.

"सावंतवाडी संस्थानांत राजधानीपासून ६ मैल दूर निर्मळा नदीच्या कांठीं माणगांव म्हणून जो गांव आहे तो वासुदेवशास्त्र्यांचा जन्मग्राम होय. त्यांच्या आईचें नांव रमा व पित्याचें नांव गणेशभटजी. या दत्तभक्त दंपतीच्या उदरीं शके १७७६ आनंदनामसंवत्सरांत श्रावण वद्य पंचमीला यांचा जन्म झाला. हे दत्तात्रेयच होत. वरदान सत्य करण्यासाठीं ते वासुदेव नांवानें अवतीर्ण झाले. बाळपणापासूनच धर्माचरणांत व व्यवहारांत यांचा दक्षपणा आहे. हे आपणांला दत्तभक्त म्हणवितात. सर्व विद्या यांच्या करतळाचा मळ आहे. सध्यां हे गृहस्थ आहेत. लोककल्याणार्थ यांचा अवतार असल्यामुळें हे स्वतः सर्व शास्त्रीय संस्कारांनीं संस्कृत झाले. वेद व वेदांगें यांना मुखोद्गत आहेत. आश्रमधर्मा-प्रमाणें हे वागतात. माता-पिता व गुरु यांचा प्रसाद यांनीं त्यांची सेवा करून मिळविला आहे. प्रायश्चित्तें घेऊन यांनीं काया पवित्र केली. भक्तीनें यांनीं योगींद्र दत्त आपलासा केला. पुत्र, धन, दारा इत्यादिकांची इच्छा यांना नाहीं. हे जितेंद्रिय व विवेक, वैराग्य, शम, दम, दया इत्यादिक सद्गुणांनीं मंडित झाले. दैवी संपत्तीनें सदैव हे अलंकृत आहेत. रजतमाचा रोध करून नित्य सत्त्वगुणी अंतःकरण यांनीं बनविलें आहे. केवळ शुद्ध सत्त्वमयी श्रीदत्तप्रभूचीच ही मूर्ति होय. परोपकार व भूतदया हें यांचें व्रत आहे. यांच्या संपूर्ण गुणांचें वर्णन कोणीही करूं शकणार नाहीं. कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुं समर्थ साक्षात् श्रीदत्तात्रेयच हे होत. इतकें म्हटलें म्हणजे जास्त वर्णन करण्याची जरूर

नाहीं. वसिष्ठांप्रमाणें हे ज्ञानी आहेत असें तरी आतां निराळें कशाला म्हणायला पाहिजे ? सर्वज्ञच ते आहेत. हे दरसाल वाडीला येतात. आले म्हणजे देवासन्निध कृष्णातीरीं घाटावर मठांत किंवा एखाद्या देवळांत उतरतात. शुलवृत्तीवरच निर्वाह करीत असल्यामुळें सकाळीं फक्त कोरान्न मागून नेण्याला एकदां ग्रामांत येतात व दुपारून भागवत वगैरे अवलोकन करण्यासाठीं आमचेपाशीं येतात. तासभर तात्त्विक विवेचन करून पुन्हां संध्योपासनेला स्वस्थानीं जातात."

लक्ष्मणशास्त्री म्हणाले, "हे यमुने, तूंदेखील त्यांना पाहिलें आहेस. पण त्यांची ओळख तुला नाहीं. ते आले म्हणजे नारायणाला त्यांचाच शिष्य बनवितों म्हणजे झालें. ते योग्य सद्गुरु आहेत व हा योग्य शिष्यही पण आहे." याप्रमाणें लक्ष्मणशास्त्री निश्चय करून राहिले.

कांहीं दिवसांनीं माणगांवांत वासुदेवशास्त्री-म्हणजेच वासुदेवानंद सरस्वती होत-त्यांना दत्ताची आज्ञा माणगांव सोडून उत्तरखंडीं जा अशी झाली. साधुसज्जनांना दीक्षा देण्यासाठीं ते आपला गांव सोडून निघाले. ते सहकुटुंब नृसिंहवाडींत आले. ब्रम्हानंदाचे मठांत माडीवर त्यांनीं आपलें स्मार्ताग्नीचें कुंड स्थापिलें व गृहस्थधर्मानुसार ब्रह्मकर्म, अग्निउपासना, देवपूजा, पंचमहायज्ञ वगैरे ते करूं लागले. प्रतिवर्षाच्या नियमाप्रमाणें दुपारनंतर भगवद्गुणानुवाद करण्यासाठीं ते हरिभक्त लक्ष्मण दीक्षितांकडे जाऊन त्यांचेपाशीं रोज बसूं लागले. श्रीदत्ताच्या लीला वर्णन करून ते दोघे महात्मे प्रेमानंदाचा उपभोग घेऊन तृप्त होत असत.

लक्ष्मण दीक्षितांचा हेतु होता त्याप्रमाणें गुरुमहाराज तर आले. नारायणाला त्यांच्या हवालीं करावयाचा तेवढाच राहिला. एके दिवशीं तोहि योग त्यांनी आणला. लक्ष्मणशास्त्री वासुदेवमहाराजांना म्हणाले, "आपला नारायण शाळा सोडून बसला आहे. शास्त्राध्ययनसुद्धां नंतर त्यानें थोडेंसें केलें आणि तेंही सोडूनच दिलें. सध्यां तो विरक्तपणा धारण करून असतो; एकान्तांत बसतो. भक्ति व वेदान्त ज्यांत आहे असे ग्रंथ वाचतो. स्नान, संध्या इत्यादिक ब्रह्मकर्मेदेखील करतो. निवृत्तिपंथी तो बनला आहे.

चांगलेंच करतो खरें; पण योग्य मार्गदर्शक त्याला असल्याशिवाय तें सारें करणें तितकेंसें उपयोगी होणार नाहीं, असें आम्हांला वाटतें. गुरुबुद्धि हितकारक असते. करतां आपण त्याला निजसहवासांत ठेवून घ्या व आपल्याप्रमाणेंच बनवा म्हणजे झालें. यापेक्षां जास्त आपणांला मी काय सांगूं ?"

वासुदेवमहाराज म्हणाले, "ठीक आहे. कोणालाहि सन्मार्गाला लावणें हें आपलें कर्तव्यच आहे. तुम्ही म्हणत असाल तर तसें करूं. बोलवा त्याला." असें म्हणतांच शास्त्रीबुवांनीं आपल्या मुलाला हांक मारली. ती ऐकून श्रीनारायण खोलींतून बाहेर आले. विनयानें ते उभेच राहिले होते. ते एकदम बसले नाहींत. लक्ष्मणशास्त्री त्यांना म्हणाले, "नारायणा, तुझी परमार्थाची इच्छा पूर्ण करणारे समर्थ सद्गुरु वासुदेवमहाराज आहेत असें जें मी म्हणालों होतों तेच हे भगवान् आहेत बरें ! ! यांच्या स्वाधीन मी तुला केला आहे. यांचे पाय तूं धर. म्हणजे हे तुला कृतार्थ करतील." असें म्हणतांक्षणीं श्रीनारायणांनीं वासुदेवचरणीं आपलें मस्तक ठेवलें व उठून प्रार्थना केली कीं, या अनन्य दासाचा समर्थांनीं अंगीकार करावा. वासुदेवमहाराजांनीं सर्वज्ञपणानें शिष्यलक्षणें ओळखलीं व आपणांला जसा पाहिजे तसा हा मुलगा योग्य अधिकारी आहे असें जाणून हास्यवदन केलें व कृपायुक्त भाषणानें नारायणाचा अंगीकार करण्यासाठीं 'तथास्तु' असें ते म्हणाले. म्हणजे "हे नारायणा, तुझा मी अंगीकार केला आहे," अशा अभिप्राय त्यांनीं त्यांना कळविला. तेव्हां लक्ष्मण दीक्षित व नारायण ह्या दोघांनाहि परम आनंद झाला. दोघांनाहि कृतकृत्यता वाटली. मनुष्यजन्म आज सफळ झाला असें ते म्हणाले. खरेंच आहे. सद्गुरु मिळणें हेंच नृजन्माचें साफल्य होय. सर्व कांहीं मिळूं शकेल, पण आत्मज्ञानदाता ब्रम्हनिष्ठ तत्त्वदर्शी सद्गुरु लाभणें हें अत्यंत कठीण आहे. बहुजन्मांतली पुण्यसंपत्ति ज्याची फलोन्मुख झाली असेल त्यालाच हा लाभ लाभतो, दुसऱ्याला नाहीं. ज्या लाभानें परमानंदाची प्राप्ति व्हावयाची असा हा सर्वोत्कृष्ट सद्गुरुलाभ आहे.

ज्ञानदान करण्याच्या संकल्पानें माणगांव सोडून बाहेर पडलेल्या वासुदेव सद्गुरुरायांना दानाला सत्पात्र मिळालें असें वाटून आनंद झाला नसेल काय ?

श्रीनारायण हे कुलीन घराण्यांतले, भगवद्भक्तांचे पोटीं जन्मलेले, व वरदी पुरुष असल्यामुळें ब्रह्मज्ञान आकलन करण्याला लायक असे अधिकारी आहेत हें ओळखून गुरुवर्य वासुदेवसुद्धां 'आपणांला आज सच्छिष्यलाभच झाला,' असें मानून अतिशय आनंदित झाले. दाता पुरुष सत्पात्राची इच्छा करीतच असतो. ती इच्छा पुरली म्हणून वासुदेवांना आनंद होणें साहजिकच आहे. अस्तु.

नित्याप्रमाणें गुणानुवाद केल्यानंतर संध्याकाळ झाल्यावर वासुदेवमहाराज मठांत जाण्याला निघाले. जातांना नारायणांना त्यांनीं सांगितलें कीं, 'उद्यांपासून मठांत आमची भेट घेत जा; म्हणजे तुला जें कांहीं पाहिजे आहे तें सर्व कांहीं देऊं बरें!' असें सांगून ते जाऊं लागले. ते जात असतां लक्ष्मण दीक्षितांनीं त्यांना प्रार्थना करून सांगितलें कीं, मी आपल्या चरणीं नारायणाला अर्पण केला आहे. त्याचे मायबाप, देव, सद्गुरु सर्व आपणच आहां. दयावंतांना मी कशाला सांगावें कीं याचा सांभाळ करा म्हणून! हरिणी पाडसाला सांभाळतेच; तिला प्रेमपात्राची अपेक्षा असतेच. असें म्हणून दीक्षितांनीं नमस्कार केला. वासुदेवमहाराज पुन्हां बसले. नंतर लक्ष्मण दीक्षित नारायणांना म्हणाले कीं, "नारायणा, तुझे हितकर्ते तुला मिळाले. यांची सेवा तूं अनन्य भावानें कर. गुरुभक्ति करणारावरच गुरुप्रसाद होतो. गुरूपेक्षां दुसरें तत्त्व श्रेष्ठ नाहीं, याची जाणीव सदा ठेव. दीपकाप्रमाणें निष्ठावंत भाव गुरुपदीं राख. ब्राह्मणपणाचा अभिमान मिरवूं नको. गुरूपुढें बालभावानें रहा. आळशी होऊं नको. सत्य भाषा बोल. निष्कपटानें वाग. कोणाचीच निंदा-स्तुति गुरूपुढें किंवा इतरत्र देखील करूं नको. मानापमान चित्तांत बाळगूं नको. सासूजवळ सून, तसा गुरूपाशीं विनयमर्यादशील रहा. गुरु हे परब्रह्म होत. त्यांचें महत्त्व जाणून दृढ भावानें भजन कर. त्यांना सोडूं नको; हातचें निधान दवडूं नको. तुझें सर्वस्व कल्याण हेच करणारे आहेत. तूं ज्ञाताच आहेस. करितां जास्त सांगणें नलगे." इतकें बोलून दीक्षित स्वस्थ राहिले. त्यांना वासुदेवमहाराज म्हणाले, "दीक्षित, तुम्ही हा आमचा बहुमान केलात. अन्याला मान देणें हें तुमचें व तुमचे घराण्याचें शीलच आहे. तुम्ही स्वतः भगवत्कृपापात्र ज्ञानी आहां. तसाच तुमचा नारायणदेखील पुढें मोठाच कोणीतरी होईल." त्यावर

नारायण म्हणाले, " माझा मोठेपणा आपल्या कृपेवर अवलंबून आहे. आपण दया कराल तर पाषाणाचा देव बनेल किंवा लोखंडाचें सोनें व्हावें तसा पशुतुल्य असलेला मी खरोखर मनुष्य होईन. समर्थ करतील तें होणारें आहे. सर्व महिमा समर्थांचाच होय असें मी मानतों. " असें म्हणून नारायणांनीं गुरुपदीं नमन केलें. नंतर वासुदेव महाराज मठीं गेले.

प्रकरण ३ रें

श्रीवासुदेव महाराज लक्ष्मण दीक्षितांपाशीं भगवद्गुणानुवाद करीत बसले. नंतर नारायणांचा परिचय त्यांना शास्त्रीबुवांनीं करून दिला. पुत्राला त्यांचे हवालींच केला व 'वासुदेवमहाराज हे तुझे सद्गुरु होत. भक्तिभावानें यांची सेवा कर, आणि त्यांची कृपा संपादून कृतार्थ हो' असा उपदेशदेखील त्यांनीं नारायणांना केला. वासुदेवमहाराजांनीं लक्ष्मणशास्त्र्यांचे म्हणण्याप्रमाणें नारायणांचा अंगीकार केला व सायंकालीन अग्निकार्य व संध्या करण्यासाठीं ते जाऊं लागले. जातांना नारायणांना त्यांनीं 'मठांत येऊन भेट' असें सांगितलें. तसेंच लक्ष्मण दीक्षितांना 'त्याला मठांत पाठवा' असेंही म्हणाले व ते गेले इत्यादि हकीगत मागच्या प्रकरणांत सांगितली. वासुदेव टेंब्ये-महाराज या वेळीं गृहस्थाश्रमी होते. भार्येसहित ते आले होते. व अग्निकुंड स्थापून त्यांत अग्नि सिद्ध करून ते रोज अग्निनारायणाची उपासना व श्रीदत्त-प्रभूच्या दोन लहानशा मूर्ती मांडून त्यांची पूजा-अर्चा, भक्ति करीत मठांत राहिले होते असेंही सांगून झालें. त्यांना तेथें जाऊन भेटण्यासाठीं नारायण फार उत्सुक होऊन राहिले. रात्र संपेल केव्हां व मी दयामेघाला भेटेन केव्हां, असें त्यांना होऊन राहिलें. त्यांना रात्रीचें भोजनसुद्धां सुचेना. भार्या घरांत होती. पण तिच्याशीं बोलावेंसें त्यांना वाटेना. फार काय पण त्यांना झोंप-सुद्धां लागेना. सद्गुरुमुखानें ज्ञानोपदेशरूपी अमृताचें पान करण्याची जबरदस्त तृषा त्यांना लागून राहिली. ज्ञानाची इच्छा म्हणजे जिज्ञासा उत्कट असली म्हणजे मुमुक्षूला वैराग्यश्री माळ घालते. ही गोष्ट नारायणांचे मनःस्थिती-वरून स्पष्ट होते. ती तीव्र जिज्ञासा नसली म्हणजे प्रापंचिक विषयच गोड लागतात, एरवीं नाहीं. चातक पृथ्वीवर वहात असलेलें उदक सोडून मेघो-

दकाचीच इच्छा करतो तसें नारायण विषयसुख त्याज्य करून ज्ञानगम्य मोक्षसुखाचीच तळमळ करीत होते. त्यामुळें सद्गुरुनाथाकडे त्यांचें लक्ष सारखें लागून राहिलें होतें. अर्थातच ते दुसऱ्या कशालाहि इच्छित नव्हते. एकदांची रात्र कशीबशी संपली; प्रभात झाली. नारायणांनीं कृष्णास्नान केलें. आपलें संध्यावंदन आटोपलें. वडिलांना व मातोश्रीला तद्वत् गृहदेवतांना त्यांनीं नमस्कार केले. सर्वांचे आशीर्वाद घेतले व कृष्णातीरीं औदुंबराचे छायेंत बसलेल्या श्रीदत्तभगवंताचे मंदिरांत ते गेले. तेथें साष्टांग नमस्कार करून पादुकांना विनंती करून म्हणाले कीं, वासुदेवस्वरूपी आपला समागम व गुरुसेवा मला द्यावी. अशी प्रार्थना करून श्रीवासुदेवमूर्ती मनांत आणून त्यांचें ध्यान करीत करीत ते ब्रह्मानंदाचे मठापाशीं येऊन पोंचले. सद्गुरुसदनाची पायरी चढतांना प्रथम नमन केलें व नंतर माडीवर ते गेले. तेथें गुरुपत्नीचें दर्शन त्यांना प्रथम झालें. त्यांना नमस्कार करून 'गुरुराजांचें दर्शन मला होईल काय ?' असा प्रश्न त्यांनीं तिला केला. इतक्यांत त्यांचें आराध्य दैवत भगवान् वासुदेव स्वतःच खोलींतून बाहेर तेथें यदृच्छेनें आले. दत्ताला केलेली प्रार्थना फुकट कशी जावी ? सद्गुरुनाथच आपोआप प्राप्त झाले.

श्रीनारायण हे शास्त्रीय पद्धतीनें मोक्षगुरूला भेटले. समित्पाणि होऊन सद्गुरूला शरण जावें असें शास्त्र सांगतें. त्याला अनुसरून ते गेले होते. त्यांनीं समिधा जरी नेल्या नव्हत्या तरी उपायन म्हणून कांहीं फळें नेलीं होतीं. मुख्य उपायन जी श्रद्धा, भक्ति किंवा वैराग्य तें तर त्यांनीं घेतलेंच होतें. वासुदेवमहाराजांचें दर्शन होतांक्षणीं त्यांनीं उपायन पुढें ठेवून त्यांचे चरणारविंदीं आपलें मस्तक ठेवलें. तेव्हां प्रसन्न मनानें महाराजांनीं त्यांना आशीर्वाद दिला व प्रेममय अशी गोड भाषा त्यांनीं उच्चारून म्हटलें कीं, "नारायणा ! आलास ? ये बरें ! " असें म्हणून ते दोघे गुरुशिष्य खोलींत जाऊन बसले तेथें स्वसन्निध बसवून घेऊन महाराजांनीं नारायणांना विचारपूस करायला सुरुवात केली. तो गुरुशिष्य संवाद असा—

वासुदेवमहाराज– नारायणा, तूं काय काय शिकला आहेस ?

नारायण– मराठी शिक्षण पुरें घेऊन इंग्रजी पांच इयत्ता मी शिकलों.

वासुदेव– ब्रह्मकर्म करतोस कीं नाहीं ?

नारायण– होय; संध्या करीत असतों व गुरुचरित्र वाचतों.

वासुदेव– पारमार्थिक वेदान्तग्रंथ वाचले आहेत काय ?

नारायण– होय. वेदेश्वरी व एकनाथी भागवत वाचिले आहेत.

वासुदेव– वेदेश्वरी ही हंसराजकृत शिवगीतेची टीका होय. तिच्या वाचनाचा परिणाम तुझ्या चित्तावर कोणता झाला ?

नारायण– जग हें मिथ्या आहे व ब्रह्मच सत्यवस्तु आहे. त्या ब्रह्माची प्राप्ति सद्गुरुकृपेनें होते. म्हणून गुरुसेवा, गुरुभक्तीच करावी. इतर कर्मयोग वगैरे सर्व साधनें निरुपयोगी आहेत असा माझा परिणामात्मक समज होऊन राहिला आहे.

असा संवाद झाल्यावर वासुदेवमहाराजांनीं विचार केला कीं, कांहीं लोकांच्या मनावर वेदेश्वरीचा असा परिणाम झालेला दिसतो कीं, सर्वच मिथ्या. सर्वच म्हणजे कर्म–धर्म, भक्ति वगैरे सर्वच मिथ्या. आपण ब्रह्मच आहों. आपल्याला आतां साधनमार्गांची जरूर नाहीं. ब्रह्मज्ञान झाल्यावांचूनच ते असें म्हणतात व साधन सोडून भ्रष्ट होतात. पण नारायणाचे मनावर तसा भलताच परिणाम झाला नाहीं. तो विचारी दिसतो. आपल्याला ब्रह्मज्ञान व्हायचें आहे व तें गुरुभक्तीनें होईल, असें हा म्हणतो. साधनाचा त्याग करूं इच्छित नाहीं. फक्त कर्मयोग निरुपयोगी आहे एवढेंच याचें म्हणणें आहे. त्या-बद्दल त्याची समजूत करून देतां येईल. असा आपल्या मनाशींच महाराजांनीं विचार केला व नारायणांना संमत असलेल्या गुरुसेवेची परवानगी त्यांनीं पर्यायानें त्यांना दिली. " नारायणा, तुझ्या इच्छेप्रमाणें तूं आतां ब्रह्मप्राप्तीच्या साधनाचा अवलंब कर. " इतकेंच ते म्हणाले. याचाच अर्थ हा कीं, " तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया " म्हणजे नमस्कार, प्रश्न व सेवा करीत तूं आमचे सन्निध रहा. गुरुसेवा करण्याची नारायणांची इच्छा वासुदेवमहाराजांनीं पूर्ण केली. भक्ताचें काम पुरविणें हें त्यांचें ब्रीदच होय. कारण श्रीपादश्रीवल्लभांचे अवतारच ते होते. श्रीपादप्रभू साधुजनाला दीक्षा

देण्यासाठीं घर सोडून निघाले. तसेच वासुदेव महाराजसुद्धां दत्ताज्ञेनें साधु-सज्जनांना म्हणजे अधिकारी जे असतील अशा मुमुक्षु लोकांना दीक्षा देण्या-साठींच माणगांव सोडून उत्तरपथगामी झाले व वाडींत आले. तेथें पहिली गुरुसेवेची दीक्षा त्यांनीं साधुवर्य नारायणांना दिली व अनुक्रमानुसार पुढील ज्ञानदीक्षादेखील दिली तें चरित्र यथाक्रम सांगितलें जाईल.

दीक्षितांचे पूर्वजाला वरदान देऊन भक्तिधर्माची स्थापना करण्याकरितां जन्मलेल्या भक्तरूपी नारायणमूर्तीनें आपलें कर्तव्य जी गुरुभक्ति तिचीसुद्धां सुरुवातच केली. दोघांनींहि अवतारकृत्यच प्रारंभिलें. भूमीचा भार दूर करणें हें अवतारकृत्य होय. कामक्रोधादि षड्रिपूंच्या थैमानानें मनोभूमीला झालेला भार भक्तिज्ञान–वैराग्यादिकांच्या योगानें दूर करणें व त्या भूमींत स्वानंदाचें साम्राज्य स्थापणें, अशा तऱ्हेचें सात्त्विक अवतारकृत्य या दत्ता-वतारांतलें आहे. जीवबुद्धि असणें हा अधर्म व ब्रह्मबुद्धि होणें हा स्वधर्म. अधर्म सहज वाढतो; पण स्वधर्माची स्थापना गुरुपरमेश्वरावांचून होत नसते. आपल्या अंतःकरणांत त्या स्वधर्माची स्थापना करूं इच्छिणाऱ्या नारायणांनीं गुरुसेवाव्रत धारण केलें व ते मठांत राहिले. आत्मकल्याणार्थ त्यांनीं गुरुसेवेला प्रारंभ केला तो असा—

प्रथम नारायणांनीं मनांतून गृहदारादिकांचा संबंध तोडून टाकला. भोजना-पुरते ते घरीं जात किंवा न जात. वासुदेवमहाराज त्यांना आपल्या पंगतीला घेऊन भोजन करीत. अन्नपूर्णाबाई स्वयंपाक करीत. त्यांना बाजारांतील वस्तू, भाजीपाला किंवा दुसरें कांहीं सामान लागल्यास ते आणून देत. वासुदेव-महाराजांचे प्रेमास्तव दत्ताचे पुजारी व स्वामीदेखील त्यांचेकडे भोजनाला नेहमीं असत. शिधासामुग्री देव त्यांना पुरवी. नेहमीं उत्सव होत असे. अशा वेळीं नारायण हे घरांतील मनुष्य म्हणून सर्वच कामें करीत. सज्जनांचीं उष्टीं काढीत, शेण लावीत, भांडीं घाशीत, मठाची झाडलोट करीत. सारवण वरचेवर देत. रांगोळ्या घालीत. सद्गुरुनाथांची साक्षात् सेवादेखील ते करीत. त्यांच्या उपासनेला लागणारें साहित्य : गंध, तुळशी, फुलें, वेल वगैरे सर्व त्यांना आणून देत. नीरांजनांत तूपवाती घालीत, समईत तेलवात घालीत,

गुरुनाथांचीं पूजापात्रें स्वच्छ व सिद्ध ठेवीत. त्यांचें आसन मांडीत. वस्त्रें धुऊन वाळवून देत. पाणी आणून देत. अग्निपूजेला समिधा किंवा गोमयाचे गोळे तयार करून ठेवीत. पूजोत्तर आरत्या म्हणत. तीर्थ नेऊन जळांत सोडीत, तसाच निर्माल्यदेखील शुद्ध जागेंत टाकीत. अन्यदेखील सर्व चाकरी ते करीत. गुरु व गुरुभार्या, हे देव व देवी आहेत अशा भावनेनें उभय दंपतीची सेवा ते श्रद्धाभक्तिप्रेमानें अहोरात्र करीत. काया, वाचा व मन असें त्रिकरण त्यांनीं गुरुचरणीं अर्पिलें होतें. अशा तऱ्हेनें गुरुदास्य करणाराला रामदास स्वामींनीं भू-सूर्य अशी संज्ञा दिली आहे. गुरुसेवक ज्ञानप्रकाशानें ब्रह्मांड भरून टाकतो. अप्रकाशित असें कांहींच उरवीत नाहीं. म्हणून गगनसूर्यापेक्षांही महत्त्वाचा असा भू-सूर्य होय. नारायण भू-सूर्यच होऊन शोभत होते.

नारायणांनीं सेवा करून गुरुरायाला आपलासा केला. प्रेमशृंखलेनें त्यांना आपल्या हृदयमंदिरांत बांधून ठेवलें. सद्गुरुराज प्रसन्न मनानें स्वाधीनच जरी त्यांनीं केले तरी आपण मर्यादा मात्र सोडली नाहीं. कित्येक मंदप्रज्ञ शिष्य गुरूची अवज्ञा करतात. त्यांच्या प्रसन्नतेचा फायदा त्यांच्याशीं थट्टा-विनोद वगैरे करण्याकडे करून घेतात. गुरूलाच आपली सेवा करायला लावतात. ते शिष्य अधम होत. तसे नारायण नव्हते. उच्च वृत्तीचे, उच्च भक्तीचे व उच्च विचाराचे नारायण, सासूजवळ सून तसे अतिशय मर्यादशीलपणानें वासुदेवमहाराजांजवळ वागत. कारणापुरतें बोलणें, व्यवस्थेनें बसणें, थट्टा-मस्करी न करणें. फार काय सांगूं ? गुरुमुखाकडेसुद्धां एकाएकीं न पाहणें, पाहिलेंच तर भीडमुरवत, लज्जा धारण करून पाहणें इत्यादि प्रकारचें मर्यादित वर्तन त्यांचें गुरूजवळ असे. जसजसा गुरुप्रसाद त्यांच्यावर होऊं लागला, तसतसे ते अधिकाधिकच श्रद्धाभक्ति-विनयवंत होत गेले. या आपल्या निरुपम सद्गुणानेंच ते वासुदेवमहाराजांचे अत्यंत आवडते व एकमेवाद्वितीय असे पट्टशिष्य झाले. थोडक्यांत सांगायचें म्हणजे सद्गुरूच झाले व सद्गुरुभक्ति कशी असावी याचा बोध स्ववर्तनानें त्यांनीं सर्व जगाला दिला व सद्गुरुचरणाच्या रजःकणाला भवसमुद्राच्या सेतूचें महत्त्व आहे असें ज्ञापित केलें.

सद्गुरुमूर्तीला प्रेमपुरस्सर अवलोकन करीत त्यांच्यावर आसक्त झालेले नारायण गुरुसेवेनें गुरुकृपापात्र झाले. सेवा घेऊन शिष्यावर प्रसन्न होणें ही पूर्वयुगांतील गरूंची रीतच वासुदेवमहाराजांचे ठिकाणीं होती व त्या गुरूंचें सामर्थ्यदेखील त्यांचे अंगीं होतें. निग्रहानुग्रहाचें बळ त्यांचे अंगीं असल्याचा अनुभव सर्वांनाच आहे. शिष्याच्या सेवाकर्मानें आपलीं शेतें पिकवून घेणें, गुरें पोसणें किंवा आपल्या मुलाबाळांना सांभाळणें, इत्यादि गोष्टींची मात्र त्यांना अपेक्षा नव्हती. त्यांनीं नारायणाकडून जी सेवा घेतली ती फक्त त्याच्या अंतःकरणाची भूमिका तपासण्यासाठींच होय. सेवा घेणें हें त्यांना आवडत नसे व पुढें त्यांनीं कधीं नारायण आपला एकनिष्ठ सेवक आहे अशा भावानें त्यांच्याकडून सेवा करून घेतलीहि नाहीं. निर्हेतुक प्रेमच त्यांच्यावर त्यांनीं केलें. असो. नारायणांच्या अंतःकरणशुद्धीबद्दल वासुदेवमहाराज असें म्हणत कीं, नारायण हा स्फटिकमणिच आहे. म्हणजे स्वभावतः अतिशय शुद्ध आहे. दुर्वासना त्याचे अंतःकरणांत नाहींत. तथापि शास्त्रानुसार कर्ममार्गानेंच याला प्रथम चालविला पाहिजे. नारायणाला पहिल्या दिवशीं प्रश्न केला असतां त्यानें कर्मयोग मोक्षाच्या बाबतींत निरुपयोगी आहे असें आपलें मत सांगितलें होतें. तें त्यांचें मत बदलून कर्माचेंसुद्धां प्रयोजन त्याला दाखविलें पाहिजे. असा विचार करून महाराज एके दिवशीं नारायणांना जवळ बोलावून आपल्या-जवळ बसवून म्हणाले कीं, "नारायणा, तुला इच्छित असेल तें विचार. आम्हीं तें सांगूं." नारायण वाटच पहात होते. ते म्हणाले, "मी स्वमतानें वागलों व ग्रंथदेखील स्वबुद्धीनेंच वाचले. तेणें करून मला समाधान झालें नाहीं. गुरुकृपांजनावांचून यथार्थ ज्ञान व्हावें कसें! आपण मला यथार्थ ज्ञान व निजचरणाची भक्ति द्यावी असें मी आपणांला प्रार्थीत आहें." वासुदेव-महाराज म्हणाले, "ठीक आहे. योग्य मागणी केलीस. मनुष्यजन्म एवढ्या-साठींच आहे. चौऱ्याऐंशीं लक्ष जीव निर्माण करून ब्रह्मदेवाला समाधान झालें नाहीं. कारण ते ब्रह्मवस्तु ओळखण्याला योग्य दिसेनात. मग मनुष्यप्राणी त्यानें निर्माण केले. ब्रह्मात्मज्ञान होण्याला योग्य अशी बुद्धि त्यांची आहे असें पाहून तो प्रजापती आनंद पावला. याचें तात्पर्य हेंच कीं मनुष्यदेह आत्म-ज्ञान संपादन करण्यासाठींच निर्मात्यानें निर्मिला आहे. तुझादेखील हेतु तोच

आहे ही आनंदाची गोष्ट आहे. आत्मज्ञानाची इच्छा न करणारे, भक्ति-विहीन मनुष्य केवळ राक्षस होत. त्यांचे श्वासोच्छ्वास म्हणजे लोहाराचे भातेच होत; त्यांचें जीवित व्यर्थ होय. "

महाराज म्हणाले, " नारायणा ! कल्याण व्हावें असें सर्वांनाच वाटतें. तें तसें वाटण्यांत मोठेंसें महत्त्व नाहीं. खरें कल्याण कोणतें तें जाणून, त्याच्या खऱ्या साधनाला सुरुवात करणें, हें महत्त्वाचें आहे. वसिष्ठांनीं रामचंद्राला बोध करतांना म्हटलें आहे कीं, योग्य अशा पौरुषप्रयत्नानें सर्व कांहीं मिळूं शकतें. योग्य म्हणजे शास्त्रानुसार. पौरुषप्रयत्न म्हणजे ' ही गोष्ट मी या साधनानें अवश्य संपादीनच ' असा मानसिक उत्साह. तो उत्साह तूं धारण कर व आम्ही सांगतों त्या योग्य प्रयत्नाला लाग म्हणजे तुझें पूर्ण समाधान होईल. "

नारायण दीक्षित हात जोडून विनयानें म्हणाले कीं, " सर्वज्ञ भगवंतांनीं मला योग्य मार्ग दाखवावा; निश्चित कल्याणाचें साधन मला सांगावें. आपल्या आज्ञेनुसार यापुढें मी आपलें वर्तन ठेवीन. " त्यावर वासुदेव भगवान म्हणाले, " हे नारायणा, ऐकून घे. कोणत्याहि गोष्टीची उत्कट इच्छा असल्याशिवाय ती गोष्ट साधत नाहीं. ज्ञानाचीसुद्धां तीव्र इच्छा पाहिजे. आत्मज्ञान व्हावें असें सारेच म्हणतात. पण ज्ञानयज्ञ सुरू झाला म्हणजे मात्र ते कंटाळतात. त्यांना तो श्रवणमननिदिध्यासरूपी ज्ञानयोग रुचत नाहीं. मग ती सामान्य जिज्ञासा काय कामाची ? उत्कट जिज्ञासाच अध्यात्मश्रवणीं आवड उत्पन्न करते. ती आवड म्हणजेच खरी ज्ञानेच्छा होय. आत्मचिंतनाची आवड म्हणजेच खरी ज्ञानेच्छा होय. आत्मचिंतनाची आवड लागण्यासाठीं प्रथम वर्णाश्रमविहित कर्मानुष्ठानच केलें पाहिजे. तेंच योग्य साधन आहे. तूं म्हणत होतास कीं कर्मयोग निरुपयोगी आहे. भक्ति व ज्ञानयोगच मोक्षरूपी समाधान देऊं शकतात; तर तें तुझें मत कच्चें आहे. कर्मयोगसुद्धां मोक्षोपयोगीच आहे. कसा तो पहा. मोक्ष म्हणजे ' अज्ञानभंग ' होय. तो जरी ज्ञानानेंच होत असला तरी तें ज्ञान शम, दम, वैराग्य, भक्ति, विवेक इत्यादि साधनसंपत्तीवांचून उत्पन्न होत नाहीं म्हणून साधनसंपत्तीची जरूर आहे. साधनसंपत्ती-

सुद्धां बुद्धि शुद्ध झाल्यावांचून अंतरांत उत्पन्न होत नाहीं. म्हणून बुद्धिशुद्धीची सुद्धां जरूर आहे. बरें. बुद्धिशुद्धि ती तरी आश्रमोक्त कर्माचरणावांचून कुठें होते ? होत नाहीं. म्हणून स्वधर्माचरणाची म्हणजेच कर्मयोगाची अत्यंत जरूर आहे. परंपरेनें कर्म हें अशा तऱ्हेनें मोक्षाचें साधन होऊन राहिलेलें आहे. कर्मयोग, भक्तियोग व ज्ञानयोग हे तीन योग परस्परांना सहाय्य होऊन अद्वैत ब्रह्मस्वरूपी मोक्षाची प्राप्ति करून देतात. केवळ एकेक योगानें म्हणजे यथानुक्रमानें तिघांचाही अवलंब न करतां, मोक्षसुख म्हणजे शाश्वत समाधान मिळत नाहीं. म्हणून कर्मयोग हाच मोक्षरूपी इमारतीचा पाया आहे असें समज.

" नारायणा ! तूं आज गृहस्थाश्रमी आहेस. तुझ्या आश्रमधर्माप्रमाणें तूं आपलें कर्तव्य कर. तें तुला आम्हीं शिकवूं. कर्म करतांना, 'हीं कर्में मी ईश्वराच्या आज्ञेस्तव त्याचें आराधन म्हणून करीत आहें. चित्तशुद्धिद्वारा श्रीपरमेश्वराची प्रीति मला यांच्या योगें संपादावयाची आहे. दुसरें कोणतेंच फळ मला नको आहे' अशी बुद्धि ठेव. ईश्वराराधनबुद्धि ठेवून कर्में करणें यालाच कौशल्य म्हणतात व हें कौशल्य संपादून केलेल्या आश्रमधर्माचरणालाच कर्मयोग ही संज्ञा आहे; फलेच्छापूर्वक केलेल्या कर्माला ती संज्ञा नाहीं. स्वर्गादिक फलाकरितां आचरलेलें कर्म प्रापंचिकांचा कर्मयोग व मोक्षार्थ आचरलेलें कर्म हा मुमुक्षूंचा कर्मयोग होय. या योगाचरणानेंच ब्राह्मी तनु बनते. मातीनेंच जसें मातीचें क्षालण होते, किंवा खेंकडीच्या पोरांनींच जसा तिचा नाश होतो तद्वत् अविद्याजन्य जड अशा कर्मांनींच कर्में व अविद्या दोन्हीं नष्ट होतात; म्हणजे मोक्ष होतो, यांत तिळमात्र संशय नाहीं."

वासुदेवमहाराजांचा असा हितोपदेश ऐकून नारायणांना आनंद झाला. ते म्हणाले, " महाराज, आपण मला शुद्धीवर आणलेंत. नाहीं तर मी कर्म वगैरे सर्व झूटच समजलों होतों. तो माझा भ्रम निघून गेला. आतां मी कर्मयोग आचारीन. वैदिक सनातन धर्मच मोक्षसाधन आहे. व मोक्ष हेंच याचें खरें अंतिम साध्य आहे, हा माझा दृढनिश्चय झाला. " महाराज म्हणाले, " तुला योगबुद्धि ही आम्ही दिली. आतां भक्तियोग श्रवण कर. कर्मयोगावर तुझा

विश्वास नव्हता म्हणून त्याचा विस्तार वाढवून तो तुला सांगितला. भक्ति-ज्ञानावर तुझा विश्वास आहेच. म्हणून थोडक्यांत त्याचें महत्त्व सांगतों. कर्मांनीं चित्तशुद्धि जरी झाली तरी असंभावना, विपरितभावना व संशय-भावना ह्या तीन भावना ज्ञानाला प्रतिबंध करून मोक्षसुखाची प्राप्ति होऊं देत नाहींत. त्या जबरदस्त असतात. परमेश्वराच्या प्रसादानेंच त्या दूर होतात, एरवीं नाहीं. भगवत्प्रसाद केवळ कर्मांनीं होत नाहीं; नवविधा भजनानेंच होतो. देवावर व तशीच गुरुवर निःसीम प्रीति ठेवल्यावांचून ज्ञान होत नाहीं. हा मोक्षाख्य परमात्मा एका भक्तीनेंच लभ्य आहे. केवळ कर्मी लोकांना परमेश्वर जन्ममृत्यूच्या फेऱ्यांतच फलभोगार्थ घालतो. पण तोच भक्तांचा मात्र मृत्युसंसारसमुद्रांतून स्वतः उद्धारच करतो. जो माझा भक्त आहे तोच मनुष्य मला आवडतो, असें स्वतः भगवानच म्हणतात, अर्थात् कर्मी आवडत नाहीं असेंच ठरतें. शिवाय मोक्षाचा क्रम ध्यानांत घेतां भक्तीलाच प्राधान्य आहे, या गोष्टीचें ज्ञान होतें. तो क्रम असा आहे.– १ ईश्वरोद्देशानें धर्मानुष्ठान करणें ही पहिली पायरी होय. २ नंतर सद्गुरुसेवा ही दुसरी पायरी. ३ तिसरी पायरी, भागवत धर्मावर श्रद्धा उपजणें. ४ चौथी पायरी, हरिकथा श्रवण करणें. ५ पांचवी पायरी, चित्तांत भगवंताचें प्रेम उत्पन्न होणें. ६ सहावी पायरी, प्रेमाचे योगानें देहद्वयाहून आपला वेगळेपणा कळणें. ७ सातवी पायरी, दृढभक्ति होणें. ८ आठवी पायरी, भगवंताच्या स्वरूपाचें ज्ञान होणें. ९ नववी पायरी, भगवंताच्या कृपेनें भक्ताअंगीं भगवद्गुणांचा आविर्भाव होणें म्हणजे भगवानच स्वयें होणें, असा हा अनुक्रम आहे. या अनुक्रमांत भक्तीनेंच भगवद्भाव सिद्ध होतो, असें सिद्ध केलेलें आहे. म्हणून भक्ति सर्व साधनांत श्रेष्ठ होय. प्रीतिपूर्वक माझें भजन करणाऱ्या भक्तांना मी मद्रूप होण्याचा बुद्धियोग देतों, असें भगवान आश्वासन देऊन सांगत आहेत. म्हणून हे नारायणा, भक्तियोगाचा आश्रय तूं धर. भगवत्कृपा झाली कीं अनायासानें मोक्ष करामलकवत होईल. ''

महाराज म्हणाले, '' नारायणा, भक्तीचें महात्म्य आम्हीं तुला सांगितलें. आतां ज्ञानयोगाचें ऐक. मोक्ष हा परमपुरुषार्थ होय. तो नित्य आहे. अर्थात् तो उत्पन्न व्हावयाचा नसतो. सच्चिदानंदघन आत्माच तो होय. म्हणजे आपलें

तो स्वरूपच आहे. म्हणून तो मिळवून घ्यायचादेखील नाहीं. कारण आपण आपल्याला कोणी गमावूं शकतच नाहीं. फक्त अविद्येचा पडदा बुद्धीवर पडला आहे तेवढाच दूर करणें आहे. अविद्येमुळें मी ब्रह्म नव्हे, जीव आहें असा जो भ्रम झाला आहे हाच तो पडदा होय. यालाच अध्यास किंवा अविवेक म्हटलें आहे. जीव हा ईश्वराहून वेगळा असेल तर तो कधींच ईश्वराशीं ऐक्य पावणार नाहीं. एक वस्तूला दुसऱ्या वस्तूचें स्वरूप प्राप्त होत नसतें. कृतीनें जें तसें प्राप्त झाल्याप्रमाणें दिसतें, तें कालान्तरानें पुन्हां नष्ट होतें. श्रुतीनें तर जीव हा ब्रह्मच आहे असें उपदेशिलें आहे. व ब्रह्माहून आपणांला निराळा मानणाऱ्यांची तिनें निंदा केली आहे. जीव जर खरोखर ब्रह्माहून अत्यंत निराळा असता तर, 'मी ब्रह्माहून निराळाच जीव आहें असें जो समजेल तो केवळ देवांचा पशूच होय' अशी त्याची तिनें निंदा केली नसती. व ब्रह्म जाणतो तो स्वतःच ब्रह्म होतो, असा ब्रह्मभाव जीवाला तिनें सांगितला नसता. ती तर तूंच ब्रह्म आहेस असें निश्चयानें बजावीत आहे. अर्थात् जीव मी आहें असें समजणें, हा केवळ भ्रमच होय. अंधाराला निवृत्त करण्याला जसा प्रकाशच एक समर्थ आहे तद्वत् हा आत्मभ्रम नाहींसा करण्याला सुद्धां एक आत्मज्ञानच बलिष्ठ आहे, दुसरें कोणी नाहीं. कारण अंधःकार व प्रकाश हे जसे विरुद्ध स्वभावाचे आहेत तशीं अज्ञान व ज्ञान हीं दोनही परस्परविरुद्ध स्वभावाचीं आहेत. प्रकाश पडला कीं अंधार जसा रहात नाहीं तद्वत् ज्ञान झालें कीं अज्ञान क्षणभरदेखील रहात नाहीं, कायमचेंच निवृत्त होतें. अज्ञाननिवृत्ति हाच मोक्ष होय व ती अविद्यानिवृत्ति ज्ञानानेंच होते. म्हणून ज्ञानयोगाची मातब्बरी शास्त्रांत गाइलेली आहे. नारायणा, तूं देखील या ज्ञानयोगाचा अवलंब कर म्हणजे तुझें पूर्ण समाधान होईल, निरतिशय आनंद तुला मिळेल व दुःखरूपी संसारांतून तूं कायमचा सुटशील."

याप्रमाणें योगत्रयाचें महत्त्व व त्याची सारखीच उपयुक्तता सांगून श्रीवासुदेवमहाराज म्हणाले कीं, "नारायणा! निष्काम कर्मानुष्ठानानें विविदिषा म्हणजे ज्ञानाची आवड उत्पन्न झाल्यावर ईश्वरस्वरूपी सद्गुरुनाथांची भक्तिरूप उपासना केली असतां चित्ताला एकाग्रता येते व शमदमादिक ज्ञानसामुग्री सहजच उत्पन्न होते. तीच अंतरंगसाधन होय. अशा अंतरंगसाधनसंपत्तीनें

संपन्न जो मुख्य अधिकारी पुरुष, त्यानें गुरुमुखानें आत्मश्रवण, मनन, निदिध्यासन संपादन केलें असतां गुरुकृपेनें त्याला याच जन्मीं मुक्ति मिळते. म्हणजे त्याचें अज्ञान नष्ट होतें. संपूर्ण आनंदाचा लाभ त्याला होतो. आनंदच तो स्वतः बनतो. म्हणून या योगत्रयाचा क्रमानें तूं अवलंब कर."

नारायणांनीं सद्गुरुचरणीं मस्तक ठेवलें व 'मी आपला आज्ञाधारक दास आहें, आज्ञेनुरूप वर्तन करीन' असें म्हटलें तेव्हां वासुदेवमहाराजांनीं त्यांना संध्योपासना, पूजा, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव वगैरे ब्रह्मकर्म शुद्ध रीतीनें कसें करावें तें स्वतः शिकविलें. विष्णुसहस्रनाम, गीता, स्वशाखेचें उपनिषद्, रुद्र, पुरुषसूक्त इत्यादिक सांगितलें. आपण जसे स्मार्ताग्निहोत्री होते तसेच नारायणांनादेखील त्यांनीं स्मार्ताग्निहोत्री बनविलें. म्हणजे स्मार्ताग्निहोत्र ठेवायला लावलें. 'लघुवासुदेवमनन' नांवाचा वेदान्ताचा ग्रंथ त्यांना समजावून दिला. त्यायोगें आत्मानात्मविवेक नारायणांना प्राप्त झाला. हीच निर्गुण उपासना त्यांना महाराजांनीं शिकविली. नंतर श्रीदत्ताची सगुणोपासना करायला आज्ञा केली तेव्हां ते म्हणाले कीं, "नारायणा, आतां तुला आमचें रहस्यज्ञान देतों तें तूं घे. सर्व वेदशास्त्रांचें हें सार आहे. तें कोणतें तर 'दत्त' हीं दोन अक्षरें हेंच आमचें रहस्य होय. दत्त हेंच परब्रह्म होय. दत्त हें नाम ज्यानें उच्चारलें त्यानें सर्व योग, याग, जप, तीर्थ, दान, अध्ययन इत्यादि सर्व कांहीं साधनजात केल्याप्रमाणें झालें. चारी पुरुषार्थांचा तो अधिकारी झाला. तो कृतकृत्य झाला. त्याला कांहीं कर्तव्य उरलें नाहीं. असा या रहस्याचा महिमा आहे. तुला हें रहस्य आम्हीं दिलें आहे." असें म्हणून श्रीभगवान् वासुदेवमहाराज सद्गद झाले. त्यांचा कंठ दाटून आला. नेत्रांतून प्रेमाश्रू वाहूं लागले. अंगावर रोम उभारले. तनूला कंप सुटला. चित्त भरून आलें. त्यांनीं 'श्रीगुरुदेवदत्त' असा मुखानें उच्चार केला व आपल्या आवडत्या शिष्याला प्रेमानें गाढ आलिंगन दिलें. त्यावेळीं नारायणांचीदेखील तीच अवस्था झाली. तेही प्रेमानंदानें तुडुंब भरले. सागरच झाले. थोडक्यांत सांगायचें म्हणजे ते वासुदेवच झाले. दोघां गुरुशिष्यांत अंतरंगीं भेद राहिला नाहीं. गुरु व शिष्य एकच झाले. वासुदेवमहाराजांनीं कृपाळू होऊन स्वसामर्थ्यानें नारायणांचे मनोरथ पूर्ण केले. आपली ज्ञानकर्मउपासनेची दीक्षा शिष्याला त्यांनीं दिली व आपणांप्रमाणेंच

आपली दुसरी एक मूर्ति तयार करून वाडीमध्यें त्यांनीं स्थापन केली, तिचें नाम नारायण दीक्षित.

कृतकृत्य झालेल्या नारायण दीक्षितांनीं वासुदेवमहाराजांची पुष्कळ स्तुति केली. आपण अज्ञानसमुद्रांतून माझा उद्धार केलात असें ते त्यांना म्हणाले. मज अंधाला आपण आज दिव्य दृष्टि देऊन डोळस बनविलात; मज पंगूला पाय आपण दिलेत; पतिताला पावन केलात; हा देह या श्रीचरणावरून मी ओवाळून टाकला आहे; हा जीव मी आपल्या पदकमळीं वाहिला आहे असें म्हणून नारायणांनीं भुईवर लोटांगण घातलें. तेव्हां वासुदेवांनीं त्यांना वर उचलून दृढ आलिंगन दिलें व म्हणाले कीं, " सांगितल्याप्रमाणें कर्म, भक्ति-ज्ञानाचा अभ्यास आतां तूं कर व आपला बोध दृढ करून घे. आमचें कर्तव्य झालें. तुझें तूं कर व ज्या वेळीं संशय, शंका प्राप्त होईल त्यावेळीं आम्हांला विचारीत जा. म्हणजे आम्ही सर्व संशय वेळोवेळीं दूर करूं, कांहीं काळजी करूं नको. आपल्या घरींच राहून आश्रमधर्मानुसार वागून आत्म-साधन करीत रहा " असा उपदेश करून वासुदेवमहाराज आपल्या पत्नीला घेऊन श्रीदत्तात्रेय भगवंताच्या आज्ञेनुसार उत्तरखंडीं निघून गेले. गोदातीरीं गंगाखेड नांवाच्या क्षेत्रांत पत्नि निवृत्त होतांच तेथें त्यांनीं संन्यासआश्रम स्वीकारला. उज्जयिनीला जाऊन दंड घेतला. शके १८१२ सालीं ते " श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराज " या नांवानें मंडित झाले व उत्तर खंडीं जगदुद्धारार्थ संचार करीत राहिले.

प्रकरण ४ थें

श्रीवासुदेव महाराजांचा उपदेश झाल्यापासून नारायण दीक्षितांची पूर्वीची स्थिति अगदीं बदलून गेली. त्यांना आतां विवेकवैराग्य प्राप्त झालें. पूर्वीचें हेकड वैराग्य राहिलें नाहीं. प्रपंच, घरदार वगैरे आत्महिताला बाधक आहेत असें त्यांना आतां वाटेना. कारण बाधकपणा हा आसक्तींत आहे, बाह्य वस्तूंत नाहीं. त्या उलट परमार्थाच्या साधकच आहेत. योजना करणारा जसा असेल तसें फल त्या देतात. हें तत्त्व त्यांना आतां समजून चुकलें. जसा कर्मयोग ईश्वराच्या आराधन बुद्धीनें अनुष्ठिला म्हणजे मोक्षालाच कारणीभूत होतो तद्वत् सर्व कांहीं गोष्टी ईश्वराराधनार्थ समजल्यानें त्या श्रेयस्करच होतात इत्यादि प्रकारचा बोध त्यांना सद्गुरुमुखानें नीट झाला. मग ते आतां पूर्वीप्रमाणें खोलीचें दार बंद करून सर्व काळ कां बसतील ? सर्वांबरोबर अबोला तरी सर्व काळ कां धरतील ? ज्यावेळीं जें जसें करावयाचें व ज्या वेळीं जें जसें बोलावयाचें तसें तसेंच ते करूं व बोलूं लागले; सद्गुरु वासुदेवांच्या उपदेशाप्रमाणें त्यांनीं ब्रह्मकर्म करायला सुरुवात केली. स्मार्ताग्नीची गृहांत स्थापना करून ते वेळच्या वेळीं अग्निकार्य करूं लागले. स्नानसंध्या, पंचमहायज्ञ रोज आदरानें करूं लागले. श्रीगुरुमुखानें घेतलेलें उपनिषद, गीता, विष्णुसहस्रनाम वगैरे वेळच्या वेळीं नेमानें म्हणूं लागले. त्याप्रमाणें आत्मचिंतनाभ्यास ते एकान्त काळीं एकटे बसून नियमित ~~काळी~~ स्थळी करूं लागले. श्रीदत्तात्रेयाचें भजनपूजन, गुरुचरित्रवाचन इत्यादि उपासना त्यांनीं सुरू केली. नियमित वेळीं नियमित कर्तव्य करून झाल्यावर सदा सर्वकाळ दत्तनामाचा मानसिक जप त्यांनीं चालू ठेवला. सर्वांबरोबर बोलून चालून, हंसूनखेळून सर्वांचा संतोष ते राखूं लागले. पूर्वीच्या वर्तनांत व गुरु-

सहवासानंतरच्या वर्तनांत जमीनअस्मानाचा फरक पडलेला पाहून लक्ष्मण दीक्षितांना फार संतोष वाटला. आपला नारायण योग्य मार्गाला लागला असें ते म्हणाले व कांहीं वर्षांनीं चतुर्थाश्रम घेऊन त्यांनीं समाधि घेतली.

वडील हयात होते तेव्हांच नारायणांना संतती झाली होती. पहिली संतती (बरीच) मयत झाली. नंतर एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन मुलेंच त्यांचीं वांचून राहिलीं होतीं. नारायण पुत्रपरिवारांत राहूनसुद्धां असंगपणानें असत. माया, ममता त्यांनीं आपल्या अंतःकरणांत वाढूं दिल्या नाहींत. विवेक-रूपी खड्गानें ते त्यांचा छेद करीत राहिले. वासुदेवमहाराजांनीं त्यांना तें खड्ग देऊन ठेवलें होतें. वैराग्याच्या साणेवर ते त्याला सतत धार लावून ठेवीत; बोथट होऊं देत नसत. विवेक दृढ होण्याचा त्यांचा अभ्यास सर्वकाळ सुरू असे. वैराग्य तर त्यांना पूर्वीपासून होतेंच. भक्तीचा झरा गुरुरायानें उत्तरेंत जातांना त्यांच्या हृदयभूमिकेंत उत्पन्न केलाच होता. शम, दम, विवेक, वैराग्य व भक्ति इत्यादि मोक्षोपयोगी सद्गुण नारायणांचे अंतःकरणाला शोभवूं लागले. सात्त्विक सद्गुणांनीं नारायणमूर्ति अलंकृत झाली.

श्रीनारायण दीक्षित गृहस्थाश्रमधर्म सशास्त्र चालवीत राहिले. जरी ते गृहस्थधर्मी होऊन सदनांतच रहात होते तरी अतिथीप्रमाणें निरभिमान वृत्ति ठेवून रहात. ही निरभिमान वृत्ति गुरुकृपेवांचून ठेवतां येणें शक्य नसतें. वासुदेवमहाराजांच्या कृपावीक्षणरूपी चाक्षुषदीक्षालाभानें, साक्षीस्वरूप आत्म्याचा व देहत्रयाचा अन्योन्याध्यासरूपी हृदयग्रंथी, नारायणांचा तुटल्या-मुळें, ते स्वसदनामध्येंच अतिथिवत् राहूं शकले, म्हणजे अनासक्त राहिले. नारायणांचे वडील संन्यस्त होऊन ब्रम्हीभूत झाले असें पूर्वीच सांगितलें. वडील निवर्तल्यानंतर कांहीं काळानें नारायणांना, बाडवडिलार्जित अस्तावर आपली उपजीविका चालवूं नये असें वाटलें. सदलग्यांतून त्यांना जमिनीचा फाळा येत असे, तो घेऊं नये. आपण स्वकष्टार्जित धान्यावर नैवेद्य, वैश्वदेव, अतिथिदान, भोजन इत्यादि सर्व व्यवहार चालवावा असा त्यांचा बेत झाला. परंतु कोण-तीही गोष्ट सद्गुरुमहाराजांच्या आज्ञेवांचून करणें बरें नाहीं असें समजून त्यांनीं गुर्वाज्ञा संपादन करण्यासाठीं त्यांना उत्तरखंडांत एक पत्र पाठविलें. या वेळीं वासुदेवमहाराज चतुर्थाश्रमी संन्याशी झालेले होते,

त्यांना नारायणांनीं पत्रद्वारें विचारलें कीं, "माझ्या मनांत शुक्लवृत्ति धारण करावी असें आहे. वडिलार्जित अन्न सेवूं नये असें वाटतें. कसें करूं ? आपली आज्ञा होईल त्याप्रमाणें करीन." यावर वासुदेवानंदसरस्वतींनीं असें उत्तर दिलें कीं, "आपली इच्छा चांगलीच आहे. शुक्लवृत्ति धरायला आमची परवानगी आहे. पण भिक्षा मागूं लागल्यानंतर ग्रामस्थ मंडळी तुम्हांला हंसतील. तें सहन करण्याची ताकद असेल तर शुक्लवृत्ती धरावी. जे प्रथम हांसतील तेच लोक पुढें स्तुतीहि करतील. दोन्ही समानच मानावीं किंवा निंदा ही सुधाच होय व स्तुति हें विषच होय असें समजून स्वहिताला लागावयाचें धैर्य असल्यास इच्छेप्रमाणें करा. आमचा पूर्ण आशीर्वाद आहे." याप्रमाणें उत्तर खंडांतून वासुदेवमहाराजांचें उत्तर नारायणांना आलें. तें वाचून त्यांच्या हृदयांत आनंद मावेना. आपल्या इच्छेनुरूपच महाराजांनीं उत्तर धाडलें असें ते म्हणाले व वाराणशीला म्हणजे आपल्या पत्नीला त्यांनीं आपला विचार कळविला. उद्यांपासून आम्ही जें धान्य आणून देऊं त्याचाच स्वयंपाक करावयाचा. घरांतल्या तांदुळांचा भात करूं नको असें तिला त्यांनीं सांगून ठेवलें.

महाराजांच्या आज्ञेनुसार नारायणांनीं शुक्लवृत्ति धारण केली. श्रीदत्ताचे पायां पडून गांवांत पुजारी ब्राह्मणांचे घरीं ते कोरान्न मागावयाला गेले. नियमित घरची शुक्लभिक्षा आणून त्यांनीं पत्नीच्या स्वाधीन केली. तिचा पाक साध्वीनें तयार केला. त्या पाकानें नारायणांनीं नैवेद्य, वैश्वदेव केला. अतिथीला अन्नदान दिलें व एक ब्राह्मण पंगतीला घेऊन आपण भोजन केलें. त्या दिवशीं त्यांचे मनाला मोठें समाधान झालें. पत्नीला मात्र खेदच झाला. तिची मनोवृत्ति पतीप्रमाणें बनली नव्हती. मुलगा, मुलगी दोघें तर अप्रबुद्धच होतीं. त्यांना चांगलें किंवा वाईट वाटण्याचा संभवच नव्हता. नारायणांना बंधू होते. त्यांच्याशीं आजपर्यंत एकत्रतेनेंच ते वागत. पण शुक्लवृत्ति धरतांच ते निराळे राहून भोजनादिक व्यवहार पृथक्पणानें करूं लागले. बंधूंना यांचें करणें आवडलें नाहीं. पण स्वतंत्र बुद्धीच्या आपल्या भावाला ते कांहींच बोलले नाहींत.

नारायणांचा शुक्लवृत्तीचा क्रम रोज चालू झाला. एकदां त्यांची सासू रेंदाळाहून जामातांना भेटण्यासाठीं आली होती. तिनें जांवईबुवा भिक्षा माग-

तात असें पाहून फार खेद केला. लेकीजवळ बसून ती रडली व म्हणाली कीं, 'हे इंग्रजी शिकत होते. मोठी नोकरी करतील; द्रव्य मिळवितील म्हणून समजलें व तुला यांच्या पदरांत घातली. आणि यांनीं तर झोळी हातीं घेतली. तुझें नशीब; मी तरी काय करूं ? बाळे वाराणशी, यांना बोलून हे काय ऐकणार तरी आहेत ? आली दशा ती निमूटपणें भोग झालें ! ! ' असें म्हणून परत आपल्या गांवीं सासुबाई निघून गेल्या.

बंधू असोत कीं सासुसासरे असोत आपल्याला कोणीहि गुरुमहाराजांपेक्षां कांहीं अधिक नाहींत. मग त्यांना आपलें वर्तन आवडलें नाहीं म्हणून खेद करण्याचें काय प्रयोजन आहे ? महाराजांची आज्ञा पाळायची ही एकच गोष्ट आपण जाणतों, दुसरें कांहीं जाणत नाहीं. असें म्हणून सासू रुसून गेल्याचा खेद नारायणांनीं केला नाहीं. त्यांनीं आपली शुक्लवृत्ति चालूच ठेविली. पुढें ग्रामस्थ लोकसुद्धां त्यांना नांवें ठेवूं लागले. महाराजांच्या बोलाचा अनुभवच त्यांना येऊं लागला. लोक म्हणत, 'पहा नारायण दीक्षिताची तऱ्हा. हा इंग्रजी विद्या शिकत होता. बापाचे पैसे वायां दवडून, ती सोडून बसला. नोकरी किंवा धंदा कांहींच केला नाहीं. शास्त्राभ्यास करीत होता; तोहि सोडून दिला; कथापुराण सांगून कांहीं मिळवावें पण तेंही केलें नाहीं. बरें न करो. घरचें उत्पन्न घेऊन तरी कुटुंबपोषण करावें होतें, तेंहि नाहीं. भिक्षाच आपला मागूं लागला. याला काय म्हणावें ?' याप्रमाणें गांवांत निंदा होऊं लागली. कोणी त्यांच्या तोंडावरसुद्धां तसें बोलूं लागले. तथापि गुरुमहाराजांच्या उपदेशाकडे लक्ष देऊन नारायण लोकनिंदा लक्षांतच घेत नसत.

कांहीं सज्जन मात्र त्यांची स्तुति करीत. ते म्हणत : पहा नारायण दीक्षितांची वृत्ति. वडिलांनासुद्धां यांनीं मागें टाकलें. पूर्वीच्या वृत्तींत व आतांच्या वर्तनांत कितीतरी फरक यांनीं केला. असे हे सुधारतील असें कांहीं वाटलें नव्हतें. ब्राह्मण धर्माप्रमाणें हे अगदीं योग्य वागूं लागले. सद्गुरुकृपा यांच्यावर झालेली दिसते. वासुदेवमहाराज टेंब्यांनीं यांना सन्मार्गाला लावलें म्हणतात. गुरूप्रमाणेंच यांनींसुद्धां शुक्लवृत्ति धरली. ठीक झालें. कुलोद्धारच होईल. त्याप्रमाणें सज्जन बोलूं लागले. त्यांच्या समक्ष त्यांची स्तुति करूं लागले. पण नारायण

ती स्तुतिदेखील मनावर घेत नसत. पुढें पुढें निंदकसुद्धां स्तुति करूं लागले. नारायणांनीं निंदास्तुतीवर काठीच लाविली होती. निंदा ऐकून किंवा स्तुति ऐकून ते दुःखी किंवा सुखी होत नसत. सर्वांबरोबर हंसतमुखानेंच बोलत, रागावत नसत.

नारायणांची धर्मचिकाटी व सहनशीलपणा पाहून सर्व लोक त्यांचें कौतुक करीत. साम्यबुद्धीचा अंगीकार करून नारायण वागत. परान्न व प्रतिग्रह नारायणांनीं अजिबात बंद केला होता. ज्या दिवसाचा लाभ त्या दिवशींच खर्चून सोडीत; भिक्षान्नांचा संग्रहदेखील ते करीत नसत. ही यांची वृत्ति पाहून कुटुंबभरणार्थ वस्त्रादिकांची काळजी नारायणांना पडूं नये म्हणून कांहीं सज्जन त्यांना द्रव्याची मदत करूं लागले; तीहि ते नको म्हणून घेईनात. तेव्हां लोक त्यांना न कळविता ते कोरान्न मागायला आले म्हणजे तांदुळांतून त्यांना द्रव्य देऊं लागले. नारायणांना घरीं तांदुळांत द्रव्य सांपडूं लागलें. त्यांना बरें वाटेना. त्यांनीं भिक्षेच्या वेळीं भिक्षा वाढणाराला "तांदुळांतून द्रव्य वाढूं नका हो" म्हणून सांगायला सुरुवात केली; द्रव्य घातलेले तांदूळ ते घेईनात. लोकांना मोठें नवल वाटे. ते म्हणत, 'खरें वैराग्य याला म्हणतात. कोणी देत असतांदेखील जो नको म्हणतो व दिलें तरी घेत नाहीं, तोच विरक्त खरा. नारायण दीक्षित खरोखरच विरक्त आहेत.'

नारायण लोकादराला पात्र झाले. सद्गुरुनाथांच्या आज्ञेनुसार पंचमहायज्ञ, देवपूजा, अतिथिअभ्यागताला अन्नदान करणें, दत्तभजन, वगैरे ते नियमानें करीत. स्मार्ताग्निहोत्र त्यांनीं ठेवलें होतें, असें पूर्वी सांगितलेंच आहे. बाळंभटजी बोरगांवकर हे वैदिक ब्राह्मण त्यांचे स्नेही होते. त्यांच्या विचारानें ते धर्म-संबंधीं कर्में करीत असत. संशय वगैरे आल्यास त्यांना विचारून आपलें वर्तन ते सुधारीत. धर्माचरणांत एखादे वेळीं शंका आल्यास विद्वानांचा विचार घ्यावा, असें त्यांना वासुदेवमहाराजांनीं सांगितलें होतें, तसें ते करीत. स्मार्ताग्नीवर इष्टया करायच्या असतात. त्या ते करीत असत. गायत्रीचीं लहान पुरश्चरणें त्यांनीं केलीं. तसेंच चांद्रायणव्रत देखील केलें. प्रायश्चित्तें घेतलीं. एकादशा-जयंत्या आल्या म्हणजे उपोषणें केलीं. याप्रमाणें तपश्चर्या करीत ते सूर्याप्रमाणें

तेजस्वी शोभूं लागले; अंतर्बाह्य स्फटिकाप्रमाणें शुद्ध झाले. वडिलार्जित इस्टेट त्यांनीं सत्पात्र पाहून सर्व दान देऊन संपविली. मुद्दाम ब्राह्मण बोलावून आणावे व त्यांना स्वादिष्ट अन्नाचें भोजन घालावें, आग्रहानें वाढावें, दक्षणा द्यावी, वस्त्रें द्यावीं असा क्रम त्यांनीं सर्व घर मोकळें होईपर्यंत चालविला. संग्रह संपला तेव्हां आनंदित झाले. नारायणांना कोणी लोक द्रव्य देण्याची इच्छा करीत. पण ते नको म्हणत म्हणून त्यांचे अग्निनारायणापुढें ते लोक द्रव्य ठेवून जाऊं लागले. नारायण तेंदेखील द्रव्य सत्पात्र ब्राह्मणांनाच देऊन मोकळे होत. त्यांचा आनंद संग्रहावर अवलंबून नव्हता, त्यागावर अवलंबून होता. त्यागानेंच ते सुखी होत. अध्यात्म शास्त्रांत वैराग्यच सुखाचें खरें साधन मानलेलें आहें. " सर्वपरिग्रहभोगत्यागः ॥ कस्य सुखं न करोति विरागः ' असें शंकराचार्यांचें देखील म्हणणें आहे.

नारायण दीक्षित वैराग्यशील असल्यामुळें ते द्रव्य, अन्न, वस्त्रादिकांचा सांठा मुळींच करीत नसत. एकदां रात्रीं यांचे घरीं चोर शिरला होता. त्याला अग्निकार्यासाठीं एका बुट्टींत ठेवलेल्या गोमयाच्या गोळ्यांशिवाय दुसरें कांहींच न मिळाल्यामुळें व गोमयगोळे निरुपयोगी म्हणून रिकाम्या हातांनींच परत जावें लागलें. चोराला विन्मुख जावें लागलें म्हणून नारायणांना वाईट वाटलें. चोर निराश होऊन गेलेला ज्यांना रुचला नाहीं, त्यांना अतिथिअभ्यागत विन्मुख गेलेला रुचेल कसा ? त्याच्या संतोषासाठीं ते किती जपत असले पाहिजेत, याची कल्पना सूज्ञच करतील. आपल्या मुलांप्रमाणें दासदासींवर दया करणाराला साधु म्हटलेला आहे. मग चोरावरसुद्धां दयावृत्ति ठेवणारे नारायण महासाधु नव्हेत काय? मुलाबाळांची काळजी तुम्हांला नाहीं काय ? असें कोणी विचारलें असतां, 'ती ईश्वराला आहे,' असें ते म्हणत. त्यांची स्वतःची राहणी अगदीं साधी होती. नेसायचीं पांघरायचीं धोतरें साधीं होतीं. गळ्यांत शुभ्र यज्ञोपवीत, कपाळीं भस्माचें त्रिपुंड्र व हातांत आचमनें करण्यासाठीं पळीपंचपात्री, मुखावर हास्य, हृदयांत शान्ति, वृत्तींत लीनता, बोलण्यांत मधुरता, चालण्यांत नीति. व वर्तनांत धर्म अगदीं भरलेला असे. अकिंचन असून शान्त, दान्त व भगवद्भजनानें संतुष्ट असणारे नारायण सदोदित सर्वत्र सुखीच असत. सुदामदेवाप्रमाणें त्यांचा संसार होता म्हटलें तरी चालेल. तो

जसा अत्यंत निष्कांचन, धर्मनिष्ठ व वासुदेवप्रिय होता तसेच नारायणदेखील होते. वयानें ते तरुण, पण विवेकानें वृद्ध होते. स्वधर्मपरायण, विरक्त व गुरुदेवभक्त नारायण महाभागवत होत. नवविधाभक्ती ते करीत असत. श्री-दत्ताची म्हणजेच वासुदेवाची उपासना त्यांनीं भावभक्तीनें चालविली होती. सगुणाप्रमाणें निर्गुण उपासनादेखील गुरूपदेशानुसार ते करीत असत. युक्ताहार-विहार करून नियमित वेळीं एकान्तांत बसून आत्मानात्मविवेक ते करीत. प्रथम वासुदेवानंद सद्गुरूंची मूर्ति ध्यानांत आणीत. सर्व अवयवांचें ध्यान करीत करीत गुरुमुखावरील हास्य ते मनांत भरवून घेत व आनंदित होत. आनंदरूपाचेंच मग ते चिंतन करीत राहात; मन आनंदाकार करीत. हा आनंद मनाचा साक्षी आहे; हाच आत्मा आपण होय, असें ते समजत व देहत्रयाचा विसर होईपर्यंत अखंड आत्मध्यान करीत ते बसत. अशा तऱ्हेनें निर्गुण उपासना त्यांनीं चालविली होती. आत्मस्वरूपाचें जें भजन हेंच वासुदेवभजन होय. कायिक, वाचिक, मानसिक असें त्रिविध तप त्यांचें सुरू होतें. विष्णु-सहस्रनाम, गीता, उपनिषद्, गुरुचरित्र तर त्यांचें चालू होतेंच. एवंच कर्म, भक्ति व ज्ञानाभ्यास करीत नारायण गुर्वाज्ञापालनार्थ गृहस्थाश्रमांत वर्तत होते.

सद्गुरुरायाच्या सहवासांत राहून त्यांनीं धर्माचें, उपासनेचें व आत्म-चिंतनाचें ज्ञान करून जें घेतलें त्याचा योग्य विनियोग करीत ते राहिले. देव, गुरु व शास्त्र या तिघांवर त्यांचा पूर्ण विश्वास होता. तिघांचें जसें त्यांना प्रेम होतें तसें त्यांचें भयसुद्धां ते बाळगीत असत. म्हणून तर मनाला स्वाधीन ठेवून सत्कर्मानें त्यांना वागतां आलें. देव, गुरु व शास्त्र यांची ज्यांना भीति व प्रीति नसते त्या लोकांकडून सन्मार्ग आक्रमिला जात नाहीं. स्वेच्छाविहारी लोक दुःखमय स्थितींतच अखेर जातात. नारायण हे देवभक्त, गुरुभक्त व धर्मशास्त्रभक्त पक्के असल्यामुळें संसारांत राहूनच सुखमय स्थितीचा अनुभव घेत होते. गुर्वाज्ञापालनाचें फल त्यांना असें मिळालें कीं षड्रिपूंचा पराजय करून ते ध्यानयोगारूढ झाले. योगारूढ पुरुष झाला म्हणजे त्याचीं सर्व कर्में व मनोव्यापारदेखील बंद पडतात. आसक्तिरहित तो पुरुष बनतो. कर्मकाण्डाची मर्यादा येथपर्यंतच आहे. नारायणांनीं ती मजल पूर्ण गांठली. त्यांचे चित्तांत

शम, दम, दया, करुणा इत्यादिक सात्त्विक गुण परिपूर्ण वाढून राहिले. ध्यानाला बसले म्हणजे त्यांना तें सोडून उठावेंसें वाटेना. तसेंच बसून रहावें, आत्मसुखच घेत रहावें, असें त्यांचें पुढें पुढें होऊं लागलें. त्यामुळें शुक्लवृत्तीला जाण्याचा वेळ एकादे प्रसंगीं टळूं लागला. असें जेव्हां होऊं लागलें, तेव्हां त्यांनीं ती वृत्ति पुरीच केली. म्हणजे कोरान्नाला जाणें सोडून दिलें. परमेश्वरावर भार ठेवून त्याच्या इच्छेनें जें काय वसल्या ठिकाणीं मिळेल तेणेंकरून आपला व कुटुंबाचा निर्वाह चालवावयाचा, म्हणजे ईश्वरानेंच तो चालवावयाचा असा याचा अर्थ. आपण कोणतीच चिंता करावयाची नाहीं असा त्यांचा निर्धार झाला. व अयाचित वृत्ति धारण करून स्वस्थ आत्मसाधनांत तल्लीन होऊन ते राहिले. " निष्काम निश्चल विठ्ठलीं विश्वास ॥ न पाहाती वास आणिकांची " अशी त्यांची स्थिति झाली.

नारायणांनीं अयाचित वृत्ति धरली तरी आपलें धर्मकर्म, भजनपूजन मात्र कमी केलें नाहीं; तें तर चालू ठेवलेंच. प्रथम दोनतीन दिवस त्यांना कडक उपास पडले. थोडेंसें धारिष्टच ईश्वरानें पाहिलें म्हटलें तरी चालेल किंवा त्यानें तें लोकांना दाखविलें असें समजा. परमेश्वर कृपाळूच आहे. त्यानें सर्वांचे मनाला प्रेरणा दिली. नारायणांचे घरीं लोक शिधा म्हणजे 'अयाचित' पोंचवूं लागले. " ज्याचा सखा हरी ॥ त्यावर विश्व कृपा करी " भक्तवत्सल भक्ताभिमानी दत्तभगवान नारायणांचा योगक्षेम चालवूं लागला. म्हणजे भक्ताची चाकरीच त्यानें सुरू केली म्हणायला कांहीं हरकत नाहीं.

श्रीदत्ताचे कृपेनें नारायणांचे घरीं आपोआप शिधासामुग्री जरी येऊन पडूं लागली तरी पूर्ण विरक्त व निर्लोभी वृत्तीचे ते, सर्व शिधा ज्या दिवशींचा त्या दिवशीं संपवीत. गोरगरिबांना माधुकरी वाढीत, ब्राम्हणांना भोजन घालीत. गोग्रास देत; श्वान, कावळे तृप्त करीत, आपल्या घरच्या माणसांना म्हणजे भार्या व दोन मुलें यांना जेवायला वाढीत व आपण नैवेद्याचें ताट घेऊन मिताहार करीत. दुसऱ्या दिवसाला एक कणदेखील राखीत नसत. ते परिग्रह जरी करीत नसत, तरी मोठे भांडवलवाले सावकारच होते. भूतदया हें त्यांचें भांडवल होय. कंजूषपणा सोडून उदारपणानें ते जगजसा खर्च

जास्त करीत, म्हणजे अन्नवस्त्र गोरगरिबांना सत्पात्रीं दान करून सोडीत, तसतसें त्यांचें भांडवल अधिकाधिक वाढलेलेंच लोकांचे दृष्टिपथाला येई. नारायणांच्या भूतदयेचें एक उदाहरण मी आपणांला सांगतों. त्यावरून ते केवढे दयाळू होते, तें तुम्हांला कळेल.

एकदां वाडीग्रामीं प्लेगाची सांथ आली होती. त्यावेळीं नारायण हे देवसन्निध कृष्णातटाकीं एका धर्मशाळेंत राहिले होते. तेथेंच त्यांनीं आपली मंडळी नेली होती. स्मार्ताग्निहोत्राचें कुंडदेखील तेथेंच त्यांनीं स्थापिलें. अयाचित वृत्तीच त्यांची चालू होती. लोक म्हणजे परमात्मा त्यांना शिधासामुग्री तेथेंहि पुरवीतच होता. त्यांचा अन्नदानाचा क्रम रोजचा सुरूच असे. शिधा उरवायचा नाहीं, रोजच्या रोज संपवायचा हा त्यांचा स्वभावच होता. आलेला सर्व शिधा ते शिजवीत व माधुकरी लोकांना मुद्दाम आमंत्रण देऊन अन्न वाढीत. वाडीकर विप्रांना अशौच आलें, म्हणजे प्लेगनें कोणी मनुष्य मरण पावला असतां त्याचें सुतक त्यांना आलें असतां, गांवांत माधुकरी मिळणें बंद होई व रोज न येणारेसुद्धां बरेचसे माधुकरी लोक रोज नारायण दीक्षितांकडेच दुपारीं माधुकरीला येऊं लागत. आलेल्या अतिथीला प्रेमानें अन्न वाढायचें, कोणालाही परत फिरवायचा नाहीं असा नारायणांचा बाणा होता. त्या आपल्या व्रताला अनुसरून त्यांनीं येतील तितक्या माधुकऱ्यांना अन्न वाढायला सुरुवात केली. त्यांची पत्नी दुखणेकरीच नेहमीं असे. कारण तिला दमा होता म्हणून नारायण अन्नाचा विनियोग स्वतःच आपल्या हातानें करीत. माधुकऱ्यांना वाढायचें. मुलांना जेवूं घालायचें, पत्नीला एक पात्र तयार करून द्यायचें व नंतर आपलें पात्र पुढें घेऊन आपण भोजन करावयाचें असा त्यांचा परिपाठ होता. चमत्कार असा झाला. कीं, नारायणांनीं भोजनार्थ ताट पुढें घ्यावें, तों अकस्मात् कोणी तरी अतिथि भिक्षेला यावा; यांनीं आपलें वाढलेलें ताट त्याचे पदरांत ओतावें असा सतत दहा दिवस क्रम चालला. अकरावे दिवशीं, दहा दिवसांत पोटांत अन्नाचें शीतसुद्धां न गेल्यामुळें ते कृष्णेचा घांट चढून येतांना चक्कर येऊन बेशुद्ध पडले. वाराणशी भ्याली. अण्णांना म्हणजे नारायणांचे वडील बंधूंना तिनें बोलावून आणलें. त्यांनीं औषधोपचार बरेच केले. तेव्हां कांहीं तासांनीं नारायणांना

शुद्धि आली. विचारपूस करतां अण्णांना वाराणशीनें कळविलें कीं वहा दिवसांत तर एक शीतसुद्धां यांनीं पोटांत घातलें नाहीं. त्याचे पूर्वी महिनाभर अगदीं चार चार घांसच अन्न हे खात होते. हें ऐकून अण्णा नारायणांना थोडेसे रागें भरले. व ' शरीर रक्षून धर्म कर ' असें सांगून घरीं गेले. प्लेगाचे दिवस असल्यामुळें भलताच ग्रह वाराणशीचा झाला होता. पण प्राणनाथ शुद्धीवर आले तेव्हां तिच्या जिवांत जीव आला. लोकांना ही हकीगत समजली. तेव्हां सज्जनांनीं नारायण दीक्षितांना भूतदयेचे बाबतींत रंतिदेवाची उपमा दिली व धन्यता गाइली. ते म्हणाले, ' भूतदया, औदार्य, भक्ति, धर्माचरण, वैराग्य इत्यादि पवित्र गुणांनीं मंडित श्रीनारायणमूर्ति हे केवळ देवच होत. परमेश्वराची विभूतीच हे असले पाहिजेत खास, यांत संशयच नाहीं. आम्हां अज्ञ जनांचे मार्गदर्शक सद्गुरूच हे शोभतात. लक्ष्मण दीक्षितांचे चिरंजीव हे धन्य होत. ' आपल्या पोटाला धोतराच्या घडचा बांधून नारायणांनीं अतिथीचा संतोष केला. आपण उपाशी राहिले! पण भुकेलेल्यांचे प्राण आपल्या पुढ्च्या अन्नानें शांत केले. यावरून ते केवढे दयाळू महात्मे होते याची कल्पना वाचकांना होईलच.

या प्लेगाचे सांथींत नारायणांची पत्नी वाराणशी व मुलगा राम, या उभयतांनींहि परलोकीं वस्ती केली. स्वतः नारायणांनादेखील ग्रंथिज्वर आला. त्यांत त्यांना वात झाला; ते बडबडूं लागले. त्यांची बडबड, त्यांच्या अंतरांतील वासना, त्या दुर्वासना आहेत कीं सद्वासना आहेत याची जाणीव सर्वांना करून देणारी होती. ते बेशुद्ध अवस्थेंत असें बरळत होते कीं,— " देवांचेहि देव आमचे गुरुमहाराज वासुदेव आले पहा. मी त्यांना आसन देतों. गुरुमहाराज यावें, आपली पूजा मी करतों. मंदिर बांधून त्यांत मी तुम्हांला विराजमान करतों. पालखींतून तुम्हांला मी मिरवितों. आप्तजनहो ! या. तुम्हीं महाराजांना नमस्कार करा. आपला उद्धार करून घ्या. " हे उद्गार काढतांना नारायणांना त्यांचे गुरुभगवंत साक्षात् पुढें दिसत होते. आपल्या निष्ठावंत अनन्य भक्ताला काळाचे दाढेंतून ओढून काढण्यासाठीं ते तेथें आले होते. यमधर्माला शासन करून त्यांनीं नारायणांना दुखण्यांतून बरें केलें; मृत्यु परत फिरविला. भक्ताचा अभिमान प्रभु असा

बाळगतात. नारायणांच्या निष्ठेचें फळ त्यांना मिळालें. प्लेगाला भिऊन इतर लोकांप्रमाणें ते दत्ताला सोडून गेले नाहींत. काळावर सोंटा मारणारा, काळाचाहि काळ असा प्रणतपाळ भगवान् वासुदेव दत्तप्रभु आपला पाठिराखा असतांना ग्रंथिज्वराचे भयानें मी त्याचा आश्रय कां सोडूं? मला काळाचें काय भय आहे? असा निर्धार करून नारायण ज्या अर्थीं वाडींतच राहिले, त्या अर्थीं त्यांचें संरक्षण करणें भक्ताभिमानी प्रभूला भाग पडलें.

नारायणांचा काळपाशरूपी वात गुरुकृपेनें दूर झाला मात्र; तोंच म्हणजे देहाची स्मृति होतांच त्यांनीं चतुर्थाश्रम घेण्याचा संकल्प केला. भार्यापुत्रादिक उपाधी तर पूर्वीच निवृत्त झाली होती. तशींच कर्में करण्याची मर्यादा त्यांनीं उल्लंघिली होती. देहद्वयाचा साक्षी मी अकर्ता अभोक्ता आत्मा आहें! असें समजून देहाहंकार गळाल्यामुळें, त्यांचा कर्माधिकार संपला होता. मुमुक्षुता, शमादिषट्क, वैराग्य आदि करून सकळहि ब्रह्मज्ञानाची सामुग्री त्यांनीं सिद्ध केली होती. महावाक्यांतील त्वंपदार्थशोधन करून तत्पदार्थाचे ज्ञानाधिकारी ते होऊन राहिले होते. वस्तुतः ते संन्यासीच होते. कारण "यो न द्वेष्टि न कांक्षति" या वचनानुसार नित्यसंन्यासित्व त्यांनीं संपादिलें होतें. तथापि शास्त्रविधानाप्रमाणें चतुर्थाश्रम घ्यावा, म्हणजे महावाक्योपदेशाचे श्रवणाला आपण सशास्त्र अधिकारी होऊं असें त्यांनीं ठरविलें व आपल्या वडील बंधूंना ते म्हणाले कीं, "अण्णा मला संन्यास घ्यायचा आहे. करितां सर्व सिद्धता करा." अण्णा नाखूष झाले. पण नारायणांच्या निश्चयापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. दत्तंभटजी नांवाचे तपस्वी ब्राह्मण कुरुंदवाडचे घाटावरून त्यांनीं बोलवून आणले. हे पुरुष त्या वेळीं सर्वमान्य होते. त्यांनीं येऊन नारायणांची थोडीशी वैराग्य परीक्षा घेतली. त्या वेळीं नारायणांनीं त्यांना स्वच्छ असें सांगितलें कीं, "मला माझ्या सद्गुरुनाथांच्या मुखानें जन्मसाफल्य करणारा महावाक्योपदेश श्रवण करण्यापलीकडे, कोणतीच इच्छा उरलेली नाहीं. सांसारिक सुख मी विषासमान त्याज्य समजतों. करितां क्षणाचा देखील विलंब न लावतां मला प्रेष द्या; 'बरें वाटल्यावर दुसरा विवाह करून घे' असें सांगून पुन्हां संसारसिंधूंत लोटण्याचा प्रयत्न करूं नका. मनुष्यशरीराचा महिमा मनांत घेतां, व त्याचे क्षणभंगुरत्वाचा विचार करितां, परमार्थाचा लाभ ज्याच्या

योगानें साधतां येतो, असें हें दुर्लभ शरीर काळमुखीं पडलें नाहीं तोंच त्यापासून निःश्रेयसाची प्राप्ति करून घ्यावी, असें माझें मत आहे. विषयसुखोपभोगार्थ अवांतर योनी कांहीं कमी नाहींत. आमच्या गुरुमहाराजांनीं पत्नी वारल्याबरोबर चौदावे दिवशींच संन्यास घेतला. क्रियाकर्मान्तर झाल्यावर एक दिवससुद्धां मध्यें जाऊं दिला नाहीं. मग मीच विलंब कशाला लावूं ? कुळाचा उद्धार करणारा संन्यासाश्रम तुम्ही मला द्या. "

नारायणांचा विवेकवैराग्ययुक्त आश्रमस्वीकाराचा दृढनिश्चय जाणून दत्तंभटजींनीं सर्व सिद्धता केली व लगेच त्यांना विधिपूर्वक संन्यासदीक्षा दिली. भगवी कौपीन व छाटी नारायणांनीं परिधान केली, कमंडलु घेतला, कपाळीं व सर्वांगाला भस्माचें त्रिपुंड्र लावून श्री दीक्षित स्वामीमहाराज वंदन करणारांना ' नारायण ' म्हणून आशीर्वाद देऊं लागले.

जरी नारायणांनीं मुंडन करून शिखायज्ञोपवीताचा त्याग करून लौकिक वैदिक कर्मांचा संन्यास केला तरी त्यांनीं गुरुस्वरूपी भगवंताची उपासना मात्र सोडली नाहीं. किंबहुना त्यांनीं गृहस्थाश्रमाची उपाधी सोडून निरुपाधिक संन्यासाश्रम घेऊन भक्तिमार्गाचा अवलंब अधिक खबरदारीनें केला असें म्हटलें तरी चालेल.

प्रकरण ५ वें

श्रीदीक्षितस्वामींनीं आपल्या वयाच्या अडतिसाव्या वर्षी भर तारुण्यांतच संन्यास घेतला. यावरून त्यांचें वैराग्य अति तीव्र होतें, हें सहजच दिसून आलें. त्यांच्या वडिलांनीं आणि चुलत्यांनींसुद्धा संन्यास घेतला होता. पण तो अगदीं म्हातारपणीं घेतला. तसा गलितेंद्रिय झाल्यावरचा नारायणांचा संन्यास नव्हे. द्वितीय संबंध करून घेण्याला वय योग्य असतांच त्यांनीं परवैराग्याचा आश्रय करून पुत्रदारधनेषणांचा त्याग केला. विरक्तीच्या बळावर त्यांनीं संन्यास घेतला. असा वैराग्यपूर्वक संन्यास कोणत्याहि आश्रमांतून घेतां येतो. त्याला कशाचा देखील प्रतिबंध नाहीं. परम पुरुषार्थ जो मोक्ष त्याच्याकरितां संन्यासच घेणें उचित आहे. कारण "न कर्मणा न प्रजया धनेन" या शास्त्रवाक्यानें यरकड सर्व साधनांचा निषेध करून 'त्यागेनैके अमृतत्वं' असें म्हणून संन्यासाचेंच विधान प्रामुख्यानें शास्त्रानें केलें आहे. श्रीमच्छंकराचार्यांनीं अशा विरक्त संन्याशांना धन्य म्हटले आहेत. एषणात्रयाचा त्याग करून, भैक्ष्यामृताच्या पानानें शरीर-यात्रा चालविणारे, व लंगोटी चालून परमात्मचिंतनांत निमग्न राहणारे वैराग्यवंत संन्यासी धन्य होत, ते महाभाग्यवंत होत असें आचार्यांनीं त्यांचें धन्याष्टक गाइलें आहे. अर्थात् अशा धन्यवादाला पात्र झालेले श्रीदीक्षित-स्वामी धन्यच होत.

दीक्षितस्वामी संन्यस्त झाले तरी अजून ते ग्रंथिज्वराच्या आजारांतून चांगले बरे झाले नव्हते. पुनर्जन्म झाल्यानें त्यांचा गंडांतरयोग मात्र चुकला. सामान्य रीतीनें त्यांना उठतां बसतां येऊं लागतांच ते ब्रम्हानंदाच्या मठांत माडीवरील खोलींत राहूं लागले. तेथें त्यांची शुश्रुषा बाबूराव शिरोळकर

हे करीत असत. ऊन पाणी स्नानाला व पथ्याचें भोजन त्यांना कांहीं दिवस वैद्यांच्या सांगण्याप्रमाणें सुरू ठेवावें लागलें. पुढें ते चांगले बरे झाले.

वैराग्यभाग्याबरोबर 'साधनमात्रालागिं विसावा' असा जो विवेक तो त्यांना वासुदेवानंदांनीं दिलाच होता. त्या विवेकाचा अभ्यास त्यांनीं एकान्तीं बसून आतां आरंभिला. 'कूटस्थ मी तरि सदोदित साक्षिभूत' या गुरुवचनाचा अनुभव ते अखंड घेऊं लागले. देहद्वयाचा मी आत्मा साक्षी इतकें कळून त्यांचें समाधान होईना. बरोबरच आहे; समाधान व्हावें कसें? देहद्वय-साक्षित्वाचा बोध म्हणजे केवळ महावाक्यांतील एका शब्दार्थाचा तो बोध होय. संपूर्ण वाक्यार्थाचा बोध तो नव्हे. साक्ष्यसुद्धां निरसून जावें लागतें. तेव्हां त्या बोधाला पूर्णता येते. ती खूण स्वसंवेद्य आहे. सद्गुरुनाथांच्या कृपेनें महावाक्योपदेशकालींच मुमुक्षु त्या स्वसंवेद्य खुणेला जाणतो; स्वबुद्धीनें जाणूं शकत नाहीं. नेत्राला जसा सूर्यानुग्रहानें पदार्थ प्रकाशित दिसतो, तसा मुमुक्षूचे बुद्धीला गुर्वनुग्रहानें वाक्यार्थरूपी स्वयंब्रह्म हा बोध होतो, एरवीं होत नाहीं. दीक्षितस्वामींना सर्वकाळ असेंच वाटूं लागलें. स्वतःचे प्रयत्न जितके करावयाचे तेवढे मी केले, यापुढें आतां आपली गति होत नाहीं. जें टाकतां येणें शक्य होतें तें मी टाकलें. गुरुकृपेवर अवलंबून असलेल्या अद्वैत बोधानेंच ज्याचा निरास होतो, असें जें निजस्वरूपाचें मूळ अज्ञान तें मी कसें टाकूं? असें त्यांना वाटे. ब्रह्मबोधरूपी दंडावांचून त्या अज्ञानाचें खंडन होणारें नसल्यानें हा संन्यासाश्रम मला न्यूनच वाटत आहे. सद्गुरुनाथ केव्हां येतील बरें!! व मज दासाला कृतार्थ केव्हां करतील बरें!! अशी त्यांना अहोरात्र तळमळ लागून राहिली. आपण गुरुशोधार्थ जावें असें ते म्हणूं लागले.

'अविद्याकपाटाची किल्ली ज्यांच्या हातीं आहे, असे माझे वासुदेवानंद-सरस्वती गुरुमहाराज जिकडे असतील तिकडे मी त्यांचा शोध करीत जाईन' असा विचार करून स्वामी होते. तों त्यांना गुरुमहाराज उत्तरखंडीं ब्रह्मावर्ताच्या समीप असल्याचा शोध लागला. 'काशी, प्रयाग, गया, अयोध्या, मथुरा, द्वारका, गोकुळवृंदावन, हरिद्वार, बद्रिनाथ, ज्योतिर्लिंगें, ब्रह्मावर्त इत्यादि क्षेत्रें उत्तरेंत आहेत, तिकडेच त्यांचा संचार धर्मस्थापनार्थ होत आहे.

ते जगदोद्धार करीत पृथ्वीपर्यटण करीत आहेत' अशा अर्थाचीं पत्रें कोणाकोणाला आलीं होतीं. त्यांचे मुखानें स्वामींना त्यांचा रहिवास बहुधा ब्रह्मावर्तालाच असेल, अशी बातमी लागली. सद्गुरूच्या भेटीसाठीं आतुर झालेल्या दीक्षितस्वामींना वाडींत बसून चैन पडेना. केव्हां गुरुमाउलीला मी पाहीन, असें त्यांना झालें. त्यांनीं गणू बोडस नांवाच्या ब्रह्मचाऱ्याला बरोबर घेऊन ब्रह्मावर्ताला जाणारा रस्ता धरला. पायीं चालण्याची त्यांना संवय नव्हती व आजारांतून उठल्यामुळें त्यांचे अंगीं बळदेखील नव्हतें. म्हणून ते मिरजेला जाऊन अग्निरथांत बसले, व ब्रह्मावर्ताला गुरुभेटीस निघाले.

उत्कंठा पूर्ण लागली म्हणजे गुरुपरमेश्वर आपोआपच भक्ताला येऊन भेटतात, असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. आतां दीक्षितस्वामी स्वतः गुरुशोधार्थ प्रवास करूं लागले. ती त्यांची तशा तऱ्हेची एक भक्तीच होय. पण ते जरी तसे न जाते, तरीदेखील त्यांची इच्छा पुरी झालीच असती. त्यांना सद्गुरु वासुदेव जागेवर येऊनच भेट देते. आणि ते तसे ती देण्यासाठीं ब्रह्मावर्तांहून निघालेदेखील होते. जेव्हां दीक्षितांना त्यांची तळमळ लागली, तेव्हांच ब्रह्मावर्तांत त्यांना दत्तात्रेय प्रभूंनीं आज्ञा केली कीं, "वासुदेवा! नरसोबाचे वाडीला तुझा शिष्य नारायण दीक्षित संन्यासाश्रम घेऊन बसला आहे. त्याला दंड देऊन वाडीकर पुजाऱ्यांची धार्मिक सुधारणा कर." या दत्ताज्ञेनुसार वासुदेवानंदसरस्वती ब्रह्मावर्त सोडून निघालेच होते. दत्ताज्ञा झाल्यावर ते क्षणाचाहि विलंब लावीत नसत. प्रभूच्या सांगण्याप्रमाणें वागायला प्रारंभच करीत. दत्ताला त्यांनीं देह अर्पण केला होता. त्याचे आज्ञाधारक भक्त ते आपणांला मानीत असत. लोकसंग्रहार्थ त्यांचा भक्तभाव होता. एरवीं ते स्वतः दत्तच होते.

दीक्षितस्वामी गुरुशोधार्थ निघाले ते प्रथम ब्रह्मावर्तालाच गेले. गुरुस्थानाचा शोध करीत ते राममंदिरांत जाऊन उभे राहिले. तेथें लोकांनीं त्यांना महाराजांची माहिती सांगितली. महाराज येथून वाडीला जातों म्हणून गेले व ते सध्यां मालवदेशीं भेलसाग्रामीं आहेत, अशी बातमी त्यांनीं श्रीदीक्षितस्वामींना दिली. महाराज येथें नाहींत, मग येथें आतां कशाला रहावें, असें

म्हणून स्वामी निघाले. गुरुस्थानाला त्यांनीं वंदन केलें, गुप्ततीर्थांत स्नान केलें, आचमन घेतलें व महाराजांची लीला तेथील भक्तांच्या मुखानें ऐकत एक रात्र तेथें त्यांनीं काढली. दुसरे दिवशीं गणूला घेऊन मालवदेशीं जाण्याला निघाले. आश्चर्याची गोष्ट ही कीं, काशी, प्रयाग, गया वगैरे महाक्षेत्रें समीप असतांना तिकडे ते गेले नाहींत. सर्व तीर्थांचें तीर्थ, व सर्व देवांचे देव आपले सद्गुरुनाथच आहेत. त्यांच्या दर्शनानें आपणांला सर्व तीर्थांचा व देवांचादेखील लाभ होईल, असें त्यांनीं मानलें. मारुतीला रामाव्यतिरिक्त त्रिभुवनाच्या मोलाचीं रत्नेंदेखील तुच्छ गमलीं; तद्वत् दीक्षित स्वामींना वासुदेवाव्यतिरिक्त कांहींच थोर वाटलें नाहीं. 'न गुरोरधिकं न गुरोरधिकं' 'गुरुरेव परं गुरुरेव परं' हा शिवगीतेंतला उपदेशमंत्र त्यांचे हृदयांत सतत घोळत होता. मग ते त्याच्या बाहेर कसे वागतील ? दुसरा एखादा सामान्य मनुष्य असता तर 'जवळ असलेलीं तीर्थें करून घ्यावीं' असेंच म्हणता व तसें करता. पण दीक्षितस्वामी अद्वितीय गुरूचे अद्वितीय शिष्य होते. त्यांना गुरुपरब्रह्मावांचून दुसरें कांहीं आठवलेंच नाहीं. पूर्वाश्रमापासूनच त्यांची गुरुभक्ति अत्यंत उज्ज्वल होती, 'माझी देवपुजा देवपुजा पाय तुझे गुरुराजा ॥' या शिवदिनकेसरीच्या मताचे ते होते. ते तडक मालवदेशींच प्राप्त झाले. त्या देशांत गेल्यावर ठिकठिकाणीं गुरुशोध त्यांनीं घेतला. कारण भेलशांतच गुरुनाथ राहिले असतील कशावरून ? दुसरीकडे देखील जाण्याचा संभव त्यांना दिसला. विचारीत विचारीत ते चालले तों भेलशांतच महाराज आहेत ही बातमी त्यांना नक्की लागली. तेव्हां ते त्या गांवालाच गेले.

भेलशाचे सीमेवर त्यांनीं दंडप्राय नमस्कार घातला व पुढें पाऊल टाकलें. जातां जातां महाराजांच्या सुखवार्ता लोकमुखांनीं त्यांना ऐकायला येऊं लागल्या. त्यांचे योगानें आनंदित होऊन ते पुढें गेले तों नदीवर संध्या करून स्वस्थानीं परत जात असलेले भगवान् वासुदेव सद्गुरुनाथ त्यांचे नजरेस पडले. तेव्हां दुरूनच दंडवंदन करायला त्यांनीं सुरुवात केली. दंडाप्रमाणें देह जमिनीवर ठेवीत ठेवीत ते त्यांचेकडे जाऊं लागले. तों भक्तसखे वासुदेव त्यांच्यापुढें हातांत दंडकमंडलु घेऊन, छाटी परिधान करून, कपाळीं भस्म लावलेले, राजीवलोचन, प्रसन्न वदनानें येऊन उभे राहिले. दोघांनींहि एकमेकांना

संन्यासी स्वरूपांत प्रथमच पाहिलें. वाडींतले आपले शिष्य नारायण दीक्षित हे होत असें जाणून गुरुमहाराजांनीं त्यांना प्रेमपुरस्सर हांक मारली व जे भूमीवर आडवे पडले होते त्यांना 'वर उठा' म्हणाले. तेव्हां दीक्षितस्वामींचें हृदय प्रेमानें भरून आलें. नेत्रांतून प्रेमाश्रू वाहूं लागले. त्यांनीं उठून हात जोडले व प्रार्थना केली कीं, "या दासाला पदरीं घ्या. मला अभयवचन द्या. माझे मनोरथ पूर्ण करा." असें म्हणतांच महाराजांनीं त्यांना प्रेमानें अभय दिलें व स्वस्थानीं घेऊन गेले. तेथें गुरूनीं आश्रम घेण्याचीं कारणें विचारलीं. इतक्यांत संन्यास कां घेतलात म्हणून म्हणतांच स्वामी म्हणाले, "ग्रंथिज्वराचें निमित्त करून आपण या दासाला उपाधिनिर्मुक्त केलात." महाराज म्हणाले, "ठीक झालें, आतां आश्रमधर्माप्रमाणें दंड घ्या व ब्रह्मचिंतन करीत स्वस्थ रहा." त्यावर दीक्षितस्वामींनीं विनविलें कीं, "आपणांकडूनच दंड मिळावा म्हणून मी येथपर्यंत आलों आहें. मजवर आपण अनुग्रह करावा." महाराज म्हणाले, "तुम्ही वाडीला परत जा व श्रीदत्ताची प्रार्थना करीत रहा. आम्ही तिकडेस निघालों आहों. तेथें आल्यावर पाहूं. दत्तमहाराज तुमचे हेतु सफल करतील. इतके लांब आलांत कशाला ? बरें, आतां रेल्वेनें परत जा." या प्रमाणें वासुदेवानंदसरस्वतींची आज्ञा होतांच दीक्षितस्वामी परत वाडीला आले. महाराज वाडीला येत आहेत ही वार्ता त्यांनीं वाडीकर विप्रांना सांगितली व त्यांच्यासह आपण चकोराप्रमाणें गुरुचंद्राची वाट पहात राहिले.

पुढें कांहीं दिवसांनीं वासुदेवानंदसरस्वतीमहाराज वाडीला आले. शा १८२६, फाल्गुन शुद्ध द्वादशीच्या दिवशीं शनिवारीं सकाळीं प्रहर दिवस वासुदेवमहाराजांचें संन्यास घेतल्यावर प्रथम आगमन नृसिंहवाडींत झाल सर्व ग्रामस्थ लोकांना मोठा आनंद झाला. रामराय व भरत यांच्या भेटी प्रमाणें वासुदेव व नारायण यांची प्रेमभेट चौदा वर्षांनीं वाडींत झाली. त्यायो उभयतांना आनंद झाला. दीक्षितस्वामींनीं वासुदेवचरणीं आपलें शिरपंव भावार्थानें वाहिलें. सर्व पुजारी वगैरे वाडीकर ब्राह्मणांनींदेखील श्रीगुरु नमस्कार केले. गुरुमाउलीच्या दर्शनानें सर्वांना आनंद झाला. आबाल नरनारी जनाला श्रीवासुदेवप्रभूंनीं कुशल विचारपूस करून आशीर्वाद दि वस्तुतः संन्याशानें कोणाची कुशल विचारपूस करूं नये, असें शास्त्र आहे.

वासुदेवानंद हे संन्यासी वेषधारी साक्षात् दत्तच होते; व पुजारी हे त्यांचीं लेंकरेंच असल्यामुळें, मायबापांप्रमाणें गुरूंनीं त्यांना कुशल विचारलें. भक्त-वात्सल्यच हें त्यांचें समजा.

चौदा वर्षांपूर्वी जे गुरुशिष्य दोघेही ज्या मठांत गृहस्थधर्मानें राहिले होते, तेच दोघे त्याच मठांत आज संन्यासी स्वरूपानें राहिले. दोघांनींहि आश्रम बदलले. पण परस्परांवरचें गुरुशिष्यप्रेम मात्र बदललें नाहीं; तें होतें तसेंच राखलें. किंबहुना तें प्रेम ते आतां पहिल्यापेक्षां द्विगुणित वाढविणार होते असेंच समजा.

श्रीवासुदेवानंद महाराजांनीं श्रीनृसिंहांना गृहस्थ धर्माचा आचार सांगते-वेळींच यम, नियम, आसन, प्राणायाम, धारणा, ध्यान, समाधि, अशा अष्टांगांनीं युक्त असलेला हठयोग देखील शिकविला. त्याची विशेष माहिती जाणूं इच्छिणारांनीं वासुदेवविरचित "श्रीदत्तमाहात्म्य" नांवाचा प्राकृत ओंवीबद्ध ग्रंथ वाचावा; त्यांत योगाभ्यास त्यांनीं सविस्तर उपदेशिला आहे. विस्तारभयास्तव आम्हीं तो या ठिकाणीं लिहीत नाहीं. श्रीनृसिंहसरस्वतींनीं संन्यास आश्रम घेतल्यानंतर तो आसन-प्राणायाम इत्यादिक योगाभ्यास पूर्वी-पेक्षां अधिक वाढविला. प्राणस्पंदनिरोध हा मनोजयाचा एक उपायच आहे. तो आसनजय झाल्याशिवाय होत नाहीं व आसनजय यमनियमावांचून होत नाहीं. म्हणून नृसिंह मुनीश्वर पहांटे उठून प्रथम धूती, पूती, नीती, नौली, त्राटक, बस्ती या षट्क्रिया करून झाल्यावर कृष्णेचें स्नान करून येत व मच्छेंद्र पीठासारख्या अवघड आसनावर तास तास दोन दोन तास बसत असत. सर्वच आसनें त्यांचीं तयार होतीं. यम नियम तर त्यांचे अंगचीं सहज लक्षणेंच झालीं होती. रेचक, पूरक व कुंभक व्यवस्थेनें वाढवीत वाढवीत दीर्घकाल प्राणायाम करून प्राणावर पूर्ण ताबा त्यांनीं ठेविला. ध्यानयोगाला उपकारक म्हणून हठयोगाचा अवलंब कारणापुरताच त्यांनीं केला. ध्यान धारणा करून राजयोगाचे समाधीचाच अभ्यास त्यांचा प्रमुख होय.

स्वात्माराम मुनीश्वर श्रीवासुदेवानंद सरस्वती हे श्री दत्ताचे अवतारच होत व तसेच ते श्री दत्ताचे निर्हेतुक भक्तदेखील होत. आपल्या स्वामीच्या

दरबारीं देवरोवक या भावनेनें ते वाडींत राहिले. दत्ताच्या आज्ञेप्रमाणें त्यांनीं दत्ताचे पूजकांना धर्मसंबंधीं शिक्षण द्यावयाला सुरुवात केली. बहुत वर्षांपासून बिघडलेलें त्यांचें वर्तन त्यांनीं सुधारलें. तो इतिहास फार मोठा आहे. तो त्यांचे स्वतंत्र चरित्रांत वाचकांना वाचावयाला मिळेल. येथें श्री दीक्षितस्वामींचें चरित्र प्राधान्यानें सांगावयाचें आहे. करितां तेंच सांगतों. आपले इष्टपुरविते भक्तकामकल्पद्रुम श्रीवासुदेव भगवान वाडीला येतों म्हटल्याप्रमाणें तर आलेच. आतां आपणांला ते दंड देतीलच. आपण त्यांना भेलशांत प्रार्थना केलीच आहे. आज दंड देतील, उद्यां देतील, परवां देतील असे मनोरथ-महाल दीक्षितस्वामी रचीत राहिले. पण फाल्गुन मास संपला तरी महाराज कांहीं असें म्हणेनात कीं, " नारायण स्वामी दंडाची तयारी करा ". दीक्षितांना चिंता लागली. पुन्हां पुन्हां दंड मागण्याची तर त्यांना भीड वाटूं लागली. मग त्यांनीं महाराजांच्या प्रेमांत असलेल्या पुजाऱ्यांकरवीं आपली इच्छा त्यांच्यापुढें पुन्हां एकदां मांडिली. पुजाऱ्यांनीं महाराजांना विनंती केली कीं, ' दीक्षित हे योग्य अधिकारी आहेत. त्यांना आपण दंड व महावाक्योपदेश द्यावा, अशी आमची इच्छा आहे. ' त्यावर वासुदेवानंद एकदम ' बरें आहे ' असें म्हणाले नाहींत. विचार करीत राहिले. कारण दंड म्हणजे नुसती वंशाची यष्टी द्यायची नव्हती. किंवा महावाक्य नुसतेंच ऐकवावयाचें नव्हतें. त्याबरोबर निजसामर्थ्य द्यावयाचें होतें व तें ईश्वरी सामर्थ्य आणि ईश्वरी ज्ञान त्यांचे अंगीं परिपूर्ण होतेंदेखील. ते सामान्य मनुष्य नव्हते. म्हणून त्यांनीं आत्मवैभव सांभाळण्याला पात्रता असणारालाच तें द्यायचें, इतराला नाहीं असें ठरवून दीक्षितांची पात्रता तपासण्याचा विचार केला व ती तपासणी साक्षात् दत्तप्रभूंवरच त्यांनीं सोपविली; आपणांकडे घेतली नाहीं. ते पुजाऱ्यांना म्हणाले, " उत्तरखंडांत असतांना काशी, प्रयाग इत्यादि क्षेत्रांतून दंड घेण्याकरितां आमच्याकडे पुष्कळ संन्यासी आले होते. आपण कोणालाच दंड दिला नाहीं. कारण औत्सुक्यमात्रानें संन्यासी झालेले, प्रमादी, बहिर्वृत्ति, कलहप्रिय असेसुद्धां पुष्कळ संन्यासी असतात. प्रत्यक्ष गुरूबरोबरसुद्धां कलह मांडायला भीत नाहींत. ते दुसऱ्याला काय जुमानणार! अशा अनधिकाऱ्यांना दंड देऊन काय फळ ? संन्याशाला मुख्य वैराग्य असावें लागतें

व जिज्ञासा असावी लागते. ती नसेल तर चित्तशुद्ध्यर्थ कर्मयोगच आचरावयाची आज्ञा शास्त्राची आहे. पण शास्त्राप्रमाणें वागणाराला ती आज्ञा; स्वेच्छाचारी असणाराला तिचें काय? अशा स्वेच्छाचारी संन्याशांना तुम्ही अनधिकारी आहांत असें तरी आपण कशाला म्हणत बसावें? कोणाची निंदा नको व कोणाची स्तुति नको. आम्ही कानांवर हातच ठेवीत आलों. दंड द्या म्हणून कोणी संन्यास घेऊन आला की, आम्ही त्याला एकच जबाब देत होतों की, 'श्रीदत्तमहाराजांनीं दंड दे असें आम्हांला सांगितल्याशिवाय आपण तो देणार नाहीं.' तोच जबाब तुम्हांलादेखील आमचा आहे असें समजा." याप्रमाणें महाराजांनीं पूजकांजवळ भाषण केलें.

पूजकांनीं दीक्षितयतींना तसेंच सांगितलें. त्या वेळीं, स्वामी हताश झाले. त्यांना उदासीनता आली. व स्वतःच एकदां गुरुमाउलीला पदर पसरावा म्हणून ते त्यांच्या सन्निध जाऊन नम्र भावानें साष्टांग नमन करते झाले. गुरुमहाराजांनीं 'काय इच्छा आहे' म्हणून विचारलें. तेव्हां दीक्षितमुनि त्यांना म्हणाले, "सद्गुरुमाउलीनें मला लहानाचा थोर केला. वर्णाश्रमधर्माचें शिक्षण दिलें; विवेक-विचार शिकविला; वेळोवेळीं मी विचारीत गेलों त्या शंकांचें निरसन केलें व संन्यास घेण्यापर्यंत माझ्या मनाची तयारी आपण केली. आपणांवर विश्वासून मी राहिलों आहें; प्रेमतंतू अखंड राखावा; मज बालकाचा अव्हेर करूं नये; या दासाला दंड देऊन कृतार्थ करावा." इतकी प्रार्थना करून स्वामी हात जोडून उभे राहिले. त्यांना वाटलें कीं पूर्वाश्रमांतला आपल्या वडिलांचा स्नेहसंबंध व आपला प्रेमसंबंध महाराज मनांत आणतील व आपला अंगीकार करतील. पण त्यांचा तो समज उलट झाला. वासुदेवमहाराजांनीं तो पूर्वसंबंध मनावर घेतला नाहीं. श्रीमत् भगवत्पूज्यपाद श्रीशंकराचार्यांचे ते परंपरागत अनुयायी होते. त्यांनीं शंकराचार्यांच्या सांप्रदायानुसार शिष्यपरीक्षा झाल्याशिवाय दंडदान करणें अयोग्य ठरविलें. आचार्यांचा उपदेश त्यांनीं मनांत आणला. तो असा :-" हें मोक्षसाधन ज्ञान चतुःसमुद्रवलयांकित पृथ्वी भरून जडजवाहीर कोणी देऊं लागला तरी देऊं नये. त्यापेक्षां हें अधिक आहे. द्यायचेंच झाल्यास कृपाळूपणानें द्यावें. तेंसुद्धां विधिवत् शरण येणाराची कुलशीलपरीक्षा घेऊन मग द्यावें. परीक्षेचें कारण

हेंच कीं, शिष्याची ज्ञान सांभाळण्याची पात्रता समजते." ही आद्यशंकराचार्यांची सांगी लक्षांत घेऊन व श्रीदत्तभगवानाला परीक्षक नेमून महाराजांनीं नारायणस्वामींना देखील पूर्वीचाच जबाब दिला. ते म्हणाले, "श्रीदत्ताची आज्ञा झाल्यास आपण तुम्हांला दंड देऊं; नाहींतर तुम्ही परमानंदस्वामींकडून दंड घ्या."

धर्मशास्त्रानुसार वागण्याचे बाबतींत करारी असलेले, प्रसंगीं शास्त्राज्ञेपुढें ईश्वराचेंसुद्धां न ऐकणारे महाराज, शास्त्राज्ञेनुसार परीक्षणार्थ दत्ताज्ञेची अट घालून जेव्हां बसले तेव्हां दीक्षितस्वामी मनांत म्हणाले कीं, "गुरुमाउली इतकी निष्ठुर कां बरें झाली! लोण्याहूनदेखील मृदु असलेलें त्यांचें मन आज कठीण कसें झालें!! 'अन्य यतीकडून दंड घे.' ही त्यांची वाणी मला अत्यंत प्रखर भासली. बाळाला निजमातेविण दुसरी स्त्री केव्हांतरी माता वाटेल काय? पतिव्रतेला दुसरा पुरुष केव्हांतरी रुचेल काय? माशाला जसें जल तसें वासुदेव सद्गुरुनाथच माझें जीवन आहे. त्यांनीं उपेक्षा केल्यावर मी जगूं कसा? व कशाला? मनानेंसुद्धां मी सद्गुरुदेवावांचून दुसरें दैवत श्रेष्ठ समजत नाहीं. श्रीदत्तप्रभुदेखील साक्षात् श्री वासुदेवानंदच होत. यांच्याहून ते भिन्न नाहींत व त्यांच्याहून हे भिन्न नाहींत; दोघे एकच आहेत. मज अनन्याची उपेक्षा ते करणार नाहींत. मी त्यांनाच शरण जाईन. त्यांच्या मनाला पाझर फोडीन. हा देह एवढ्यासाठीं मी आज त्यांच्या चरणीं समर्पण करीन. सद्गुरुकृपेवीण जगून तरी काय उपयोग?" असा मनाचा निर्धार दीक्षितस्वामींनीं केला.

स्वजीवितावर उदार होणारे दीक्षितस्वामी महाधीर वीर पुरुष होत. गुरूंनीं जी अट घातली ती मी जीव पणाला लावून पुरी करीन व त्यांच्याकडूनच दंड व गुरूपदेश घेईन असा ज्यांनीं निर्धार केला त्यांची गुरुनिष्ठा व गुरुप्रीति केवढी होती, ती सहजच सर्वांना कळून येईल; सांगणेची जरूर नाहीं. अशी गुरुप्रीति व गुरुनिष्ठा अन्यत्र क्वचितच दृष्टीस पडेल. कृतनिश्चयाचे महामेरू दीक्षितस्वामी लडिवाळ मुलाप्रमाणें आपल्या गुरुमातेच्या पायथ्यापाशीं, म्हणजे त्यांनीं रात्री शयन केलें होतें तेथें, त्यांच्या पायथ्यापाशीं, संध्या-

काळपासूनच म्हणजे प्रार्थनेला गेले होते तेव्हांपासूनच हात जोडून जे एकदां ठाण मांडून उभे राहिले, ते रात्रभर तसेच उभे राहिले. नेत्रांतून दुःखाश्रूचे प्रवाह ते सोडीत होते. निजनयनोदक धारांनीं वासुदेव पदपंकजें ते भिजवीत होते. श्रीगुरुनाथांच्या मनाला ते आर्द्रता आणीत होते. त्यांनीं दत्ताची प्रार्थना काकुळतीनें मांडली होती. ते सद्गद होऊन अनन्य भावानें विनवून प्रभूला म्हणाले कीं,

पद

(**चाल**— हरि तव विपरित वचन दिसे।)

मजवरी कां बरी दृष्टि नसे ॥ जरि मी दोषी असें ॥ धृ० ॥ माझ्या दोषां नाहीं गणित ॥ अगणित भूकणसे ॥ मज० ॥ १ ॥ नाहीं दयाळू लोकीं तुजसम ॥ मजसम दोषि नसे ॥ २ ॥ रोगिच नसता तरि कोण पुसता ॥ असतां वैद्य जसे ॥ ३ ॥ गुरुमायबाप तूं वारि ताप ॥ कोप तव चित्तीं नसे ॥ मज० ॥ ४ ॥

दीक्षितस्वामी म्हणाले, " मज पतिताचा उद्धार करून प्रभूनीं आपलें पतित-पावन ब्रीद रक्षण करावें; त्याची हानि होऊं देऊं नये. आपण करुणासमुद्र आहां; परमोदार आहां. आपल्या शरणागत भक्ताला करांत धरून दोष-समुद्रांतून वर काढणारे, श्रुतिप्रतिपादित महिम्याचे देवदेवोत्तम आपण आहां. करितां मज गरीब दासाचा अंगिकार करा; माझा अंत पाहूं नका. " याप्रमाणें रात्रभर प्रार्थना जेव्हां दीक्षितस्वामींनीं केली, तेव्हां श्रीदत्तदयाघनाला त्यांचा कळवळा आला.

पहांटे अरुणोदयकाळीं श्रीदत्तप्रभु प्रसन्न झाले. आपल्या भक्ताचा पूर्ण अभिमान त्यांनीं धरला व वासुदेवानंदसरस्वतींना ते म्हणाले कीं, " नारायण हा महागुरुभक्त, माझा आत्मा आहे. त्याचा अंत किती पाहतोस! वासुदेवा ! त्याला आपला शिष्य करून घे. परीक्षा पुरी झाली. दंड दे. " याप्रमाणें दत्त-भगवंताचें सांगणें महाराजांना झालें. ते आपल्या जागीं उठून बसले. पाहतात

तों, दीक्षितस्वामी अश्रू ढाळीत उभे आहेत असें त्यांना दिसलें. त्याबरोबर त्यांच्या हृदयांत खळबळ उडाली. " अरेरे! किती कष्ट यानें सोसले हे. चार प्रहर एका जागीं सारखा रडत हा उभाच आहे अद्याप. धन्य ह्याची निष्ठा. " असें स्वगत म्हणून उघडपणें म्हणाले कीं, " नारायणा, तुझा विजय झाला. स्वामी, दंडाची तयारी होऊं द्या. " श्रीगुरुनाथांच्या मुखांतली ही अमृतवाणी कानीं पडतांच दीक्षितांना नवा जीवच प्राप्त झाला. ते अत्यंत आनंदित झाले. त्यांनीं आपले डोळे पुसले. गुरुचरणावर प्रेमानें मस्तक ठेवलें व आपल्या पुढील कार्याला लागले.

प्रथम पूर्वीच्या सहवासांतील पद्धतीप्रमाणें महाराज एकवचनी नारायणा असा प्रयोग करूनच भाषा बोलले. पण नंतर " स्वामी दंडाची तयारी करा " असें अनेकवचन त्यांनीं योजलें. हा व्यवहार सांभाळला. पण पूर्वी प्रेमातिरेकानें तो सुटून गेला होता; त्याला नाइलाज आहे.

गुरुशिष्यांचा हा प्रेमसंग्रामच झाला म्हणावयाचा. गुरूंनीं दंड न देण्याची प्रतिज्ञा केली होती व शिष्यानें तो मी त्यांना द्यायला लावीन असा पण केला होता. युद्धांत अखेर शिष्यच विजयी झाला.

' शिष्यादिच्छेत्पराजयं ' या वाक्यानुसार गुरूदेखील आनंदित झाले. श्रीदत्तानें पसंत करून आपणाला शिष्य दिला. अर्थात् तो विद्यादानाला सत्पात्र आहे असें जाणून वासुदेवानंद सच्छिष्यलाभानें आनंदित झाले. आपलें सर्व ज्ञानवैभव दीक्षितस्वामींना दंड देतांना द्यावयाचा संकल्प त्यांनीं केला. आपल्या आनंदसाम्राज्यावर ते त्यांना बसवितील; स्वीय साम्य त्यांना देतील; त्यांना पूर्णकाम करतील तो कथाभाग आतां वर्णन केला जाईल. प्रेमळ भक्त हो ! एकाग्रतेनें श्रवण करा.

प्रकरण ६ वें

अनंत जन्मीं पुण्य संपादन करीत करीत जीव सुदुर्लभ अशा नरजन्माला प्राप्त झाला म्हणजे तो अनंत सुखाचा वांटेकरी होतो. तें अनंत अपार सुख ज्यावेळीं सद्गुरु ब्रह्मबोध करतात त्यावेळीं मनुष्याला मिळतें. असें जाणून ज्यांनीं त्याच्याकरितां आजवर शास्त्रीय पौरुष प्रयत्न केले, ज्यांनीं गुरुसेवा करून ज्ञानाचा अधिकार संपादन केला, सद्गुरुवचनीं विश्वास ठेवून त्यांच्या सांगण्याप्रमाणें वागून जे साधनचतुष्टयसंपन्न बनले व महावाक्यश्रवणाकरितां म्हणजेच गुरुमुखानें ब्रह्मज्ञानसंपादनार्थ चतुर्थाश्रमी संन्यासी होऊन राहिले, ते नृसिंहसरस्वती-दत्ताचे अंशावतार असे दीक्षितस्वामी आज सद्गुरुमुखानें आपण कोण आहों हें ओळखून घेण्याला तत्पर झाले. अवतारी पुरुषांनासुद्धां सद्गुरुवांचून गति नाहीं हा सिद्धांत ते आपल्या वर्तनानें जगाला पटवीत आहेत. ' उद्धरेदात्मनात्मानं ' आपला उद्धार आपणच करून घ्यावा या वचनाचा अर्थसुद्धां ते एकाच वर्तनानें बोधित करीत आहेत, असेंसुद्धां म्हटलें तरी चालेल. गुरूवर आणि शास्त्रावर विश्वास ठेवून त्यांच्या आज्ञेनुसार वर्तन केल्यानेंच आपला आपण उद्धार केला असें होतें. कारण गुरुवचन किंवा शास्त्रवचन प्रमाण मानल्याशिवाय बंध, मोक्ष, अधःपात किंवा उद्धार याची कल्पनादेखील जीवाला होणें शक्य नाहीं. मग तो करून घेणें तर दूरच राहिलें. म्हणून गुरुदेवाला शरण जाणें म्हणजेच आपला आपण उद्धार करणें होय, हीच गोष्ट खरी आहे असें आम्ही म्हणतों. श्रीनृसिंहसरस्वती स्ववर्तनानें याचाच बोध करीत आहेत असें समजा.

श्रीवासुदेवानंद सरस्वती श्रीदत्ताच्या आज्ञेनें दीक्षितस्वामींना दंड व महावाक्योपदेश द्यायला सिद्ध झाले, असें पूर्वीच्या प्रकरणांत सांगितलें.

त्यानंतर महाराजांच्या आज्ञेप्रमाणें स्वामीनीं तयारी केली. दंडसूत्र, दंड-वस्त्र व दंड त्यांनीं गुरुनाथांच्या हवालीं केला. तो घेऊन त्याला विधियुक्त पद्धतीनें महाराजांनीं मुद्रांकित केला. त्याच्यावर जे संस्कार करावयाचे ते करविले. विष्णु भगवानाचे हातांत जसें सुदर्शनचक्र किंवा शिवहातांत जसा त्रिशूल, तसा तो मुद्रांकित दंड विष्णुचिन्ह म्हणून विष्णुरूपी यतीच्या हातांत देण्यासाठीं त्यांनीं तयार करून ठेवला. व नरसोबाचे वाडीला शके अठराशें सत्तावीस सालचे चैत्रमासीं श्रीनारायणस्वामींच्या मंदिरांत श्रीदत्तात्रेय भगवंताच्या उत्सवमूर्तीपुढें विधियुक्त रीतीनें दीक्षितस्वामींची पूजा झाल्यानंतर श्रीवासुदेवानंदांनीं त्यांचे हातीं तो दंड दिला व त्यांना महावाक्याचा उपदेश केला. उपदेश करतांना वासुदेवानंद सरस्वती त्यांना म्हणाले, "जें एकमेवाद्वितीय परब्रह्म, भक्तोद्धारार्थ भूतळीं अवतीर्ण झालें, ज्याला श्रीदत्त नरसिंहसरस्वती हें नाम आहे, तेच नरसिंहसरस्वती तुम्ही आहां. तुम्ही सच्चिदानंद वस्तु आहां. आम्ही, तुम्ही व श्रीदत्त एकच ब्रह्म आहों; निराळें कोणी नाहीं. भेदकल्पना सांडा." याप्रमाणें बोध करून श्रीनरसिंहसरस्वती हेंच त्यांचें नांव त्यांना महाराजांनीं दिलें. त्यावेळीं साक्षात् दत्तभगवानच झालेले नरसिंह सरस्वती हे आपलें उपास्य दैवतच होत असा भाव ठेवून वासुदेवमहाराज त्यांचे पुढें गुडघे टेकून नम्र झाले. हातांत निजदंड घेऊन त्यांनीं त्यांना वंदन केलें. आपले शिष्य प्रत्यक्ष ब्रम्हमूर्ति दत्तच आहेत, अशी निश्चित बुद्धि झाल्यावांचून वासुदेव भगवान त्यांचे पायां पडले असतील काय? नाहींच नाहीं. नरसिंहसरस्वती हे दत्तच होत म्हणूनच त्यांना त्यांनीं नमन केलें. याप्रमाणें दंडदान विधि पुरा करून वासुदेवमहाराज आपल्या आसनावर विराजमान झाले.

वासुदेव भगवंतांनीं आपलें गुरुपद म्हणजे ब्रम्हपद दीक्षित यतींना असें ज्ञानद्वारा अर्पण केलें. त्यांना सद्गुरु बनविलें; आपणासारखें केलें. आपलें ज्ञान व आपली ईश्वरी शक्ति त्यांना त्यांनीं दिली; कृतार्थ केलें. तेव्हां पूर्णकाम झालेले नरसिंह सरस्वती कृतज्ञतेनें वासुदेवचरणीं आपलें मस्तक ठेवते झाले. त्यांच्या हृदयांत परप्रेम उत्पन्न झालें. महानंदाचा शाश्वत लाभ ज्या परमकारुणिकांनीं आपणांला करून दिला, त्या गुरु भगवंताचे आपण कसे

उतराई होऊं, या गुरूपकाराची फेड कशानेंही केव्हांही होणें शक्य नाहीं असें त्यांना वाटलें. त्यांचे नेत्र पाण्यानें भरून आले. अष्टसात्त्विक भाव हृदयांत उत्पन्न झाले. त्यांच्या हृदयांत परमानंद प्रगटला असल्यामुळें त्यांना जास्त कांहीं बोलवेना. त्यांचें देहभान उडून गेलें. कांहीं काळ स्वानंदसमाधि भोगीत ते तसेच राहिले. झोंपेंतून मनुष्य उठतो तसे ते कांहीं वेळानें समाधींतून उठले. त्यांनीं आपला गुरुदत्त दंड सांवरून धरला व सद्गुरुनाथांना वंदन करण्याला ते सिद्ध झाले. वंदनाचे वेळीं कटिवस्त्र बांधावें असें शास्त्र आहे. त्याला अनुसरून ते कटीभोंवतीं छाटी गुंडाळूं लागले. पण त्यांना ती पद्धतशीर गुंडाळतां येईना. तेव्हां माता जशी आपल्या मुलाला वस्त्रालंकार आपण करते तद्वत् शिष्यवत्सल वासुदेवानंद सरस्वती स्वतः उठून नरसिंहसरस्वतींना आपल्या हातांनीं कटिवस्त्र नेसायूं लागले. याप्रमाणें नेसत जा असें म्हणून त्यांनीं व्यवस्थितपणानें छाटी शिष्याचे कटीला नेसवून त्याला सुशोभित केला. यालाच म्हणतात सद्गुरूंचें शिष्यप्रेम. असें प्रेम क्वचित् तरी अन्याचे ठिकाणीं असेल किंवा नाहीं याचा वानयाच आहे. वासुदेवानंदांसारखे शिष्यप्रेमी सद्गुरु व नरसिंह सरस्वतींसारखे गुरुप्रेमी सच्छिष्य आमच्या तरी पाहण्यांत कोठें आलेले नाहींत, दोघेही अद्वितीयच होत.

नरसिंहसरस्वतींनीं सद्गुरुवासुदेवभगवंतांची पूजा केली. त्यांना चंदन, हार वगैरेंनीं अलंकृत केलें. त्यांचे अंगावर नवी छाटी घातली व आपला दंड हातांत घेऊन सद्गुरुपरमेश्वराला त्यांनीं गुढघे टेंकून दंडवंदन केलें. ते सद्गद होऊन पुढें उभे राहिले व म्हणाले कीं,—

नमः श्रीगुरो मेशधीशे दयाब्धे भयार्तिघ्न ते स्वात्मदो वासुदेव ॥ यतीट्सेवितानंदपादाब्जयुग्मं सदा मे हृदि स्थास्नुतां यातुदेव ॥ १ ॥

शिष्यस्वामी म्हणाले, "भो सद्गुरो, सकल ब्रह्मांडीं तुम्हीच ओतप्रोत भरून राहिले आहां. बुद्धींद्रियाचे चालक व भासक आपण आहां, सर्वच आपण आहां. वेदशास्त्रें व सरस्वती आपलेंच वर्णन करीत असतात. आपल्या कृपामृताचा अभिषेक माझ्यावर होतांच जीववुद्धीरूपी गार आत्मजळांत मिसळून

गेली. नदीप्रमाणें ती वासुदेवानंदसागरांत ऐक्य पावली. अद्‌भुतच आपण केलेंत. आपल्यावांचून जगांत दुसरें कांहीं नाहीं. एक आपणच वासुदेवमूर्ति सर्व नटलां आहांत. आपणांला सर्व बाजूंनीं माझे अनंत नमस्कार असोत." असें म्हणून वारंवार स्वामींनीं गुरुनाथांना नमस्कार घातले व पुन्हां प्रेमळपणानें अशी मागणी केली कीं—

पदिं गंगा कटिं शोभे छाटी कौपीन ॥ हृदयीं लक्ष्मीकौस्तुभ भृगुपदलांछन ॥ दंडकमंडलु हातीं रवींदुसम वदन ॥ राहो माझे हृदयीं हेंचि सदा ध्यान ॥ १ ॥

या आरतीच्या कडव्यांत त्यांनीं सद्‌गुरुमूर्तीवरील आपलें निःसीम प्रेम व्यक्त केलें आहे. निःसीम म्हणण्याचें कारण हेंच कीं ब्रह्मात्मबोध म्हणजे निर्गुण ब्रह्मज्ञान झाल्यानंतरसुद्धां पुन्हां त्यांनीं अशी मागणी केली; यालाच म्हणतात कृतज्ञता !! असो.

स्वतः परमेश्वरानेंच लीलेनें जीवभाव घेतला होता. तो सद्‌गुरुनाथांच्या वचनानें त्यानें सोडून दिला. सद्‌गुरुवचनाचें महत्त्व असें आहे कीं, ज्यायोगें जीव, ब्रह्म म्हणजे ईश्वर बनतो; असा जगूं जनतेला उपदेश करीत श्रीनृसिंह-सरस्वतींनीं वासुदेवानंद सरस्वतीचें पट्टशिष्यत्व संपादन केलें. रामचंद्रप्रभूंना जसे वसिष्ठ तसे नृसिंहसरस्वतींना वासुदेवानंद हेच सद्‌गुरु शोभले. एकमेक एकमेकांना शोभवीत ते अद्वितीय गुरुशिष्य ब्रह्मानंदाचे मठांत राहिले. नंतर वासुदेवमहाराजांनीं सर्व पुजारी मंडळीला दत्ताज्ञेनुसार उपदेश केला; धार्मिक आचारविचार त्यांना शिकविला व त्यांना देवापाशीं वागण्याचे कांहीं नियम घालून दिले. या नियमांचें उल्लंघन करूं नका असें त्यांना बजावलें व आपण परत वाडी सोडून निघाले. महाराज निघालेले पाहून नृसिंह-सरस्वतीसुद्धां त्यांच्यावरोबर गुरुसमागमानें जावयास सिद्ध झाले. दोघे मिळून श्रीदत्तमंदिरांत देवाचे वंदनासाठीं गेले. तेथें महाराजांचे वंदनाला व त्यांच्या हातून प्रसाद घ्यावा म्हणून सगळा वाडी गांव गोळा झाला. सर्वांना महाराज जातात म्हणून वाईट वाटलें. महाराज दत्तमंदिरांत कांहीं

वेळ बसले. त्यांना पुजारी म्हणाले कीं, " गुरुमहाराजांनीं आम्हांला दुःख-समुद्रांत ठेवून जाऊं नये. " महाराज म्हणाले, " प्रभूच्या आज्ञेप्रमाणें आपलें कर्तव्य आम्हीं केलें; आतां राहण्याला परवानगी नाहीं. तुम्हांला सांगितल्या-प्रमाणें वागा म्हणजे दुःखमुक्त रहाल. " असें म्हणून सर्वांना प्रसाद देऊन निघाले. त्यांच्याबरोबर त्यांचे नूतन शिष्यदेखील निघालेच. असें पाहून पुजारी महाराजांना पुन्हां विनवूं लागले कीं, " आपण जातां तर आपले शिष्य नृसिंहसरस्वती आहेत त्यांना तरी येथें ठेवा; बरोबर नेऊं नका. संकटकालीं रक्षणकर्ते एक तरी येथें रहा; दोघेही जाऊं नका. " असें म्हण-तांच वासुदेवानंदसरस्वती पुजाऱ्यांना म्हणाले कीं, " आम्हीं घालून दिलेल्या नियमांप्रमाणें आपण वागूं असें लिहून द्या; म्हणजे स्वामींना येथें ठेवतों, नाहींतर घेऊन जातों. " असें म्हणतांच चारी फडेवाले पुजारी एकत्र झाले. त्यांनीं महाराजांनीं लिहून दिलेल्या नियमांच्या कागदावर आपल्या सह्या केल्या. तेव्हां महाराजांनीं नृसिंहसरस्वतींना आज्ञा केली कीं, " तुम्ही वाडी क्षेत्रांतच निरंतर रहा. वाडीकर बाळगोपाळांवर दृष्टी ठेवा व दत्ताच्या उत्सवमूर्तीची शयनारति, पूजा नियमानें करा; तेच आम्ही आहों. त्यांची जी सेवा तीच आमची होय. आम्ही तिनें संतुष्ट होऊं. " स्वामींना असें सांगून महाराज पुजाऱ्यांना म्हणाले कीं, नृसिंहसरस्वतींना तुमच्यासाठीं येथें ठेविले आहेत. यांच्या वचनाबाहेर जाऊं नका. यांच्या मतानें वागा म्हणजे तुमचें कल्याण होईल. इत्यादि उपदेश करून वाडी सोडून महाराज गेले व गुर्वाज्ञेनें नृसिंहसरस्वतीस्वामी वाडींतच क्षेत्रसंन्यासी होऊन राहिले.

वासुदेवानंदसरस्वतींनीं वाडींत राहून नृसिंहसरस्वतींना दंड दिला व चतुर्थाश्रमाचा धर्म त्यांना शिकविला. उपनिषदें, पंचीकरण, वार्तिकें वगैरे पढविलीं. ध्यानसमाधि वगैरेचा अभ्यास सांगितला व त्यांची वाडींत स्थापना केली. उत्सवमूर्तीची पूजा हीच आपली सेवा त्यांना सांगितली व ते संचारार्थ गेले. त्यानंतर नरसिंहसरस्वतीस्वामीमहाराज गुरूपदेशाप्रमाणें आपलें आन्हिकाचरण करीत वाडींत राहिले. आसन, प्राणायाम, ध्यान, समाधि वगैरे ते अभ्यासूं लागले. श्रीदत्ताच्या स्वारीची शेजारती भक्तिभावानें ते रोज करूं लागले. एक वर्ष होतांच पुन्हां वासुदेवानंदमहाराज वाडीला आले. त्यावेळी

त्यांनीं नृसिंहसरस्वतींना जीवन्मुक्तीचा अभ्यास सांगितला. नारायणस्वामींच्या धर्मशाळेंत सकाळीं जीवन्मुक्तिग्रंथावर ते प्रवचन करीत. त्यावेळीं सर्व स्वामी व इतर मुमुक्षूदेखील श्रवणाला बसत. सायंकाळीं संगमावर महाराज संध्येला जात त्या वेळीं त्यांचा दंड नृसिंहसरस्वती आपल्या हातांत घेत व त्यांना संगमावर नेऊन देत. तेथें संध्या झाल्यावर विधिवत गुरुवंदन करीत व 'वेदान्तकेसरी' ग्रंथ महाराजांच्या मुखानें श्रवण करीत. या खेपेला महाराज दोन महिने आपल्या पट्टशिष्याला निजसहवास देत वाडींत राहिले. पहांटे दोघांचीं प्रश्नप्रत्युत्तरें जीवन्मुक्तिविषयक होत असत. माध्यान्हकाळीं गांवांत भिक्षेला दोघे मिळून जात. मठांत एकदमच भिक्षा संपवीत. एकमेकांवर अतोनात प्रेम करीत नृसिंहसरस्वती गुरुदेवांबरोबर चार लोकांत कधींच बोलत नसत. त्यांची मर्यादा फार ठेवीत. या खेपेला वासुदेवानंदांनीं वाडींतील मठांत पुजाऱ्यांचे मुलांकरितां संस्कृत पाठशाळा स्थापिली. धुंडिराजशास्त्री कवीश्वर अध्यापक नेमले. स्वामी श्री दीक्षित महाराज शाळेचे अध्यक्ष, त्यांनीं धार्मिक शिक्षण विद्यार्थ्यांना द्यावें, असें महाराजांनीं सांगितलें व संचारार्थ निघाले. तेव्हां विद्यार्थीवर्गानें व नृसिंहसरस्वतींनीं त्यांच्या जवळ चरणपादुका मागितल्या. महाराजांनीं स्वामींना एक जोड व विद्यार्थ्यांना एक जोड मागणीप्रमाणें काष्ठपादुका पायांत घालून चार पावलें चालून त्यांच्या हवालीं केल्या. विद्यार्थ्यांना दत्ताचें भजन पादुकांपुढें नियमानें करायला सांगितलें आणि स्वामींच्या आज्ञेंत त्यांना वागायला सांगून आपण पृथ्वीपर्यटण करीत देशान्तरीं गेले.

विद्यार्थी मुलें मठांत संस्कृत शिकूं लागलीं. तीं आपल्याला मिळालेल्या गुरुपादुकांची पूजा व भजन, आरती वगैरे करीत. स्वामीमहाराजदेखील आपल्याला मिळालेल्या गुरुपादुकांची प्रेमपुरस्सर त्रिकाळ पूजा, आरती करूं लागले. पुजारी लोक त्यांना धाकटे महाराजच म्हणूं लागले. थोरल्या महाराजांप्रमाणें त्यांचा मानमरातब ते ठेवीत. त्यांना पूजेला गंध, तुळशीफुलें, दिव्याला तेलतूप वगैरे देत. नारायणस्वामींच्या पूजेंतला बाण देवळांत होता. तोसुद्धां पुजाऱ्यांनीं "स्वामींचे देव स्वामींपाशींच बरे" म्हणून नृसिंहसर-

स्वतींजवळंच दिला. त्याची पूजा गुरुपादुकांसंगें ते करीत व नारायण-स्वामींची नित्यवाचनाची श्रीगुरुचरित्राची पोथी ते नियमानें रोज वाचीत.

श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वतः मुक्तमंडलचक्रवर्तीच होते. तथापि लोक-संग्रहार्थ किंवा स्वतःची आवड म्हणून ते वेदान्त, गुरु व देव यांची सेवा आमरण करीतच असत. त्यांनीं आपल्याप्रमाणेंच आपल्या शिष्यांना म्हणजे नृसिंहसरस्वतींनादेखील तयार केलें. आपल्या सद्गुरुदेवाची व वेदान्त-शास्त्राची सेवा नृसिंहसरस्वतीसुद्धां करूं लागले. स्वतःच्या ज्ञानदाढर्यासाठीं व कृतघ्नत्वाचा दोष लागूं नये यासाठीं ज्ञानोत्तरसुद्धां त्यांनीं वेदान्त-गुरु-देव-भक्ति जी चालविली ती लोकसंग्रहाच्या देखील उपयोगाची झाली. गुरुभक्तिवांचून ज्ञान निष्फळ होय. करितां मुख्यत्वानें गुरुभक्तीच ते करीत असत. कांहीं ज्ञान्यांना सगुण पूजा, भक्ति रुचत नाहीं. तशांतले नृसिंहसरस्वती नव्हते. ते सप्रेम मानसाचे मृदुस्वभावी ज्ञानी होते. सगुण भजन हा त्यांचा आवडीचा विषय होता. त्यांनीं श्री गुरुमहाराजांपासून मोठ्या आवडीनें गुरुपादुका मागून घेतल्या. त्यांची ते प्रेमपुरस्सर त्रिकाळ पूजा यथा-स्थित करीत. प्रातःस्नान, संध्या करून श्रीदत्तप्रभूंच्या मनोहर पादुकांवर जलाभिषेक ते रोज नियमानें करून येत. नंतर वासुदेवचरण-खडावांची पूजा ते प्रारंभीत. अभिषेक, पंचामृतस्नान वगैरे सावकाश घालीत. नंतर छाटीनें त्या पादुका पुसून त्या पाटावर मांडीत. चंदनाच्या गोळ्या करून त्यांना गंध लावीत. मग अत्तर, तुळशी, बेल, सुवासिक फुलें त्यांना वहात. वस्त्रो-पवस्त्राची छाटी वर घालीत. ती अशी कीं सुपूजित पादुकांचें दर्शन तर घडावें. अशा रीतीनें सुमारें अर्ध्या पाव पादुका वस्त्रांत, व बाकी सर्व उघ-ड्याच राखीत. नंतर उदबत्त्या लावीत. तुपाचें नीरांजन एकारतीला ओवा-ळीत. फळफळावळ किंवा दूध व त्या त्या ऋतूंतील मेवा नैवेद्यार्थ ताम्हनांत भरून त्याचा नैवेद्य श्रीगुरुनाथांना समर्पण करीत. नैवेद्यानंतर ताम्हनांत घृत-नीरांजनें पेटवून ठेवून ताम्हन हातीं धरून ते उभ्यानें आरती ओंवाळीत. गुरुकृत आरत्या व स्वकृत आरत्या व स्तोत्रेंदेखील पुष्कळ म्हणत. गुरुकृत स्तोत्रें म्हणण्याची त्यांना फार आवड असे. वासुदेवविरचित ग्रंथांचें भांडार त्यांचेजवळ असेच, तो इतिहास पुढें येणार आहे. आरत्या, स्तोत्रें झाल्यावर

पादुकांना साष्टांग प्रणिपात प्रीतीनें ते घालीत व प्रदक्षिणा करीत. गुरुपद-तीर्थ प्रेमानें ग्रहण करीत. याप्रमाणें प्रातःकाल पूजा झाल्यावर दत्ताला गंध-पुष्पादिकांनीं नारायण मंदिरांत जाऊन तेथें पूजीत. दत्तपूजा करून आल्यावर खोलीचें दार बंद करून ते समाधि लावून बसत. अकराचे सुमारास दार उघडीत व गुरुपादुकांची माध्यान्हपूजा करीत. नंतर श्रीदत्ताला प्रारंभ करून रामचंद्रयोगी, नारायणस्वामी, काशीकरस्वामी, गोपाळस्वामी, विठोबा, मौनीस्वामी, ब्रह्मानंदस्वामी व कृष्णा, जान्हवी, गणपती, अन्नपूर्णा इत्यादि देवतागणाला रोज त्यांचे पुढें जाऊन हातांत दंड धरून वंदनें करून येत. नंतर नियमित घरची माधुकरी आणीत. ती कृष्णेवर नेऊन जलानें प्रोक्षीत व श्रीदत्तात्रेयभगवंतापुढें त्याचे मंदिरांत ती झोळी घेऊन जात. त्याला अंशतः नैवेद्य अर्पून मग गुरुपादुकांपुढें झोळी ठेवून त्यांना संपूर्ण महानैवेद्य समर्पण करीत व लगेच गुरुचरित्र व उपनिषद्ग्रंथ वाचीत बसत. दोन वाजतां भिक्षा संपवीत. कोणी उष्टें काढणारा नसल्यास आपण स्वतः उष्टें काढून शेण लावीत व गोग्रास गाईला देऊन झोळी धुऊन स्नान करून येत. दिवसाचा पूर्वार्ध याप्रमाणें व्यतीत होई !

सायंकाळीं विद्यार्थ्यांना कांहीं शिक्षण देऊन लगेच संध्येला उठत. विद्यार्थ्यांना कुमारशिक्षा नांवाचा धर्मग्रंथ ते सांगत. जास्ती माहिती पुढें सांगूं. सायंसंध्या झाल्यावर गुरुपादुकांचें सायंकालीन पूजन ते करीत. (तिन्ही काळीं) घृतनीरांजनें विशेष ते लावीत व आरत्या, स्तोस्त्रें वगैरे प्रेमानें म्हणत. तोंपर्यंत श्रीदत्ताची पालखी बहुतेक पुरी होत येई. तिसऱ्या प्रदक्षिणेचे वेळीं पूजासाहित्य घेऊन ते नारायणमंदिरांत जात. उत्सवमूर्ती बसण्याची जागा झाडून स्वच्छ करीत व पालखींतील मूर्तीचा पोषाख उतरून होतांच मूर्ती सिंहासनावर गाभाऱ्यांत नेऊन विराजमान करीत. श्रीवासुदेवानंदांनीं आज्ञा केल्याप्रमाणें उत्सवमूर्ती ते भावभक्तीनें वस्त्रालंकारांनीं सजवीत, गंधपुष्पें वहात; माळा घालीत, धूप अर्पण करीत. नैवेद्य चांगला—बासुंदी वगैरे स्निग्धमधुर असा—प्रभूला अर्पण करीत व ताम्हनांत नीरांजनें ठेवून हातांत ताम्हन धरून " करितों प्रेमें तुज नीरांजन स्थिरचुनियां मन " व " जय तत्त्वज्ञाननिदान ॥ अनुसूयात्रिनंदन ॥ त्वत्पदपद्मावरून ॥ पंचप्राण ओवाळीन ॥ १ ॥ " ही

आरती व अशाच निरनिराळ्या आरत्या रोज ते म्हणत. स्तोस्त्रें गाऊन प्रभूला आळवीत व गाभाऱ्याचे बाहेर येऊन साष्टांग नमस्कार व प्रदक्षिणा घालीत. यस्य स्मृत्या सोडून झाल्यावर प्रभूला छाटी पांघरायला घालीत व शेजारतीचें पद्य म्हणत. नंतर दरवाजा लावून घेत. याप्रमाणें उत्तरोत्तर उपचार व भक्ती वाढवीत वाढवीत ते शयनारती करीत असत. गुरुमहाराज व दत्तमहाराज हे एकच समजून ते अशी पूजनभक्ति करीत.

शयनारतिपूजा झाल्यावर आपल्या खोलींत जाऊन बसत. जातांना कृष्णातीरविहारी दत्तमहाराजांचे मंदिराला नमस्कार घालीत व पांच प्रदक्षिणा घालून येत. नंतर कांहीं वेदान्तग्रंथ, सन्निध असलेल्या भक्तांना समजावून सांगत व पावशेर दूध प्राशन करून, खोलीचें दार बंद करून आपल्या गुरुनाथांसह निद्रानंद घेत स्वस्थ स्वरूपविश्रान्तीला ते जात. पुनरपि पहांटे चाराला उठून प्रातःस्मरण, ध्यान वगैरे करीत. असा त्यांचा दैनंदिन कार्यक्रम चालू असे. नियमित वेळीं नियमित कार्यें करण्याची त्यांची पद्धत सर्वांना अनुकरणीय अशी असे. त्यांचें कायिक, वाचिक, मानसिक वर्तन सौम्य, सरळ व मृदु असे. आधींच ते दयाळु सात्त्विक वर्तनाचे, सर्व ग्रामस्थांना प्रिय असे सत्पुरुष होते. त्यावर वासुदेव भगवानांचा अनुग्रह त्यांच्यावर झाला. मग तर ते पहिल्यापेक्षां जास्तच लोकादरास पात्र झाले. एक घर व एक कुटुंब आपलें त्यांनीं जरी सोडलें तरी असंख्य घरें व असंख्य कुटुंबें आतां त्यांचींच झालीं. विश्वकुटुंबीच ते आतां स्वसद्गुरूप्रमाणें झाले. त्यांच्यावर समस्त वाडीकर प्रेम करूं लागले. वासुदेवानंदांच्या आज्ञेनुसार पूजक त्यांची मर्यादा ठेवून आज्ञा मानूं लागले. थोरले महाराज हेच होत, अशी त्यांनीं एकत्व भावना नरसिंहमुनीश्वरांवर ठेविली. स्वामीमहाराजांनींदेखील त्यांच्यावर हीं श्रीदत्तबाळें म्हणजे पर्यायानें आपलींच बाळें अशी प्रेमबुद्धि ठेविली. आपल्या उक्तींनीं सर्वांचे पापताप निवारण करणारे, आपल्या गुरूप्रमाणें परोपकारी, चंदन-आम्रादिवृक्षांप्रमाणें ते वाडींत सर्वांना सेव्य झाले.

श्रीवासुदेवानंदसरस्वती हे दत्तच होत अशी भावना त्यांच्याबद्दल सर्व पुजाऱ्यांची होती व नृसिंहसरस्वती हे थोरले महाराजच होत अशी स्वामी-

महाराजांबद्दल त्यांची भावना होती. अर्थात् दत्त अशीच ती भावना होय व तशी भावना ठेवण्याला ते पात्रच होते. ब्रह्मज्ञानी तर ते होतेच. शिवाय दत्ताची अभेद उपासनादेखील ते करीत. म्हणून दत्तस्वरूपता त्यांना मिळाली होती. ती अहंग्रहोपासना ते गुर्वाज्ञेनेंच करीत. गुरुवर्य वासुदेवानंदांचें त्यांना तसें आज्ञापत्रच आलें होतें. तें पत्र असें—

"श्रीमत्परमहंस नृसिंहसरस्वती यांस नारायण. सदा येतां जातां सर्वकाळ जे वेहत्रयी व्यापार होतात, त्या सर्वांचा साक्षी जो भगवान दत्त, तदतिरिक्त मी नाहीं असें साक्ष्यनुसंधान ठेवावें."

हया पत्रांत सर्वसाक्षी दत्तभगवान तोच मी असें अनुसंधान म्हणजे ध्यान करण्याचा उपदेश आहे. त्याला अनुसरून जे सदा अभेद ध्यान करीत होते, त्यांच्यावर लोकांची दत्तभावना बसणें साहजिकच होय. श्रीदीक्षित-स्वामीमहाराज निर्गुण व सगुण दोन्हीही भगवत्स्वरूपाशीं ऐक्य पावले होते. त्यांचा अधिकार त्यांच्या गुरूप्रमाणें फार थोर होता. सर्वभूतांना अभय-दान ते देत. कोणाची देखील हिंसा करीत नसत. कायावाचा मनानें सर्वांचा संतोषच ते राखीत. त्यांच्या दर्शनानेंसुद्धां जनतेला मोठें सुख होई. हातांत दंडकमंडलु, कटीं कौपीन, अंगावर छाटी व भाळाला भस्म लावलेली नृसिंह-सरस्वतींची गौरवर्णाची हंसतमुखी रम्य मूर्ति प्रत्येकाला पाहावी अशीच वाटे. सर्व सद्गुणांनीं अलंकृत ते होते. कोणताच दोष त्यांचे ठिकाणीं नव्हता. सर्वांना सुख देणारे दीक्षितस्वामी स्वतः गुर्वाज्ञापालन करीत वाडीमध्यें शोभत राहिले. नृसिंहवाडी क्षेत्राला ते एक भूषणच झाले. शिष्टांचीं सर्व लक्षणें त्यांचे अंगीं होतीं. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, निंदा, असूया इत्यादिक विकार त्यांनीं पूर्वाश्रमांतच घालवून दिले होते. श्रद्धा, भक्ति, वैराग्य, शान्ति, दान्ति, करुणा, इत्यादि सद्वृत्ति त्यांचे अंतःकरणांत घर करूनच राहिलेल्या होत्या. आहार, विहार, निद्रा वगैरे त्यांची अगदीं परिमित असे. ज्ञानसमाधीचा अभ्यास ते करीत असत. ज्ञानोत्तर भक्ति त्यांनीं चालविली होती. ही भक्ति समाधिविघ्नें दूर करणारी आहे. ज्ञानाच्या सात भूमिका साधून देणारीदेखील तीच आहे; असें ते निजाचरणानें सर्वांना सुचवीत असत व तसें त्यांना त्यांच्या गुरूंचें सांगणेंदेखील होतें.

"यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ॥ तस्यैते कथिता-ह्यर्थाः प्रकाशंते महात्मनः ॥"

असें त्यांना गुरुमहाराजांनीं एका पत्रांतून बोधिलें होतें व जी दत्ताची भक्ति तुम्ही करीत आहां, ती आमचीच होय अशें त्यांना सांगितलें होतें. कृष्ण भगवंतांनींसुद्धां अव्यभिचारिणी भक्ति हीच त्रिगुणातीत होण्याचें साधन गीतेंत सांगितलें आहे. वासुदेवमहाराजांनीं तर तीच भक्ति दीक्षित मुनीश्वरांना करायला लाविली. त्यायोगें ब्रह्मज्ञानी पुरुषानें संपादन करावयाच्या पांचवी, साहवी व सातवी ह्या जीवनमुक्तीच्या भूमिका ते शीघ्र आक्रमण करूं लागले. असंभावना, विपरित भावना त्यांना मुळींच उद्भवल्या नाहींत. संप्रज्ञात समाधीनंतर लवकरच ते असंप्रज्ञात समाधि लावूं लागले. ही समाधि राजयोगी मुनीच लावूं शकतात. केवळ हठयोग्यांना ती लावतां येत नाहीं. संप्रज्ञात समाधींत वृत्ति असते ती वृत्तीसुद्धां असंप्रज्ञात समाधीमध्यें उरत नाहीं. निर्विकल्प ब्रह्ममात्र योगी होऊन राहतो. तशी निर्विकल्प समाधि नृसिंहसरस्वती लावीत असत. तिचाच ते नेहमीं अभ्यास करीत बसत. सर्व ज्ञानभूमिका जिंकून ते ब्रह्मविद्वरिष्ठ पूर्ण जीवन्मुक्त झाले. शास्त्रीय पौरुष प्रयत्न करून नरजन्मांत संपादन करावयाच्या ज्ञानाच्या शिखरावर जाऊन नरसिंह बसले. स्वतःचें कर्तव्य त्यांना आतां कोणतेंच उरलें नाहीं; ते पूर्ण कृतकृत्य झाले.

स्थितप्रज्ञ किंवा जीवन्मुक्त अशी ब्रह्मविद्वरिष्ठाला संज्ञा आहे. त्याला ती स्थिति प्राप्त करून घेतांना सहा व्रतें धरावीं लागतात. तीं व्रतें नृसिंहमुनींद्रांनीं धरिलीं होतीं. त्यांतलें पहिलें व्रत 'अजिव्हत्व' होय. त्याचें लक्षण असें-प्राणरक्षणार्थ खात असलेल्या अन्नाला चांगलें किंवा वाईट न म्हणणें व हित, मित, सत्य बोलणें. दुसरें व्रत 'षंडकत्व'. त्याचें लक्षण असें–स्त्री उपजल्या-वेळीं, ती सोळा वर्षांची होतां, किंवा म्हातारी झाली असतां, तिन्ही वेळीं-देखील दिसली असतां मनांत विकार न उत्पन्न होणें. तिसरें व्रत 'पंगुत्व.' याचें लक्षण असें– योजनाचे आंतच गमन ठेवणें व स्नान, शौच आणि भिक्षे-शिवाय आपला मठ न सोडणें. चौथें व्रत 'अंधत्व'. याचें लक्षण असें—

चालतांना किंवा बसला असतां सोळा हातांपेक्षां लांब दृष्टीला जाऊं न देणें. पांचवें व्रत 'बधिरत्व'. याचें लक्षण असें–चांगलें किंवा वाईट लोकांचें भाषण ऐकत असूनदेखील त्याचा कोणताच परिणाम मनावर होऊं न देणें. सहावें व्रत 'मुग्धत्व'. याचें लक्षण असें– विषय सन्निध असतां देखील त्यांची स्पृहा न धरणें. भोगसामर्थ्य असून निद्रित पुरुषाप्रमाणें त्यांचें स्मरणसुद्धां न करणें. शिष्टलक्षणसंपन्न यतीश्वराजवळ हीं सहा व्रतें असतात. तींच नृसिंहमुनींनीं स्वीकारलीं होतीं. पुढें तीं व्रतें त्यांचीं स्वाभाविक लक्षणेंच बनलीं. प्रयत्नाबांचूनच तीं त्यांचे आचरणांत येऊन राहिलीं. "चणे खावे लोखंडाचे ।। तेव्हां ब्रम्हपदीं नाचे" या म्हणीप्रमाणें नृसिंहमुनींनीं उपरी उक्त लोखंडाचे चणे खाल्ले. म्हणून ब्रह्मपद, जी जीवनमुक्ति ती त्यांना साध्य झाली. म्हणजे ज्ञानोत्तर असलेलें जें ज्ञानरक्षणाचें कर्तव्य तेंसुद्धां त्यांनीं करून सोडलें. मुक्तीनंतरची प्रेमलक्षणभक्ति ते आतां करीत राहिले. स्वतः प्रेमसुख उपभोगीत लोकांनादेखील तें देत सुटले. ब्रह्मानंदाचे मठांत संस्कृत शाळा होती. तिच्यांतले विद्यार्थी यांचेच भक्त होते. थोरल्या महाराजांप्रमाणेंच ते यांना मानीत. त्यांत पुजारी व परिष्ट तसेच बाह्य गांवींचे देखील विद्यार्थी असत. तेरा चौदापर्यंत त्यांची संख्या होती. बाबुराव कुलकर्णी शिरोळकर हे सतत महाराजांजवळच रहात. ते प्रेमळ भक्त होते. गांवांतल्या पूजक कन्या व बाह्य गांवच्या दत्तसेवेकरी स्त्रिया, त्याही परमार्थसाधनासाठीं नृसिंहमहाराजांची आज्ञा किंवा इच्छा जाणून त्यांच्या भक्तिकार्याला मदत करीत. या भक्त मंडळीच्या सहाय्यानें श्रीनृसिंहसरस्वती महाराज देवाचे व सद्गुरुरायाचे उत्सव करूं लागले.

श्रीवासुदेवानंदसरस्वती संन्यास घेऊन त्यांना दंड देण्यासाठीं प्रथम ज्या वर्षी वाडींत आले त्या फाल्गुन शुद्ध द्वादशीला त्यांचा 'आगमनोत्सव' आणि श्रावण वद्य पंचमीला त्यांचा 'जन्मोत्सव' असे दोन उत्सव दीक्षितस्वामींनीं प्रथम सुरू केले. सात दिवस पूजा, महानैवेद्य व अखंड "दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा" या मंत्राचा अहोरात्र नामसप्ता इतकाच कार्यक्रम आगमनोत्सवाचा असे. जन्मोत्सवाचा कार्यक्रम असा असे कीं नामसप्ता, श्रीवासुदेवानंद पादुकांवर रुद्राभिषेक, महापूजा, महानैवेद्य वेद-

पारायण, भागवत पारायण, गुरुचरित्र सप्ता, वासुदवविरचित समस्त ग्रंथ-पारायणें, कीर्तन, पुराण, भजन, शंभरसव्वाशें पर्यंत रोज ब्राम्हणसंतर्पण, मंत्रजागर इत्यादिक अनुष्ठानें सात दिवस चालू असत. पंचमीला जयंतीचें कीर्तन करवून पाळण्यांत गुरुमूर्तीला ठेवून नामकरण वगैरे करणें. सुंठवडा वांटणें, सर्वांना प्रसाद देणें असा कार्यक्रम जन्मोत्सवाचा असे. धाकटे महाराजांनीं ब्रम्हानंदाचा मठ म्हणजे वैकुंठभुवनच केलें आहे असें लोकांना वाटे.

वासुदेव जन्मोत्सव सुरू झाला म्हणजे श्रीदत्त प्रभु व त्यांचें रामचंद्र-योगी, नारायणस्वामी इत्यादिक विभूति मंडळ या सर्वांची रोज साभिषेक-महापूजा ते करवीत असत. पुढें पुढें त्या विभूति मंडळींच्या पुण्यतिथ्या ते करवूं लागले. एकेक दिवसाचा उत्सवच पण भजन, पूजन, कीर्तन, पुराण वगैरे सर्व कार्यक्रम व्हावयाचेच. त्या त्या देवाचीं देवळें चुना लावून रंगवून त्यांवर नाना रंगांचीं चित्रें काढविणें; ध्वज, पताका, तोरणें लावणें वगैरे शोभादेखील ते प्रत्येक उत्सवाचे वेळीं करीत. नृसिंह मुनिवर्यांची हौस फार मोठी असे. त्यांच्यासारखी उत्सव करण्याची रीत कोणाला साधणार नाहीं. प्रत्येक उत्सवांत वाजंत्रीं वाजविणारे लोक, गवई, हरिदास, पुराणिक, वैदिक ब्राह्मण, पुजारी इत्यादिकांना ते योग्य दक्षणा, वस्त्रें वगैरे देऊन सर्वांचा संतोष करीत. आरंभीं हे दोन उत्सव ते करूं लागले. असो.

आतां कांहीं गोष्टी सांगून हें प्रकरण समाप्त करतों. मागें सांगितलें कीं, श्रीदीक्षितस्वामी नृसिंहसरस्वतीमहाराजांना ज्ञानोपदेश करून वासुदेवानंद सरस्वती गेले व एक वर्षानें पुन्हां आले. शिष्याला दिलेलें ज्ञान त्यांनीं तपासलें. त्याचें कारण, ज्ञानाग्नि पेटला तरीसुद्धां असंभावना, विपरित भावना, त्यांचें मोक्ष देण्याचें सामर्थ्य कमी करतात, प्रतिबंधक होतात. त्या आपल्या शिष्याला ज्ञानप्रतिबंधक भावना आहेत कीं काय त्या महाराजांनीं पाहिल्या. पण त्या त्यांना दिसल्या नाहींत. गुरुभक्तीच्या बळानें त्या शिष्यांनीं दूर झुगारल्या होत्या. तत्रापि तत्त्वज्ञान, वासनाक्षय, व मनोनाश या त्रितयींचा अभ्यास जीवनमुक्ति सुखाकरितां शिष्याला शिकवून थोरले महाराज गेले. त्यानंतर गुरुनाथांच्या उपदेशानुसार दीक्षित यतीश्वर तो

अभ्यास करीत राहिले. त्यांत त्यानीं प्राविण्य मिळविलें.स्वत: ब्रम्हज्ञचूडामणि झाले. उत्सवमूर्तीची शेजारती गुरूपदेशाप्रमाणें त्यांनीं चालविली. आश्रम-धर्मानुष्ठान ते यथायोग्य करीत. कर्म, भक्ति व ज्ञान त्यांचे आचरणांत तुल्य प्रमाणानेंच असत. लोकसंग्रहार्थ ज्ञान्यानें अज्ञान्याप्रमाणेंच आसक्त झाल्या-सारखें दाखवून साधनाचरण करावें अशा भगवंतांचा ज्ञानी पुरुषांना उपदेश आहे. तदनुसार नृसिंहमुनींनीं आपलें वर्तन ठेवलें. शास्त्राज्ञेनुसार आपण वागत राहून ते ब्राह्मणांच्या तरुण मुलांना कर्मभक्तिज्ञानाचें शिक्षण देत असत. पादुकांची पूजा ते करीत. ती पाहून एका व्यक्तीनें त्यांना विचारलें कीं, संन्या-शाला हें पूजाकर्म कशाला पाहिजे ? त्यावर स्वामींनीं असें उत्तर दिलें कीं, "आम्ही अद्याप ज्ञानाधिकारी झालों नाहीं. तो अधिकार यावा म्हणून आम्हीं ही उपासना करतों. तुमच्या दृष्टीनें अयोग्य असेल पण आम्ही ही करणारच. नरकांत पडावें लागलें तरी चालेल. उपासना करीत करीतच त्यांत पडूं." या उत्तरानें कुटिल मनुष्य निरुत्तर झाला. तो समजला कीं गुरुभक्ति कर-णारे स्वामी कांहीं नरकांत जाणार नाहींत; पण मी अभक्त कुटिल मात्र नरकवारी होईन. असो.

नृसिंहसरस्वती पुजाऱ्यांच्या मुलांना कर्म, भक्ति व ज्ञान शिकवूं लागले. पंचमहायज्ञ, स्नान, संध्या वगैरे ब्रह्मकर्म ते त्यांचेकडून करवून घेत. थोरल्या महाराजांनीं केलेली दत्त पंचपदी म्हणजे 'चिंतूं दत्तात्रेया' इत्यादि अभंग, बाराचीं पदें, आरत्या व स्तोत्रें इत्यादि भजन ते मुलांकडून रात्रौ पादुकां-पुढें करवून घेत, ज्या पादुका वासुदेवमहाराजांनीं भजनाकरितां दिल्या होत्या त्यांची पूजा करवीत व नंतर रात्रौ हें भजन करवीत. त्यांना वेदा-न्ताचा ग्रंथ ते अद्याप सांगूं लागले नव्हते. पण थोरले महाराज पुन्हां एकदां येऊन गेल्यावर ते तो सांगूं लागले. सूत्रवृत्ती, जीवन्मुक्ती, काठकोपनिषद्भाष्य ते पुढें विद्यार्थ्यांना पढवूं लागले. तो इतिहास पुढें सांगूं. सध्यां आचार-विचार व भावभक्ती ते त्यांना शिकवीत असत त्याचें वर्णन येथें केलें. तसेंच आपणांबरोबर गुरुवर्याचे उत्सव करायला त्यांना ते घेऊं लागले. आगमनो-त्सव व जन्मोत्सव असे दोन उत्सव त्यांनीं मुलांना हाताखालीं घेऊन सुरू केले. उत्सवांत दररोज जें प्रयोजन केलें जात असे तें तीं पुजाऱ्यांचीं मुलें

एकेक दिवस एकेक, याप्रमाणें करीत. तींसुद्धां हें आपलें कर्तव्यच आहे असें समजत. याप्रमाणें नृसिंहसरस्वती व पुजाऱ्यांचीं प्रौढ मुलें मिळून वासुदेवानंदांचे उत्सव करूं लागले. हें एकंदर वर्णन म्हणजे वर्णन केलेला नृसिंहसरस्वतींचा इतिहास एका यात्रेकरूनें उत्तर खंडांत जाऊन श्रीवासुदेवानंदांना सांगितला. नृसिंहसरस्वती व पुजारी मिळून तुमचे उत्सव वाडींत करीत आहेत असें यात्रेकरू त्यांना म्हणाला. त्यावेळीं त्यांचे चित्ताला काय वाटलें असेल तें असो. पण त्यांनीं उद्‌गार असे काढले कीं, "स्वामींना वेड लागलें आहे व पुजारीदेखील त्यांच्या नादीं लागून तसेच झाले आहेत. आमचे उत्सव कशाला करतात, देवाचे करावेत." इत्यादि.

स्वामी वेडे झाले आहेत. या उत्तरांत गुरूंची प्रीतीच मला दिसून येते. कित्येक गुरुभक्तांनीं आपणांला आपणच "सद्‌गुरु घरचे पिसे व वेडे" म्हणून घेतलें. पण नृसिंहसरस्वतींनीं मात्र तें वेडा म्हणून घेण्याचें भूषण आपणच आपले अंगावर चढवून घेतलें नाहीं, तर तें गुरूकडून चढवून घेतलें. गुरूंनीं त्यांना आपला वेडा म्हटलें, यांतच त्यांना खरें भूषण मिळालें, असें आम्हीं म्हणतों. स्वतः म्हणून घेण्यांत तें तसें नाहीं. अस्तु.

नृसिंहसरस्वतींची गुरुनिष्ठा व गुरुमर्यादा मनांत आली म्हणजे वासुदेवानंद स्वतः डोळ्यांतून प्रेमबिंदू गाळीत असत. त्यांच्या गुरुभक्तीचें त्यांना फार कौतुक वाटे. "सर्व हिंदुस्थान देश आपण फिरलों. पण ज्ञानाला अधिकारी नृसिंहसरस्वतीवांचून आम्हांला मिळाला नाहीं. काय त्यांचें गुरुप्रेम ! केवढी मर्यादा ! ! सासूजवळ जशी सून, तसे ते आपणांशीं अतिशय मर्यादेनें वागतात." असे उद्‌गार त्यांनीं कित्येकांपुढें पुष्कळ वेळां काढले. जशी गुरुभक्ति त्यांची पराकाष्ठेची होती तसेंच वैराग्यदेखील त्यांचें पराकाष्ठेचेंच होतें. त्यांच्यापुढें दिवसेंदिवस द्रव्य येऊन आपोआप न मागतांच पडूं लागलें होतें. पण त्याला त्यांनीं आपला हात कधीं चुकूनसुद्धां लावला नाहीं. आमरणान्त त्यांनीं हा नियम कडक रीतीनें पाळला. कनक व कान्ता त्यांना वमनप्राय वाटत असत. निंदास्तुति ते कधीं कोणाची करीत नसत. कोणाजवळ कांहीं मागत नसत, कोणावर कोप करीत नसत. कोणाला त्यांच्यापासून

उद्वेग होत नसे, व त्यांना कोणीदेखील त्रास देत नसे. सर्वांबरोबर प्रेम, मैत्री, कृपा व उपेक्षा या वृत्ती धारण करून ते वागत. गुरुदेवावर प्रेम, गुरुभक्तांबरोबर मैत्री, दीनांवर दया व बालिश लोकांची उपेक्षा ते करीत. गुरुभक्तीला प्राधान्य देऊन ते वागत. त्यामुळें त्यांचें ज्ञान प्रेमरसानें युक्त म्हणजे सरस होतें; नीरस नव्हतें. ज्ञानोत्तर भक्ति-प्रेम असणें हें ज्ञानी लोकांनीं मोठें भूषण मानलेलें आहे. त्या भूषणानें मंडित असे जीवन्मुक्त, गुरुभक्तचूडामणि श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज धन्य होत !!

प्रकरण ७ वें

वाडींतील दत्तप्रभूचे पुजारी नृसिंहसरस्वतींना फार मान देत असत. वासुदेवानंदांनीं सांगितल्याप्रमाणें ते स्वामींच्या आज्ञा पाळूं लागले. उदाहरणार्थ दोनच गोष्टी सांगतों, त्या अशा:–पूर्वी यात्रेकरूची दत्ताला महापूजा नसली तर पादुका संध्याकाळपर्यन्त पूजेशिवाय तशाच राखीत. संध्याकाळीं धुपाचे वेळीं पूजा करीत. 'ही रीत बरी नाहीं. तुम्हीं स्वतः माध्यान्हपूजा दत्तपादुकांची करीत जा; यात्रेकरू येवो अगर न येवो.' अशी आज्ञा नृसिंहसरस्वतींनीं थोरले महाराजांचे इच्छेवरून पुजाऱ्यांना केली. ती शिरसा मान्य करून पुजारी तेव्हांपासून यात्रेकरूची महापूजा नसेल त्या दिवशीं आपण आपल्या खर्चानें दत्ताची माध्यान्हपूजा करूं लागले.

त्याचप्रमाणें "रामचंद्रयोगी, काशीकर स्वामी, गोपाळ स्वामी, इत्यादि देव मानलेल्या नित्य पूजेंतील स्वामींच्या पुण्यतिथ्या करून एक एक दिवस त्यांचा देखील उत्सवसमारंभ करीत जा." अशी दुसरी आज्ञा पुजाऱ्यांना नृसिंहसरस्वतींनीं केली. तीदेखील समस्त पुजाऱ्यांनीं मान्य केली. त्या देवांचे उत्सवसुद्धां ते करूं लागले. तद्वत् नृसिंहसरस्वतीजयंती पौष शुद्ध द्वितीयेला व श्रीपाद जयंति भाद्रपद शुद्ध चतुर्थीला साजरी करावी असें थोरले महाराजांचें वचन त्यांनीं पुजाऱ्यांना सांगितलें व आपण त्या दोन उत्सवांना प्रारंभच केला. महापूजा, पालखी, पुराण, कीर्तन, ब्राम्हणभोजन, भजन, मंत्रजागर वगैरे ते त्या त्या जयंतीचे दिवशीं करवूं लागले. तपःप्रभावबळानें त्यांच्या खर्चाची व्यवस्था स्वामी स्वतःच करीत. दत्तजयंतीसुद्धां स्वामीमहाराज थाटानें करवीत. दर उत्सवाला आपल्या गुरुमहाराजांच्या पादुकांचें पूजन

जास्त थाटानें करीत व सर्व देवांचे उत्सव ते पुजाऱ्यांकडून व आपण त्यांना साह्य देऊन करवीत. नेहमीं उत्सव, नेहमीं कीर्तनें, नेहमीं पुराणें, नेहमीं नामसप्ते, नेहमीं ब्राम्हणभोजन, वाडीमध्यें चालू झालें. आनंदीआनंद होऊन राहिला. भक्तिप्रेमाची सुधा आपण पिऊन सर्व जनतेला धाकटे महाराज पाजवूं लागले. जग आनंदानें भरून गेलें.

अशा तऱ्हेनें उत्सव चालू झाल्यावर थोरले महाराज आणखी एकदां तिसऱ्यानें वाडीला आले. संन्यासाश्रम घेऊन ते प्रथम नृसिंहसरस्वतींना दंड देण्यासाठीं शके अठराशें सव्विसांत आले. सत्ताविसांत दंड देऊन गेले ते पुन्हां अठ्ठाविसांत दुसऱ्यांदां आले. त्यानंतर तिसऱ्यांदां आले ते अठराशें एकतिसांत कन्यागतीं आले. यावेळीं जे ते आले तेसुद्धां नृसिंहसरस्वतींच्या इच्छेस्तव त्यांना भेट देण्यासाठींच आले. ती हकीगत अशी आहे कीं, पुष्कळ दिवस झाले तरी गुरुमहाराजांची भेट होईना. म्हणून नृसिंहमुनी तळमळूं लागले. गुरुमहाराज कोठें आहेत ? असा तपास करितां, पवनीक्षेत्रीं भंडारा जिल्ह्यांत ते असल्याची बातमी लागली. तेव्हां स्वामीजींच्या इच्छेवरून कांहीं पुजारी तिकडे जाण्यास तयार झाले. त्यांना स्वामीजींनीं असें सांगितलें कीं," वाटेल तो प्रयत्न करा. पण महाराजांना वाडीला आणा " असा आपला मनोदय त्यांना सांगून महाराजांना वाडीला आणविण्यासाठीं त्यांनीं पुजाऱ्यांना पवनीला पाठवून दिलें. पुजारी पवनीला गेले. महाराजांना भेटले व एके दिवशीं सकाळीं भाष्य सांगायला महाराज बसले असतां त्यांच्यापुढें त्यांनीं आपली इच्छा मांडली. वाडीला आपण यावें असें ते त्यांना म्हणाले. त्याबरोबर वासुदेवानंदमहाराजांची समाधि लागली. ते देहभान विसरले. पण तशाच अवस्थेंत असतां त्यांचे मुखानें क्रोधयुक्त भाषा निघाली. ते म्हणाले, " दोन वेळां आल्याचा फायदा काय करून घेतलात ? पुन्हां कशाला बोलावतां ? पूर्वीप्रमाणें बाजारच भरणार कीं नाहीं ? " ही क्रोधभाषा व क्रोधमुद्रा पाहून पुजारी घाबरले. भाष्यपाठ त्या दिवशीं बंद पडला.

सकाळीं वर सांगितलेला प्रकार झाला. पुन्हां दुपारीं पुजाऱ्यांनीं भोजनाला बसावयाचे वेळीं महाराजांना विनंती केली कीं, 'वाडीला येतों म्हणून आश्वा-

सत मिळावें.' महाराज पुन्हांसुद्धां 'नाहींच' म्हणाले. तेव्हां नृसिंहसरस्वतींचा मंत्र पुजाऱ्यांना आठवला. वाटेल तो प्रयत्न करायला त्यांनीं आरंभ केला. ते महाराजांना म्हणाले कीं," नृसिंहसरस्वतींनीं आम्हांला सांगितलें आहे कीं, महाराजांना घेतल्याशिवाय येऊंच नका. करितां आपण 'येतों' म्हणून वचन द्याल तर हें आपोशन घेतों, नाहींतर उपाशीं उठतों." हें ऐकून महाराजांनीं डोळे मिटले. आपल्या आवडत्या शिष्याची इच्छा त्यांनीं मनांत आणली व पुजाऱ्यांना " बरें तर येऊं " असें म्हणाले. अभिवचन मिळतांच पुजारी आनंदानें जेवले. कांहीं दिवसांनीं परत वाडीला आले. त्यांनीं झालेला प्रकार नृसिंहमहाराजांना कळविला व तुमचें नांव सांगितलें तेव्हां महाराज येतों म्हणाले; नाहींतर सकाळीं आम्हांवर क्रुद्ध झाले होते. तुमच्यामुळें आम्हांला त्यांचा लाभ वाडींत आतां होणार असें म्हणून पायां पडले.

अभिवचन दिल्याप्रमाणें गुरुमहाराज चातुर्मास पुरा करून गुरुद्वादशीला वाडीला येतील असा तर्क सर्वांनीं केला. पण गुरुद्वादशी होऊन गेली. दत्तजयंतीदेखील झाली. कोणत्याच उत्सवाला महात्मे न आल्यामुळें नृसिंहसरस्वतींना चिंता लागली. त्यांनीं महाराज भजनप्रिय आहेत असें जाणून ते लौकर यावेत म्हणून नामसप्ता सुरू केला. एक सप्ता होतांच मिरजेनजीक " अर्जुनवाड " नामक गांवीं महाराज येऊन उतरल्याची बातमी वाडींत आली. त्याबरोबर नृसिंहसरस्वती गुरुभेटीसाठीं अत्यंत उत्सुक झाले. स्वामीजी मोठे प्रयत्नवादी खरे ! मोठे एकनिष्ठ भक्त खरे ! दंडग्रहणाचे वेळीं त्यांनीं गुरुभगवंताला भक्तीनें वश केला. तसा यावेळींसुद्धां केला. नामभजन करून अर्जुनवाडापर्यंत वासुदेवगुरुनाथांना त्यांनीं आणलें.

महाराज वाडीजवळ सहा मैलांवर आले असें ऐकून वाडीकर सर्वच हर्षित झाले. वासुदेवानंदसरस्वती भक्तकामकल्पद्रुम आहेत. सकामनिष्काम दोघांही भक्तांवर त्यांची समान कृपादृष्टि असते. दीनांचे ते दयाळु आहेत. साक्षात् श्रीदत्त भगवंतच ते. असें ते लोक जाणत होते. नृसिंहसरस्वती हे त्यांचे निष्काम भक्त होत व पुजारी हे बहुतेक सकाम भक्तच म्हणायला हरकत नाहीं. पण महाराजांचें प्रेम दोघांवरही होतें. पवनींत ते जे रागें भरले,

त्याचा हेतु, 'पुजारी यजमानांचीं कार्यें करवून घेतात, केवळ प्रापंचिक सुखालाच भुलतात. आपल्यापासून स्वतःचें खरें कल्याण नृसिंहसरस्वतीं प्रमाणें करून घेत नाहींत. तें त्यांनीं करून घ्यावें. सत्य सोडून मिथ्या मागत बसूं नये' इतकाच होय. आतां अधिकारानुसार जे जे जी जी मागणी करतील ती ती भक्तवत्सलाला पुरविणें असल्यामुळें चतुर्विध भक्तांतलेच हे एक प्रकारचे आपले भक्त आहेत असें समजून सर्वांनाच उदार म्हणणारे व प्रिय मानणारे वासुदेवमहाराज सर्वांसाठींच अर्जुनवाडला येऊन उतरले म्हटलें तरी कांहीं वावगें होणार नाहीं. नरसिंहसरस्वती निष्काम भक्त म्हणून तर सर्वाधिक प्रेमानें त्यांच्यासाठीं ते आलेच आले ही गोष्ट सिद्धच आहे.

सद्गुरुनाथांना सामोरे जाण्यासाठीं दीक्षित महाराज तयार झाले. वल्लभ कुलकर्णी ऊर्फ बाबूराव शिरोळकर व पुजाऱ्यांचीं भक्त मुलें घेऊन टाळ मृदुंग विणा पताका त्यांच्या हातीं देऊन **"दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा"** हें भजन करीत स्वामी महाराज दिंडी घेऊन अर्जुनवाडला निघाले. सद्गुरूविषयक प्रेमाची केवळ मूर्तीच स्वामी होत. ते नाजूक शरिराचे होते. त्यांत आसनावर बसून त्यांच्या पायाच्या नाड्या निर्बळ झाल्या होत्या. तरीपण ते तसेच सहा मैल चालत निघाले. एक मैल गेले तों त्यांच्या गुडघ्यांत अशी कांहीं कळ सुरू झाली कीं ती पाय उचलूं देईना. तेव्हां सडकेच्या कडेला असणाऱ्या शेंडाचा म्हणजे हुऱ्याचा चीक त्यांनीं ढोपरावर पुष्कळसा थापला. तूप खाल्ल्याबरोबर रूप जसें येत नसतें, तशी चीक घातल्याबरोबर कळ कांहीं थांबत नाहीं. तरी पण मनाची समजूत करून ते उचलतां न येणाऱ्या पायानेंच सर्वांसह भराभर तसेच सहा मैल चालत गेले, परतले नाहींत. गुरुप्रेमाचें बळ त्यांचे अंगीं होतें. त्याच्या जोरावर ते तसे गेले. हीच गोष्ट खरी!! हे न जाते तरी महाराज येतेच पण उत्सुकता त्यांना कोठें बसूं देत होती?

भक्तिप्रेमानें जाऊन त्यांनीं गुरुमहाराजांना विधिवत् दंडवंदन केलें सद्गुरुनाथांचीं चरणकमळें त्यांनीं आपल्या प्रेमाश्रूंनीं भिजविलीं. निज शिष्याला आल्हाद देत वासुदेव भगवंत त्यांचेकडे पाहून हंसले व अंत

ज्ञानानें त्यांचे शरीरकष्ट ओळखून "इतके दूर चालत कशाला आलांत" असें म्हणाले. आपले सन्निध बसायला त्यांनीं त्यांना आज्ञा दिली. भक्तवर्य बाजूला बसले. इतक्यांत वाडीकर सर्व भक्तांनीं महाराजांना नमस्कार घातले. बाबूरावांनीं "पूर्णानंदकंद विबुधवंद्य देखियला हो" हें पद पुढें उभे राहून म्हटलें. त्यावेळीं अखिलांचे हृदयांत प्रेमाचा उमाळा उठला. डोळ्यांतून धारा निघाल्या. महाराजांनीं सर्वांना 'नारायण' म्हणून अमृत पाजलें. दर्शनानंदानें सर्वांना तृप्त केलें. नंतर सर्व भक्तांसह महाराज कृष्णास्नानाला गेले. सर्वांचे मस्तकावर त्यांनीं स्वहस्तें पाणी घातले. तो सोहळा अपूर्व होता. नंतर स्वयंपाक झाले. दोन्ही–थोरले व धाकटे महाराज भिक्षा घेते झाले. मग भक्तगणांसह भोजन करून महाराजांची स्वारी चौथ्या प्रहरीं वाडीला येण्यास निघाली. पुढें वासुदेवमूर्ती व मागें नृसिंहसरस्वतींसहित भक्त भजन करीत निघाले. प्रेमानंदानें नामघोष करीत शिरोळांत भोजनपात्राचें दर्शन करून विश्रांती घेऊन महाराज दिवेलागणीचे वेळीं वाडींत येऊन पोहोंचले.

वासुदेवानंद सरस्वती हे साक्षात् श्रीदत्ताचे अवतार वाडींत आल्याबरोबर वाडींतील आबालवृद्ध नरनारींना मोठा आनंद झाला. त्यांतले त्यांत नरसिंहसरस्वतींच्या आनंदाला तर पारावारच उरला नाहीं. गुरुप्रेमानें भरलेला सागरच ते झाले. ज्यांच्या कृपेनें जीवन्मुक्तिपदाचा अद्भुत लाभ आपणाला झाला, त्यांचा मी कसा उतराई होऊं ? असें त्यांना वाटे. ज्ञानाच्या सप्त भूमिका ज्यांनीं गुरुभक्तीच्या बळावर आक्रमिल्या ते गुरुभक्ताग्रणी दीक्षितस्वामी मारुतिरायाप्रमाणें आपणाला मानीत. म्हणजे 'देहबुद्धीनें मी गुरुरायाचा दास आहें; जीवबुद्धीनें मी गुरुरायाचा अंश आहें व आत्मबुद्धीनें मी सद्गुरुवासुदेवच आहें.' अशी त्यांची महाराजांविषयीं सेव्यसेवकबुद्धि होती. ज्ञानाचा गर्व त्यांना नव्हता. व्यवहारानें ते आपणाला गुरुवर्यांचा दास समजत असत. त्यांच्या बरोबरीचा मी आहें असें मानीत नसत. महाराजांचे आणखी कांहीं शिष्य, गांडाबुवा, गोविंदराव वगैरे यावेळीं वाडींत जमले होते. त्या सर्वांमध्यें नृसिंहसरस्वती हेच आश्रमानें, भक्तीनें व ज्ञानानें सर्वांत श्रेष्ठ होते. सद्गुरूंनीं त्यांना स्वीयसाम्यच दिलें होतें. कागलकरांनी वासुदेवानंद चरित्र लिहिलें. त्यांत त्यांनीं नृसिंहसरस्वतींना गुरुनिष्ठा, गुरु

प्रेम व गुरुबोध या बाबतींत वासुदेवानंदांचे हे कल्याणच होत, असें म्हटलें आहे. महाराजांप्रमाणें देहीं वसून देहधर्माला न शिवणें, कर्मीं प्रवृत्त असून असंग असणें व कोणत्याहि परिस्थितींत आपण निर्विकार आनंदमय राहाणें या गोष्टी त्यांना साध्य झाल्या होत्या. त्यांच्या योग्यतेला जाणणारा मनुष्य विरळा; नाहीं म्हटलें तरी चालेल. एक त्यांचे गुरु श्रीवासुदेवानंदसरस्वतीच त्यांना ओळखीत होते.

नृसिंहसरस्वतींचें महत्त्व किती होतें हें वासुदेवानंदांच्या उद्‌गारांवरून समजून येईल. त्यांचे एके वेळचे उद्‌गार मी येथें सांगत आहें. आप्पासाहेब भिडीकर गुरुमहाराजांचे दर्शनाला चातुर्मासीं एके ठिकाणीं गेले होते. ते वाडीचे वारकरी होते. त्यांना महाराजांनीं विचारलें कीं, 'काय हो आप्पा! वाडीहून दत्तदर्शन घेऊन तुम्हीं आलां काय?' आप्पा म्हणाले, 'होय.' महाराजांनीं विचारलें, 'दत्तदर्शन कोठें घेतलेंत?' आप्पा म्हणाले, 'औदुंबराखालीं मंदिरांत.' महाराज म्हणाले, 'ब्रम्हानंदाच्या माडीवर खोलींत यापुढें दत्तदर्शन घेत जा; दत्त तेथें रहातात.' आप्पासाहेब मनांत समजले कीं नरसिंहसरस्वती स्वामी हेच दत्त होत, असा महाराजांनीं आपणांला बोध केला. महाराजांना ते होय म्हणाले व पुढें केव्हां वाडीला आले म्हणजे गुरुवाक्यानुसार ब्रम्हानंदमठांत माडीवर जाऊन नरसिंहसरस्वतीस्वामी महाराजांचें दर्शन प्रेमपुरःसर ते घेऊं लागले, त्यांच्यावर मग त्यांचें इतकें प्रेम वसलें कीं तेच गुरुमहाराज होत अशी त्यांची भावना झाली. गुरुपुण्यतिथीला आप्पा भिडीकर शंभर रुपये दरसाल पुढें जे खर्चूं लागले ते नृसिंहसरस्वतींच्याच ते हवालीं करूं लागले व स्वामी जेव्हां अमरापुरांत राहण्याला गेले, तेव्हां ती रक्कम वाडींत न देतां तिकडे त्यांच्यापाशींच देऊं लागले. गुरुमहाराजांच्या वचनावर अशी त्यांनीं निष्ठा ठेविली. असो.

नरसिंहसरस्वतींचा अधिकार यापेक्षां वर्णन करण्याला कोण समर्थ आहे? वासुदेवानंदांनीं ज्यांना दत्त मानलें, त्यांच्या ज्ञानभूमिकेची चर्चा करीत बसणें, ती सहावी कीं सातवी तें ठरविणें हा केवळ मूर्खपणा होय. ज्ञानाची परमावधीच त्यांनीं गांठली होती. ही गोष्ट पुढें वासुदेवांच्या वचनांनीं

आम्ही आणली सांगणारच आहों. त्या वचनांत तर त्यांनीं आपणांपेक्षां देखील नृसिंहसरस्वती अधिक आहेत असें स्पष्ट म्हणून सोडलें आहे. तें वचन त्या प्रसंगींच सांगूं. सिताराम महाराज हे वासुदेवानंदांचे बंधू होत. ते महाज्ञानीच होते. त्यांनींसुद्धां महाराजांप्रमाणेंच नृसिंहसरस्वतींचें महत्त्व मानलें. असे जे पूर्णब्रह्मनिष्ठ विद्वच्छिरोमणि श्रीनृसिंहसरस्वती दीक्षित मुनी ते गुरुभगवंतांचे आपण केवळ चरणरज आहों असा अतिलीनपणा धरीत असत. दासभावानें त्यांची ते सेवा करीत असत.

वासुदेवानंद वाडींत आल्याचें वर्णन मागें केलेंच.ते ब्रह्मानंदाचे मठांत राहिले. त्यांची सेवा नृसिंहसरस्वतींनीं प्रारंभिली. प्रातः स्नानाचे वेळीं गंगेवर सोवळचानें गुरुनाथांना दंड, छाटी, कौपीन, भस्म, कटिसूत्र वगैरे ते स्वतः नेऊन देत. मठांत आल्यावर त्यांना आसन मांडीत, त्यांच्यापुढें संध्येचीं काष्ठपात्रें ठेवीत. त्यांच्या दंडाला मुद्रा बांधीत व त्यांचेपुढें श्री दत्ताचे अंगाऱ्याचा डबा ठेवीत. त्यांतला अंगारा महाराज भक्तलोकांना देत असत. भाष्याचे वेळीं उपनिषद्-ग्रंथ नेऊन त्यांना देत. तो घेऊन महाराज भाष्य सांगत. सायंकाळीं संगमावर जेव्हां महाराज संध्येला निघत, तेव्हां त्यांचा दंड आपण घेऊन त्यांच्याबरोबर जात,इत्यादि समयोचित गुरुसेवा ते भक्तिभावानें आचरूं लागले. कांहीं दिवस वासुदेवमहाराजांनीं ती घेतली. पण पुढें ते नको म्हणाले.' तुम्ही जी स्वारीची पूजा, शेजारती, व आपलें स्वधर्मानुष्ठान करतां तीच आमची सेवा होय. तिनें आमचा संतोष होतो.' असें ते त्यांनीं म्हणाले. शिष्य-संतोषार्थ चार दिवस त्यांनीं सेवा करून घेतली. पण मग त्यांनीं असें सांगितलें. संगमावर संध्येला जातांना दंड तेवढा ते त्यांना घेऊं देत असत. त्याचें कारण गुरुभक्ति कृतीनें थोडीतरी केल्याशिवाय आपलें जसें समाधान होत नाहीं, तसेंच आपल्या शिष्याचें तरी कसें व्हावें ? असा विचार त्यांनीं केला. दंड नेण्याची मात्र मोकळीक त्यांना ठेविली. घरकड परिचर्या मात्र बंद केली. दोघांचें परस्परांवरील प्रेम या गोष्टींत दिसून आलें.

वासुदेवानंद सरस्वतीमहाराज नृसिंहसरस्वतींवर अतिशय प्रेम करीत. दुपारीं ग्रामांत भिक्षेला जातांना त्यांना ते आपल्याबरोबर नेत. भिक्षान्न सेवन

करतांना ते आल्याशिवाय भिक्षा ग्रहण करीत नसत. त्यांना घेतल्याशिवाय संगमावर संध्येला जात नसत. त्यांची संध्या पुरी झाल्याशिवाय तेथें ग्रंथ-निरूपण करीत नसत; ते आल्यावर सुरू करीत. सकाळीं भाष्यार्थ-कथन तर केवळ त्यांच्यासाठींच महाराजांनीं सुरू केलें होतें. गुरुमुखानें श्रवण कर-ण्याची आवड त्यांची ते पुरवीत असत. नृसिंहसरस्वती म्हणजे वासुदेवा-नंदांच्या गळचांतले प्रेममणीच शोभत होते. त्यांना ते आपल्या सन्निध बसवून घेत असत. त्यांचे हातीं एक भाष्याचें पुस्तक देत व नंतर शांति म्हणून भाष्य सांगत. या खेपेला "काठकोपनिषदाचें भाष्य" व "सूत्रवृत्ती" महाराजांनीं सांगितली.

नरसिंहसरस्वतीचें वासुदेवानंदांवर अतिशय प्रेम होतें. पुराण, कीर्तन, प्रवचन इ. प्रसंगीं महाराजांच्या आज्ञेनें ते जेव्हां त्यांच्या जवळ जाऊन लोकांचीं प्रवचनें वगैरे ऐकत, तेव्हां मधून मधून आपल्याला सद्गुरुनाथांची नयनमनो-हर मूर्ति अवलोकनाला मिळावी या हेतूनेंच ते तेथें बसत.संगमावर जातांना-सुद्धां त्यांचा हेतु तोच असे. गुरुमाउली सतत आपल्याजवळ असावी; सतत आपणांला दिसावी. तिची प्रेमवाणी सतत आपण ऐकावी. या हेतूनें नृसिंह-सरस्वती वत्स होऊन गुरुमाउलीच्या कांसेखालीं सतत राहूं लागले. गुरु-मातेच्या अंगाभोंवतीं ते बाळ होऊन वसूं लागले. त्यांची पूजा, जप, तप, ध्यान,धारणा, समाधि गुरुमूर्तीला पाहणें हीच होऊन राहिली. कशीतरी ते नेहमींची आपली खडावपूजा व संध्या, जप इत्यादि तपश्चर्या करीत. सारें लक्ष त्यांचें महाराजांकडेच लागलेलें असे. त्यामुळें कशाचीच त्यांना खबर नसे.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ॥ गुरुः साक्षात्परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥१॥

"नास्तितत्त्वं गुरोःपरं" अशी त्यांची गुरूविषयीं अनुभवपूर्वक भावना असे. श्रीगुरूचा व गुरुभक्तीचा महिमा प्रगट करणारे चिद्रूपी सूर्यनारायण, असे श्रीनृसिंह सरस्वती, संदीपकाप्रमाणें गुरुभक्तचूडामणी धन्य होत !!

गुहामर्यादा राखून गुरुगृहवास त्यांनीं केला. मर्यादा सोडून त्यांनीं त्यांचेकडे पाहिलेंसुद्धां नाहीं. मग इतर तें काय ? सद्गुरुमूर्ती पाहण्याची तर आवड. पण त्यांच्यासमोर बसणेची मात्र लज्जा किंवा भीड फार. मग त्यांनीं आपल्या खोलीच्या भितीला एक लहानसा झरोका तयार केला व त्या झरोक्यांतून ते बाहेरच्या बाजूला लोकोपकार करीत बसलेल्या आपल्या ध्येयमूर्तीला पहात राहूं लागले. कारणपरत्वें तेवढे साक्षात् पुढें जात, तेव्हांसुद्धां पूर्ण आसन मांडी घालून ते गुरूपुढें बसत नसत. एका पायाची मांडी व एक पाय पोटाशीं धरून अगदीं अदबीनें सर्वावयव सांवरून ते बसत. दोन दोन तास असेच बसत. मग एखादे वेळीं महाराजच त्यांना नीट बसा असें म्हणत. तरी कांहीं वेळ तसें वागून पुन्हां अर्धीच मांडी ते ठेवीत. संकोच सोडून बसणें त्यांच्यानें होत नसे.

भाष्य पाठाचे वेळीं इतर शास्त्री शंका उत्तरें करीत पण नृसिंहमुनीश्वर तुसते गुरुमुखांतून निघणारें बोधामृत पीतच रहात. त्यांची समाधि श्रवणकालीं लागूं लागे. पण ती ते दूर सारण्याचाच प्रयत्न करीत. गुरुवचनलाभापुढें ती त्यांना तुच्छ वाटे. गुरु व शिष्य दोघेही एकमेकांकडे कधीं टक लावीत नसत व एकमेकांबरोबर फारसें बोलत नसत. ओझरती भाषासुद्धां गुरूबरोबर शिष्य करीत नसत. दृष्टी मात्र एखादे वेळीं दोघेहि एकमेकांवर ओझरती पोंचवीत. तीसुद्धां गुरूंची दृष्टि चुकवून आपली दृष्टि शिष्य गुरूकडे नेत; दृष्टीला दृष्टि भिडवीत नसत. गुरुमर्यादेची केवळ मूर्तीच नृसिंहमुनी होत. दोघे गुरुशिष्य जनाला सतेज सुंदर दिसत. भाषणानें, दर्शनानें वगैरे मनाला आल्हाद देणारे ते दोघे गुरुशिष्य, वासुदेवानंद सरस्वती व नरसिंहसरस्वती लोकांना दत्तमूर्तीच भासत. परस्परांवर प्रेम करणारे, ब्रह्मानंदाचे पूर्ण सागर, समाधिसुखाचे डोल देणारे, शांत, दान्त, परमहंसवर्य गुरु व शिष्य सर्वांना वंदनीय व सेवनीय झाले होते.

वासुदेवानंदसरस्वतींनीं वृद्धशिक्षानामक वेदान्त ग्रंथ स्वतः रचून नृसिंहसरस्वतींना दिला. तुमच्यासाठींच आम्ही हा ग्रंथ केला असें त्यांना म्हणाले. त्याचा पाठ नृसिंहसरस्वती करूं लागले. जितके ग्रंथ वासुदेवा-

नंदांनीं रचिले ते सर्वच त्यांनीं त्यांचेजवळ सुरक्षित रहावे म्हणून ठेवले. महाराजांचे समागमांत नृसिंहमुनी आनंद लुटूं लागले, असें या वेळेपर्यंत सांगून झालें. इतका आनंद होऊनसुद्धां स्वामीजींना एक तळमळ लागून राहिली. ते म्हणत, " महाराजांचे आवडते भक्त जे त्यांचे बंधू सिताराम-महाराज ते या प्रसंगीं असते तर दुधांत साखर पडती. ते आले पाहिजेत. " अशा संकल्पानें त्यांनीं त्यांना वरचेवर पत्रें पाठविलीं. तीं पाहून सिताराम महाराजदेखील वाडीला आले. नृसिंहस्वामींना ते म्हणाले कीं, " आम्ही विश्रान्ति घेत राहिलों होतों. पण तुमचीं प्रीतीचीं पत्रें येतांच तुमच्या आग्रहास्तव आलों." दोघे गुरुबंधू प्रेमानें भेटले. दोघांना भेटीचा मोठा आनंद झाला.

वासुदेवानंदांचे धाकटे सख्खे बंधू हे सिताराम गणेश टेंब्ये महाराज होत. यांची बंधूंचे ठिकाणीं गुरुबुद्धि होती. आपण वासुदेवानंदांचे शिष्य व भक्त आहों असें ते मानीत.महाराजांनीं त्यांना ब्रह्मबोध देऊन आपणांसारखेंच बनविलें होतें. महाराजांप्रमाणें तेदेखील लोकांना उपदेश देत असत. औषधें, मंत्र, यंत्रें देऊन लोकांचे रोग, पिशाच्चबाधा वगैरे तेदेखील घालवीत. नृसिंहसरस्वतींवर त्यांचें अतोनात प्रेम होतें. पूर्वी ते वाडींत आले होते; तेव्हां त्यांनीं कीर्तन केलें. नृसिंहसरस्वतींनी त्यावेळीं आपल्या अंगावरची छाटी त्यांना दिली. ती मस्तकीं बांधून त्यांनीं तें कीर्तन केलें. गुरुप्रेमाच्या गोष्टी बोलत ते दोघे बसत. एकमेकांना पूज्य समजत. एक नृसिंहवाडीतले तर दुसरे सावंतवाडीचे; पण दोघे अगदीं एकरूप झाले होते. वासुदेवानंद गुरुमहाराजांनीं परमार्थाचा उपदेश करून कर्म, भक्ति, ज्ञान देऊन जगांतील दूर दूर असलेल्या लोकांना निजशिष्य करून नातेवाईक बनवून सोडलें, म्हणजे सर्वांचे मनांत आपण गुरुबंधू आहों असा संघटित भाव उत्पन्न करून ठेवला. तसाच सिताराम व नरसिंह यांचे मनांतदेखील तो उत्पन्न केला. त्यामुळें यांचें मन अगदीं एक होऊन राहिलें. सिताराममहाराजांनीं पुढें जेव्हां सर्व उपाधी दूर केली व आपण जंगलांत जाऊन राहिले तेव्हां त्यांच्याजवळ असलेलें गुरुसेवेचें चांदीचें सामान म्हणजे ताटें, फुलपात्रें, तांब्या, पळ्या वगैरे त्यांनीं वाडींत नृसिंहसरस्वतींकडे पाठविलें; दुसऱ्याला दिलें नाहीं. नृसिंह-

सरस्वतींनीं पुढें सीतारामम्हाराज समाधिस्थ झाल्यावर तेंच चांदीचें सामान बढणेरीला मंदिरांत त्यांची स्थापना करून तेथें त्यांच्या सेवेलाच अर्पण केलें. या गोष्टीवरून त्या उभयतांचें एकमेकांवर असलेलें प्रेम दिसून आलें. असो.

श्रीवासुदेवानंदमहाराज या खेपेला चार महिने वाडींत राहिले. नृसिंहसरस्वतींच्या हाताखालीं जे संस्कृत विद्यार्थी बाळ होते, ते दत्तपंचपदी भजन रोज सायंकाळीं करीत असत. महाराज आल्यापासून ते त्यांचेपुढेंच तें भजन करूं लागले. भजनसमाप्तीला " जयजय श्रीमद्गुरुवर स्वामिन् परमात्मन् हंसा " ही आरती ते म्हणत. आणि " नमः श्रीगुरोमेशधीशे दयाब्ध भयार्तिघ्न ते स्वात्मदो वासुदेव ॥ यतीट्सेवितानंदपादाब्जयुग्मं सदा मे हृदि स्थास्नुतां यातु देव ॥१॥" इत्यादि सहा श्लोकांचें एक स्तोत्रही ते म्हणत. ती आरती व तें स्तोत्र दोन्ही नृसिंहसरस्वतींनींच करून त्यांना दिलीं होतीं. तें स्तोत्र ऐकत असतां महाराजांनीं पहिल्या श्लोकांतील एक शब्द कमी करून त्या जागीं आपण 'स्थास्नुतां' हा दुसरा शब्द घातला. तो पाहून नृसिंहसरस्वतींना फार आनंद झाला. आपण केलेलें स्तोत्र गुरुनाथांनीं निजशब्दानें अलंकृत केलें असें ते म्हणाले.

सीतारामम्हाराज आल्यानंतर नृसिंहसरस्वतींनीं त्या विद्यार्थ्यांकरवीं 'वेदान्तग्रंथ आम्हांला सांगा' अशी महाराजांना प्रार्थना करविली. महाराज म्हणाले, " पंचदशीच्या पोथ्या आणा म्हणजे तोच ग्रंथ सांगूं." लगेच मुलांकडून स्वामींनीं मुंबईहून पोथ्या आणविल्या. प्रत्येकाला एकेक पोथी दिली. नंतर वासुदेवमहाराज रोज पंचदशीचा पाठ सायंकाळीं पांच वाजतां देऊं लागले. त्यावेळीं महाराजांचे उजवे बाजूला नरसिंहसरस्वती एक पोथी घेऊन बसत. सीतारामम्हाराज समोर बसत व विद्यार्थी बाळ सभोंवतीं पोथ्या घेऊन बसत; महाराज पाठ देत. तोच एखादे वेळीं सीतारामम्हाराज समजावून सांगत. नृसिंहसरस्वती नुसतें श्रवणच करीत. सर्व विद्यार्थी गुरुमुखांतील ब्रह्मज्ञानामृत प्राशन करून कृतार्थ झाले. त्यावेळीं वासुदेवानंद सरस्वती, नरसिंहसरस्वती आणि सीतारामम्हाराज हे तिघे तेजःपुंज दिवाकर प्रत्यक्ष त्रैमूर्ति दत्तात्रेयच शोभत होते. ज्ञान, दया, शांति, दान्ति,

विरक्ति, औदार्य इत्यादि गुणांनीं ते तिघेहि मंडित होते. त्यांच्या दर्शनानें सर्व जग पुनीत झालें.

पंचदशीचीं पांच प्रकरणें वासुदेवानंदमहाराजांनीं स्वतः सांगितलीं. बाकी "नृसिंहसरस्वतींकडून तुम्हीं समजावून घ्या. नृसिंहसरस्वती व आम्हीं यांत मुळींच भेद नाहीं. इथून पुढें गुरु, देव यांनाच माना व यांची आज्ञापालनरूप सेवा करा. यांना (वाडींतून) सोडूं नका." याप्रमाणें त्या प्रौढ पूजकपुत्रांना गुरुमहाराजांनीं उपदेश केला. सर्वांना संध्या, ब्रह्मयज्ञ वगैरे शुद्ध कसें करावे तें सांगितलें. नृसिंहसरस्वतींना चार महिने सहवास दिला. एकान्तीं रहस्यज्ञानाच्या गोष्टी त्यांच्याशीं बोलले. त्यांचें पूर्ण समाधान केलें व पुजाऱ्यांचा संतोष करून सर्व भक्तांच्या कामना पुरवून वासुदेवानंदमहाराज १८३२ वैशाख वद्य पंचमीला वाडींतून रामेश्वराकडे गेले. त्यांना पोंचवीत नृसिंहसरस्वती चारपांच मैलपर्यंत गेले होते. तेथून गुर्वाज्ञेनें परत वाडीला आले. नंतर कांहीं दिवसांनीं सीतारामम्हाराजदेखील नृसिंहसरस्वतींची अनुमति घेऊन निघून गेले.

श्रीगुरुनाथांच्या सहवाससुखांत असतांना नृसिंहसरस्वतींना चार महिने एका पळासारखे भासले. ते निघून जातांक्षणीं त्यांचा वियोग त्यांना दुःसह झाला. उद्धव, अर्जुन इत्यादिक भक्तांनासुद्धां वासुदेववियोग दुःखद झाल्याच्या कथा प्रसिद्धच आहेत. आत्माराम म्हणजे ब्रह्मानंदानें तृप्त असे ज्ञानी लोकसुद्धां भगवंताची निर्हेतुक भक्ति करतात. त्यांना भगवद्वियोग दुःखद होतो. अशा अद्भुत गुणांचाच तो गुरुपरमात्मा आहे !! तो सदा सर्वकाळ आपल्या सन्निध असावा असें कोणाला वाटणार नाहीं? नरसिंहसरस्वतींना तर तसें वाटतच असे. ती त्यांची कामना भक्तकामधेनु वासुदेवमहाराजांनीं पुरविली-देखील. लोकदृष्ट्या ते जरी दूर गेल्यासारखे भासले; तरी आपल्या प्रिय भक्ताला म्हणजे नृसिंहसरस्वतींना ते त्यांच्या खोलींत सतत सान्निध्य देत राहिलेले दिसूं लागले. कशावरून म्हणून कोणी विचारील, तर गुरुमहाराजांच्या वचनावरून आम्ही तसें म्हणतों. वाडीची मंडळी कन्यागतानंतर 'गलगलीला' (हें एक क्षेत्र आहे) महाराजांना भेटायला एकदां गेली होती

दर्शन घेऊन परत येतांना ते वाडीकर भक्त महाराजांना म्हणाले कीं, 'महाराज, आम्हांला आपलें दर्शन झालें,पण नृसिंहसरस्वतींना तें देण्यासाठीं आपण वाडीला यावें.' त्यावर गुरुमहाराज म्हणाले, " नृसिंहसरस्वतींना आमचें दर्शन त्यांच्या खोलींत रोज होत असतें होतें कीं नाहीं तें त्यांना जाऊन पाहिजे तर विचारा.' वाडीकर भक्त परत वाडीला आले. त्यांनीं झालेला संवाद नृसिंहसरस्वतींना सांगितला 'व महाराज म्हणालेली गोष्ट खरी काय ?' म्हणून त्यांनीं त्यांना विचारलें. तेव्हां प्रेमाश्रुपूर्ण लोचन करून नृसिंहमुनिराज खदखदां हंसले. यांतच त्यांनीं प्रश्नाचें 'होय' असें उत्तर सुचविलें. ' नित्य देव भेटे म्हणुनि काय लोकांस सांगावा ' या कवीच्या उक्तीप्रमाणें त्यांनीं पर्यायानेंच 'होय' म्हटलें. नृसिंहसरस्वती हे समुद्रासारखे गंभीर गुरुभक्त होते; उथळ नव्हते. म्हणून ते स्वानुभवाच्या गोष्टी कोणापुढें बोलत नसत. खरा श्रीमंत आपली श्रीमंती झांकीत असतो. तद्वत् खरे ज्ञानी व भक्त आपलें ज्ञान किंवा भक्ती यांचें प्रदर्शन लोकांपुढें मांडीत नाहींत. अस्तु.

नृसिंहसरस्वतींच्या प्रेमाला लुब्ध झालेले श्रीवासुदेव भगवंत त्यांच्या हृदय-कमळांत भ्रमर होऊन राहिले होते. तसेच नृसिंहसरस्वती हे वासुदेवाच्या प्रेमाला लुब्ध होऊन त्यांच्या चरणकमळीं भ्रमर झाले. दोघे एकमेकांना प्रिय, व ध्येय होत्साते एकमेकांचे आत्मेच बनले. वासुदेव ' नरहरिवांचुनि कांहीं आतां मी नाहीं मी नाहीं ' असें म्हणत. व नरसिंहसरस्वती ' वासुदेव गुरुनाथावांचुनि वीळहि ठाव नाहिं रिता ' ' वासुदेवः सर्वम् ' असें म्हणत. ज्ञानशास्त्राच्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे असे हे दोघे गुरुशिष्य आत्मरूपानें एकच जर झाले होते तर त्यांचा वियोग कसा होणार ? व त्यांच्या अखंड दर्शनांत खंड तरी कसा पडणार ? म्हणून वासुदेवमहाराज जे गलगलींत म्हणाले कीं, " आमचें दर्शन नरसिंहसरस्वतींना त्यांच्या खोलींत नित्य होत असतें " तें किती अर्थपूर्ण होतें, याचा विचार तज्ज्ञ करतील.

भक्तिशास्त्राच्या दृष्टीनेंसुद्धां तें गुरुमहाराजांचें भाषण असेंच अर्थपूर्ण आहे. " जो मलाच सर्वत्र पहातो व सर्व माझेंच ठिकाणीं पाहतो त्याला मी कधीं अंतरत नाहीं व मला तो अंतरत नाहीं." असें भगवद्गीतेंत देवांनीं म्हटलें

आहे. तसेंच भागवतांतसुद्धां भागवतप्रधानाचें म्हणजे भक्तोत्तमाचें लक्षण सांगतांना "विसृजति हृदयं न यस्य साक्षाद्धरिः" म्हणजे भगवान आपण होऊन भक्तांचें हृदयमंदिर सोडून जातच नाहीं असें म्हटलें आहे.

भक्तानें ढकलून टाकण्याचा प्रयत्न केला तरीसुद्धां भगवान भक्तहृदय सोडूं इच्छित नाहीं. याचें कारण तेथेंच सांगितलें आहे कीं, "प्रणयरशनया-धृतांघ्रिपद्मः" म्हणजे प्रेमशृंखलेनें भक्तानें त्यांचीं चरणकमलें स्वहृदयांत बांधून ठेविलेलीं असतात. वासुदेवानंदांचे भक्त नरसिंहसरस्वती यांनींसुद्धां वासुदेव-चरणकमळें आपल्या हृदयमंदिरांत प्रेमपाशानेंच बांधून घातलीं होतीं. म्हणून भक्ताधीन झालेल्या महाराजांना, नृसिंहसरस्वतींना सतत दर्शन देतच त्यांचे-जवळ रहावें लागत होतें, ही गोष्ट सिद्ध झाली. म्हणून गलगलींतली त्यांची भाषा अर्थपूर्ण होती खास.

प्रकरण ८ वें

श्रीनृसिंहसरस्वतींना सीतारामम्हाराजांनीं राजूर मुक्कामीं स्वाहाकाराच्या समारंभकालीं मुद्दाम बोलवून नेलें होतें. आपल्या गुरुबंधूचें बोलावणें, तें-सुद्धां गुरुमहाराजांजवळ राहून; दुसरीकडून नव्हे. अर्थात् त्यांच्या संमतीनेंच तें केलेलें असणार असा विचार करून नृसिंहमुनी राजूरला गेले. तेथें त्यांना आपल्या प्रेमास्पदाचें दर्शन झालें. महाराज त्यांना भेटले. भेट होतांक्षणीं "हां !! तुम्हीसुद्धां आलां काय ?" असे उद्गार महाराजांनीं काढले. सीतारामम्हाराजांना स्वामी आले म्हणून आनंद झाला. यज्ञसमारंभ आठ दिवस झाला. वासुदेवानंदसरस्वती, नरसिंहसरस्वती व सीताराम असे तिघे महाराज एकत्र बसले म्हणजे साक्षात् त्रैमूर्ति दत्तभगवंतच ते सर्वांना दिसत. गुरुमहाराज संस्कृत भाषेंत एके दिवशीं रात्रीं नृसिंहस्वामींपाशीं पुष्कळ वेळ रहस्य बोलत बसले होते. यज्ञ झाल्यावर ते दुसरे दिवशींच निघून गेले. सीता-राममहाराजांनीं गुरुस्थानीं नृसिंहमहाराजांची स्थापना केली. त्यांचे हस्तें सर्व यात्रेकरूंना तीर्थ, अंगारा व प्रसाद देवविला व म्हणाले कीं,'तुम्ही आलांत म्हणून यज्ञाला मोठी शोभा आली. माझ्या वचनाला मान दिलात याबद्दल मी आपला आभारी आहें." असें म्हणून त्यांनीं त्यांना वंदन केलें.तेव्हां "तुमच्या कृपेनें सद्गुरुलाभ आम्हांला झाला म्हणून आम्हीदेखील आपले आभारी आहों." असें नृसिंह म्हणाले. दोघांनीं एकमेकांचा आदरसत्कार केला. नंतर नृसिंहसरस्वती वाडीला परत आले, राजूरची ही तिघांची भेट व्यवहारदृष्ट्या अखेरचीच होय. राजूरच्या यज्ञाचें वर्णन नृसिंहसरस्वतींनीं सीताराममहा-राजांचें स्तोत्र त्यांच्या स्थापनेच्या वेळीं केलें त्यांत सुंदर केलें आहे.

वाडींत आल्यावर नृसिंहसरस्वतींना 'आपण वाडी सोडून राजूरला गेलों' हीं गोष्ट सद्गुरूंना आवडली नसावी असें वाटलें. 'हां तुम्हीसुद्धां आलां काय' या गुरुवचनाचा अर्थ त्यांना तसा भासला. वास्तविक पाहिलें तर सीताराम-महाराजांनीं गुरूंना विचारूनच त्यांना बोलावलें. पण गुरुमहाराजांनीं नुसती मूक संमतीच दिली होती. स्पष्ट 'बोलवा' असें म्हणाले नव्हते. तेवढ्यावरून त्यांनीं गुरुसंमतीवांचून आपण गेलों, ही मोठी चूक केली असें मानलें व महाराजांना ते त्या वेळीं होते तेथें एक पत्र पाठवून अपराधाची क्षमा मागितली. महाराजांचें त्यांना त्यावेळीं असें उत्तर आलें कीं, "अपराध कांहीं घडला नसून उगीच मनीं धाक धरिला तो सोडावा." या उत्तरानें मग त्यांचें समाधान झालें. नाहीं तर एकदोन महिन्यांपूर्वी ते वेडयासारखे झाले होते. त्यांना संध्या, पूजा, जप, ध्यान वगैरे सुचेनासें झालें होतें, असें त्यांच्या उद्-गारांवरून जवळच्या प्रेमी लोकांना समजून आलें. "आम्हांला महिना दोन महिने पूजा वगैरे सुचेनाशी झाली होती" असें ते म्हणाले होते. सद्गुरुनाथांची आज्ञा वाडींत रहा अशी त्यांना होती. ती आपण मोडली असें त्यांना वाटलें. म्हणून इतका खेद त्यांना झाला. गुरुवचन पालन करण्याविषयींची त्यांची सप्रेम दृढनिश्चयाची बुद्धि केवढी असली पाहिजे, याचा तर्क विवेकी लोक या त्यांच्या चरित्रावरून करतील.

श्रीनृसिंहसरस्वतींची राहटी त्यांच्या सद्गुरूप्रमाणेंच होती. पुडीला ते कोणाचे घरीं जात नसत किंवा जागेवर कोणी वाढून आणलें तरी ती भिक्षा घेत नसत. फक्त दोनतीन घरची माधुकरीच ते आणीत. संन्यासी लोकांना ही मधुकरवृत्तीच शास्त्रानें उत्तम म्हणून सांगितली आहे. ती त्यांनीं धरिली होती. पुढें वाडी सोडून गुर्वाज्ञेनें ते जेव्हां बाहेर संचाराला गेले तेव्हां मात्र त्यांची ती वृत्ती सुटली. त्याचें कारण त्यांची स्वतोत्थान जिच्यांत असतें अशी पदार्थाभाविनी गोवाची षष्ठ भूमिका तिच्या पुढें गजल गेली होती. सप्तम भूमिकारूढ ते झाले होते. "देहंच नश्वरमवस्थितमुत्थितं वा, सिद्धो न पश्यति यतोध्यगमत्स्वरूपम्" या भागवत वचनाप्रमाणें त्यांची अवस्था पुढें पुढें झालेली दिसून येत होती. मस्तकामध्यें तुळीचें टोंक शिरून आंतल्या मेंदूपर्यंत बोट शिरेल एवढें मोठें छिद्र त्याला पडलें होतें. डॉक्ट-

रांना तें धुतांना भय वाटे. भूल देऊं काय म्हणून तें विचारीत. पण ती नको असें ज्यांनीं सांगितलें, जेव्हां तुळी मोडून डोक्यांत शिरली तेव्हां किंवा छिद्र धुतांना ज्यांना त्यांचें भानच होत नसे, वेदना ज्यांना कळत नसत त्यांची "ब्रह्मविद्वरिष्ठता" म्हणजे विदेह स्थिति किती शिखरावर गेली होती ती आम्हींच सांगितली पाहिजे असें नाहीं. डॉक्टर सोमणांनीं असे उद्गार काढले कीं, "माझ्या सगळ्या आयुष्यांत असे विदेह पुरुष पाहिले नाहींत. मला जखम धुतांना दुःख होई; पण हे स्वामीमहाराज स्वस्थ आनंदांतच बसून रहात." याला म्हणतात ज्ञानाची पराकाष्ठा !

वाडींतून स्वामींद्र बाहेर गेल्यानंतरची गोष्ट वर आम्ही सांगितली. वाडींत असतांनासुद्धां ते देहभानावर रहात नसत. दुसऱ्यानें हांक मारिली तर जागें झाल्याप्रमाणें दाखवीत. एरवीं स्वस्वरूपीं त्यांची सतत समाधीच लागलेली असे. अशा समाधि अवस्थेंतच त्यांचा व्यवहार चाले. याचें एक उदाहरण आपणांला सांगतों. लक्ष्मणराव फुलारी बोठे आडनांवाचे ब्राह्मण हे टेंबेमहाराजांचे आज्ञेनें नृसिंहसरस्वतींना रोज फुलें देत असत. स्वामींच्या पूजेचे वेळीं ताजीं फुलें आणून द्यावयाचा त्यांचा नेम होता. एके दिवशीं ते थोडे उशिरां फुलें घेऊन गेले. दीक्षितमहाराज रिकाम्या बुट्टींत हात घालीत; रिकामाच हात गुरुपादुकांवर नेत; पुन्हा बुट्टींत हात घालीत, तसा रिकामाच हात पुन्हां फुलें घालतात तसा पादुकांवर नेत; असा प्रकार करीत असलेले त्यांचे दृष्टीस पडले. लक्ष्मणरावांनीं शब्द उच्चारले कीं, 'महाराज ! या कालच्या रिकाम्या बुट्टींत फुलें नाहींत. हीं मी फुलें आणलीं आहेत. मला थोडा वेळ लागला त्याची माफी असावी.' असे लक्ष्मणाचे शब्द ऐकतांच नृसिंहयोगींद्र जणूं काय जागे झाले. त्यांनीं वरती पाहिलें व म्हणाले, "लक्ष्मणराव ! आम्हांला वाटलें कीं या बुट्टींत फुलें आहेतच म्हणून आम्ही तीं घालीत होतों."

या गोष्टीवरून श्रीनृसिंहमुनिराज पूजनादिक क्रिया अंतर्मुख वृत्तीनें कशा करीत असत त्यांची दिशा दिसून येते. गाडीवान निजला तरी बैल जसे गाडी ठराविक स्थळीं घेऊन जातात, तशीं नृसिंह योगीश्वरांचीं इंद्रियें बाह्य व्यवहार व्यवस्थितपणानें जेव्हांचा तेव्हां, जेथला तेथें व जशाचा तसा बिनचूक

करीत होतीं. त्यावेळीं स्वतः ते मात्र समाधिसुखांतच बुडालेले असत. दुसऱ्यानें हांक मारल्यावर उत्थान पावत. अशी त्यांची स्थिति लक्ष्मणरावांबरोबर आम्हां सर्वांनादेखील समजून आली. मनुष्य थकून झोंपी जात असावा व अंतर्मुख होऊनच कांहीं कोणाशीं बोलत असावा. त्या निद्राळू मनुष्याप्रमाणें नृसिंहमुनी केव्हां केव्हां बोलत वगैरे असलेलेसुद्धां दिसत. केव्हां केव्हां श्रवण करतां करतां ते गाढ झोंपी गेल्याप्रमाणें समाधिस्थ होऊन बसत. कालांतरानें जागे झाल्याप्रमाणें उत्थान पावत. ग्रंथ वाचतांना त्यांचा असाच क्रम चाले. गुरुचरित्र ते रोज नेमानें वाचीत. पण एक अध्याय पुरा करायला किती वेळ लागे त्याची मात्र परिमिति नव्हती. चार ओंव्या वाचायच्या व समाधींत जायचें. कांहीं वेळानें उत्थान पावून पुन्हां कांहीं ओंव्या वाचायच्या व पुन्हां समाधींत शांत असायचें, असें त्यांचें वाचन चालत असे. केव्हां अध्याय संपेल तेव्हां संपेल. स्वारीच्या पूजेला जातांना केव्हां केव्हां कांहींतरी विसरून जायचे; आम्हांला आतां सर्वांचा विसर फार पडूं लागला, असें म्हणायचे. एखादे वेळीं आम्हांला अलिकडे झोंप फार येऊं लागली, असेंही म्हणायचे. हीं सर्व ब्रह्मविद्वरिष्ठांचींच लक्षणें होत. मदिरा पिऊन मदांध झालेल्या पुरुषाप्रमाणें स्वानंदरसाची उन्मत्तता त्यांना प्राप्त झाली होती. ती पुढें वर्णिली जाईल. असो. ज्या भूमिकांवर आरूढ झालेल्या ज्ञान्याला ब्रह्मवित्, ब्रह्मविद्वर, ब्रह्मविद्वरीयान्, ब्रह्मविद्वरिष्ठ म्हणतात; चौथी, पांचवी, सहावी व सातवी, अशा त्या वसिष्ठोक्त ब्रह्मज्ञानाच्या सर्व भूमिका ज्यांनीं आक्रमिल्या; त्यांचीं नांवें इतर ग्रंथांतून समजून घ्यावीं. त्यांचीं लक्षणेंदेखील तेथेंच वाचावींत. ब्रह्मज्ञानी जीवन्मुक्त पुरुषाचें उत्थान किंवा समाधि इतरांना दुर्ज्ञेय असते. निश्चेष्ट राहणें म्हणजे समाधि. व्यवहार करणें म्हणजे उत्थान, असें कित्येक समजतात पण तें तसें नाहीं. समाहित असतांनासुद्धां योगी व्यवहार करतात ही गोष्ट फुलें वाहण्याचे गोष्टीवरून सिद्ध झाली आहे. जडभरतासारखे कांहीं योगी जनसंगाला भिऊन साधकवृत्तीनें प्रवृत्ति टाकून जरी राहिले, तरी जनकादिकांनीं ती कांहीं सोडली नव्हती. जनक राज्य करीत असून विदेह स्थितींत रहात असे. " जक्षन् क्रीडन् " ही श्रुतीसुद्धां हाच अर्थ सांगून राहिली आहे कीं, सर्व कर्मीं ज्ञान्याची समाधि राहूं शकते. तटस्थता म्हणजे समाधि

नव्हे. अंत:शीतलतेला वसिष्ठांनीं समाधि हें नांव दिलें आहे. ती अंत:शीतलता उत्तम ज्ञान्याची व्यवहारकालीं देखील असते. तशी नृसिंहसरस्वतींची ती होती. गुरुभक्तीच्या बळावर त्यांनीं ती संपादन केली होती. गुणातीत राहण्याचें साधन अव्यभिचारी गुरुभक्तीच आहे, असें कृष्णांनीं १४ व्या अध्यायांत गीतेंत सांगितलें आहे. गुरुभक्तशिखावतंस श्रीनृसिंह मुनीश्वरांच्या अंतरंगीं असलेली तृप्तीची शीतलता त्यांच्या सर्वांगावर दिसत होती. त्यांना पाहणारे लोक त्यांच्या दर्शनानेंच शीतल होऊन जात. ही आनंदमूर्ती आपल्या पोटांत भरून घ्यावी असें कित्येकांना वाटे. सर्वांना ते आपला आनंदरूप आत्माच भासत. सर्वात्मभाव प्राप्त झालेल्या ब्रह्मज्ञपुरुषांचें सर्वप्रिय व सर्वज्ञ होणें हें लक्षणच आहे.

नृसिंहसरस्वती आपली सर्वज्ञता जरी प्रकट करीत नव्हते, तरी एखादे प्रसंगीं, साधकवृत्तीच्या वाडी ग्रामस्थ परिचित भक्तांना ते विनोदानें असें म्हणत असत कीं, "तुम्ही आपल्या घरीं कोण काय करतां तें आम्हांला मठांत बसून सर्व समजतें." भक्तांना केवळ ही थट्टा वाटे व स्वामीसुद्धां थट्टेवरच भाषण घालवीत. पण एकदां मात्र त्यांची ती भाषा लक्ष्मणराव फुलाऱ्यांना पूर्ण पटली. तो प्रसंग असा—थोरले महाराज म्हणजे टेंब्येस्वामीमहाराज समाधिस्थ झाल्यावर त्यांचें मंदिर बांधावें असा नृसिंहयतींचा हेतु फार होता. त्याला अनुसरून ते एकादे वेळीं भक्तजनांपुढें आनंदानें देवळाची भाषा बोलत. एकदां शिरोळचे कांहीं भक्त त्यांच्याजवळ असतांना त्यांनीं ती आपली नेहमींची भाषा केली. भक्तांना वाटलें, आमच्याजवळ स्वामीजी देवळाची भाषा बोलूं लागले आहेत, तर त्यांच्या मनांत आम्ही त्यांना द्रव्य द्यावें असें असेल. अशी मनाची समजूत करून घेऊन ते शिरोळच्या रस्त्याला लागले. त्यांच्याबरोबर लक्ष्मणराव फुलारी होते. त्यांच्याजवळ भक्त म्हणाले कीं, "लक्ष्मणराव, महाराज आम्हांकडे रुपये मागतात. ते शिरोळांत देऊळ बांधणार असले तर आम्ही यथाशक्ति मदत करूं. पण त्यांचा हेतु अमरापुरांत मंदिर बांधण्याचा दिसतो. मग आम्ही कसें करावें!" हें शिरोळकर भक्तांचें भाषण शिरोळपाशीं म्हणजे वाडीहून दोन मैलांच्या अंतरावर झालें. दुसरे दिवशीं लक्ष्मणराव फुलें घेऊन परत वाडींत आले व नृसिंहसरस्वतीमहाराजांना फुलें

द्यायला गेले. तों जातांक्षणीं प्रथम महाराज त्यांना म्हणाले कीं, " लक्ष्मण-राव, आम्ही कांहीं त्या शिरोळकरांनीं द्रव्य द्यावें या हेतूनें देवळाची गोष्ट त्यांच्यापुढें बोललों नाहीं. तर आनंदानें सहज इतरांपुढें बोलतों ती तुम्हीं. नेहमीं पाहतांच, तशी ती बोललों." स्वामीमहाराजांचें हें भाषण ऐकून लक्ष्मण-राव चकित झाले व इतरांपुढें त्यांनीं महाराजांच्या सर्वज्ञतेची स्तुति केली.

नृसिंहमहाराजांना कोणीहि पुढें आला कीं त्याचें सर्व भवितव्य कळत असे नुसता शब्द ऐकूनसुद्धां तें त्यांना कळे. पाहण्याचीसुद्धां जरूर नसे. लक्ष्मण-रावांना तर शब्दांवांचूनसुद्धां त्यांना समजल्याचा अनुभवच आला. एकंदरींत काय कीं ज्ञानी पुरुष सर्वात्मा बनतो. म्हणून त्याला सर्व ठिकाणचें सर्व सम-जतें. तसे नृसिंहमुनींद्र सर्वात्मे बनले होते. मग त्यांना तें कां समजूं नये ? ही सर्वात्मता व सर्वज्ञता त्यांना श्रीवासुदेवानंदांच्या प्रसादानें मिळाली होती. नृसिंहसरस्वती हे आपले शिष्य पूर्ण स्थितीला जाऊन पोंचावेत म्हणून ते त्यांची माउलीप्रमाणें काळजी घेत. घारीचें लक्ष जसें पिलांवर असतें तसें त्यांचें निजशिष्यावर असे. कोठेंहि संचारांत ते असले तरी तेथून पत्रद्वारा ते ह्यांची बोधवृद्धि व्हावी म्हणून जपत. त्यांनीं वाडीला नृसिंहांकरितां पुष्कळ बोधपत्रें पाठविलीं. संन्यासापूर्वी व नंतर दंड देतांना महावाक्योपदेश करून ते जे देशां-तरीं गेले तेव्हांपासून ते वरचेवर बोधपत्रें पाठवीत असत. त्यांतलीं कांहीं पत्रें खालीं देतों.

श्रीवासुदेवानंदांचीं नृसिंहसरस्वतींना आलेलीं पत्रें.

पत्र १ लें

(हें पत्र संन्यासदंड देण्याचेदेखील पूर्वीचें आहे.)

वे. शा. सं. नारायण दीक्षित यांस--

पत्र पावलें.भजन म्हणजे कायावाचामनेंकरून ज्या ज्या समयीं जसजसें घडेल तसतसें अनुरागपूर्वक परमेश्वराचें सेवन करणें. मनानें स्मरण, वाचेनें गुण-नामोच्चारण, कायेनें वंदन इत्यादि लक्षणांची अनुवृत्ति भगवंतीं ठेवावी.

नारायण.

पत्र २ रें

श्री. प. नृसिंहसरस्वती यांस नारायण.

पाठविलेलें पुस्तक पावलें. निरंतर साक्षीभूत मी आहें, असें अनुसंधान ठेवणें हीच आमची सेवा होय. कळावें. तेथील सर्व स्वामींना व पुजारी व परस्थ सेवेकरी आदीकरून सर्वांस नारायण. येथें सर्व व्यवस्था बरी आहे.

पत्र ३ रें

श्री. प. नृसिंहसरस्वती यांस नारायण.

नित्य श्रीगुरुभजनीं सादर रहावें. हेंच तारक होय. नारायण.

पत्र ४ थें

श्री. प. नृसिंहसरस्वती यांस नारायण.

जर कवितेविषयीं स्फुरण होत असेल तर त्यावेळीं तो विषय टाकून ध्यान किंवा भजन करावें. अशा रीतीनें कविताविषयाची विस्मृति पाडावी. कारण, हें ध्यानविघ्न आहे. कळावें. नारायण.

पत्र ५ वें

श्री. प. नृसिंहसरस्वती यांस नारायण.

भ्रम होणेजोगी विश्वेश्वरी वाचूं नये. नित्यकर्म ज्याप्रमाणें लिहून दिलीं असतील तशीं करावींत. विशेष कर्मादर ठेवून भ्रमणीचें प्रयोजन नाहीं. जितका जप होईल तितका घडूं द्या. अमूकच झाला पाहिजे असा निग्रह नाहीं. भिक्षा एकदांच मागावी असा शास्त्रार्थ आहे. परंतु तसा प्रसंग येऊन पुन्हां मागितली तरी हरकत नाहीं. " नान्नदोषेण मस्करी " इति स्मृतेः॥ अलं. नारायण.

पत्र ६ वें

श्री. प. नृसिंहसरस्वती यांस नारायण.

नित्य स्वानुसंधान ठेवावें. सूत्रवृत्ति पुन्हां पुन्हां वाचावी. नारायण.

पत्र ७ वें

श्री. प. नृसिंहसरस्वती यांस नारायण.

हंसाश्रमपरित्याग झाल्यानें संध्याधिकार नाहीं. प्रणवानुष्ठान, श्रवणादिक करावें. नारायण.

पत्र ८ वें

श्री. प. नृसिंहसरस्वती यांस नारायण.

" सत्त्वप्रधानं मायावच्छिन्नं सर्वगुणाश्रयं ओंकारोपाधिकं ब्रह्माहमस्मीति भावयेत् " प्रणवाभ्यासाकडे चित्तवृत्ति ठेवल्यानें चित्त शांत होईल. कळावें, नारायण.

पत्र ९ वें

श्री. प. नृसिंहसरस्वती यांस नारायण.

स्वानुसंधान सतत ठेवावें. कळावें. नारायण.

पत्र १० वें

श्री. प. नृसिंहसरस्वती यांस नारायण.

चुकून प्रारब्धवशात् घडलें. हा कांहीं अपराध नव्हे. तथापि चित्ताला समाधान वाटत नसेल तर श्रीगुरुचरित्राची एक आवृत्ति करावी. सर्वदा आपलें साक्षीपणाचें अनुसंधान ठेवावें. कळावें. नारायण.

पत्र ११ वें

श्री. प. नृसिंहसरस्वती यांस नारायण.

प्रणवानुसंधानीं सादर असावें. कळावें. नारायण.

पत्र १२ वें

श्री. प. नृसिंहसरस्वती यांस नारायण.

सर्वप्रकारक ज्ञानोपसंहार हयाच अविद्यावृत्ति, वटबीजांत वटशक्ती-प्रमाणें आहेत. त्याच पुढें टवटवतात. कळावें. नारायण.

पत्र १२ वें

श्री. प. नृसिंहसरस्वती यांस नारायण.
भगवद्भजनीं सादर असावें. कळावें, नारायण.

याप्रमाणें आणखीदेखील अनेक पत्रें आहेत. बहुतेक पत्रांत " भगवद्भजनीं सादर असावें " असाच मजकूर आहे. हीं पत्रें ब्रह्मावर्त, कुरुगड्डी, वढवाई, तंजावर, कावेरी संगम, हावनूर, गरुडेश्वर इत्यादि ठिकाणांहून आलेलीं आहेत.

श्रीवासुदेवानंदसरस्वती आपल्याप्रमाणें आपल्या शिष्याला बनवावा म्हणून झटत असल्याचा बोध दिलेल्या पत्रांवरून होतो. त्यांचा भावार्थ वरील पत्रांतच आला आहे. असो. असे आपणाकरितां कळकळीनें झटणाऱ्या दयासिंधु देशिकेंद्रावर श्री नृसिंहसरस्वतींचासुद्धां तसाच निरुपम प्रेमा होता." स सर्वविद् भवति " "स सर्वो भवति" असा सर्वज्ञपणा व सर्वात्मभाव देणाऱ्या वासुदेवानंदसद्गुरुनाथांबद्दल " नाद्वैतं गुरुसन्निधौ " या शास्त्रानुसार त्यांनीं कृतज्ञतेची कमाल करीत द्वैतभावच आमरणांत धारण केला होता. अज्ञ जनांप्रमाणें गुरु भिन्न व आपण भिन्न, ते पूज्य व आपण पूजक, ते सेव्य व आपण सेवक, अशी दृढतर भक्तभावना त्यांनीं राखिली होती. ज्ञानोत्तर भक्तीच ती होय. वासुदेवसरस्वतींची जशी श्रीदत्ताशीं उपास्य-उपासक वृत्ति होती तशी यांची त्यांच्याशीं होती, म्हणजेच दत्ताशीं होती. कारण वासुदेव दत्तच होते.

प्रेमसुखाचा उपभोग घेणारे नृसिंहसरस्वती सद्गुरुपादुकाचें पूजनभजन करीत असतां तिकडे गरुडेश्वर मुक्कामीं त्यांचे गुरुवर्य भगवान् वासुदेवानंद अवतार समाप्त करण्याच्या विचारांत होते. निमित्तभूत कांहींतरी शारीरिक रोग शरीरांत होऊन ते दुखणाईत झाले. त्यांची ती अवस्था जेव्हां वाडीमध्यें नृसिंहसरस्वतींना कळली, तेव्हां मायबापासाठीं सत्पुत्र तसे, त्या आपल्या सद्गुरूसाठीं ते फार तळमळूं लागले. त्यांचा गुरुप्रेमा कसा होता तो पहा.

वाडींत श्रीदत्तपादुकांवर त्यांनीं गुरुरायाला आरोग्य मिळावें म्हणून अखंड संततधार अभिषेक चालू केला. पुजारी अनुष्ठानाला बसविले. कोणाला जप करायला बसविले, कोणाला गुरुचरित्र सप्ते करा म्हणाले, तर कित्येक स्त्रियांना प्रदक्षणा घालायला सांगितल्या. सर्व वाडी गांवाकरवीं असें अनुष्ठान त्यांनीं मांडलें. शिवाय गुरुमहाराजांना जो अतिसार झाला होता, त्यावर औषध बनवून तें श्रीदत्तालाच ते अर्पण करूं लागले. कित्येक पुजारी गरुडेश्वरीं समाचाराकरितां पाठवून दिले व आपण स्वतः त्यांच्यासाठी अनुष्ठान करीत वाडींत राहिले. ते स्वतः गेले असते. पण 'वाडी सोडूं नका' अशी त्यांना गुर्वाज्ञा होती. म्हणून ते गरुडेश्वरीं गेले नाहींत. तरी पण तेथला समाचार रोज आपणांला कळण्याची तजवीज त्यांनीं केली होती. पूर्वीच वाडींतून तिकडे कांहीं भक्त गेले होते. त्यांना रोज एक हकीगतीचें पत्र पाठविण्याची आज्ञा त्यांनीं केली होती. त्याप्रमाणें रोजचें गुरु-वर्तमान त्यांना वाडीच्या सुंदराबाई पुजारी व परशराम भटजी रोज पत्र घालून कळवीत.

वाडींतून स्वामींनीं जे पुजारी पाठविले ते गरुडेश्वरीं गेले त्यांनीं वासुदेवानंदप्रभूंना सांगितलें कीं, "वाडींत नृसिंहसरस्वतींनीं तुमच्याकरितां पादुकांवर संतत धार ठेवली आहे व ते औषध दत्ताला देत आहेत." त्यावर महाराज म्हणाले, "स्वामींनीं अनुष्ठान व औषधें चालविलीं आहेत म्हणूनच आपला हा एक महिना पुढें लोटला गेला. त्यांना सांगा, आम्हांला आतां देह सोडावयाचा आहे. करितां आरोग्याचे उपाय बंद करा." त्यावर पुजारी म्हणाले, "महाराज, श्रीदीक्षितस्वामी आपली कष्टमय स्थिति ऐकून फार शोक करीत आहेत." त्यावर महाराजांनीं एक उपनिषदांतला मंत्र म्हणून दाखविला तो असा-" यस्मिन्सर्वाणिभूतान्यात्मैवाभूद्विजानतः ॥ तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः' ॥ १ याचा अर्थ—" सर्व कांहीं आपणच एक ब्रह्म आहों अशा अद्वैतज्ञानी पुरुषाला शोक मोह आहेत कोठें ? नरसिंहसरस्वतींना शोक मोह नाहींत बरें ! तुम्हांला त्यांचें अजून ज्ञान झालें नाहीं. आम्हांलादेखील कष्ट कोठें आहेत ? हे पहा आम्ही

निरोगीच आहों." असें म्हणून महाराज उठले व कमंडलु घेऊन एका टेकडीवर जाऊन आले. आणि पुन्हां पूर्ववत् रुग्णस्थिति स्वीकारून निजून राहिले. तेव्हां पुजाऱ्यांना त्यांचें व दीक्षितस्वामिजींचें मोठें आश्चर्य वाटलें. गुरुमहाराजांचें दुखणें व शिष्यस्वामींचें शोक करणें हीं दोन्ही मोठीं गूढेंच आहेत, असें ते म्हणाले. गुरुमहाराजांच्या भाषणावरून तीं त्यांनीं मिथ्याच ठरविलीं. पण स्वानुभवाला मात्र पुजाऱ्यांना तीं सत्यच येत होती. कारण ते कांहीं अद्वैतानुभवी नव्हते. असो.

पुजारी पुन्हां वाडीला आले. त्यांनीं गरुडेश्वरीं झालेला संवाद व पाहिलेला प्रकार नृसिंहसरस्वतींना सांगितला. कांहीं दिवसांनीं वासुदेवानंदसरस्वती आषाढ शुद्ध प्रतिपदेला समाधिस्थ झाल्याची तार वाडीला आली. तेव्हां आतां अनुष्ठानें ठेवून काय करावींत ? असें म्हणून तीं स्वामींद्रांनीं बंद करविलीं. त्या प्रथम वर्षीचा वासुदेवानंदांचा पुण्यतिथीसमारंभ नृसिंहसरस्वती व समस्त पुजारी यांनीं केला.

नृसिंहसरस्वतींच्या ज्ञानवैभवाची वाखाणणी वासुदेवानंदांनीं पुजाऱ्यांपुढें जशी केली, तशीच ती एका अधिकारी संन्याशापुढेंदेखील केलेली आहे. कशी ती ऐका:-शृंगेरी मठाच्या शंकराचार्यांनीं ब्रह्मानंदसंज्ञक आपले एक शिष्य वासुदेवानंदांपाशीं जीवन्मुक्तिसुखाची प्राप्ति करून घेण्याच्या उद्देशानें गुरुडेश्वरीं पाठविले होते. त्यांना वासुदेवमहाराजांनीं आपला सहवास दिला. जीवन्मुक्तीचें स्वरूप व तिचीं साधनें व त्यांचा अभ्यास वगैरेसंबंधीं जें कांहीं त्यांना शिकवावयाचें तें सर्व शिकविलें. नंतर एके दिवशीं ते त्यांना म्हणाले कीं, " स्वामिन्, आपण नृसिंहवाडीला कधीं गेलां होतां काय ? नसाल गेलां तर एकदां अवश्य जा. तेथें ह्या सांगितलेल्या जीवन्मुक्त लक्षणांची मूर्ती तुम्हांला पहावयाला मिळेल. आम्ही तिची तेथेंच स्थापना करून ठेवली आहे. तेथलेच ते आहेत. पण त्यांना कोणी ओळखीत नाहींत. आमच्यापेक्षांसुद्धां ते कांकणभर अधिक आहेत." इतकें बोलून महाराज स्वस्थ राहिले. पुढें कांहीं महिने ब्रह्मानंदस्वामी तेथें होते. त्यांनीं इतरांजवळ चौकशी केली. तेव्हां

नृसिंहसरस्वतीच ते महाराजांचे शिष्य होत अशी माहिती त्यांना लोकांनीं दिली. महाराजांचे प्रिय शिष्य वाडींत असतात असें जेव्हां त्यांना समजलें तेव्हां त्यांनीं तेथें जाण्याचा निश्चय केला. गुरुमहाराज समाधिस्थ झाल्यावर त्यांचें बसावयाचें मृगासन व हस्तलिखित छोटीशी वही प्रसाद म्हणून नृसिंहसरस्वतींना देण्यासाठीं तेथील व्यवस्थापकांच्या परवानगीनें त्यांनीं घेतली व वाडीला आले. महाराजांनीं वर्णिलेली मूर्ती पाहण्यासाठीं ब्रह्मानंदाचे मठांत माडीवर ते गेले. तेथें गुरुमुखानें ऐकल्याप्रमाणें सर्वलक्षणसंपन्न शांत दांत ब्रह्मनिष्ठाग्रणी महात्मे श्रीनृसिंहसरस्वती त्यांनीं पाहिले. दर्शन होतांच समाधान पावले. त्यांना विधियुक्त वंदन केलें. आपण गरुडेश्वराहून आलों असें सांगितलें.

गरुडेश्वराहून कोणी जरी आला तरी नृसिंहसरस्वती त्याचा फार आदरसत्कार करीत. गुरुवार्ता सांगणारा त्यांना फार प्रिय गमे. स्वामींना त्यांनीं आदरानें आसनावर बसवून घेतलें व वासुदेवमहाराजांचें वर्णन त्यांचे मुखानें ऐकण्याला उत्कंठित होऊन राहिले. प्रथम स्वामींनीं, "हा गुरुमहाराजांचा प्रसाद घ्या" म्हणून मृगासन व वही पुढें केली. ती नृसिंहांनीं मोठ्या भक्तिभावानें पदरांत घेतली. नंतर त्यांनीं सांगितलेलें गुरुवृत्त संपूर्ण श्रवण केलें. स्वामींनीं गरुडेश्वरच्या दत्तमंदिराबद्दलची हकीगत व तुम्हांला मंडळीनें तेथें सरपंच म्हणजे देवसंस्थानचे अध्यक्ष नेमले, असेंहि सांगितलें. "त्यांना कशाला नेमतां ? ते स्वामी अगदीं निर्वासन आहेत. ते या उपाधींत पडणार नाहींत." इत्यादि जें मंडळीला गुरुडेश्वरीं महाराज म्हणाले, तेंदेखील त्यांनीं सर्व नृसिंहसरस्वतींना सांगितलें व कांहीं दिवस राहून सुखसंवाद करून ते दुसरीकडे गेले.

श्रीवासुदेवानंदसरस्वतींनीं स्वतः ज्यांचें महत्त्व गाइलें ते लोकोत्तर पुरुष होत. त्यांची योग्यता दुसरा कोण जाणूं शकणार आहे ? ती एक त्यांच्या सर्वज्ञचूडामणी सद्गुरुभगवंतांनींच जाणली. ज्यांनीं ती त्यांना दिली त्यांनाच तिचें ज्ञान असावयाचें हें उघडच आहे. येथें एक लक्षांत ठेवण्याची गोष्ट अशी

कीं, शृंगेरीच्या ब्रह्मानंद-स्वामीजवळ शिष्यांची महती गातांना वासुदेवानंद महाराज म्हणालेले आहेत कीं, " ते आम्हांपेक्षां कांकणभर अधिक आहेत. " या त्यांच्या भाषणाचा प्रत्यय नृसिंहसरस्वतींच्या पुढील चरित्रावरून येणार आहे.

थोरल्या महाराजांनीं नृसिंहसरस्वती महाराजांना सांगितलें होतें कीं, 'फार उपाधी वाढवूं नका. जाग्यावर कोणी शरण येतील तेवढ्यांची मनोरथपूर्ति करीत जा.' ह्या गुरुमहाराजांच्या सांगीप्रमाणें स्वामीजींनीं आपलें वर्तन ठेवलें होतें. आपलें सामर्थ्य प्रगट होईल अशा पद्धतीनें ते वागत नसत. झांकलेल्या माणकाप्रमाणें किंवा भस्माच्छादित अग्नीप्रमाणें ते लोकांत गुप्तपणानेंच रहात. ते उपाधी वाढवीत नसत. नित्यनैमित्तिक आश्रमधर्म सांभाळून गुरुपूजा, गुरुशेजारती, गुरुस्तुति, गुरुध्यान, गुरुभजन, गुरूत्सव इत्यादि गुरूपासनाच ते सर्वकाळ करीत. ब्रह्मानंदसमाधि ते अखंड लावून रहात. मागें आम्ही समाधिसुख भोगीतच ते व्यवहार करीत असें जें म्हटलें, तो व्यवहार म्हणजे उत्सव होत. ते उत्सवसुद्धां ते पुजाऱ्यांच्या मुलांकडूनच करवीत. आपण नुसते द्रष्टेच असत. पूजकबाळ चतुर होते. अनंत, हरि, नागु, गोविंद, शंकर, गोपाळ, राघु, सखाराम इत्यादि नांवाचे ते होते. परशुराम, शिवराम, राम, शंकर, बाबुराव, मोरू, वझे इत्यादिक भक्त बाहेरगांवचे असत. गांवांतील, थोरले महाराजांच्या शिष्यिणी स्त्रियादेखील कांहीं कार्यापुरत्या येत. ही मंडळी नेहमीं स्वामीमहाराजांचे हाताखालीं आज्ञाधारक होऊन वागत. पुजाऱ्यांच्या मुलांना नृसिंहसरस्वतींनीं स्वधर्मानुष्ठान शिकविलें. गुरुभक्ति करायला लावली. शास्त्राभ्यास त्यांचेकडून करवून त्यांना संस्कृत भाषाभिज्ञ केलें व नंतर गुरुमहाराजांनीं सांगितलेले सूत्रवृत्ती, जीवन्मुक्तिविवेक, काठकोपनिषद्भाष्य, वाक्यवृत्ती, वाक्यसुधा, वासुदेवमनन इत्यादि वेदान्तग्रंथ त्यांनीं त्यांना पढविले. कर्म, भक्ति व ज्ञान हीं तिन्ही श्रेयःसाधनें त्यांना दिलीं. कित्येकांना दशोपनिषदें मूळ पढविलीं. वेदेश्वरीदेखील ऐकविली. त्यावेळीं स्त्रियाही श्रवणाला असत. वाडींतल्या वाडींत, तोहि कांहीं विशिष्ट मंडळींतच त्यांनीं वेदांतबोध संप्रदाय चालू ठेवला. भक्तिभावाचा सांप्रदाय मात्र त्यांनीं सार्वजनिक रीतीनें

चालू राखला. आजपर्यंत स्थापित देव झालेल्या अवांतर स्वामींच्या पुण्यतिथ्या व जयंत्या त्यांनीं चालविल्या होत्या. वासुदेवानंदांचा जन्मोत्सव व आगमनोत्सव असे दोनच उत्सव ते करीत. पण आतां वासुदेवानंदसरस्वती समाधिस्थ झाल्यानें त्यांचा पुण्यतिथिमहोत्सवसुद्धां त्यांच्या भक्तिमार्गातलें एक महत्त्वाचें कर्तव्य होऊन राहिलें.

शके १८३७ पासून त्यांनीं आपलें कर्तव्य म्हणून गुरुपुण्यतिथीचा उत्सव सुरू केला. त्यांच्या हाताखालची मंडळी वर सांगितलीच आहे. मुख्य कार्यकारी मंडळ पुजाऱ्यांचे बाळच असत. उत्सवकार्यें ते करीत. मठाला चुना देणें, त्यावर चित्रें काढणें, जमिनी सारवून ठेवणें, कुरुंदवाडच्या वाडयांतून मोठीं भांडीं, अरगिनी दिवे वगैरे आणणें; हरिदास, पुराणिक, वैदिक, अभिषेक करणारे, ग्रंथ वाचणारे, भजनांत सप्त्याचा पहारा घेणारे, स्वयंपाक करणारे, वाढणारे, उष्टीं काढणारे, रांगोळ्या पाट करणारे, वाजविणारे इत्यादि लोकांना आमंत्रणें देऊन त्यांना त्यांच्या त्यांच्या कार्यावर नियोजित करून तीं कार्यें चालू ठेवणें, हें सर्व कृत्य तें बाळमंडळच करीत असे. प्रतिपदेच्या पूर्वी सात दिवस उत्सवाचा प्रारंभ होई. ज्येष्ठ वद्य नवमीला माडीवरून दत्तदिगंबराच्या पितळी पादुका व वासुदेवानंदांच्या खडावा, ज्या नृसिंहसरस्वतींना व विद्यार्थ्यांना म्हणजेच कार्यकारी मुलांना महाराजांनीं स्वयें दिलेल्या त्या; असे तीन पादुकांचे जोड मठाच्या तळमजल्यांत, गुरुमहाराज जेथें बसत त्या जागीं पुजारीच सिंहासनावर आणून ठेवीत. सात दिवस तेथें त्यांची अभिषेक, महापूजा वगैरे होई. सर्व उत्सवांतले कार्यक्रम तेथेंच केले जात.

वेदमूर्ति बाळंभट बोरगांवकर अभिषेक व पूजा नैवेद्य करीत, वे. शा. सं. बाळशास्त्री कोडणीकर भागवताचा सप्ता वाचीत. वे. शा. सं. अण्णा दीक्षित समश्लोकी गुरुचरित्र सकाळीं सहस्र वाचीत व दुपारीं त्याचाच अर्थ सांगत, कित्येक पुजाऱ्यांचीं सुशिक्षित मुलें व कांहीं शास्त्री वासुदेवानंदविरचित समग्र ग्रंथांचीं पारायणें करीत. वेदमूर्ति दामले, वे. मू. सखाराम भटजी येडूरकर व वे. मू. बाळू कंटराव पुजारी वगैरे वेदपारायणें करीत व रात्री मंत्रजागर करीत. हरिभक्तिपरायण गणेशशास्त्री शिरोलीकर हे रोज

कीर्तन करीत. कोणी स्वयंपाक करीत, कोणी वाढीत; कोणी पाणी भरीत. हीं कामें स्त्रिया करीत. कीर्तनपुराणाला श्रोतृसमाज मठ भरून बसे. जन्मोत्सवाचे वेळीं रोज ब्राम्हणभोजन होत असे असें सांगितलेंच आहे. तद्वत् या वेळींही होई. तीन त्रिकाळ आरतीला, कीर्तनाला, पुराणाला स्वतः नृसिंहसरस्वती येत असत. सकाळीं पादुकांना पाणी घालून उत्सवांत ते आपली जपसमाधि लावीत देवासन्निध मठांतच बसत.

कांहीं वेळानें माडीवर जात. रात दिवस नामसप्ता चाले. आषाढ शुद्ध प्रतिपदेला किती मिळतील तितके संन्यासी व बाकीचे ब्राम्हण मिळून सोळा ब्राम्हणांची यथाविधि पूजा होई. ती वर्णिलदार पुजारी करी. ब्राम्हणांना पंचपक्वान्नें वाढीत. वस्त्रें व दक्षणा रुपरुपाया देत असत. हरिदास, पुराणिक, सप्तावाचक, वाजंत्री इत्यादिकांना वस्त्रें व प्रसाददक्षणा दिली जाई. सार्वजनिक मुक्तद्वार भंडारा केला जाई. तेव्हां चारी वर्णांचे आबालवृद्ध नारीनर महाप्रसाद घेत. उत्सव झाल्यावर पुन्हां पादुका माडीवर आणून ठेवीत. याप्रमाणें पुण्यतिथीचा महोत्सव सुरू झाला. गांवचे व परगांवचे--शिरोळ, कुरुंदवाड, अमरापुर, सांगली, पुणें, कोल्हापूर इत्यादि ठिकाणचे नारीनर उत्सवाला येत व ते यथाशक्ति सेवादेखील करीत असत. त्यांत बाबुराव शिरोळकर व परशुराम शिकेरकर हे सतत महाराजांचे हाताखालीं सोवळ्यांत राहून कार्य करीत. बाबुराव प्रेमळ भक्त होते. हास्य, विनोद, थट्टा त्यांची व नृसिंहसरस्वतींची चाले. परशुरामभट पूजासाहित्य करून देत. हे नृसिंहसरस्वतींची मर्जी सांभाळून अखेरपर्यन्त राहिले. गुरुप्रीती त्यांचेवर फार होती. गांवांतल्या भक्त स्त्रिया नृसिंहसरस्वतींना थोरल्या महाराजांप्रमाणेंच समजत. त्यांना त्या फुलवाती, तूप, नैवेद्याला फलाहारी जिन्नस वगैरे आणून देत. नीरांजनें घाशीत व तीं भरीत. मठ सारवीत, रांगोळ्या घालीत, पडेल ती सेवा त्या करीत. सर्व वाडीगांव नृसिंहसरस्वतींच्या इच्छेनुरूप उत्सवकार्याला मदत करी. स्वतः श्रीनृसिंहसरस्वती सिद्धपुरुष समर्थ असल्यामुळें त्यांच्या संकल्पाप्रमाणें जेव्हां जेव्हां जसें जसें व्हावयाला पाहिजे तेव्हां तें तसें तसेंच सर्व व्यवस्थित होत असे. कोणत्याही गोष्टीची उणीव होत नसे.

दिवसेंदिवस भक्तिभजनाची वाढ जशी जशी होत गेली तसतशीं नवीं नवीं ब्राम्हणांचीं मुलें नृसिंहसरस्वतीपाशीं रात्रौ भजनाला जमूं लागलीं. मुलें संध्या करून भजनाला आलीं कीं, स्वामीमहाराज त्यांना बराचसा नैवेद्य व तुपाचें नीरांजन आरतीला देत. प्रसाद मिळतो असें पाहून सर्व प्रसाद थोडया मुलांनाच मिळावा म्हणून अधीं मुलें लवकर येऊन भजन करून प्रसाद सगळाच घेऊन जात. पुन्हां राहिलेलीं अधीं येत व तीं भजन करून तितकाच प्रसाद घेऊन जात. कांहीं दिवस दोन टोळयांनीं तीं येत. पुढें तीन टोळयांनीं, त्याचेनंतर चार टोळयांनीं, अखेर एकेक मुलगा येऊं लागला. प्रत्येक मुलाला महाराज आरतीला नीरांजन व लाडू किंवा वाटीभर घरगुती चिवडा देऊं लागले. मुलांनीं युक्ति योजली व प्रत्येकाला मुबलक प्रसाद मिळवून घेण्याला सुरुवात केली. ही मुलांची युक्ति नृसिंहमहाराजांना समजली नाहीं असें नाहीं. ते त्यांच्यापेक्षां लहानपणीं युक्तिमान होते. आतां तर योगेश्वरच झालेले. त्यांनीं विचार केला कीं प्रसादाच्या लालचीनें तरी मुलें भजन करूं देत ! ! भक्तिमार्गाला लावण्यासाठीं ते मुलांची कींव करीत असत. व त्यांना खाद्य देऊन संसारसागरांतून तरून जाण्याच्या साधनाला लावीत असत. प्रल्हाद जसा दैत्यांचे मुलांना भक्तीला लावी तसे नृसिंहमुनीदेखील अल्लड वृत्तीच्या मुलांना आमिष दाखवून भक्तीला लावीत. कोणत्याही वेळीं बालक त्यांचेसमोर गेला कीं ते त्याला खारीक, संत्रें, जरदाळू वगैरे कांहीं ना कांहीं देतच असत व भजन करीत जा म्हणून सांगत असत. त्यांच्या सन्निध परगांवचे सेवेकरी जे मठांतच रहात म्हणून मागें सांगितलें. उदाहरणार्थ परशुराम, गोविंद, शंकर, शिवराम वझे वगैरे–त्यांनासुद्धां ते वरचेवर नानाप्रकारें प्रसाद म्हणून खाद्यपेय पदार्थ देत. त्यांना वस्त्रें देत. त्यांना जी कोणती अडचण असेल ती ते दूर करीत. नेहमीं पादुकांना पक्वान्नाचा महानैवेद्य बोरगांवकरांकडून आणवीत व तो हया सेवेकऱ्यांनाच घ्यायला लावीत.एकादशीला फराळ देत.अशी कृपादृष्टि त्यांची सर्वांवरच असे. सर्वांवर ते प्रेम करीत. सर्वांबरोबर हंसत; बोलत. कोणाला रागवत नसत. सर्वांना नृसिंहसरस्वती हे आपले मायबाप आहेत असें वाटे.

मठांत राहून मुमुक्षु वृत्तीनें श्रीनृसिंहसरस्वतींची सेवा जे कित्येक सेवेकरी करीत त्यांत रामचंद्र बडवे शिंगणापुरकर हे एक होते. त्यांनीं महाराजांची शिष्यवृत्ति धारण केली होती. दुसरे भक्त कृष्णंभटजी पुजारी हे वाडींतलेच होते. त्यांची माहिती पुढें देऊं. कोल्हापूरचे हरिभाऊ कडेकर हे गरुडेश्वरीं थोरल्या महाराजांकडे उपदेश घ्यावा म्हणून गेले होते. पण महाराजांनीं त्यांना वाडींत जाऊन नृसिंहसरस्वतींकडूनच तुम्ही उपदेश घ्या, असें सांगितलें. तेव्हां ते वाडीला आले व नृसिंहसरस्वतीस्वामींचा उपदेश घेऊन त्यांचे शिष्य झाले. दर पौर्णिमेला वाडीला ते वारीला येत असत व उत्सवप्रसंगींदेखील येत. यांची हकीगत पुढें सांगितली जाईल. गोपाळराव दंडगे हेसुद्धां महाराजांचेच शिष्य झाले. दत्तू कवीश्वर, दिगंबर हवळे, बापू कोडणीकर, श्रीपाद उपाध्ये, बाळू पुजारी इत्यादिक मुलें पुढें पुढें नृसिंहसरस्वतींच्याच भजनीं लागलीं. त्यांची माहिती पुढें दिली जाईल. गोविंदा डिग्रजकर हा देखील या मुलांतलाच एक गुरुभक्त होय. बळवंतराव नंदनवाडकर हे यांचेच भक्त होत. असे अनेक शिष्य होते. त्यांची गणना कोण करूं शकेल ? स्त्रियासुद्धां शिष्यिणी झाल्या. पण त्या फार थोडया. थोरले महाराज समाधिस्थ झाल्यावर नंतर नृसिंहसरस्वतींनीं जे कोणाला उपदेश दिले ते दिले. त्यापूर्वी ते आपल्या गुरुमहाराजांकडूनच ते देववीत, आपण बहुधा देत नसत.

प्रकरण ९ वें

मागच्या प्रकरणांत गरुडेश्वराहून एका यतींनीं श्रीवासुदेवानंदांचें आसन व पोथी वाडींत आणून श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजांना प्रसाद म्हणून दिल्याचें वर्णन झालें. निज सद्गुरुनाथांचा प्रसाद म्हणून छाटी अंगावर घेतात, किंवा माळ गळ्यांत घालतात; असा प्रासादिक वस्तूंचा कोणी कोणी स्वीकार करतात. तसा त्या आसनांचा स्वीकार मात्र नृसिंहसरस्वतींनीं केला नाहीं. म्हणजे तें बसायला त्यांनीं घेतलें नाहीं. आपले सद्गुरुनाथच हे या रूपानें आपल्याला प्रीतीनें भेटायला आले आहेत, असें समजून त्यांनीं एक पाट मांडून त्यावर त्याची स्थापना केली व तें आपल्या देवांजवळ नित्य पूजेंत ठेवलें. त्याच्यावर त्यांना निज गुरुनाथच बसलेले दिसत. देवपूजेबरोबर त्यांची ते पूजा करीत. गंध, फुलें वगैरे अर्पण करीत. नित्याचे देवांना म्हणजे गुरुपादुकांना व पुढें आतां आम्ही सांगणार आहों त्या गुरुमूर्तींना वंदन करतांना त्या आसनालादेखील ते वंदन करीत. ज्या दिशेला तें आसन मांडलें होतें त्या दिशेकडे मुख करून ते नमस्कार घालीत. गुरुगीताशास्त्रांतदेखील गुरुभक्तानें गुरुभक्ति करतांना तसेंच करावें म्हणून सांगितलें आहे. तें असें:—

श्रीनाथचरणद्वंद्वं यस्यां दिशि विराजते ।।
तस्यै दिशे नमस्कुर्यात्प्रीत्या प्रतिदिनं प्रिये ।। १ ।।
किंवा तस्यै दिशे सतत मंजलिरेष आर्ये ।। १ ।।

इत्यादि. गुरुनाथ असतील त्या दिशेला पुष्पांजलि व नमस्कार करावा, असें सांगितलें आहे. त्याप्रमाणें नृसिंहमुनीश्वर करीत असत. आसन मांडून नंतर

च ते त्या दिशेला नमन किंवा पुष्पांजलि अर्पू लागले असें नाहीं; तर पूर्वी-सुद्धां ते तसें करीत असत. वाडींतून पुढें अमरापुरीं गेल्यावरसुद्धां तेथें वाळवंटांत पूर्वतटाकीं येऊन कृष्णेच्या पश्चिम तटाकाकडे (वाडीकडे) मुख करून दत्तप्रभूच्या सन्मुख ते उभे रहात. आणि तेथूनच पुष्पांजलि अर्पून श्रीगुरुमूर्तीला ते वंदन करीत. दत्त व वासुदेवानंद एकच समजून ते अशी गुरुभक्ति करीत. हातांत आरतीचें ताट धरून आरत्या म्हणून तेथूनच ते गुरुदत्ताला ओंवाळीत; नैवेद्य समर्पीत. इत्यादि सर्व पूजा ते करीत. आरतीनंतर स्तोत्र म्हणतांना किंवा आरती ओंवाळतांना त्यांचे नेत्रावाटे प्रेमाच्या धारा चाललेल्या असत. आजपर्यंत म्हणजे वाडी सोडीपर्यंत ज्या दत्तदेवाचें पूजनभजन त्यांनीं केलें, त्याच्यावर त्यांचें अतोनात प्रेम बसून राहणें साहजिकच होतें. वाडी सोडून ते अमरापुरीं कां गेले, वाडींत कां येत नसत, वगैरेची माहिती पुढें देण्यांत येईल. सध्यां त्यांची गुरुभक्ति तेवढीच सांगत आहें.

ज्ञानवैभव कळसाला पोंचलें असूनसुद्धां सगुण परमेश्वरावर त्यांचें पराकाष्ठेचें प्रेम होतें. गुरुभजन त्यांना कधींच पुरेसें झालें नाहीं. उत्तरोत्तर श्रीगुरुदेवावर त्यांची प्रीति अधिकाधिकच वाढत होती. गुरुपादुकांचें पूजन करीत असून त्यांनीं सखाराम गेंडे नामक पुजाऱ्याकडून वासुदेवानंदांच्या रंगीत तसबिरी काढून घेतल्या. तद्वत गोपाळराव बेडक्याळकर नामक भक्ताकडून एक रौप्यमय वासुदेवानंदमूर्ति बनवून घेतली. त्यांचेंदेखील ते नित्य पूजन करूं लागले. जयंत्या, पुण्यतिथ्या इत्यादि उत्सव करणें, ब्राह्मणभोजनें घालणें, कथा–पुराणें, भजनें करविणें व ऐकणें, नामसप्ते अखंड चालविणें, यांतच ते नेहमीं दंग असत. गुरुमहाराजांवरून स्वतः आरत्या, स्तोत्रें वगैरे ते करीत व दुसऱ्यांकडून करवून घेत. त्यांचीं चरित्रें रचायला लावीत. गुरुगुणानुवाद स्वतः करीत व दुसऱ्याला करायला लावून तो आपण प्रेमानें ऐकून घेत. नृसिंहसरस्वतींची गुरुभक्ति वर्णन करतां येणें शक्य नाहीं. गुरुभक्ति करणाराने स्वाधीन आम्ही ब्रह्माविष्णुमहेश्वर तिघेहि देव होतों, असें गुरुचरित्रांत त्रमूर्ति म्हणाले आहेत. त्याप्रमाणें त्रैमूर्ति दत्त नृसिंहसरस्वतींच्या स्वाधीनच झाले, "मद्भक्ता यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद" आणि "सांठविला राहे

हृदयसंपुटीं ॥ बाहेर धाकुटी मूर्ति उभा " इत्यादि वचनांप्रमाणें दीक्षितमहाराजांच्या हृदयांत व बाहेर भगवान श्रीदत्त वासुदेवच होऊन राहिला.

हृदयसंपुटांत भगवंतांचें वास्तव्य झाल्यावर " ततस्तत्कृपया तद्गुणाविर्भावः " या नियमानुसार नृसिंहसरस्वतींच्या ठिकाणीं सर्वज्ञत्व, सत्यसंकल्पत्व, वाचासाफल्य, कारुण्य इत्यादि गुणसुद्धां प्रगट झाले. ते जें बोलतील, किंवा इच्छितील तें तें सर्व सत्य होऊं लागलें. त्यांच्या आशीर्वादाचें फळ लोकांना मिळूं लागलें. त्यांच्या इच्छेंत भक्तांचें अभीष्ट पुरविण्याचें सामर्थ्य आलें. त्यांचे दृष्टींतदेखील तें बळ आलें व त्याचा अनुभव लोकांनादेखील येऊं लागला. म्हणून राजेरजवाडे, शेट सावकार, अमीरउमराव, श्रीमंत मध्यम व गरीबदेखील लोक त्यांचे दर्शनाला येऊं लागले; त्यांच्या हस्तें प्रसाद घेऊं लागले. सर्व जनता त्यांना प्रत्यक्ष श्रीदत्तच समजून भजूं लागली. अनुभव आल्यावर कोण देव मानणार नाहीं ? व कोण भजणार नाहीं ? नृसिंहसरस्वतींच्या देवत्वाचे, त्यांच्या सत्यसंकल्पत्वाचे किंवा त्यांच्या सत्यवचनीत्वाचे पुष्कळांना अनुभव आले. त्यांच्या कृपेनें पुष्कळांचें दुःख निवृत्त झालें व सुखाचा लाभ पुष्कळांना झाला. त्या सर्वच कथा सांगून होणें शक्य नाहीं. तथापि भक्तांच्या संतोषार्थ व वक्त्याच्या हृदयशुद्धयर्थ त्यांतील कांहीं चरित्रें संक्षेपानें येथें सांगतों.

त्यांचे संकल्प सफळ होत असत, याबद्दलचें उदाहरण असें आहे :-वाडीमध्यें नारायणस्वामींचा उत्सव दरवर्षी चैत्रांत होत असतो. त्या उत्सवांत श्रीदत्तप्रभुची उत्सवमूर्ति नारायणस्वामींच्या पुढें बसविली जाते. कीर्तन होईपर्यंत प्रभु तेथें बसतात; तें पुरें होतांच आपल्या स्थानांत जातात, असा नित्याचा सांप्रदाय आहे. जसे प्रभु नारायणस्वामींच्या उत्सवांत स्वतः येऊन बसतात, कीर्तन ऐकतात तसेच ते श्रीवासुदेवानंदसरस्वतींच्या उत्सवांत यावेत; त्यांनीं वासुदेवानंदांसमीप बसून कीर्तन श्रवण करावें. आपल्या गुरुमहाराजांवरील प्रेमसुद्धां दत्तप्रभूंनीं अशा प्रकारें व्यक्त करावें असा गुरुभक्तिमूलक दृढ संकल्प नृसिंहसरस्वतींनीं केला व तो आपला हेतु त्यांनीं श्रीदत्ताला निवेदिला. ज्यांनीं भक्तसुरद्रुम षड्गुणाधिकरण श्रीदत्तप्रभु कायमचा आपला हृदयनिवासी

करून ठेवला, ज्याला ते लवनिमिषार्धसुद्धां विसरत नसत, त्रिभुवनांतलें वैभवसुद्धां त्यापुढें ज्यांना तुच्छ झालें त्यांनीं केलेला मनोरथ निष्फळ कसा व्हावा ? त्यांच्या इच्छेप्रमाणें भगवान कां वागं नये ? वागलाच पाहिजे व तो तसा वागलादेखील. तेंच त्याचें भक्तवात्सल्य आतां दाखवावयाचें आहे. तें पुढील चरित्रांत दिसून येईल.

नृसिंहमुनींनीं आपली ही इच्छा उत्सवांत त्यांचे हाताखालीं वागणाऱ्या पूजकपुत्रांना एकदां बोलून दाखविली. त्या वेळीं त्यांची समजूत झाली कीं स्वामीमहाराजांना आपल्या गुरुमहाराजांचें फार वेड आहे. म्हणून हे जें वाटेल तें आपले बोलतात त्यावेळीं ते पूजक बाळ म्हणाले, " पूर्वीच्या वहिवाटीविरुद्ध पुजारी जात नाहींत. नारायणस्वामींच्या उत्सवांत स्वारी बसविण्याची वहिवाटच आहे. तशी वासुदेवानंदांचे उत्सवांत बसविण्याची कोठें आहे ?" इत्यादि भाषा मुलांच्या मुखांतून ऐकून नृसिंहमुनी स्वस्थ राहिले. त्यांना त्या कुमारांचा तो विचार खरा वाटला. तरीपण आपला मनोरथ सिद्ध व्हावा, याबद्दल त्यांना उत्कंठा लागून राहिली होती ती कायमच होती. ती आतां देवाकडूनच पुरी होणार. परमेश्वर दत्तगुरु वांझेलासुद्धां संतती जर देतात, मेलेला मनुष्यसुद्धां जर उठवतात, तर त्यांना वहिवाटीच्या विरुद्धदेखील वागतां येणें शक्य आहे. अघटित घडविणारा काय एक करूं शकणार नाहीं ? त्यानें पूर्वतयारी म्हणून प्रथम कृष्णेला मोठा पूर आणला. पुजाऱ्यांचे घरींच स्वामींसह आपणसुद्धां जाऊन राहिला. पाणी चढलें म्हणजे दत्ताची स्वारी पूजकाचे घरी ठेवावयाचा पुजाऱ्यांचा नियम आहे. त्याप्रमाणें त्यांनीं केलें. नृसिंहसरस्वतीदेखील त्याच पूजकाचे घरीं म्हणजे श्रीपादभटजी हवळघांचे घरीं राहिले. दत्ताची स्वारी पहिल्या मजल्यांत व नृसिंहसरस्वती माडीवर दुसऱ्या मजल्यांत राहिले. कांहीं दिवसांनीं पाणी पुन्हां उतरूं लागलें. श्रावण महिना होता. वासुदेवानंदांचा जन्मोत्सव वद्य पंचमीचा. तो देखील जवळ आला होता. अशा संधींत दत्त व वासुदेव यांचा एकत्र वास झालेला असून पाणी उतरूं लागलें. तेव्हां नृसिंहमुनींना वाटलें कीं आतां देव परत घाटांवर गेले म्हणजे हा योग पुन्हां येणार नाहीं. खालच्या मजल्यांतून देव माडीवर येऊन महाराजांच्या उत्सवांत त्यांच्या समीप बसले तर पाहिजेत. आतां कसें करावें?

पाणी पुन्हां कसें चढावें ? अशा विवंचनेंत स्वामीजी पडले. त्यांनीं तेथें जाऊन तळमजल्यांत असलेल्या उत्सवमूर्तीची प्रार्थना केली कीं, " आम्ही माडीवर वासुदेवानंदमहाराजांचा जन्मोत्सव श्रावण वद्य पंचमीला करणार आहों. तरी आपण येऊन कार्यसिद्धी करावी." अशी प्रार्थना करून दीक्षितमहाराज माडीवर गेले. तों चमत्कार असा झाला कीं, नदीच्या पात्रांत उतरत गेलेलें पाणी पुन्हां वेगानें वर चढूं लागलें. प्रभुराजांनीं इंद्राकरवीं अशी कांहीं पर्जन्यवृष्टि सर्वत्र सुरू करविली कीं पूर्वापेक्षांदेखील कृष्णेला मोठा भयंकर महापूर आला. गांवांत घरोघरीं पाणी शिरलें. दत्तमहाराज होते त्या घरीं पहिल्यांदां पाणी गेलें नव्हतें. पण दुसऱ्यांदां जें पाणी चढलें तें त्यांचेदेखील घरांत शिरलें. दारापुढें, सडकेवर पुरुषभर पाणी झालें. घरांतला तळमजला पूर्ण बुडाला; स्वारीचे चौरंगावर पाणी चढलें. गांवांत सर्वत्र हलकल्लोळ उडाला. प्रलयकाळ भासला, घरें पडत होतीं, पाणी वाढत होतें, पाऊस जोराचा सुरू होता. सर्व लोक घाबरले. कांहीं पुरुष पोहत श्रीपादभटजींकडे आले. नृसिंहसरस्वतींना त्यांनीं विनंति केली कीं, आपण दत्तमहाराजांची प्रार्थना करा व हा प्रलय होत असलेला निवारा.

पुजारी लोकांनीं देवाची प्रार्थना करा म्हणतांच महाराज नृसिंहसरस्वती म्हणाले कीं, " प्रार्थना करतों; पण सध्यां स्वारी पाण्यांतून उचलून माडीवर नेऊं या." त्यावर पुजारी म्हणाले, " माडीवर स्वारी नेण्याची आजपर्यंतची वहिवाट नाहीं." स्वामी मनांत म्हणाले, " घाटांवर देवस्थानांत वहिवाटच आपणाला विरोधक होती, येथें घरीं आलों तरीदेखील पुन्हां ती अडचण आलीच." पुजारी म्हणाले, " पूर्वी असें पाणी आलें होतें. तेव्हां चौरंगाखालीं हंड्यांची उतरण लावून त्यावर स्वारी आम्ही ठेविली होती." स्वामीजी म्हणाले, " स्वारी तेवढी तशी ठेवाल, पण तिची पूजाअर्चा कशी करणार? पुजाऱ्याला किंवा सेवेकऱ्याला पाण्यांत राहणें शक्य नाहीं, व सोसणारदेखील नाहीं. जसें आपणांला तसें देवालासुद्धां तें सोसणार नाहीं असें मानावें. " पुजारी स्वामींचें मत ऐकण्याला नाखुष होते. मग नृसिंहमुनींनीं सर्वांकरितां दत्तप्रभूला पाणी उतरावें म्हणून वरकरणी विनंति केली. कोणत्याही संकटकालीं पुजारी नृसिंहसरस्वतींकरवींच प्रभूला गाऱ्हाणें

कळवीत असत. तसेंच यावेळीं त्यांनीं केलें. स्वामींनीं प्रार्थना करतांच सर्वांनीं "श्रीगुरुदेवदत्त" असा घोष केला व रात्र फार होऊं लागली म्हणून ते आपापल्या घरीं गेले.

दत्तप्रभूंनीं जें पाणी आणलें आहे तें नृसिंहसरस्वतींच्या इच्छेकरितां होय. ती त्यांची इच्छा पुरी केली पाहिजे; टेंबेमहाराजांचे जन्मोत्सवांत आपण त्यांचे सन्निध गेलें पाहिजे; उत्सव साजरा केला पाहिजे. या सर्व गोष्टी घडल्याच पाहिजेत' असा विचार प्रभूंनीं केला. श्रीपाद भटजी सज्जन होते. त्यांचे मुखीला प्रेरणा दिली. त्याप्रमाणें ते नृसिंहसरस्वतीस्वामींना म्हणाले कीं, "भाऊबंद वहिवाट पुढें मांडतात व आपण स्वारी माडीवर आणा म्हणतां. मला तोंहीहि म्हणणी मोडायला संकट वाटतें. आपण जसें आतां सांगाल तसें मी करीन. भाऊबंद यावेळीं येथें कोणीहि नाहींत." त्यावर महाराज म्हणाले, "देवसौख्य व जीवसौख्य याचा विचार करून तुम्हांला जसें वाटेल तसें आतां तुम्हीं करा, आमचें म्हणणें तुम्हीं ऐकलेंच आहे." श्रीपादभटजी म्हणाले, "आपल्याप्रमाणेंच माझेंदेखील मत होत आहे. देवांना सुखरूप स्थळींच ठेवणें चांगलें. प्राणान्त होण्याची वेळ आल्यावर लोकवहिवाट घेऊन काय कामाची ?" असें म्हणून त्यांनीं श्रावणी पौर्णिमेच्या रात्रीं बारा वाजतां वाजतगाजत पद्धतीप्रमाणें स्वारीला नेऊन माडीवर विराजमान केली

स्वारी माडीवर येतांच नृसिंहमुनींद्रांना आनंद झाला. त्यांनीं लगेंच श्रीपादकन्येकरवीं श्रीकृष्णाबाईची ओटी भरविली. आपण पूजा-आरती केली. खण, नारळ, रुपया, हळद, कुंकू इत्यादि सौभाग्यालंकार, प्रवाह घरांतच आला होता, त्यांत सोडले व प्रार्थना केली कीं, "मातोश्रींनीं आतां पात्रांत जावें." अशी प्रार्थना होण्याची खोटी; सकाळीं पाणी घरावाहेर गेलें. पाऊस बंद झाला. रात्रीं बारा वाजतां पुरुषापेक्षां जास्त असलेलें पाणी सकाळीं सडकेवर नुसतें पाऊलभरच राहिलें. इतकें वेगानें तें उतरूं लागलें. प्रतिपदेपासून माडीवर वासुदेवानंदसरस्वतींचा जन्मोत्सव सुरू झाला. अभिषेक, महापूजा, कथा, पुराण वगैरे रोज होऊं लागलें. पंचमीला जन्मकाळ झाला, सर्व उत्सव पुरा झाला. नारायणस्वामींचे उत्सवांत कीर्तनापुरतेच देव

रहात, पण वासुदेवानंदांचे उत्सवांत अहोरात्र उत्सव पुरा होईपर्यंत राहिले. सर्व कार्यक्रम आपल्यापुढें त्यांनीं करवून घेतले. नारायणस्वामीपेक्षांवेगळे वासुदेवानंदांवर आपलें प्रेम त्यांनीं अधिक व्यक्त केलें. नृसिंहसरस्वतींची इच्छा 'उत्सवांत प्रभू आले पाहिजेत' अशी जी होती ती याप्रमाणें प्रभूंनीं पूर्ण केली, व गोकुळाष्टमीला दत्तराज गांवांतून परत निज देवस्थानीं आले. श्रीनृसिंहसरस्वतींची सत्यसंकल्पता या चरित्रांत सर्वांना समजून आली. जसा त्यांनीं संकल्प केला तसा तो सत्य झाला. गुरुभक्त ते होते म्हणून त्यांना गुरूत्सवांत दत्त भगवान् आल्यानें कृतकृत्यता वाटली. त्यांचा एक सेवक त्यावेळीं त्यांचे सन्निध होता. तो त्यांना म्हणाला कीं, "महाराज, आपली इच्छा देव उत्सवांत यावेत अशी होती, म्हणून हा असा प्रलयप्रसंग आला व अखेर दत्तराज उत्सवांत गुरुमहाराजांसन्निध येऊन बसले." त्यावर नृसिंह म्हणाले कीं, "तूं म्हणतोस तेंच सत्य होय. पण ही गोष्ट कोणाजवळ सांगूं नको." सामर्थ्य गुप्त ठेवण्याची ही स्वामीमहाराजांची हातोटी होय. अस्तु.

श्रीनृसिंहसरस्वती स्वतःच दत्तस्वरूप बनले होते. याबद्दलची गोष्ट अशी आहे कीं, कोणी एक बरवे नांवाचा ब्रम्हचारी, शास्त्राध्ययन केलेला होता. वाडींत तो आला, तेव्हां दीक्षित महाराज हे वासुदेवानंदांचे शिष्य ब्रम्हज्ञानी आहेत, असें त्याला कळलें. आपण त्यांचे मुखानें एखादें उपनिषद ऐकावें अशी इच्छा त्याला झाली. त्यानें स्वामीमहाराजांना विचारलें कीं, "मला भाष्य श्रवण करवाल काय?" महाराज 'होय' म्हणाले. नंतर रोज राकाळीं सोवळ्यानें ते त्याला भाष्यार्थ सांगूं लागले. स्वानुभवी पुरुषापुढें कसें बोलावें? त्यांना कसे प्रश्न विचारावे याचें ज्ञान त्या शास्त्री ब्रम्हचाऱ्याला नव्हतें. अयोग्य प्रश्न करण्याचा त्याला संचय होती. ती नृसिंह महाराजांना आवडली नाहीं. एक दोन वेळां त्यांनीं ती संचय सोड म्हणून त्याला सामोपचारानें सांगितलें. तथापि तो अनधिकारी ब्रम्हचारी तसेंच वर्तन करूं लागला; कुतर्क सोडीना. तेव्हां अखेर स्वामीजींनीं त्याला सांगितलें कीं, "तूं अतःपर आमच्या पुढें येऊं नको; दुसरीकडे जा व अध्ययन कर." असें सांगतांच तो घाबरला व महाराजांकडे गेल्यास ते रागें भरतील म्हणून

त्यांच्याकडे जाणें त्यानें सोडलें. पण श्रीदत्ताचे मंदिरांत बसून तो तेंच चालू असलेलें उपनिषद्भाष्य म्हणजे नृसिंहमुखांतून ऐकलें होतें तेवढें पुन्हा पहावें म्हणून दत्ताजवळ वाचीत बसूं लागला. दोन दिवस तेथें बसतांच तिसरे दिवशीं स्वप्नांत त्याला असा प्रकार दिसला कीं, 'आपण देवापुढें गेलों. दत्तपादुकावर नरसिंहसरस्वती बसलेले आहेत, व म्हणत आहेत कीं, " तुला आमच्यापुढें पुन्हां येऊं नको असें सांगितलें असून तूं कां येतोस ? व येथें भाष्य कां वाचतोस ? " इतका प्रकार पाहून तो ब्रम्हचारी जागा झाला. त्याची खात्री झाली कीं नृसिंहसरस्वती स्वामी हे दत्तच आहेत. मी त्यांना मनुष्य समजलों व वांकडे प्रश्न केले; आपण चुकलों. असें म्हणून पश्चात्ताप करीत तो राहिला. श्री दीक्षित स्वामींची दत्तस्वरूपता या गोष्टीवरून सर्वांना कळून आली.

नृसिंहसरस्वतींची वाचासिद्धी पुढील कथानकांत सर्वांचे नजरेस पडेल. ती कथा अशीः-कोणी एक वैजनाथ नांवाचा त्यांचा सेवक होता. बस्तवाडचा तो कुलकर्णी ब्राह्मण. गरिबीमुळें घर सोडून त्याचे आईबाप वाडीत येऊन राहिले होते. वैजनाथ सत्रा अठरा वर्षांचा होता. तो नृसिंहसरस्वतींच्या मठांत त्यांची सेवा करून राही. मुलगा सुशील होता. कांहीं दिवसांनीं तो एकाएकीं वांतीच्या विकारानें इतका आजारी पडला कीं, घटकेंत मरतो कीं अर्ध्या घटकेंत मरतो अशी प्राणांतिक अवस्था त्याची झाली. वामनराव बडु नांवाचे पुजाऱ्याचे घरीं त्याचें बिऱ्हाड होतें. त्याचे आईबाप फार दुःखी झाले. कांहीं दिवस वैद्यांचीं वगैरे औषधें त्यांनीं वैजूला दिलीं तरी अखेर वर सांगितल्याप्रमाणें अंतकाळ त्याच्यावर येऊन ठेपलाच. मध्यरात्रीची वेळ. वैजनाथ वान्तीच्या विकारानें गुराप्रमाणें ओरडून ओरडून बेहोष झाला. त्याचे डोळे पांढरे झाले, प्राण घोटाळले व आवाज देखील बंद झाला. बहुतेक मेलाच तो असा निचेष्ट पडला. त्यावेळीं त्याची आई पुत्रदुःखानें विव्हळ होऊन मध्यरात्रीं ब्रम्हानंदाचे मठांत आली व नृसिंहसरस्वतींना तिनें रडून व ओरडून जागे केले. त्यांनीं दार उघडलें. 'कां दुःख करतां ?' असा प्रश्न करतां माता म्हणाली, " महाराज, माझा मुलगा मला सोडून निघाला. आपण दया करा व मला तेवढा दान द्या. " महाराजांना त्याचें दुखणें माहीत होतेंच.

त्याची भयप्रद अवस्था ऐकून त्यांना त्या वेळीं कळवळा आला व ते म्हणाले कीं, "बाई, रडूं नका; महाराजांचे कृपेनें वैजनाथ वांचेल बरें! मरणार नाहीं." असें म्हणून तिच्या हातावर त्यांनीं अंगारा घातला व सांगितलें कीं, " हा अंगारा त्याला लावा व सकाळीं कुशल आम्हाला कळवा. " अंगारा घेऊन माता गेली. तिनें वैजनाथाचे भाळाला तो लायला व थोडा त्याचे मुखांत घातला. तों चमत्कार असा झाला कीं वैजनाथाचें मरण टळलें. त्याला खाड्-दिशीं झोप लागली. आई काळजी करीत जवळ बसलीच होती. इतक्यांत तो झोंपेंतून जागा झाला व हुशारीनें बोलूं लागला. दुःख त्याला होईनासें झालें. प्राण घोटाळणें बंद पडलें. वांती बंद झाली व तो ' मला आई भूक लागली.' असें म्हणाला. आईनें हलकें अन्न त्याला खायला दिलें व त्यानें तें खाल्लें. नंतर पुन्हां निजला व सकाळीं निरोगी होऊन जागा झाला. मला आतां कांहीं त्रास राहिला नाहीं असें त्यानें आईबापांना सांगितलें. आई महाराजांना कुशल कळवावें म्हणून घरांतून निघाली ती मठांत येण्यापूर्वी कोणी एकानें स्वामींना म्हटलें कीं, ' महाराज, वैजनाथ मेला ' त्यावर महाराज म्हणाले, " असें होणार नाहीं. आपण गुरुमहाराजांचा अंगारा दिला होता; तो फुकट जाणारच नाहीं." असें असून वैजनाथ मेला कसा ? काळजी करीत ते तसेच बसले. इतक्यांत वैजनाथाची आई मठांत येऊन पोंचली; ती हांसतच आली. तिला पाहून महाराज म्हणाले, " कसें काय आहे ?" ती म्हणाली, " महाराजांचे वचनाप्रमाणें वैजनाथ माझा बरा झाला; मेला नाहीं. " महाराज म्हणाले, " तर मग आम्ही आयकिलें हें काय ?" त्यावर ती म्हणाली " तुम्ही ऐकलेंत तेंही सत्यच होय. माझ्या वैजनाथाऐवजी यमरायानें तो म्हातारा वैजनाथ परवां स्वामी झालेला तोच नेला. माझ्या वैजूला आपण वांचविलात." असें म्हणून ती बाई कृतज्ञतेनें महाराजांचे पाया पडली. नृसिंहसरस्वतींना समाधान वाटलें. गुरुमहाराजांचा अंगारा गुणदायक झाला असें ते म्हणाले. पण त्यांच्या वाणींत मृत्यु हरण करण्याचा गुण महाराजांचे कृपेनें प्राप्त झाला होता असें आपण समजूं. थोर महात्मे परोक्षप्रियच असतात. आपणाकडे महत्त्व ते घेऊं इच्छित नाहींत. या चरित्रांत नृसिंहवचनाची सत्यता-सफलता सर्वांना समजून आली.

नृसिंहसरस्वतींच्या कारुण्य दृष्टीमध्यें भाविकाचा मृत्यु परतविण्याचें सामर्थ्य होतें. ही गोष्ट या पुढील कथेवरून समजेल. ती कथा अशी:—नरसिंह-सरस्वतींची सेवा करणारा शंकर नांवाचा एक सेवेकरी ब्रह्मानंदाचे मठांतच गुरुसन्निध रहात असे. त्याला एकदां भयंकर हिमज्वर येऊं लागला. तो कोण-त्याही औषधानें हटेना. उत्तरोत्तर वाढतच गेला. त्याच्या वेदना इतक्या होऊं लागल्या कीं ज्वर आला म्हणजे सर्व शरीरगत नाडया व अस्थी मोडून तोडून कोणी टाकीत आहे, असा दुःखवेग दुःसह होऊं लागे. तो शंकराला सहन होईना. प्राण जातो असें त्याला वाटे. एके दिवशीं तो ज्वरानें व्यथित होऊं लागतांच नृसिंहसरस्वतींच्या द्वारांत जाऊन लोळत पडला. "मला या दुःखांतून आतां हे गुरुमाउली, आपणच काढलात तर मी वांचेन; मला कांहीं यातना सहन होत नाहींत. " असें तो त्यांना म्हणाला. स्वामीमहाराज त्याचें दुःख रोज पहात होतेच. त्यांना त्याची दया आली. त्यांनीं आपली कृपादृष्टि उघडली व त्याला म्हणाले, " हा अंगारा घे व लाव कपाळीं. दिगंबराचें भजन कर. म्हणजे तूं बरा होशील. " शंकर म्हणाला , " या असल्या वेद-नांत मजकडून भजनाचें एक नांवसुद्धां उच्चारणें होत नाहीं. " महाराज म्हणाले, " अंथरुणावर जा म्हणजे बरें वाटेल. " तो अंथरुणावर गेला व अंग आडवें टाकून दुःखानें इवळूं लागला. पण चमत्कार असा झाला कीं, गुरुकृपा-दृष्टीच्या प्रभावानें त्याला क्षणमात्रांत एकदम झोंप लागली. अर्थात् दुःखें मावळलीं. स्वप्नस्थितीमध्यें गुरुआज्ञा त्याला भजन करवूं लागली. " दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा " हा मंत्र जागेपणीं त्याला म्हणतां येणार नाहीं इतक्या जलद रीतीनें रुद्रावर्तनाप्रमाणें त्याचे मुखांतून बळेंच निघूं लागला. स्वामींच्या प्रभावानें हें भजन घडलें. इतक्यांत दुसरा प्रकार झाला. वडाच्या झाडाइतका उंच व सत्यवानाचे तसबिरींत दिसतो तसा हातांत मोठा दंड धरलेला काळपुरुष यम शंकराचे पुढें येऊन उभा राहिला व मोठ्यानें हांक मारून व त्वरा दाखवून तो त्याला म्हणाला कीं, " नृसिंह-सरस्वती महाराज तुझी अतिशय काळजी करीत बसले आहेत. तूं निजलास काय ? ऊठ आधीं. त्यांना जाऊन सांग कीं हिमज्वर निघून गेला. गेला तुझा ज्वर; ऊठ. " असें जोरानें भाषण करून त्या काळपुरुषानें शंकराला जागृत केला.

त्याची निद्रा संपली. उठून पाहतो तों ज्वरसुद्धां उरला नव्हता. लगेच तो अंथरुणावरून उठून नृसिंहसरस्वतींच्या समीप गेला. नमन करून त्यांचे जवळ बसला. तेव्हां ते त्याला हांसून म्हणाले कीं, " काय रे उठूनसा आलास? तुझा ज्वर गेला कीं काय ? " शंकर म्हणाला, " होय महाराज, चमत्कार असा झाला कीं, झोपेंत भजन घडलें व एक अति उंच काळपुरुष येऊन त्यानें मला जागा केला. मला तो म्हणाला, तुझा ज्वर आतां गेला. महाराज काळजी करीत बसले आहेत त्यांना लौकर जाऊन सांग जा; ऊठ, निजलास काय ? " महाराज म्हणाले, " तो कसा दिसला काळपुरुष तुला ? " शंकर म्हणाला, " मंद अंधारांत जसा एखादा मनुष्य दिसतो म्हणजे त्याचा चेहरा ओळखतां येत नाहीं तसा तो मला दिसला. उंच होता, जटा पसरलेल्या होत्या, हातांत गगनांत गेलेला एक मोठा दंड होता व तो वरीलप्रमाणें मला स्पष्ट बोलला.' हे ऐकून नृसिंह मुनींद्र हांसले. 'बरें झालें' म्हणाले. कृपेची मूर्तीच ते नृसिंह सद्गुरु होत. त्या दिवसापासून शंकराला पुन्हां हिमज्वर आलाच नाहीं; एकदम बंद झाला. या गोष्टींत नृसिंहसरस्वतींनीं दीनावर दयादृष्टि करतांच यमराज सुद्धां घाबरले व त्यांनीं त्या दीनाला आपल्या मृत्युपाशांतून सोडला. न सोडते तर त्यांना शिक्षा झाली असती, असें त्यांचे भाषेवरून व भयाकुळ स्थितीवरून दिसून आलें. कृपादृष्टीचें सामर्थ्य सर्वांना कळून आलें.

श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज आपल्या गुरुमहाराजांचा अंगारा देऊन व कृपादृष्टीनें पाहून अशा अनेक अद्भुत लीला करीत. मात्र जो कोणी त्यांचे दारांतच येऊन पडे, व 'निरुपाय झालों, आतां आपणच कृपा करा' असें म्हणे त्याला ते आपला म्हणत व फसल्याहि अनिवार्य दुःखांतून सोडवीत. हें त्यांचें ब्रीदच होतें. अनन्य शरणागत तारणें हें आपलें शील त्यांनीं पुष्कळांना जाणवून दिलें. पुष्कळांना त्यांनीं संकटमुक्त केलें, व इष्टलाभाला मिळविलें. त्यांतलीं थोडींशीं उदाहरणें मी येथें देतों. वाडींत असतांवेळचीं कांहीं उदाहरणें मी यावेळीं सांगत आहें. अमरापुरीं ते गेल्यानंतरचीं अनुक्रमानें त्या त्या वेळीं सांगण्यांत येतील.

म्हैसाळ गांवाच्या गांवांतील एका ब्राह्मणीचा मुलगा इंग्रजी शिकत होता. शाळा संपतां संपतां त्याची परीक्षा एक साल नापास झाली. परीक्षा पास

होतांच आपण दोन पैसे मिळविता होणार, ही त्याची उमेद खचतांच त्याला एकदम वेड लागलें. चिंध्या फाडूं लागला; दगड मारूं लागला. देहाची शुद्ध उडाली. त्याच्या आईनें डॉक्टरी इलाज केले पण यश आलें नाहीं. डॉक्टरांनीं सांगितलें कीं, " हा मुलगा बरा होत नाहीं. याला तुम्हीं दैवी उपाय करा. निराश झालेली ती म्हातारी त्या आपल्या वेडया मुलाला घेऊन वाडीला आली. ब्रह्मानंदाचे मठांत माडीवर श्रीनृसिंहसरस्वती दीक्षितस्वामी मोठे सिद्ध पुरुष आहेत, असें तिला एकानें सांगितलें. तिची श्रद्धा बसून ती स्वामींना शरण गेली. वेडा मुलगा तिनें त्यांचे चरणीं घातला. सर्व हकीगत त्यांना सांगितली व कृपा करून मला एवढा पुत्र दान द्या; मनुष्यांत याला आणा. अशी तिनें दीनवाणीनें महाराजांची प्रार्थना केली. ती म्हणाली, " माझें जीवित या मुलावर अवलंबून आहे. हा बरा झाला व नोकरीधंदा करूं लागला तर मला अन्न मिळेल; नाहीं तर भीक मागावी लागणार. या आपत्तींतून दयाळांनीं मला वर काढावी. " ही करुणवाणी ऐकून कोमल मनाच्या नृसिंहसरस्वतींना तिची दया आली. त्यांनीं तिला आपल्या गुरुमहाराजांचा अंगारा दिला. ' मुलाचे मुखांत थोडा घाला व कपाळीं लावा ' असें त्यांनीं तिला सांगितलें. व ' आठ दिवस तुम्ही दत्ताला प्रदक्षणा घाला म्हणजे आठवे दिवशीं तुमचा मुलगा बरा होईल, त्याचें वेड निघून जाईल " असें ते तिला म्हणाले. बाई आठ दिवस दत्ताची सेवा करी व नृसिंहसरस्वतींचें दर्शन व अंगारा रोज घेऊन मुलाला लावी. चमत्कार असा झाला कीं, आठवे दिवशींच बरोबर तो असाध्य वेडा मुलगा पूर्ववत् शहाणा झाला. त्याचें वेड सर्व निघून गेलें. नृसिंहसरस्वतींच्या वचनाचा गुण बाईला आला. तेव्हां ती कृतज्ञतेनें महाराजांचे पायांपुढें लोळली. ' मला अन्नाला लावलीत, आपण दीनदयाळू आहां ' असें म्हणाली. मुलानेंदेखील स्वामींचे चरणीं मस्तक ठेवलें. पुष्कळ स्तुति त्यानें त्यांची केली व आशीर्वाद नारळ प्रसाद त्यांचा घेऊन तो आईबरोबर आपल्या गांवीं गेला. डॉक्टरांनीं त्याला शहाणा झालेला पाहून आश्चर्य केलें. देव प्रसन्न झाला म्हणून याचें वेड गेलें असें ते म्हणाले. पुढें तो मुलगा पगारदार मोठा नोकर झाला. अशी नृसिंहसरस्वतीं-

नीं त्याचेवर दया केली. नृसिंहसरस्वतींच्या अंगचें सामर्थ्य या गोष्टीवरून समजून आलें. स्वामींनीं अशा अनेक गोष्टी केल्या.

महाराजांनीं वंध्येला पुत्रदान दिल्याची गोष्ट मी आतां सांगत आहें. बळवंतराव नंदनवाडकर नांवाचे दत्तसेवेकरी महाराजांचे भक्त होते. पुष्कळ वर्षें त्यांना संतती होईना. संतती होण्याचें वय निघून चाललें. अजून आपणाला एखादा पुत्र होत नाहीं, पुढें वंश खंडतो कीं काय; अशी चिंता बळवंतपत्नी राधाबाईंना लागली. पुरुषांपेक्षां स्त्रियांनाच मुलांची हौस फार असते. तिनें लोकांच्या सांगण्यावरून दत्ताला प्रदक्षणा घातल्या. गुरुचरित्र सप्ते पतीकडून करविले. व्रतें, दानें, उपोषणें वगैरे केलीं. पण गुण नाहीं. शेवटीं नृसिंहसरस्वतींना ती शरण गेली. " आपण मला आपली कन्या समजा; माझ्यावर कृपा करा व पुत्रवती मला बनवा " असें ती त्यांना म्हणाली, " शरण आलेल्याला संकटमुक्त करीत जा. " अशी वासुदेवानंद महाराजांची आज्ञा नृसिंहसरस्वतींना होती. तदनुसार वागणूक त्यांनीं ठेवली होती. राधाबाईला ते म्हणाले, " राधाबाई, तुम्ही दत्तप्रभूंना लक्ष प्रदक्षणा घाला; म्हणजे तुम्हांला मुलगा व मुलगी होईल. " राधाबाई म्हणाल्या, " मी प्रदक्षणा एकदां घातल्या आहेत; त्यांचा गुण मला आला नाहीं. दुसरें कांहीं सांगा. " त्यावर महाराज म्हणाले, " आम्ही सांगतों म्हणून पुन्हां प्रदक्षणाच घाला. तुमची इच्छा पूर्ण होईल." राधाबाईनीं प्रदक्षणेचा विधि वगैरे व्यवस्थित कसा करावा तो विचारला. तेव्हां भक्तिपूर्वक तुम्ही अशा अशा तऱ्हेनें प्रदक्षणा घाला, म्हणून तिला त्यांनीं सांगितलें. लक्ष प्रदक्षणा राधाबाईनीं घातल्यावर एके दिवशीं नृसिंहसरस्वतींनीं तिला मुद्दाम बोलावून नारळ तिचे पदरांत घातला व " तुम्हांला हा नारळ प्रसाद आमच्या गुरुमहाराजांनीं द्यायला सांगितला आहे. तुम्हांला मुलगा होणार आहे " असें ते तिला आशीर्वादवचन बोलले. राधाबाई प्रसाद व आशीर्वाद मिळतांच आनंदित झाल्या. घरीं गेल्या. लगेच त्याच महिन्यांत त्यांना गर्भ राहिला. नऊ मास पूर्ण होतांच प्रसूत झाल्या. पहिली कन्या त्यांना झाली. तिला घेऊन त्या बुद्धि संपतांच मठांत आल्या. कन्या झाली; पुत्र झाला पाहिजे. असें त्या नृसिंहसरस्वतींना म्हणाल्या व पाया पडल्या. महाराज म्हणाले," कांहीं काळज

करूं नका. पुत्रदेखील होईल." नंतर त्यांना दोन मुलगे व नऊ मुली अशीं एकंदर अकरा मुलें झालीं. मुलगे गुरुभक्त झाले. बळवंतराव व राधाबाई नृसिंहसरस्वतींचे अनन्यदास होऊन राहिले. हेच प्रत्यक्ष दत्तभगवंत होत, अशी त्यांची स्वामीजींबद्दल दृढ बुद्धि झाली. नृसिंहसरस्वतींनीं वंध्येला संतति दिली व आपलें सामर्थ्य भक्ताच्या प्रत्ययाला आणून दिलें असें या गोष्टीवरून समजलें.

अण्णासाहेब कुरुंदवाडकर यांना सुद्धां पुष्कळ वर्षें संतति नव्हती. श्रीमंतांना, 'मुलगा नसेल तर हें संस्थान रहावें कसें ?' अशी विवंचना उत्पन्न झाली होती. त्यांनीं आपल्या राणीला वाडीला नृसिंहसरस्वतींना शरण धाडली. ती येऊन पदर पसरून महाराज नृसिंहसरस्वतींना आपली पुत्रेच्छा कारभाऱ्याचे मुखानें कळविती झाली व तिनें श्रीचरणीं नमस्कार केला. याचकाला परत न फिरविणें, त्याची कामना पूर्ण करणें, हा नृसिंहसरस्वतींचा बाणा पूर्वाश्रमापासूनच होता. आतां तर गुरुकृपेनें ते पूर्ण समर्थच झालेले होते. यावेळीं तर ते आपला बाणा मुळींच सोडणारे नव्हते. अण्णासाहेबांचे पत्नीनें पुत्राची मागणी करतांच त्यांनीं आपल्या गुरुमहाराजांचे पादुकावरचें तुळशीपत्र वर ठेवून एक नारळ राणीसाहेबांचे ओंचांत घातला. व "श्रीगुरुदेव दत्त इच्छा पूर्ण करतील" असा आशीर्वाद त्यांनीं त्यांना दिला. प्रसाद घेऊन राणीसाहेब घरीं गेल्या. नृसिंहसरस्वतींच्या कृपेनें त्यांना त्याच सालीं मुलगा झाला. श्रीमंतांना जास्त मुलें होणें चांगलें नाहीं म्हणूनच कीं काय एकच मुलगा श्रीगुरुनृसिंहसरस्वतींच्या प्रसादानें त्यांना झाला. तोच हल्लीं संस्थानचा मालक आहे. त्यांचें नांव बाळासाहेब पटवर्धन. वंध्येला संतती देऊन आपलें अलौकिक सामर्थ्य या गोष्टींतसुद्धां नृसिंहमुनिवर्यांनीं भक्ताला दाखविलें आहे. महाराजांचे उपकार स्मरून पुढें अमरापुर येथें वासुदेवानंद दत्तामरेश्वराचे स्थापनेच्या वेळीं अण्णासाहेबांनीं नृसिंहसरस्वतींना सर्व प्रकारें सहाय्य करून त्यांची सेवा केली. असतु.

नृसिंहसरस्वतींनीं कृपाळुपणानें एका गरीब ब्राम्हणाची त्याच्या इच्छेप्रमाणें अन्नवस्त्राची व्यवस्था केल्याबद्दलची गोष्ट अशी कीं:—नागपुर प्रांता-

कडला जोशी उपनांवाचा एक सज्जन गरीब ब्राम्हण वाडींत आला. ब्रह्मानंदाच्या मठांत तळमजल्यामध्यें तो बसूं लागला. जाग्यावर बसल्या ठिकाणीं अन्न मिळालें तर खायचें; नाहीं तर उपास करायचे अशा निर्धारानें तो मठांत पहिल्या मजल्यांत बसून राहिला. नृसिंहसरस्वती माडीवरून खाली उतरतांना तो ब्राह्मण त्यांचे नजरेस पडे. जातां येतां ते त्याला पहात. दोन तीन दिवस ब्राह्मण सारखा बसूनच आहे. खातो पितो तरी काय ? माधुकरी आणून खाल्लेल्याचें तर चिन्ह कांहींच दिसत नाहीं. उपाशी आहे कीं काय ? अशी दयावृत्ति नृसिंहसरस्वतींच्या मनांत झाली. त्यांनीं एके दिवशीं त्याला आपण होऊन विचारलें कीं, " काय हो, तुम्ही असें बसून राहिलेलेच सदा दिसतां; तर जेवतां किंवा नाहीं?" ब्राह्मण म्हणाला, " तीन दिवस मी उपाशींच बसलों आहे." स्वामीमहाराज म्हणाले, " माधुकरी कां आणीत नाहीं! " ब्राह्मण म्हणाला, " मी अयाचित वृत्ति धरली आहे. जागेवर बसूनच ज्या दिवशीं अन्नाची सोय होईल त्याच दिवशीं जेवेन, असा मी संकल्प केला आहे. मला दत्तमहाराजांनीं माझें आयुष्य असेपर्यंत स्वस्थ बसूनच जेवायला घाढावें व वस्त्रें द्यावींत; अशी माझी त्यांच्यापाशीं मागणी आहे."

नृसिंहसरस्वती मनांत म्हणाले, " आम्हीं आपण होऊन या ब्राह्मणाला प्रश्न केला व त्याची कामना ऐकून घेतली. आतां ती पुरवणें प्राप्त झालें. विचार केलेंच नसतें तर आपणांकडे कांहीं येत नव्हतें. आतां मात्र आपलें विचारां विफल होऊं देतां कामा नये." असा विचार स्वामीमहाराजांनीं केला. थोरांना एकदां एकादी गोष्ट मनावर घेतली कीं ती यशस्वी करण्याबद्दल ते दक्ष रहात. त्यांना मग उदासीन रहावत नाहीं. गरीबाचा अंगीकार केल्यावर त्याला विपत्तींत ठेवणें त्यांच्या शीलाला आवडत नाहीं. नृसिंहमुनी याच शीलाचे होते. ब्राह्मणाची कामना पूर्ण करण्याचा संकल्प त्यांनीं केला व थोडीशी विनोदार्थ त्याची कसोटी ते पाहूं लागले. ते म्हणाले " जोशीबुवा ! तुम्ही असे किती दिवस बसून राहणार? जेव्हां कृष्णा नदीला पूर यतो तेव्हां जागीं गळ्याइतकें पाणी येतें, व तें आतां लवकरच येईल. तें आल्यावर तरी तुम्ही ही जागा सोडून उठालच कीं नाहीं !" जोशी म्हणाला, " पाणी येउ त्यांत मी बुडून मेलों तरी चालेल; पण हेतु पूर्ण झाला तरच ही जागा सोडी

तोंवर आसन बदलणार नाहीं." असें निश्चयाचें वाक्य ऐकतांच महात्मे नृसिंह-मुनीश्वर अंतःकरणांत कृपेनें द्रवले. त्यांचे मुखानें एकदम शब्द निघाले कीं, " जोशीबुवा, तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें बसल्या ठिकाणीं तुमची अन्नवस्त्राची सोय दत्तमहाराज निश्चयानें लावतील." असें म्हणून ते माडीवर आपल्या मठिकेंत गेले. दुसऱ्या दिवसापासून त्यांनीं वेदमूर्ती बाळंभटजी बोरगांवकर यांचेकडून गुप्त रीतीनें जोशीबुवांना अन्नाचें ताट सुरू केलें. जोशीबुवा जेवूं लागले. पुढें पुढें ते माडीवर जाऊन नृसिंहसरस्वती महाराजांपाशीं मोरोपंती आर्या म्हणून त्यांना ऐकवूं लागले. महाराज त्या ऐकून संतुष्ट होत असत.

ब्राह्मणाला आपण अयाचित सुरू केलें आहे. हें अयाचित (अन्न) याला जन्मभर चालू राहिलें पाहिजे व हा ब्राह्मण जेथें राहील तेथें त्याला तें मिळालें पाहिजे, असा पूर्णहिताचा विचार ब्राह्मणाबद्दल नृसिंहमुनींद्रांनीं केला. सत्य-संकल्पता त्यांची सिद्धच असल्यामुळें, जोशीबुवांच्या प्रांतांतलाच एक ब्राह्मण सावकार दुधाचा व्यापारी वाडीला आला. साधुसत्पुरुषांना प्रापंचिक अडचणी निवेदन करून त्या दूर करून घेण्याकडे पुष्कळांचा ओढा असतो. तसा त्या व्यापाऱ्याचा होता. स्वामीमहाराजांचा आशीर्वाद घ्यावा व आपण गांवीं जावें म्हणून तो ब्रह्मानंदाचे माडीवर महाराज रहात होते त्यांचे खोलीपुढें गेला. त्यांना त्यानें नमस्कार केला. नारळ खारका वगैरे उपायन पुढें ठेवलें व प्रार्थना करून म्हणाला कीं, " स्वामीमहाराज ! मला एक विश्वासू नोकर पाहिजे आहे. त्याला काम कांहीं नाहीं. माझ्या जागीं त्यानें नुसतें बसावें व इतर नोकरांवर नुसती नजर ठेवावी, इतकेंच करणारा तो असावा. मी त्याला जन्मभर माझ्या इतमामाप्रमाणें वागवीन. अन्न, वस्त्र व आणखी वरती रुपये योग्य ते देखील मी त्याला देईन. मी दुधाचा व्यापारी आहें. विश्वासू माणूस हुडकून देखील मला अजून मिळाला नाहीं. तो मिळेल असा आशीर्वाद आपण मला द्या. "

सावकाराचें मागणें ऐकून नृसिंहसरस्वतींनीं जोशीबुवांना हांक मारविली. जोशी आले. वंदन करून ' काय कार्य आहे ?' म्हणून विचारतांच महाराज यांना म्हणाले कीं, " हे पहा श्रीमंत गृहस्थ आहेत. ते बसल्या ठिकाणीं

तुमची अन्नवस्त्राची व द्रव्याची सुद्धां आजीवित व्यवस्था ठेवायला तयार आहेत. विश्वासुक वृत्तीनें एका जागीं बसून यांचे नोकरांवर फक्त नजर ठेवायची. हिशोब वगैरे ते करतील ते लक्षपूर्वक पहायचे. इतकेंच कर्तव्य तुमच्याकडे ते सोपविणार आहेत. थोडक्यांत सांगायचें म्हणजे हे आपल्या गादीवर तुम्हांलाच बसविणार आहेत. तुम्हांला ही सोय पसंत आहे काय ?" महाराजांचें भाषण जोशीबुवांनीं ऐकलें. त्यावर ते म्हणाले, " आपण सांगत असाल तर मला सर्व पसंत आहे. " महाराज सावकाराला म्हणाले, " हे जोशीबुवा आमच्या विश्वासांतले सज्जन मनुष्य आहेत. तुम्हांला पाहिजेत तर यांनाच न्या म्हणजे झालें. "

व्यापारी सावकाराला अतिशय आनंद झाला. तो म्हणाला, "स्वामिन्,आपण मला साक्षात्फळच दिलेंत. मजवर आपली कृपा पूर्ण झाली. मी या जोशीबोवांना घेऊन जातों." महाराज म्हणाले, " आमचे मनुष्य हे आहेत. यांना जपत जा व सुखांत ठेवा. " सावकाराबरोबर जोशीबुवा महाराजांचा प्रसाद घेऊन गेले. त्यांचे इच्छेप्रमाणें बसल्या ठिकाणीं अन्नवस्त्राची सोय त्यांची काय-मची लागली. नृसिंहसरस्वतींची दया अशी आहे.

श्रीनृसिंहसरस्वतींनीं अशीच दया करून एका ब्राह्मणीची मुलगी मृत्यु-मुखीं पडत असलेली वांचविली; तिला मरूं दिली नाहीं. ती कथा अशीः- अंबाबाई गोंवेकरीण नांवाच्या विधवा बाई आपली सात एक वर्षांच्या वयाची मुलगी घेऊन वाडींत रहात असत. देवाची सेवा त्या करीत. गरीब असल्या-मुळें कोणी बोलावल्यास स्वयंपाकाला जात, नाहीं तर माधुकरी मागून मुलीचें व आपलें पोट त्या भरीत. नृसिंहसरस्वतींचें दर्शन नियमानें व प्रेमानें त्या रोज घेत असत. स्वामीमहाराजांचा प्रभाव त्यांना माहित होता. हे दत्तमूर्ति स्वामी मोठे समर्थ आहेत, दयाळु आहेत असें त्या जाणत होत्या. त्यांच्यावर त्यांची श्रद्धा व भक्ति पूर्ण होती. अंबाबाईची कन्या एकदां विषमानें आजारी पडली. औषधोपचार पुष्कळ केले,वैद्यांनीं ही पोर वांचत नाहीं, म्हणून सोडून दिली. तेव्हां अंबाबाई फार घाबरल्या. त्यांना पोर मेलीच असें वाटून रडूं आलें. प्रेतकळा त्या पोरीचे अंगावर आलेली त्यांच्यानें पहावेना. मुलगी

कांहीं खात नाहीं, पीत नाहीं, बोलत नाहीं, हालत नाहीं, चालत नाहीं, अशी झाली. विषमज्वराच्या वेदना दुःसह होऊन ती पोर अगदीं मृतवत् होऊन पडली तेव्हां अंबाबाईंना नृसिंहसरस्वतीच या पोरीला वांचविली तर वांचवितील; नाहींपेक्षां ही हातची गेलीच आहे, असें एकदम स्मरण झालें.

स्वामीमहाराजांचे चरणीं विश्वास ठेवून अंबाबाईंनीं ती अर्धमडें झालेली आपली कन्या खांद्यावर टाकली, व मठांत आणून तिला नृसिंहसरस्वतीपुढें ठेविली. 'ही माझी कन्या मृत्युमुखीं गेली आहे. आपण कृपा करून मला ही द्याल काय ? माझें एकुलतें एक पोर मजपाशीं राहूं द्या. मजवर दयादृष्टि करा.' असें म्हणून अंबाबाई दुःखाश्रू गाळीत महाराजांचे दारांत बसली. ती दुःखार्त झालेली बाई पाहून नृसिंहमुनीश्वरांनें हृदय द्रवलें. त्यांनीं भस्माची चिमटी त्या बाईच्या हातावर घातली. पोरीला ही विभूति लावा म्हणजे इचा विषमज्वर निघून जाईल असें अभिवचन त्यांनीं तिला दिलें. तीर्थाची पळी भरून मुलीचे वदनांत सोडली. निजकारुण्यदृष्टीनें तिला पाहिली व "हिला आतां घरीं न्या; भिऊं नका; ही मरणार नाहीं." असें ते अंबाबाईला म्हणाले. अंबाबाई मुलीला पुन्हां खांद्यावर घेऊन निघाल्या. त्या जातांना गुरुमहाराज त्यांना म्हणाले कीं, "एका लवंगेचा काढा जातांक्षणीं मुलीला द्या." बाई म्हणाल्या,"एक लवंग तरी माझेजवळ आहेच कोठें ? मी अगदीं कफल्लक झालें आहे." महाराज म्हणाले,' जातांना पेठेंतील दुकानदारापुढें हात पसरा व मला एक लवंग द्या म्हणा. म्हणजे तो तुम्हांला ती देईल बरें !! " अंबाबाईनीं बाजारांतून जातांना गुरूंनीं सांगितल्याप्रमाणें केलें. श्रीगुरुनाथांच्या प्रेरणेनें वाण्यानें त्यांना एक लवंग दिली. तिचा काढा त्यांनीं घरीं जाऊन केला. पोरीला कसाबसा थोडासा पाजला व अंथरुणावर तशीच तिला ठेवून दिली. लगेच त्या पोरीला श्रीगुरुनृसिंहमूर्तीच्या कृपेनें गाढ झोंप लागली व त्या वेळीं मोठा चमत्कार झाला तो असा.

श्रीनृसिंहसरस्वती त्या कन्येच्या स्वप्नांत तिला दिसूं लागले. आपल्या अंगावर भस्माच्या मुठी भरून ते फेंकीत आहेत व हातांतील कमंडलूनें न्हाऊं घालावें तसें भराभर तीर्थ आपल्या अंगावर स्वामी ओतीत आहेत,

फक्त मस्तकावर मात्र ते तीर्थ घालीत नाहींत." इतकें स्वामीचरित्र ती पुत्री पहात राहिली असतां तिच्या अंगांतून पाण्याचा प्रवाह वहात होता. तेणेंकरून तिचीं अंथरलेलीं व पांघरलेलीं वस्त्रें प्रत्यक्ष भिजलीं व तो जलप्रवाह जमिनीवर सुद्धां सुरू झाला. अंबाबाईनीं ती स्थिति पाहिली व त्या अतिशय घाबरल्या पोरीच्या अंगांतून मरणकाळचा शेवटचाच हा घाम निघूं लागला असें त्यांना वाटलें. पोर निचेष्ट झालेली व हा अपरिमित घर्मप्रवाह चाललेला पाहून त्यांना भय वाटणें, साहजिकच होतें. तिलाचसें काय, पण इतर माणसें पहायला आलीं होतीं त्यांना सुद्धां मृत्यूच पोरीला आला असें वाटलें. अंबाबाई तर धैर्य सुटून हंबरूं लागल्या. इतक्यांत ती मुलगी जागी झाली. तिचा विषमज्वर श्रीगुरूंनीं घालविला होता. त्यामुळें ती आनंदांत होती. आईला ती म्हणाली, " आई ग, तूं कां रडतेस? मला आतां वेदना होत नाहींत. मी बरी झाले. "

पोर हुशारपणानें बोलूं लागलेली पाहून अंबाबाईच्या जिवांत जीव आला. नाहीं तर पोरीच्या पूर्वी तोच अगोदर जातो कीं काय अशी स्थिति त्यांची झाली होती. मुलीला अंबाबाई म्हणाल्या, " बाळचे, तुला हा भयंकर घाम फुटलेला पाहून मला तुझें भय वाटलें होतें. म्हणून मी रडत होते. " बाळी म्हणाली. "आई ग, हा घाम नव्हे. आपण ज्यांचे दर्शनाला मठांत रोज जातों ते स्वामी एवढा वेळपर्यंत माझे जवळ बसून सारखे तीर्थ ते माझेवर ओतीत होते. गळ्याचे वर मात्र त्यांनीं तें ओतलें नाहीं. वरचेवर भस्म ते माझ्या अंगावर फेंकीत होते. त्यामुळें मला किती तरी सुख झालें ! ! त्यांनीं ओतलेल्या तीर्थाचे हे पाट चालले आहेत; हा घाम नव्हे." अंबाबाई म्हणाल्या, " बाळे, खरेंच तुझें तोंड तेवढेंच कोरडें राहिलें होतें. बाकी सर्वांगांतून लोट चालले होते. त्यावरून तुझ्या सांगण्याचा ताळा मला पटला. "

अंबाबाईच्या मुलीचा विषमज्वर त्याच दिवशीं जो बंद झाला, तो कायमचाच बंद झाला; पुन्हां आला नाहीं. मुलगी आनंदानें बोलूं लागली व निदुःख झाली असें पाहून लगेच तिला घेऊन अंबाबाई पुन्हां मठांत गेल्या. मुलीला नृसिंहसरस्वतीपुढें उभी केली व म्हणाल्या कीं, " ही आपण मला

कन्या दिलीत. ही आपली आहे असें समजून मी इचें पालन करीन. आपले अनंत उपकार मी आतां जन्म असेपर्यंत विसरणार नाहीं. प्रेताला जीव आणणारे नरसिंहसरस्वती भगवान् दत्तमहाराजच आपण आहांत. आपण मनुष्य नाहीं; देव आहांत अशी माझी पूर्ण खात्री झाली. " असें म्हणून अंबाबाई श्रींपुढें दंडप्राय पडल्या. तेव्हां महाराज म्हणाले कीं, "सद्गुरुनाथांनीं तुमची मुलगी वांचविली; त्यांचें स्मरण सतत करीत रहा."

असे अद्भुत शक्तीचे म्हणजे ईश्वरी प्रभावाचे चमत्कार नृसिंहसरस्वतींनीं आपल्या भक्तांना दाखविले. चमत्कारांचे मिषानें स्वधर्माचरण व गुरुभक्ति करून नराचा नारायण कसा मनुष्य बनतो. या गोष्टीचा बोधच त्यांनीं आपल्या उदाहरणावरून सर्वांना दिला म्हटलें तरी चालेल. भक्तांच्या मुखानें कीर्तीचा विस्तार होत चालला. नृसिंहसरस्वती असे अलौकिक पुरुष साक्षात् दत्त भगवंतच आहेत अशी भावना त्यांचेविषयीं सर्वत्र होऊन राहिली.

प्रकरण १० वें

मागील प्रकरणांत थोडींशीं उदाहरणें सांगितलीं, त्यांत श्रीनृसिंहसरस्वती-च्या अंगीं भगवद्गुणाविर्भाव झालेला दाखविला. सत्यसंकल्पत्व, वाक्साफल्य, हस्तानें दिलेल्या विभूतींत सर्वेष्टपूरकत्व, दत्तपादुकांवर वास्तव्य, अमृतमय कृपादृष्टित्व, दयाळुत्व इत्यादि सर्व गुण ईश्वराचेच आहेत. ते नृसिंहगुरुवर्यांचे अंगीं होते. यापेक्षां देखील अधिक म्हणजे अनंतच ते सद्गुण असल्यामुळें त्यांचें साकल्यानें वर्णन करीत बसूं म्हटलें तर सरस्वतीदेवीसुद्धां ते वर्णूं शकणार नाहीं; मग अल्पमति जीव ते कसे वर्णील ! प्रसंगाप्रसंगानें पूर्वी आम्हीं यथामति अल्पस्वल्प गुणवर्णन करूं. श्रीनृसिंहसरस्वतींनीं किंत्येक शरणागतांना आत्मबोध दिला व त्यांना शाश्वत सुखाचे भागिदार बनविले. ऐहिक व आमुष्मिक सुख देणारे श्रीनृसिंहयोगींद्र मोठे दयाळू होते. त्यांची दया मला वर्णवत नाहीं; ती अवर्णनीय आहे. ब्रह्म जसें बोटानें दाखवितां येत नाहीं, तशी श्रीगुरुदयादेखील दाखवितां येत नाहीं. आत्म्याप्रमाणेंच ती स्वसंवेद्य आहे. तथापि लोकांनीं सांगितलेल्या व स्वानुभूत उदाहरणांवरून तिचें आम्हीं थोडेसें परोक्ष रीतीनें वर्णन केलें. मागील सर्व उदाहरणांत मुख्य पाहूं गेल्यास दया हाच लोकोत्तर सद्गुण नृसिंहसरस्वतींचा आम्हांला दिसला. त्या दयेनें त्यांनीं परगांवच्या लोकांप्रमाणें वाडीक्षेत्रस्थांचेदेखील हेतु पुरविले. त्यांनादेखील संततिसंपत्तीचा लाभ करून दिला. म्हणून तर त्यांची त्यांचेवर निष्ठा बसली होती. शिवाय वासुदेवानंदांचें उपदेशवाक्य कीं, " आम्हांप्रमाणेंच नृसिंहसरस्वतींना माना " हें तर निष्ठा ठेवण्याचें प्रमुख कारण होतेंच. अस्तु.

गुरुद्वादशीच्या उत्सवाला वाडींत मोठें महत्त्व आहे. ब्राह्मणसंतर्पण फार मोठें होतें. त्याचा स्वयंपाक आदले दिवशीं रात्रीं सुरू होतो. त्यावेळीं नृसिंह-

सरस्वती हे सिद्धपुरुष म्हणून त्यांचे हस्तें आधीं थोडीशी हरभऱ्याची डाळ चरावरील आधणांत पुजारी लोक टाकवीत असत. वाजत गाजत जाऊन स्वामीमहाराज बनांतील आधणाच्या हंड्यांत डाळ ओतीत व दुसरे दिवशीं पुन्हां वाजत गाजत दुपारीं बनांत जाऊन तयार झालेल्या अन्नपूर्णेची स्वतः पूजा करीत. नंतर प्रसाद सर्वांना वाढला जाई. महाराजांकरितां दुरड्या भरून प्रसाद पुजारी मठांत आणून पोंचवीत; अशी वहिवाट चालूं होती. नृसिंहगुरुनींच्या पंगतीला पुजारी, रोवेकरी वगैरे मठांत असत. नृसिंहसरस्वती हे साक्षात् शंकरच भासत व वाडी म्हणजे भूकैलास वाटे. दंडकमंडलु धारण केलेले; भाळीं भस्म व अंगीं छाटी लंगोटी परिधान केलेले; कर्पूर-गौर स्वामीमहाराज सर्वांना पाहावेसे वाटत. त्यांच्या प्रसन्न मुखपंकजाकडे सदैव पहात बसावें, त्यांचें रसाळ हास्य मनांत भरून घ्यावें, असें भक्तांना वाटे. आपल्या कृपावीक्षणानें व अमृतमधुर वाणीनें भगवान् नृसिंहसरस्वती सकलांना अतोनात आनंद देत असत. आनंदाची मूर्तीच ते होते. मग सर्वांना त्यांच्या दर्शनानें, भाषणानें, सहवासानें, आनंद कां न व्हावा? सर्वांना श्रीदत्तच ते कां न दिसावेत? हे दत्तच आहेत; असा अनुभव भक्तगणाला त्यांचा येतच होता. "जनासि वाटे दत्तात्रय हा अवतारचि पूर्ण" तद्वत् "मनासि वाटे दत्तात्रय हा" असे उद्गार त्यांच्याबद्दल तत्कालीन लोक काढीत होते. जसे वासुदेवानंद सरस्वती हे दत्त; तसेच नृसिंहसरस्वतीदेखील दत्तच होत. गुरुशिष्यरूपानें हा अवतार समजा. वासुदेवानंद, सिताराम व नृसिंहसरस्वती असे हे त्रैमूर्ती दत्तच होत. लोकसंग्रहार्थ हे अवतारी पुरुष कर्म, भक्ति व ज्ञान या त्रिपथानें चालत. या तिघांत श्रीवासुदेवानंद हे परमेश्वर रामचंद्रांप्रमाणें व नरसिंह आणि सीताराम हे दोघे शिष्य अनुक्रमें भरत व लक्ष्मणाप्रमाणें त्यांचे एकनिष्ठ भक्त होते. गुरुस्वरूप झाले असून ते दोघे आमरणान्त गुरुभक्तीच करीत राहिले, व जगाला मार्गदर्शक झाले. कलियुगांत भक्ति व त्यांतले त्यांत गुरुभक्ति हेंच निःश्रेयसाचें मुख्य साधन आहे. हा बोध त्यांनीं आपल्या आचरणानें सर्वांना दिला. जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती त्या ह्या!

नरसिंहसरस्वतींनीं भरताप्रमाणें गुरुदेवाच्या पादुकाचे आपण कारभारी आहों अशी बुद्धि ठेविली होती. कोणतेंहि कार्य म्हणजे भक्तांचें इष्ट, ते पादुकांपुढील अंगारा देऊन पुरवीत व हें वासुदेवमहाराजांनीं तुमचें इष्टकार्य केलें असें ते सर्वांना सांगत. गुरुनाथांचें महत्त्वच वाढवीत; आपलें महत्व सांगत नसत व मानीत देखील नसत. " मी गुरुदास आहें; मी गुरुबालक आहें. " असें सेव्यसेवक नातें त्यांनें सद्गुरुदेवांशीं असे. स्वतः मोठेपणाचा गर्व त्यांना मुळींच नव्हता व तो नसणें हेंच मोठेपणाचें चिन्ह व भूषण देखील आहे. गुरुभक्ति हेंच त्यांना भूषण वाटे. भक्तीच्या बाबतींत ते साक्षात् श्री शंकरच होत. सिद्धांचे अधिपति असून शंकर जसे रामाची भक्ति करतात तसे हे वासुदेवाची भक्ति करीत होते. भक्ति ह्या गुणावरूनच त्यांना मी शंकर म्हणतों असें नाहीं, तर मला ते शंकर असल्याचा अनुभवच आला. तो असाः-

मी एकदां त्यांचे खोलींतली वस्तु त्यांचे पश्चात् चोरली होती. त्याच रात्रीं स्वप्नांत नंदिकेश्वर माझ्या अंगावर धावून आले. शिंगांनीं मला मारूं लागले. मी अतिशय भ्यालों. तेव्हां त्यांनीं तें बैलाचें रूप सोडून मनुष्यरूप घेतलें, व मला म्हणाले कीं, "शंकरा, तूं आमच्या मालकांचा अपराधी आहेस. गुरुचरित्राचा सप्ता कर, म्हणजे दोषमुक्त होशील." असें सांगून गुप्त झाले. मी दुसरे दिवसापासून गुरुचरित्राचा सप्ता सुरू केला. असो. तात्पर्य हेंच कीं नंदी ज्यांचा नोकर आहे ते नरसिंहसरस्वती साक्षात् महादेव श्रीशंकरच आहेत, अशी माझी तेव्हांपासून खात्री झाली. म्हणून मी त्यांना वरती शंकर असें स्वानुभवानें म्हटलें.

ज्यांच्या ब्रह्मनिष्ठतेची म्हणजे ज्ञानाची तारीफ त्यांच्या वासुदेवानंदगुरुवर्यांनीं स्वतः केली, असें मागें आठव्या प्रकरणांत सांगितलें, ते ज्ञानिशिरोमणि श्रीमन्नृसिंहसरस्वती 'वासुदेवः सर्वं' असें समजणारे होते. 'उत्तमा सहजावस्था' तर त्यांची होतीच. असें असून 'मध्यमा ध्यानधारणा' ते करीत असलेले दिसत. 'प्रतिमा स्वल्पबुद्धीनाम्' या वचनाप्रमाणें स्वल्पबुद्धि प्राकृताप्रमाणें वासुदेव-प्रतिमा व पादुका देखील ते पूजीत होते. तेसुद्धां कांहीं काळ नसून देह ठेवीपर्यंत पूजीत होते. शिवाय 'तीर्थयात्राधमाधमा' म्हणून म्हटलेली जी

अगदीं निकृष्ट साधनावस्था, तीसुद्धां पुढें त्यांनीं धारण केली. कनिष्ठ कनिष्ठ साधनाचरण ते जे उत्तरोत्तर करीत राहिले, ते स्वतःकरितां होय, असें तर म्हणतांच येत नाहीं. कारण ते पूर्ण ज्ञानीच होते. अर्थात् त्यांचें सर्व वागणें

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वंति भारत॥
कुर्याद्विद्वांस्तथाऽसक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहं ॥१॥

या कोटींतलें होतें असेंच म्हणावें लागतें. पंतोजी अक्षरें गिरवून दाखवितो. तसे ते परमार्थाचीं साधनें स्वतः आचरून जगाला दाखवीत होते. ही गोष्ट सिद्ध झाली. "परोपकाराय सतां विभूतयः"

केवळ कृतज्ञतेनें गुरुभक्ति करीत ते राहिले.त्यांच्यावर त्यांच्या सद्गुरुनाथांचा प्रेमा सर्वांपेक्षां जास्त होता व ज्ञानाची पायरी देखील त्यांनीं सर्वांच्याही पुढची गांठली होती, ही गोष्ट पूर्वीच सांगितली आहे. त्यावरून त्यांची गुरु-भक्ति देखील इतर भक्तांपेक्षां वरिष्ठ दर्जाची होती, असेंच म्हणावें लागतें. त्यांचें आजपर्यंतचें चरित्र पाहिलें असतां सर्व संग व सर्व इच्छा सोडून केवळ एका आत्मज्ञानार्थच त्यांनीं निष्कामणानें गुरुभक्ति केली असेंच दिसून येतें. अशी निष्काम भक्ति इतरांनीं केलेली दिसत नाहीं. इतरत्र ती असूं द्या असली तर पण ते ज्या क्षेत्रांत रहात होते, त्या क्षेत्रांतील विप्रवर्गांत तरी ती नव्हती, ही गोष्ट निर्विवाद आहे. म्हणजे ते क्षेत्रस्थ विप्र अभक्त होते, असें आम्ही म्हणत नाहीं. भक्तच होते. पण नृसिंहसरस्वतींच्या सारखे सर्वैषणा सोडून गुरुभजनीं लागलेले निष्काम भक्त नव्हते, तर सकाम भक्त ते होते, एवढेंच आमचें म्हणणें आहे. व तें कोणालाहि नाकबूल करतां यावयाचें नाहीं. क्षेत्रस्थ ब्राह्मण व नृसिंहसरस्वतीस्वामी महाराज या दोघांच्या भक्तीचें न्यूनाधिक्य जें आम्ही येथें दाखवीत आहों, तें पुढील इति-हासाकरितां होय. यापुढें आतां क्षेत्रस्थ पुजारी व श्रीनृसिंहसरस्वती स्वामीमहाराज, या दोघांचा जो पुढें बेबनाव झाला, व ज्यामुळें स्वामीजींनीं अमरापुरीं जाऊन वास्तव्य केलें, त्याचीं कारणें आम्हांला सांगावयाचीं आहेत. तीं कारणें दाखविणें जरूर असल्यामुळें त्यांतलें प्रमुख कारण जें गुरु-

भक्तीचें न्यूनाधिक्य, म्हणजे दोघांच्या गुरुभक्तींतला कमीजास्तपणा, तो येथें आम्हीं दाखविला आहे. आमच्या दृष्टीनें विरोधाचें प्रधान कारण तोच होय. याप्रमाणें विरोधाचें पहिलें कारण गुरुभक्तीचें न्यूनाधिक्य या ठिकाणीं सांगितलें. दुसरीं कारणें आतां सांगतों.

श्रीवासुदेवानंदसरस्वती दत्त भगवान् धर्मस्थापक होते. ते समाधिस्थ होतांक्षणीं, श्रीकृष्ण निजधामीं जातांच द्वारकेंत जसा समुद्र शिरला, तसा भूतळीं, त्यांतले त्यांत आमच्यासमोर म्हणजे वाडी क्षेत्रांत कलिप्रवेश झाला. कलीचे गुण तेथें प्रगट झाले. म्हणजे कलिदोषांमुळें,

शमोदमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेवच ॥
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजं ॥१॥

या श्लोकांतील ब्राह्मणधर्म सुटून त्याच्या उलट,

दंभो दर्पोभिमानश्च क्रोधः पारुष्यमेवच ॥
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥१॥

या श्लोकांतले आसुरी स्वभाव प्रगट झाले.कलिप्रवृत्तीनें ब्रह्मसमाज कलिदोष-युक्त झाला. अर्थात् कली हा एक विरोधाचें कारणच झाला. असो. आणखी देखील कारणें झालीं, तीं आतां सांगतों.

श्रीनृसिंहसरस्वती हे उत्सवप्रसंगीं ग्रामस्थ पुजारी ब्राह्मणांना जसे अनुष्ठानें करावयाला सांगत, तसे ग्रामस्थ परिष्टांना आणि परगांवच्या विद्वान् ब्राह्मणांना देखील सांगत. हें स्वामींचें वागणें पुजाऱ्यांना पसंत नसे. ते म्हणत, 'सर्व कार्यक्रम आम्हा पूजकांकरवींच करून घ्या व दक्षणा सर्व आम्हांलाच द्या; परक्यांना ती जाते, तिला बंद करा.' पुजाऱ्यांनीं असें जरी म्हटलें तरी विद्वत्तेच्या दृष्टीनें सर्व कार्यक्रम त्यांचे हातून होणें शक्य नसल्यामुळें, नृसिंहसरस्वतींना तें कसें ऐकून घेतां यावें ? शिवाय हौसेनें देखील ते कुरुंदवाड, सांगली इत्यादि ग्रामांतले विद्वान् वैदिक बोलावीत. पण तें तसें करणें पुजाऱ्यांना आवडलें नाहीं. हें एक दोघांत विरोध पडण्याचें कारण झालें. दुसरीं कारणें सांगतों.

श्रीवासुदेवानंद सरस्वतींची पुण्यतिथि स्वामी श्रीनृसिंहसरस्वती आपलें भक्तिमार्गांतलें प्रधान कर्तव्य या दृष्टीनें करीत असत असें पूर्वी सांगितलेंच आहे. पट्टशिष्य या नात्यानें देखील असलेलें त्यांचें तें कर्तव्य ते पुजाऱ्यांकडून करवीत. पुण्यतिथीच्या उत्सवामध्यें तीर्थाची पूजा महत्त्वाची आहे. तीर्थ-पूजेला एक छाटी, एक नारळ, व दक्षणार्थ एक रुपया आणि कलशाखालीं घातले जाणारे चिपटेंभर तांदूळ लागत. हा एवढा विषय तीर्थपूजा झाल्या-वर वासुदेवानंदांचे क्षेत्रोपाध्ये कोडणीकर, यांना द्यावा, असें स्वामीमहा-राजांचें मत होतें. गुरुमहाराजांच्या उपाध्यांचा मान ठेवावा असा गुरुभक्ति-मूलक हा स्वामींचा विचार खरा; पण पुजाऱ्यांना तो रुचला नाहीं. ते प्रथम म्हणाले, "पुण्यतिथीच्या सोळा ब्राम्हणांत आम्हीच बसणार. पण शिष्य असें जे आपणांला म्हणवून घेत, त्यांना स्वगुरूच्या पुण्यतिथीला बसणें मग गैरशिस्त वाटलें. तेव्हां पुण्यतिथीच्या ब्राम्हणांत बसण्याचें त्यांनीं नाकारलें. पण तीर्थपूजेचा विषय मात्र आम्ही कोडणीकरांना देणार नाहीं असें ते म्हणूं लागले. 'पुण्यतिथिकर्ते शिष्य आम्ही आहों. म्हणून तो विषय आम्ही आपल्या उपाध्यायालाच देणार.' याप्रमाणें विचारांचें दुमत हें एक दोघांमध्यें विरोध पडण्याला कारण झालें.

गुरुभक्तिमूलक हेतु होता म्हणून जें आम्ही वर लिहिलें त्याचें स्पष्टी-करण असें आहे कीं, श्रीवासुदेवानंद गुरुमहाराजांची पुण्यतिथी श्रीदत्ताचे पूजकांनीं स्वतःच करावी. पुण्यतिथीचा क्षण घेणारे किंवा तिचा विधी चाल-विणारे त्यांनीं होऊं नये, तर पुण्यतिथि करणारे यजमानच त्यांनीं व्हावें. म्हणजे पुण्यतिथिमहोत्सव वाडी क्षेत्रांत कायमचा होत राहील, आणि तो तसा व्हावा असाच हेतु नृसिंहसरस्वतींचा होता. पण कांहीं पुजारीवर्गाचा हट्ट आम्ही क्षण घेणारे ब्राम्हण होणार असाच प्रथम दिसून आला. तेव्हां आपलें सांगणें हे ऐकणार नाहींत असें निश्चित जाणून नृसिंहसरस्वतींना मोठ्या युक्तीनें त्यांना पुण्यतिथीचे कर्ते बनवावे लागले. तो प्रकार असाः— बाळशास्त्री कोडणीकर हे टेंबे महाराजांचे पूर्वाश्रमींचे क्षेत्रोपाध्याय होत. त्यांना एकांतांत बोलावून दीक्षित महाराज म्हणाले, कीं " तुम्ही तीर्थपूजेचा विषय आपला आहे तो आपणाला मिळावा अशी आमच्याकडे मागणी करा"

बाळशास्त्र्यांनीं तसेंच केलें. त्यांचें तें म्हणणें दीक्षित महाराजांनीं पुजाऱ्यांपुढें मांडलें. पण तें त्यांना आवडलें नाहीं. ते म्हणाले, " तीर्थपूजेचा विषय आमच्या उपाध्यायालाच मिळाला पाहिजे. दुसऱ्याला आम्ही घेऊं देणार नाहीं व तुम्ही देखील तो कोडणीकरांना द्या म्हणून आम्हांला सांगूं नका." त्यावर दीक्षितमहाराज म्हणाले, " तुम्ही पुण्यतिथी करणारे नसल्यामुळें तुमच्या उपाध्यायाचा तरी त्या विषयाशीं कसा संबंध पोंचतो ? " असें विचारतांच पुजारी चिडले. त्यांना ईर्षा उत्पन्न झाली व ते आपसांत वाटाघाट करून नृसिंहसरस्वतींना म्हणाले कीं, " आम्हीच गुरुगहाराजांची पुण्यतिथी करणार व तीर्थपूजेचा विषयदेखील आपल्याच उपाध्यायाला देणार, तुमचें आम्ही ऐकत नाहीं. " असो. नृसिंहसरस्वतींची युक्ति सफळ झाली. पुजारी स्वतःच पुण्यतिथी करूं लागले. पण नृसिंहसरस्वतींना आपणांप्रमाणें व्यवहारज्ञान मुळींच नाहीं असें ते समजले. समजोत बिचारे ! विरोधाचें आणखी कारण असें :—

ब्रम्हानंद मठाचे माडीवर वासुदेवानंदांची मोठी तसबीर व श्रीदत्ताच्या दोन पितळी पादुका एका सिंहासनावर पुजाऱ्यांनीं मांडल्या होत्या. त्यांना दिगंबर अशी संज्ञा होती. वासुदेवानंदांचें तें स्थान मानलें जाई. मागें आठव्या प्रकरणांत आम्ही म्हटलें आहे कीं, " दत्तदिगंबरांच्या पितळी पादुका आणि नरसिंहसरस्वतींना व विद्यार्थ्यांना वासुदेवानंदांनीं दिलेल्या आपल्या काष्टपादुका, असे पादुकांचे तीन जोड एकत्र सिंहासनावर बसवून तळमजल्यांत पुण्यतिथीच्या उत्सवाला प्रारंभ होई."त्या तीन जोडांतल्या पितळी पादुकांनाच दिगंबर संज्ञा होती. त्यांच्याच जवळ वासुदेवानंदांची मोठी तसबीर एका सिंहासनावरच म्हणजे दिगंबराचे सिंहासनावरच मांडलेली होती. तसबीर व त्या पादुका मिळून " वासुदेवानंदसरस्वती दिगंबरदत्त " मानले जात. जन्मोत्सवादि प्रसंगीं या दिगंबराबरोबर त्यांच्याच सिंहासनावर नरसिंहसरस्वती व विद्यार्थी यांना मिळालेल्या काष्टमय वासुदेव पादुका एकत्र बसवून दर उत्सवांत पूजा होई. अभिषेकाकरितां एकाच परातींत त्या ठेवल्या जात. त्या तिन्ही जोडांत कांहीं वर्षें भेदभाव मानला जात नसे. पुजारी स्वतःच त्या एकत्र मांडीत व त्यांची हे सद्गुरुदत्तमहाराजच आहेत अशा भावानें

पूजाअर्चा करीत. पण पुढें वासुदेवानंदसरस्वती समाधिस्थ झाल्यावर कलिबल अधिक होऊन पुजाऱ्यांचे मनांत किंतु उत्पन्न झाला. दिगंबराच्या पादुकांजवळ एकाच सिंहासनावर वासुदेवानंदांच्या पादुका ठेवायच्या नाहींत, निराळ्या ठेवायच्या व नंतर पूजाअर्चा करावयाची, देवाचे पादुकांजवळ स्वामीच्या पादुका ठेवणें योग्य नाहीं असें ते आतां म्हणूं लागले. पूर्वी ज्यांना दत्त समजत असत, त्यांना तेच पुजारी दत्त नव्हेत असें मानूं लागले व त्यांच्या पादुका दिगंबराचे सिंहासनावर उत्सवांत ठेवूं नका असें ते नृसिंहसरस्वतींना बजावूं लागले. नृसिंहसरस्वतींची वासुदेवानंदांवर जी दत्त अशी निष्ठा होती ती कायमच होती. पण पुजाऱ्यांची ती राहिली नाहीं; बदलली. दोघांच्या भावामध्यें भिन्नता आली व कृतींतदेखील ती आणण्याचा प्रयत्न दक्षतेनें पुजारी करूं लागले. तेव्हां नृसिंहसरस्वतींच्या भावनाप्रधान अंत:करणावर केवढा अनिष्ट परिणाम झाला असेल याची कल्पना सुज्ञ लोकांना येईलच. वर सांगितलेला पुजाऱ्यांच्या भावनेंतला फरक व कृतींतला फरक हा दोघांच्या म्हणजे नृसिंहयोगींद्र व पुजारी यांच्या विरोधाला कारण झाला. आणखीदेखील कारण आहे तें सांगतों.

श्रीनृसिंहसरस्वती पुष्कळ वर्षें उत्सवसमारंभ करीतच होते व ते लहान-मोठ्या प्रमाणांत का असेनात, द्रव्य खर्चूनच करीत होते. उत्सवापुरतें द्रव्य त्यांना मिळत असे. जेवढी ते योजना करीत तेवढी ती पुरी होई. विद्यार्थी मुलें कांहीं खर्चाचा भाग आपण आपल्यावर घेत व अवांतर खर्च स्वामींपुढें येणाऱ्या द्रव्यानें पुरा केला जाई. पुजारी लोक जेवायला खायला येतच असत; अनुष्ठानें करीत; भजनपूजन आरतीला वगैरे हजर असत. सर्व कांहीं निरभिलाष वृत्तीनें ते आज पुष्कळ वर्षेपर्यन्त करीत असत. परंतु स्वामी-महाराजांचा महिमा जसा वाढूं लागला, त्यांना राजेरजवाडे जसे भजूं लागले; व त्यांच्या पुढें जशी लगबग वाढूं लागली, जशी ती बाळपणांतून प्रौढदशेला आली तशी ती पुजाऱ्यांचे मनांत आपला अभिलाष उपजवूं लागली. आजपर्यन्त तिच्याकडे जे पहात नव्हते, तेच पुजारी स्वामीजींना असें म्हणूं लागले कीं, "स्वामीमहाराज, तुमच्या पुढें आलेल्या संपत्तीचे मालक आम्ही पुजारी आहों. जसे देवापुढच्या संपत्तीचे मालक आम्ही आहों,

तरी. आमच्या स्वाधीन तुम्ही ती करा. आम्ही आपल्या इच्छेप्रमाणें तिचा योग्य व्यय करून पुण्यतिथीचा समारंभ साजरा करूं. तुम्ही अमूक असें करा वगैरे आम्हांला कांहीं सांगूं नका. स्वस्थ बसा. कीर्तन-पुराणाला आम्हीं तुम्हांला हांक मारूं तेव्हां येत चला. आम्ही सर्व कांहीं करूं." स्वामी-महाराज त्यांना म्हणाले, "आम्ही तेंच इच्छितों. तुम्हीच सर्व द्रव्य घ्या व उत्सव करा. पण आम्ही सांगतों तशा पद्धतीनें करा म्हणजे झालें." पुजारी म्हणाले," तुम्ही आम्हांला पद्धत सांगायला नको. आमच्या इच्छेप्रमाणें आम्ही वागूं. तुम्ही असें असें करा किंवा अमक्याला अमूक इतकें द्या वगैरे सांगितल्यानें आमची वृत्ति बुडते. करतां तुम्हीं कांहीं सांगूं नका. आमच्या मताप्रमाणें आम्ही द्रव्यविनियोग करूं." असें म्हणून ते पुजारी मठांत जमून नृसिंहसरस्वतींसंगें वाद माजवूं लागले. त्यांनीं कांहीं जरी सांगितलें तरी ते ऐकेनातसे झाले.

स्वामीमहाराजांचे मनांत वासुदेवानंदांचें मंदिर वाडींत बांधावयाचें होतें. लक्ष्मीबाई जाधव इनें सर्व खर्च पुरविण्याचें त्यांना अभिवचन दिलें होतें. रक्कमसुद्धां मुक्रर केली होती. पण पुजारी लोकांनीं तिला फितविली. व स्वामींच्या मतानें तूं द्रव्य खर्चूं नको, इत्यादि वाक्यांनीं तिचा बुद्धिभेद केला. अर्थात् मंदिराला अडथळा आला. उत्सवाला जसे पुजारी द्रव्यापायीं विरुध्द जाऊं लागले तसे ते द्रव्यापायीं गुरुमंदिर बांधण्याला सुद्धां विरुद्ध गेले. एकंदरींत द्रव्यलोभामुळें पुजाऱ्यांना स्वामीमहाराज तुच्छ वाटले. त्यांचा मान राखणें, किंवा त्यांची आज्ञा मानणें त्यांना आवडेनासें झालें. दोघांमध्यें मोठा विरोध उत्पन्न झाला. व त्या विरोधाला लोभोत्पादक लक्ष्मीच कारण झाली असें ठरलें.

अशीं कारणें सांगूं गेल्यास पुष्कळ होतील. त्यांतलीं कांहीं सांगितलीं. तसेंच आणखी एक सांगतों तें असें.—

स्वारीच्या शेजारतीचे वेळीं पूजा करतांना स्वामीमहाराज भक्तीनें दत्ताला पुष्कळ पुष्कळ चांगला चांगला नैवेद्य समर्पीत व तो प्रसाद परशुराम भटजी इत्यादि शिष्यांकरवी सर्व लोकांना द्यायला लावीत. प्रसाद घेणाऱ्यांत पुजारी,

परिष्ट, सेवेकरी वगैरे सर्वच लोक असत. सर्वांभूतीं समान प्रेम करणाऱ्या दयावंत स्वामीजींना प्रभूचा प्रसाद सर्वांना द्यावासा वाटला खरा. पण पुजाऱ्यांना तो कसा आवडावा ? केवळ स्वार्थैकपरायण ते होते. त्यांनीं स्वामींना सर्वांना प्रसाद द्यायला प्रतिबंध केला. देवाचे मालक आम्ही आहों, तुम्ही नुसती पूजा करून जा. अर्पण केलेल्या वस्तूचा विनियोग करणारे तुम्ही कोण ? देवावर एकदां घातल्यानंतर एक तुळशीच्या पानावरसुद्धां तुमची सत्ता नाहीं; ती आमची आहे. करितां नैवेद्य जो तुम्हीं प्रभूला दाखविता तो दाखवून झाला कीं फक्त पुजाऱ्यांचेच स्वाधीन करीत जा. दुसऱ्याचे हातांतसुद्धां देऊं नका. मग त्याला खायला देऊं नका हें काय सांगावें ? इत्यादि प्रकारें पुजारी स्वामींना सांगूं लागले व प्रसादार्थ मोठे तंटे माजवूं लागले. हा प्रकारसुद्धां विरोधाला करणच झाला. अशा तऱ्हेचीं कारणें किती सांगत बसूं ? तीं संपणार नाहींत.

सांगितलेल्या पांच सहा कारणांनीं स्वामीमहाराज व पुजारी हयां दोघांत विरोध उत्पन्न झाला. विरोधापूर्वी उत्सव करतांना जो एक प्रकारचा उल्हास व आनंद स्वामी श्रीनृसिंहसरस्वती यांना होत होता, तो विरोधानंतर कसा व्हावा ? अविरोधानें एकत्र जमून जें देवाचें भजन-पूजन इत्यादि करणें तो उत्सव होय. यांत आनंद होतो. त्याच्या उलट स्थिति झाल्यावर म्हणजे सर्व कार्यांत कलह, मत्सर, द्वेष वगैरे माजूं लागल्यावर उत्सवच कशाचा ? व आनंद तरी त्यांत कुठला ? सर्व जनतेसह-वर्तमान आपण आनंद लुटावा असा नृसिंहमुनींचा हेतु होता. पण प्रारब्धहीन जनता पडली ! ! म्हणून सत्यसंकल्प स्वामीमहाराजांच्या देखील इच्छेला अडथळा आला. पुढारी पुजारी जसे स्वामीमहाराजांशीं विरुद्ध झाले. तसे त्यांचे मतानुयायी सारेच पुजारी व त्यांचे स्त्रिया पुत्रसुद्धां विरुद्धच झाले. पुढाऱ्यांना विरोध कोणीच केला नाहीं.

सर्व गांव विरुद्ध झाल्यावर आनंदकारक उत्सव व्हावा कसा ? विद्यार्थी मुलें स्वामीमहाराजांना अनुकूल होतीं खरीं. पण ज्यांना भोजनादिकाला बोलवायचे ते कुठें अनुकूल व शुद्धांतःकरणाचे राहिले होते ? अर्थातच

उत्सवाचे बाबतींत महाराज उदास झाले. गुरुत्सव बंद करावयाचा नाहीं म्हणून ते, विद्यार्थ्यांनीं दरसालप्रमाणें तो सुरू केला म्हणजे कथापुराणाला येत असत. पण स्वतः ते त्यांना कोणतीच आज्ञा करीनासे झाले. पुजारी लोकच स्वच्छेनें पुण्यतिथीचा कार्यक्रम आपल्याकडे द्रव्य घेऊन करूं लागले. पुण्यतिथीचा उत्सव पुजाऱ्यांनीं आपणांकडे जसा घेतला तसा नृसिंहसरस्वती जयंतीचा पौषांतला उत्सवसुद्धां त्यांनीं आपणांकडे घेतला. तो प्रकार असा झाला:-

ग्वाल्हेरची लक्ष्मीबाई जाधव या उत्सवाकरितां रुपये महाराजांकडे पाठवूं लागली. ते रुपये श्रीपाद भटजी हवळे म्हणून एक सत्पुरुष पुजारी होते, त्यांचेकडे महाराज देत; व त्यांच्याच घरीं जयंतीचें प्रयोजन करवीत. पण श्रीपादभटजींच्या भाऊबंधांना तें खपेना. प्रापंचिक व्यवहारयोगी ते असल्यामुळें आत्मौपम्य दृष्टि त्यांची होती. श्रीपाद भटजीच एक हे पैसा लाटणार कोण ? आम्हांला ती लाट का नसावी ? असें त्यांना वाटलें. श्रीपाद भटजी किती निस्पृह आहेत. व केवढे सत्पुरुष आहेत, याची जाणीव त्यांना नव्हती; ती एका नृसिंहसरस्वतींनाच होती. असो. भाऊबंधांनीं तंटा करून श्रीपाद भटजींकडून पौष जन्मोत्सवाचे रुपये आपणांकडे घेतले. अशा तऱ्हेनें तोही उत्सव त्यांचेकडेच गेला. दोन्ही उत्सव पुजाऱ्यांनीं आपणांकडे घेतले खरे. पण त्यांत हेतु निराळा असल्यामुळें तो हेतु सफळ होत होता, तोंपर्यंतच त्यांना उत्सवापासून आनंद होत होता व उत्सवही होत होते. हेतु पूर्ण होईनासा पुढें पुढें जसा झाला; तसा तो आनंद व ते उत्सव अवस्थांतराला गेले. अस्तु.

नृसिंहसरस्वती व पुजारी यांच्यामध्यें विरोध आला. त्याचीं कारणें पुष्कळ असलीं तरी त्यांत मुख्यत्वेंकरून द्रव्यलोभच कारण झाला. नृसिंहसरस्वतींना गुरूचा लोभ, व पुजाऱ्यांना द्रव्याचा लोभ असे दोघांचे लोभ अगदीं भिन्न स्वभावाचे म्हणजे सात्त्विक व राजस स्वभावाचे असल्यामुळें तेजस्तिमिरवत् त्या दोघांचें ऐक्य जमेनासें झालें. समाधानाचें साधन जर असमाधान करूं लागलें तर तें साधन सोडणें चांगलें असें नृसिंहसरस्वतींना

वाटलें असावें व म्हणून त्यांनीं पुढें उत्सवांतून आपलें अंग काढून घेतलें. १८३८ शकांत नृसिंहसरस्वती उपोषण करूं लागले. पुजाऱ्यांतील एका साध्वी स्त्रियेला दृष्टान्त झाला कीं, " स्वामींना म्हणावें उपास धरा. " हा दृष्टान्त तिनें स्वामीमहाराजांना सांगितला. त्या दिवसापासून त्यांनीं गांवांत माधुकरीला जाणें बंद केलें. त्यांची पूर्वाश्रम भगिनी यमुनाताई उपहाराचें भक्ष्य जें कांहीं आणून देई तेंच ते भक्षण करून रहात. वासुदेवानंद समाधिस्थ झाल्यावर तिसऱ्या वर्षी त्यांनीं उपास धरले व उत्सवांतून हळूहळू आपलें अंग काढीत काढीत शके १८४२ मध्यें कन्यागत सालीं तर त्यांनीं उत्सवांत जाणें अजीबातच बंद केलें. तोंपर्यंत विद्यार्थ्यांच्या संतोषार्थ पुराण वगैरे ऐकायला जात असत; तेंसुद्धां नंतर बंद केलें.

कलिकालाचा प्रभाव केवढा तो पहा !! स्वामी पूर्वी दत्ताप्रमाणें पुजाऱ्यांना पूज्य गमत होते. पण पुढें ते त्यांचा मान ठेवीनासे झाले. वासुदेवगुरूंनीं म्हणजे टेंब्ये महाराजांनीं त्यांना " स्वामींच्या वचनाप्रमाणें वागा, विरुद्ध जाऊं नका " अशी आज्ञा केली होती. तीसुद्धां ते विसरले. द्रव्यच एक देव, व तोच पूज्य त्यांना वाटूं लागला. शंकराचार्यांना त्यांचे ग्रामस्थ जुमानीनात, तिरस्कार करूं लागले तेव्हां शंकराचार्यांनीं त्यांना चांडाळ व्हा असा शाप दिला. त्याप्रमाणें नृसिंहसरस्वतींनीं आपल्या विरोधकांना शाप मात्र दिला नाहीं. कलिकालाकडे पाहून त्यांची नुसती उपेक्षाच केली. स्वभावतः हे ब्राम्हण साधूच आहेत. पण कलिदोषानें पछाडले गेले असें ते मनांत समजले व भवितव्यता अटळ असते, असें म्हणून शांतच राहिले.

मग आतां दोषी कोण ? तर कोणीच नाहीं. कारण भवितव्याप्रमाणें सर्व गोष्टी घडतात. बलराम, युधिष्ठिरांनासुद्धां भवितव्यता सुटली नाहीं. तशी नरसिंहसरस्वतींना किंवा पुजाऱ्यांनादेखील ती सुटली नाहीं. कशी ती पहा, सर्वांबरोबर प्रेमानें वागून भक्तिसुखांत मग्न होऊं इच्छिणाऱ्या जीवन्मुक्त मुनींना उदासवृत्ति धरावी लागली. ही नरसिंहसरस्वतींची भवितव्यता होय व स्वामिनिष्ठ असलेल्या पुजाऱ्यांना स्वामींशीं विरोध करावासा वाटला ही त्या पुजाऱ्यांची भवितव्यता होय. ही दोघांची भवितव्यता अपरिहार्य

अशीच झाली. कोणी म्हणेल कीं, नरसिंहसरस्वतींनीं गुरुमहाराजांचे उत्सवाचा किंवा त्यांच्या मंदिररचनेचा आग्रह सोडून स्वस्थ समाधि लावून बसण्याचाच जर आग्रह धरला असता तर चाललें नसतें काय ? त्याचप्रमाणें पुजाऱ्यांनासुद्धां, " स्वामी काय करतात तें करूं द्या. सत्पुरुषांचे वृत्तीला अडथळा कशाला करावा ? वासुदेवानंदांचें मंदिर किंवा उत्सव स्वामींच्या पश्चात आमच्याच ताब्यांत रहावयाचे आहेत. वाढत्या झाडाला खुटूं नये." असें म्हणून नरसिंहसरस्वतींच्या मर्जीनेंच जर त्यांनीं वर्तन चालविलें असतें तर नसतें का चाललें ? होय. दोघांनींहि तसें केलें असतें तरी चाललें असतें. त्यांत कांहीं बिघडलें नसतें, ही गोष्ट खरी. पण मग अवश्यंभाविता ती काय उरली असती ? अवश्यंभावितासुद्धां ईश्वरानेंच निर्मिलेली आहे. ती टळेल कशी ? यावरून निष्कर्ष असा निघतो कीं, पुजाऱ्यांनीं विरोध करावा; नरसिंहसरस्वतींनीं त्यांच्याविषयीं उदासीन व्हावें व पुढें अमरापुरांत जाऊन श्रीवासुदेवानंदांचें मंदिर बांधावें.ही ईश्वरी घटनाच होय. या ईश्वरी घटनेला अनुसरून ज्यांनीं ज्यांनीं जीं जीं वर्तनें केलीं, तीं सर्व ईश्वरेच्छेनेंच केलेलीं असल्यामुळें ते सर्व निर्दोषीच होत. नृसिंहसरस्वती जसे थोर व पूज्य, तसेच पुजारीदेखील थोर व पूज्यच आम्ही समजतों.

वासुदेवानंदांनीं पूर्ण पारख करून ज्यांना आपल्या सर्व ज्ञानवैभवाचे मालक केलें होतें, ते पूर्ण विवेकी नृसिंहसरस्वतीस्वामी, आपल्या अवयवांप्रमाणेंच सर्वांना मानणारे कोणावर क्रोध करणार ? शत्रु-मित्र समान पाहणारे ते पुजाऱ्यांवर क्रुद्ध झाले नाहींत. त्यांनीं अपमानकारक असा एक चकार शब्ददेखील पुजाऱ्यांना उच्चारला नाहीं. पुजाऱ्यांना आपले गुरुराज देवच मानीत; मग आपण त्यांना दुखवूं कसे ? " ते देव आहेत " असाच भाव नृसिंहमुनींनीं मनांत धरला. व योग्याचें शील जी क्षमा व सहनशीलता तीच त्यांनीं अखेरपर्यंत धरिली. ते पुजाऱ्यांचीं द्वेषवर्तनें सोशीतच गेले. पुजारी त्यांना गुरुद्वादशीचा प्रसाद पूर्वीप्रमाणें मठांत पोंचवीनासे झाले; त्यांना अन्नपूर्णेच्या पूजेला बोलावीनासे झाले; ते स्नान करीत असतां एखादे वेळीं कृष्णेच्या प्रवाहांतील वाळू त्यांच्या मागें राहून त्यांच्या पाठीवर नकळत फेंकूं लागले. ते अन्न खात होते तेव्हां माधुकरीला गांवांत गेले म्हणजे एखादे वेळीं

त्यांचे झोळींत कोणी निषिद्ध अशी कांद्याची भाजीदेखील वाढीत. असा छळच ते करीत. हा छळ पुढें आणखी एकदांआम्ही सांगणार आहों. कितीही कोणी छळ केला तरी नृसिंहसरस्वती तो मनावरच घेत नसत. छळ करणारे लोक आपलें शील दाखवीत व सहन करणारे मुनींद्र आपलें शील सांभाळीत. असो.

याच भानगडीच्या वेळीं वासुदेवानंदांचे शिष्य गांडाबुवा ब्रह्मचारी आतुर संन्यासी होऊन " दंड मला द्या. " म्हणून नृसिंहसरस्वतींकडे आले. त्यांना 'दत्ताची आज्ञा झाल्यावर दंड तुम्हांला देऊं " असें नृसिंहांनीं सांगितलें. गांडाबुवा विरोधक लोकांच्या घरीं भोजनाला जात. अन्नाचा म्हणा किंवा विरोधकांच्या सल्ल्याचा म्हणा त्यांचे मनावर दुष्परिणाम होऊन तेही विरोधक बनले व आले तसे दंड न घेतांच परत गेले ही एक प्रकारें त्यांनीं आपली परीक्षाच दिली. नृसिंहसरस्वती स्वतः वासुदेवांनीं हातीं घेतलेल्या कडक परीक्षेंत उत्तीर्ण झाले, तसे गांडाबुवा झाले नाहींत. " श्रीदत्ताची आज्ञा " ही परीक्षेची कसोटी दोघांना एकच होती. एक त्या कसोटीला उतरले; दुसरे उतरले नाहींत. असो.

शके १८३८ या सालीं नृसिंहसरस्वतीमहाराज हे उत्सवापासून आपण अलग झाले, म्हणून मागें सांगितलें. त्याच सालीं त्यांनीं आपला गुरुमहोत्सवाचा प्रारंभ कृष्णानदीच्या परतीरीं वाडीसमोर अमरापुरांत चालू केला. त्यांनीं तो उत्सवोपक्रम बंद पाडला नाहीं; वाढविलाच उलट. वाडींत तर पुजारी लोक उत्सव करीतच होते. त्याची काळजी करण्याचें कामच नव्हतें. तेव्हां दुसरीकडेदेखील वाडीप्रमाणेंच आपल्या गुरुमहाराजांचे व दत्ताचे चालू केलेले सर्व उत्सव निरंतर व्हावेत, ते वाढावेत, या उद्देशानें त्यांनीं ते पलीकडेदेखील सुरू केले. उत्सवरूपी दिवा वाडींत जो विरुद्ध वातावरणांत टिकेना, तो त्यांनीं अमरापुरांत अनुकूल स्थानीं नेऊन ठेवला व गुरुभक्तीची तेलवात त्याला पुरवीत ते वाडींत राहिले. उत्सवाला लागणारें सामानसुमान भक्तांजवळ देऊन त्यांच्या करीं ते अमरेश्वराची पूजा अर्चा, पालखी, ब्राम्हणभोजन वगैरे पलिकडेच करवूं लागले. जयंत्या, पुण्यतिथ्या वगैरे तेथेंच चालवूं

लागले. भक्तीच ज्याला करायची असते तो एक जागा किंवा एक समाज विरुद्ध झाला तर दुसरी जागा व दुसरा समाज निर्माण करतो. जगांत काय कमी आहे, म्हणून त्यानें द्रव्यासाठीं व हक्कासाठीं झगडा करणाऱ्या भक्ति-हीन लोकांत नित्य त्रास सोशीत दिवस कंठावेत ? स्थलांतर कां करूं नये? नरसिंहसरस्वतींनीं स्थलांतर केलें तें योग्यच केलें. झाडाखालीं झाड वाढत नसतें, असा न्याय आहे. त्याला अनुसरूनच ते वागले. शिवाय अमरापुरांत त्यांनीं आपलें जगदुद्धारक भक्तिकार्य करावें असा त्यांच्या सद्गुरुमहाराजांचाच संकल्प असावा असें वाटतें. व तो त्यांना गुरूंनीं कळविलादेखील होता असें वाटतें. कारण, ते पूर्वाश्रमीं आपल्या घरीं असतांना एका वेळीं आपले हात अमरापुराकडे करून आपल्या बंधुभगिनींना म्हणाले होते कीं, " या बाजूला माझ्या हातून महाराज मोठें कार्य करवून घेणार आहेत. " गुरुमहाराजांनीं आपले विचार सांगितले असल्यावांचून ते कांहीं असें बोलले नाहींत खास. शिवाय वासुदेवानंदांना भक्तांनीं अमरेश्वर कोठें आहेत म्हणून विचारलें होतें. " अमरेश्वर गुप्त आहेत; ते बारा वर्षांनीं प्रगटतील" असें ते देखील म्हणाले होते. नंतर बारा वर्षांनींच नरसिंहसरस्वतींनीं श्रीवासुदेवानंददत्तामरेश्वरांची स्थापना केली. त्यावरून गुरुपरमेश्वरांच्या इच्छेनेंच ते तिकडे गेले असें म्हणावें लागतें. पुढें पुन्हां त्यांनीं गुरुदेवाची आज्ञा तर वाडी सोडायला घेतलीच. तो इतिहास पुढें सांगूं. ह्या गुरुसंकल्पित म्हणजे ईशसंकल्पित कार्याला पुजाऱ्यांचें विरुद्ध वर्तन स्वामीजींना अनुकूलच झालें. त्यामुळें त्यांना स्वतंत्र श्रीगुरुसंस्था स्थापन करायला अवसर मिळाला.

सर्व पुजारीवर्ग जरी स्वामीरायांना प्रतिकूल होता तरी पण गांवांत कांहीं लोक त्यांचे भक्त होते. पुजाऱ्यांतसुद्धां त्यांच्या कांहीं स्त्रिया किंवा कन्या वगैरे स्वामीजींना अनुकूल भक्त होतेच. त्यांना पुजाऱ्यांचें दुर्वर्तन आवडत नसे. पण त्यांचा इलाज नव्हता. ते महाराजांना भजतच असत. पुजाऱ्यांचीं कांहीं मुलें, बापू कोडणीकर, श्रीपाद लोटांगणे, बापटीण काकू, वगैरे मंडळी अमरापुरांत जाऊन नृसिंहसरस्वतींच्या सांगण्याप्रमाणें उत्सव करीत. बापटीण काकू स्वयंपाक करीत. पुरुष लोक पूजा, पालखी, भजन वगैरे

करीत. अमरापुरचे कुलकर्णी त्यांना सहाय्य करीत. तेसुद्धां वाडीकर भक्तांबरोबर गुरुमहाराजांचे उत्सव करूं लागत. भजन करीत, पालखी मिरवीत, सर्व काहीं करीत. त्यांना ते उत्सव आपल्या गांवीं होतात हें पाहून आनंद वाटे. घेवडयाच्या शेंगांची भाजी खायला दत्त प्रभु मुद्दाम त्यांचे घरीं गेले होते. अर्थात् ते दत्ताचे पुरातनचे भक्त होते, पुन्हां त्यांचेवर दत्ताचा हा अनुग्रह होऊं लागला.

अमरापुरकर भक्त मंडळी वरचेवर वाडींत येत व नृसिंहसरस्वतींना भेटत. प्रेमानें ते त्यांच्याशीं बोलत बसत. महाराज वाडींतून अमरापुरीं यावेत असें त्यांना वाटे. श्रीदीक्षितस्वामी म्हणजे साक्षात् दत्तामरेश्वरच होत, अशी त्यांची भावना झाली. ते त्यांना म्हणत कीं, " पूर्वी जशी आपण आम्हांघरीं भाजी खाल्लीत व आमच्यावर दया केलीत; तशी दया करण्याकरतां तुम्हीं अमरापुरला चला. वाडींत आपणांला त्रास होत आहे, करितां ही जागा आपण सोडा. पलीकडे या. आम्ही तेथें आपली सेवा करूं व पावन होऊं. " असें ते वरचेवर नृसिंहमुनींना म्हणत. " अमरापुरांतच आपण कायम रहा " असें देखील ते त्यांना म्हणत. तें ऐकून नृसिंहसरस्वती त्यांना म्हणाले कीं, " आमचें तिकडे येणें तुमच्याच हातीं आहे. भजन जोरांत होऊं द्या. म्हणजे आम्हांला आज्ञा झाली कीं लगेच तुमच्या गांवींच आम्हीं येऊं, दुसरीकडे जाणार नाहीं. आम्हांला निरुपाधिक स्थळच पाहिजे आहे. " इत्यादि अभिवचनपर भाषा दीक्षितमहाराजांनीं करतांच शंकरराव वगैरे अमरापुरकर भक्तांना आनंद झाला. त्यांनीं महाराज आपलेकडे यावेत म्हणून अमरेश्वरापुढें रोज नेमानें व प्रेमानें भजन सुरू केलें. चारपांच वर्षांनीं महाराज नृसिंहसरस्वती तेथें जाईपर्यंत त्यांनीं जोराचें भजन चालविलें व महाराजांची वाट पहात ते राहिले.

आज्ञा झाल्यावर वाडींतून जातांना भाविक प्रेमी लोकांचा प्रेमपाश नसावा याकरितां नृसिंहसरस्वतींनीं उपाय करण्याचा ठरविला. ते मुक्तमंडलचक्रवर्ती कसल्याही पाशांत गुंतणारे नव्हते. तथापि त्यांनीं साधक लोकांना शिक्षण देण्यासाठीं तसा निश्चय केला. " जीवन्मुक्तीची पराकाष्ठा

संपादन करण्यासाठीं पूर्ण निःसंगता संपादिली पाहिजे " असा बोध त्यांनीं साधकांना देऊं इच्छिला. "निःसंगता मुक्तिपदं यतीनाम्" " संगीहि बाध्यते लोके निःसंगः सुखमश्नुते " " संगं त्यजेत मिथुनीव्रतिनां मुमुक्षुः " इत्यादि वचनांनीं सांगितलेला अर्थ ते आतां आचरणांत आणून दाखविणार होते व ती निःसंगता कशी कशी संपादावयाची तिचीं साधनेंसुद्धां ते आचरून दाखविणार होते. आपण ठरविलेला वेत स्वामींनीं आपल्याजवळ असणाऱ्या भाविक लोकांपुढें केव्हां केव्हां स्पष्ट सांगायलादेखील सुरुवात केली. " आम्ही आतां धौम्य ऋषि होणार आहों ; वेदधर्माऋषी बनणार आहों. कोण कोण परीक्षेंत टिकतात तें आम्हांला पहावयाचें आहे " असे उद्‌गार कित्येकांपुढें त्यांनीं काढले. " आम्ही आतां उपाधी सोडणार आहों, एकदम सोडीत नाहीं. क्रमाक्रमानें ती सोडणार " असेंही ते कित्येकांना म्हणाले. " आपापलें साधन करीत तुम्हीं आतां एके ठिकाणीं स्वस्थ बसा. आपला पुण्योदयकाल येईपर्यंत स्वस्थ रहा " असेंही ते कोणापुढें बोलले. शिष्यशिक्षण व शिष्यपरीक्षण दोन्ही कार्यें एकदमच करावयाचीं त्यांनीं ठरविलीं. असा बोध त्यांच्या वरील भाषणावरून होतो व तसें करत करत अवतारकृत्यदेखील ते क्रमानें संपूर्ण करून घेणार असाही अर्थ त्यांतून निघतो. निःसंगता साधण्यासाठीं स्वामींनीं आचरलेली योगीचर्या पुढील प्रकरणांत वर्णिली जाईल.

प्रकरण ११ वें

श्रीनृसिंहसरस्वतींना उत्सवामध्यें भांडणें करून पुजारी जरी विरोध करूं लागले, तरी त्यांनीं मात्र आपली पुजाऱ्यांविषयींची आदरबुद्धि व प्रेमबुद्धि कायमच राखिली होती. याविषयीं दृष्टान्त सांगतों. एकदां परगांवचे सोनार लोक देवाला पाणी घालावें म्हणून दत्तमंदिरांत शिरूं लागले. पुजाऱ्यांची व त्यांची तेव्हां मारामार झाली. सोनार श्रीमंत होते. " द्रव्येण सर्वे वशाः " या न्यायानें त्यांनीं करवीर सरकारला वश करून घेऊन पुजाऱ्यांना शक्तगजुरीची शिक्षा द्यायला लाविली. पुजारी कोल्हापुरांत तुरुंगांत पडले. तेव्हां त्यांच्या स्त्रिया दुःख करीत नृसिंहसरस्वतींकडे मठांत गेल्या; त्यांच्या पुढें पदर पसरून " आमच्या पतींना संकटांतून सोडवा." असें म्हणून रडल्या. तेव्हां स्वामीमहाराजांना त्यांची दया आली. त्यांनीं त्यांना आश्वासन दिलें कीं, " आपण देवाची प्रार्थना करतों. तुमचे पती सुटतील. चिंता करूं नका. " पूजक स्त्रियांना आश्वासन देऊन दीक्षित मुनी त्यांना संकटमुक्त करण्यासाठीं दत्तापाशीं धरणें धरून बसले. कांहीं दिवस त्यांनीं आहार बंद केला. पतिव्रतांचे पती कैदेंतून सुटलेले ऐकल्याशिवाय दूधसुद्धां पिणार नाहीं असा निश्चय करून ते बसले मात्र, तों चमत्कार असा झाला कीं, प्रत्यक्ष करवीरच्या राजाचे स्वप्नांत दत्तमहाराज संन्यासीरूपानें दंड घेऊन गेले व राजाला म्हणाले कीं, " आत्तांच्या आत्तां पुजाऱ्यांना सोड, नाहीं तर तुला या दंडानें मारीन " राजा खडबडून जागा झाला. लगेच मोटारींत बसून स्वतः तुरुंगावर गेला व पुजाऱ्यांना मुक्त करून वाडीला जा असें म्हणाला. पुजारी सुटून घरीं आले. लगेच त्यांच्या स्त्रिया आनंदानें नृसिंहसरस्वतीमहाराजांना पति सुटले म्हणून सांगायला मठींत गेल्या. त्यांनीं पति सुटले

असें सांगतांच नृसिंहसरस्वतींनीं आपल्या वासुदेवानंद दत्तमहाराजांचे उपकार मानले व त्या वेळेपासून ते आहार स्वीकारूं लागले. शत्रुभाव धरणारांवरसुद्धां उपकार करण्याचें त्यांचें असें शील होतें.

दृष्टांत दुसरा– एकदां गुरुद्वादशीच्या उत्सवाला स्वयंपाक करण्याचे वेळीं मुसळधार पाऊस सुरू झाला होता. चर पाण्यानें भरून वाहूं लागले. पाऊस थांबेना, म्हणून पुजाऱ्यांना मोठी काळजी पडली. कांहीं भाविक पुजारी नरसिंहसरस्वतींकडे आले. कोणत्याहि संकटकालीं देवाला प्रार्थना करायची असली म्हणजे त्यांचेकडेच ती असे. त्यांनीं दत्ताला सांगितलें म्हणजे हटकून कार्यभाग होत असे. हा अनुभव पुजाऱ्यांना होताच. त्यांनीं पाऊस बंद होण्याकरितां व उत्सवाचा स्वयंपाक व्हावा म्हणून देवाला आपण प्रार्थना करा अशी विनंति दीक्षितस्वामीमहाराजांना केली. महाराज दत्तमंदिरांत गेले; प्रार्थना करून आले. लगेच पाऊस बंद झाला. चरांतलें पाणी उपसून काढून लगेच पुजाऱ्यांनीं स्वयंपाक सुरू केला. नरसिंहसरस्वतीमहाराजांनीं अशीं पुजाऱ्यांचीं पुष्कळ कार्यें केलीं. संत स्वत: निर्वैर बुद्धीचे असतात, ही गोष्ट नरसिंहसरस्वतींच्या चरित्रावरून सिद्ध होते. वासुदेवानंदांची आज्ञा त्यांना "वाडींतील बाळगोपाळांवर दयादृष्टि ठेवा" अशी होती. तदनुसार त्यांनीं आपलें वर्तन ठेवलें होतें. शरण आल्यावर मग ते कोणाचा अपराध मनावर घेत नसत, कृपाच करीत. सर्व भूतांवर करुणा करणें हें त्यांचें शीलच बनलें होतें. असो.

मागच्या प्रकरणांत नरसिंहसरस्वती मुनिवर्यांनीं आपल्या शिष्य,भक्त,भाविक लोकांना "आम्ही उपाधी सोडणार आहों; तुम्हीं आपलें साधन करीत रहा. आम्ही धौम्य होणार आहों" वगैरे जसें सांगितलें तसेंच त्यांनीं "आम्ही आतां पहिली मंडळी सोडून नवी मंडळी घेणार आहों" असेंदेखील म्हटलें होतें. अशी भाषा करण्यांतला त्यांचा अभिप्राय असा असावा कीं, "शिष्यादिकांनीं सावध रहावें, घाबरूं नये. आपली निष्ठा सोडूं नये व वियोगव्यथा मानूं नये." कारण त्यांना यापुढें योगीचर्या धारण करावयाची होती ती पाहून शिष्य घाबरण्याचा वगैरे संभव होता. तन्निवारणार्थ ते आदी त्यांना सूचना देत राहिले. हें त्यांचें दयाळुत्वच होय.

जगत्कार्य करणाऱ्या महापुरुषांना एकाच स्थानांत राहून कसें चालावें? वाडीच्या बाहेर राहणाऱ्या भक्तांचा व दीनांचा सुद्धां त्यांना उद्धार कर्तव्य असल्यानें त्यांनीं स्थानान्तर करण्याचा व नवी भक्तमंडळी बनविण्याचा विचार केला व तो आपल्या आजपर्यंतच्या भक्तवर्गाला बोलून दाखविला. वाडींत राहून त्यांनीं आजपर्यंत तेथील होतकरूं लोकांना कर्म, भक्ति व ज्ञानाचें शिक्षण दिलें. व तें देतांना मैत्री, करुणा, मुदिता इत्यादि सद्वासना धारण केल्या होत्या. त्या सद्वासनांच्या बळावर रागादि दुर्वासनांचा क्षय कसा केला जातो, याचेंदेखील शिक्षण त्यांनीं आतांपर्यंत साधकांना दिलें. यापुढें त्यांना विशिष्ट साधकांना विशिष्ट शिक्षण द्यावयाचें होतें.

ततः पक्वकषायेण नूनं विज्ञातवस्तुना ॥
शुभोप्यसौ त्वया त्याज्यो वासनौघो निराधिना ॥१॥

या वसिष्ठांच्या उपदेशाप्रमाणें पूर्ण जीवन्मुक्ति सुखासाठीं शुभाशुभ वासनांशा त्याग; त्यासाठीं मनोनाश, त्यासाठीं निर्विकल्प समाधीचा अभ्यास. एतद्रूप शास्त्रीय विद्वत्प्रयत्न, ते ज्ञानी पुरुषांना आतां आचरून दाखविणार होते. या प्रयत्नांत मैत्री, करुणा, मुदिता इत्यादि शुभवासनांचासुद्धां त्याग करावयाचा असतो. तो त्याग अत्यंत कठीण असतो.

दुःसाध्यो वासनात्यागः सुमेरून्मूलनादपि ॥१॥

म्हणजे मेरूपर्वताच्या उत्पादनापेक्षां सुद्धां हा वासनात्याग फार कठीण आहे असें वसिष्ठ वचन आहे. मनोनाशसुद्धां तितकाच कठीण आहे, असें समजावें. चित्तनिरोध करणें म्हणजेसुद्धां लोहचणक भक्षण करणेंच होय. लोकवासना व शास्त्रवासना त्याला आड येतात. अशा प्रसंगीं योग्याला उन्मत्त पिशाच्च वृत्तीही धराव्या लागतात. विपरीत वर्तन दाखवावें लागतें. श्रीदत्तमहाराजांनीं बालोन्मत्तपिशाचवत् वर्तन केल्याच्या कथा दत्तपुराणांत आहेतच. त्यांचा हेतुदेखील तोच कीं, निरुपाधिकपणानें निर्विकल्प समाधि लावून निजानंदीं मग्न राहतां यावें. जनसंसर्ग होऊं नये. श्रीदीक्षितस्वामी महाराजांनासुद्धां दत्तमहाराजांचा कित्ताच गिरवावा लागला. ते जे, आम्हीं धौम्य किंवा वेदधर्मा होणार आहों, असें म्हणाले, तें या कित्याला उद्देशूनच

होय. व अशा समयीं सावध रहा, निष्ठा सोडूं नका असें त्यांनीं बजावलें म्हटलें तरी चालेल. कारण कांहींची परीक्षा व कांहींना शिक्षण त्यांना द्यावयाचें होतें. परीक्षेंत टिकतील त्यांना प्रसाद मिळेल, असा त्यांचा अभिप्राय होय. आजपर्यन्त नृसिंहसरस्वतींनीं मैत्री, करुणा इत्यादि वृत्ती धरून उघडपणें प्रसाद पुष्कळांवर केला. आतां ते गुप्तदान देणार होते. क्रोधादिकांचा आवेश दाखवून उन्मत्त पिशाच्च वृत्तीनें दिलेला प्रसाद तो गुप्तप्रसाद होय, तेंच गुप्त दान समजा.

वर आम्हीं "शास्त्रीय विद्वत्प्रयत्न" ज्याला म्हटलें तीच योगीचर्या होय. योग्यांनीं ती धरावी याबद्दल प्रमाण असें आहे कीं--

तथाचरेत वै योगी सतां धर्ममनुस्मरन् ॥
जना यथावमन्येरन् गच्छेयुर्नैव संगतिं ॥१॥

स्वरूपीं सावध राहून, जनसंग व जनसन्मान टाळण्यासाठीं लोकविलक्षण वर्तन करणें हा या श्लोकाचा मथितार्थ आहे. श्रीदीक्षित मुनिवर्यांनीं हीच योगीचर्या धारण केली. योगाभ्यास असें तिला म्हणतात. ज्ञानापूर्वी हा अभ्यास ज्ञानाकरितां असतो व ज्ञान झाल्यावर हा अभ्यास जीवन्मुक्तीकरितां केला जातो. जनांनीं आपला अवमान करावा अशा तऱ्हेचें विपरीत वर्तन हया योग्याला करावें लागतें असें पूर्वी सांगितलेंच आहे. श्रीनृसिंहसरस्वतींचा अवमान पुजारी तर करीतच होते. पण इतर लोक त्यांचा मान करीत असत तोसुद्धां त्यांना टाळायचा होता. शिवाय कन्यागत लागलें कीं वाडीमध्यें एक वर्षपर्यंत यात्रा फार जमते. तिच्याकडूनदेखील आपणांला संसर्ग नसावा, तिलासुद्धां स्वामी विपरीत दिसावेत व तिनें देखील आपल्याकडे येऊं नये या उद्देशानें स्वामीमहाराजांनीं एक वर्ष योगीचर्या धरिली.

शके १८४३ सालीं श्रीदीक्षित मुनिराजांनीं योगीचर्येला प्रारंभ केला. प्रथम त्यांनीं मौन धारण केलें. मौन ही योगांतली पहिली भूमिका आहे. "मौनं सर्वार्थसाधनं" म्हणजे पुढल्या सर्व योगभूमीचा पाया मौन होय. तो पाया बळकट असेल तर पुढील इमारत रचली जाणार, एरवीं नाहीं. हा अर्थ मुनिमहाराजांनीं प्रथम मौन धरण्यांत सुचवून दिला. आषाढ मासी

त्यांनीं हया व्रताला प्रारंभ केला. अर्थात् गुरुपुण्यतिथी, गुरुपौर्णिमा, गुरुजयंती, श्रीपादजयंती इत्यादि कोणतेच उत्सव ते करीनातसे झाले. आपल्या राहण्याचे खोलींतच ते जें कांहीं त्यांना कर्तव्य होतें तें सारें एकटेच करीत बसत. खोलीचें दार चोवीस तास बंद करून घेत, बाहेर पडत नसत. स्नानाला केव्हां नदीवर जात हेंदेखील कोणाला माहीत पडत नसे. दुपारीं स्नान करीत त्यावेळीं मात्र लोकांना ते दिसत. जातां येतां ते कोणाकडे पहात नसत. खालीं मान करून चालत. कोणाचा नमस्कार घेत नसत व कोणाला नारायणदेखील म्हणत नसत. कोणी कांहीं बोलल्यास तें ऐकत नसत. कोणाकडे लक्ष देत नसत. अशा रीतीनें सर्वेंद्रियांचा उपसंहार करून ते राहिले. निजगुरुरायांची आज्ञा जी, स्वारीची पूजा व शेजारती, ती मात्र ते खोलीचे बाहेर येऊन करीत, नाहींतर सर्वकाळ खोलींतच ते बसून असत. त्यांची गुरुपादुकांची पूजा जलावरच चाले. सर्वोपचार जलाचेच. पूजा वगैरे आन्हिक धर्मकर्म करून सर्वकाळ समाधी लावून निर्विकल्पावस्थेंत ते सदैव रहात.

स्वामीमहाराजांची हालचाल कोणाच्याच नजरेला जेव्हां पडेनाशी झाली, तेव्हां हे काय समाधि घेतात कीं काय ? असें वाटून पुजारी लोक लोकोपचारार्थ त्यांचे खोलीपाशीं गेले व " दार बंद करून तुम्ही सदा असतां, तेव्हां तुम्हांला कांहीं व्यथा होत आहे कीं काय ? " असा प्रश्न बाहेर राहून त्यांनीं महाराजांना केला. तेव्हां मात्र एकदां ते बोलले कीं, " आम्हांला व्यथा होत नाहीं, काळजी करूं नका. देवाची आज्ञा नाहीं म्हणून दार उघडीत नाहीं. " हें उत्तर ऐकून पुजारी परत घरीं गेले. ते कांहीं त्यांना चिकटले नाहींत. पूर्वीच ते सुटलेले होते. पण जे कांहीं भक्त किंवा शिष्य त्यांचे चरणीं मिठी मारून, कोणी मठांत तर कोणी गांवांत, वास्तव्य करून राहिले होते ते मात्र त्यांच्या दर्शनाला नेहमींप्रमाणें जात. महाराज दार केव्हां उघडतात, त्या पाळतीवर ते रहात. संधि साधून त्यांचे पायां पडत व दर्शन घेत. कांहीं बोलत, व त्यांना बोलविण्याचा प्रयत्न करीत. अशा तऱ्हेनें चिकटलेले लोक त्यांनीं सोडावयाचे कसे ? ते सुटण्याचा उपाय एकच होता व तो अंमलांत आणल्याशिवाय योगाभ्यासाला लागणारी निःसंगता त्यांना साधणें शक्य नव्हतें. म्हणून त्यांनीं पूर्वी सांगून ठेव-

लेला धोम्यावतार किंवा वेदधर्मावतार धारण केला. नारसिंहावतारमुळां त्याला म्हटलें तरी चालेल. मौन धरण्याच्या आरंभीं आरंभीं कांहीं दिवसांवर त्यांनीं नुसती उग्र अशी दृष्टि वटारली. त्याबरोबर ते घाबरून निघून गेले; पुन्हां स्वामींपाशीं आले नाहींत. कित्येकांना त्यांनीं न रुचणारी अशी भाषा ऐकविली. त्यासरशी त्यांचीं मनें भंग पावलीं व त्यांनींदेखील स्वामींपाशीं जाणें बंद केलें. दृष्टीनें किंवा भाषेनें दूर न होणाऱ्या लोकांवर योगींद्रांनीं कित्येकांवर कमंडलूभर पाणी ओतलें; कित्येकांवर चुळा टाकल्या; कित्येकांवर जें हातांत सांपडलें तें म्हणजे उंसाचीं कांडीं, पेढे, डाळिंबें वगैरे पदार्थ फेंकले. फेंकतांना आवेश मात्र क्रोधाचा होता. त्यामुळें ते लोक घाबरले. कोणी चिडले व स्वामींशीं जाणें त्यांनीं बंद केलें. मठांतदेखील कोणी राहीना किंवा त्यांत जाईना. सर्व मठ मोकळा झाला. तथापि मुरदाडपणानें कोणी मठांत त्यांच्याशीं जाऊन नमस्कार करूं लागले. त्यांच्यावर त्यांनीं दाराला लावायच्या लांकडी ठोकळ्याचा बेदम प्रहार केला. तेव्हां मग सारेच लोक मठांत जायचे बंद झाले. महाराजांनीं योगीचर्या धरलेली माहीत न होतां कित्येक लोक केव्हां केव्हां त्यांचें दार उघडें असलेली संधि पाहून कांहीं पदार्थ त्यांच्या पुढें चटकन नेऊन ठेवीत. अशा लोकांना आपली माहिती देण्यासाठीं महाराज त्यांनीं ठेवलेला पदार्थ फाडदिशीं त्यांचेवर भिरकावीत. भाविक बिचारे घाबरून जात. मग ते पुन्हां त्यांचेकडे जातातच कशाला? योगीश्वरांनीं अशा उपायानें जनसंसर्ग सर्वथैव धुऊन टाकला व आपला योगाभ्यास करीत ते स्वात्माराम होऊन ब्राम्ही स्थितींत अखंड रमूं लागले.

नृसिंहयोगीश्वरांनीं बालोन्मत्तपिशाच वृत्ति धरलेली पाहून अनेकांचीं अनेक मतें बनलीं. कित्येक त्यांच्याविषयीं उदास बनले. कित्येक द्वेषी बनले. कांहीं स्वामींना वेड लागलें असें समजून द्वेषी होते ते आनंदित झाले. कित्येक सद्भक्त आपल्यावर गुरुराज कां बरें असे निष्ठुर झाले? असें मानून खिन्न झाले. कित्येक संतुष्ट झाले. ते असें म्हणत कीं, स्वामी करतात तें योग्यच आहे. योगीचर्या जे कोणी धरतात ते निःसंगतेसाठीं असे विपरीतच वागतात. सर्वेंद्रियांचा संयम ते करीत असतात, तसा यांनीं चालविला आहे

स्थितप्रज्ञ होण्याचें हें एक साधनच आहे. " वशेहि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता " असें गीतेंत म्हटलेलेंच आहे.

कोणी म्हणत, संन्यासी होऊन उपाधी वाढवून हे बसले होते. उत्सव, ब्राम्हणभोजनें, दक्षणा, बिदाग्या, वस्त्रें वगैरे वांटणें इत्यादिक फंद यांना पाहिजे होते कशाला ? पुजाऱ्यांचे स्वाधीन पहिल्यानेंच द्रव्य देते व ते कसेंही करोत म्हणते, तर पुजाऱ्यांनीं त्यांच्याशीं तंटा कशाला केला असता ? पुजाऱ्यांनीं सर्व द्रव्य आपल्या ताब्यांत घेतलें, म्हणून हे आतां अनुतप्त झाले आहेत.

कोणी म्हणत, स्वामी फार दयाळू होते. निःपक्षपातानें सर्वांनाच अन्न, वस्त्र, धन हे देत होते. पण हचा अपस्वार्थी लोकांना ते कसे आवडावेत ? त्यांनीं यांचा छळ मांडला, अपमान केला. तेव्हां हा त्रास रोज रोज नको म्हणून ते सर्व उपाधी टाकून स्वस्थ बसले. एकेपरी त्यांनीं केलें तें ठीकच केलें. या दुष्टांच्या त्रासांतून सुटले बिचारे !!

कोणी असेंही म्हणत कीं, स्वामींनीं खाबू लोक व त्यांचे बरोबर भाविक भक्त वगैरे सर्वच लोक उपाधी नको म्हणून दूर केले. नुसतें जा असें म्हणून ते जर ऐकेनात, ते स्वामींचें मृदुवाक्य जर मनावरच घेईनात, तर स्वामींनीं तरी काय करावें ? धाक बसावा म्हणून खोटा क्रोध दाखवून काठी-दिकांनीं मारल्याचा फार्स त्यांना करावा लागला ! ते ब्रह्मनिष्ठ सद्गुरु असल्यामुळें दयावंतच आहेत. उन्मत्त पिशाच्चादिक कोणत्याही वृत्तीचा अवलंब ते नुसता नटवत बाहचात्कारीच करीत आहेत. त्यांच्या हातून आलेले पदार्थ म्हणजे तो महत्प्रसादच होय. त्यांच्या प्रत्येक क्रियेंत प्रसादच आहे. त्यांचें माहात्म्य अज्ञ जनाला कळणारें नाहीं. मूर्ख लोक आपण वेडे असून सर्व-ज्ञालाच वेड लागलें म्हणतात. याला आतां काय म्हणावें !! आमचें तरी ठाम मत असें आहे कीं ज्या ज्या लोकांवर स्वामींनीं रुद्ररूपानें प्रसाद केला, ते सर्व धन्य होत! सांगूनसवरूनच जर ते असे धौम्य झाले तर त्यांचें सर्व वर्तन साभिप्रायच आहे, असें नको का समजायला? कोणी सांगत असतात कीं, बाबुराव शिरोळकरांवर त्यांनीं क्रोधानें डोळे वटारले. पण आम्ही

म्हणतों तो प्रसादच त्यांनीं त्यांच्यावर केला. नेत्रद्वारा आपली शांभवी शक्तीच त्यांनीं त्यांना दिली. तुळसा नांवाच्या श्रीपादकन्येला ते "तूं दुकानांत बसतेस" असें अरोचक वाक्य बोलले म्हणे. आम्ही म्हणतों, हा प्रसादच होय. परमार्थाची दुकानदारीण म्हणजे जीवन्मुक्तच त्यांनीं तिला केली. काशीबाई कुरुंदवाडकरणीच्या मस्तकावर त्यांनीं पूर्ण कमंडलु ओतला म्हणे. आम्ही म्हणतों, ज्ञानगंगेनें तिला न्हाऊंच घातलें, म्हणजे ज्ञानच दिलें. भागूबाई वाशिमकरणीला उंसाचें कांडें मारलें म्हणे. आम्ही म्हणतों, तो ब्रम्हरसाचा पेलाच तिला पाजला. सदाशिवराव सेवेकऱ्यावर पेढे फेंकले म्हणे. आम्ही म्हणतों, त्याला ते स्वानंदाचे मोदकच चारले. शंकरस्वामींना ठोकळघानें, झाडणीनें व डाळिंबानें मारलें असें ऐकतों. तोही त्यांनीं त्यांचेवर अनुग्रहच केला, असें आम्ही म्हणतों. झाडणीनें पापें झाडून, त्यांचा अहंकार ठोकळघानें नष्ट केला, व शेवटीं भक्तिप्रेमच त्यांना त्यांनीं डाळिंबरूपानें दिलें. गंगुबाई रेंदाळकरणीला तिचाच लाडू घेऊन मारला म्हणतात. आम्ही म्हणतों कीं, "तुझें सुख तुझ्यापाशींच आहे," असा तिला त्यांनीं बोध दिला. अशाच तऱ्हेनें अन्य लोकांवरसुद्धां स्वामींनीं कांहीं फेंकलें असेल किंवा कोणताही प्रयोग केला असेल, त्या त्या रूपानें त्यांनीं त्यांच्यावर गुप्त प्रसादच केला. मागें सांगितलेल्या लोकांवरदेखील त्यांनीं गुप्त प्रसादच केलेला आहे. हेंच त्यांचें गुप्तदान समजा. ज्याला मिळालें त्यालाच तें माहित. अशा तऱ्हेनें सज्जन म्हणाले. अशीं अनेकांचीं अनेक मतें झालीं.

एकंदरींत नृसिंहसरस्वतींची लीला मोठी गहन खरी!! बाळपणापासून त्यांचें चरित्र जर सिंहावलोकन करून पाहिलें तर तें सर्वच असें गहन म्हणावें लागेल व तें सर्व सर्वांना बोधप्रद असेंच ठरेल. सद्गुरुमूर्तीच्या आचरणाचा कोणाला तरी अंत लागेल काय? समुद्र बाहूंनीं तरणें जसें शक्य नाहीं तसें श्रीनृसिंहसरस्वतींचें संपूर्ण चरित्र, झालेलें व पुढें होणारेंदेखील, सर्वथैव आकलन करतां येण्यासारखें नाहीं. त्यांत अनेक अर्थ व अनेक अभिप्राय भरलेले आहेत. म्हणून त्यांचेविषयीं अनेकांचीं अनेक मतें होत राहिलीं व तसे ते अनेक प्रकारें त्यांना बोलूं लागले. त्या सर्वांची गोळाबेरीज केली तर दोनच वर्ग होतात. मतें जरी अनेक असलीं तरी भाषा दोन तऱ्हे-

च्याच निघत होत्या. एक निंदा व दुसरी स्तुति. परिणाम हा लोकभाषेचा होतो. मताचा परिणाम दुसऱ्यावर होत नाहीं. नृसिंहसरस्वतींच्या अंतःकरणावर वरील दोन्ही भाषणांचा परिणाम होत नव्हता. " असन्मानात्तपोवृद्धिः सन्मानात्तु तपःक्षयः " अपमान झाल्यानें तप वाढतें व मान झाल्यानें तें क्षीण होतें. म्हणून सन्मानाची ते कधीं इच्छा करीत नसत व अवमान नको असेंही त्यांना वाटत नसे. म्हणून त्यांचा जरी पुष्कळ वेळां व पुष्कळ ठिकाणीं अवमान होत होता तरी ते तो सर्व सहनच करीत होते; किंबहुना मनावरच घेत नव्हते. मानापमानांत ते मन घालीत नव्हते.

मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः ।।
सर्वारम्भपरित्यागी गुणातीतः स उच्यते ।। १ ।।

असे ते गुणातीत पुरुष होते व गुणातीत पद ज्या साधनानें संपादिलें जातें तें साधन जी अव्यभिचारी भक्ति ती ते अखंड करीतच राहिले होते. स्वारीची पूजा व शेजारती त्यांनीं या योगीचर्येमध्येंसुद्धां चालूच ठेवलेली होती. कारण तीं त्यांच्या गुरुमहाराजांनीं त्यांना सांगितलेली होती. ती गुर्वाज्ञा ते उल्लंघतील कसे ? अस्तु.

मानापमानाप्रमाणें निंदा किंवा स्तुतीसुद्धां ते मनावर घेत नसत. पूर्वीपासूनच ते मुळीं

तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित् ।।
अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान् मे प्रियो नरः ।।१।।

या भागवतलक्षणांनीं मंडित झालेले होते. निंदेबद्दल त्यांचें मत नेहमीं असें असे कीं, " सर्वकाळ दैन्यें व दुःखें ज्यांत सुलभ आहेत, अशा हया जीवलोकामध्यें माझ्या निंदेनें जर एखादा किंवा अनेक जीव संतुष्ट व सुखी होत असतील तर त्यांनीं मजसमक्ष किंवा माझ्या पश्चात् यथेष्ट निंदा करून घ्यावी. कारण अतिशय दुःखमय जगांत प्रीतियोग दुर्लभ आहे. " याप्रमाणें निंदेलाच भूषण मानणारे श्रीनृसिंहमुनिराज होते. त्यांचे मनावर वरील स्तुतिनिंदेचा परिणाम व्हावा कसा ? तो मुळींच झाला नाहीं.

निर्मानमोहा जितसंगदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ॥
द्वन्द्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैर्गच्छन्त्य मूढाः पदमव्ययं तत् ॥१॥

या श्लोकांत म्हटल्याप्रमाणें बनून ते अव्ययपदीं विराजमान झाले होते. कोणत्याही द्वंद्वाघातानें डंडळणारे ते नव्हते. ते महाधीर खंबीर होते. ते अत्यंत गंभीर होते. जातां येतां निद्राळु मनुष्यासारखे आत्मनिमग्नच ते असलेले सर्वांना दिसत.

या योगीचर्येला उद्देशून पुढें वाडी सोडल्यावर त्यांनीं असें म्हटलें कीं, आम्ही वाडींत एक वर्षपर्यंत वाणी, लोचन व कान बंद करून ठेवले होते. या भाषेवरून ते कोणाचें कसलेंच भाषण मुळीं ऐकून घेत नव्हते असें ठरतें. मग त्याचा परिणामच कुठला ! या वरील स्वामींचे वचनाचा असादेखील एक भाव निघूं शकतो कीं, वाणीनें उच्चारूं नये असें वर्तन आतां लोक करणार, डोळ्यांनीं पाहूं नयेत अशीं दृश्यें आतां दिसूं लागणार व कानांनीं ऐकूं नयेत अशा गोष्टी आतां जगांत सुरू होणार हा भावार्थ "आम्ही वाणी, नयन व कान बंद केले होते" या म्हणण्यांतून निघूं शकतो. नृसिंहसरस्वतींचें बोलणें साधें नसे. तें फार गूढ व बव्हर्थक असे. असो.

स्वामीमहाराजांच्या खोलीच्या बाहेर कलिदावानल भडकला होता. तरी ते स्वतः आनंदसमुद्रांत पोहत होते; शान्तदान्त होते; हिमालयासारखे थंड-गार होते. एकटेच ते खोलींत असत म्हणून त्यांना कांहीं सर्व शून्य झाल्या-सारखें भासत नव्हतें, तर पूर्णताच भासत होती. लोकान्त व एकान्त त्यांना वस्तुतः ज्ञानमहिम्यानें सारखाच म्हणजे निजानंदपूर्णच होऊन राहिला होता. योगी लोकांना एकटे असण्यांतच पूर्णता वाटते व जनसंघांतच उलट शून्यता भासते.

येन पूर्णमिवाकाशं भवत्येकेन सर्वदा ॥
शून्यं यस्य जनाकीर्णं तं देवा ब्राह्मणं विदुः ॥ १ ॥

जीवन्मुक्तांचें असें लक्षणच आहे. त्या लक्षणानें युक्त मुनिराज असत.

श्रीनृसिंहसरस्वती हे दत्तयोगेश्वरच होत. त्यांनीं जी योगीचर्या आचरली ती त्यांची अवधूतलीलाच होय. भगवल्लीला ही लोककल्याणार्थच असते.

लोक हे भिन्नभिन्न रुचीचे आहेत. म्हणून गुरुमूर्तीच्या लीलासुद्धां अनेक प्रकारच्या होत असतात. योगीचर्या ही एक प्रकारची त्यांची लीलाच होय. या लीलेनें त्यांनीं भक्त व अभक्त सर्वच लोकांना आपणांकडे खेंचलें. निरनिराळ्या प्रकृतीच्या लोकांच्या मनांत त्यांनीं निरनिराळ्या वृत्त्या उपजविल्या व तेणेंकरून आपलें ध्यान करायला त्यांना त्यांनीं लाविलें. वैद्यराज एकच औषध निरनिराळ्या रोग्यांना निरनिराळ्या अनुपानांतून देतो किंवा पुष्कळांना एकाच रोगावर एकच औषध देतो. पण प्रकृतीच्या तारतम्याप्रमाणें अनुपान तेवढेंच बदलून देतो. तद्वत् नृसिंहसरस्वती गुरुमहाराजांनीं हा प्रकार केला. त्यांनीं ध्यानरूप औषध सर्वांना एकच दिलें. पण प्रत्येकाला मनोधर्मरूपी अनुपान मात्र निराळें योजलें. कित्येकांचे मनांत भय उत्पन्न केलें. वस्तुतः त्यांनीं योगीचर्येचा प्रयोग म्हणजे मागें सांगितल्याप्रमाणें सक्रोध मुद्रा दाखवून, फळादिकानें ताडन करणें अशा तऱ्हेचा प्रयोग पुजाऱ्यांवर केलाच नव्हता; इतरांवरच तो केला. तथापि पाहून व ऐकून त्यांनादेखील त्याची भीति वाटली. ब्रम्हानंदाचे मठाची पायरी चढणें म्हणजे सिंहाचे गुहेच्या तोंडांत पाय टाकल्याप्रमाणें भीतिप्रदच त्यांना वाटूं लागलें. तद्वत् सर्वांनाच तसें वाटूं लागलें. ज्यांच्यावर त्यांनीं प्रयोग केला ते तर शंकरस्वामींसारखे लोक मठाकडे फिरकेनासे झाले. त्यांना महाराज ठोकळा किंवा अन्य वस्तू घेऊन मारायला उभेच आहेत, असे डोळ्यांपुढें सदा दिसत. याप्रमाणें स्वामीजींनीं कित्येक लोक भयग्रस्त केले. कित्येक त्यांचा मत्सर करूं लागले. कित्येक भक्त गुरुप्रसाद झाला म्हणून त्यांच्यावर अधिक प्रेम करूं लागले व अभक्त मत्सर करूं लागले. मेघोदक सखोल भूमींतच राहतें, उन्नत भूमींत रहात नाहीं तसा गुरुप्रसाद भक्तालाच सुखदायी होतो, अभक्ताला होत नाहीं. गुरुराज हे निरुपम आहेत. त्यांच्या स्पर्शानें किंवा कोणत्याही कृतीनें जीव, जगासहित परब्रम्ह होतो असा त्यांचा महामहिमा आहे. पण भक्ति मात्र पाहिजे. अस्तु. कित्येकांना श्रीगुरुनृसिंहमूर्तीनीं आपले कामीदेखील बनविलें. महाराज मला भेटतील काय ? मजशीं ते बोलतील काय ? मजवर अनुग्रह करतील काय ? अशी कामना पुष्कळजण करूं लागले. उदाहरणार्थ, अमरापुरकर लोक. महाराज अमरापुरीं केव्हां येतील म्हणून ते वाटच पहात होते. एकं-

दरींत निरनिराळ्या मनोधर्मांनीं सारीच जनता त्यांचें ध्यान करूं लागली. त्यांची भक्त बनली. मत्सऱ्यांना किंवा द्वेष्ट्यांना आम्ही नृसिंहसरस्वतींचे भक्त आहों, त्यांचें ध्यान करतों असें जरी माहित झालें नाहीं तरी तेसुद्धां भक्तच बनले. त्यांचा सुद्धां उद्धारच होणार किंवा झाला असें आम्ही म्हणतों. भक्तिवंतांचा तर तो झालाच, पण अभक्तांचा सुद्धां, कंस शिशुपालांप्रमाणें उद्धारच झाला. नृसिंहसरस्वतींच्या चिंतनानें भिन्न मनोधर्मी लोक कसे उद्धरले, व ते सर्व भक्तच कसे मानले गेले, याला दृष्टान्तभूत असा हा भागवतांतला पुढील श्लोक आहे.

गोप्यः कामाद्भयात्कंसोद्वेषाच्चैद्या दयो नृपाः ॥
संबंधाद्वृष्णयः स्नेहाद्यूयं भक्त्या वयं हरेः ॥ १ ॥

या दृष्टान्तानुसार सर्वांचा उद्धार करणारे श्रीनृसिंहसरस्वती भगवान खरोखरच मोठे दयाळू, उदार, समदर्शी होत.

मागें आठव्या प्रकरणांत शृंगेरीच्या स्वामींजवळ श्रीवासुदेवानंदसरस्वतींनीं काढलेल्या उद्गारांत त्यांनीं "नृसिंहसरस्वती हे आपल्यापेक्षां कांकणभर अधिक आहेत" असें म्हटलें आहे. त्यांनीं जी एवढी त्यांची तारीफ केली ती उगीच केली नाहीं. शिष्याची कोटी पुढचो आहे, याची जाणीव त्यांनाच झाली म्हणून ते तसें म्हणाले. नृसिंहमुनिवर्यांनीं चारी आश्रम तर घेतलेच घेतले. चतुर्थाश्रमी संन्यासी ते दिसतच आहेत. पण या पुढील पंचमाश्रमांतसुद्धां ते गेले. श्रीदत्ताप्रमाणें बालोन्मत्त पिशाच्च वृत्ति धारण करून त्यांनीं जी ही अवधूतलीला केली, ही ते पंचमाश्रमी झाल्याची खूणच त्यांनीं दाखविली. दत्त आपणांला पंचमाश्रमीच म्हणून घेत असत. माझा हा पंचमाश्रम आहे असें उत्तर त्यांनीं त्रयोदशावतारांत पिंगल नागाला दिलें आहे. उन्मत्ताचरण पाहूनच पिंगलानें "तुझा हा आश्रम कोणता?" म्हणून प्रभूंना विचारलें होतें. त्याला "पंचमोयं ममाश्रमः" हेंच उत्तर दत्तावधूतांनीं दिलें. "अतिवर्णाश्रमी" असेंही या अवस्थेला पोंचलेल्याला नांव आहे व तो गुरूंचादेखील गुरु होय अशी त्याची प्रशंसा पुष्कळशी 'सूतसंहितेमध्यें' आढळते. एकंदरींत पाहिलें असतां नृसिंहसरस्वती हे श्रीवासुदेवानंदांच्या म्हणण्याप्रमाणें पुढल्या

कोटींत म्हणजे अवधूत कोटींत पोंचले होते. ही गोष्ट त्यांच्या वर्तनावरून सिद्ध झाली. आपल्या सद्गुरुनाथांच्या शिफारसपत्राला त्यांनीं सत्यत्व आणून दाखविलें. तज्ज्ञांना आपल्या स्वरुपाची जाणीव त्यांनीं दिली. पुढेंदेखील ते ती देत राहिले. तो लीलाप्रकार पुढें वर्णिला जाईल. झालेल्या चरित्रावरून गुरुकृपेनें जें मला थोडेंसें सुचलें तें मी येथें लिहिलें आहे.

एकंदरींत, श्रीनृसिंहसरस्वती ही सामान्य मूर्ति नव्हे. वासुदेवानंदांनींच त्यांना जाणलें. इतरांची किंमतच काय कीं, त्यांनीं त्यांना यथार्थ जाणावेत! वासुदेवानंदांच्या वचनावरून व मुनिराजांनीं प्रगट केलेल्या आपल्या स्थितीवरून आम्ही त्यांना श्रीदत्तावधूतच समजतों. श्रीनृसिंहसरस्वती हेच ब्रम्हाविष्णुमहेश्वरांची मूर्ति होत, असें आम्ही निश्चयानें म्हणतों. शास्त्रीय कर्माचरणाची प्रवृत्ति लोकांत करणें हें ब्रम्हदेवाचें लक्षण. शम, दम, दया इ. सात्त्विक वृत्तींची वाढ भजनपूजन उत्सवादिक करून करणें व जनता सुखी राखणें हें विष्णूचें लक्षण होय. ज्ञानोपदेश, अवधूतलीला इत्यादिकांनीं जीवांच्या अविद्या संसाराचा प्रलय करणें, हें महेश्वराचें लक्षण होय. या तिन्ही लक्षणांनीं मंडित असलेले श्रीनृसिंहसरस्वती त्रैमूर्तींचे अवतार होत. जनतेच्या हृदयांत सात्त्विक वृत्तीरूपी साधूंचें संरक्षण करणें, राजस तामस वृत्तींचा विनाश करणें, व परमानंदघन परमात्मस्वरूपीं सर्वांना स्थापणें या जगत्कल्याणकार्यार्थ ते भूमंडळीं प्रगटले. हें जगत्कल्याणाचें कार्य त्यांचें कर्तव्यच होय. तें कर्तव्य ते गुरुभक्तनात्यानें बोलून दाखवीत. " आम्ही आमच्या गुरुमहाराजांचें उर्वरीत कार्य करीत आहों " असें ते म्हणत. " दासस्तेनरसिंहसरस्वती " अशी त्यांची गुरुचरणीं भक्ति होती. दीक्षितांच्या मूळ पुरुषाला मिळालेल्या वरदानाकडे पाहतां गुरुदास म्हणवून घेणें, हें त्या अवतारांतलें वैशिष्टयच आहे, असें दिसून येतें. श्रीनृसिंहसरस्वती भगवानांनीं आपलें ईश्वरी कर्तव्य पुढें बोलून दाखविलें व तें ते गुरुदास आपण आहों या भावनेनेंच बोलले. तें त्यावेळीं निरूपिलें जाईल. अस्तु.

श्रीगुरुनृसिंहयोगींद्रांनीं म्हटल्याप्रमाणें पहिली मंडळी तर योगीचर्येच्या साधनानें दूर केली. त्यांत परशुराम भट शिकेरकर व कृष्णा पुजारी हे दोघे

भक्त टिकाव धरून राहिले. बाकी सर्व भयानें किंवा अन्य वृत्तीनें निघून गेले. गं. भा. काशीबाई बारा वर्षें मठांतली गुरुसेवा कुरुंदवाडाहून येऊन करीत होत्या. त्या बंद झाल्यावर आपल्या खोलींतलें व गुरुमहाराजांचे स्थानींचें झाडलोट, सारवण वगैरे स्वत: स्वामीमहाराज आपले आपणच करीत असत. "स्वामीही आम्हीच, व सेवकही आम्हीच" असें ते म्हणत. तपस्वी स्वयंदास असतो तसे ते स्वयंदास झाले. शुभेच्छेपासून तुर्यगा नामक सप्तमभूमीपर्यंतच्या सर्व भूमिकांना तपोरूपत्व सांगितलेलें आहे. तें तप त्यांचें सुरूच होतें. समाधी लावण्यासारखें उत्तम तप दुसरें नाहीं. "मनसश्चेन्द्रियाणां च ऐकाग्र्यं परमं तप: ॥" असें प्रमाण आहे. जीवन्मुक्ती सिद्ध झाली म्हणजे तिच्यापासून पांच फळें मिळत असतात. तप:सिद्धि हें त्यांतलें पहिलेंच फळ आहे, सर्वसमत्व हें दुसरें, दु:खनिवृत्ति हें तिसरें, सुखाविर्भाव हें चौथें व ज्ञानरक्षा हें पांचवें होय. ही तप:सिद्धि म्हणजेच अविनाशी तप. हें योगींद्राना जन्ममात्र देत नाहीं. लोकसंग्रह या तपानेंच ते करतात. आपलें तप खर्ची घालूनच ते शिष्य करून घेतात. उपदेश देतांना मंत्राबरोबर आपल्या तपांतला भाग ते देत असतात. म्हणून गुरुमुखांतून घेतलेला मंत्रच शीघ्र कार्यकारी होतो. जगत्कल्याण हें तर नृसिंहसरस्वतीमहाराजांचें मुख्य ध्येयच असल्यामुळें, त्यांनीं योगीचर्या आचरली व तपाचा संचय मुबलक केला. सर्वही योगभूमी त्यांनीं आक्रमल्या, व महातपस्वी बनले. शिष्य, भक्त, तटस्थ, आस्तिक, नास्तिक वगैरे सर्वही लोकांच्या उद्धाराची शक्ती त्यांनीं संपादून ठेवली. जे लोक त्यांच्यावर शुद्ध बुद्धि ठेवतील त्यांना तर त्यांचें तप मिळेलच; पण कोणत्याही दृष्टीनें त्यांचें जरी भजन घडलें तरी त्यालासुद्धां तें मिळेल. त्यांच्या दृष्टीमध्येंच अगोदर असें सामर्थ्य आलेलें असतें कीं, ती ज्याच्यावर पडेल तो सर्व पातकांतून मुक्त होतो. एकंदरींत योगींद्र हे सर्व जगत्कल्याण सहजच करीत असतात. जगत्कल्याणार्थ अवतरलेले श्रीनृसिंहसरस्वती तप करतांना स्वयंदास बनले होते इतकेंच आम्हांला सांगायचें आहे. दुसऱ्या मनुष्यावर अवलंबून असलेले सर्वच कार्यक्रम त्यांनीं या योगीचर्येमध्यें बंद केले होते, हें पूर्वी सांगितलेंच आहे.

अमरापूरच्या भक्तांना श्रीगुरुमहाराजांनीं अभिवचन दिलें होतें कीं "तुम्ही भजन चालवा, आम्हीं आज्ञा झाल्यावर तिकडे येऊं." त्या अभिवचनाच्या सिद्धचर्थ त्यांनीं स्वत:देखील आपल्या गुरुमहाराजांचें भजन खोलींत चालविलें होतें. त्यांच्या आज्ञेशिवाय त्यांना वाडी सोडतां येत नव्हती. ते आज्ञा मिळावी म्हणून रोज प्रार्थना करीतच होते; उपोषणें ते करीत. हेंसुद्धां एक त्या प्रार्थनेचें अंगच होतें म्हटलें तरी चालेल. "वाडी सोडून जाण्याची आज्ञा मिळवायला आम्हांला फार कष्ट करावे लागले," असें ते पुढें म्हणाले आहेत. त्या कष्टांपैकींच उपोषणाचे देखील कष्ट समजायला हरकत नाहीं. असो. प्रार्थनेप्रमाणें त्यांना भगवंतांची आज्ञा मिळाली. श्रीवासुदेवानंदसरस्वतींच्या स्वरूपानें श्रीदत्तप्रभूंनीं त्यांना सांगितलें कीं, "श्रीकृष्णेच्या पूर्वतटाकीं जाऊन तुम्ही आमची तेथें स्थापना करा. अमरेश्वर मंदिर बांधा व भक्तिधर्माची स्थापना करा." याप्रमाणें सद्गुरुभगवंतांची आज्ञा नृसिंहमहाराजांना झाली. ती शके १८४३ सालचे कन्यागतीं झाली. महाराजांचा या वर्षीं सतरावा चातुर्मास होता. 'कन्यागत' पुरें होईपर्यंत ते वाडींत राहिले. एक वर्षभर मौनधारी होते. सहा वर्षें उपोषीत होते. पुढें गरुडेश्वरीं गेल्यावर सात वर्षें पुरीं झाल्यानंतर ते अन्न घेऊं लागले. तो इतिहास पुढें येईल.

निजदेशिकांची आज्ञा मिळतांच नृसिंहसरस्वतीमहाराज सखाराम श्रीपाद गेंडे पुजारी व कृष्णंभटजी (कृष्ण श्रीपाद पुजारी) या दोन इसमांबरोबर रात्रौ दहाचे पुढें एक तास बोलत बसूं लागले. बाकीच्यांची विरोध वृत्ती पूर्वी सांगितली ती कायम होतीच. ते कोणी मठांत जात नव्हते व महाराजदेखील कोणाशीं बोलत नसत. जे त्यांनीं लोक सोडले ते सोडलेच. दोन मात्र सोडले नाहींत. ते परमभक्त होते. त्यांतले कृष्णंभटजी हे नेहमीं मठांतच रहात. गुरुमहाराजांचे वचनावर त्यांचा विश्वास होता. पार्थिव पूजा करणें, मठांतल्या महादेवाची पूजा करणें, नारायणस्वामींच्या तीर्थाचें कुंड धुऊन साफ करणें, व भाद्रपद मासीं गणपती करून पदरचा पैसा दक्षणा देऊन फुकट गणपती भक्तांना देणें इत्यादिक गोष्टी ते गुरुमहाराजांचे सांगीप्रमाणें नेमानें करीत असत. सर्व भाऊबंद विरोध करीत तरी पण कृष्णंभटजी

मात्र नृसिंहसरस्वतींवर प्रेमभाव ठेवून त्यांची सेवाच करीत. म्हणून ते धन्य होत.

सखाराम बापू गेंडे हे भाऊबंदसुद्धां विरुद्ध होते. तरी शुद्ध मनानें व प्रेम-भक्तीनें नृसिंहसरस्वतींजवळ जात असत. त्यांच्यापाशीं त्यांनीं पूर्वी बहुत वेदांत श्रवण केला होता. वासुदेवानंदांच्या तसबिरी बनवून ते महाराजांना देत असत. त्यांचेवर महाराजांचें अतिशय प्रेम होतें. रोज रात्रीं त्यांच्याबरोबर तीर्थयात्रेच्या गोष्टी ते करीत बसत. सगळया हिंदुस्थानांतल्या नद्या व क्षेत्रें कोठें कोठें आहेत तीं पहाण्यासाठीं सखाराम बापू मठांत नकाशा नेत. महाराज रोज तीर्थक्षेत्रांची आवृत्ती नकाशा घेऊन मुखानें एकदां तरी करीत. ते म्हणत, " वाचिक यात्रा करून घेतों, कायिक घडेल तेव्हां घडेल. आतां आम्हांला भगवंतांची आज्ञा संचारार्थ झाली आहे. आम्ही आतां अमरापुरांत जाऊन राहणार. " इत्यादि भाषा ते रोज करीत. केव्हां केव्हां असेंही म्हणत, " आम्ही एका संन्याशाला खूप मार दिला. अजून कोणी आमच्याकडे येईल तर त्याला असा मारच आम्ही देऊं. ज्ञानबिन कांहीं देणार नाहीं. " म्हटल्याप्रमाणें त्यांनीं ती योगीचर्येची पध्दत पुढेंसुध्दां केव्हां केव्हां सुरू केली होती किंवा ती वाडींतून त्यांनीं बरोबर नेलीच होती म्हटलें तरी चालेल. क्रमाक्रमानें उपाधि कमी करतांना ते तिचाच उपयोग करीत. गुप्तदानपध्दतीनें एखाद्यावर प्रसाद करीत व त्याला दूर करीत.

ते आतां वाडींतून जाण्याच्या तयारीलाच लागले. त्यांनीं पूर्वी सुचविल्या-प्रमाणें नवीन स्थान करून त्यांत ठेवण्यासाठीं नवीन मंडळी घ्यावयाला सुरु-वात केली. प्रभूंचा संकल्प म्हणजेच त्यांचें तयारी करणें होय. आपोआप संकल्पाप्रमाणें होऊंच लागलें. अनुसूयाबाई नांवाची थोरल्या महाराजांची शिष्यीण कडगांवांत रहात असे. तिला तेथें वासुदेवानंदमहाराजांचा दृष्टान्त झाला कीं, " तूं नरसोबाचे वाडीला जा व अवधूतचर्या करीत असलेल्या जीवन्मुक्त शिखामणि श्रीनृसिंहसरस्वतींची सेवा कर. भय दाखविलें तरी त्यांना तूं सोडूं नको. आम्हीच ते आहों असें समज. " दृष्टान्त होतांच अनुसूयाबाई वाडीला आल्या. पहातात तों योगीचर्या धरून दार बंद केलेलें, खोलींत बसून आपल्या गुरूंचीं पदें, अभंग वगैरे म्हणून आनंद लुटणारे व

बाहेर पडले म्हणजे नृसिंहावतारी वाटणारे असे स्वामीमहाराज त्यांना दिसले. त्यांना त्यांच्या उन्मत्त तांडवामुळें कोणी फलाहारसुद्धां नेऊन द्यायला भीत. कोणी देत असत पण त्यांनीं तोही बंद केला. आठदहा दिवस गृहस्थपणांतले सर्वान्नदानांतले कडक उपासच पुन्हां त्यांना घडले व त्याच वेळीं अनुसूयाबाई दृष्टान्त होऊन वाडींत आल्या. त्यांनीं मठांत माडीवर जाऊन महाराजांपाशीं सेवेची परवानगी मागितली. ती त्यांना त्यांच्या मोठ्या भाग्यानें मिळाली. तेव्हां गांवांत बिन्हाड करून त्या राहिल्या व महाराजांना उपोषणाचे स्वल्प पदार्थ नेऊन देऊं लागल्या. उपासानें प्रकृतींत पित्त होणें साहजिकच होतें. अनुसूयाबाई पित्तनाशक औषधें देत असत. महाराज त्यांची सेवा घेऊं लागले तरी पण त्यांचें मौन होतें तें मात्र ते सोडीत नसत. त्यांची मौनमर्यादा संपल्यावर मग ते त्यांच्याशीं बोलूं लागले.

अनुसूयेप्रमाणें गोदूबाई म्हणून शंकर कौलीकरांच्या भगिनी होत्या. त्यासुद्धां महाराजांचे सेवेला याच वेळीं राहिल्या. त्या दोघी मिळून महाराजांची सेवा करीत. कन्यागतीं कृष्णेचें माहात्म्य फार असतें. गंगा तिच्यांत येऊन मिसळलेली असते. महाराज रोज कृष्णापूजन करीत; कृष्णालहरी म्हणत व प्रत्यक्ष कृष्णेची पूजा घाटावर जाऊन करीत. त्यांच्याबरोबर या दोघी सखया पूजा–आरतीचें सामान भरलेलें ताट घेऊन जात असत व आरती करून परत येत. दत्तप्रभूंची शयनारति पूजा महाराज आधीं करीत. नंतर वर सांगितल्याप्रमाणें कृष्णापूजा रोज कन्यागत पुरा होईपर्यंत करीत असत. त्यांच्या सेवेला अनुसूया व गोदू ह्यांच्याशिवाय तिसरी भाग्यवंतीण कोणीही नव्हती; त्या दोघीच धन्य होत होत्या.

सखाराम बापूंजवळ जेव्हां मग महाराज संचाराला जाण्याच्या गोष्टी बोलूं लागले तेव्हां त्या ऐकून अनुसूयाबाईनीं आपल्याला बरोबर नेण्याची प्रार्थना त्यांना केली. सर्वांचें भवितव्य जाणणारे त्रिकाळज्ञानी श्रीनृसिंहसरस्वतीमहाराज " अनुसूयेला बरोबर घेऊन जाऊं " असें म्हणाले. दिलेल्या वचनाच्या सत्यतेसाठीं त्यांनीं देह ठेवीपर्यंत तिला बरोबर घेतली. तिच्यावर योगीचर्येचा प्रयोग केला नाहीं व तिला सोडली नाहीं. एकदां तिच्यावर तो

उन्मत्त तांडवाचा प्रयोग त्यांनीं केला. पण त्यांत ती टिकाव धरून राहिली. ही त्यांचीच कृपा होय म्हणून तिला त्यांनीं सोडली नाहीं असें आम्ही म्हटलें. अनुसूया व गोदूबाईनंतर रामचंद्र श्रीनिवास कट्टी ब्याकुडकर हे ब्रम्हचारी वाडींत मारुतीची उपासना पाण्यांत उभे राहून करीत असत. हे महाराजांना एक दिवस जाऊन भेटले. आपल्या सेवेची इच्छा करणारा हा आपला दास आहे असें ते त्यांना म्हणाले तेव्हां त्यांचें पूर्वसुकृत जाणून श्रीगुरुनाथांनीं त्यांना प्रवासांत आपल्याबरोबर नेण्याचें ठरविलें. "कट्टी एक असले म्हणजे आम्हांला पुरेत, दुसरे कोणी मग असोत कीं नसोत," असे उद्‌गार त्यांनीं त्यावेळीं काढले.

गोविंदराव डिग्रजकर विद्यार्थीदशेंत सांगलीला होते. त्यांनीं याच संधीला महाराजांकडून गुरुपदेश घेतला. महाराजांनीं त्यांनादेखील आपले म्हटलें; "आम्ही नेहमीं भक्तांचे हृदयांतच वास्तव्य करून असतों" असें महाराज त्यांना प्रेमानें म्हणाले. रामचंद्र शिंगणापुरकर हे गुरुभक्तदेखील या वेळीं महाराजांबरोबर संचाराला जाण्याचा बेत करून त्यांचेपाशीं सिद्ध राहिले. कृष्णंभटजी तर पहिल्यापासून त्यांच्या जवळच होते. या प्रमाणें कृष्णंभटजी, कट्टी, शिंगणापुरकर, गोविंदराव परशुराम भटजी असे पुरुष व अनुसूयाबाई, गोदूबाई व राधाबाई राजहंस इत्यादि स्त्रिया ही नवीन भक्त मंडळी श्रीगुरुमहाराजांनीं आपल्याजवळ केली व वाडी सोडून तीर्थक्षेत्रें करीत संचार करण्याचा निश्चय त्यांनीं केला. कलिमलांतून मुक्त होण्यासाठीं नृसिंहसरस्वती भगवंतांची मार्गप्रतीक्षा तीर्थें, क्षेत्रें, दैवतें व भक्त ठायीं ठायीं करीत राहिले. महाराजांच्या अधहारी दर्शनाची त्यांना उत्कंठा लागून राहिली. अमरापुर क्षेत्र तर सारखी टक लावूनच बसलें होतें. महाराज येतील केव्हां व माझा अज्ञातवास संपवितील केव्हां अशी त्याला तळमळ लागून राहिली होती. श्रीगुरुयोगेश्वर सर्वांचीं मनें जाणत होते. तथापि एकदम ते जाईनात. सद्‌गुरुवासुदेव भगवंतांची आज्ञा जशी आपणांला वाडी सोडण्याची झाली तशी वाडीची व दत्ताचीदेखील झाली पाहिजे. नाहींतर "तुम्हीं जातां कां ?" म्हणून वाडी कदाचित् पाठी लागेल. व्यवहारार्थ जाऊं नका म्हणेल व गेल्यानंतर ती आपली पाठ सोडणार नाहीं. ती तर

जागेवरच राहिली पाहिजे. तिनें आपली पाठ धरूं नये. आपल्या मुखानें तिनें " तुम्ही जा " असें म्हणावें, अशी युक्ती योजावी. असा संकल्प श्रीनृसिंह करीत राहिले होते. संकल्प हीच युक्ती त्यांची समजा. कारण ते सत्यसंकल्प परमेश्वर होते. " यं यं लोक मनसा संविभाति " ही श्रुति इच्छा-मात्रानें प्रभू सर्व करतो, असेंच म्हणते. ती इच्छाच त्यांनीं नुसती केली कीं, ब्राह्मण हेच देवाचें व क्षेत्राचें मुख आहे. त्यानें आपणांला आमच्या इच्छे-प्रमाणें आज्ञा द्यावी, असा संकल्प करून ते राहिले.

कृष्णंभटजी व सखाराम बापू दोघे त्यांचेजवळ बोलत बसत. तेव्हां महाराज " आम्ही आतां जाणार " असें सहज बोलले. त्यावर कृष्णंभटजीं-नीं त्यांना विचारलें कीं, " आपण गेल्यावर स्वारीची पूजा कोण करणार? " महाराज म्हणाले, " आम्ही स्वारीला घेऊनच जाणार आहों " कृष्णंभट म्हणाले, " पुजारी तुम्हांला ती कशी नेऊं देतील ? " महाराज म्हणाले, " स्वारीमधलें बिंब तें आम्ही बरोबर नेणार आहों. महाराजांनीं (वासुदेवमहाराजांनीं) तें आमच्या स्वाधीन केलें आहे. " या प्रमाणें कृष्णंभटजींचें समाधान त्यांनीं केलें. नंतर सखाराम बापू खेदपूर्वक त्यांना म्हणाले कीं, " महाराज, आमचे भाऊबंद थोरल्या महाराजांची आज्ञा मोडून तुमच्याशीं विरुद्धच वागले आहेत. तुम्ही गेल्यावर आमची गति काय ? " महाराज म्हणाले, " श्रीगुरुभक्ती कार्याला विघ्न करणाऱ्या लोकांवर दत्तमहाराजांचा दंड फिरणार आहे. तुम्हांलासुद्धां तो भोगावा लागेल. " सखाराम बापू म्हणाले, " भारतीयुद्धाचे वेळीं रणक्षेत्रांत सर्वांचा संहार करतांना भगवंतांनीं एका पक्षिणीला पिल्लांसहित सुरक्षित ठेविली तसें मला नाहीं का ते ठेवूं शक-णार ? " महाराज म्हणाले, " भाव तसें फळ. "

एके दिवशीं श्रीगुरुमहाराजांनीं अशी उपदेशपर भाषा केली कीं, " काय हो सखाराम बापू ? ब्राह्मण दोघे आहेत. ते एकमेकांवर ईश्वरभावना ठेवतात. एकमेकांना घरीं बोलावतात. श्रद्धेनें एकमेकांची पूजा वगैरे करतात व इच्छित फळ भावानुसार मिळवून घेतात, असा प्रघात चाललेला असतो. आम्हीं म्हणतों फलप्राप्ति एकमेकांना करून देणारे ते दोघे ईश्वरच होत.

त्यांनीं आपापल्यावरच जर ईश्वरभाव ठेवला, व आपलें ईश्वरत्व ओळखलें तर 'यो वेदनिहितं गुहायां सोश्नुते सर्वान्कामान्' या वेदवचनाप्रमाणें ते पूर्णकाम होणार नाहींत काय ?" असें श्रीगुरु म्हणाले. श्रीनृसिंहसरस्वतींनीं आपल्या शिष्यवर्गाला वरील अद्वैतबोधाचा उपदेश केलेला आहे. वाडी सोडून जातांना होणाऱ्या गुरुविरहाचें निरसन त्यांनीं त्यांचें असें करून ठेवलें. अद्वैतबोधच दुःख वारणार असतो व द्वैतभाव हा भयदायक असतो. करितां द्वैतभाव सोडून अद्वैत बुद्धीनें स्वस्वरुपीं सर्वांनीं आनंदांत रमावें," असें कळकळीचें भाषण श्रीगुरु करुणाकरांनीं सखाराम बापूंना निमित्त करून अखिल जिज्ञासूंकरितां केलें. हा गुप्त प्रसादच त्यांनीं जातांना निजभक्तांना दिला असें आमचें मत आहे. अस्तु.

श्रीनृसिंहसरस्वतीमहाराजांच्या इच्छेप्रमाणें वाडीचा तुटक निरोप त्यांना मिळण्याची घटनादेखील आतां सुरू झाली. वाडी पाठीस लागेल असा चिकट निरोप त्यांना नकोच होता. जसा तो पाहिजे होता तसाच त्याचा योग जुळून आला. तो प्रकार असा झाला:- कन्यागत साल असल्यामुळें वाडींतले चारी फडचांचे पुजारी वर्षिलदार अधिकारीच होते. त्या सर्वांनीं मिळून नृसिंहसरस्वतींची वासुदेवाज्ञेनें चालत असलेली उत्सवमूर्तींची शयनारति पूजा बंद करायची, त्यांना शेजारती करूं द्यायची नाहीं, असा ठराव केला. स्वारीपुढचा नैवेद्य हे वांटून सर्वांना देतात. अर्थात् आपली सत्ताच हे गाजवितात. आमच्या हक्काची अशानें पायमल्ली होते, असा आरोप त्यांनीं त्यांचेवर पूर्वीच ठेवलेला होता. तो, व आणखी सर्व पूर्वीचीं कारणें मनांत घेऊन चारी फडेकऱ्यांनीं उत्सवमूर्तींच्या मंदिराला कुलूप लावलें. स्वामीमहाराज नित्याप्रमाणें शेजारती करायला आले, व पहातात तों मंदिराला कुलूप. अंतर्ज्ञानानें त्यांनीं ओळखलें कीं, " आज आपणांला निरोप मिळणार आहे. कुलूप लावून मुका निरोप पुजाऱ्यांनीं दिला खरा; पण अशानें भागणार नाहीं. व्यवस्थिशीरच तो मिळाला पाहिजे, असा त्यांनीं विचार केला व वाडींत आहों तोंपर्यंत गुर्वाज्ञारूपी शयनारति पूजा देहान्त झाला तरी सोडायची नाहीं, असें म्हणून ईश्वरी सामर्थ्याचा आवेश अंगीं आणून त्यांनीं दरवाजावर जोराचा धक्का मारला. त्यासरशीं कुलुपकडी असतांनाच दरवाजा

मात्र एकदम उघडला. हा त्यांनीं तेव्हां चमत्कारच केला व मंदिरांत गेले. नित्याप्रमाणें गाभाऱ्याची झाडलोट करून "स्वारी" पालखींतून उतरून मंदिरांत येण्याची ते वाट पहात राहिले.

स्वारी वरती येण्यापूर्वी नियमाप्रमाणें विष्णु कानिटकर नांवाचा शागीर्द तीर्थांगारा घेऊन प्रथम स्वारीच्या मंदिराच्या मंडपांत गेला. तेथें त्यानें एका बचकेएवढ्या दगडींत तीर्थ घातलें. पण स्वामींनीं हात पुढें केला असतां त्यांना मात्र तें त्यानें रागानें घातलें नाहीं. सर्व पुजाऱ्यांनीं विष्णु शागीर्दाला स्वामींच्या छळणार्थ नेहमींच पुढें केलेला असे; आपण मागें असत. तो म्होरकड्या पुढ्यांत येतांक्षणीं, त्यानें ज्या दगडींत तीर्थ घातलें, तीच दगडी घेऊन महाराजांनीं त्याचे अंगावर फेंकली. मनांतला उद्देश हा कीं, विष्णु शागीर्दानें पुजाऱ्यांना आपल्यापुढें आणावेत. दगडी लागतांक्षणीं तो ओरडतच पुजाऱ्यांकडे गेला व मला स्वामींनीं मारलें असें म्हणाला. तें ऐकून पुजारी त्रस्त झाले व म्हणाले कीं, "स्वामींनीं आजपर्यंत इतरांवरच नारसिंहस्वरूपाचे प्रयोग केले तेव्हां आम्ही गप्प राहिलों. पण आज आमच्या मनुष्यावर यांनीं तो प्रयोग केला. आतां गप्प बसणें चांगलें नाहीं. स्वामींना शेजारतीवरूनच काढायचें आम्ही म्हणत होतों. पण त्यांना मुळीं वाडींतूनच काढून लावले पाहिजेत," असा कृतनिश्चय त्यांनीं केला व सर्व पुजारी एकदम क्रोधाविष्ट होऊन स्वारीच्या मंदिराच्या मंडपांत घुसले.

श्रीनृसिंहसरस्वती मंदिरांत गर्भगृहांत होते. पुजारी मंडपांतून त्यांना अवाच्य शब्द बोलूं लागले. जणूं ते स्वामीमहाराजांशीं युद्धच करणार आहेत, असा त्यांचा आवेश इतरांना दिसत होता. नृसिंहसरस्वतींचे शिष्य कृष्णभटजी, रामचंद्र कट्टी, गोविंदराव डिग्रजकर इत्यादि तरुण गुरुभक्त वीरदेखील तेथें उभे होतेच. तसाच प्रसंग आला तर पुजाऱ्यांचा चांगलाच समाचार घ्यायचा, महाराजांचे अंगाला हात लावूं द्यावयाचा नाहीं असा बेत त्यांनीं मनांत केला होता. पण श्रीगुरुनृसिंहसरस्वती हे रागद्वेषांच्या स्वाधीन होऊन अतिप्रसंग करून घेणारे अज्ञानी जीव नव्हते. ते मायेचे नियंते होते. ते नित्यपूत परमेश्वर होते. इतरांना मृत्यूसारख्या संकटांतून बाहेर काढणारे महा-

समर्थ योगीश्वर श्रीदत्तच ते होते. त्यांना जेवढा इष्ट प्रसंग आणवावयाचा तेवढाच ते आणविणार. ते जरी आपला प्रभाव चमत्कारांनीं लोकांना दाखवीत नसले तरी ते प्रभाववानच होते. शान्ति, क्षमारूप शस्त्रास्त्रें त्यांनीं धारण केलेलीं होतीं. दिव्य ज्ञानाचें सुदर्शन चक्र त्यांचे हातांत होतें. आसुरी माया निजदर्शनानेंच नष्ट करणारे महाविष्णूच ते नरसिंहसरस्वतीस्वामी होत. त्यांचेवर भलताच प्रसंग येणें शक्य नाहीं व तो आलाहीपण नाहीं. लोकदृष्टया जो कांहीं बोलाचालीचा प्रसंग आला, तो तर त्यांना इष्टच होता व तो मात्र तेवढा आला.

श्रीनृसिंहसरस्वती हे मूढ बुद्धि पुरुषांसारखे नव्हते. सर्वत्र आस्थापरित्याग केलेले म्हणजे असंग होते. रागद्वेषरहित निर्मळ असें त्यांचें मन होतें व त्याच्या उलट स्वभावाचे पुजारी होते. असा त्या दोघांत मोठा फरक होता. तोच आतां पुढील प्रसंगीं दिसून येईल. जेव्हां पुजारी मंडपांत येऊन स्वामीमहाराजांना अद्वातद्वा बोलूं लागले, तेव्हां स्वामी मंदिरांतून बाहेर पुजारी उभे राहिलेल्या मंडपांत आले. आंत असतांना बोलायचें नाहीं असा त्यांचा नियम असे. ते बाहेर येतांच पुजारी तरवारीच्या वारांसारखे आपले हात त्यांच्या पुढें नाचवून त्यांना क्रोधानें अपमानकारक भाषा बोलूं लागले. त्या वेळीं नृसिंहसरस्वती हंसत होते. त्यांना क्रोधाऐवजीं हास्यच येत होतें. ते म्हणाले, " पूजकहो, तुम्ही हे अपशब्द देवापुढें व नारायणस्वामींपुढें बोलत आहां हें लक्षांत असूं द्या. त्यांचाच हा अपमान होय. शांतपणा धरा व काय विचारायचें तें विचारा. " पुजारी जास्तच चिडले. ते म्हणूं लागले कीं, " तुम्हांला स्वारीच्या पूजेला कोणी नेमले आहेत काय ? कशाला येथें राहतां ? वाडी सोडून निघून जा. " इत्यादि भाषा रागाच्या आवेशांत पुजारी बोलले. अप्पाशास्त्री म्हणून एक पुजारीच होते. त्यांनीं मात्र महाराजांचा कैवार घेतला. पुजाऱ्यांना ते म्हणाले, " तुम्ही वासुदेवानंदांची आज्ञा उल्लंघन केलीत हें बरें नव्हे. त्यांनीं तुम्हांला नृसिंहसरस्वती हे कोण आहेत, व त्यांच्याशीं तुम्ही कसे वागा म्हणून सांगितलें होतें तें सर्व विसरलां काय ? " पण त्यांचें ऐकतो कोण ? दत्तभट रुके पुजारी यांनीं मात्र सौम्यपणानें प्रश्न विचारला कीं, " स्वामीमहाराज, तुम्ही विष्णु शागीर्दाला



श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील श्रीदत्तपादुका

श्रीनृसिंहवाडी येथील श्रीउत्सवमूर्ति

मारलात कां ? तुमचें काय म्हणणें आहे ? " महाराज म्हणाले, " हा शागीर्द देवाला ओल्या छाट्या पांघरायला घालतो व अन्यायानें वागतो; सबब याला कामावरून दूर करा. " पुजारी म्हणाले, " देवाचें काम मग कोण करील ? " महाराज म्हणाले, " आम्ही करूं; सर्व संन्याशी मिळून तें करूं. " हें म्हणणें पुजाऱ्यांनीं नाकारलें. ते म्हणाले, " आम्ही विष्णूला काढीत नाहीं. तुम्ही सांगणार कोण ? तुम्हांला कोणी नेमलें आहे ? कशाला राहतां ? त्याचें उत्तर कां देत नाहीं ? " वरीलप्रमाणें प्रश्न करणारे व पूर्वीपासून महाराजांबरोबर वादविवाद करणारे पुजारी, पुढारी म्हणून ज्यांचा आम्हीं पूर्वीपासून उल्लेख करीत आलों ते— भास्कर आप्पाजी, नारायण दत्तात्रेय, दत्तू वामन, दत्तू वासुदेव, श्रीपाद सखाराम, श्रीपाद गणेश इत्यादिक होत.

वरील पुजाऱ्यांनीं वर उल्लेखिलेले प्रश्न केल्यावर श्रीनृसिंहसरस्वतीस्वामी शांतपणें म्हणाले, " पूजकहो, तुम्हांला येथें ज्यांनीं नेमलें त्याच श्रीदत्त वासुदेवानंद भगवंतांनीं आम्हांलादेखील नेमले आहेत. सज्जनांच्या संरक्षणासाठीं व दुष्टांच्या शासनासाठीं त्यांनीं आम्हांला येथें ठेविले आहेत. तुम्ही येथून ढकलूनच घालतेत तर जाऊं व खालीं पादुकांजवळ बसूं. "

" परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् "

या भगवद्वचनाप्रमाणें ईश्वरी अवतारांचें प्रयोजन त्यांनीं बोलून दाखविलें व तें गुरुभक्त या नात्यानें बोलून दाखविलें ही गोष्ट महत्त्वाची आहे. अवतारित्व तर त्यांनीं या भाषणांत जाणविलेंच, पण गुर्वाज्ञापालनव्रतित्वदेखील सुचविलें. म्हणजे " आम्ही वाडींत आहों तोंपर्यंत गुर्वाज्ञेप्रमाणें उत्सवमूर्तीची पूजा, शेजारती करणारच, सोडणार नाहीं, " असें त्यांनीं बजावलें म्हटलें तरी चालेल. पुजारी निघून गेले. पुजाऱ्यांचा वर सांगितल्याप्रमाणें निरोप झाला. तेव्हां श्रीनृसिंहसरस्वतींनीं रोजच्या नियमाप्रमाणें स्वारीची शेजारती केली व ते आपल्या मठांत गेले.

दांतओंठ चावून, तावून, काचून, एकेरी शब्दांनीं पुजारी जरी बोलले तरी नृसिंहमुनीश्वर शांत गंभीरच राहिले होते. ते हंसतच बोलत होते.

ही त्यांची शांति पाहून कन्यागतांत अनेक गांवचे जमलेले प्रेक्षक लोक स्वामी-महाराजांची स्तुति करूं लागले. ते म्हणाले, "नृसिंहसरस्वती हे धन्य महात्मे आहेत. पुजाऱ्यांनीं अपमान केला तरी हे शांतच राहिले, विकारवश झाले नाहींत. सोन्याच्या कमळाप्रमाणें यांची मुखकान्ती म्लान झाली नाहीं. चंद्रम्याप्रमाणें हे शीतलच राहिले, तापले नाहींत. समुद्राप्रमाणें यांनीं आपली मर्यादा उल्लंघिली नाहीं. सूर्याप्रमाणें आपली नियति यांनीं राखली. गुरुसेवा सोडली नाहीं. निंदास्तुति समान मानणारे हे संयमिराजे होत. हे आनंदाचे अपार सागरच होत. हे साक्षात् श्रीदत्तभगवंतच होत." इत्यादि प्रकारें लोक स्वामीरायांची स्तुति गाऊं लागले व अशा साधुपुरुषांचा पुजाऱ्यांनीं अवाच्य व अश्राव्य शब्दांनीं छळ केला म्हणून त्यांची ते निंदा करूं लागले. हे लोक ब्राम्हण असून ब्राह्मणांची वृत्ति मात्र यांचेपाशीं नाहीं असें ते म्हणाले. त्यांनीं नृसिंहसरस्वतींची स्तुति केली; पण तिची इच्छा नृसिंहसरस्वतींना नव्हती व ते ती ऐकतदेखील राहिले नाहींत. पुजाऱ्यांच्या मुखानें "तुम्ही वाडी सोडून जा" इतकीं स्पष्ट अक्षरें त्यांना पाहिजे होतीं तीं मिळतांक्षणीं त्यांचें कार्य झालें होतें. आणि म्हणून मात्र ते आनंदांत होते.

प्रकरण १२ वें

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें नृसिंहसरस्वती वाडी सोडण्याची सर्व तयारी करून राहिले. श्रीगुरुवासुदेवानंदांची आज्ञा जशी त्यांनीं मिळविली तशी दत्ताची म्हणजेच पुजाऱ्यांचीदेखील मिळविली. पुजाऱ्यांनीं दिलेला निरोप तीच दत्ताज्ञा ते समजले. वाडींत पुजाऱ्यांचे मुखानेंच दत्तभगवान् सर्वांना आशीर्वाद वगैरे देत असतात. ती दत्ताज्ञा मिळवायला त्यांना योगीचर्येचें सहाय्यच मिळालें. फेंकाफेंकी, ठोकाठोकी वगैरे जे प्रकार त्यांनीं अवधूतलीला म्हणजे उन्मत्त वृत्ति धरून केले त्यांच्या योगानें पुजारी संतप्त झाले व त्यांनीं क्रोधानें का होईना, पण वाडी सोडून जाण्याला परवानगी दिली. त्यांनीं ती दिली म्हणा किंवा स्वामींनींच युक्तीनें ती घेतली असेंदेखील म्हटलें तरी चालेल, ती घेतांना मात्र स्वामीजींना श्रम पडले, व ते त्यांनीं पुढें बोलूनसुद्धां दाखविले. "वाडी सोडण्याची आज्ञा मिळवायला आम्हांला फार श्रम घ्यावे लागले," असे त्यांचे उद्‌गार आहेत. उपोषणें व उन्मत्त तांडव करतांना त्यांना श्रम करावे लागलेले प्रत्यक्ष सर्वांनीं पाहिलेच. शंकरस्वामींना ठोकळ्यानें मारल्यावर ते विश्रान्ति घेत तासभर स्वस्थ पडून राहिले होते. वाडी सोडून त्यांना पलीकडे अमरापुरांत श्रीदत्त वासुदेवानंदांची स्थापना कर्तव्य होती व तिच्यासाठीं ते आज्ञा मागत होते. ती आज्ञा द्यायला प्रभूंनीं ज्या अर्थीं इतके श्रम घ्यायला त्यांना लाविले त्या अर्थीं पलीकडे जाणें त्या दत्ताला अवघड वाटलें कीं काय कोण जाणें !

आम्ही आमच्या अज्ञ दृष्टीनें उन्मत्त तांडवांत श्रम मानले, पण जीवन्मुक्तीशास्त्राच्या दृष्टीनें तें तांडव म्हणजे ब्रह्मसमाधीच मानलेली आहे.

उन्मत्ततांडवस्थस्य चेतश्चेत्क्षीणवासनं ॥
तत्तस्योन्मत्त नृत्यं तु तुल्यं ब्रम्हसमाधिना १ ॥

असें तें शास्त्र म्हणतें. म्हणून शुकाचार्य त्यागी, कृष्ण भोगी, राम व जनक राज्यकर्ते, आणि दत्तप्रभू उन्मत्त पिसे. तथापि या सर्वांची ब्रह्मसमाधि सारखीच होय. तशीच नृसिंहसरस्वतींचीसुद्धां उन्मत्त तांडवांत ब्रह्मसमाधिच होती. म्हणून ते, पुजाऱ्यांनीं दुर्वर्तन केलें तरी, आणि दुर्वाक्यें उच्चारलीं तरी आपण दुर्वाक्य वदले नाहींत. उलट त्यांना "शांतपणें बोला", असें शांतपणेंच म्हणाले, रागावलेदेखील नाहींत. जेव्हां ते योगीचर्यंत मारहाण करतांना रागेजलेले दिसत, तेव्हां ते नुसता नटाप्रमाणें आविर्भावच दाखवीत असत. ती त्यांची लीला होती, खरा क्रोध नव्हता. त्यांना क्रोध असता तर ते पुजाऱ्याप्रमाणें अपशब्द बोलते; पण तसे ते बोलले नाहींत. केव्हांच त्यांचे मुखानें पुजाऱ्यांनाच नव्हे, तर कोणालाही अपशब्द गेलेला कोणीही ऐकलेला नाहीं. पुजाऱ्यांनीं स्वारीच्या दरवाजाला कुलूप लावलें. तेव्हां "सर्वत्र अशींच कुलपें लागतील" असे शब्द नृसिंहमुनींनीं उच्चारले, असें कित्येक सांगतात. पण तो शाप नव्हे, ती अवधूतलीलेंतलीच भाषा होय. त्यांनीं म्हटल्याप्रमाणें पुढें तसा एक दिवस प्रसंग आला होता खरा; पण तो शब्दांचा गुण नव्हे. त्यांचे ते शब्द जर शाप असते तर कायमचींच कुलपें पडतीं; तसें झालें नाहीं. नृसिंहसरस्वती शापानुग्रहसमर्थ होते खरे, पण त्यांनीं अनुग्रहसामर्थ्याचाच सर्वत्र उपयोग केला, शापसामर्थ्याचा उपयोग केव्हांच केला नाहीं. वसिष्ठोक्तीप्रमाणें ते वागले. वसिष्ठ म्हणतात—

नित्यमापूर्णतामंत रक्षुब्धामिंदु सुंदरीम् ॥
आपद्यपि न मुञ्चन्ति शशिनः शीततामिव ॥ १ ॥

असे ते वागत राहिले. म्हणजे चंद्र जसा शीतलता केव्हांही सोडीत नाहीं तशी त्यांनीं आपली शान्ति सोडिली नाहीं. ज्याच्या त्याच्या कर्माचें फळ जो तो भोगणारच असतो. मग ते शाप देऊन आपलें तप कां वायां दवडतील ? ते निर्वैर, निर्मत्सर महायोगीश्वर होते. त्यांच्या गुरुमहाराजांनींसुद्धां त्यांची तारीफ केलेली आम्ही पूर्वी सांगितली आहे कीं, नृसिंहसरस्वती हे काम-

क्रोधादिशून्य निर्वासन मुनी आहेत. स्फटिकासारखे ते शुद्धान्तःकरणाचे आहेत इत्यादि. हें वासुदेवमहाराजांचें वाक्य आम्हांला प्रमाण आहे.

मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः संगवर्जितः ॥
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव ॥ १ ॥

" कोणाचेंही वैर न धरणारा, संगवर्जित, मलाच एक श्रेष्ठ समजणारा, मदर्थ कर्में म्हणजे माझी चाकरी करणारा, असा जो माझा भक्त तो मीच बनतों." या अर्थानुसार वागून स्वतः मी भगवानच बनलों असें जे निजाचरणानें साधकांना शिक्षण देत होते म्हणजे या वरील साधनांनीं तुम्हीसुद्धां भगवद्भाव मिळवूं शकाल, असा बोध जे देत होते ते स्वतः वरील साधन सोडतील कसे ? म्हणजे वैरवृत्ति धरतील कसे ? ज्या वृत्या एकदां निःशेष निघून गेल्या त्या पुन्हां अंतरांत येतीलच कशा ? भागवतांतील भिक्षूची तितिक्षा व शान्ति त्यांनीं लोकांना दाखवून दिली. पुजाऱ्यांनीं तसा प्रसंग जर आणला नसता, तर त्यांना ती दाखवितां आली नसती व आपल्या गुरुमहाराजांचा श्लोक त्यांना सक्रीय प्रतिपादन करून सांगायलादेखील संधि मिळाली नसती. ती संधि उत्पन्न करून देणारे पुजारी त्यांनीं उपकारकच मानले असतील. त्यांच्या गुरूंचा श्लोक तो हा—

कथंचन त्यजेन्नैव विवेकी शान्तिगेहिनीम् ॥
यथा कामाग्निसंतप्तोऽविवेकी कान्तगेहिनीम् १ ॥

" जसा अविवेकी कामुक पुरुष प्रिय स्त्री सोडीत नाहीं तसा विवेकी शान्ती केव्हांही सोडीत नाहीं." हा या श्लोकाचा अर्थ नृसिंहसरस्वतींनीं आपल्या कृतींत आणून आम्हांला दाखविला. पण त्यांना तो कृतींत आणायला पुजारी लोकांनींच संधि दिली. म्हणून आम्हीं नृसिंहसरस्वतींचे व पुजाऱ्यांचे दोघांचेही आभारी आहों.

एकंदरींत नृसिंहमुनिवरांचें बालपणापासूनचें सर्वच चरित्र सर्वांना बोधप्रद असेंच आहे. गृहस्थसाधक व संन्यासीसाधक कसा असावा याचा बोध त्यांनीं दोन्हीं आश्रमाचार पाळून दिला. ज्ञानोत्तर जीवन्मुक्तीचा साधन-

कर्ता तोही कसा असावा तो दाखविला. सिद्धावस्था कशी असते ती प्रसंग आणून त्यांत दाखवून दिली. भक्ति, विरक्ति, शान्ति, दान्ति, दया वगैरे सर्वांचेंच शिक्षण त्यांनीं आजपर्यंतच्या चरित्रानें लोकांना दिलें. जगाच्या हिताचें शिक्षण देणारे नृसिंहसरस्वती जगद्गुरूच होत. त्यांचें गुणवर्णन मजसारख्या पामराकडून कसें होईल ? गणपति, शारदा, शेष अशांनींच तें करावें.

अद्वैत स्थितिचीं विदेह पदवी, आरूढले तीवरी ॥
उन्मत्तापरि नृत्य बाह्य करुनी निर्मुक्त जे स्वान्तरीं ॥
ब्रह्मानंदसमाधि भोगिति सदा येती न वेहावरी ॥
स्वामी श्रीनरसिंह दत्तभगवान् प्रत्यक्ष पृथ्वीवरी ॥ १ ॥

अशा ह्या भगवन्मूर्तीला ज्यांनीं ढकलून घालविलें, त्या लोकांचेंसुद्धां वर्णन कोण करूं शकेल ? अस्तु.

कन्यागत सालांतला तो चातुर्मास यतिशास्त्राप्रमाणें भाद्रपदी पोर्णिमेला पुरा झाला. त्या दिवशीं श्रीगुरु नृसिंहसरस्वतींनीं विधियुक्त क्षौर, स्नान, दंडतर्पण, पूजा वगैरे आपला नित्यनैमित्तिक कार्यक्रम उरकून घेतला. मौनाची पूर्णता केली. म्हणजे, ते विशिष्ट मंडळीबरोबरच जे बोलूं लागले होते ते आतां सर्व भक्तांबरोबरहि बोलूं लागले. चातुर्मास संपला कीं सीमोल्लंघन करण्याचा यतीचा नियम असतो. तदनुसार सीमोल्लंघनाचे मिषानें ते प्रथम वाडींतून निघाले. गरुडेश्वरची यात्रा करणें, श्रीवासुदेवानंदसरस्वतींनी गिरवणूक गरुडेश्वरापर्यंत नेणें हा त्यांचा मुख्य उद्देश होता. म्हणून त्यांनीं वासुदेवमूर्ती आपल्याबरोबर घेतली. भजन करणारे दिंडीगण– कृष्णंभट, काट्टी, शिंगणापुरकर, अनसूया, गोदू, राधा इत्यादिक स्त्रिया व पुरुष मंडळीदेखील बरोबर घेऊन श्रीगुरु प्रथम दक्षिण देशांतली त्रिस्थळी करण्याला निघाले. तेव्हां लक्ष्मणराव फुलारी, सखाराम गेंडे इत्यादिक भक्तदेखील जमले. त्या सर्वांना घेऊन श्रीगुरु नावेंत बसले व त्रिस्थळींतलें पहिलें क्षेत्र जें " काशी " म्हणजे हल्लींचें जें जुगूळ, त्याचे यात्रेला कृष्णाप्रवाहांतून नावेमधून भजन करीत करीत चालले. " दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ

दिगंबरा " या नाममंत्राचा घोष भक्त करीत होते. भक्तगणामध्यें वासुदेवमूर्तिसह श्रीगुरु नृसिंहसरस्वतीभगवान दंड हातांत घेऊन विराजमान झाले होते. त्यांचे अंगावर कापायवर्णाची छाटी शोभत होती. सर्वांगीं भस्माचे त्रिपुंड्र लावले होते. मुखकमल प्रसन्न व हास्ययुक्त दिसत होतें. नयनमनोहर स्वामीमहाराजांची मूर्ति पाहात पाहात भक्त आनंदानें नामसंकीर्तन करून त्यांना रमवीत होते.

जुगूळसंज्ञक काशींत जाऊन श्रीगुरूंनीं भक्तांसहित विधियुक्त तीर्थस्नान, तीर्थपूजन वगैरे केलें. इतक्यांत ग्रामजोशी तेथें आला. तो म्हणाला, " स्वामीमहाराज, आपण मला गेल्या रात्रीं स्वप्नांत दर्शन व प्रसाद दिलात त्या प्रमाणें आपलें दर्शन झालें. वाडीहून दत्त म्हणजे काशीविश्वेश्वरच आपण या काशींत आलांत. " असें म्हणून त्यानें नमस्कार केला. त्याला श्रीगुरूंनीं दक्षणा दिली. तो खूष होऊन समोरच खिद्रापुरला श्रीगुरु जाऊन पोंचेपर्यंत त्यांना पहात उभा होता. नंतर घरीं गेला.

कोपनाथाचे पुढें तीर्थांत स्नान करून श्रीगुरूंनीं त्याची पूजा केली व तेथून पुढें ते येडूर गांवीं वीरभद्राचे दर्शनाला गेले. तेथेंही कृष्णास्नान केलें, वीरभद्राची पूजा केली व मंदिरांत बसले. इतक्यांत वझे नांवाचे सद्गृहस्थ तेथें आले. ते येडूरचेच राहणारे होते. महाराजांना पाहतांच त्यांना आनंद झाला. ते नमस्कार करून महाराजांना म्हणाले कीं, " ज्या दिवशीं कन्याराशीला गुरु आला, त्याच दिवशीं आपण प्रत्यक्ष वीरभद्राचे लिंगावर बसलेले माझ्या मुलाला दिवसाच दिसलां, स्वप्नांत नव्हे हो, जागृतींत. वीरभद्रस्वरूपी दत्तभगवान आपणच आहांत. माझा दीनाचा उद्धार करा. माझे घरीं भिक्षेला या " असें म्हणून वझे नम्र झाले. त्यांच्या संतोषार्थ श्रीगुरु त्यांचेकडे भक्तगणांसह भोजनाला गेले. श्रीगुरूंनीं स्वत: मात्र फराळ केला. गरुडेश्वरीं गेल्याशिवाय अन्न स्वीकारायचें नाहीं असा त्यांचा पण होता. रामराव कट्टी बारा वर्षांपासून उपोषणव्रत करीत होते. त्यांना श्रीगुरूंनीं उपास सोडायला सांगितलें. कट्टी यांनीं आज्ञा प्रमाण म्हणून त्या दिवसापासून अन्न घ्यायला सुरुवात केली. येडूरकर वझे व ग्रामवासी अन्य लोक यांना प्रसाद देऊन श्रीगुरूंची स्वारी परत वाडीला निघाली.

महाराजांचे पाय आजच अमरापुरीं लागावेत असा योग होता, म्हणूनच कीं काय परत येतांना नौका शीघ्र चालेना. स्वारीची शेजारती करण्याचा तर महाराजांचा नेम होता. वाडींतून सकाळीं ते निघाले होते. जुगूळ खिदरापुर व येडूर या तीन क्षेत्रांची यात्रा करून परत येतां येतां अर्ध्या वाटेंतच संध्याकाळ होऊं लागली तेव्हां श्रीगुरु लवकर वाडीला यावें म्हणून नावेंतून कृष्णेच्या पूर्व तीरावर उतरून शीघ्र गतीनें अमरापुरला आले. भक्तदेखील पायींच आले. अमरेश्वराचें दर्शन घेऊन श्रीगुरुनाथ दुसऱ्या एका नौकेंत बसून दिवस मावळल्यानंतर वाडींत आले. लगेच स्नान करून त्यांनीं नित्याप्रमाणें भावभक्तीनें श्रीउत्सवमूर्तीची पूजा व शेजारती केली. चातुर्मासामुळें पालखी बंदच होती. म्हणून आल्याबरोबरच त्यांना शेजारती करतां आली. ही काशीयात्रा व सीमोल्लंघन यात्रा भाद्रपद वद्य प्रतिपदेला झाली.

जुगूळ ही काशी, कोल्हापुर ही गया आणि कृष्णा-पंचगंगा संगम हा प्रयाग. ही दक्षिणी त्रिस्थळी होय. गंगानुजाला ती जशी पूर्वी नृसिंहसरस्वतीदत्तांनीं दाखविली तद्वत् आपल्या भक्तगणाला श्रीनृसिंहसरस्वती गुरुमहाराज ती दाखवीत आहेत. त्यांतली काशीची यात्रा तर झाली. प्रयागची यात्रा पुढें ते करणार; सध्यां गया करण्याला ते निघाले. भाद्रपद वद्य द्वितीयेचे दिवशीं श्रीगुरु अमरापुरीं जाण्याला प्रथम तयार होऊन राहिले. ही बातमी वाडीग्रामांत पसरली, तेव्हां पुष्कळ भक्त मठांत गोळा झाले. त्यांत कांहीं पूजक कन्या व पूजकस्त्रियादेखील होत्या. नृसिंहसरस्वतीप्रभूंनीं वाडींतच रहावें, आमच्याकडे पाहून दीनवत्सलांनीं आमच्या पालकांचे अपराध क्षमावेत वगैरे प्रार्थना त्यांनीं भक्तीपूर्वक केली. श्रीगुरुनाथांनीं त्यांचें नीट समाधान केलें.

जो सत्य आहे परिपूर्ण आत्मा । जो नित्य राहे उदित प्रभात्मा ॥
ज्ञानें जयाच्या नर हो कृतार्थ । तो पूर्ण आनंद गुरू समर्थ ॥१॥

" या श्लोकाच्या अर्थाकडे लक्ष द्या म्हणजे आम्ही कोठें जात नाहीं, सर्वत्र आहों, अशा ज्ञानानें तुमचा शोक निवृत्त होईल. " असा उपदेश श्रीगुरूंनीं त्या भक्तांना केला व जवळ बसलेल्या पुरुष बाळ भक्तांबरोबर गुरुचरित्रांतल्या कचदेवयानीच्या अध्यायावर ते कांहीं निरुपण करीत बसले.

इतक्यांत अमरापुरकर भक्त ब्राह्मण, मराठे, जैन, मुसलमान इत्यादि लोक श्रीगुरूंना अमरापुरीं नेण्यासाठीं मठांत आले. "आम्ही आपल्याला नेण्यासाठीं नौका आणल्या आहेत. महाराजांनीं चलावें," असें ते म्हणाले. श्रीगुरुनाथांचें सर्व गुरुसेवेचें सामान ते नावेंत ठेवूं लागले. इतक्यांत अशी गोष्ट झाली—

एकदोन पुजारी लाजेकाजे मठांत येऊन श्रीगुरूंना म्हणाले कीं, "आम्ही अन्यायी आहों; आम्हांला अनुताप झाला आहे; आम्ही शरण आलों आहों; आपण वाडींतच रहा; जाऊं नका." इत्यादि. त्यावर सर्वज्ञ श्रीनृसिंह-सरस्वतीभगवानांनीं त्यांना सांगितलें कीं, "श्रीगुरुवासुदेवानंद सरस्वती-महाराजांनीं जे नियम तुम्हांला घालून दिले ते सर्व तुम्ही मोडलेत, त्यांच्या आज्ञेचा भंग केलात, हा त्यांचा तुम्ही अपराध केलात, आमचा नव्हे. अनुताप झाला म्हणतां तर सर्व पुजारी तुम्ही सक्षौर प्रायश्चित्त घ्या म्हणजे आम्ही यथें राहण्याची देवाकडून परत परवानगी घेतों." असें म्हणतांक्षणीं ते आलेले दोघे इसम "प्रायश्चित्त घ्यायला कोणी कबूल नाहीं," असें म्हणाले व परत निघून गेले.

यांत एक अशी महत्त्वाची गोष्ट लक्षांत घ्या कीं, नृसिंहसरस्वती हे पूर्ण ब्रह्मनिष्ठ. त्यांचा ज्यांनीं अवमान केला, ते ब्रह्मघातकी ठरतात, "ब्रम्हवेत्त्याचा द्वेष करतात ते ब्रम्हघातकी होत व ते सर्वधर्मबहिष्कृत होत" असें स्मृति-वचन आहे. या वचनाप्रमाणें प्रायश्चित्ताला अयोग्य असलेल्यांनासुद्धां केवळ एका प्रायश्चित्तानें शुद्ध करून घ्यायला नरसिंहस्वामी तयार झाले होते. कारण ते, तो आपला सर्व अवमान विसरले होते. अपकाऱ्यांवर उपकारच ते करूं लागले होते. गुर्वाज्ञाभंगाबद्दलच त्यांनीं विचार केला व तद्दोषपरिहा-रार्थ उपाय सांगितला; पण अनुतापाचें ढोंग केलेल्या लोकांना तो आवडला नाहीं. त्यांनीं आपली शरणागति परत घेतली व ते लज्जित होऊन उठून गेले. दंभाला सत्यासमोर वसवणारच कसें ? तें कांहीं असो. आम्हांला इतकेंच सांगावयाचें आहे कीं, आपला द्रोह करणाऱ्या लोकांवर अनुग्रहवृत्ति धरून, त्यांना आपले करून घ्यायला व आपण त्यांचे व्हायला, जे महात्मे तयार झाले ते नृसिंहसरस्वतीस्वामी खरे क्षमावंत व खरे कृपावंत होत.

चंदन घर्षण केलें तरी सुगंधच देतें, ऊंस पिळला तरी गोड रसच देतो किंवा दूध तापविलें, विरजलें किंवा घुसळलें तरी स्नेहच देतें तद्वत् सत्पुरुष छळले गेले तरी दयाच करतात.

सत्पुरुषांचे उलट दुर्जन असतात. त्यांचेवर कितीही उपकार केले, तरी ते आपलें दुर्जनत्व सोडीत नाहींत. सर्पाला दूध पाजलें तरी तो विषच ओकतो तद्वत् खल सज्जनाचा छळच करतात. त्यांना त्यांच्या दुष्कर्माचें फळ ईश्वर देतो. सत्पुरुषांनीं शाप दिला नाहीं तरी ईश्वर त्यांचें शासन करतो. याबद्दल गीता प्रमाण आहे. भगवंतांनीं म्हटलें आहे कीं, "काम, क्रोध, लोभ, मत्सर धारण करून माझ्या विभूतींचा जे द्वेष करतात त्यांना मी नरकतुल्य आसुरी योनीला पाठवितों व माझ्या भक्तांचा मी संसारसागरांतून उद्धार करतों अशीं दोन तऱ्हेचीं फळें मीं दोघांना देतों." अस्तु.

सत्वसंपदेची खाण, सत्पुरुषांचे मुकुटमणी, वासुदेवानंदांचे पूर्ण कृपापात्र, जीवन्मुक्तांचे राजे, सर्वभूतहितैषी, परमकारुणिक, दीनदयाळ, भक्तेष्टपूरक, दत्तावतारी श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य नरसिंहसरस्वतीभगवान अमरापुरला जाऊं लागले. त्यांनीं जातांना क्षेत्रांतल्या दत्तविभूती, ज्या रामचंद्र योगी, नारायणस्वामी, गोपाळस्वामी इत्यादि देवता, त्यांना प्रत्येकापुढें नारळ व दक्षणा ठेवून वंदन केलें. श्रीदत्तप्रभूंना नारळ दक्षणेसह-साष्टांग प्रणिपात केले, व ते भक्तांसह आपल्या देवांना म्हणजे श्रीवासुदेवानंदसरस्वतींना घेऊन नौकेकडे निघाले. भक्तांचीं नांवें पूर्वी सांगितलीं. त्यांतले कृष्णंभटजी पुजारी हे भक्त "आपल्या स्वजनांना सोडून मी कसा जाऊं ?" असें मनांत येतांच नांवेंत उतरायचेवेळीं जरासे घोटाळूं लागले. सर्वज्ञ प्रभूंना तें समजलें. त्यांनीं कृपावंत होऊन आपल्या भक्ताला सांगितलें कीं, "कृष्णा, हा स्वजनांचा मोह तूं सोडून दे. भिऊं नको. धैर्य धर. या भक्तिरूपी नौकेचा आश्रय धैर्यानें कर. आम्ही तुझा योगक्षेम चालवूं. हो पुढें. तूं आधीं नावेंत पाऊल टाक." असें म्हणतांच त्या गुरुभक्ताला धैर्य आलें. तो नावेमध्यें गुरुसाहित्य घेऊन उतरला व नंतर मग नृसिंहसरस्वतीप्रभु आपण नौकारूढ झाले. "स्नेहपाशांतून भक्त लोकांना आम्ही असे सोडवितों" असें भक्तोद्धारांनीं सर्वांना स्ववर्तनानेंच बोधित केलें. असो.

आपले सद्गुरु वासुदेवानंद दत्तप्रभू देशसंचाराला चालले आहेत. त्यांचे आपण दास त्यांच्या स्वारींतून जात आहों अशा भावनेनें श्रीगुरु वासुदेवमूर्तीजवळ नौकेमध्यें जेव्हां बसले, तेव्हां अमरापुरकर भक्त हे अक्रुराप्रमाणें आपल्या गोपाळकृष्णरूपी नृसिंहमहाराजांना घेऊन चालले, असें वाटून गोपीगोपाळांप्रमाणें दुःखीकष्टी झालेले गुरुभक्त असे कांहीं वाडींतील लोक रुदन करूं लागले. त्यांना गुरुविरह दुःसह झाला. प्रेमी, द्वेषी, मत्सरी, भक्त, अभक्त, आस्तिक, नास्तिक, उदासीन वगैरे सर्व वृत्तींचे ग्रामस्थ वाडीच्या दत्तघांटावर उभे राहून नरसिंहगमन पहात होते. फार काय सांगू? विमानांतून देवसुद्धां पहात होते. ते मनांत म्हणाले असतील कीं, "वाडीकरांनीं अनर्घ्य रत्न हातचें गमावलें याबद्दल आश्चर्यच वाटतें. त्याची परीक्षा यांना झाली नाहीं, म्हणून हातचा परमेश्वर यांनीं घालविला व परमेश्वरसुद्धां महामायावीच आहे, तो आपला पत्ता कोणाला सहसा लागूं देत नाहीं, आजपर्यंत गुप्त असलेला अमरेश्वर प्रभु आज प्रगट होऊन अमरापुरला जात आहे. त्याचेबरोबर भाग्यवंत भक्त प्रेमानें भजन करीत आहेत. नरसिंह नामधारी हे अमरेश्वर भक्तोद्धारार्थ वासुदेवदत्तप्रभूची स्थापना अमरापुरांत आतां करतील इत्यादि. नौकेंतील सर्व भक्तगणांनीं "श्रीनरसिंहसरस्वतीस्वामीमहाराजकी जय, श्रीगुरुवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजकी जय, श्रीगुरुदेवदत्त," असे उच्च जयजयकार केले व नाव निघाली. अमरापुरच्या तटाला अमरापुर गांव स्वागतार्थ लोटला होता. भक्तगणांच्या भजनाचे गजरांत श्रीगुरुसुध्दां "दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा" असें गुरुभजन करीत चालले होते. कृष्णंभट, कट्टी, शिगणापुरकर, परशुरामभट, तानू, अनसूया, गोदावरी वगैरे भक्त महाराजांचे देव घेऊन जात होते. महाराजांनीं नावेंत बसायचे वेळीं तानूआका नामक पूजककन्येला बरोबर येण्याची इच्छा असेल तर चल म्हटलें. तेव्हां अनुसूयाप्रमुख स्त्रीभक्त समाजांत त्या सामील झाल्या. हया सर्व भक्तांसह वासुदेवानंदमूर्ती घेऊन श्रीनृसिंहसरस्वती अमरापुरांत प्रविष्ट झाले. तेव्हां तेथील नगरवासी नारीनरांना महाराजांचे आगमनानें मोठा आनंद झाला. "नृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजकी जय" असा जयघोष सर्वांनीं केला.

श्री नृसिंहसरस्वती सद्गुरुनाथांनीं श्रीदत्तांच्या बालोन्मत्त पिशाच वृत्तीच्या आचरणानें वाडीकरांचे डोळ्यांत धूलिक्षेपच केला. म्हणून ते त्यांना वेडे समजले. स्वामीमहाराजांचें डोकें फिरलें, असें ते म्हणत असत. " स्वामी वेडे झाले " असें म्हणून घेणें श्रीगुरुनाथांना आवडूनच त्यांनीं तसें म्हणवून घेतलें. ते म्हणत असत कीं, आपल्या वासुदेवमहाराजांचीच कीर्ति लोकांनीं गावी. त्यांनाच पूज्य मानावेत. त्यांच्यापुढें आपलें महत्त्व नसावें. गुरुवासुदेव व दत्तगुरु एकच. तेच खरे थोर. त्यांच्या कृपेनें आपण जगतों. तेव्हां त्यांच्या स्थानांत आपला गौरव नसावा, त्यांचाच तो असावा. आपलें नांवसुद्धां कोणी घेऊं नये, अशी भक्तिपूर्ण कृतज्ञता मनांत धरून आपणांला वेडे म्हणवून घेऊन ते वाडींतून गेले; असें तरी आम्ही त्यांच्या उद्गारांवरूनच म्हणतों. लक्ष्मणराव फुलारी यांनीं अमरापुरच्या वाळवंटांतून श्रीगुरु चालले असतां त्यांना म्हटलें कीं, " महाराज, या जगांत चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं. वाडीकरांना आपण चमत्कार दाखवा. म्हणजे ते आपणांला न्यायलासुद्धां येतील. " यावर महाराज म्हणाले, " लक्ष्मणराव, श्रीगुरु वासुदेवानंदप्रभूंनीं आपल्याला सर्व कांहीं दिलें आहे. पण गुरूपेक्षां आपण स्वतःला मोठा म्हणवून घेऊं नये. श्रीगुरूंचाच महिमा जगांत व्हावा व तो आम्ही गावा यांत आम्हां गुरुभक्तांना भूषण आहे असें आम्हांला वाटतें. नाहीं तर गुरुकृपेनें चमत्कार करून दाखवायला कांहीं मोठेंसें अवघड नाहीं. " या स्वामीमहाराजांच्या भाषणावरून आम्ही वरती त्यांचा हेतु सांगितला. पुढें श्रीगुरु जेव्हां नणदीला गेले तेव्हांसुद्धां त्यांनीं अशा अर्थाचेंच भाषण नणदीकरांजवळ केलें. नणदीकरांनीं जेव्हां त्यांना विचारलें कीं, " गुरुमहाराज, हया आपल्याबरोबर आलेल्या स्त्रिया स्त्रीस्वभावानुसार आपसांत झगडे करतात. त्याचा त्रास आपणांला होत असेल असें मला वाटतें. सबब यांना त्यांच्या त्यांच्या गांवीं पोंचवूं काय ? " त्यावेळीं श्रीगुरुनाथांनीं त्यांना सांगितलें कीं, " आम्हांला लोकांनीं, त्यांतले त्यांत वाडीकरांनीं, स्वामी भ्रष्ट झाले, बिघडले, असेंच म्हणावें म्हणून हया स्त्रिया आम्हीं मुद्दामच बरोबर घेतल्या आहेत. तुम्हांजवळ सांगितलेला हा हेतु तुम्ही कोणापुढें बोलूं मात्र नका; गुप्त ठेवा. " हया श्रीगुरूंच्या खास भाषणावरून त्यांचा हेतु उघडपणें

सर्वांना कळतोच आहे. " वाडीमध्यें दत्तभगवान् व वासुदेवभगवान्च पूज्य व स्तुत्य व्हायेत; आपण होऊं नये. " अशी इच्छा करणारांचे हृदयांत केवढी गुरुदेवमर्यादाबुद्धि असली पाहिजे, ती मीच कशाला सांगायला पाहिजे ? सकळ सूज्ञांना ती सहजच कळेल. वाडीकरांनीं आपणांला वाईट म्हणावें म्हणून बरोबर घेतलेल्या स्त्रिया आपल्याला जगानेंदेखील वाईट म्हणण्याला कारणीभूत होतील, ही गोष्ट त्यांना समजतच होती. पण लोकनिंदा त्यांना इष्टच वाटली अशल्यास कोणी काय करावें ? तसें वाटणें हें त्यांच्या परमहंस बाण्याला उचितच होतें.

निंदावमानावत्यंतौ भूषणं यस्य योगिनः ॥
धीविक्षेपः कथं तस्य वाचाटैः क्रियतामिह ॥ १ ॥

या श्लोकांत ती उचितता दाखविलेली आहे. श्रीगुरुनाथांच्या अहिल्या मातोश्रींना व गुरुचरित्रांतील नरसिंहसरस्वतींच्या अंबामातोश्रींना डोहाळेच तसे लागले होते. परमहंस स्थितीचेच ते होते. अहिल्यामाय म्हणत असत, 'मला परमहंसस्थिति आदरावीशी वाटते.' अंबामाय तर असें म्हणत असत कीं,

सुधापमानो विषमेवमानो भिक्षासमानं न च सोमपानं ॥
तदेव मेऽभीष्टतरं परं नो हृदापि कांक्षे कुसुखं न वीक्षे ॥ १ ॥

या प्रमाणें दोन्ही मातांचे डोहाळे एकसारखेच होते. त्यांचे गर्भातिमे एकाच परमहंसवृत्तीचे होते व ते पुढें परमहंसच झाले. एकच नरसिंहसरस्वती संज्ञा त्यांनीं धारण केली व सच्चिदानंद ब्रह्म हें एकच त्यांचें स्वरूप होय. स्वरूपांत तिळमात्र भेद नाहीं. एकच ते हे नरसिंहसरस्वती गुरुमर्यादापालनार्थ आपणांला कनिष्ठ मानून घेते झाले; वेडा म्हणवून घेते झाले. लोक आपला अनादर करोत म्हणून त्यांनीं वाडींत योगीचर्या आचरून दाखविली व तिच्यांतलाच एक प्रकार म्हणून स्त्रिया बरोबर घेऊन ते अमदापुरीं गेले. तेथून ते भगवान भक्तांच्या इच्छेस्तव त्यांच्या त्यांच्या गांवीं जातील. त्यांच्यावर अनुग्रह करतील. भक्तांकडून पूजा घेतील. गुरुस्थापना करतील. लोकांना भक्तिमार्गाला लावतील. ज्ञान देतील, सर्व कांहीं जगदुद्धारार्थ ते करतील; पण " मी एक गुरुदास आहें " हा

आपला गुरुभक्तबाणा मात्र ते सोडणार नाहींत, व योगीचर्येचेंच एक अंग असा जो स्त्रियांचा मेळा तोदेखील ते सोडणार नाहींत. म्हणजेच भस्माच्छादित अग्नीप्रमाणें अभाविकांना तें गुप्तच राहतील व शुभाविक त्यांच्यापासून स्वहित साधून घेतील. त्यांना ते साक्षात् दत्तभगवान दिसतीलच.

श्रीनृसिंहसरस्वतीमहाराजांचें वागणें पहिल्यापासून सर्वच गूढ. तसेंच तें पुढेंसुध्दां त्याहून जास्तच गूढ म्हटलें तरी चालेल. पहिल्यांदां त्यांनीं आजपर्यंत माया जवळ केली नव्हती पण आतां त्यांनीं माया स्वीकारली आहे. म्हणून ते पहिल्यापेक्षां जास्त गूढ झाले. अनसूयासंज्ञक माया त्यांनीं बरोबर घेतली ती आरंभापासून अंतापर्यंत ठेवली म्हणून हा " मायायुक्तावधूत " संज्ञक नवा अवतारच आम्ही मानतों. या अवतारांत ते आपल्या गुरुवर्यांची उर्वरित कृति करूं लागले. त्यांचे गुरु म्हणत असत कीं, " आमची अवधूतचर्याच तेवढी बाकी राहिली आहे. " विधिनिषेधातीत वर्तन करणें, उन्मत्त पिसेपण दाखविणें इत्यादि स्वरूपाची ती अवधूतचर्या श्री दीक्षितमहाराजांनीं आतां या नव्या अवतारांत सुरू केली. उन्मत्त पिसेपणा त्यांनीं वाडींत दाखविलाच. संन्यासी असूनसुद्धां स्त्रिया सहवासी ठेवणें, अभ्यंगस्नान करणें, दुसऱ्याचे घरीं भोजनाला जाणें, पायांत त्राण घालणें, वाहनांत बसणें, सर्वांना शिवून घेणें इत्यादिक गोष्टी त्यांचे गुरूंनीं केल्या नव्हत्या त्यासुद्धां ते आतां करूं लागले. विधिनिषेधातीत वागणें तें हेंच होय. पंचमाश्रमी यालाच म्हणतात. ही पुढची स्थिति गुरूंनीं शिल्लक ठेवलेली यांनीं उचलली. म्हणूनच त्यांचे गुरु त्यांना भविष्य वृत्तीनें असें म्हणत कीं, " नरसिंहसरस्वती आमच्यापेक्षांही पुढचे आहेत, आमच्यापेक्षां कांकणभर अधिकच ते आहेत इत्यादि. " तें त्यांचें म्हणणें आतां लोकांना पटू लागलें. आतां म्हणजे जेव्हां श्रीगुरूंनीं मायायुक्तावधूतचर्या सुरू केली तेव्हां. अस्तु.

श्रीगुरु अमरापुरांत जातांक्षणीं तेथल्या असंख्य लोकांनीं त्यांचें स्वागत केलें. एका मुसलमान शाहीरानें तर त्यांचें वर्णन एका मोठ्या कवितेंतच केलें इतके ते सर्व लोकांना प्रिय झाले. हिंदु लोकांना ते प्रत्यक्ष श्रीदत्त अमरेश्वर भगवान भासले. मुसलमानांना पैगंबर अल्लाच ते वाटले. चिचेच्या

मोठ्या वृक्षाखालीं व्याघ्रासनावर श्रीगुरु भगवान विराजित झाले. त्यांच्यापुढें सर्व लोक सभोंवार बसले होते. अमरापुरकर शंकरराव कुलकर्णी वगैरे भक्तसमाज प्रेमानें त्यांना म्हणाला कीं, " नरसिंहसरस्वती या स्वरूपानें, श्रीदत्तामरेश्वर आमचा आम्हांला आज मिळाला. आमच्या येथें पूर्वी घेवड्याची शाक सेवून तो जो वाडींत राहिला होता, तोच योगिनीवरद श्रीगुरु अमरापुरांत योगिनीसन्निधच पुन्हां आला. आम्ही केलेल्या भजनाचें फळ आम्हांला मिळालें. वाडी सोडून येथें येण्यांत आपण आपली भजनप्रियता आम्हांला जाणविलीत. पूर्वी भाजी तरी आपणांला पाहिजे होती, पण या अवतारीं भजनानेंच आपण संतुष्ट झालांत. आपल्या आगमनानें आम्ही कृतार्थ झालों व हा आकाशचुंबित चिंचेचा तरूसुद्धां आपल्या निवासानें कल्पवृक्षाचा धि:कार करीत आहे. औदुंबर असो, वट असो, आमलक असो, अश्वत्थ असो, कीं कोणताही तरु असो; आपल्या आश्रयानें तो पूज्य व धन्य होय. आपल्या योगानें सगळें जगच नंदनवन, पृथ्वीच काशी, जळ तितकें गंगोदक, सर्व क्रिया पुण्यरूप व प्राकृत, संस्कृत सर्व वाङमय वेदतुल्य होय. मग आम्हीसुद्धां सगळे जन पावनच नाहीं काय ? आम्ही सर्व आपल्या दर्शनानें भाग्यवान् झालों. "

याप्रमाणें स्वागतपर भाषण ऐकून घेतल्यावर श्रीगुरूंनीं त्यांना चार उपदेशाचे शब्द सांगितले. ते म्हणाले, " तुमच्या भक्तीला वश होऊन अमरेश्वर दत्तस्वरूपी श्रीवासुदेवानंदसरस्वती आम्हांबरोबर येथें आले आहेत. भजनप्रिय ते आहेत. जसें आजपर्यंत तुम्ही भजन केलेंत तसेंच पुढें अखंड चालू ठेवा. भक्ताभिमानी प्रभू भक्तांचें अभीष्ट पुरें करतील " असें उपदेशपर भाषण करून श्रीगुरूंनीं त्या भाविकांना नवीन भजन शिकविलें तें असें—

वासुदेवानंद स्वामिराज गुरु, अमरेश्वर दत्तगुरु,
भज भक्तांचे कल्पतरु ॥ १ ॥

सर्व बालगोपालांनीं तें भजन महाराजांबरोबर म्हटलें. श्रीगुरूंनीं दर्शनाला आलेल्या सर्व जातीच्या लोकांना स्वहस्तें प्रसाद दिला. मराठे लोकांच्या प्रेमास्तव त्यांनीं त्यांना चरणस्पर्शपूर्वक वंदनाला परवानगी दिली. " आज

आम्ही आतां दंड ठेविला " असें ते म्हणाले. दंड म्हणजे विधिनिषेधशास्त्राचा नियम असा भावार्थ. नंतर श्रीगुरु शुक्लतीर्थावर संध्या करून आले व भक्तांनीं पर्णकुटी बांधून ठेविली होती तींत रात्रभर राहिले. आपल्या गुरुमूर्ति वासुदेवाचें भजन, पूजन, आरती त्यांनीं तेथें केली. अमरापुरकर भजनी मंडळीनें भजन केलें. तें श्रीगुरूंनीं प्रेमानें ऐकलें. सर्व स्त्रीपुरुष भक्तमंडळीचे फराळ त्याच झोपडींत झाले.

श्रीगुरुनाथांच्या भक्तिप्रियतेचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे. विद्वानांनीं भरलेला ब्राह्मणप्रचुर गांव सोडून म्लेंच्छप्रचुर गांवांत जे आले, आपला पूर्वीचा टोलेजंग मठ किंवा अमरापुरांतील मोठीं मोठीं सदनें वगळून भक्तांनीं बांधून दिलेल्या झोंपडींत जे राहिले, जाति, कर्म, विद्यादिकांनीं विहीन अशा त्या भोळ्या निरभिमानी भक्तांनीं दिलेला दुग्धफलाहार पंचपक्वान्नें वर्ज्य करून ज्यांनीं स्वीकारला, वेदघोष ऐकणें सोडून जातिहीनांचे मुखानें भजनच ज्यांनीं श्रवण केलें, त्या भाविकांत बसले, त्यांच्याबरोबर हंसले, बोलले, चालले; फार काय, त्यांचेच होऊन राहिले, त्या भक्तांचे सर्व उपचार अत्यंत प्रीतीनें ज्यांनीं ग्रहण केले इतका प्रेमा त्यांच्यावर ज्यांनीं केला त्यांचे हृदयांत भक्तीची आवड केवढी बरें असली पाहिजे ! तिचें माप कोणी करूं शकेल काय ? श्रीकृष्ण भगवंताचे हृदयांत विदुराचे घरच्या कण्या खातांना जितकी आवड होती तितकी आवड नृसिंहसरस्वतींच्या हृदयांत अमरापुरकर भक्तांचे प्रेमोपचार घेतांना होती, असें मला वाटतें. भगवंताला भक्तच आवडतात. " आवडतीचें मीठही गोड " अशी म्हण आहे. तदनुसार श्रीगुरूंना भक्तांचें सारेंच गोड लागलें. त्यांची जात, त्यांचें कर्म, त्यांचें कुळ, त्यांची भूमि, त्यांची झोंपडी, त्यांची काणी, त्यांचे दाणे, त्यांचें पाणी भक्तिप्रियाला ब्रह्मरसापेक्षांसुद्धां अत्यंत मधुर लागलें.

भोळ्या भाविकांच्या संगतींत आल्यावरोबर श्रीगुरुभगवंताला झालेला आनंद ब्रह्मसमाधीच्या आनंदापेक्षांसुद्धां कितीतरी पटीनें अधिक होय. समाधिसुखाचें वर्णनच जर श्रुतीला करवत नाहीं तर त्याहून अधिक अशा भक्तिप्रेमसुखाची वर्णना ती कशी करणार ? श्रुतीला वर्णिता येईना

त्याचें वर्णन दुसरा तरी कोण करणार ? अर्थात् श्रीगुरुनाथांना भक्तांच्या झोंपडींत बसून भक्तिरसपान करीत असतां झालेला आनंद त्यांचा त्यांनींच जाणावा. आम्ही त्याचें वर्णन करूं शकत नाहीं व नित्यानंदरूपी भगवंताला नवा आनंद तो काय होणार ? असेंही म्हणत नाहीं. काडवातीनें सूर्याचा संतोष झालेला दिसतो, किंवा जेवलेल्या मातेला बालकानें दिलेल्या ग्रासानें अधिक तृप्तता आलेलीही दिसते; तद्वत् श्रीगुरुनाथ नित्यानंदरूप असूनसुद्धां भक्तांच्या प्रेमोपहारानें अधिक आनंदित झालेच असले पाहिजेत, यांत वादच नाहीं. भक्तिमान अशा स्त्रिया, शूद्र, रजक, जैन, मुसलमान इत्यादिकांपुढें, अभक्त म्हणून, वेदवेदांगपारंगत ब्राह्मणसुद्धां त्यांना तुच्छ वाटले असावेत.

भक्त्या तुष्यति केवलैर्नतु गुणैर्भक्तप्रियः श्रीपतिः ॥

हें ब्रीद बाळगणारे भगवान नरसिंहसरस्वती होते. म्हणून पूर्वी वर्णिल्याप्रमाणें जातिवर्णादिकांचा विचार न करतां ब्राह्मणांनीं गजबजलेली वाडी सोडून म्लेंच्छमय अशादेखील अमरापुरांत जाऊन ते राहिले. पाण्याची धांव खोलगट जागेकडे सहजच असते, उन्नत भूमीकडे ती असत नाहीं. अमरापुराचें वर्णन करतांना त्यांनीं त्याला काशी म्हटलें. गोपूर म्हणजे गौरवाड ही त्यांनीं गया ठरविली व संगम हा प्रयाग मानला. दक्षिणेंतली त्रिस्थळी वर सांगितलेलीच त्यांनीं निश्चित केली. इतकें महत्त्व त्यांनीं त्या गांवाला दिलें. फार काय सांगावें ! आपल्या देवाधिदेव वासुदेवानंद सद्गुरुमूर्तीचीसुद्धां त्यांनीं तेथेंच स्थापना केली. यापेक्षां आतां त्या क्षेत्राला त्यांनीं किती महत्त्व द्यावें ? महत्त्व देण्याची परमावधीच केली. असतु.

शबरी जशी वनांत तप करीत होती तशा दत्ताबाई पाठक चारपांच वर्षांपासून जुन्या अमरेश्वराचे मंदिरांत बाहेरचे बाजूस झोंपडी करून रहात असत. तेव्हां तेथें फडेनिवडुंगाचें जंगल होतें. वाडींत जाऊन श्रीगुरुमहाराजांकडून तेल, तूप, बुक्का, अष्टगंध, उदवत्या वगैरे पूजासाहित्य त्या वरचेवर आणीत व अमरेश्वराची सेवाभक्ति करून जंगलांतच रहात. भिक्षा मागून खात. महाराज त्यांच्यावर फार प्रेम करीत असत. भावी गुरुस्थानांत

राहणारी भक्तीण त्यांना आवडली होती म्हणून ते तिला पूजासाहित्य पुरवीत होते. अमरापुरांत महाराज येतांच तिला साक्षाद्वैकुंठपति महाविष्णुच आले असें वाटलें. शबरीनें जशीं प्रेमानें वन्यफळें रामरायाला अर्पण केलीं तद्वत् दत्ताबाईंनीं श्रीगुरुनाथांना भिक्षा मागून आणलेले शेंगदाणे व गाईचें वाटीभर दूध प्रेमानें अर्पण केलें. तें भगवंतांनीं मोठ्या आवडीनें स्वीकारलें, संतुष्ट झाले व भक्तिणीला म्हणाले कीं, " दत्ताबाई, तुमच्या भक्तिभावाला वश होऊन भगवान श्रीवासुदेव येथें आले. अशीच भक्ती चालवा म्हणजे ते तुमच्या हृदयमंदिरांत कायमच राहतील. " गुरुनाथांची गौरवयुक्त अमृतवाणी ऐकून दत्ताबाईंना धन्यता वाटली. त्यांनीं नेत्रांतून पाणी काढलें व श्रीगुरूंना दंडप्राय नमस्कार घातला. पुष्कळ स्तुतीदेखील केली. देव व भक्त आनंदित झाले.

नंतर महाराज मृगासनावर पहुडले. सर्व भक्त झोंपीं गेले. दुसरे दिवशीं श्रीगुरूंनीं प्रातःस्नान, संध्यावंदन, पूजन इत्यादि उपासना केली व त्रिस्थळीपैकीं गयेला म्हणजे कोल्हापुरला जाण्याची त्यांनीं तयारी केली. कोल्हापुरची महालक्ष्मी महाराजांना आपल्या पुराला नेण्यासाठीं आली होती. त्याबद्दलची हकीगत पुढें सांगणार आहों. मुख्य यात्रा गरुडेश्वरची. बाकीच्या यात्रा ह्या तिच्या अंगभूत समजाव्यात. महाराज निघालेले पाहून अमरापुरकर सोळा भजनी गडी त्यांचे पुढें आले. ते म्हणाले, " आम्ही गुरुमहाराजांना मिरजेपर्यंत नौकेंतून पोचवावें म्हणतों. " महाराज " बरें आहे " म्हणाले. लगेच भक्त मोठी थोरली नाव घेऊन आले. त्यांच्या इच्छेस्तव श्रीगुरु नौकेवर निघाले. जातांना त्यांनीं अमरापुरवासी कारागीर लोकांना व कुलकर्ण्यांना असें सांगितलें कीं, " गरुडेश्वरचे यात्रेला आम्ही जात आहों. सध्यां करवीरची यात्रा करून घेतों. नंतर अमरापुरची पंचक्रोशी यात्रा करूं. तोंपर्यंत येथें असलेलें हें जीर्ण मंदिर उद्धृत होऊं द्या. अर्थात् त्या ठिकाणीं नवें बांधून तयार होऊं द्या. म्हणजे श्रीवासुदेवदत्तामरेश्वराची स्थापना करून गरुडेश्वरला जाण्याला आम्ही मोकळे होऊं. " याप्रमाणें आज्ञा करून मंदिराची सुरुवात करून देऊन श्रीगुरु नृसिंहसरस्वती भक्तगणासहवर्तमान नौकारूढ झाले. पूर्वी सांगितलेल्या भक्तांत आणखी नवीन कांहीं बाळभक्त येऊन दाखल झाले होते. वाडीहून ते आले होते. दत्ता कवीश्वर, दिगंबर

हुन्नळे, बापू कोडणीकर, बाळू पुजारी वगैरे हे नवे व कष्णंभट, कट्टी, गोविंदराव, शिगणापुरकर वगैरे हे पहिले. हे सर्व बाळभक्तच होते. यांच्याशिवाय आणखीही कांहीं भक्त, तसेंच अमरापुरकर भक्त व स्त्रिया भक्त असे एक नौकाभर भक्त संगें घेऊन श्रीगुरु भजन करीत वासुदेवमूर्ती घेऊन तिची जलक्रीडा करीत जेव्हां जाऊं लागले तेव्हां भक्तांनीं मोठा जयजयकार केला. वासुदेवानंदसरस्वती, नरसिंहसरस्वती, दत्तअमरेश्वर इत्यादि नांवांचे प्रचंड जयजयकार झाले व नाव निघाली. महाराज मध्यें व सभोवती भक्तसमाज बसून देव भक्त आनंदानें जलप्रवास करूं लागले तेव्हां भक्तांचे लोभी भगवान बाळभक्तांबरोबर विनोद करीत होते. " आम्हांला मुलें आवडतात, पांचपेंचवाली मंडळी आवडत नाहींत " असें ते त्यांना म्हणाले. " पांचपेंचवाले म्हणजे काय ? " असा प्रश्न एकानें केला. तेव्हां महाराज म्हणाले, " पंच विषयांचे व पंचकोशांचे पेचांत जे सांपडलेले आसुरी वृत्तीचे लोक ते पांचपेंचवाले लोक होत व त्या पेंचांत न सांपडलेले भाविक भक्त ते मुलें होत. तीं मुलें आम्हांला आवडतात. " अर्थात् तुम्ही आम्हांला आवडतां असा सांगण्याचा अभिप्राय. इत्यादि प्रकारें नाना सुखसंवाद करून महाराज भक्तांना आपलें प्रेम लावीत होते. प्रेमाची पेरणी किंवा ज्ञानाची पेरणी मुलांच्या मनोभूमीमध्येंच केलेली सफळ होणार असा भाव धरून महाराज मुलांचे ठिकाणीं प्रेम पेरीत चालले होते.

अमरापुरकर भक्त दिगंबराचें व वासुदेवानंद स्वामीराजांचें भजन म्हणत नाव हांकीत होते. सर्वच भक्त भजन करीत होते. जातां जातां नाव प्रथम शेडशाळ कौंठ्याला जाऊन पोंचली.

कवठेकर इनामदार पाटीलसाहेब यांनीं आपल्या दिवाणाचे घरीं महाराजांची पूजा केली. भक्तांना भोजनें व महाराजांना फलाहार दिला. दक्षणा दिली व महाराजांकडून नारळ प्रसाद घेतला. एक समंधिक बाई होती. महाराजांना पाहतांच तिचे अंगांत संचार झाला, महाराजांपुढें आला. त्याला महाराजांनीं तीर्थ प्यायला दिलें. त्याबरोबर झाड सोडून त्यानें मुक्ति घेतली. झाड मोकळें झालें. श्रीगुरूंनीं त्या बाईवर दया केली म्हणून ती दुःखमुक्त झाली.

कवठ्याहून महाराजांची स्वारी नौकेंतून पुढें निघाली. महाराज सर्व भक्तांना फार आवडत होते. जसे भक्त त्यांना आवडत तसे तेही भक्तांना अतिशय आवडत होते. दोघे देव भक्त एकमेकांकडे प्रेमानें पहात होते. एकमेकांत ते अगदीं मिसळून जात होते. महाराज भक्तांना नूतन आनंद देत होते. कूर्मी जशी, तशी गुरुमाउली आपल्या वत्सांना अमृत दृष्टीनें पाहून त्यांचीं पोटें आनंदानें भरीत चालली होती. आपले देव, गुरु, मायबाप काय ते गुरुमहाराजच होत, घरांत असलेले ते आपले खरे मायबाप नव्हेत, असें त्या मुलांना होऊन गेलें होतें. इतकी कृपादृष्टि श्रीगुरु त्यांचेवर ठेवीत होते. गुरुकृपेला पात्र झालेले ते भक्त धन्य होत !!

आठ आठ अमरापुरकर भक्त आळीपाळीनें वल्हेकरी बनत. भजन तर चालूच असे. याप्रमाणें भजनघोष करणारी नौका ते भक्त कृष्णेच्या प्रवाहांतून उलटया दिशेनें नेत होते. श्रीगुरूंच्या कृपादृष्टीनें त्यांचे अंगीं बळ वाढत असे. त्या गुरुकृपाबळावर ते भक्तवीर मोठया आनंदानें नाव चालवीत चालवीत श्रीगुरूंना वर वर घेऊन चालले.

प्रकरण १३ वें

अमरापुरकर भक्त मोठ्या हौसेनें गुरुपरमेश्वराला नौकागमन करवीत होते. त्यांनीं जशी गुरुसेवेची हौस धरली तशी ती सर्वांनींच धरावी. "करते करविते श्रीगुरु" ही गोष्ट तर खरीच तथापि गुरुसेवेच्या बाबतींत अहंकार धरलेला कांहीं वाईट नव्हे. सत्कर्मांचा अभिमान धरावाच, वाईटाचा मात्र धरूं नये इतकेंच. करितां अमरापुरकर जे अभिमानानें श्रीगुरूंना आम्ही नौकेंतून कसे नेतों पहा, असें मानीत होते तें त्यांचें मानणें योग्यच होतें. ते धन्य भक्तगडी श्रीगुरुनाथांना गणेशवाडी क्षेत्राला नेते झाले. गणपतिपूजन भजन वगैरे करून तेथून श्रीगुरु पुढें चालले. कृष्णेच्या दोन्ही तीरांवरील शेतकरी किंवा गांवकरी, तसेच पशुपक्षी, मृग इ. सर्व प्राणी श्रीगुरुदर्शनानें कृतार्थ होत होते. श्रीगुरुनाथांना ते प्रीतीनें नमस्कार करीत होते. जणूं काय आपापल्या भाषेप्रमाणें "श्रीस्वामीमहाराजकी जय" असा जयघोष करीत ते त्यांचें स्वागतच करीत होते. श्रीगुरुनाथांच्या दृष्टीनें ते कृतार्थ झाले. तत्त्वज्ञाची दृष्टि ज्याच्यावर पडेल तो जीव सर्व पापांतून मुक्त होतो.

मध्यंतरीं कनवाड गांव लागला. तेथें जैन व मुसलमान लोक होते. श्रीगुरुभगवंतांना त्यांनीं आपल्या गांवीं उतरायला लावलें. समदर्शी सद्गुरु कोणाला नाहीं म्हणत नसत. मुसलमानांनीं केलेला आदरसत्कार त्यांनीं घेतला, त्यांना प्रसाद दिला व पुढें चालले. सायंकाळीं ढवळी ग्रामीं मुक्काम पडला. तेथें नाव चालविणारे भक्त थकून गेले होते. श्रीगुरुनाथांनीं त्यांना दूध आणायला गांवांत पाठविलें. पण दुधाची वेळ टळली असल्यामुळें दूध

मिळेना. एका शेतकऱ्याचे अंगणांत गाय दिसली. दूध आहे काय म्हणून विचारतां तो म्हणाला, " मी आतांच धार काढून दुधाचा रतीव घालून आलों. " भक्त म्हणाले, " पुन्हां धार काढा; आमच्या गुरुमहाराजांना दूध पाहिजे आहे. " शेतकरी म्हणाला, " कोणाला जरी पाहिजे असलें तरी एकदां दोहन झाल्यावर लगेच पुन्हां धार कशी निघेल ? " भक्त म्हणाले, " गुरुमहाराजांच्या इच्छेनें न होणारी गोष्टसुद्धां होऊं शकते. त्यांनीं दूध पाहिजे म्हटलें आहे. करितां " श्रीगुरुदेव दत्त " म्हणून धार काढूं लागा. गाय दूध देईल. " शेतकऱ्याचा विश्वास बसला. साधुसंत वाटेल तें करतील. करितां ते सांगत आहेत तसें करावें. असें म्हणून तो दूध काढूं लागला. चमत्कार असा झाला कीं, पुन्हां गाईनें पहिल्याइतकें कासंडीभर दूध दिलें. " घ्या बाबांनो तुमचें दूध तुम्ही " असें म्हणून मोठ्या आश्चर्यानें तें त्यानें भक्तांच्या हवाली केलें. ते भक्त आनंदानें तें घेऊन श्रीगुरूंपाशीं आले. झालेली गोष्ट त्यांनीं प्रभूंना सांगितली. महाराज म्हणाले, " आमच्या गुरुमहाराजांचा प्रभाव असा आहे कीं वांझसुद्धां दूध देईल. मग दूधवाल्या गाईनें पुन्हां धार दिली यांत आश्चर्य तें काय ? " महाराजांचा जयजयकार करीत सर्व भक्तांना श्रीगुरूंनीं तो प्रसाद दिला. प्रसाद सेवून अमरापूरकर भक्त तृप्त झाले. श्रीगुरूंची कीर्ति सर्वत्र विस्तारली कीं श्रीनृसिंहसरस्वती-स्वामी हे साक्षात् दत्तमूर्तीच होत.

दुसरे दिवशीं सर्वांचीं प्रातःस्नानें झालीं. पूजाअर्चा वगैरे करून सायंकाळीं मिरजेच्या घाटावर मार्कंडेश्वराचे मंदिरांत श्रीगुरु येऊन उतरले. तेथें नौकाप्रवास पुरा झाला. अमरापुरकरांना श्रीगुरूंनीं पारितोषिक स्वरूपाचा आशीर्वाद व प्रसाद दिला. ते भक्त तेथून परत अमरापुरीं आले व महाराज एक दिवस घाटावर राहिले. तेथें वाडींतून भगवानस्वामी व कांहीं दुसरे वाडीकर भक्त महाराजांचे स्वारींत दाखल झाले. सखाराम बापू गेंडे पुजारी राह-कुटुंब महाराजांबरोबर होते. श्रीगुरु दुसरे दिवशीं आगगाडींतून भक्त-गणासह सांगलीला गेले. गोविंदराव डिग्रजकर व चतुरपीतांबर गुजर यांच्या इच्छेस्तव श्रीगुरु सांगलीस जाऊन विष्णुमंदिरांत राहिले. त्यांनीं तेथें असतां हरिपुरची यात्रा केली. चतुर व गोविंदराव यांचे घरीं श्रीगुरु

गेले, व त्यांचा प्रेमोपहार स्वीकारून संतुष्ट झाले. मंदिरांत श्रीगुरूंपुढें लोकांनीं कीर्तनें, पुराणें, भजनें, गायनें वगैरे केलीं. वासुदेवपूजन भजन त्रिकाळ करण्याचा श्रीगुरूंचा नेम सतत चाललेलाच असे. भक्तगण अखंड दिगंबराचें भजन, पंचपदी वगैरे रोज करीत असत. श्रीगुरूंनीं येथें पुष्कळांना ज्ञानोपदेश केला. सांगलींत श्रीगुरु असतांना गं. भा. गंगुताई टाकळीकर, होशाका, कमलाबाई, तुळशी इत्यादि स्त्रिया वाडींतून तेथें गेल्या. " आम्ही गरुडेश्वरीं आपल्याबरोबर येतों " असें त्या श्रीगुरूंना म्हणाल्या. महाराज म्हणाले, " गरुडेश्वरीं आमची ही दिंडी निघाली आहे. यांतून चलण्याची इच्छा असणारांना आम्हीं गरुडेश्वरला घेऊन जाऊं. तुम्ही येतों म्हणतां तर चला " अशी परवानगी मिळतांच त्या वाडीकर भक्तिणी अनसूयाप्रमुख--स्त्रीभक्त-गणांत सामील झाल्या.

भक्तांचा मेळा घेऊन वासुदेवानंदांना मिरवीत गरुडेश्वरला घेऊन निघालेल्या श्रीगुरुनृसिंहसरस्वतींना येतील तितके भक्त दिंडींत पाहिजेच होते. पण ज्यांचीं पूर्वपुण्यें मोठीं होतीं तेच भक्त त्यांचेबरोबर गेले. अपरिमित पुण्याई असलेल्यांचा श्रीगुरूंनीं अंगिकार केला व सर्व भक्तगणासह-वर्तमान सांगलीहून ते आगगाडीनें करवीर क्षेत्रीं गेले. दत्तमहाराजांचें माध्यान्हभिक्षेचें हें क्षेत्र होय. श्रीगुरुमहाराज हरिभाऊ फडेकर नांवाच्या आपल्या शिष्याचे घरीं उतरले. करवीर क्षेत्रांत असलेलीं सर्व तीर्थें व दैवतें त्यांनीं पूजिलीं. जगदंबेची महापूजा वस्त्राभरणानिशीं मोठ्या थाटानें केली. विप्रभोजनें घातलीं. देव--ब्राह्मणांचा संतोष केला. करवीर क्षेत्रस्थ ब्राह्मण भक्तांनीं श्रीगुरूंना आपापल्या घरीं पुडीला व पूजेला नेलें. रोज आठदहा घरच्या भिक्षा श्रींना घ्याव्या लागत. फराळी पुडी महाराजांची असे. भक्तगण भोजन करीत. मराठे भक्तांनींसुद्धां श्रीगुरूंना आपल्या घरीं नेलें होतें. महाराज पंचगंगाप्रमुख सर्व तीर्थांच्या स्नानाला, पुडीला किंवा देवतादर्शनाला जातां येतां त्यांच्याबरोबर भक्तगण दिगंबराचें भजन मोठ्यानें करीत असत. हा भजनीमेळा पहात लोक उभे रहात. त्यांना भजनाची आवड उत्पन्न होई. तेसुद्धां भजन करूं लागत. सर्व जगाला भजनामृताचें भोजन श्रीगुरुनाथ अशा प्रकारें अखंड घालीत चालले होते. स्वस्थळावर भजन, पूजन, कीर्तन, पुराण

नित्य चालवीत तें तर निराळेंच. एकंदरींत जातां येतां किंवा स्थळावर असतां अहोरात्र अखंडभक्तीचें संतर्पण त्यांनीं चालविलें होतें. विश्वाचा उद्धार असा ते सहजच करीत होते. देव्हाऱ्यांत वासुदेवानंदांची मूर्ति ठेवून भगवी छाटी पांघरलेले नृसिंहसरस्वती दंडकमंडलुधारी सर्वांचे नेते सर्वांचे पुढें ध्वजाप्रमाणें शोभत व त्यांचे मागें त्यांचा भला मोठा दिंडीगण प्रेमानें नामघोष करीत चाले. अशा थाटानें मिरवणूक काढीत ते वासुदेवानंदांना गरुडेश्वरी नेत होते. "कलियुगांत हरिनामसंकीर्तन हाच तरणोपाय आहे." याप्रमाणें ते सर्व जगाला भजन करून बोध देत होते असें आम्हांला वाटतें.

हरिभाऊ कडेकरांनीं नृसिंहसरस्वतींना आपल्या घरीं गुरुसेवा घडावी म्हणून ठेवून घेतलें होतें. हे महाराजांचे पट्टशिष्य होत. महाराजांचें यांचेवर फार प्रेम होतें. पुढें महाराजांनीं हरिभाऊंनाच अमरापुर संस्थानचे सर्वाधिकारी केले. हरिभाऊसुद्धां मोठे गुरुप्रेमी खरे! त्यांच्या गुरूंनीं वाडी सोडली म्हणून त्यांनींसुद्धां वाडीला जाणें बंद केलें. नाहींतर ते वाडीचे पौर्णिमेचे पहिले वारकरी होते. त्यांनीं ती वारी अमरापुरांतच चालू केली. याला म्हणतात गुरुप्रेम व गुरुनिष्ठा!! महाराजांचे पश्चात् अमरापुरांतले सर्व उत्सव त्यांनीं महाराजांचे इच्छेप्रमाणें चालविले आहेत. आपलेंच कार्य समजून गुरुकार्य ते दक्षतेनें करीत असतात. म्हणून त्यांना आम्ही महामेरु समजतों. त्यांनीं आपल्या घरीं श्रीगुरूंना ऊनपाण्यानें स्नान करायला लावलें. थंडपाणी बाधेल म्हणून तें त्यांनीं बंद केलें. गुरुप्रेम असें असतें. महाराजांचे कृपेनें ते पुढें संपन्न झाले. गुरुमहाराज भक्तांच्या इच्छेप्रमाणें वागत असत. भक्तमनोरथपूर्वक दत्तभगवानच ते होते.

महालक्ष्मी गुरूंना करवीरला न्यायला अमरापुरीं आली होती, असें मागें सांगितलें. त्याचा खुलासा असा– "बळवंतराव नंदनवाडकरांना वाडींत असतां एक स्वप्न पडलें. त्यांत त्यांनीं असें पाहिलें कीं, श्रीमहालक्ष्मी अमरापुरीं आली. तिनें महाराजांना करवीरला चला म्हटलें. लगेच महाराज व आपण नावेंत बसून कृष्णाप्रवाहांतून ती वर वर निघाली." असें स्वप्न पाहिल्यानंतर लगेच चार दिवसांत महाराज स्वप्नांत पाहिल्याप्रमाणें नावेंतून

उलट प्रवाहानें कोल्हापुरयात्रेला निघाले. तेव्हां झालेला दृष्टान्त त्यांना पटला. त्या दृष्टान्तावरून आम्हीं मागें त्याचा तसा उल्लेख केला. करवीरांत महाराजांना घरोघरीं ज्या भिक्षा झाल्या त्या जगदंबेनेंच ब्राह्मणांना प्रेरणा देऊन करविल्या. अर्थात् तिनेंच त्या प्रीतीनें केल्या असें आम्ही म्हणतों. देवी महाराजांना आपले पती महाविष्णुच समजली व दिवाळीच्या सणाला तिनें आपल्या प्रियाला स्वमंदिरीं नेऊन त्याचा थाटमाट केला. प्रियानें-देखील प्रियेचा तसाच थाटमाट पूजनादिक करून केला तो पूर्वी सांगितलाच. एकमेकांनीं एकमेकांचा संतोष केला. वासुदेवमय जगत् पाहणाऱ्या श्रीगुरूंनीं महालक्ष्मी म्हणजे वासुदेवीच मानिली.

गोपाळराव दंडगे नांवाचे महाराजांचे एक शिष्य लहानपणीं वाडीत महाराजांपाशीं भजन करीत. ते इंग्रजी शिकत कोल्हापुरांत राहिले होते. महाराज आलेले त्यांना कळतांच हरिभाऊंचे माडीवर ते गुरुदर्शनाला गेले. महाराजांची नजर त्यांच्यावर पडतांच त्यांचे हृदयांत प्रेमानंदाचा उमाळा आला. त्या सरशीं देहभान विसरून ते कांहीं काळ स्वस्थ बसून राहिले. मग महाराजांनीं त्यांना प्रेमानें हांक मारून जागें केलें व ते त्यांच्याशीं सुखगोष्टी बोलले. गोपाळराव धन्य झाले. त्यांना श्रीगुरूंनीं चाक्षुषी दीक्षा दिली. डोळे उघडून भक्ताकडे पहात असतां त्याचे हृदयांत चिच्छक्तीचा उदय करून देणें, याला चाक्षुषी दीक्षा म्हणतात. स्पर्शदीक्षा, संकल्पदीक्षा इत्यादिक सर्व दीक्षा श्रीगुरु देऊं शकत असत. ते महायोगेश्वर होते म्हणून असा अद्‌भुत चमत्कार ते करीत. जीवाचा शिव बनविणें हाच खरा चमत्कार होय; भुतें काढणें हा कांहीं त्यांच्यासारख्यांचा मोठासा चमत्कार नव्हे. भूत, समंधसुद्धां महाराजांनीं करवीरांत असतां गतीला पाठविलें. पुष्कळांना उपदेश दिले. अनेकांच्या अनेक कामना पुरविल्या.

अमरापुरांतून त्रिस्थळीपैकीं गयेची यात्रा करावी म्हणून श्रीगुरु करवीरांत आले. त्यांनीं गया केली. त्यांची यात्रा पुरी झाली जोतिबा वगैरे देवही केले. पांडवपंचमीपर्यंत त्यांचेबरोबर वाडींतून आलेले व अन्य ठिकाणचे बरेच भक्त सहवासाकरितां राहिले होते. त्यांना महाराजांनीं निरोप दिला.

सखाराम बापू गेंडे पुजारी वगैरे भक्त कोल्हापुरांतून परत घरीं आले. नौकेमध्यें बाळभक्त होते म्हणून पूर्वी सांगितलें. ते मात्र घरीं जाईनात. त्यांना महाराजांजवळ सतत रहावेंसें वाटूं लागलें. महाराजांनासुद्धां ते जवळ असावे असेंच वाटत होतें. कशावरून ? तर इतरांप्रमाणें त्यांना त्यांनीं निरोप दिला नव्हता म्हणून. पण त्यांचे पालक शाळा बुडते म्हणून त्यांना परत घेऊन आले. घरीं आल्यावर ते बाळ रडूं लागले. " आम्हांला महाराजांकडे पोंचवा नाहींतर आम्ही जेवत नाहीं. " इत्यादि प्रकारें त्यांनीं हट्ट मांडला. धुंडीराज कवीश्वरशास्त्री म्हणाले कीं, आमच्या दताची समजूत घालतां घालतां आमच्या नाकीं नऊ आले. महाराजांनीं त्या बाळांना इतका आपला लळा लावला होता. चाक्षुषी दीक्षाच त्यांना ते देत राहिले होते. म्हणून त्या बाळांना त्यांचेजवळ राहण्यांत इतका आनंद होत होता. संतमहात्म्यांचे दृष्टींत असें अद्‌भुत सामर्थ्य असतें. कूर्म दृष्टि ती होच होय. श्रीगुरुनाथ कृपादृष्टीनें भक्तिज्ञानाची पेरणी अशी करीत सुटले होते. " आम्ही आतां पोतें मोकळें सोडलें आहे, " असें ते म्हणत.

श्री करवीर क्षेत्रीं असतां गुरुद्वादशी प्राप्त झाली. अमरापुरकर मंडळींनीं महाराजांना अमरापुरीं त्या उत्सवाला आणलें. कांहीं मंडळी घेऊन मोटारींतून श्रीगुरु आले. हौशाका वगैरे स्त्रिया व कट्टी कृष्णंभट वगैरे पुरुष असे भक्त श्रीचेबरोबर होते. उत्सवांत श्रीगुरूंनीं देवाला महापूजा केली, पालखी काढली, भक्तभोजन व भजन करविलें. महाराज अमरापुरांत आलेले ऐकून शिरोळचे काळे वकील, हौशाकांचे वडील लहान दोन मुलगे बरोबर घेऊन महाराजांचे दर्शनाला अमरापुरीं आले. त्यांचे ते दोन मुलगे कृष्णानदीवर खेळायला गेले. तेव्हां हौशाका मठांत महाराजांपाशीं श्रवण करीत होत्या. इतक्यांत ते दोन मुलगे पात्रांत खेळतां खेळतां खोल पाण्यांत गेले व बुडाले. इकडे सर्वज्ञ प्रभूंना तें कळलें. समर्थांनीं परभारें भक्ततारणाचें कार्य रूपान्तरानें चालविलेंच होतें व समोर बसलेल्या हौशाकांना ते भक्तपाळ त्वरा करून म्हणाले कीं, " अहो हौशाका, तुमच्या मुलांची परिस्थिति काय आहे तुम्ही जाणतां काय ? त्यांच्याबरोबर मोठें माणूस कोणी आहे कीं नाहीं ? लवकर उठा; नदीवर जाऊन त्यांचा शोध

करा; कदाचित् तीं पाण्यांत बुडतील बिडतील." श्रीगुरूंनीं जाणूनच संशयाची भाषा वापरली, " आपण बुडालेलीं मुलें वर काढलीं आहेत, तीं आणा जा " असें ते स्पष्ट बोलले नाहींत; छपून राहिले. घाबऱ्या घाबऱ्या हौशाका व त्यांचे वडील वकीलसाहेब कृष्णेवर धांवत गेले. तों एका बैराग्यानें ते बुडालेले दोन मुलगे वर काढून त्यांची शुश्रूषा चालविली होती. यांना पाहतांच " तुमचे हे मुलगे काय ? हे बुडाले होते. वहात असतां मी यांना वर काढून येथें ठेवलें. तुमचे तुम्ही घेऊन जा. " असें म्हणून तो इसम बेपत्ता झाला. हौशाका मुलांना घेऊन महाराजांसन्निध आल्या. " आपण म्हटल्याप्रमाणें मुलगे बुडालेच होते. पण एका मनुष्यानें त्यांना वर काढलें. आपण म्हणालां तसेंच तिकडे पोरांचें झालें. आपलें वाक्य खरें झालें " असें म्हणून त्यांनीं पोरें महाराजांचे चरणीं घातलीं. महाराज म्हणाले, " आम्हीं वाईट कांहीं कोणाचें बोललों कीं तेवढेंच खरें होतें. " वाइटांतून आपण एखाद्याला वर काढतों असें ते म्हणाले नाहींत. आत्मप्रौढी त्यांना आवडत नसे. अमरापुरांतून परत कोल्हापुरला ते दिवाळीला गेले. जातांना महाराज हौशाकांच्या घरीं अर्थात् शिरोळांत काळे वकिलांचे घरीं त्यांच्या आग्रहास्तव गेले होते. नंतर पूजा, उपहार घेऊन कोल्हापुरला गेले.

आठदहा घरींसुद्धां रोज भिक्षा करविणारी करवीराभिमानिनी महालक्ष्मी ही जशी महाराजांना प्रिय झाली, तशीच राधाबाई हंस ही गरीब बाईसुद्धां त्यांना प्रियच झाली. त्या राधा राजहंसीच्या बोलावण्यावरून कोल्हापुराहून श्रीगुरु कण्हेरीस गेले. श्रीगुरूंना श्रीमंत किंवा गरीब भक्तीच्या दृष्टीनें समानच होत. तीन दिवस राधेच्या घरीं प्रीतिस्तव श्रीगुरुभगवान राहिले. ती गुरुपूजा व भिक्षा समर्पण करून कृतार्थ झाली. जवळच रेवणसिद्धपर्वतावर श्रीगुरुनाथ गेले होते. दत्तदर्शन, तीर्थस्नान करून तेथील बालमठाधिपतीला गुरूंनीं बोध दिला व परत आले. कण्हेरींतून श्रीगुरूंना हरिभाऊ कडेकरांनीं आपल्या कोडोलींतल्या उसाच्या मळ्यांत नेलें. त्या स्थळीं महाराजांनीं तुळशीविवाह थाटानें केला. हरिभाऊंसारखे भक्त हे सर्व उंसाचे मळेच होत. श्रीगुरु त्या मळ्यांत भक्तिरस आपण पीत तसे त्यांनाही तो पाजीत.

असत. श्रीगुरूंनीं पाजल्याशिवाय उंसांना रस पितां कसा यावा ? स्वस्वरुपाचा आनंदभोग गुरुकृपेनेंच होतो.

कोडोलींतून गुरुनाथ सांगोड्याचे नरसोबाला गेले. नरसोबाला नरसोबा भेटले. ते दोघे एकमेकांचे कुलदैवत होत. देव भक्ताचें दैवत व भक्त हा देवाचें दैवतच होय. श्रीगुरु सकळांचेंच दैवत असल्यामुळें व त्यांचें दैवत नरसोबा, म्हणून परस्पर एकमेक एकमेकांचीं दैवतें त्यांना आम्हीं म्हटलें. श्रीगुरूंनीं नरसोबाची महापूजा कोल्हापुराहून वस्त्रालंकार आणवून केली. वस्त्राभरणांनीं सुशोभित करून त्याचा महोत्सव त्यांनीं केला. ग्रामभोजन दिलें. पुजाऱ्यांना ऐहिक व पारमार्थिक या दोन्हीचा लाभ करून दिला. पुजारी गुरव मंडळींनीं महाराजांचा योग्य सन्मान ठेवला. " श्रीनृहरे जय नृहरे जय जय नृहरे सुखसूरे " हें भजन श्रीगुरूंनीं तेथें रचून त्यांना दिलें. भक्ती-धर्माची वाढ केली.

सांगोड्यांत इंगळीकर देशपांडे महाराजांना नेण्यासाठीं आले. त्यांच्या इच्छेस्तव नृसिंह भगवान इंगळीला गेले. महाराजांचा नेहमींचा भक्तगण त्यांच्याबरोबर भजन करीत होताच. वाडींतून व सांगलींतून किंवा अन्य गांवांतून येऊन त्यांचे स्वारींत पुरुष व स्त्रिया दिंडीगण म्हणून जे भक्त राहिले होते ते सतत महाराजांबरोबर ते जिकडे जातील तिकडे असतच होते. ते भक्त व आपण मिळूनच श्रीगुरूंची स्वारी जगदुद्धार करीत चाललेली होती. म्हणून वरचेवर त्या मंडळीचा उल्लेख आम्हीं करीत नाहीं. श्रीगुरु म्हटले कीं त्यांची भक्तांसह स्वारीच समजावी. जेथें विशेष कांहीं सांगावयाचें असेल त्यावेळीं त्या त्या भक्ताचा उल्लेख केला जाईल.

इंगळीला पंचगंगा नदीचे तीरीं महाराजांचा कार्तिक पौर्णिमेचा क्षौरविधी व स्नानविधी झाला. इंगळीकर भक्तांनीं महाराजांना उष्णोदकस्नानच घातलें व तें त्यांचे अंगाला तेल लावून अभ्यंगस्नान या स्वरूपानें घातलें. अभ्यंगस्नानाचा नवा उपक्रम इंगळीकर भक्तांनीं करून दिला व महाराजांचे चरणावर वाटेल त्यानें मस्तक ठेवण्यालासुद्धां त्यांनींच सुरुवात करून दिली. इतके दिवस श्रीगुरु अभ्यंगस्नान किंवा सरसकट सर्वांचा स्पर्श करून घेत

नसत. जसे भक्त भेटले तसतसे श्रीगुरु होत गेले. आपलें भक्ताधीनत्व त्यांनीं प्रगट केलें. दिंडीगणालासुद्धां गुरुचरणीं मस्तकें ठेवण्याचा लाभ इंगळी-पासूनच मिळूं लागला. इंगळीकरांनीं श्रीगुरूंची भक्ति उत्तम प्रकारें केली. प्रत्येकानें श्रींना आपापल्या गृहीं नेऊन पूजन, भोजन, भजन वगैरे समारंभ केला. वामनराव देशपांडे आपल्या घरीं वेदान्तश्रवणार्थ महाराजांना नेत. महाराज त्यांना बोध देत. इंगळींत भक्तांनीं महाराजांवरून नवीन आरती रचली. ती येणेंप्रमाणें—

करितों आरति तुज नीरांजन घेऊनियां हातीं ।
श्रीगुरुराया जय यतिवर्या नृसिंहसरस्वती ॥ ध्रु० ॥

नृसिंहवाडी श्रीकृष्णातटिं केला रहिवास ।
प्रपंच करिशी परि त्या विषयीं असशी उदास ॥
प्रपंच निमतां स्वोद्धारासी घातलीस कांस ।
चातुर्थाश्रम घेउनि पावन केलें स्वकुळास ॥ करितों०॥ १ ॥

दंडावांचुनि चातुर्थाश्रम तुजवाटे न्यून ।
वासुदेवानंदसरस्वती सद्गुरु करून ॥
सद्गुरुहस्तें दंड घेऊनी झालासी पूर्ण ।
जनासि वाटे दत्तात्रय हा अवतारचि पूर्ण ॥ करितों० ॥२॥

योगाभ्यासासाठीं गुरू त्वां धरिलें मौनाला ।
तोही पूर्ण करोनी निघसी तीर्थाटनाला ॥
भक्तीं स्तवितां प्रेमें त्यांच्या जाशी सदनाला ।
भक्तांकडुनी पूजा घेउनि (दासांकडुनी सेवा घेउनि) देशी
मोदाला ॥ करितों० ॥३॥

इंगळी ग्रामीं येउनि आम्हां भक्तां उद्धरिलें ।
निजबोधामृत पाजुनि सकळां भजनीं लावियलें ॥

वृद्ध-नर-नारी शिशु ही तव भजनीं रमले।
तल्लिन होउनि गोपाळें तव धरिलीं पाउलें ॥ करितों०॥४॥

इंगळीहून भक्तवत्सल श्रीगुरूंना हुप्रीकर भक्तांनीं आपल्या गांवीं नेलें. पूजा, भोजन, भजन रोज होतच असे. तेथें एकदां महाराजांनीं कौतुक केलें. भक्तसमाजाला प्रसाद देण्यासाठीं त्यांनीं अनुताईपाशीं कांहींतरी मागितलें. तेव्हां तिनें दोनदां प्रसादाचा डबा उघडून पाहिला; पण त्यांत कांहीं वस्तु नाहीं, असें ती सांगत आली. श्रीगुरूंनीं सांगितलें कीं, " बाळभक्त जमले आहेत; त्यांना प्रसाद दिलाच पाहिजे. करितां आणखी एकदां जा व डब्यांत कांहीं आहे कीं नाहीं तें पहा. " गुरुवचनावर विश्वास ठेवून अनुबाई गेल्या. त्यांनीं पाहिलें तों रिकामा असलेला डबा खारकांनीं ओतप्रोत भरला होता. आश्चर्य करीतच त्यांनीं तो श्रीगुरु भगवंतांपुढें आणून ठेवला. श्रीगुरु म्हणाले, " भक्तांसाठीं वासुदेव गुरुराजांनीं प्रसाद निर्माण केला. ते अघटित लीला-पटु आहेत. " आपलें लीलापटुत्व त्यांनीं झांकलें. गुरुमहिमाच ते वाढवीत असत. त्यांची पद्धत तशीच होती. कोणाचे विहिरीला त्यांनीं पाणीच भरपूर वाढविलें. कोणाला स्वप्नांत छाटी प्रसाद दिला, तो जागृतींत सत्य झाला. पुष्कळांना गुरुपदेश दिले. एका कोष्टयाच्या प्रेमास्तव त्याचे घरींदेखील श्रीगुरु पूजेला गेले. भक्तार्पित पूजा घेऊन आले. या गांवांत श्रीगुरूंनीं आपल्या सर्व दिंडीगण भक्तांना पांढऱ्या धाबळ्या शीतनिवारणार्थ घेऊन दिल्या. श्रीगुरूंची आत्मौपम्य दृष्टि होती. ते परदुःखानें दुःखी होणारे होते.

हुप्रीतून श्रीगुरूंना आप्पासाहेब भिरडीकरांनीं 'कारदगा' नामक आपल्या गांवीं नेलें. हे श्रीगुरूंचे गुरुबंधु फार भाविक होते. त्यांनीं त्यांना आपल्या गुरुवत् मानून नृसिंहसरस्वतीपूजन केलें. त्यांना छाटी दिली. भजन, भोजन, आरती वगैरे सर्व थाट केला. श्रीगुरूंनीं प्रसन्न होऊन त्यांना प्रसाद दिला व दूधगंगा-वेदगंगा संगमामध्यें श्रीगुरूंनीं स्नान केलें.

कारदग्याहून गणपतराव मोदींनीं श्रीगुरूंना आपल्या हेरवाड नामक गांवीं नेलें. महाराजांना ते भक्तीनें भजले. त्यांनीं श्रीगुरूंना मळ्यांत ऊंस खायला नेलें. सर्व भक्तांना त्यांनीं यथेष्ट रस व ऊंस अर्पण केला. हे सारस्वत ब्राम्हण

होते. त्यांच्या भक्तीस्तव श्रीगुरु त्यांचे मंडळींकडून उष्णोदकस्नान घेत असत. महाराजांचे भक्तगण पुन्हां आपल्याकडील पाण्यानें त्यांना स्नान घालीत व शुद्ध करून घेत. महाराज नित्यशुद्ध परमेश्वरच होते, पण मानवी दृष्टीनें भक्त तसें करीत. महाराज तेंही मान्य करीत.

हेरवाडाहून श्रीगुरु दत्तजयंतीसाठीं अमरापुरला आले. महाराजांचे आगमनानें जयंतीचा उत्सवसमारंभ फार थोर झाला. उत्सवाच्या दुसऱ्या दिवशीं श्रीगुरूंनीं अमरापुरांतील अष्टतीर्थयात्रा व कृष्णा–पंचगंगा–संगम हा प्रयाग होय. त्याची त्रिस्थळींतील राहिलेली तिसरी यात्रा केली. स्त्री-पुरुषांचा मोठा मेळा बरोबर घेऊन श्रीगुरु अष्टतीर्थें करीत होते. तो समारंभ वाडींतून पहाणारांना मोठा अपूर्व भासला. एका तीर्थावर भक्तगणांनीं श्रीगुरूंना पंचामृत स्नान घातलें. श्रीगुरुनाथांबरोबरचे भक्तगण श्रीगुरुनाथांनाच सर्व तीर्थें व सर्व दैवतें समजत असत व श्रीगुरुनाथ सर्व तीर्थें किंवा सर्व दैवतें आपले सद्गुरु श्रीवासुदेवानंदच होत, असें समजत असत. गुरुमूर्तीचे ठिकाणीं सर्व पाहणें ही साधक दशा होय व गुरुरूपीं सर्व पाहून सर्वांठायीं गुरुमूर्ति पाहणें म्हणजे ती सहजच दिसणें ही श्रीगुरूंची सिद्धदशा होय. सिद्धांचें सर्व करणें लोकसंग्रहासाठींच समजावें. श्रीगुरूंनीं प्रयागांत स्नान केलें व अष्टतीर्थयात्रेबरोबर दक्षिणेंतली त्रिस्थळी यात्रा पुरी केली. म्हणजे भक्तांकरवीं ती करविली.

"आपण वागोनी वागवितो लोकां ।
धन्य नव्हे तो का विश्वोद्धारी ॥"

सांगली मुक्कामीं वाडीकर स्त्रिया जशा श्रीगुरूच्या स्वारींत दाखल झाल्या; तद्वत् या खेपेला अमरापुरांत वाडीच्या ताई काकतकर या महाराजांचे स्वारींत दाखल झाल्या. त्या महाराजांना टाकळीला घेऊन गेल्या. तेथें ते विठ्ठल मंदिरांत रहात. ताई त्यांची सेवा करीत. आपल्या पित्याचे घरीं सकाळीं त्यांना नेऊन उष्णोदकानें मंगलस्नान घालीत. विष्णुपंत नांवाचे कुलकर्णी महाराजांना आपल्या शेतांत भुईमुगाच्या शेंगा खाण्याकरितां घेऊन गेले होते. महाराज टाकळींत असेपर्यंत, पंतांनीं गुरुभक्तगणांना रोज शेंगा

देऊन आपलें शेत खलास केलें. संतवर्य विष्णुपंत महाराजांना रोज भजन ऐकवीत. श्रीगुरुनाथ हरिभक्तांवर फार प्रेम करीत. त्यांनीं विष्णुपंतांवर कृपा केली. विष्णुपंत व ताई या दोघांनीं महाराजांचा खर्च ते तेथें पंधरा दिवस होते तोंवर चालविला. या ठिकाणीं ताई काकतकरणींना वाटलें कीं, " महाराजांना चालतांना जमीन रुतत असेल. करितां मृगचर्माच्या पादुका त्यांना द्याव्या. " लगेच तिनें त्या तयार करवून त्यांना दिल्या. त्या दिवसापासून श्रीगुरु भक्तसंतोषार्थ पादुका पायांत घालूं लागले. पूर्वी ते अनवाणीच चालत. त्यांना सुख व दुःख दोन्ही समानच वाटत असत. रात्रीं अपरात्रीसुद्धां तीर्थ लागलें कीं थंडींतूनसुद्धां ते त्यांत बुडी मारीत; व भक्तांनीं तैलाभ्यंगपूर्वक उष्णोदकानें घातलेलें स्नानदेखील घेत. दोन्ही त्यांना सारखींच भासत. कोणीं स्तुति केली असतां किंवा निंदा केली असतांदेखील ते तिकडे लक्ष देत नसत. सर्व द्वंद्वें त्यांना समच झालेलीं होतीं, असें त्यांच्या वर्तनावरून सहज कळून येत असे. पाण्यांत माशांना जसे लोक चुरमुरे टाकतात तसे श्रीगुरु तीर्थपूजेचे वेळीं जळांत रुपये टाकीत. रुपयांची किंमतच त्यांना वाटत नसे.

समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकांचनः ॥
तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिंदात्मसंस्तुतिः ॥१॥

हीं स्थितप्रज्ञ योगीश्वराचीं लक्षणें त्यांचे अंगीं बाणलेलीं दिसत. सर्व काळीं व सर्व अवस्थेंत ते आत्मारामच असत. जसे त्यांना भक्त वागवितील तसे ते वागत. बाहुलीप्रमाणें भक्तपरतंत्र झालेले नृसिंहसरस्वती केवळ दत्तभगवानच होत व याच भावानें सर्व जनता त्यांची भक्ति करीत असे. गंगुताईनीं महाराजांना एक दिवस आपली गरिबीची पण प्रेमाची मेजवानी दिली. या सांगलीपासून महाराजांबरोबर राहिल्या. त्यांची भक्ति पाहून महाराजांनीं त्यांना पुढें अमरापुरांत देवाचा नैवेद्य तयार करून देण्याच्या सेवेला मठांतच ठेवून दिल्या. त्या म्हणजे गंगुताई, ताई, यमुताई, यमुताई जोशी व कोल्हापुरच्या तुळसाबाई हया पांच गुरुभक्तिणी, सर्वसंगपरित्याग करून श्रीगुरुसमाधीनंतर अमरापुरांत गुरुसेवाव्रत धरून कायमच्या राहिल्या.

गुरुसमाधीला आज हें चरित्र लिहितांना सोळा वर्षें होऊन गेलीं. इतक्या मुदतींत वरील पांचच बाया गुरुस्थानीं राहिलेल्या दिसल्या. म्हणून त्या आम्हांला फार धन्य वाटतात. स्त्रिया असून त्या संन्यास वृत्तीनें राहून गुरुसेवा करतात ही एक त्यांची अपूर्वताच आम्हांला दिसते. गुरुनिष्ठा, गुरुप्रेम, गुरुभक्ति यालाच म्हणतात. स्त्रियांत या पांच व पुरुष मंडळींत कृष्णंभटजी व बागुलबोया हे दोन गुरुभक्त येथें सतत राहतात. बाकीचे हरिभाऊ, रामराव, गणपतराव इत्यादि भक्त येऊनजाऊन पण प्रेमानें तनमनधनपूर्वक सेवा करतात. कृष्णंभट्जी तर, त्यांचा गांव, वाडी जवळ असतां अमरापुर सोडून तेथें जात नाहींत. अर्थात् ते धन्य होत. अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, क्षमा, सरळपणा इत्यादि गुणयुक्त हे वरील सर्व गुरुभक्त गुरुकृपेनें मुक्त होऊन प्रेमलक्षणाची भक्ति करीत गुरूपाशीं राहिले आहेत. अस्तु. टाकळींत असतांना श्रीगुरूंनीं एक कौतुक केलें. ते भक्तांसह संगमावर स्नानाला गेले. तेथें एका शेतकऱ्यानें मक्याचीं कणसें साधुसेवा म्हणून महाराजांना दिलीं. तीं सगळ्यांना पुरण्याइतकीं नव्हतीं पण सद्गुरूंनीं तीं प्रत्येकाला एकेक दोनदोन दिलीं. तेव्हां सर्वांना मोठा चमत्कार वाटला.

टाकळींतूम श्रीगुरु चंदूरला चंद्रेश्वराचे दर्शनाला गेले होते. तेव्हां तेथल्या देशपांडे मंडळींनीं त्यांची प्रार्थना करून त्यांना एक दिवस ठेवून घेतलें. त्यांची पूजा-आरती केली, दक्षणा दिली व त्यांचे हातचा प्रसाद आपण घेतला व धन्य झाले. महाराजांजवळ द्रव्याची कधींच वाण पडत नसे. जिथें जातील तिथें त्यांचेपुढें द्रव्याचा ढीग पडत असे. देव, तीर्थ, ब्राह्मण, गोरगरीब इत्यादिकांना त्या द्रव्यानें ते पूजीत. शिल्लक राखून द्रव्य ठेवीत नसत. चंदुराहून गुरुराज टाकळीला आले. तेथें एक विरक्त तापसी 'चतुर्थाश्रम द्या' म्हणून त्यांना शरण आला. त्याला महाराजांनीं पदरचे पाऊणशें रुपये खर्चून विधिपूर्वक संन्यासाश्रम दिला. पहिले एक भगवान स्वामी मिरजेपासून त्यांचेबरोबर होते तसे हे दुसरे नवे संन्यासीदेखील समागमें राहूं लागले.

टाकळींतून श्रीगुरु पौष शुद्ध द्वितीयेला पुन्हां अमरापुरला आले. नृसिंहसरस्वती दत्तप्रभूंची जयंती त्या दिवशीं त्यांनीं तेथें थाटानें साजरी केली. कथा, पुराण, भजन, भोजन, महापूजा, पालखी इ. सर्व कार्यक्रम झाले

उत्सवप्रिय श्रीगुरुमूर्ति स्वतःच उत्सवमूर्ति होते. ते जिकडे जातील तिकड उत्सवच चालू असत.

. अमरापुरांतून महाराजांना बोवासाहेब इनामदार यांनीं आपल्याकडे नणदीला नेले. तेथें त्यांची पूजा, आरती वगैरे केली व महाराजांकडून वर-प्राप्ति करून घेतली. त्यांना मुलगा होत नसे म्हणून त्यांनीं श्रीगुरूपाशीं कृपेची मागणी केली. श्रीगुरूंनीं त्यांचे पत्नीचे ओटींत नारळ घातला व एक वर्षाचे आंत मुलगा होईल असा त्यांना आशीर्वाद दिला. तो खराळ झाल्याची कथा पुढें सांगूं. बोवासाहेबांचे पुतण्ये बाळासाहेब यांना त्यांच्या उपास्यदेवाचा म्हणजे रेवणसिद्धांचा दृष्टान्त झाला कीं, "नृसिंहसरस्वती हे आम्हा सिद्धांचे आदिसिद्ध, आदि गुरु दत्तच आहेत. त्यांची सेवा कर जा" असा दृष्टांत होतांच बाळासाहेबांची श्रीगुरुनाथांवर फार भक्ति जडली. त्यांनीदेखील श्रीगुरुपूजा, आरती वगैरे थाट केला. भक्तगणांसह महाराजांना ऊंस, शेंगा वगैरे दिल्या. जवळ बसून गुरुमुखानें वेदान्त श्रवण केला व ते गुरुकृपासंपन्न झाले. नणदीकरांवर श्रीगुरुनाथांनीं अनुग्रह केला. नणदीकर क्षत्रिय आहेत. त्यांनीं भोजनादिकाचें सर्व साहित्य दिलें व महाराजांबरोबर असलेल्या भक्त लोकांनीं स्वयंपाक वगैरे बनविले. नणदींत विष्णुपंत कुलकर्ण्यांनींदेखील अनुग्रहार्थ गुरुसेवा केली. त्यांनादेखील श्रीगुरूंनीं अनुग्रह दिला.

नणदीहून बेडक्याळचे गोपाळराव कुलकर्णी यांनीं श्रीगुरूंना बेडक्याळला आपल्या घरीं नेलें. श्रीगुरूंना चांदीची वासुदेवमूर्ति यांनींच वाडींत असतांना दिली. गोपाळराव महाराजांची महापूजा करूं लागले. तेव्हां महाराज म्हणाले, "तुम्हीं जी वासुदेवानंदमूर्ति आम्हांला दिली आहे तीही आम्हीं बरोबरच आणली आहे. तिचीच महापूजा तुम्ही अगोदर करा." गोपाळरावांनीं लगेच ब्राह्मण बोलावून अभिषेक, पंचामृतस्नान, महापूजा, महानैवेद्य, महाआरती प्रथम वासुदेवांची केली व नंतर श्रीगुरुनृसिंह-सरस्वतींची केली. गोपाळरावांनीं भक्तीनें तो सद्गुरूंचा मोठा उत्सवच केला. गोपाळराव व श्रीगुरु एकमेकांवर फार प्रेम करीत. नणदीहून बेड-

पर्याळला जे श्रीगुरु आले ते बोवासाहेबांनीं त्यांना बैलगाडींत (सारवटांत) बसवून पाठवून दिले. त्या दिवसापासून नंदिवाहन श्रीगुरु जीवांनीं ओढण्याचे वाहनांत बसूं लागले. त्या नंदीगणाचें भाग्य उदयाला आलें तेव्हां श्रीगुरूंनीं त्याचा स्वीकार केला म आपण नंदिवाहन होंकर या स्वरूपानें शोभूं लागले. श्रीगुरूंना जो भक्त जसा शोभवील तसे ते शोभत होते; जसा बनवील तसे बनत होते. जसा भाव तसा देव. गोपाळरावांच्या पत्नीला श्रीगुरूंनीं आपल्या जवळची वासुदेवानंदांची तसबीर प्रसाद दिली. गोपाळरावांनीं वासुदेवमूर्तीचे हातांत सोन्याची मुद्रा बांधलेला चांदीचा दंड करून दिला. वासुदेव हे संन्यासी म्हणून त्यांचें भूषण त्यांना त्यांनीं दिलें, तेव्हां नृसिंहसरस्वती खूष झाले. त्यांना तें दंडधारी वासुदेवानंदस्वरूप पाहून आनंद वाटला. कारण त्यांच्या आवडीची ती गुरुमूर्ति होती.

मांजरीचे मंगेश कामत यांनीं श्रीगुरूंना आपल्या मांजरी गांवीं नेलें. जातांना श्रीगुरु एकसंध्यांत बाबा म्हणून एक ऋषितुल्य ज्योतिषी होते. त्यांना आपली भेट देऊन गेले. "गरुडेश्वरीं आम्हीं जात आहों" असें गुरुवर्यांनीं बाबांना सांगितलें. बाबांनीं नमन करून गुरुमुखानें आशीर्वाद घेतला. धन्य झालों म्हणाले. दत्त भेटले असें त्यांना वाटलें. मांजरींत श्रीगुरुनाथांनीं कृष्णेचे तीरीं पौष पौर्णिमेचा क्षौरविधि उरकला. मंगेशांनीं गुरुपूजा, भजन व आरती केली. स्वारीला उपहार भोजन दिलें. त्याच गांवचा कुलकर्णी रामराव यानें श्रीगुरूंना आपल्या घरीं सेवेला नेलें. भक्तीनें पूजा वगैरे केली व भक्तगणाला पुरणपोळीचा स्वयंपाक करून भोजनाला बसविलें. भोजनास सुरुवात करण्यापूर्वी आसपासचे गांवाहून श्रीगुरुनाथांचे दर्शनाला आयत्यावेळीं पन्नास एक ब्राह्मण आले. श्रीगुरूंनीं सर्वांना भोजनाला बसण्याची आज्ञा केली. पत्रावळी तितक्या मांडल्या गेल्या. ब्राह्मण जाग्यावर येऊन बसले. तेव्हां रामराव घाबरले. आतां मी या अल्प अन्नांत सर्वांची तृप्ति कशी करूं? सर्वांना काय वाढूं? याप्रमाणें चिंता करीत ते राहिले. वाढायला घेईनात. रामराव चिंतेंत पडताक्षणीं महाराज घरांत गेले. त्यांनीं आपल्या दिव्यदृष्टीनें स्वयंपाक पाहिला. आपल्या गुरुमहाराजांचें तीर्थ त्यावर शिंपलें व "रामराव, वाढायला घ्या. काळजी करूं नका. अन्न कमी पडणार नाहीं.

भरपूर होईल, " असें म्हणाले. गुरुवचनाचा प्रभाव असा झाला कीं, रामरावांचें भय गेलें. त्यांनीं तयार केलेल्या स्वयंपाकानें दुप्पट तिप्पट मंडळी जेवविली; तरी अन्न होतें तितकेंच होतें. श्रीगुरु हे भास्कर भक्ताप्रमाणें माझ्यावरदेखील प्रसन्न झाले, असें तो म्हणाला. गुरुचरित्रांत भास्कर ब्राह्मणाकडून श्रीगुरूंनीं असेंच अल्पान्नानें सहस्रावधि लोकांना जेवविल्याची कथा आहे. तेंच चरित्र श्रीगुरूंनीं पुन्हां करून दाखविलें व आपलें दत्तस्वरूप भक्ताचे हृदयांत भरेल असें केलें. यावरून रामराव मांजरीकर केवढा मोठा भक्त असला पाहिजे याची कल्पना वाचकांनींच करावी.

भक्ताप्रमाणें अभक्तदेखील तेथें होते. जन त्रिविध आहे. त्यांनीं स्त्रियांचे बाबतींत श्रीगुरुनाथांची निंदा केली. त्याच रात्रीं चमत्कार असा झाला कीं, जटाधारी अवधूत निंदकांचे स्वप्नांत गेले व त्यांना दंडानें मारून म्हणाले कीं, " दीनदयाळू स्वामीमहात्म्यांची निंदा पुन्हां कराल तर तुम्हांला मोठें शासन करीन. तुम्ही त्यांना शरण जा. " दुसरे दिवशीं निंदकवर्ग श्रीगुरूंना शरण आला. त्याला श्रीगुरूंनीं सदुपदेश केला. त्या वेळेपासून तो सज्जन झाला.

आपणासारिखे करिती तात्काळ ॥ नाहीं काळवेळ तयांलागीं ॥
पुष्पसंगें मातीस वास लागे ॥ मृत्तिकेचा पुष्पांत गुण न वागे ॥

श्रीगुरुनाथ ब्रह्मनिष्ठाग्रणी विदेह पुरुष होते. ते स्त्रियांचे संगतीनें पतित होणारे नव्हते. तर महापतितांना पावन करणारे, पुष्पाप्रमाणें आपलें पावित्र्य स्त्रियांना देणारे, परमपावन होते. पण अज्ञानी निंदकांना त्यांचा महिमा प्रथम कळला नाहीं, नंतर कळाला.

मांजरीहून श्रीगुरु नणदीकुरोळी येथें द्वादशलिंगांच्या दर्शनाला गेले. श्रीगुरूंनीं पाण्यांतच सदा बुडून असलेल्या द्वादशलिंगांचें पूजन केलें. पाण्यावर बेल ठेवला म्हणजे तो बुडून लगेच लिंगावर जाऊन पडे. तेथें हा एक चमत्कारच आहे. तेथें श्रीगुरूंनीं तीर्थस्नान केलें व संकल्प सांगवून घेतला आणि तो सांगणाऱ्या ब्राह्मणाला सोळा रुपये दक्षणा दिली पाण्यांतगुद्धां जे ओंजळीनें रुपये सोडणारे, त्यांनीं सोळा रुपये संकल्प सांगणाराला दिले. यांत

कांहीं मोठेंसें नवल केलें असें नव्हे. होते जवळ ते दिले, इतकेंच. आणखी असते तर आणखीही देते.

नणदीकुरोळीहून श्रीगुरु नणदीकरांचे सारवटांतून पुन्हां एकदां अमरापुरीं आले. मंदिररचनेच्या व दुसऱ्या कांहीं महत्त्वाचे कामाकरितां ते आले होते. अमरापुरांतून मोदींच्या इच्छेस्तव त्यांचेबरोबर पुन्हां एकदां श्रीगुरु हेरवाडला गेले. तेथून संक्रमणाला पुन्हां एकदां अमरापुरीं आले व प्रयागस्नान करून एक दिवस तेथें राहिले.

अमरापुरांतून महाराज यमुताई काकतकरणींच्या भक्तिस्तव दुसऱ्यांदां टांकळीला गेले. मागच्या खेपेला त्या तेथें नव्हत्या. पण गंगुताईच्या मुखानें त्यांनीं गुरुमहिमा श्रवण केला होता. त्यांनीं भक्तिभावानें गुरुपूजा केली व महाराजांकडून गुरुमंत्र घेतला. महाराजांचे चरणीं मस्तक ठेवतांच ते साक्षात् श्रीविठ्ठलच आहेत असा त्यांना त्यांचा साक्षात्कार झाला. इतके दिवस त्या बाई पंढरीच्या वारकरिणी होत्या. पण सद्गुरुनाथांची भेट होतांच त्यांच्या दर्शनानें विठ्ठलदर्शनानंद त्यांना होतांक्षणीं त्यांनीं ती वारी पुरीच झाली असें मानलें व पंढरीस जाणें बंद केलें. मागें पांच भक्तिणी अमरापुरांत सर्वसंग, घरदार, इष्टेट, गुरुनाथार्पणमस्तु असें म्हणून ज्या गुरुसेविका झाल्या म्हणून सांगितलें त्या पांचांतल्याच हचा एक होत. यांनींदेखील सद्गुरूंची कृपा चौघींबरोबर संपादन केली. विशेषकरून जास्त इस्टेट श्रीगुरुचरणीं यांनींच वाहिली.

टांकळींतून श्रीगुरु, सदलगेकर भक्तांचे बरोबर त्यांच्या प्रेमास्तव सदलगा येथें गेले. महाराजांचाच हा मूळगांव होय. दीक्षित घराण्याचा मूळ पुरुष, ज्याला वाडींत दत्तानें वरप्रदान दिलें होतें कीं, "तुझे वंशांत मी भक्तिधर्म आचरण्यासाठीं जन्म घेईन" तो याच गांवचा म्हणून, हा गांव श्रीदीक्षित-स्वामी नृसिंहसरस्वतीमहाराजांचाच होय. अडके, दंडगे वगैरे वैदिक घराणीं या गांवांत नांदतात. दीक्षित घराणें तर आहेच. महाराज हे आपले ग्रामस्थ व श्रीदत्तही आहेत असें सदलगेकरांचें दुहेरी प्रेम महाराजांवर असे. महाराज हे गुरुभक्त आहेत असें जाणून त्यांना रुचणारी वासुदेवमूर्तीची पूजाअर्चा ते करूं लागले. वासुदेवाला रोज सकाळीं ते रुद्राभिषेक करीत. त्यावेळीं

महाराजदेखील त्यांचेबरोबर रुद्र म्हणत. पण लगेच त्यांची समाधि लागे. अभिषेकानंतर पूजा सुरू होतांच ते उत्थान पावत. मंत्रपुष्प, स्तोत्रें वगैरे म्हटलीं जात. रात्रौ महाराजांपुढें भजन, पुराण, कीर्तन चाले. प्रत्येक भक्त आपापल्या घरीं महाराजांना दिंडीगणासह पूजेला व भोजनाला नेई. ते महाराजांचा जयजयकार करीत. दत्तोबा अडके व शामभटजी दंडगे हे भक्त प्रमुख होते. सर्व ग्रामच महाराजांचा भक्त बनला. दीक्षितांना दिलेल्या वरदानाप्रमाणें श्रीगुरु त्यांचे कुळीं अवतरले व त्यांना स्वतः दिलेल्या त्रैमूर्तीचें पूजन त्यांनीं मूळ घरीं जाऊन केलें. तिचें मंदिर बांधलें. तिला चांदीसुवर्णाचे किरीट वगैरे अलंकार दिले. तिचा माघ वद्य गुरुप्रतिपदेचा उत्सव सुरू केला व विठ्ठल मंदिरांत वासुदेवानंदांच्या पादुकादेखील स्थापन केल्या.

महाराज मोठे उदार होते. तेथें एक बहुरूपी मनुष्य देवाचें सोंग घेऊन भिक्षेला आला. महाराजांनीं त्याला भिक्षार्थ कांहीं रुपये दिले. तसाच एक ब्राह्मण मुलाच्या मुंजीला म्हणून त्यांच्याशीं द्रव्य मागूं लागला. उतारवय झालें होतें तरी त्याला मुलगाच झाला नव्हता. ककमरी गांवचा तो होता. खोटें बोलून द्रव्य मिळवावें हा त्याचा हेतू. "मी रामतीर्थचा आहें" असें त्यानें सांगितलें. महाराजांनीं त्याला दोनशें रुपये दिले व "या रुपयांनीं आपल्या मुलग्याची तुम्ही मुंज करा" असें सांगून त्याला त्याच्या गांवीं पाठवून दिला. चमत्कार असा झाला कीं, त्या वृद्ध निपुत्रिक ब्राह्मणाला त्याच सालीं मुलगा झाला. सर्वांना मोठें नवल वाटलें "सदलगा ग्रामांतील श्रीदीक्षितस्वामींच्या प्रसादानें मला हा मुलगा झाला. ते सत्यसंकल्प आहेत. ते बोलतील तें सत्य होतें. अर्थात् श्रीदत्त ते आहेत. मला त्यांचा अनुभव आला," असें तो ब्राह्मण सर्वांना सांगत सुटला. पुढें आठ वर्षांनीं त्या गुरुमहाराजांनीं दिलेल्या दोनशें रुपयांनीं त्यानें आपल्या मुलाची मुंज केली. लबाडी करणारालासुद्धां श्रीगुरूंनीं लाभयुक्त केला. कल्पवृक्षाखालीं जरी मिथ्या संकल्प केले तरी ते सत्य होतात त्या प्रमाणें ब्राह्मणाचे मिथ्या संकल्प श्रीगुरूंनीं सत्य करून दिले. मग त्यांना कल्पद्रुम कां म्हणूं नये ?

येथें महाराजांनीं फालगुनी पौर्णिमेचा क्षौरविधि केला. वेदगंगेवर स्नानाला गेले होते. श्रीगुरूंनीं भक्तगणासह जलविहार करून सर्वांचे अंगावर आपल्या हस्तें पाणी घातलें. सर्वांनीं श्रीगुरुरायांचेही अंगावर भक्तीनें पाणी घातलें. ते रोजच महाराजांना अभ्यंगस्नान घालीत होते. जळांत उभा असलेला व सुपूजित बसलेला, असे नृसिंहसरस्वतींचे दोन फोटो सदलगेकरांनीं घेतले. पुष्कळांनीं गुरुमंत्र घेतले. महाराजांनीं सदलगेकरांवर फार प्रेम केलें.

प्रकरण १४ वें

भक्तप्रेमी श्रीगुरु नृसिंहसरस्वती महाराज दत्तोबा खचनाळकरांच्या प्रेमास्तव सदलग्यांतून खचनाळला गेले. प्रत्येक गांवीं महाराजांना त्या त्या गांवचे लोक ताशेवाजंत्री लावून भजन म्हणत मिरवीत मिरवीत नेत असत. महाराज ती मिरवणूक आपल्या वासुदेवानंद गुरुमूर्तींची आहे असें मानीत. दत्तोबानें महाराजांना मारुतीच्या मंदिरांत ठेवलें. मंदिराला ध्वज, पताका, तोरणें वगैरे लाविलीं व आपण मराठा म्हणून आपल्या अधिकारानुसार त्यानें नामयज्ञानें गुरुदेवाचें पूजन केलें सात दिवस नामसंकीर्तनाचा सप्ता त्यानें गांवकरी जमवून केला. महाराजांचे स्वारीला पुरेल एवढा महाराजांचे प्रीत्यर्थ आपल्या घरचा शिधा त्यानें महाराजांना दिला. महाराजांनीं दत्तोबाची ती भक्तिभेट आपल्या गुरुरायाला अर्पण केली. दत्तोबानें गुरुमहाराजांना स्वत: तेल लावून स्नान घातलें. श्रीगुरु भक्ताधीन पडले. त्यांनीं तें घेतलें. स्नानकाळीं महाराजांचे पायांचा अंगुष्ट दत्तोबानें प्रेमानें आपल्या मुखांत घालून चोखला. महाराज म्हणाले, " दत्तोबा हें काय करतां ? " दत्तोबा म्हणाले, " भगवंताचे चरणांगुष्टांतलें अमृत पीत आहें. " महाराज हंसले व मनांत म्हणाले कीं, " आपलें अंगुष्टामृत पिणारा हा एकच वत्स आहे. " दत्तोबा प्रेमीभक्त खरे !! व महाराज हे भक्तवत्सल खरे !! म्हणून जातिहीनाला त्यांनीं आपला स्पर्श व चरणांगुष्टामृताचा लाभ दिला व त्याचें उच्छिष्ट आपले अंगाला लावून घेतलें. माउलीला बाळाची लाळसुद्धां गोड व प्रियच वाटते. हा प्रेमाचा स्वभाव होय !! महाराजांनीं दत्तोबाचे भक्तीला भुलून आपल्या गुरुमहाराजांच्या चरणपादुका त्याला दिल्या. गुरुशंकरांनीं आपलें प्राणलिंगच भक्ताला दिलें

असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं. गुरुपादुका म्हणजे आपला जीवप्राणच ते मानीत. याहून औदार्य तें आणखी कोणतें उरलें !!

द्रव्य, वस्त्र, भूमि इत्यादि देणें म्हणजे औदार्य, असें कित्येक समजतात. पण तें खरें औदार्य नव्हे. खरें औदार्य त्यालाच म्हणावें कीं ज्या दानानें एखाद्याचें आत्यंतिक कल्याण होईल. भक्ति किंवा मुक्ति हीं दोन दानेंच या दृष्टीनें खऱ्या औदार्याचीं लक्षणें आहेत. तींच नृसिंहसरस्वतींनीं आपल्या अंगीं धारण केलीं होतीं. ते जगाला भक्ति-मुक्ति दानच करीत सुटले होते. ठिकठिकाणीं आत्मज्ञानाचा बोध ते मुमुक्षूंना देत होते. तद्वत् भजन, पूजन इत्यादिकांनीं भक्तीसुद्धां ते देतच सुटले होते. मागूं येतील त्यांना ते तारक मंत्रोपदेश प्रत्येक मुक्कामीं देत असत. कांहीं गांवीं जास्त तर कांहीं गांवीं कमी, पण पुष्कळांना त्यांनीं उपदेश दिले. आपल्या दर्शनानें, स्मरणानें, वर्णनानें, स्पर्शानें, सहवासानें व सेवेनें सकळांना त्यांनीं भक्ति-मुक्तीच दिल्या. दत्तोबा खचनाळकर याला जसें पादुकारूपी प्राणलिंग दिलें, तसें गणपतराव मोदींना त्यांनीं आपल्या पूजेंतील बाण, म्हणजेसुद्धां आत्मलिंगच तें दिलें. त्याचें वर्णन पूर्वी करायचें राहिलें. तें मी येथें सांगितलें. तद्वत् आणखी लक्ष्मणराव फुलारी किंवा गोविंदराव डिग्रजकर यांनादेखील ज्या त्यांनीं पादुका दिल्या, तशा पादुका किंवा अन्य छाटी वगैरे आपल्या वस्तु त्यांनीं ज्यांना ज्यांना दिल्या तीं सर्व त्या श्रीगुरुशंकरांनीं आत्मभक्तांना आत्मलिंगेंच दिलीं आहेत. त्यांच्या भजनानें आत्मपदाचीच प्राप्ति त्यांना व्हावी, या उद्देशानेंच तीं त्यांना दिलीं. किंबहुना गुरुमंत्र देतांना जसें त्यांनीं त्याबरोबरच आत्मपददान गुप्त रूपानें दिलेलेंच होतें. तद्वत्च वरील वस्तू देतांना तें त्यांनीं गुप्तदान दिलें. उघडदानामध्यें श्रीगुरुराज आपलें गुप्तदान देत असत म्हणून त्यांचेंच औदार्य खरें व तेंच सर्वांत थोर होय. "दाता कोण आहे ऐसा । निज पद देई दासा ।। " असतु.

खचनाळमधून गुरुराज सदलगेकरांच्या आग्रहास्तव माणकापुरला गेले. हा त्यांचा इनामी गांव होय. त्यांनीं महाराजांना त्या गांवाला दरबारी थाटानें सनदी शिपाई वाजंत्री वगैरे संगें घेऊन रथांतून नेलें. दीक्षित कुलोत्पन्न महाराज सदलगेकरांतच अंतर्भूत होत असल्यानें तेसुद्धां माणकापुरचे मोकाशीच होते.

जे अद्वैतपदाचे मोकाशी ते सर्वत्रच मोकाशी होत. तेयें सदलगेकरांनीं महाराजांची थाटानें महापूजा केली व त्यांचा महानैवेद्य सर्व पौरवर्गाला पोटभर प्रसाद दिला. सर्वांनीं श्रींचें दर्शन घेतलें व ते कृतार्थ झाले.

माणकापुराहून कृष्णराव इत्यादि कुलकर्ण्यांनीं श्रींना शरद्वाड गांवीं आपल्या घरीं पूजनार्थ नेलें. भक्तिभावानें मंगलस्नान, पूजा, आरती, भोजन, भजन इत्यादि उपचारांनीं त्यांनीं गुरुसेवा केली. श्रीगुरूंनीं त्यांना आशीर्वाद प्रसाद दिला व त्यांचे विहिरीला पाणी नव्हतें, तिच्यांत स्वकरस्थित कमंडलूंतलें अमृत ओतलें. त्या दिवसापासून ती विहीर जीवनपूर्ण झाली. जळदारिद्र्य दूर झालें. गुरुबळाचे परिणाम कोण जाणूं शकेल ?

शरद्वाडानंतर श्रीगुरूंना देशपांडे मंडळींनीं पुन्हां आपल्या इंगळी गांवीं नेलें. मंगलस्नान, पूजा, आरती, भोजन, भजन वगैरेंनीं त्यांनीं पुन्हां गुरुसेवा केली. त्यांचें प्रेम दुणावलें होतें. इंगळीकर भक्त मोठे भाग्यवान ! त्यांचें भक्तिभावाचें ऐश्वर्य मोठें होय ! वामनराव देशपांडे महान् अधिकारी पुरुष होते. परमार्थश्रवणाच्या इच्छेनें ते महाराजांचे एकनिष्ठ दास बनले. त्यांना महाराजांनीं " विवेकचूडामणि " ग्रंथ सांगून आत्मबोध दिला. महाराजांचें देणें रोख होतें; उधारीचें नव्हतें. ते ग्राहक योग्य असल्यास त्याचे करतळीं आंवळ्याप्रमाणें मोक्षज्ञान देण्याला महान् समर्थ होते. वामनरावांना त्यांनीं चटकच लावली. महाराजांचे दिंडीगणांत वामनराव मिसळले. बाबण नामक एक वेड्यासारखा वागणारा साधू होता. त्याला महाराजांनीं सात-आठ रुपयांचे नारळ फोडून त्यांतलें पाणी पाजलें. त्याची ती इच्छा तृप्त केली. त्याला सर्व रेशीमकांठीं पोषाखानें सजविला. तेव्हां चमत्कार असा झाला कीं तो वेडा असून महाराजांपुढें कीर्तन करून आनंदानें प्रभुकीर्ति गाऊं लागला. सर्वांना मोठें नवल वाटलें. श्रीगुरुसमर्थ काय करणार नाहींत ? मूकं करोति वाचालं !

सावकारांच्या माईंना प्रभूंनीं उपदेश दिला. त्यांच्या इच्छेस्तव स्वतःची दत्तमूर्तीदेखील त्यांना गुरूंनीं दिली. हे आपलेच गुरुराज असें समजून त्या तिची नित्य पूजा करूं लागल्या. त्यांची भक्ती धन्य !

या गांवीं श्रीगुरु नृसिंहसरस्वती व त्यांचे भक्त यांनीं बोधपर प्रश्नोत्तरें झालीं. तीं येणेंप्रमाणें—

भक्त —चित्तशुद्धि म्हणजे काय ? व ती कशानें होते ?

श्रीगुरु —मनांतील दुर्वासना जाणें ही चित्तशुद्धि होय व ती कर्माचरणानें होते.

भक्त —कर्म कोणतें ?

श्रीगुरु —पूजा हेंच कर्म. म्हणजेच ईश्वरार्पणबुद्धीनें केलेलें स्वस्वकर्म.

भक्त —नामानें चित्तशुद्धि होणार नाहीं काय ?

श्रीगुरु —नामापुढेंही कर्म करावें लागतें. नामदेवाला कर्म करावें लागलें हें माहीत आहे ना ?

भक्त —उपासना कोणती व तिचें फळ काय ?

श्रीगुरु —श्रद्धाभक्तिपूर्वक उपास्य देवतेचें अनुस्मरण ठेवणें ही उपासना होय. हिच्या योगानें चित्ताला तदाकारता येते व देवतासान्निध्य घडतें.

भक्त —सगुण साक्षात्कार केव्हां होतो ?

श्रीगुरु —उपासनामंत्राची जितकीं अक्षरें तितके कोटी जप झाला असतां.

भक्त —पण नामरूपाचा मेळ पाहिजे ना ?

श्रीगुरु —होय; अवश्य.

भक्त —मृत्यूबद्दल भीति कां वाटते ?

श्रीगुरु —देहतादात्म्यामुळें.

भक्त —ती भीति नाहींशी होण्याचा उपाय कोणता ?

श्रीगुरु —विचार.

भक्त —देहाबद्दल विचार कसा करावा ?

श्रीगुरु —हा देह दृश्य, जड, अन्नविकार अर्थात् पांचभौतिक आहे. इत्यादि.

भक्त —परमेश्वराचा (आत्म्याचा) विचार सोडून देहाच्या विचारानें काय होणार ?

श्रीगुरु —दोघांचाहि विचार केला पाहिजे. देहाच्या विचारानें त्याची असत्यता कळते व परमेश्वराच्या म्हणजे आत्म्याच्या विचारानें त्याची सत्यता पटते.

भक्त —परमेश्वराविषयीं विचार तो कसा ?

श्रीगुरु —परमेश्वर कोण ? त्याचें स्वरूप काय ? हें दिसणारें दृश्यच त्याचें रूप कीं त्याचेहि आंत तें आहे ? इ०

भक्त —ज्ञान म्हणजे काय ? व त्यानें काय मिळतें ?

श्रीगुरु —देहादिक दृश्याचा साक्षी (ज्ञाता) मी सच्चिदानंद आत्मा आहें असें निश्चित कळणें म्हणजे ज्ञान होय. यानें अजरामर अशा स्वस्वरूपाचा म्हणजेच परमात्मस्वरूपाचा लाभ होतो व तेणेंकरून अविद्याजन्य देहतादात्म्य सुटून जाऊन मृत्युभयांतून कायमची मुक्तता होते.

हा संवाद गुरुभक्त मास्तर दत्तोपंत इंगळे यांचेकडून मिळाला. दत्तोपंतांना महाराजांचा आलेला अनुभव येणेंप्रमाणें आहे.

या इंगळे मास्तरांच्या रघुनाथ नांवाच्या मुलाचें लग्न ठरलें असतां मुलीच्या बापानें तें दुसरीकडे ठरविलें. तेव्हां मास्तरांनीं नृसिंहसरस्वती महाराजांची प्रार्थना मोठ्या काकुळतीनें केली. भक्ताभिमानी श्रीगुरु लगेच त्या सोयऱ्याच्या घरीं रघुनाथाचें लग्न जमविण्याकरितां स्वतः गेले असें मास्तरांना स्वप्नांत दिसलें व त्या प्रमाणें अचानक रीतीनें तें लग्न रघुनाथाच्या व मास्तरांच्या मनाप्रमाणें घडून आलें. असेच अनेक अनुभव मास्तरांना श्रींनीं दिले. मास्तर हे श्रीगुरूंचे एकनिष्ठ प्रेमळ भक्त होत.

महाराजांबरोबर दोन संन्यासी असत. ते मुमुक्षु होते. त्यांतले एक भगवान् नामक स्वामी तर फारच विरक्त होते. महाराजांनीं त्यांना आपल्या छाट्या दिल्या. त्यांचे रेशमीकांठ वैराग्याला शोभेनात म्हणूनच जणूं त्यांनीं फाडून टाकले. भोजनाचे वेळीं ते लांब कोठें तरी जाऊन बसत. मग मंडळी त्यांना हुडकून आणीत. ते आल्याशिवाय महाराज फलाहार घेत नसत. भगवानस्वामी भोळे गुरुभक्त होते. म्हणून महाराज त्यांचें असें कौतुक करीत.

इंगळीमध्यें लष्करची लक्ष्मीबाई जहागीरदारीण गेली. तिनें महाराजांना अमरापुरला आणलें. तिनें त्यांची स्वहस्तें उटी लावून, हार घालून छाट्या

पांघ्ररायला घालून तेथें महापूजा केली. योग्य अशी दक्षणाही समर्पण केली व गुरुस्थापनेला उत्सवाचे स्वयंपाकार्थ लागणारीं मोठीं व लहान सर्व प्रकारचीं भांडीं त्यांनीं दिलीं. वासुदेवमूर्तीची महापूजा, पालखी, ब्राह्मणभोजन इ. सेवा करून ती बाई गुरुप्रसाद घेऊन गेली.

यात्रोद्देशानें पर्यटन करीत असतां पांचसहा वेळां श्रीगुरु अमरापुरीं आले. मंदिराची रचना वगैरे सहज पाहून गेले. या खेपेला बहुतेक मंदिर तयारच झालें. महाराजांनी अखेर स्वतः पुढें उभें राहून आपल्यासमक्ष मंदिराचें काम पुरें करायला लावलें. तेव्हां तें पूर्ण झालें.

महाराजांचे मावसबंधु श्रीपादपंत कुलकर्णी हे इचलकरंजीहून आणखी कांहीं लोकांसह अमरापुरीं आले. त्यांनीं श्रीगुरूंना इचलकरंजीला आपल्याकडे कांहीं काळ सहवासार्थ नेलें. देवळांत महाराज राहिले. त्या देवळांत सुंदर दत्त-पादुका आहेत. त्या नमुन्याप्रमाणें वासुदेवमहाराजांच्या पादुका त्यांनीं कुरुंदवाडच्या नारायण गवंड्याकडून करून घेतल्या. एक षड्भुज दत्तमूर्ती बैठी, एक अमरेश्वराचें भव्य लिंग, चौसष्ट योगिनींच्या मूर्ति आठ व गणपति असे देव स्थापनेकरितां करवून घेतले. याप्रमाणें मंदिर व देव तयार करून ठेवले. वाडींत असतांना आणखी एक गुरुपादुकांचें सिंहासन तयार करविलें होतें. या पादुकास्थापनेचा योग येईल तेव्हां येवो, असें म्हणून तें अमरापुरीं येतांना दीक्षितांच्या म्हणजे आपल्या घरीं ठेवून दिलें आहे.

इचलकरंजींतील पुष्कळशा लोकांनीं महाराजांना आपल्या गृहीं पूजनादिकाला नेले होते. श्रीपादपंतांनीं आपल्या घरींही नेलें. त्यांची पूजा, आरती केली. महाराजांचे दिंडीगणाला मेजवानी व महाराजांना फलाहारभिक्षा त्यांनीं दिली. श्रीपादपंत महाराजांचे लहानपणचे शाळासोबतीदेखील होते. त्यांचे चिरंजीव अण्णा हे विद्वान् व गवई असून कीर्तन करण्याची त्यांना फार आवड होती. महाराजांना त्यांनीं कीर्तनें ऐकविलीं. महाराज खूष झाले. "आमचे अमरापुरचे हरदास तुम्हीच" असें त्यांनीं त्यांना बहुमानानें म्हटलें. अण्णांवर महाराजांचा प्रेमा फार होता तसाच अण्णांचा भाव गुरुवरांवर दृढतर होता. म्हणून त्यांना नृसिंहसरस्वतीप्रभूंनीं आपले हरिदास म्हटलें.

गुरुभक्त गोविंदराव डिग्रजकर यांचा प्रेमा महाराजांवर फार होता. त्यांनीं ओताऱ्याकडून नृसिंहसरस्वती प्रभुरायांची धातुमय मूर्ति बनवून घेतली व ती त्यांना एके दिवशीं दाखविली. गोविंदरावांचा प्रेमा गुरुमूर्तीवर होता. पण गुरुमहाराजांचा प्रेमा त्यांच्या श्रीवासुदेवानंदांवर होता. त्यांना ती स्वतःची मूर्ति आवडावी कशी ? किंचित् रागाचा आविर्भाव दाखवून ते त्यांना म्हणाले कीं, " गोविंदा, आमच्या महाराजांचो मूर्ति करावयाची सोडून आमची कशाला करविलीस ? हें भाषण ऐकून त्या भक्तवर्याला, महाराज रागावले म्हणून खेद झाला. आपला भोळा भक्त खिन्न झाला असें पाहतांच त्यांचे समाधानार्थ भक्तवत्सल प्रभू त्याचेकडे पाहून हंसूं लागले. तेव्हां गोविंदरावांना बरें वाटलें. गुरु व शिष्य दोघेही आपापल्या गुरुदेवाबद्दल प्रेम दाखविते झाले. अस्तु.

श्रीनृसिंहसरस्वतीगुरुनाथांना वाडी सोडून नऊ महिने होत आले. भक्तांच्या इच्छेस्तव त्यांच्या त्यांच्या गांवीं ते गेले. भक्तमनोरथ त्यांनीं पुरविले. भक्ति-धर्माची स्थापना सर्वांचें अंतःकरणांत केली व आपली अमरापुरच्या आसपासची पंचक्रोशी यात्रादेखील इचलकरंजींत संपूर्ण केली. तोंपर्यंत अमरापुरांत मंदिर-देखील तयार झालें. आतां चातुर्मासापूर्वी गुरुस्थापना झाली पाहिजे असें महाराज श्रीपादपंतांपाशीं बोलले. श्रीपादपंत, फडके अग्निहोत्री व श्रीगुरु-महाराज अशा तिघांनीं एकत्र बसून स्थापना केव्हां करायची तो मुहूर्त निश्चित केला. वेदमूर्ति फडक्यांकडे याज्ञिक कर्म करण्याची जबाबदारी महाराजांनीं दिली. स्थापनेचे पूर्वीचें स्थापनांगभूत कर्म श्रीपादपंतांना करायला सांगितलें. लगेच स्थापनेला लागणारें सामानसुमान पंतांनीं तयार केलें व सर्व साहित्यानिशीं ज्येष्ठमासीं महाराजांची स्वारी आपल्या सर्व मंडळीसह अमरापुर येथें श्रीगुरुवासुदेवानंदांच्या स्थापनेला आली.

अमरापुरकर कुलकर्णी व भजनी मंडळी, जी महाराजांना नावेंतून पूर्वी घेऊन गेली होती ती, या सर्वांनीं मंदिराला चुना वगैरे लावून तें सुशोभित केलें. सर्वत्र मोठमोठे मंडप घातले. देशोदेशींचे विद्वान ब्राम्हणांना महाराजांचे आज्ञेनें आमंत्रणपत्रें पाठविलीं. महाराजांच्या गांवोगांवच्या भक्तांना सह-

कुटुंब सहपरिवार बोलावण्यांत आलें. आण्णासाहेब कुरुंदवाडकरांनीं लागेल ती मदत द्यायला सुरुवात केली. साधुसंत, जपी, तपी, संन्यासी, गृहस्थ वगैरे सर्व समाजाची मोठी यात्रा भरली. नानानऱ्हेचीं वाद्यें वाजूं लागलीं. सर्व भक्त जमले, जे ते आपापलीं कामें करूं लागले. श्रीपादपंतांनीं करावयाचें तें सर्व स्थापनांगभूत कर्म व्यवस्थित केलें. फडक्यांनीं आपलें कर्तव्य जें यजनयाजन तेंही सर्व केलें. नंतर ज्येष्ठ वद्य सप्तमीचे दिवशीं सकाळीं प्रहर दिवसा श्रीनृसिंहसरस्वतीमहाराजांनीं " श्रीवासुदेवानंद सरस्वतींच्या पादुका, दत्तमूर्ति, अमरेश्वर, गणपती व योगिनी ह्या पंचायतनाची स्थापना शके अठराशें पंचेचाळिसांत स्वहस्तें केली. त्यावेळीं चमत्कार असा झाला कीं, कोठेंही आदले दिवसापर्यंत पाऊस पडला नसून सकाळपासून श्रीकृष्णा नदी जी चढूं लागली ती स्थापनेच्या वेळेपर्यंत इतकी वरती आली कीं, वाडींतल्या श्रीदत्तपादुका पाण्यांत बुडाल्या. त्यांचेवर पाणी गेलें. यांत चमत्कार तो इतकाच कीं, गुरुमहाराज इचलकरंजींत असतां एकदां सहज म्हणाले होते, " अमरापुरांत दत्तमहाराज वाडीहून पाण्यांतून येतात अशी वहिवाट गुरुचरित्रांत लिहिलेली आहे. त्या वहिवाटीला अनुसरून स्थापनेच्या दिवशीं वाडीहून दत्तमहाराज पाण्यांतून बुडूनच येतील. पादुकांवर त्या दिवशीं पाणी येईल व त्या बुडतील. " श्रीगुरूंनीं हें भाषण पुढील भविष्य जाणूनच केलें होतें. त्याप्रमाणें स्थापनेच्या ऐनवेळीं वाडींत दत्तपादुका बुडाल्या. महाराज बोलले होते त्याप्रमाणें दत्तमहाराज कृष्णेच्या पाण्यांतून स्थापनेला अमरापुरींत आले, असेंच म्हणावें लागतें. गुरुवचनाचा प्रत्यय सर्वांना आला. सद्गुरुवाक्य सत्य असतें. ते बोलतात तसेंच तें होतें.

स्थापना झाल्याबरोबर श्रीगुरूंनीं यात्रा करतांना जे बाण, वासुदेवानंदांची मूर्ति व त्यांचे कांहीं फोटो इत्यादि देव बरोबर ठेवले होते ते घेऊन सर्व भक्तगणांसहित नौकेंत बसून वाजत गाजत ते वाडीच्या दत्तमंदिरापुढें गेले. मंदिर अर्धे पाण्यांत बुडालेलेंच होतें. अशा वेळीं नौकेंतून दत्तपादुकांप्रीत्यर्थ पाण्यांतच षोडशोपचार पूजा त्यांनीं अर्पण केली व नारळ, खारका वगैरे ताटें भरून पाण्यांतच सोडलीं. पुष्कळसे रुपयेदेखील सोडले व हातांत आरतीचें ताट घेऊन नावेंतच उभे राहून आरती म्हणून त्यांनीं ओवाळली, स्तोत्र

म्हटलें व श्रीदत्ताला दंडवदन केलें. नंतर सर्वांनीं मिळून दत्तप्रभूचा, वासुदेवानंदांचा व अमरेश्वराचा मोठ्यानें जयजयकार केला व ते नाव घेऊन अमरापुरीं परत आले.

अमरापुरांत महाराजांनीं दत्ताची स्थापना केली. तेथें तर त्यांचें प्रेम बसलेंच पण पूर्वीच्या स्थानावद्दलचेंदेखील त्यांचें प्रेम होतें तसेंच होतें, ही गोष्ट वरील चरित्रावरून सिद्ध होते.

वाडीला जाऊन आल्यानंतर महाराजांनीं स्थापित देवांची स्वहस्तें महापूजा केली. आरती झाल्यावर "श्रीवासुदेवानंद दत्तामरेश्वरा" चें स्तोत्र त्यांनीं नवें करून म्हटलें.

" जगज्जन्महेतुं दयापूर्णसिंधुं ॥ भजत्कामधेनुं निधिं सज्जनानाम् ॥
प्रसन्नं शरण्यं श्रुतेः सारभूतं ॥ परब्रह्मलिंगं भजस्वामरेशं ॥ १ ॥

इत्यादि बारा श्लोकांचें स्तोत्र त्यांनीं नवें करून म्हटलें. आणखीदेखील कांहीं नवीं स्तोत्रें त्यांनीं केलीं. तीं त्यांचे भजनी पुस्तकसंग्रहांत आहेत. श्रीवासुदेवानंदकृत समस्त ग्रंथसंग्रह वाडींत असतांना यांचेपाशीं होता. तो त्यांनीं अमरापुरांतच ठेवला. त्यांतच त्यांचीं स्तोत्रें आहेत.

नृसिंहसरस्वतीमहाराजांची इच्छा होती त्याप्रमाणें त्यांनीं निजगुरुरायाची स्थापना केली. तेव्हां त्यांना आपण आज कृतार्थ झालों असें वाटलें. स्वतःचा अर्थ त्यांना तर नव्हताच. म्हणून लोककल्याणार्थ प्रभुरायाची स्थापना त्यांनीं केली. यांत जें लोकहित साधलें, त्याला उद्देशून आपण कृतार्थ झालों, असा त्यांचे म्हणण्याचा अभिप्राय आमचे ध्यानीं आला व तोच त्यावेळीं तेथें जमलेल्या सज्जनांचेदेखील ध्यानीं आला. ते म्हणाले कीं,

असोनी ज्ञान्यांचे नृपति परमात्मा स्वयमपि ।
स्वतांसाठीं ज्यांना नसुनि निजकर्तव्य किमपि ॥
अहो भक्तिश्रद्धा अतुल सगुणीं स्वामि धरिती ।
जनोद्धारासाठीं सदय गुरु संस्था बनविती ॥१॥

वाडींतच ते ही गुरुसंस्था बनविणार होते. पण तेथील लोकांचा योग नव्हता म्हणून तेथें विघ्नें आलीं. कितीही विघ्नें आलीं तरी व हालअपेष्टा, अपमान वगैरे झाला तरी अवधूतवृत्तींत गेले असूनसुद्धां ज्यांनीं लोकहिताची कळकळ बाळगून कर्म, भक्ति, ज्ञानात्मक सगुण गुरुभक्तीचा पंथ सोडला नाहीं, स्वतः तो आचरून त्याची पुन्हां संस्थापनाही करून ठेवली ते लोकहितार्थ झटणारे नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज केवढे दयाळू म्हणून सांगूं बरें !!

या अमरेश्वरस्थानाला उद्देशून वरदानस्वरूपाचे त्यांचे उद्‌गार असे आहेत:—"पूर्व युगांत मोठ्या मोठ्या ऋषि-मुनियोग्यांनीं मोठी तपश्चर्या करून जें फळ मिळविलें तें आम्ही येथें अमरापुरांत गुरुसेवा करणारांना केवळ एका सेवेनें देऊं" या वरील भाषेवरून नृसिंहसरस्वतींचेंसुद्धां स्थान अमरापुरच होय असेंदेखील सिद्ध झालें.

नंतर भक्तांनीं श्रीगुरुनाथांची पूजा केली व ब्राह्मणभोजन झालें. श्रीगुरु स्वतः लाडू वाढीत होते. नंतर चारी वर्णांना बुंदीच्या लाडवांचेंच भोजन देण्यांत आलें. रात्रौ पालखीमिरवण झालें. महाराजांनीं स्वगुरुपालखीचा दंड आपल्या स्कंधावर घेतला होता. याला म्हणतात गुरुभक्त! केवढी ही स्वामीजींची आवड! मी संन्यासी असतां लोकांबरोबर पालखी खांद्यावर कशी घेऊं? असें त्यांना वाटलें नाहीं. गुरुदेवाची सेवा करण्यांत रंगून गेल्यामुळें त्यांना मी संन्यासी आहें असेंसुद्धां भान राहिलें नव्हतें. 'गुरुसेवा करणारा मी एक कोणीतरी' इतकेंच ते समजत होते.

सद्‌गुरुनाथ आपले अशनपानसुद्धां विसरले होते. त्यांची दिंडीगण मंडळी मात्र तें विसरली नव्हती. गुरुमहाराजांची सर्व तऱ्हेची काळजी अनसूया किंवा कृष्णंभटजी इत्यादि भक्तमंडळी घेत असत. त्या भक्त मंडळींचीं नांवें एकदां उत्सवप्रसंगीं आपण घेऊं या. गुरुनाथांचे भक्त ते सर्व संत होत. "पुण्यवंत व्हावें। घेतां सज्जनांचीं नांवें॥" शंकरराव कुलकर्णी, हरिभाऊ कडेकर, गणपतराव, लक्ष्मणराव फुलारी, कृष्णंभटजी पुजारी, बाळु पुजारी, रामचंद्र कट्टी, रामचंद्र शिंगणापुरकर, अप्पा बडबडे, गोविंदराव डिग्रजकर, नारायण तासगांवकर, भगवानस्वामी हे गुरुभक्त पुरुष व अनसूयाबाई,

गोदूबाई, ताई, गंगूताई, टाकळीची यमूताई, वाडीची यमूताई, यमुनाबाई, रंगूबाई, तुळशाबका, तानुआक्का, कमळाबाई, होशाबका, राधाबाई, दत्ताबाई ह्या गुरुभक्त स्त्रिया होत. आणखीही कित्येक पुरुष व स्त्रिया गुरुभक्तगणांत या उत्सवांत होत्या. त्यांचीं नांवें सांगूं गेल्यास ग्रंथविस्तार फार होईल. महाराजांजवळ आलेले सर्व लोक त्यांचे भक्तच होते. अभक्त ते कोणीही आलेच नाहींत. अभक्तांचा प्रवेश उत्सवभूमींत होऊं नये म्हणून श्रीमंत अण्णासाहेब कुरुंदवाडकरांनीं आपले सशस्त्र शिपाई चौफेर उभे करून ठेविले होते.

संस्थानिक, इनामदार, जहागिरदार, सावकार इत्यादि सर्व प्रकारचे लोक उत्सवाला आले होते. सर्वांनीं महाराजांची सेवा केली व प्रसाद घेतला. उत्सव म्हणून देवापुढें कीर्तन, पुराण, भजन, वैदिकांचें वेदपठण, गायन वगैरे झालें. दक्षणा प्रसाद महाराजांनीं सर्वांना भरपूर दिला. रात्रीं अकराचे पुढें गुरु-महाराजांनीं फराळ केला. रात्रभर जागर झाला. हा जो गुरुस्थापनेचा उत्सव झाला हा वासुदेवानंदांच्या पुण्यतिथीच्या उत्सवाचा पहिलाच दिवस समजला गेला. सप्तमीपासून आषाढ शुद्ध प्रतिपदेपर्यंत उत्सवाचें नवरात्र सुरूच होतें. नामसप्ता, ऋग्वेद, यजुर्वेद, वासुदेवग्रंथ, गुरुचरित्र इत्यादि ग्रंथपारायणें रोज सुरू होतीं. संहिता-स्वाहाकार सुरू होता. रुद्राभिषेक, महापूजा, ब्राह्मण-भोजन, कथापुराणें, पालखी वगैरे सर्वच कार्यक्रम रोज सुरू होते. आषाढ शुद्ध प्रतिपदेला वासुदेवानंदांची आराधना झाली. अप्पासाहेब भिर्डीकरांचे हस्तें महाराजांनीं आराधनेचा सर्व विधि करविला. ब्राह्मणांना व संन्याशांना वस्त्रें, पात्रें, दक्षणा, भोजन देण्यांत आलें. तीर्थपूजा झाली. सर्वांनीं तीर्थ घेतलें. नंतर स्थापनेच्या रमण्याप्रमाणेंच चारी वर्णांना पक्वान्नाचा महाप्रसाद दिला गेला. उत्सवांतील अनुष्ठानी ब्राह्मणांना महाराजांनीं सोन्याच्या आंगठ्या, जरीच्या शालजोड्या, चांदीचीं भांडीं, रेशमी धोतरजोडे इत्यादि मौल्यवान देणग्या दिल्या. दहाबारा हजार रुपये खर्च आला. महाराज सत्यसंकल्प भगवान् स्वतः जें कार्य करायला प्रवृत्त झाले तेथें कशाची उणीव पडणार ? अष्टसिद्धि व नवनिधी गुरुमहाराजांचे चरणदासच होत.

निर्विघ्नपणानें कांहीं तंटाभांडण न होतां स्थापनासमारंभ व गुरुपुण्यतिथीचा उत्सव महाराजांचे इच्छेप्रमाणें होतांच त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांचे नेत्रांतून गुरुरायाच्या आठवणीनें प्रेमपूर वहात होते. वाडीच्या दत्तपादुकांसमोर जाऊन आरती करतांना व गुरुरायांची पालखी खांद्यावर घेतांना त्यांचे सर्वांगीं अष्टसात्विक भाव उत्पन्न झाले होते. जीवन्मुक्तीच्या तांडवाबरोबर प्रेमलक्षणभक्तीचेंदेखील त्यांनीं तांडवच केलें व तें एकट्यानें केलें नसून जनतेसह केलें. त्यांनीं आनंदानें त्रिभुवन भरून सोडलें. गुरुभक्तीची कमाल केली !

उत्सवांत भावभक्तीनें सेवा करणारांना श्रीगुरूंनीं प्रीतिपूर्वक प्रसाद दिला. अमृतमधुर भाषणानें त्यांचा गौरव केला. महाराजांची दृष्टि सर्वांवर समान होती. त्यामुळें सर्व भक्तांना वाटे कीं, माझ्यावरच काय ती महाराजांची पूर्ण मर्जी आहे. असें वाटून जो तो " मी एकट्यानेंदेखील सर्व गुरुसेवा करीन, " असा उत्साह धरून उत्सवांत किंवा अन्य वेळींदेखील अमरेश्वरमंदिरांत पडेल ती सेवा करीत असे व अद्यापिदेखील तितक्याच उत्साहानें व गुरुभक्तीनें तेथें राहणारी भक्त मंडळी सर्व कार्यें करतात.

स्थापनेच्या समारंभाला वऱ्हाड, सोलापूर, तुळजापुर, पुणें, सांगली, मिरज, कोल्हापूर, सावंतवाडी इत्यादि ठिकाणची विद्वान् मंडळी व भक्त मंडळी आली होती. गुरुमहाराजांची कीर्ति चारी दिशांत भरून गेली. ब्राह्मणांवर व ब्राह्मण धर्मावर, भक्तांवर व भक्तिधर्मावर, तद्वत् मुमुक्षूंवर, मुक्तांवर आणि मोक्ष धर्मावर–सर्वांवर निरुपम प्रेम करणारे श्रीनृसिंहसरस्वतीमहाराज अमरापुरांत विहार करीत असतात. त्यांचा सर्वत्र विजय चालूं आहे, असें जे ते म्हणूं लागले.

श्रीगुरूंनीं गुरुस्थापना केली व त्यांचें मंदिर बांधलें. ब्राह्मण, साधु, संत यांना द्रव्यानें, अन्नानें संतुष्ट केलें. राजेरजवाडे किंवा ऋद्धिसिद्धि त्यांच्या दासी होत्या. इतकें असून जसें आपल्या गुरूंना मंदिर बांधून दिलें, तसा त्यांनीं आपणांला एक सुखसोईचा मठ मात्र बांधून घेतला नाहीं. येत असलेलें द्रव्य ब्राह्मण, देव, गोरगरीब यांनाच दिलें. आपले पूर्वाश्रमांतले इष्ट बंधुजन

बोलावून त्यांना दिलें नाहीं. आपणांसाठीं द्रव्य ब्यांकेंत ठेवलें नाहीं; परमार्थालाच तें लावलें. इत्यादि गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. श्रीगुरूंनीं हें जें वर्तन केलें तें जगद्गुरु म्हणविणाऱ्या पीठाधिपतींनीं म्हणजे सिद्धांनीं कित्ता घेण्याला योग्य आहे. तद्वत् साधकवर्गानेंही कित्ता घेण्याला तें योग्य आहे. त्यांचें संपूर्ण जीवनचरित्रच असें सिद्धांना व साधकांना अनुकरणीय असेंच आहे. सिद्धांनासुद्धां महाराज स्ववर्तनानें कित्ता घालून देते झाले कीं, जरी आम्ही चाललों तरी लोकसंग्रहार्थ तुम्हीसुद्धां सन्मार्गानेंच चाला. अस्तु.

श्रीगुरूंनीं या वर्षी अमरापुरांतच आपला चातुर्मास केला. पहिल्यापासूनचा हा त्यांचा अठरावा चातुर्मास होय. दुसरीकडे त्यांना भक्त लोक बोलवीत होते; पण अमरापुरांत श्रीदत्तामरेश्वराची म्हणजेच वासुदेवानंदसरस्वतींची स्वहस्तें दोन महिने पूजा करावी या हेतूनें त्यांनीं कोठें अन्यत्र गमन केलें नाहीं. स्वसद्गुरुस्थानींच ते राहिले. झोंपडीमध्येंच श्रीगुरुनाथांनीं व्यासपूजा केली व सद्गुरुसेवेचा नेम धरून ते अमरापुरांतले श्रीगुरुभक्त बनले. रोज श्रीवासुदेवानंददत्तामरेश्वराची माध्यान्हपूजा ते स्वतः करूं लागले. दोन महिनेपर्यंत त्यांनीं हा आपला गुरुपूजेचा नेम अखंड चालविला.

अण्णासाहेब कुरुंदवाडकर गुरुदर्शनाला येत असत. एकदां त्यांचे मस्तकाला झोंपडीचें ठेंगणें दार वडवलें. तेव्हां त्यांनीं झोंपडीचा मठ बनविला. वामनराव इंगळीकरांनीं देखरेखीनें मठाचें बांधकाम करून घेतलें. मठ ओला होता तोंवर श्रीगुरु कुलकर्ण्याचे वाड्यांत राहिले. दोन संन्यासी महाराजांचे सहवासी होतेच. भक्तगणांसह श्रीगुरुनाथ ज्या वाड्यांत राहिले त्या वाड्याची मालकीण भीमाबाई ही मोठी भक्त होती. तिनें श्रीगुरुनाथांना अभ्यंगस्नान घातलें. त्यांची पूजा केली, आरती केली, फराळाला घातलें. तिनें गुरुचरणींचें तीर्थ घेतलें व गुरुपदीं आपलें मस्तक ठेवलें. तिच्या भक्तिस्तव श्रीगुरु मठाचें निमित्त करून तिचे घरीं गेले. चमत्कार असा कीं, ज्या एका पाटावर त्या म्हातारीनें गुरुनाथांना बसवून अभ्यंगस्नान घातलें त्या पाटावर श्रीगुरूंच्या पादुका छाप उठविल्याप्रमाणें उमटून राहिल्या. तसाच त्यांचेजवळ दंडाचाहि छाप आडवा ठेवल्यासारखा उठला. हा गुरुपदचिन्ह व गुरुदंडचिन्ह उमटलेला पाट भक्तिण भीमाबाईनें आपल्या हयातीपर्यंत पूजा करीत

ठेवला. तिचा चरितार्थ त्यामुळें चालूं लागला. तिच्या हयातीनंतर मात्र तो पाट पुन्हां पहिल्याप्रमाणेंच झाला. भीमाबाईबरोबर गुरुपावलेंसुद्धां अदृश्य झालीं. ज्याची मिळकत त्यालाच लाभली. दुसऱ्याला ती उरली नाहीं; कारण त्याला तितकी भक्ति नसेल. अस्तु.

आपल्या श्रीगुरुस्थानांत दत्तमूर्ति नरसिंहसरस्वती प्रेमानें गुरुभक्ति करीत राहिले. वासुदेवजयंती, कृष्णजयंती श्रीरामदजयंती, व गणेशजयंती, हया चातुर्मासांतल्या जयंत्या त्यांनीं महोत्सवानें साजऱ्या केल्या. वामनराव इंगळीकरांना वेदान्तश्रवण करविलें. तसेंच संन्यासी व इतर मुमुक्षु यांनाही देखील आत्मबोध केला.

आपल्या गुरुमहाराजांच्या ग्रंथांचें पारायण करीत ते अमरापुरांत रहात. गुरुग्रंथांवर त्यांचें अतोनात प्रेम होतें. ते ग्रंथ नसून गुरूच आहेत, असें ते मानीत. जो कोणाला मंत्रोपदेश द्यायचा तो ते त्या ग्रंथांतून श्लोक, ओंवी, वाक्य, शब्द वगैरे घेऊन देत असत; दुसरा देत नसत. गुरुहातींची कोणतीही वस्तु ते अत्यंत प्रेमानें सांभाळीत व ती गुरुवत् मानीत. गुरुमहाराजच काय ते एक देव, तीर्थ, मंत्र वगैरे सर्व कांहीं त्यांना वाटे. असें त्यांचें गुरुवरांवर अतोनात प्रेम असे. ते कोठेंही गेले तरी तेथल्या महादेवतांची पूजा करीत. पण आपल्या गुरुमूर्तीची पूजा केल्याशिवाय त्यांना बरें वाटत नसे. म्हणून त्यांनीं गुरुमूर्ति प्रवासांत आपल्याजवळ बाळगली होती. कोठल्याही तीर्थराजांत त्यांनीं जरी स्नान केलें तरी त्यांना गुरुतीर्थ मस्तकीं घेतल्याशिवाय समाधान वाटत नसे. म्हणून त्यांनीं निजगुरुहस्तींचा कमंडलू सतत जवळ बाळगिला होता. त्या गुरुकमंडलूंतलें तीर्थ ते मस्तकीं घेत तेव्हां आपण तीर्थस्नान केलें असें त्यांना वाटे. ते गुरुनामाविण रितें वदन कधीं ठेवीत नसत. गुरुचिंतनावांचून दुसरें कांहीं चिंतीत नसत. ते सर्वकाळ गुरुमूर्तीकडे पहातच बसत. गुरुरायाची यात्रा म्हणूनच ते संचार करीत. सर्व क्रिया, कर्म, धर्म त्यांनीं गुरुमय केलें होतें. किंबहुना, आपणच ते गुरुमय बनले होते. गुरुभक्ति कशी असते हें पाहाण्याची इच्छा करणारांनीं नृसिंहयतिवरांची मूर्तिच पहावी म्हणजे त्यांना ती प्रत्यक्षच दिसेल.

कोल्हापुरांत असतांना त्यांनीं एका अडलेल्या बाळंतिणीला आपल्या गुरुमहाराजांनीं केलेल्या प्राकृत ग्रंथांतली एक ओंवी मंत्र समजून वाचायला दिली. एकदां वाचल्याबरोबरच ती बाळंतीण बाळंत झाली. गुरुवचनावर जशी भावना ठेवावी तसें तें फलद होतें, या गोष्टीचा अनुभव त्यांनीं सर्वांना दिला.

गुरुरायाचे अंगाऱ्यानें त्यांनीं प्रेतेसुद्धां जिवंत केलीं. त्यांनीं अमरापुरांतच एक चमत्कार दाखविला. रामभाऊ कुलकर्ण्यांचा लहान मुलगा कृष्णा मरणोन्मुख झाला होता. त्याची हालचाल, वाणी वगैरे सर्व बंद पडली. तेव्हां त्याला अखेर श्रीगुरुमहाराजांपुढें आणून ठेवला. सर्व इलाज थकल्यावर हातचें पोर गेलें असें वाटल्यानंतर निर्वाणीचा सखा गुरुमहाराज त्यांना आठवले. श्रीगुरुनाथांनीं आपल्या गुरुरायाचा अंगारा त्या प्रेततुल्य झालेल्या रामपुत्राचे मस्तकीं लाविला व "अमरेश्वराला पुजाऱ्याची जरूर आहे, सबब हा मुलगा वांचेल, मरणार नाहीं" असें ते म्हणाले. मुलाला घरीं न्यायला लावला. घरीं जातांक्षणीं मुलगा हुशार झाला. बोलूं, चालूं, खेळूं, जेवूं लागला. पुन्हां जिवंत झाला. लोकांना व मायबापांना महाराजांचे बळाचें आश्चर्य वाटलें व ते श्रीगुरुचरणाचे अनन्य दास बनले; त्यांचे आज्ञाधारक शिष्यच बनले. चमत्काराशिवाय खरा नमस्कार नसतो. अशा श्रींनीं पुष्कळ चमत्कार केले. त्यांतले कांहीं मागें सांगितले; पुढेंहि कांहीं सांगू.

'श्रीवासुदेवानंददत्तामरेश्वर' यांची पूजा अखंड चालावी म्हणून श्रीगुरूंनीं कुलकर्ण्यांना धर्म, कर्म, पूजा वगैरे शिकविलीं व आपण स्थापलेल्या वासुदेवदत्तामरेश्वराची पूजा करण्याची आज्ञा त्यांना त्यांनीं केली. ते म्हणाले, "देवाला मुख्य भक्तीच प्रिय आहे. करितां तुम्ही भावभक्तीनें त्याची त्रिकाळ पूजा करीत जा. सर्वोपचार समर्पण करणें चांगलेंच आहे. निदान नुसतें एक तांब्याभर श्रीकृष्णेचें उदक जरी प्रभूवर तुम्ही घातलेंत तरी चालेल" इतकी सोडवण करून देऊन त्यांनीं सोपारी आज्ञा कुलकर्ण्यांना दिली. त्यावेळीं कुलकर्ण्यांनीं ती शिरसामान्य केली. महाराजांनीं आम्हांला आपल्या पदरीं घेतलें ही भगवंतांनीं आम्हांवर मोठीच दया केली, असें ते

महाराजांना म्हणाले व देवाचे पुजारी झाले. कुलकर्ण्यांना श्रीगुरूंनीं पुजारी बनविलें व आपल्या गुरुमहाराजांना त्यांनीं त्यांचे हवालीं केले. अर्थात्च महाराजांचे भक्त आपणदेखील त्यांचे स्वाधीन झाले म्हटलें तरी बाध येणार नाहीं. केवढें भाग्य त्या कुलकर्णी द्विजांचें कीं ज्यांच्या घरीं प्रभू चालून आला व त्यांचे स्वाधीन होऊन राहिला ! पूर्वजांचें पुण्य व त्यांचें पुण्य अगणित खरें ! !

महाराज अमरेश्वराची माध्यान्हपूजा स्वतःच करीत म्हणून कुलकर्ण्यांनीं दोन वेळची पूजा सुरू केली. आप्पा कुलकर्णी सकाळीं वासुदेवदत्तामरेश्वराची पूजा करूं लागले व शंकरराव संध्याकाळची करूं लागले. पूजा सुरू करतांच चमत्कार असा झाला कीं, " आप्पांचा बारा वर्षांचा पोटशूळ अजीबात बंद झाला " असा जेव्हां त्यांना अनुभव आला तेव्हां मग ते दुसऱ्याला पूजाच करूं देईनात मीच ती करणार असें ते बाकीच्या कुलकर्ण्यांबरोबर भांडूं लागत.

श्रीगुरूंनीं म्लेंच्छमय अशा भूमीचें महाक्षेत्र बनविलें व भक्तिधर्माची स्थापना देवस्थापनेबरोबरच तेथें केली व ब्रह्मकर्माला आणि भगवत्पूजेला सर्वांना लावून त्यांचा उद्धार केला. चातुर्मासभर अखिल भक्त लोकांना भक्तिप्रेमाचा आनंद दिला. शरणागतांचे हेतु पुरविले, परमार्थाचा सुकाळ केला व चातुर्मास संपण्याचे सुमारास भाद्रपदी पौर्णिमेला भागवताचा सप्ता वाडींत असतांना वे. शा. सं. धुंडिराज कवीश्वरांकडून ते जसा करवून घेत तसा अमरापुरांतदेखील त्यांनीं धुंडिराजांचे चिरंजीव वे. शा. सं. दत्तात्रेयशास्त्री यांचे करवीं करविला. हे शास्त्री त्यावेळीं पाठशाळेंत संस्कृत शिकायला नुकतेच जाऊं लागले होते. भागवताचा सप्ता करण्याइतकी त्यांची तेव्हां तयारी नव्हती. तथापि महाराजांनीं त्यांनाच सप्ता करा म्हटलें. " नुसता मूळ ग्रंथ वाच म्हणजे झालें, " असे ते त्यांना म्हणाले. महाराजांचेबरोबर नावेंतून गेलेले व कोल्हापुरांतून आल्यावर पुन्हां महाराजांकडे जाण्यासाठीं रडून आईबापांची त्रेधा करणारे ते हे महाराजांचे प्रिय बाळभक्त दत्तुकवीश्वर चिमुकले शास्त्री महाराजांनी म्हणण्याप्रमाणें लगेच भागवताचा सप्ता करायला बसले.

त्यांनीं प्रथमच हें वाचन केलें. सात दिवसांत सप्ता पुरा केला. महाराजांनीं तो साद्यंत ऐकला व तुष्ट झाले. " दत्ता, तूं पुढें ज्ञानी होशील; तूं माझा प्रिय भक्त आहेस " असा त्यांनीं दत्तबाळाला आशीर्वाद दिला. त्याचे अंगावर उंची शाल घातली. चांदीचें संध्यापात्र दिलें व भागवताची मिरवणूक म्हणून नावेंत पोथीसह दत्ताला घेऊन आपण बसले व भक्तांसह भजन करीत कुरुंदवाडला जाऊन सीमोल्लंघन करून आले.

अमरापुराच्या भजनी मंडळीवर महाराज फार प्रेम करीत. त्यांना खायला, प्यायला, भोजनाला देत. त्यांचें भजन चातुर्मासभर रोज प्रेमानें ते ऐकत बसत. अमरापुरचे चारी वर्ण महाराजांचे भक्त बनले. मुसलमानदेखील महाराजांचे भक्त बनले. एका मुसलमान शाहीरानें श्रीगुरु नृसिंहसरस्वती हे साक्षात् परवरदिगार आहेत, अशा अर्थाचें कवन केलें. महाराज मुसलमानांना-देखील प्रेमानें जेवण देत, प्रसाद देत. त्यांना ते योग्य ती देवस्थानची कांहीं चाकरीदेखील सांगत व ते ती करीत.

भाद्रपद पौर्णिमेला गांवोगांवचे भक्त महाराजांचे दर्शनाला आले. त्यांनीं महाराजांपाशीं नवीन देवस्थानाची सेवा मागितली. तेव्हां त्यांच्या संतोषार्थ श्रीगुरूंनीं ती त्यांना दिली. ती अशी कीं, " अमरापुरांतील श्रीवासुदेवानंद दत्तामरेश्वराचे मंदिरांत जे उत्सव होतात ते सर्वांनीं करावे." असें त्या भक्तांना श्रीगुरूंनीं सांगितलें. तें त्यांनीं मान्य केलें. नणदीकर, कोल्हापूरकर, इंगळीकर, सदलगेकर, कारदगेकर व अमरापुरकर इत्यादि भक्तांनीं ते उत्सव वांटून घेतले. हरिभाऊ यांना महाराजांनीं अमरापुर देवस्थानचे मुख्य अध्यक्षच केले. स्त्रीभक्तसमाजालादेखील कोणाला कांहीं, कोणाला कांहीं सेवा सांगितली. ती ती ते ते भक्त करीत आहेत.

भागवतसप्त्याची मिरवणूक श्रीगुरूंनीं काढली, त्याच दिवशीं यति-शास्त्राप्रमाणें गुरुमहाराजांचा चातुर्मास पुरा झाला. तेव्हां त्यांची शरीर-प्रकृती नादुरुस्त झाली. लक्ष्मणराव फुलारी यानें सुचविलें कीं, " कारदगे मुक्कामीं भक्तांचे अंगीं देवी रेणुका आली होती. आपणांला तिनें कऱ्हाडला बोलाविलें. आपण गेलों म्हणून तिला अभिवचनदेखील दिलेंत व अजून

तिकडे गेलां नाहीं. म्हणून प्रकृती बिघडली असावी असें मला वाटतें. सर्व-ज्ञाला मी काय सांगूं ? " असें भक्तानें सांगितलें. त्यावर महाराजांनीं थोडा विचार केला व म्हणाले कीं, " लक्ष्मणराव बोठे म्हणतात हीच गोष्ट खरी आहे." लगेच ते कन्हाडला जावयाला निघाले. सर्व स्त्री-पुरुष भक्त आपल्या-बरोबर त्यांनीं घेतले. वासुदेवमूर्तीदेखील घेतली व पूर्वीच्या पद्धतीनें यात्रा करीत ते कन्हाडला गेले. रेणुकेची महापूजा करून तिला वस्त्रालंकारांनीं मंडित केली. महानैवद्य समर्पण केला. आरती, स्तोत्रें वगैरे म्हटलीं व तिला वंदन करून देवीचा तीर्थांगारा घेतला. त्यासरशीं त्यांची प्रकृति बरी झाली. कुळदैवताची कृपा संपादिली असतां अनिष्टाचें निवारण होतें, ही गोष्ट श्रीगुरूंनीं सर्व लोकांना जाणविली. लोकशिक्षणार्थ श्रीगुरूंची सर्व लीला असते. महाराजांनीं त्या देवीचे देवळाचा जीर्णोद्धार केला.

कन्हाडांत श्रीगुरु असतांना नणदीकर बोवासाहेब तेथें गेले. मागें तेरावे प्रकरणांत महाराजांनीं ज्यांचे पत्नीला नारळ व पुत्र होण्याचा वर दिला म्हणून सांगितलें तेच हे बोवासाहेब होत. महाराजांनीं सांगितल्याप्रमाणें त्यांना एक वर्षाचे आंतच पुत्रसंतान झालें. म्हणून ते त्यांना पुत्रनाम-करणाकरितां नणदीला नेण्यासाठीं कन्हाडला गेले व महाराजांना आपल्या घरीं घेऊन आले. गुरुकृपेनें म्हातारपणीं झालेल्या एकुलत्या एक मुलाला त्यांनीं श्रीगुरुनाथांचे चरणीं घातला व ' याचें आपणच नांव ठेवा ' असें त्यांना म्हणाले. श्रीगुरुनाथांनीं प्रसन्न मुद्रेनें त्या मुलाचे वदनाकडे पाहिलें व दिगंबर असें त्याचें नांव ठेवलें. तेव्हां मंगलवाद्यें वाजलीं. महाराजांनीं बोवासाहेबांना सांगितलें कीं," आमच्या वासुदेवदत्तामरेश्वराच्या कृपेनें हा मुलगा तुम्हांला झाला. याला कपडालत्ता कराल तेव्हां ज्याच्या कृपेनें हा मुलगा झाला त्यालासुद्धां तो देत जा." बोवा " होय " म्हणाले. महाराजांची पूजा त्यांनीं केली, व कृतोपकाराबद्दल आपली कृतज्ञताबुद्धि त्यांनीं व्यक्त केली. महाराज तेथें असतां त्यांनीं बोवांचे घरची पिशाचबाधा नष्ट केली. महाराजांचे वास्त-व्यानें पवित्र झालेल्या बोवांचे वाड्यांत तो पिशाच पुन्हां गेला नाहीं, घाबरून पळून गेला.

गाणगापुरांत एका भक्ताला दृष्टांत झाला कीं, "नणदीला जा म्हणज तुझी इच्छा पुरी होईल. आमचें दर्शन तुला तेथें होईल." असा दृष्टांत होतांच तो भक्त नणदीला गेला. महाराजांना पाहतांच त्याला ते सोक्षात् नृसिंहसरस्वती दत्तभगवानच दिसले. तेव्हां अष्टसात्विक भाव त्यांचे अंगीं उद्भवले. त्यानें श्रीगुरूंचें स्तवन केलें व त्यांचे हातचा प्रसाद घऊन तो आनंदमय होऊन गेला.

महाराजांबरोबर टांकळी मुक्कामीं संन्यास घेतलेले एक स्वामी होते असें पूर्वी सांगितलेंच आहे. पहिल्या वर्षी संन्याशाचा चातुर्मास चार महिन्यांचा असतो व नंतर दोन महिन्यांचा. महाराज कऱ्हाडला निघून गेले तरी नवे स्वामी अमरापुरांतच राहिले होते. कुलकर्ण्याचे वाड्यांत ते रहात असत. महाराजांना सकाळीं रोज वंदन करण्याचा त्यांचा नेम होता. मठांत जाऊन गुरुवंदन करावें व नंतर जपानुष्ठान सुरू करावें. याप्रमाणें त्यांचा क्रम असे. पण महाराज गेल्यावर आतां वंदन कोणाला करायचें? असें म्हणून त्यांनीं साहजिक रीतीनेंच तो क्रम बंद केला. ते आपल्या आसनावर बसून जप करूं लागले. तों तंद्रींत त्यांना असें दिसलें कीं, आपण रोजच्याप्रमाणें मठांत गेलों. श्रींना वंदन केलें. तेथून अमरेश्वराचे मंदिरांत आलों. तेथेंही मंदिरांत दत्तमूर्तीचे जागीं महाराजच असून आपण त्यांना वंदन केलें. तों महाराज आंतून म्हणाले कीं, "आम्ही कोठें गेलों नाहीं. नित्याप्रमाणें सेवा चालूं द्या" असें स्वप्न पाहून लगेच स्वामी जागे झाले. शंका गेल्यामुळें त्यांनीं मठांत महाराजांना वंदन करण्याचा व मंदिरांत जाऊन पुन्हां त्यांना वंदन करण्याचा आपला रोजचा नेम सुरू केला. या दृष्टांतावरून असें ठरलें कीं, अमरापुरांत महाराज स्वतः वास्तव्य करून अखंड राहिले आहेत. जसे गुरुचरित्रांतले नृसिंहसरस्वती वाडींत व गाणगापुरांत राहूनच शैलयात्रेला गेले तसे महाराज यात्रेला गेले तरी अमरापुरांतच राहून गेले.

नणदीमध्यें स्त्रियांचें झालेलें भांडण व त्यावरून बोवासाहेबांचा व महाराजांचा झालेला संवाद मागें सांगितलाच आहे. बोवासाहेबांचे मुलांचें नांव ठेवून श्रीगुरु गुरुद्वादशीला अमरापुरीं आले. येतांना घंटा, तास, झांजा वगैरे

देवोपकरणें व दत्तमूर्ति घेऊन आले. सदलग्यांतल्या त्रैमूर्तीला (दीक्षितांचे) देखील तशींच उपकरणें त्यांनीं तेथून पाठविलीं. महाराजांनीं गुरुद्वादशीचा उत्सव मोठ्या समारंभानें केला. बाळासाहेबांनीं प्रतिवर्षीं गुरुद्वादशीचें प्रयोजन करावें असें पूर्वीच ठरलें. त्याप्रमाणें त्यांनीं तें केलें. महाराज बाळासाहेब नणदीकरांवर प्रसन्न झाले व " अशीच गुरुसेवा चालवी म्हणजे गुरुकृपा पूर्ण होईल, " असें म्हणाले. बाळासाहेबांनीं आपली सेवा अखंड चालविली आहे. अमरापुरांत गुरुद्वादशीचे दिवशीं चारी वर्णांना पोटभर अन्नाचा प्रसाद मिळतो. त्याचा खर्च बाळासाहेब देतात. बाळासाहेबांची गुरुनिष्ठा वाखाणण्यासारखी आहे.

नणदीमध्यें, सांगलीमध्यें किंवा दुसऱ्याहि कांहीं ठिकाणीं महाराजांबरोबर असलेल्या स्त्रियांमध्यें कलह झालेला तेवढाच लोकांनीं पाहिला व त्याचेंच वर्णन ते करूं लागले. पण त्या कलहाला कारण काय ? कशासाठीं तो कलह होता ? इकडे कोणीच पाहिलें नाहीं. विचार करून पाहिलें असतां तो कलह नव्हता. तर ती गुरुभक्तीच होती. " मी गुरुसेवा करीन. तूं कोण करणार ? " असा जो कलह, तो जर कलहच म्हणायचा असेल, तर गाणगापुरांतील गुरुभक्तांनीं दिवाळीच्या दिवशीं " मी गुरूंना माझ्या घरीं नेईन; तूं कोण नेणार " असा जो हट्ट धरला तोसुद्धां आमच्या गुरुभक्तिणींच्या हट्टासारखाच होता. मग त्यालासुद्धां कलह कां म्हणूं नये ? व तो निंद्य कां समजूं नये ? स्वत: श्रीगुरूंनीं म्हणजे दत्तांनीं तर तो ' निरवद्य आग्रह ' म्हणजे ' योग्य हट्ट ' च ठरविला. मग आमच्या नृसिंहसरस्वतीच्या भक्तिणींनीं केलेला हट्ट गुरुसेवेविषयींचा होता म्हणून योग्यच नव्हे काय ? अयोग्य, निंद्य असें त्याला कसें म्हणतां येईल ? ज्यांना खरोखर गुरुभक्ति असते तेच गुरुसेवेचा असा अलौकिक आग्रह धरतात; भक्ति नसणारे तो धरीत नाहींत व भांडतदेखील नाहींत. म्हणून काय ते थोर झाले काय ? भांडखोर का असेनात ? भक्त तेच थोर होत असें आमचें मत आहे. घोड्याचे कंठांत एक देवमणी असला म्हणजे त्याच्या बाकीच्या अवलक्षणाकडे तज्ज्ञ लोक जसे दुर्लक्ष करतात तद्वत् एक निष्ठावंत भाव असला म्हणजे भक्ताच्या सर्व दुर्गुणांकडे श्रीगुरुभगवान लक्ष देत नाहींत.

गुरुद्वादशी होतांच श्रीगुरुनाथांना अप्पाशास्त्री दंडगे सदलगेकर यांनीं दिवाळीकरितां कोल्हापूरला आपल्या घरीं नेलें. हे अप्पा महाराजांचे नामदेवच होत. यांच्यावर महाराजांचें प्रेम फार. सदलग्यांत असतांना महाराजांनीं यांना "भागवत वाचून मग अन्नग्रहण करा" अशी आज्ञा केली. अप्पा अल्लड होते. पण महाराजांचें दर्शन घेतल्याशिवाय जेवायचें नाहीं, असा मात्र त्यांचा नेम होता. नेमाप्रमाणें भोजनापूर्वी ते विठ्ठल मंदिरांत महाराजांचे दर्शनाला गेले. महाराजांनीं विचारलें कीं, "काय अप्पा! भागवत वाचलेंत का!" अप्पा म्हणाले, "विसरलों, घरीं जाऊन तें वाचतों व नंतर जेवतों." अप्पा घरीं गेले. वचनाप्रमाणें वागले. दुसरे दिवशीं गुरुदर्शनास गेले. महाराजांनीं तसाच प्रश्न केला. अप्पांनीसुध्दां 'विसरलों' असेंच सांगितलें. आठ दिवस महाराज त्यांना "भागवत वाचलेंत काय" म्हणून विचारीत व अप्पा रोज 'विसरलों, घरीं जाऊन वाचतों' म्हणत. नववे दिवशीं अप्पांना स्मरण राहिलें व भागवत वाचून भोजनापूर्वी गुरुदर्शन घ्यावें म्हणून ते गेले. त्या दिवशीं महाराजांनीं त्यांना विचारलेंच नाहीं; गप्प राहिले. मग अप्पाच त्यांना विचारूं लागले कीं, "महाराज! आज मला आपण भागवताचा प्रश्न कां नाहीं केला?" महाराज म्हणाले, "तुमचें तुम्हांला स्मरण होईपर्यंत विचारावयाचें आम्ही ठरविलें होतें. आज तुम्ही आठवण ठेवून वाचून आलांत, मग आम्ही कशाला प्रश्न करूं?" अप्पांना तेव्हां समजलें कीं महाराज देवळांत बसून गांवांत कोणाचे मनांत किंवा आचरणांत काय काय येतें तें सारें जाणतात. हे सर्वज्ञ आहेत. असें कळाल्या दिवसापासून तर त्यांची महाराजांवर जास्तच भक्ति जडली. जसा भाव तसा देव. महाराज दिवाळीला आपल्या घरीं यावेत, असा अप्पांचा भाव झाला. मग देवाला तसें वागणें प्राप्तच झालें. अप्पांबरोबर महाराज कोल्हापुरला गेले.

महाराज एकटे थोडेच जात होते? त्यांच्याबरोबर त्यांचें सारें लटांबर-भक्तमंडळीदेखील ते जिकडे जात तिकडे असायचीच व महाराज त्या भाग्यवंतांसहितच जायचे. तसे ते दिंडीगणांसह वासुदेवमूर्ति घेऊनच गेले होते. अप्पांनीं एक दवाखाना उघडला होता. त्या इमारतींत महाराजांची स्वारी उतरली. त्यांनीं दिवाळीच्या दिवशीं महाराजांना मंगलस्नान घातलें. अत्तर,

गुलाब, हारतुरे वगैरेंनी गुरुदेवांना सुशोभित करून आरती ओवाळली, फलाहार दिला व बोलून चालून प्रिय भाषणांनीं महाराजांचे मनाला खूप केलें. महाराजांनीं त्यांना दवाखान्याला उत्तेजन म्हणून दोनशें रुपये दिले. अप्पांनीं प्रसादबुद्धीनें त्यांचा स्वीकार केला व दवाखान्याला "नृसिंहसरस्वती आरोग्य मंदिर" असें नांव दिलें. कांहीं वर्षांनीं त्यांनीं हें सदलग्यांत आपल्या रहिवासस्थानींच उघडलें. महाराज पूर्वीच्या वर्षी दिवाळीला कोल्हापुरांतच होते. तेव्हांप्रमाणेंच यंदादेखील करवीरक्षेत्रस्थ भक्त महाराजांना आपल्या घरीं नेऊन त्यांची पूजा, आरती करीत असत. महाराजांनीं जगदंबेची महापूजा मागच्या वर्षाप्रमाणेंच थाटानें केली. जगदंबेला नेसायला एक उंची रेशमी जरीची पैठणी दिली, ब्राम्हणसंतर्पण केलें व पुन्हां क्षेत्रयात्रादेखील केली. एके दिवशीं एका वैद्यराजानें महाराजांची हस्तनाडी पाहिली. ती त्याला कांहीं सांपडली नाहीं. तो महाराजांना म्हणाला, "महाराज, नाडी चालत नसतां आपण बोलतां वगैरे कसे ?" महाराज म्हणाले, "वैद्यबुवा, नाडी चालत नाहीं म्हणतां तर आतां आमचें पुढें कसें व्हायचें ?" वैद्यानें तरी काय सांगावें ? कसें व्हायचें तें प्रत्यक्ष तो पाहूनच राहिला होता. पण त्याचे तें लक्षांत आलें नाहीं कीं, जीवपणा नसून ईश्वरपणा येथें आलेला आहे व यांचें सर्व वर्तन ईश्वरी लीला आहे, असें त्या वैद्यांना समजलेंच नाहीं. त्यांनीं मौनानेंच उत्तर दिलें व तेंदेखील विचाराअंतीं बरोबरच म्हणावें लागतें. कारण गुरुमूर्तीच्या स्वरूपाचें व्याख्यान मौनच होय. "**मौनव्याख्या प्रकटित परब्रह्मतत्वं युवानं**" असें त्याबद्दल प्रमाण आहे. अस्तु.

श्रीवासुदेवानंद दत्तामरेश्वराची स्थापना होईपर्यंत श्रीगुरूंनीं दक्षिणखंड यात्रा केली. आतां ते उत्तरखंडयात्रेला म्हणजे गरुडेश्वराला निघाले. हरिभाऊ वाडेकरांकडे अधिक असलेलें सामान त्यांनीं ठेवून दिलें. लांबचा प्रवास व बरोबर बाल आणि वृद्ध भक्त असल्यामुळें भक्तांना त्रास न व्हावा म्हणून महाराज आगगाडी, मोटार वगैरेचे साह्यानेंच प्रवास करूं लागले. कोल्हापुराहून ते पांडवपंचमीला निघाले. कोरेगांवावरून जाऊन माहुली क्षेत्रीं कृष्णावेणी संगमांत त्यांनीं स्नान केलें. तेथें एक माहुलीकर ब्राह्मण आला व म्हणाला कीं, "मला गेल्या रात्रीं दृष्टांत झाला. एक अवधूत आले व म्हणाले : उद्यां एक

यतिवर येथें येतील. त्यांना तूं भिक्षा कर." मी आपली वाटच पहात होतों. महाराजांनीं माझे सदनीं हे पावनचरण लावावेत. ब्राम्हणाची भक्ति पाहून श्रीगुरु भक्तगणासहित त्या ब्राह्मणाचे घरीं गेले. त्यानें महाराजांची षोडशोपचार पूजा केली व त्यांना फलाहार दिला; भक्तांना भोजन दिलें. महाराजांचे हातचा प्रसाद घेऊन तो भक्तराज धन्य झाला.

माहुलीहून महाराज परत कोरेगांवीं आले व तेथून वांईला गेले. वांईची यात्रा करून महाबळेश्वरला गेले. श्रीकृष्णा नदी तेथें उगम पावते. कृष्णेचें माहेरच महाबळेश्वर स्थान होय. महाराजांनीं सुवासिनीला बोलावून लुगडें, खण, नारळ, दक्षणा, भोजन इत्यादि समर्पण केलें व माहेरघरीं कृष्णापूजन केलें; कुंडांत स्नान केलें. तेथें कार्तिक शुद्ध एकादशी केली व तेथून वांईवरून लोणंद मार्गानें फलटणला आले. अप्पा बडवडे हे महाराजांचे भक्त होत. त्यांचे इच्छेस्तव महाराज फलटणला आले. वेलणकर नामक सद्गृहस्थांनीं प्रथम आपले घरीं महाराजांना नेलें. महाराजांनीं वाणगंगेंत स्नान करून त्या तीर्थाचें स्तोत्र केलें. वेलणकरांनीं श्रीगुरूंना चार दिवस स्वसदनीं ठेवून घेतलें. त्यांनीं महाराजांचा मोठा उत्सवच केला. महाराजांचें भजन, पूजन, आरती वगैरे नेहमीं चालूच असे. भक्तगण रोज दत्तपंचपदी करीतच असत.

चार दिवसांनीं महाराज अप्पांचे घरीं गेले. अप्पा व त्यांची माता ह्या दोन्ही मायलेकरांनीं श्रद्धाभक्तिपूर्वक नृसिंहप्रभूंची सेवा केली. महाराजांचे चरणीं त्या उभयतांचा अलोट प्रेमा होता. त्यांनीं महाराजांना अभ्यंगस्नान घालून वस्त्राभरणांनीं अलंकृत केलें व पंचारती ओवाळून त्यांची प्रेमानें स्तुति केली. अप्पा हे मोठे चतुर व बोलके होते तसेच प्रेमीदेखील होते. त्यांचें प्रेम त्यांच्या कृतीवरून व्यक्तच झालें. 'महाराज साक्षात् परब्रह्म होत' असें म्हणून त्यांनीं श्रीपदीं लोटांगण घातलें. अप्पा व अप्पामाता या उभयतांवर गुरुमहाराज प्रसन्न झाले. कृपादृष्टीच्या योगानें, त्यांनीं त्यांना पाहिजे असलेलें प्रेमसुख अखंड अर्पण केलें. जन्माला येऊन हेंच मिळवायचें असतें. तें अप्पांना मिळालें. अप्पा धन्य झाले. त्यांनीं याच वेळीं महाराजांपासून गुरुमंत्र घेतला.

एका वेश्येनें श्रीगुरूंना आपल्या घरीं नेऊन त्यांची चरणपूजा केली व नवी छाटी आणि दक्षणा अर्पण केली. महाराजांना तिनें आपले मोक्षगुरु केले. त्यांचे मुखानें तारक उपदेश घेतला. महाराजांनीं तिला कृतार्थ केली. पतितपावन हें आपलें ब्रीद श्रीगुरु सोडतील कसे ?

कार्तिक पौर्णिमेचें क्षीरविधान महाराजांनीं फलटणांतच केलें व तेथून ते शिखरशिंगणापुरच्या महादेवाला गेले. रामचंद्र बडवे हे महाराजांना आपल्या घरीं घेऊन जाण्यासाठीं त्यांचेबरोबरच राहिलेले होते. त्यांच्या प्रेमास्तव श्रीगुरु शिंगणापुरला निघाले. महादेव शंभू हें महाराजांचें कुलदैवत होतें. महाराजांनीं बैलगाडींतून उडी मारली व संपूर्ण डोंगर पायांनींच ते चढून गेले. योगबळानें ते चालत होते. कोणत्या रस्त्यानें व कसे गेले, हें कोणालाच माहित पडलें नाहीं. चालतां चालतां ते जे गुप्त झाले ते शंभु महादेवासमोर जाऊन उभे राहिले. तेथल्या पुजाऱ्यांना ते एकटेच एकाएकीं दिसले. असा चमत्कार श्रीगुरूंनीं केला. नंतर मंडळी त्यांना जाऊन मिळाली. रामचंद्र बडवे शिंगणापुरकर यांचे घरीं श्रीगुरु उतरले. गेल्या दिवसापासून शंभूला रोज लघुरुद्रपूर्वक ते पुजूं लागले. गुरुमहाराजांची पूजा प्रसिद्धच आहे. भाव-भक्तिपूर्वक सर्वोपचारांनीं सावकाश ते शंकराचें अर्चन करीत. घळघळीत दूध, दहीं, मध, तूप, साखर; घळघळीत स्नान, घळघळीत महानैवेद्य, खणखणीत आरत्या, स्तोत्रें वगैरे म्हणून ढळढळीत तुपाचीं नीरांजनें पेटवून ओंवाळणें, साष्टांग नमन करणें इत्यादि पूजा करतांना महाराजांचें देहभान हरपत असे. त्यांच्या नयनांतून प्रेमाश्रु निघत असत. केव्हां केव्हां शंभु-महादेवाला दहींभाताची पूजा गुरुवर्यांनीं बांधिली. स्वतः नवें स्तोत्र करून म्हटलें. ब्राह्मणांना भोजनें, दक्षणा देऊन संतुष्ट केलें. महाराजांचे भक्त रामचंद्र बडवे सर्व व्यवस्था पहात.

दत्तजयंतीच्या दिवशीं रामचंद्रांनीं आपले अंगणांत महाराजांची महापूजा केली. त्यावेळीं सर्व ग्रामस्थ महाराजांचे अंगावर दुधाचा अभिषेक करून ऊन पाणी घालते झाले. प्रत्येक स्त्री-पुरुष, मुलेंसुद्धां तांब्या तांब्या पाणी गुरु-मस्तकीं घालीत राहिले. शंभु महादेवच स्वतः श्रीगुरुराज शोभले. श्रीदत्त-

भगवानाची सेवा आपण करतों अशी लोकांची भावना झाली. रामचंद्रजींनीं महाराजांना जरीचा पीतांबर नेसविला व जरीची शालजोडी पांघरायला घातली. पुष्पहार, केशर, चंदन, अत्तरें, अष्टगंधादिकांनीं गुरुमूर्ती अलंकृत केली. सर्वोपचारांनीं गुरुपूजा करून दत्तजयंतीचा उत्सव साजरा करून घेतला. गुरुस्तोत्रें, भजन, कीर्तन, पुराण, ब्राह्मणांचा वेदघोष वगैरे गुरूंपुढें झाला. त्या दिवशीं सर्वांचेच फराळ झाले. दुसरे दिवशीं पारणें झालें. रामचंद्र शिंगणापुरकराची गुरुभक्ति सर्वोत्कृष्ट होय. त्यांनीं गुरुदक्षणार्थ ताटभर रुपये महाराजांपुढें ठेवले. महिनाभर आपल्या घरीं रोज ब्राह्मणभोजनें व गुरुमहाराजांची फलाहार वगैरेची सेवा त्यांनीं चालू ठेवली. रात्रंदिवस गुरुसेवेला झटले. महाराजांकडून सर्व बाळगोपाळांनीं तेथें उपदेश घेतले. सर्व गांव गुरुरायाचा शिष्य झाला.

सदलगेकर, टांकळीकर व वाडीकर लक्ष्मणराव फुलारी तेथें गुरुभेटीला गेले होते. गुलाबाचीं फुलें घालून एक दिवस लक्ष्मणरावांनीं महाराजांना पुष्पशय्या केली. त्यांना महाराजांनीं आपल्या चरणपादुका प्रसाद दिल्या. लक्ष्मणरावांचें भाग्य फार मोठें यांत शंका नाहीं. जशी भक्ति तसें फळ त्यांना मिळालें. सद्गुरुनाथच पादुकारूपानें त्यांचे हवालीं झाले. नागोपंत बडवे यांना पुष्कळ कर्ज होतें, तें महाराजांनीं दिलेल्या ऋणमोचन मंत्राच्या अनुष्ठानानें संपूर्ण फिटलें.

पर्वतावरील अष्टलिंगांची यात्रा महाराजांनीं केली. प्रत्येक तीर्थांत स्नान केलें. कांहीं जुनाट तीर्थें दुर्गंधियुक्त होतीं. त्यांतलें पाणी हिरवें चिखलयुक्त होतें. तरी महाराजांनीं त्यांत प्रीतीनें बुडया मारल्या. बाकी कोणी भक्तांनीं मात्र त्यांत स्नानें केलीं नाहींत. थोरांचें सर्वच अनुकरण करणें शक्य होत नाहीं. अंशतः जरी तें झालें तरी महत्फल देणारें होतें. नाहीं तरी थोरांचें सर्वच अनुकरण करूंही नये, असें शास्त्र आहे. योग्य तेंच करावें.

पौष पौर्णिमेचें क्षौरविधान श्रींनीं येथें केलें. शिंगणापुर क्षेत्रांतल्या बाळगोपाळांचें, अमृतवीक्षणानें व अमृतभाषणानें समाधान करून, श्रीगुरु परत फलटणला आले. येतांना सिद्धेश्वर कुरोळींत शिवपूजा केली. तेव्हां लिंगांतून मोठा सिंहनाद झाला.

शिंगणापुरांतून फलटणला आल्यानंतर विशाळी पौषी अमावास्येला श्रीगुरु पांच मैल दूर नीरा नदीचे स्नानाला जाऊन आले. पुन्हां माघी पौर्णिमेला चंद्रग्रहण पर्वणीनिमित्त स्नानाला गेले. दुसरे दिवशीं फलटणांत येऊन गुरु-प्रतिपदेचा उत्सव महाराजांनीं वेलणकरांचे घरीं केला. गांवप्रयोजन करणेचा बेत गुरूंनीं सकाळीं ठरविला. आचारी मिळेनात तेव्हां महाराजांनीं आपल्या दिंडीगणांतल्या यमुताई जोशी व यमुना कवठेकरीण यांचेकडे पाहिलें. त्या-सरशीं चमत्कार असा झाला कीं, गांवप्रयोजनाचा एवढा मोठा स्वयंपाक त्या दोघींनीं एका प्रहरांत करून सोडला. पोळ्या करतांना गुरुमहाराज त्यांचे पुढें जाऊन उभे राहिले होते. त्यांच्या दिव्य अवलोकनानें पोळ्यांचा ढीग कसा पडत गेला तो त्या बायांना समजलाच नाहीं. नंतर त्यांना आश्चर्य मात्र वाटलें. गांवप्रयोजन गुरुसंकल्पाप्रमाणें यथासांग झालें. श्रीगुरुसमर्थ मनांत आणतील तें तडीला नेत होते. त्यांनीं दुर्बळांना बळ दिलें व सारा स्वयंपाक त्यांचेकडून करून घेतला.

गुरुमहाराजांची वृद्ध वहीण गाडींतून पडली होती. तिची शुश्रुषा वेलणकर व डॉक्टर यांनीं करून तिला बरी केली. तद्वत् अन्य कांहीं भक्तांचीदेखील त्यांनीं शुश्रुषा केली. महाराजांनीं वेलणकरांना दत्तमूर्ति व डॉक्टरांना राम-नामाची सुवर्णाची मुद्रिका प्रसाद दिली. पुष्कळांनीं महाराजांपासून गुरुमंत्र घेतले. धोंडोपंत देशपांडे यांचें लग्न होत नव्हतें तें श्रीगुरु नृसिंहसरस्वतींच्या प्रसादानें झालें.

फलटणांतून श्रीगुरु पुण्याला आले. ते मुळा, मुठा नदीचें स्नान, ओंकारे-श्वराचें पूजन वगैरे करून भक्तवर्य दत्तुशास्त्री लाटकर यांचे प्रेमाग्रहास्तव त्यांचे घरीं मुक्कामार्थ राहिले.

प्रकरण १५ वें

पुण्यांत आल्याबरोबर श्रीगुरूंनीं आळंदी, देहू व चिंचवडची यात्रा आपल्या दिंडीगणासह प्रथम करून घेतली. पुण्याला जे गुरुमहाराज गेले ते गरुडेश्वरीं जाण्याचा तो रस्ताच होता म्हणून गेले; पवित्र क्षेत्र म्हणून कांहीं गेले नसावे. कारण तें क्षेत्रांत गणलेलें नाहीं. तें क्षेत्र नसूनसुद्धां नृसिंहसरस्वती सद्गुरु तेथें दोन महिने राहिल्याचें वर्णन आहे. त्यावरून ते भक्तसंतोषार्थच केवळ तेथें राहिले, असें म्हणणें भाग आहे. निस्त्रैगुण्यपथीं संचरणाऱ्या मुक्त पुरुषांना क्षेत्रें किंवा शहरें दोन्ही सारखींच होत. संपूर्ण मोहिनी ही त्यांना वाराणशीच झालेली असते. नित्यपूत परमात्मे असे श्रीगुरुमहाराज जिथें राहतील तें पवित्र क्षेत्रच होय. परमेश्वराच्या वास्तव्यानेंच तर क्षेत्रांना क्षेत्रत्व आलेलें आहे, एरवी नाहीं. संन्यासी चतुर्थ आश्रमी असूनसुद्धां वेदरुच्या यवन बादशहाचे वाडयांतदेखील गुरुराज गेल्यावद्दलचें वर्णन श्रीगुरुचरित्रग्रंथामध्यें आलेलें आहे. त्या चरित्राप्रमाणेंच महाराजांचेंदेखील वागणें भक्तोद्धारार्थ समजावें. अज्ञानी संन्याशांचे नियम त्यांना लागू नव्हते. विधिनिषेधातीत अशा ब्राह्मीस्थितीमध्यें असणारांना नगरांत राहूं नये इ. शास्त्रनिर्बंध नसतो. मुमुक्षु साधकांनासुद्धां निर्बंध नसतो. मग मुक्त अशा सिद्धांना तो कोठचा ? असतु.

दत्तूशास्त्री लाटकर हे दत्तभक्त वाडीला प्रतिवर्षी गुरुद्वादशीला येत. तेव्हांच गुरुमहाराजांचे ते भक्त झाले होते. त्यांच्या कन्येला पुष्कळ वर्षे योग्य वर मिळत नव्हता. शास्त्रीबुवांनीं तिला महाराजांचे चरणीं घातली. महाराजांनीं तिला दत्ताची उपासना सांगितली. त्याप्रमाणें ती गुरुमहाराजांची भक्ति करूं लागली. चमत्कार असा झाला कीं, गुरुमहाराज पुण्यांत असतां-

नाच तिचा विवाहयोग अचानक जुळून आला. शास्त्रीबुवांना व त्या कन्येला मोठा आनंद झाला. नववधूवरांनीं श्रीगुरुनाथांची पूजा केली. महाराज कन्येला म्हणाले, " तुझी कामना पूर्ण झाली ना ? आतां दत्तोपासना सोडूं नको बरें ! अशीच चालीव. " श्रीदत्त प्रसन्न झाल्यावर दुर्लभ असें काय आहे ? दुर्लभ तें सुलभ करणारे श्रीगुरुमहाराज स्वतःच दत्त होत.

दत्तूशास्त्री व त्यांची पत्नी या उभयतांनीं भक्तिभावानें गुरुनाथांची पूजा केली. त्यांना नव्या छाटचा दिल्या. महाराजांना तेच फलाहार देत असत. महाराजांची पूजा करून त्यांना नमस्कार केल्याशिवाय व त्यांचा आशीर्वादात्मक नारायण शब्द घेतल्याशिवाय शास्त्रिपत्नी अन्नग्रहण करीत नसत. पुढें महाराज जेव्हां पुणें सोडून निघाले, तेव्हां त्यांनीं विनविलें कीं, " आपण गेल्यावर मी आपल्या मुखांतला ' नारायण ' शब्द पुन्हां केव्हां ऐकूं शकेन ? त्या अमृतानें माझी तृप्ति होत होती. " महाराजांनीं त्यांना सांगितलें कीं, " तुम्ही आपला नमनाचा नियम देवापुढें चालू ठेवा. तेथें तुमची इच्छा पूर्ण होत राहील. " साध्वीनें श्रीगुरुमूर्तीची तसबीर देव्हाऱ्यांत ठेवली व नित्याप्रमाणें पूजा व नमस्कार तसबिरीलाच ती करूं लागली. महाराज वचन दिल्याप्रमाणें ' नारायण ' म्हणून तिची तृप्ति करूं लागले. ती साध्वी हयात असेपर्यंत रोज तिला महाराज हा असा चमत्कार दाखवीत होते. धन्य ती साध्वी व धन्य तिचा भाव !! माझे नरसिंहसरस्वती गुरुमहाराज हे साक्षात् श्रीदत्तात्रेय भगवानच होत, अशी त्या भक्तिणीची पूर्ण श्रद्धा होती. जशी श्रद्धा तसें फळ.

नरसिंह चिंतामण केळकर हे गुरुमहाराजांचे मिरजेंतले इंग्रजी शाळामित्र होत. महाराजांना त्यांनीं आपल्या घरीं प्रेमानें पूजेला नेलें. दोघां नरसिंहांचें प्रेमसंभाषण झालें. केळकर म्हणाले, " आम्ही प्रपंचांत गुंतून पडलों; काय करावें ? " महाराज म्हणाले, " तुम्ही प्रवृत्तिरूप राजकारणांत शिरलांत; आम्ही निवृत्तिरूपी जगत्कारणांत गेलों. दोन्हीही पंथ परोपकाररूपी फलदृष्टीनें समानच आहेत. तुम्हीदेखील लोककल्याण साधणारे सत्पुरुष धन्य आहांत. " याप्रमाणें दोघांचा बालमित्रसंवाद झाला. केळकरांनीं श्रीगुरूंना केसरी कचेरी दाखविली. नंतर श्रीगुरु पुन्हां दत्तुशास्त्र्यांकडे आले.

फाल्गुनी पौर्णिमेचा क्षौरविधि श्रीनीं ओंकारेश्वरीं मुळामुठा नदीचे तीरावर केला व तेथेंच आपलें स्नान, संध्यावंदन, पूजन जपजाप्यादि अनुष्ठानही त्यांनीं स्वस्थपणें केलें.

गुरुभक्त नारायणराव कुलकर्णी, दामुअण्णा शुक्ल, इंगळीकर देशपांडे, नाटककार जोशी वकील यांच्या सासू साळुताई, पोष्टमास्तर, गणपत सावंत, काका फाटक गवई, बापटीण काकू इत्यादि मंडळींनीं महाराजांना आपापल्या घरीं नेलें. दिंडीगणासह महाराज सर्वांकडे गेले. सर्व भाविकांनीं गुरुपूजा, आरती, भोजन, भजन इत्यादिकांनीं गुरुनाथांची भक्ति केली. एकेक दिवस त्यांनीं तो सद्गुरुभगवंतांचा उत्सवच केला. पुणें हें शहर खरें; पण त्यांत असे गुरुभक्त सज्जन फार असल्यामुळें तें खरोखर एक पवित्र क्षेत्रच आहे असें म्हणायला हरकत नाहीं. पुण्यपत्तन ही जी त्याला संज्ञा आहे, ती अगदीं अन्वर्थकच आहे. श्रीगुरूंच्या वास्तव्यानें तर तें वैकुंठकैलासच झालें होतें. शहरांतदेखील सज्जन असतात, व तीर्थक्षेत्रांतदेखील दुर्जन असूं शकतात ही गोष्ट गुरुमहाराजांना आलेल्या अनुभवानें सिद्ध झाली.

पारखे गवई दत्तुशास्त्र्यांकडे येऊन रोज गुरुमहाराजांची गायनानें सेवा करीत. सामंत कुलकर्णी यांचा रोज गुरुदर्शन घेण्याचा दृढ नेम होता. त्यांना महाराजांचे कृपेनें पुत्रसंतान झालें होतें. फलप्राप्ति झाल्यावरसुद्धां त्यांनीं सेवासाधन चालविलें. तें शाश्वत फलाकरितां समजा किंवा कृतज्ञतेनें ते तें करीत असें समजा. श्रीगुरुनृसिंहसरस्वतीभगवानांनीं अगोदर ऐहिक फळें देऊन पुष्कळांना भक्त बनविले. अर्थातच ते भक्त पुढें निष्काम भजन करून पारलौकिक शाश्वत सुखाचेदेखील भागीदार झाले. ते तसे व्हावेत एवढ्याचसाठीं आगाऊ ऐहिक फळें देण्याची युक्ति श्रीगुरु योजीत व क्रमानें सर्वांचें खरें कल्याण करून देत. "सर्वभूत हिते रतः" हें ब्रीद श्रीगुरूंना शोभत होतें.

एकदां इंगळीकर देशपांड्यांचे घरीं महाराजांपुढें गोविंदराव डिग्रजकरांनीं कीर्तन केलें. महाराजांनीं त्यांची फार तारीफ केली. श्रीगुरु गुणाचे चाहते होते. गोविंदरावांप्रमाणें सर्वच बाळभक्त गुणी व्हावेत म्हणजे हरिभजनशील व्हावेत, असा त्यांचा हेतु नेहमींच असे.

चैत्र शुद्ध प्रतिपदा–गुढीपाडवा, हा दिवस महाराजांचे जन्मोत्सवाचा होय. आप्पा भावे यांनीं ती संधि साधली. त्यांनीं महाराजांना पुन्हां आपल्या घरीं दिंडीगणासह नेलें. अभ्यंगस्नान घालून राजोपचारांनीं त्यांची पूजा केली व सर्वांसह श्रीगुरुभगवंताला फलाहार दिला. सर्व भक्तगणाला पक्वान्नाचें स्वादिष्ट भोजन घातलें. गुरुनाथांपासून त्यांनीं आपल्या बंधू व मातेसहित तारक उपदेश घेतले. श्रीगुरूंच्या चरणीं पादुका घालून त्या पूजेकरितां त्यांच्याकडून मागून घेतल्या. महाराजांनीं त्या त्यांना प्रीतीनें दिल्या व आपली एक छाटी त्यांना प्रसाद दिली. अप्पांनीं गुरुमूर्तीचा, हार वगैरे घालून एक सुंदर फोटो काढून पूजेंत ठेवला. भाववंत म्हणून भावे हें नांव आप्पासाहेबांना अगदीं योग्य होय. तीन दिवस भावभोक्ते श्रीगुरु त्यांचे घरीं राहिले.

महाराज जिकडे जातील तिकडे त्यांचा वासुदेवानंदांच्या मूर्तीचा देव्हारा रामचंद्र कट्टी हे नेहमीं नेत असत. त्यांच्यावर महाराजांची कृपादृष्टि होती. भाव्यांचे घरीं एके दिवशीं महाराजांची स्वारी प्रसन्न झाली. त्यांनीं मुद्दाम कट्टींना जवळ बोलावलें व मारुतीचा मंत्र व उपासनापद्धति त्यांना समजावून दिली. प्रीतीनें व नीतीनें सेवा करणारावर श्रीगुरुनाथ असे प्रसन्न होत असत व न मागतां त्याचें कल्याण त्याचे पदरांत घालीत असत. सर्वांचे अंतरींचा भाव ओळखून श्रीगुरु तसे तसे वागत. जसा आरसा तसें प्रतिबिंब. गुरुमूर्ति भावना–परतंत्र असत. परमेश्वर हा भावनापरतंत्रच आहे.

श्री. राजेसाहेब परांजपे यांनीं गुरुमहाराजांना आपल्या घरीं नेलें. त्यांनीं पूजा, आरती करून त्यांचेकडून पत्नीसहवर्तमान गुरुपदेश घेतला. वेदान्तश्रवणाची आवड दाखवितांच महाराजांनीं त्यांना विवेकचूडामणी नामक वेदान्तग्रंथ निमित्ताला हातीं घेऊन स्वानुभवबोध कथन केला. श्रवणाला आणखीदेखील जिज्ञासू जमत असत. पुस्तकीज्ञान सर्वांनाच असतें. पण स्वानुभवानें उपदेश करणारा ज्ञानी महात्मा अत्यंत दुर्लभ असतो. त्या दुर्लभाचा लाभ आपणांला झाला म्हणून राजेसाहेब आपणांला धन्य समजत. त्यांचें पूर्वसुकृत मोठें म्हणून त्यांना श्रीगुरुजगजेठी मिळाले.

राजेसाहेबांचे घरीं गुरुभक्त दिनकर गोपाळ देवधर फोटोग्राफर यांनीं नृसिंहसरस्वतींचा व अन्य मंडळींचा फोटो काढून घेतला. तसाच त्यांनीं पूर्वी

नरसोबाचे वाडींत कृष्णानदींत कमरेइतक्या पाण्यांत स्वतः उभे राहून श्रीगुरूंचा स्नानकाळचा ते प्राणायाम करीत बसल्यावेळचा फोटोदेखील फारच उत्तम असा घेतला आहे. श्री टेंबेस्वामी महाराजांचा रंगीत फोटो तर त्यांनीं छापूनदेखील प्रसिद्ध केला. तो फारच सुंदर आहे व तो त्यांच्या 'माधव आर्ट स्टूडिओ' मध्यें मिळूं शकतो. रा. दिनकरराव देवधर हे मोठे सज्जन, परोपकारी व प्रेमळ असून श्री वासुदेवानंदसरस्वतींवर त्यांची अतिशय भक्ति आहे. आपल्या मुलाबाळांसह ते त्यांचें नित्य भजन, पूजन प्रेमानें व नेमानें करतात. प्रपंच संभाळून परमार्थाचा लाभ साधणारे व सर्वांभूतीं दया करणारे, अतिशय सात्विक व विचारी स्वभावाचे हे महात्मे धन्य होत.

दामूअण्णा परांजपे हे महाराजांचे वाडीपासूनचे भक्त होते. त्यांनींदेखील महाराजांची भक्ति त्यांना स्वगृहीं नेऊन केली. हे राजेसाहेबांचेच पुतणे होत. त्यांनीं महाराजांना मोटारींतून पर्वती, बनेश्वर, भीमाशंकर इत्यादि देव दाखवून आणले. रामनवमी व मारुतिजयंती महाराजांनीं येथें केली. तेव्हां अकरा मारुतींसह मंदिरांतील रामाचीदेखील पूजा केली. दामूअण्णांच्या स्त्रियापुत्रादिक मंडळी व महाराजांची स्त्रियापुरुषांची दिंडीगण मंडळी मिळून दिगंबराचा नामसप्ताह सर्वांनीं केला. मुलांचीं गायनें झालीं. त्यांनीं स्तोत्रें म्हटलीं. महाराजांनीं मुलांना मेजवानी दिली, अनाथ विद्यार्थी संस्थेला महाराजांनीं द्रव्यसहाय्य केलें. हे सर्व उत्सव राजेसाहेबांचे राममंदिरांत झाले.

गुरुभक्त सदाशिवराव परचुरे तुळजापुराहून गुरुमहिमा श्रवण करून त्यांना आपले मोक्षगुरु करून घ्यावे म्हणून पुण्यांत राजेसाहेबांचे घरी आले. मला उपदेश देण्याची श्रींनीं कृपा करावी, अशी प्रार्थना त्यांनीं गुरु महाराजांना केली. त्यांना महाराजांनीं उपदेश दिला. "सदाशिव म्हणजे सत्यज्ञानानंदरूप तुम्हीच आहां," हा बोध गुरुमहाराजांनीं त्यांना दिला. महान् अधिकारी सदाशिवराव गुरुमंत्र मिळतांच उमजले. मी पुरातन मुक्तच आहें, मी परब्रम्हच आहें, असें ते समजले. अधिकारी शिष्याला उपदेश करायला श्रीगुरूंना फार श्रम पडत नाहींत. दृष्टिमात्रानें किंवा वा

मात्रानेंच ते बोध देतात. परचुऱ्यांना उपदेश करतांना महाराजांना मुळींच प्रयास पडले नाहींत. गुरु व शिष्य एका दिवसाच्या समागमांतच एकमेकांचे अत्यंत प्रिय होऊन राहिले. महाराजांनीं अमरापुर येथील श्रीवासुदेवदत्तामरेश्वरांकरितां पुण्यांत एक सुंदरशी पालखी खरेदी करून ती परचुरे मास्तर यांचे स्वाधीन केली. अमरापुरांत ही घेऊन जा, असें त्यांना सांगितलें. तेव्हां जे अमरापुरकर कांहीं भक्त गुरुभेटीला पुण्यांत गेले होते ते, व सदाशिवराव मिळून ती पालखी घेऊन अमरापुरला आले. ते गुरुभक्तांमध्यें श्रेष्ठ होत. अमरापुरांतच ते गुरुगृहवास करून गुरुसेवा करीत राहिले. त्यांचें सौजन्य वाखाणण्यासारखें आहे. ते मोठे शान्त व विचारी महात्मे धन्य होत. अमरापुरांत पालखी ठेवून पुन्हां ते कांहीं दिवस गुरुसहवासार्थ पुण्याला गेले; व नंतर पुन्हां अमरापुरांत येऊन राहिले. पुढें त्यांनीं संन्यास घेतला.

राजेसाहेबांचे घरीं असतांना गुरुमहाराज नृसिंहसरस्वतीस्वामींनीं पन्नास ब्राम्हणांकडून चारी वेदांचीं पारायणें करविलीं. सर्वांना भरपूर दक्षणा, वस्त्रें वगैरे दिलीं. खाद्यपेय, भक्षभोज्य पदार्थांनीं ब्राम्हणांचा संतोष केला. श्रीगुरुनाथांची वेदांवर फार भक्ति होती. वेदशास्त्र, कथा, पुराणें, भजनें, उत्सव यांची नृसिंहप्रभूंना आवड फार. त्यांचें सर्व आयुष्य यांतच गेलें.

रा. रास्ते यांनीं महाराजांना आपल्या घरीं नेलें. त्यांची पूजा, आरती केली. त्यावेळीं तेथें बहुत स्त्रीसमाज गुरुदर्शनार्थ जमला होता. रास्त्यांनीं स्त्रीसमाजातर्फे त्यांना चार उपदेशाचे शब्द सांगावे अशी प्रार्थना केली. त्यावेळीं महाराजांनीं स्त्रियांचे धर्म त्या स्त्रीसमाजाला थोडक्यांत समजावून सांगितले. " पतिसेवा करणें, पतिदेवाचे आज्ञेंत वागणें याशिवाय स्त्रियांना दुसरें तारक कांहीं नाहीं, " असें त्या सर्व सांगण्याचें तात्पर्य होतें. शास्त्राला धरून महाराजांनीं उपदेश केला. सनातन धर्माचे पुरस्कर्ते श्रीगुरु नवीन मतवाद ऐकत नसत. कोणाला रुचो अगर न रुचो; पण बोलायचें तें शास्त्रपूत वचनच बोलायचें, असा त्यांचा बाणा होता. सर्व स्त्रिया उपदेश ऐकून शांत झाल्या. सर्वांनीं गुरुरायांची पूजा केली, नमस्कार केले व आम्ही धन्य झालों असें त्या म्हणाल्या. रास्त्यांनीं आभार मानल्यावर श्रीगुरु राजेसाहेबांकडे परत आले व तेथून हनुमानजयंती झाल्यानंतर पुन्हां दत्तुशास्त्री लाटकर

यांचे सदनीं येऊन राहिले. लाटकर यांचें सदन महाराजांनीं आपली पुण्यांतली राजधानीच मानली होती.

गुरुभक्त आप्पासाहेब भावे यांनीं श्रीगुरुनाथांना तिसऱ्यानदां आपले येथें नेलें. हा मोठा हौशी व प्रेमी असा भक्त महाराजांना पुण्यांत भेटला. त्यांनीं रोज महाराजांना अभ्यंगस्नान घालावें; उन्हाळ्याचा ताप गुरुवर्यांना होऊं नये म्हणून चंदनी उटी त्यांना लावावी; नवेनवे पुष्पहार त्यांचे गळ्यांत घालावेत; अत्तरें लावाबींत त्यांचे मस्तकावर फुलांचा किरीट घालावा; वाळ्याचा पंखा घेऊन त्यांना वारा घालावा; वाळ्याचे पडदे सभोंवार सोडावेत; आरत्या म्हणाव्या; उदबत्त्या लावाव्या; गावें; त्यांच्या आईनें प्रेमानें नानाविध फराळ बनवून श्रीगुरूंना द्यावे; मुलानें सायंकाळीं व्हिक्टोरिया किंवा मोटारगाडींत महाराजांना बसवून फुलांचे हार त्यांचे गळ्यांत घालून त्यांना लांब गांवाबाहेर हवा खायला न्यावेत; वनांत बसून त्यांचे मुखानें तत्त्वबोध ऐकावा व रात्रीं आठाचे सुमारास महाराजांना घरीं परत आणावेत असा उपक्रम भावे यांनीं सुरू केला होता. त्यांची गुरुभक्ती केवढी मोठी होती ती पहा ! गुरु माझा जीविचा जीव प्राण आहे, असें भाव्यांना वाटे. त्यांना मी गुरुसंतोषार्थ काय करूं व किती करूं असें झालें होतें. आपल्या आवडीचें हातांत बांधण्याचें घडयाळ त्यांनीं एक दिवस महाराजांचे हातांतसुद्धां बांधलें. महाराज प्रेमानें म्हणाले, " आम्ही आतां पक्के पुणेकर बनलों. " त्यांनीं तें भक्तानें प्रीतीनें बांधलेलें घडयाळ त्याच्या संतोषार्थ कांहीं वेळ हातांत ठेवलें व वरचेवर " किती वाजले पाहूं, किती वाजले पाहूं " असें म्हणून तें पाहून भक्ताला संतोष देऊं लागले. तें घडयाळ अमरापुरापर्यंत आलें. भाव्यांच्या प्रेमाला अंतपार नाहीं.

भाव्यांचा प्रेमभाव वरेच दिवस उपभोगून श्रीगुरु पुन्हां दत्तुशास्त्री लाटकर यांचे घरीं आले. वाडीहून लक्ष्मणराव फुलारी व कुरुंदवाडहून नारायण माळी गवंडी पुण्यांत गुरुभेटीला गेले. एका भक्तासाठीं षड्भुज उभी दत्तमूर्ति बनविण्याची महाराजांनीं नारायणाला आज्ञा केली. त्यानें ती कुरुंदवाडांत बनविली. पण त्या भक्तानें ती नेली नाहीं. पुढें रामराव कट्टी यांनीं तिचा खर्च

दिला व ती अमरापुरांतील मठांत आणून ठेवली. तूर्त तिची स्थापना नृसिंहसरस्वतींचे दाराबाहेर झाली आहे. एकनाथ महाराजांचे दारांत किंवा बळिराजाचे दारांत जसे दत्तभगवान उभे राहिले तसे नृसिंहसरस्वतींचेदेखील ते द्वारपाळच होऊन राहिले असें आम्हांला वाटतें.

रामचंद्र शिगणापुरकर हे महाराजांचे भक्त आपल्या बायकामुलांसह पुण्यांत महाराजांपाशीं होते. त्यांचा चार वर्षांचा मुलगा आजारी होऊन मरणप्राय बेशुद्ध पडला. त्याला महाराजांपुढें ठेवण्यांत आला. महाराजांनीं एक कांदा फोडून त्याचे नाकावर ठेविला. त्यासरशीं मुलगा शुद्धीवर आला. तेव्हां आनंदित झालेल्या सर्व भक्तांनीं महाराजांची स्तुति केली असतां महाराज म्हणाले कीं," मुलगा वांचला हा आमचा गुण नसून तो कांद्याचा गुण आहे. " खरेंच आहे. या प्रपंचवृक्षाचा कंद जो सच्चिदानंद परमात्मा तोच सर्वांचें जीवन होय. दुर्दैवानें तो मुलगा पुन्हां लवकरच मरण पावला. महामृत्यु अनिवार्यच असतो.

पुणें शहर मोठें आहे. तेथें अनेक विद्वान् लोक महाराजांचे दर्शनाला येत असत. पुष्कळांनीं महाराजांची सेवाभक्ति केली. त्यांच्यावर गुरुमहाराजांनीं कृपादेखील केली. आम्हांला त्या सर्व भक्तांचीं नांवें माहित नसल्यामुळें त्यांचा उल्लेख करतां आला नाहीं. संक्षिप्त अशा या चरित्रांत जो उल्लेख आम्ही केला आहे, तोसुद्धां अल्प असाच केला आहे. वर्णन करण्याचा भाग पुष्कळसा राहिलाच आहे. श्रीगुरुभगवंतांनीं पुण्यांत ज्ञानभक्तिधर्माची स्थापना करून, सुधारलेल्या शहरवासी लोकांतून आपले भक्त तेवढे सन्मार्गाला लावून श्रीगुरूपुढें गरुडेश्वराला जाण्याला निघाले व रथतळावर जाऊन आपल्या वासुदेवमूर्तीसहित अग्निरथांत बसले. त्यांच्या मागोमाग त्यांचे नित्य भक्त तेही बसले. वामनराव इंगळीकर येथपर्यंत गुरुसंगें होते. ते येथून परत गेले. सोलापुरचे श्रीचे शिष्य विष्णुपंत पंची व परचुरे मास्तर हे दोघे भक्त गुरुनाथांबरोबर निघाले. विष्णुपंतांनीं वासुदेवानंदविरचित श्रीदत्त पंचपदीचें भजन गोड आवाजांत व प्रेमांत सुरू केलें. लगेच आगगाडी चालू झाली. महाराज गाडींतून हात बाहेर काढून, आलेल्या असंख्य भक्तांना परत जा असें खुणेनें सांगत सांगत जेव्हां दूर गेले, तेव्हां पुणेकर भक्त परत फिरले.

पुण्याहून गुरुमहाराज निघाले ते पुणतांबें नामक क्षेत्राला गेले. गोदावरीचें स्नान व चांगदेवमहाराजांचें पूजन त्यांनीं तेथें केलें. क्षेत्रस्थ ब्राह्मणानें त्यांचेपाशीं वस्त्रप्रसाद मागितला. महाराजांनीं त्याला आपले अंगावरची जरीची शालजोडी दिली. रामराव शिंगणापुरकरांनीं ती दत्तजयंतीचे दिवशीं महाराजांचे अंगावर घातली होती. त्यांचे इच्छेस्तव ती गुरूंनीं आजवर वापरली. दुसऱ्यानें आपली इच्छा दाखवितांच त्याला ती देऊन टाकली. ब्रह्मानंद भोगणारे श्रीगुरु कोणत्याहि वस्तूवर लुब्ध होत नव्हते. त्यांना मी शालजोडी ब्राह्मणाला दिली हें मोठें कृत्य केलें असेंदेखील वाटलें नाहीं. सहज एखादें धोतर दिल्याप्रमाणेंच त्यांनीं मानलें. ब्राह्मण मात्र अतिशय आनंदित झाला. त्या गरिबाला जरीची शालजोडी कोण देणार होता ? सोलापूरचे रा. विष्णुपंत पंची व परचुरे मास्तर येथून गुर्वाज्ञा घेऊन परत आले. पुणतांब्यांत दोन दिवस राहून श्रीगुरु पुढें गेले.

कारंजपुरला श्रीगुरुनाथांची स्वारी आली. अमरापुरापासून सीताबाई नामक भक्तिण आपल्याकडे चला म्हणून महाराजांना म्हणत त्यांचे स्वारींत राहिली होती. तिच्या घरीं श्रीगुरुनाथ जाऊन उतरले. दुसरे दिवशीं भक्तगणांची दिंडी घेऊन ते नृसिंहसरस्वतींची जन्मभूमी पहायला गेले. काळ्यांचे वाड्यांत नरसिंहसरस्वती अंबामाधवांचे उदरीं पौष शुद्ध द्वितीयेला अवतरले. त्यांचें जें चरित्र आहे, त्यालाच हल्लीं श्रीगुरुचरित्र असें म्हणतात. नरसोबाची वाडी व गाणगापुर तसेंच औदुंबर हीं तीन क्षेत्रें वसविणारे भक्तकामकल्पद्रुम ते हेच नरसिंहसरस्वती दत्तभगवान् होत. त्यांच्या जन्मस्थळाचें पूजन श्री अहिल्यालक्ष्मणनंदन श्रीनृसिंहसरस्वतींनीं भावभक्तीनें केलें. आरती, स्तोत्रें म्हटलीं. भक्तांनीं भजन केलें व सर्वांनीं तेथें वाड्यांत बसून त्यांच्या नामाचा प्रचंड जयजयकार केला. बाहेरचे बाजूस वटवृक्षाखालीं श्रीगुरु कांहीं वेळ बसले. येथें मंदिर होऊन त्यांत नृसिंहसरस्वतींची स्थापना व्हावी असें ते म्हणाले. पूर्वी वासुदेवानंदसरस्वती तेथें जाऊन तसेंच म्हणाले होते. " हें स्थान पुढें प्रगट होईल " असें ते जसें म्हणाले तसें तें हल्लीं प्रगट झालें. नृसिंहयतींद्रांनीं म्हटल्याप्रमाणें मंदिर व नृसिंहसरस्वतींच्या मूर्तीची स्थापना झाली. सत्यसंकल्प प्रभूंनीं म्हटल्याप्रमाणें झालें. श्रीगुरु

जन्मस्थानयात्रा पूर्ण करून नृसिंहमुनि परत सीताबाईचे घरीं आले. जसे दिगंबराचें भजन करीत गेले, तसे भजन करीतच ते परत आले.

गं. भा. सीताबाई यांनीं श्रींना पीरमंगळूर नामक आपल्या माहेरगांवीं नेलें. तेथले लोक फार भाविक होते. त्यांनीं श्रीगुरुनाथांची पूजा, आरती थाटानें केली व पुष्कळशा भाविकांनीं त्यांचे मुखानें तारक मंत्रोपदेश घेतले. श्रीगुरूंना जरीच्या छाटचा नेसविल्या. त्यांचे करांगुळींत सोन्याच्या आंगठ्या घातल्या. रुप्याचीं रामपात्रें वगैरे भांडीं दिलीं, रुपये दिले. हे देणगीचे उपचार गुरुदक्षणा म्हणून समजून त्यांनीं दिले. तेथें वाशीम वगैरे अनेक गांवांहून गुरुदर्शनाला लोक आले होते.

आठ दिवसांनीं श्रीगुरु कारंजाला परत आले. तेथें आपल्या घरीं गं. भा. सीताबाईच महाराजांच्या मुख्य सेवेकरी होत्या. अनुताई इत्यादि बाया त्यांच्याच मतानें वागत. सीताबाईनें सर्व मंडळींची शुश्रुषा चांगली केली. श्रीनृसिंहप्रभू म्हणजे साक्षात् श्रीदत्तभगवानच होत, ह्या जाणिवेनें तिनें त्यांची प्रेमपुरस्सर भक्ति केली.

उन्हाळ्याचा ताप गुरुराजांना न होवो म्हणून ती अंगण थंड पाण्यानें गार करून ठेवी. त्यावर वरचेवर पाणी शिंपी. गुरुरायांचे मंदिराला वाळ्याचे पडदे सोडी. त्यांना पंख्यानें वारा घाली. सरबतें करून श्रीगुरूंना प्यायला देई व रात्रीं मखमलीच्या मऊ गादीवर त्यांना निजवून ती श्रीगुरुनाथांची शेजारती करी भक्तीनें जें जें सीताबाई देई तें तें सर्व श्रीगुरुनाथ स्वीकारीत. भक्तसंतोष करणें हें भगवंतांचें शीलच आहे. संन्यासी असतांनासुद्धां श्रीगुरु, जिनें दिलेले गादीसारखे उपचारसुद्धां घेते झाले. यतीला गादी अयोग्य म्हणून नाकारते झाले नाहींत तिची त्यांचेवर केवढी निस्सीम भक्ती असली पाहिजे बरें !!

श्रीगुरुमुनी एका औदुंबराचे तळीं रोज आपलें संध्या, गुरुपूजनादिक उपासनानुष्ठान करीत बसत. कारंजपुरांत ऋषितीर्थ म्हणून एक मोठा तलाव आहे. त्यावर ते वारंवार स्नानाला जात. वैशाखी पौर्णिमेचें क्षौर झाल्यावर श्रीगुरु या ऋषितीर्थांत विधियुक्त दंड घेऊन स्नान करून आले. नरसिंह-

जयंतीचा उत्सव करून श्रीगुरूंनीं कारंजपुरवासी ब्राह्मणांना पन्हें पाजलें. त्या ब्राह्मणांनीं श्रीगुरूंना आपापल्या घरीं पूजेला नेलें. भिक्षा, वस्त्रें वगैरे समर्पण केलीं व अंबामाधवनंदन श्रीनरसिंहसरस्वतीच प्रगटपणें येथें आपण पुन्हां आलां व आम्हांला दर्शन दिलेंत, असें म्हणून त्यांनीं श्रीचरणीं मस्तकें ठेवलीं. श्रीगुरूंनीं सर्वांना आशीर्वाद दिले. पुष्कळशा लोकांनीं श्रींचे मुखानें उपदेश ग्रहण केले.

कारंजांतून श्रीगुरु, गुरुभक्त बाळाभाऊ जोशी व गुरुभक्त सोमण डॉक्टर यांच्या बोलावण्यावरून बढणेरीला गेले. ज्येष्ठ शुद्ध अष्टमीच्या दिवशीं तेथें श्रीसीतारामम्हाराज टेंब्ये यांची स्वहस्तें गुरूंनीं स्थापना केली. वऱ्हाड प्रांतांत सीतारामम्हाराजांचे शिष्य बहुत. गुरुस्थापनेला मोठा भक्तसमाज जमला होता. नृसिंहसरस्वतीमहाराजांनीं आपल्या गुरुप्रमाणें गुरुबंधूंना मानून त्यांचें पूजन केलें. स्वतः त्यांचें गुणवर्णनपर स्तोत्र करून प्रीतीनें म्हटलें. त्यांतला एक श्लोक देतों.

सीतारामो योगिवरो ब्रह्मचारी कवीश्वरः ॥
गुरुपादार्पिततनुः समदृग्गुरुतां गतः ॥१॥

इ. बारा श्लोकी श्रीसीतारामचरित्रच त्यांनीं तें केलें. "नृसिंहसरस्वती गुरुचरित्र सुधाब्धी" मध्यें तें आम्ही दिलें आहे. सीतारामम्हाराजांचे सेवेला श्रीगुरूंनीं चांदीचीं ताटें, तांब्ये, फुलपात्रें वगैरे उपकरणें मंदिरांत अर्पण केलीं. सीतारामम्हाराज व नृसिंहसरस्वतीमहाराज एकमेकांवर अतिशय प्रेम करीत असत.

बढणेरीहून श्रीगुरु उमरावतीला आले. गुरुभक्त बाळाभाऊ यांनीं श्रींना आपल्या घरीं ठेवून घेतलें. श्रीकृष्णांनीं रुक्मिणीला हरण केलेल्या मंदिरांत जाऊन श्रीगुरूंनीं तेथच्या देवीचें दर्शन घेतलें. उमरावतींतले लोक मोठे भाविक व विद्वान् होते. श्रीगुरूंना त्यांनीं आपापल्या घरीं नेऊन पूजा समर्पण केली. श्रीगुरुनाथांची पूर्ण विदेहस्थिति पाहून तर त्यांची त्यांचेवर श्रद्धा जास्तच बसली. त्यांची विदेहस्थिति समजण्याला तेथें असा एके दिवशीं प्रसंग घडून आला कीं, चिमोटे नामक एका सज्जनांनीं श्रींना आपल्या घरीं

प्रेमानें पूजनार्थ नेलें. एका झोंपाळ्यावर गुरु तीला बसवून ते त्यांना अभ्यंग-स्नान घालूं लागले. दोन लहान लहान तीन तीन वर्षांचीं मुलें महाराजांपुढेंच त्यांनीं बसविलीं होतीं. स्नान चालूं असतां एकाएकीं झोंपाळा बांधलेला वांसा मधोमध काड्दिशीं मोडला. आवाज होतांक्षणीं श्रीगुरूंनीं दोन्ही मुलें आपल्या पोटाशीं धरलीं व आपण जरा पुढें ओणवे झाले. इतक्यांत मोडलेल्या तुळीचें फरशीसारखें चार बोटें रुंदीचें टोंक त्यांचे मस्तकांत मेंदूपर्यंत खोल बोटभर आंत घुसलें. लोक सभोंवती होते. त्यांनीं मुलें ओढून घेतलीं. मस्तकांतला सर ओढून काढला व औषध आणून तें खोकेंत भरूं लागले होते. इतका प्रकार होईपर्यंत महाराज देहभान सोडून निर्विकल्प समाधींत बसले होते.

जेव्हां वांशाचा प्रचंड आवाज महाराजांनीं ऐकला तेव्हांच भविष्य जाणून त्यांनीं मुलें पोटाजवळ धरून आपली मान पुढें करून आपली समाधि लाविली होती. कांहीं वेळानें ते वर पाहून लोकांना म्हणाले कीं, " स्नान-विधि बंद कां ठेवलात, चालूं द्या. " लोक म्हणाले " आपणांवर आघात झाला आहे. " महाराज म्हणाले, " कितपत झाला आहे ? रक्तबिक्त आलें कीं काय ? " लोक म्हणाले, " रक्ताचा तर तलाव झाला. आपण हें असें काय विचारतां ? " महाराज म्हणाले, " आम्हांला कांहीं दुःख होत नाहीं; स्नान बंद करूं नका. पूर्वीप्रमाणें चालू करा. " मंडळीनें पुन्हां त्यांना उष्णोदक घातलें. पण कोणाला समाधान नाहीं. स्नानानंतर श्रीगुरु दुसऱ्या छाट्या नेसले व पूजास्थानीं बसले. ते रोजच्याप्रमाणें हंसतच होते. " पूजा वगैरे तुमचें काय कर्तव्य असेल तें करून घ्या " असें म्हणाले. चिमोटे यांनीं गुरुपूजा केली व गुरुमुखानें उपदेशमंत्र घेतला. त्यांचे घरांतील अन्य मनुष्यांनींदेखील उपदेश घेतले. सर्वांचीं भोजनें झालीं. सायंकाळपर्यंत नगरवासी लोक गुरुदर्शन घेऊन जात होते. महाराज सर्वांना बोलून चालून समाधान देत होते. त्यांचे मुखावर प्रसन्नता जशीच्या तशीच होती. कोणालाही माहित झालें नाहीं कीं गुरुनाथांना प्राणान्त जखम झाली आहे.

श्रीगुरूंनीं चिमोटे यांचे मुलाचा मृत्यु आपणांवर घेतला व त्याला वांचविला, ही गोष्ट शिगणापुरकरांनीं जाणली. त्यांना आदले दिवशीं

स्वप्नांत असा प्रकार दिसला होता कीं, " रेडयावर बसून एक पुरुष चिमोटयांचे दारांत आला. व तो कोणाला तरी नेऊं लागला. " या स्वप्नावरून त्यांचा मुलगाच मृत्युमुखीं जावयाचा होता असें कळलें. महाराज सर्वज्ञच. त्यांनीं त्या मुलाला हृदयाशीं धरला व मृत्यूचा आघात स्वशिरावर घेऊन भक्ताला जिवंत राखला. पोराचे मस्तकांत वांसा शिरता तर तो तत्काळच मेला असता. महाराज पडले विदेही पुरुष. त्यांनीं तो मृत्यूचा तडाखा सहन केला. ते बाळाभाऊ यांचे घरीं परत आले.

महाराज स्वतः सच्चिदानंदघनब्रह्म होते. त्यांना जरी स्वतःस विकार झाला नाहीं तरी त्यांचे शरीराला तो झालाच. ती भयंकर जखम सोमण डॉक्टर रोज धुऊं लागले. मस्तकाचे आंत मेंदूपर्यंत वस्त्राची वात घालून जेव्हां ते ती जखम धुऊन काढीत, तेव्हां त्यांना भय वाटे. या यातना स्वामी कसे सहन करतील ? असें वाटून ते " भूल देऊं का ? " असें विचारीत. महाराज म्हणत, " भूल देऊं नका. आम्ही स्वस्थ बसतों. तुम्हांला जशी कृति करायची असेल तशी करा. " मग सोमण भूल देण्याचा बेत रहित करून तशीच जखम धुऊं लागले. त्यांना श्रीगुरुनाथांची विदेहस्थिति त्यावेळीं समजून आली. आजपर्यंत असें दुःख सहन करणारा एकही पुरुष आम्हीं पाहिला नाहीं असें ते म्हणाले. एवढी जखम भूल न देतां मी वात घालून धुतों, तरी जे अंगसुद्धां हालवीत नाहींत, त्यांच्या विज्ञानस्थितीची तारीफ करावी तेवढी थोडी आहे, असें म्हणून डॉ. सोमण श्रीगुरुनाथांचे एकनिष्ठ शिष्य बनले. त्यांनीं त्यांचे मुखानें गुरुपदेश घेतला. इतके ते गुरुनाथांवर लोभले. जखमेमुळें गुरुमहाराजांना समाजांत निजून निद्रा लागत नसेल, असें डॉ. सोमण यांना स्वानुभवाप्रमाणें वाटलें. " यथा देहे तथा गुरौ " या भावनेनें त्यांनीं श्रीगुरूंना आपल्या घरीं नेलें व पलंगावर गादी घालून तेथें एकान्तस्थानीं ते त्यांची शेजारती करूं लागले. भक्ताच्या संतोषार्थ प्रभूंनीं सकाळीं उठल्याबरोबर सोमणांना म्हणावें कीं, " आज आम्हांला फार उत्तम निद्रा लागली. " सोमणांना हें वाक्य ऐकून आपण गुरुरायाला सुख दिलें असें वाटे. तसें त्यांना वाटावें म्हणूनच महाराज रोज मुद्दाम तसेंच त्यांना म्हणत. निर्विकल्प समाधींत राहणाराला सुखानें निद्रा तो कोणती लागायची असते

कोण जाणें ! " समाधीच निद्रा सुखा योगियाची " असें म्हटलेलें आहे. चिमोटयांना श्रीगुरुमहाराज जसे " तुमची पूजाकर्तव्यता असेल ती करून घ्या " म्हणाले तसे ते सोमणांना " जखम धुणेची कर्तव्यतादेखील करून घ्या " म्हणाले. दोन्ही कर्तव्यता करून घेतांना त्यांची मुखप्रभा रोज होती तशीच होती. त्यांची आनंदयुक्त मुद्रा दुःखदशेंत लोपली नाहीं व सुखदशेंत वाढली नाहीं. जशीच्या तशीच होती.

नोदेति नास्तमायाति सुखेदुःखे मुखप्रभा ॥
यथाप्राप्ते स्थितिर्यस्य सजीवन्मुक्त उच्चते ॥ १ ॥
देहंच नश्वरमवस्थितमुत्थितं वा ।
सिद्धो न पश्यति यतोऽध्यगमत्स्वरूपं ॥
दैवादुपेत मथ दैववशादपेतं ।
वासो यथा परिकृतं मदिरामदांधः ॥ २ ॥

वरील घडलेल्या प्रसंगावरून या श्लोकद्वयांतील जीवन्मुक्त पुरुषांचीं लक्षणें श्रीगुरुनाथांचे अंगीं असलेलीं सज्जनांना दिसून आलीं.

महाराज महासिद्धपुरुष आहेत, हे ब्रह्मविच्छिरोमणि साक्षात् श्रीदत्त अवधूतच आहेत असा अभिप्राय मनांत धरून सोमण, खापर्डे इ. सुज्ञ पुरुषांनीं त्यांची आपापल्या घरीं नेऊन महापूजा केली; त्यांची स्तुति केली. सोमणांनीं तर एक स्तोत्रच केलें. त्या अष्टकांतला श्लोक असा—

विदेहीपुरुषश्रेष्ठ श्रीनृसिंहसरस्वती ।
शिरोव्रण धुतां यांचा, माझी ही जाहली मति ॥१॥

गुरुमहाराजांपासून पुष्कळांनीं गुरुपदेश घेतले. गुरुमस्तकींची जखम सोमणांनीं परिश्रमानें बरी केली. याबद्दल आम्ही गुरुभक्त लोक त्यांचे फार आभारी आहोंत, असें त्यांना सर्वजण म्हणाले. सोमणांची गुरुभक्ति सर्वांपेक्षां मोठी होय. गुरुनाथांनीं अखेरीस अयोध्येला दूरदेशीं अवतारसमाप्ति केली. तेथें इतक्या दूरदेशीं जाऊन सोमण हे आपलें शिष्यकर्तव्य म्हणून दरसाल गुरुपुण्यतिथीचा उत्सव काशीहून संन्यासी नेऊन करतात. दुसरा कोणीही

तसें करीत नाहीं. म्हणून श्रीगुरुभक्त शिरोमणि सोमण डॉक्टर उमरावतीकर हे धन्य होत !! झोंपाळ्याच्या सराचा आघात सहन करून महाराजांनीं एका भक्ताचें जसें संरक्षण केलें तद्वत् त्या सहनशीलपणानेंच त्यांनीं आपली अलौकिकता पटवून दुसरा एक नवा भक्त संपादन केला असें जें म्हटलें जातें तें हृया सोमण डॉक्टरांना उद्देशून होय. झालेल्या अपघाताचें कारण सांगतांना श्रीगुरूंनीं तें गुरुभक्तिपर असें सांगितलें, आत्मस्तुतिपर सांगितलें नाहीं. म्हणजे चिमोट्यांचे मुलाला वाचविण्यासाठीं आम्ही हा त्याच्यावर होणारा आघात स्वत:वर घेतला असें ते बोलले नाहींत तर, " गरुडेश्वरीं गुरुभेटीला जायला आपण वेळ लावला म्हणून हा आम्हांवर असा आघात झाला. गुरुमहाराज दयाळु म्हणून त्यांनीं आमचें रक्षण केलें नाहींतर ब्रह्मरंध्र–टाळू जर त्या वांशानें फुटती तर इथेंच मोक्ष झाला असता. पण थोडें अंतर राहून जखम पडली ही गुरुदयाच होय. " असें महाराजांनीं गुरुदयालुत्वच वर्णिलें. संतांचीं उत्तरें नेहमीं बोधपरच असावयाचीं व त्यांत निरहंकारताच दिसून यावयाची. जर महाराजांना कोणी म्हणता कीं, " महाराज ! आपल्या कृपेनें हा चिमोट्यांचा मुलगा वांचला. नाहींतर तोच आज मरणार होता. तर त्यावर गुरुनाथांनीं असेंच निरहंकारानें म्हटलें असतें कीं, " अहो, मुलगा वांचला हा त्या झोंपाळ्याचा गुण होय. तो चांगल्या मुहूर्तावर सुतारानें बनविला होता. " इ. मागें त्यांनीं शिगणापूरकरांचा मुलगा स्वत: वांचवून " मुलगा वांचला हा कांद्याचा गुण होय " असें प्रतिपादन केलेलें सर्वांचे ध्यानांत असेलच. तसेंच येथेंही ते म्हणते; आम्हीच भक्त संरक्षिला असें न म्हणते. पाहूं गेल्यास ' आम्ही भक्त रक्षिला ' असें त्यांनीं म्हटलें असतें तरी त्यांना तें शोभलें असतें, मृत्युमुखांतून प्रल्हादासारख्याचा बचाव करणारे नरसिंहच ते होते. पण निरभिमानता हेंच भूषण त्यांनीं धारण केलें असल्यामुळें ते तसें बोलले नाहींत. आपलें माहात्म्य त्यांनीं गुप्त राखलें. पण ज्ञानेश्वरमहाराजांनीं, " प्रगटे तंव तंव न दिसे ॥ लपे तंव तंव आभासे " असें म्हटल्याप्रमाणें गुरुमहाराजांचें गुप्त राहणें त्यांच्या प्रगटतेलाच कारणीभूत झालें. सोमणांसारखे तज्ज्ञ तेणेंकरूनच त्यांचे एकनिष्ठ सेवक बनले. महाराजांचे अंगचे पुष्कळसे मुक्त पुरुषाचे गुण त्यांचे दृष्टोत्पत्तीला

आल्यावांचून ते कांहीं त्यांचे अनन्य भक्त बनले नाहींत. सोमण एकदां वाडीला गेले होते. तेथें कोणी स्वामीद्रोही मनुष्यानें गुरुमहाराजांची निंदा केली. त्यासरशीं सोमण तो गांव सोडून चालते झाले. निंदकाचे घरचें पाणीदेखील प्याले नाहींत. हा कशाचा परिणाम ? तर त्यांना गुरुमहाराजांचें यथार्थ ज्ञान झाल्याचाच तो होय.

गुरुमहाराजांचे मुखानें स्वानुभवाचे बोल ऐकायला उमरावतीकर सज्जन बहुत येत असत. थोडक्यांत गुरुमुखांतलें समर्पक प्रतिपादन श्रवण करून ते आनंदित होऊन जात. बाळाभाऊ नांवाचा कोणी एक तरुण मुलगा महाराजांचे सहवासानें विरक्त बनला. घरींसुद्धां तो जाईना. तेव्हां स्वानुभवरूपी अमृत त्याला गुरुनाथांनीं कृपेनें पाजलें व " आतां तूं राहे जनीं वनीं । होउनियां समाधानी ॥ " असें जेव्हां सांगितलें, तेव्हां तो आपल्या घरीं गेला व कामकाज पाहूं लागला. सीतारामम्हाराजांचें स्तोत्र त्याला श्रीगुरूंनीं दिलें व ' ते तुझे सद्गुरु होत, त्यांची सेवा तूं करीत जा ' म्हणून सांगितलें. आतां तो मुलगा मोठा नोकर होऊन बढणेरीस गुरुप्रीत्यर्थ पगारांतील कांहीं रक्कम दरमहा पाठवीत असतो. असा परिणामकारक उपदेश नरसिंहसरस्वतींचा असे. ह्या बाळाभाऊप्रमाणेंच महाराजांनीं बढणेरीच्या एका सीतारामभक्तालादेखील उपदेश केला. सीताराममहाराज जेव्हां समाधिकालीं ज्वरित होऊन त्याचे घरीं दोन दिवस राहिले होते, तेव्हां त्यानें त्यांची सेवा केली होती. पण त्यांचें माहात्म्य तेव्हां त्याला माहित पडलें नव्हतें. नंतर ते माहात्मे योगिवर होते, असें त्याला कळलें. श्रीनृसिंहसरस्वती स्थापनेला तेथें जातांच त्यानें त्यांना आपल्या घरीं मुद्दाम बोलावून नेलें. त्यांची पूजा, आरती केली व उपदेश मागितला. तेव्हां श्रीगुरूंनीं त्या ब्राह्मणाला सीताराम महाराजांचें स्वकृत स्तोत्रच उपदेशरूपानें दिलें. ' सितारामम्हाराज हेच तुम्हांला तारक व उपास्य आहेत. त्यांची तुम्ही भक्ति करा ' असें सांगून त्याला त्यांचे भजनीं जोडून दिला. तो ब्राह्मण मग श्रीगुरुसीताराममहाराजांचें भजनपूजन करूं लागला व मुक्त झाला.

श्रीगुरुनाथ हे दत्तमहाराज आहेत असें समजून चतुर्विध पुरुषार्थ इच्छिणारे लोक त्यांचे भजनीं लागत होते. त्यांना श्रीगुरु उपदेश देऊन चतुर्विध पुरुषार्थ देणारें असें गुरुनाम देत असत. आपल्या तपःप्रभावानें त्या त्या भक्ताची श्रद्धाभक्ति उपदिष्ट मंत्रावर अढळ वसवून त्याला इष्टार्थभाक ते करीत असत. याप्रमाणें उमरावतीपर्यंत ते सकळांना इष्ट देत आले. पुढेसुद्धां जिकडे जिकडे ते फिरले, तिकडच्या लोकांनादेखील त्यांनीं स्वप्रभावानें पूर्णमनोरथ बनविले. निजदर्शनानें, स्पर्शनानें, संभाषणानें, तीर्थप्रसादानें वगैरे ते सर्वांचा उद्धार करीतच चालले होते. बहुतेकांचा उद्धार श्रीवासुदेवानंदसरस्वतीप्रभूंनीं केलाच होता. श्रीसीतारामम्हाराजांनींदेखील पुष्कळांचा उद्धार केला. तसाच नृसिंहसरस्वतीदेखील अनेकांचा उद्धार करीत चालले. ते फिरत फिरत उमरावतीपर्यंत येऊन पोंचले. तेथील पुष्कळांना त्यांनीं उपदेश दिला व निजदर्शनादिकानेंदेखील त्यांचा उद्धारच केला. "**तद्दृष्टिगोचराः सर्वे मुच्यंते सर्व किल्मिषैः**" या आपल्या दृष्टीच्या दिव्य महात्म्यानेंच ते सर्व जगाला पावन करीत होते. श्रीवासुदेवानंद, श्रीसीताराम व आपण असे त्रैमूर्तीस्वरूपी भगवान ते होत. आपल्या वांट्याला आलेलें जगत्कल्याणाचें कार्य करून त्यांनीं गुरुबंधू सीतारामम्हाराजांना बढणेरीस जाऊन निवेदन केलें. तसेंच तें गरुडेश्वरीं जाऊन श्रीगुरुवासुदेवभगवंतांनादेखील निवेदावें, म्हणूनच कीं काय ते तिकडे आतां जात आहेत. आषाढ शुद्ध प्रतिपदेचा वासुदेव पुण्यतिथीचा उत्सव करून त्यांनीं उमरावती सोडली.

प्रकरण १६ वें

गुरुमहाराज उमरावतीहून गरुडेश्वरीं जावयाला निघाले तेव्हां कारंजपुरवासी भक्तमंडळी त्यांना म्हणाली कीं, " आपण यंदां आपला चातुर्मास कारंजालाच करावा, गरुडेश्वरीं राहूं नये. " गुरुमहाराजांबरोबर असलेली स्त्रीपुरुष मंडळी त्यांना म्हणाली कीं, " सद्गुरुनाथांनीं यंदां आम्हांला आपला समागम देत गरुडेश्वरांतच चातुर्मास करावा. " याप्रमाणें दोघांचीं दोन मतें पडलीं. आतां कोणाची मागणी पुरवावी, असा श्रीगुरूंना प्रश्न पडला. भक्ताधीन परमेश्वराला कोणालाच नाहीं म्हणवेना. दोघांनाही त्यांनीं ' होय ' असेंच म्हटलें. आणि अधिक भक्ति ज्यांची असेल त्यांची मागणी पुरी करण्याचें मनांत योजून भक्तिपरीक्षणार्थ त्यांनीं युक्ति योजली ती अशी — आपल्या भक्तगणाला त्यांनीं सांगितलें कीं, " आम्ही तूर्त सोमणांना गरुडेश्वरीं घेऊन जातों. तुम्ही सर्व भक्त प्रीतीनें येथें आमच्या गुरुमहाराजांचें भजन करा. गरुडेश्वरांत आम्हांला तें जर ऐकूं आलें तर आम्ही तुम्हांला तेथें बोलावून घेऊं व तुमचे हेतु सफळ करूं. " ही गुरुवर्यांची आज्ञा कारंजपुरकर व आपले दिंडीगण अशा दोघांही भक्तांना उद्देशूनच होती. आज्ञेच्या बाहेर ते कसे जातील ? " जशी आपली आज्ञा " असें त्यांनीं म्हटलें.

श्रीगुरुवासुदेवानंदसरस्वतींना ज्यांची भक्ति रुजू होईल त्यांचे इच्छेप्रमाणें आपण वागूं असा अभिप्राय मनांत धरून श्रीगुरुनाथ डॉ. सोमणांना घेऊन निघाले. त्यांच्याबरोबर त्यांचे देव घेऊन रामचंद्र कट्टी व फलाहार वगैरे करून घालण्यासाठीं अनसूयाबाई असे दोन दिंडीगण निघाले. त्यांना महाराजांनीं बरोबर घेतले. बाळाभाऊ व रामप्रसाद हेही गरुडेश्वर पाहण्यासाठीं निघाले. असे एकंदर पांच भक्त बरोबर घेऊन नृसिंहगुरुमूर्ति प्रथम सुरतला गेले. तेथें

त्यांनीं तापी नदीचें स्नान केलें. देवपूजा, संध्यावंदन करून तेथून भडोचला गेले. तेथें तीर्थस्नान करून अंकलेश्वरला आले व अंकलेश्वराहून छोट्या लाइनीनें नर्मदा तीरीं नांदोद येथें गेले. श्रीमंत नांदोदकर राणीसाहेबांनीं त्यांना आपल्या लक्ष्मीनारायणाचे मंदिरांत उतरविलें. भावभक्तीनें त्यांची चरणपूजा व आरती केली. दोन दिवस नांदोद संस्थानांतच महाराजांना राणीनें ठेवून घेतलें.

नांदोद गांवीं गुरुमूर्ति असतांना इकडे उमरावतीमध्यें त्यांच्या दिंडीगणांनीं आज्ञेप्रमाणें ' दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ' या नाममंत्राचें भजन भक्तीनें चालू केलें होतें. गुरुमहाराजांनीं आपणांला घेऊन गरुडेश्वरांतच चातुर्मासाला रहावें हा त्यांचा भजनारंभींचा संकल्प होता व तत्सिद्धयर्थ महाराजांनीं गरुडेश्वरीं बोलावल्यावांचून आपण अन्न स्वीकारावयाचें नाहीं असा त्यांनीं निर्धार केला होता. उपोषणें करून त्यांनीं भजन चालविलें होतें तसें कारंजपुरकर भक्तांनीं मात्र तें चालविलें नाहीं. श्रीगुरुनाथांच्या दिंडीगणांना ती इष्टापत्तीच झाली. गरुडेश्वरांत त्यांचें भजन श्रीवासुदेवानंद दत्तप्रभूंना तत्काळ ऐकूं गेलें. प्रायोपवेशनाप्रमाणें अन्नत्याग करून जिवावर उदार होऊन कळकळीनें केलेलें भजन परमेश्वराला ऐकूं जायला उशीर लागत नाहीं. भक्तांच्या निष्ठापूर्वक हांकेकडे सततच त्यानें आपले सहस्र कान लावलेले असतात. मुंगीच्या पायांतल्या घागऱ्यांचा ध्वनिसुद्धां त्याला जर ऐकूं जातो, तर एकनिष्ठ भक्तांच्या प्रचंड आरोळ्या तो कसा ऐकणार नाहीं ? सर्वज्ञाधिपति भक्तवत्सल श्रीवासुदेवदयाघनांनीं आपल्या कंठमणींना नांदोदला जाऊन असें सांगितलें कीं, " भो नृसिंहसरस्वति स्वामिवर्य ! तुम्ही आपल्या उमरावतींतील भक्तांना बोलावून घ्या व गरुडेश्वरांतच यंदांचा चातुर्मास करा. "

" सखोल भूमीकडे जसें उदक धांवतें तसें आपल्या दिंडीगण मंडळीकडेच वासुदेवगुरुभगवंतांचें चित्त वेधलें. म्हणून त्यांनीं आपणांला ही आज्ञा केली. भक्तांची निवड त्यांनींच केली. " गुर्वाज्ञा आपणांला प्रमाण होय " असें म्हणून श्रीगुरुनाथांनीं नांदोदमधूनच बाळाभाऊकरवीं उमरावतीला तार करविली व आपल्या भक्तांना कळविलें कीं, " आमचा चातुर्मास गरुडेश्वरांतच व्हाव-

याचा ठरला. करितां तुम्ही सर्वांनीं गरुडेश्वरला यावें.'' याप्रमाणें तार पाठवून श्रीगुरु बैलगाड्या करून त्यांतून डॉ. सोमण आदि भक्तांसह गरुडेश्वरला जाऊं लागले. तेव्हां वरंधार पाऊस लागत होता तरी ते तसेच निघाले. त्यांना गुरुभेटीची आतुरता अतिशय लागून राहिली होती. म्हणून त्यांनीं वृष्टि जुमानली नाहीं, भिजतच गेले. नांदोदपासून गरुडेश्वर नऊ मैल दूर आहे. मध्यें नर्मदा नदी असून तिच्या उत्तर तीरावर श्रीगरुडेश्वरक्षेत्र व दक्षिण तीरावर इंद्रवन संज्ञक प्रदेश आहे. त्या इंद्रवनांत श्रीगुरु सायंकाळीं पांच वाजतां जाऊन उतरले. पन्हईंत (नौकेंत) बसून लगेच ते पलीकडे गरुडेश्वरांत जाऊन प्रवेशले. त्या दिवशीं आषाढ शुद्ध एकादशी होती. सायंकाळचे सहा वाजले होते. श्रीगुरुनाथांची कृपातार उमरावतींतील गुरुभक्तांना सहा वाजतांच पोंचली. त्याबरोबर त्यांना तिकडे 'आपण गरुडेश्वरला गेलोंच' असें वाटलें, व आनंद झाला. लगेच ते तेथून निघाले. निजभक्तांना असें आनंदित करून श्रीगुरु स्वतः आनंदानें गरुडेश्वरांत प्रवेशले. त्यांनीं प्रथम भूवंदन केलें. नंतर उत्कंठापूर्वक ते गुरुसमाधिमंदिरांत गेले. अनन्य भावानें दोन्ही हात जोडून वासुदेवापुढें ते उभे राहिले. तेव्हां त्यांचे सर्वांगीं अष्टसात्त्विकभाव उत्पन्न झाले. प्रेमाश्रूंनीं त्यांचें अंग भिजलें. त्यांना बोलवेनासें झालें. त्यांनीं निजसद्गुरुरायापुढें साष्टांग प्रणिपात घातला, प्रेमानें गडबडा तेथें लोळले व मुखानें 'सद्गुरु वासुदेव, सद्गुरु वासुदेव' 'पाहि मां पाहि मां' असे उद्गार त्यांनीं काढले.

त्यांच्या आदरसत्कारार्थ गुरुभक्त परसूभाई व ठाणेदार हे क्षेत्रस्थ अधिकारी तेथें पन्हईंतून महाराज उतरल्यावेळेपासून त्यांचेबरोबरच होते. त्यांना नृसिंहसरस्वतींचा गुरुप्रेमा पाहून फार आनंद झाला. त्यांनीं त्यांना बरती नेऊन दत्तमंदिर दाखविलें. श्रीगुरूंनीं दत्तदर्शन घेतलें. नंतर नारदेश्वर वगैरे अन्य देवतांचीं दर्शनेंदेखील त्यांनीं घेतलीं व गुरुसमाधिपुढें येऊन आपल्या भक्तवर्गासहित आनंद उपभोगीत स्वस्थ बसून राहिले. गरुडेश्वरीं येऊन पोंचल्याचा व वासुदेवानंदसरस्वतीप्रभूंची भेट झाल्याचा त्यांना अतोनात आनंद झाला. इतरांना जरी कोणाला वासुदेव दिसले नाहींत तरी पण स्वगुरुमाणें योग्यतेच्या नृसिंहसरस्वतींना मात्र श्रीवासुदेवानंददत्त त्यावेळीं साक्षा-

तच दिसले. त्यांचें त्यांचें संभाषण चालूच होतें. त्यांच्याजवळच भक्तांपुढें श्रीगुरुनाथ असें म्हणत राहिले कीं, "आतां आम्हांला येथून जावेंसें वाटत नाहीं. गरुडेश्वरांतच अखंड गुरुसेवा करीत रहावें असें वाटतें. येथेंच मोठा आनंद आहे." इत्यादि भाषा बोलतांना ते वासुदेवस्वरूपांत एकरूप होत होते. ते मूळचे एकच खरे! पण प्रेमानंदाच्या समुद्रांत त्यांचें मन विरून जात होतें. त्यांचे देहाचें स्मरण सुटत होतें, असें जवळच्या भक्तांना दिसत होतें. मोक्षसमाधीपेक्षां निराळी अशी त्यांची प्रेमसमाधि एकसारखी लागत होती. ते आपल्या प्रियतम सद्गुरुदेवाला देहभाव सोडून प्रेमालिंगन देत होते व गुरुमयच होत होते. पुष्कळ काळ त्यांनीं असा प्रेमानंदांत बसून काढला व नंतर नर्मदेवर जाऊन स्नान केलें. नर्मदेचें व सद्गुरुदेवाचें पूजन, भजन, आरती वगैरे उपासना झाल्यावर प्रवासाचें शीण दूर करण्यासाठीं भक्तांसह श्रीगुरुनाथ परसूभाईंनीं दिलेल्या विस्तीर्ण इमारतींत शयन करते झाले. प्रत्यक्ष वैकुंठकैलासांत आपण आलों आहों, असें मानीत मानीत निद्रासमाधिसुखांत ते निमग्न झाले.

द्वादशीचे दिवशीं श्रीगुरूंनीं वासुदेवानंददत्तभगवंतांची महापूजा थाटानें केली. गुरुभगवंताला महानैवेद्य समर्पण केला व गुरुरायाचे ताटांतला महाप्रसाद मोठ्या भक्तीनें ग्रहण करून सात वर्षांचे उपोषणाचें पारणें केलें. ठरल्याप्रमाणें उपोषणाचा नेम सोडून दिला. सोमणांनींदेखील त्याच दिवशीं महापूजा केली. महाराजांबरोबर सर्व भक्तांचीदेखील भोजनें झालीं. चतुर्दशीला उमरावतीहून भक्तगण आले. त्यांनीं आनंदानें गुरुमहाराजांचें दर्शन घेतलें. तो मायलेकरांचा संगम प्रेमवृद्धि करणाराच झाला. त्यांनींदेखील गुरुभेट होतांच आपले उपास सोडून त्यांचें पारणें केलें. श्रीगुरुनाथ व भक्त हयांच्या नेत्रांनींदेखील गुरुदर्शन होतांच आपापलीं पारणीं केलीं. त्यांनादेखील गरुडेश्वरस्थ गुरुदर्शनाचे उपासच पडले होते. ते त्यांचे गरुडेश्वरीं येतांच सुटले. त्यांच्या चरणांनासुद्धां गरुडेश्वर गांठीपर्यंत त्याचे उपासच पडले होते. ते त्यांनीं गरुडेश्वरीं उतरतांच सोडले व पारणीं केलीं. सर्वेंद्रियांनींच गुरूबद्दल घडलेल्या उपासांचीं पारणीं गरुडेश्वरांत जातांच केलीं. अशी

पारणीं तेथें त्या दिवशीं बहुत झालीं. सर्वांचे शीण गेले व सर्वांना आनंद झाला. त्या वेळीं सर्वांनीं गुरुनामाचा जयघोष केला.

महाराजांचे भक्तगणांत कृष्णभटजी हे एक होते. त्यांचा उल्लेख पूर्वी येऊन गेलाच आहे. उमरावतीहून आलेल्या भक्तगणांतच हे होते. गरुडेश्वरांत उतरतांच त्यांच्या मनाची स्थिति कशी झाली ती ऐका. जेव्हां त्यांची अश्वगाडी गरुडेश्वरला येऊन पोंचली, तेव्हां गाडींतून उतरल्याबरोबर त्यांना प्रेमाचा उमाळा आला. आतां गुरुभेट होणार म्हणून ते आनंदले व तेथूनच दंडवत, नमस्कार घालीत घालीत ते महाराजांकडे निघाले. खांचखळगे असलेला तो रस्ता होता. त्यांतूनच ते अंग भुईला टाकीत चालले. गुरुस्थान बरेंच दूर होतें. तेथें एकनिष्ठपणानें दंडवत घालीत व मुखानें 'नरसिंहसरस्वती सद्गुरु महाराजकी जय' असा मोठ्यानें जयघोष करीत करीत जवळ जवळ ते जसे गेले, तसे श्रीगुरुनाथांचे कानांवर तो जयघोष गेला व त्यांची नजर भक्ताकडे लागली. महाराजांपाशीं गरुडेश्वरनिवासी शिवानंद म्हणून एक स्वामी बोलत बसले होते. त्यांनींदेखील कृष्णभटजी असे येतांना पाहिले. त्यांनीं महाराजांना विचारलें कीं, "महाराज! हा आपला जयघोष करीत, दंडवत घालीत कोण इकडे येत आहे?" महाराज म्हणाले, "तो वाडीचा दत्तपुजारी आहे. आमचा तो भक्त आहे." शिवानंद म्हणाले, "वाडीचे पुजारी तुमचा द्वेष करीत असतां हा असा कसा येत आहे?" महाराज म्हणाले, "त्याला आम्ही समस्त पुजाऱ्यांतून काढून आपणांकडे घेतला आहे. जसा कृष्णांनीं उद्धवाला घेतला, तसा." शिवानंद म्हणाले, "एकाचा स्वीकार व बाकी पुजाऱ्यांचा अव्हेर करणें आपणांला योग्य नाहीं. वासुदेवानंद महाराजांचे पट्टशिष्य तुम्ही त्यांचेप्रमाणेंच समदर्शी आहांत असें आम्ही ऐकलें होतें. वासुदेवमहाराजांची तुम्हांवर परिपूर्ण कृपा झालेली आहे ना?" महाराज म्हणाले, "आमच्या महाराजांची पूर्ण कृपा आम्हांवर झालेलीच आहे, यांत शंकाच नाहीं." शिवानंद म्हणाले, "मग हा विषम भाव कां?" महाराज म्हणाले, "विचार करा. आमचा हा समभावच आहे. तो कसा? तर, श्रीकृष्णभगवंताप्रमाणें. वैरानें, कामानें, भयानें, प्रेमानें इत्यादि निरनिराळ्या वृत्तीनें भजणाऱ्या भक्तांना निरनिराळ्या रीतीनें वागवून सर्वांना स्वस्वरूपाची

प्राप्ति कृष्णानीं जशी समानच करून दिली त्याप्रमाणें आम्हीसुद्धां निरनिराळ्या वृत्तींनीं भजणारांना भिन्नभिन्न तऱ्हेनें वागवितों व स्वस्वरूपाची प्राप्ति त्यांना समानच देतों. असें करतांना कृष्ण जसा समान म्हटला गेला तसेच आम्हीदेखील सर्वांना समानच आहों. उद्धव जसा प्रेमळ भक्त होता, तसा हा कृष्णापुजारी आमचा प्रेमळ भक्त आहे. म्हणून आम्ही त्याला असा प्रेमानें आपणांजवळ आणीत आहों. त्याला आम्ही प्रेमानें दिंडीगणांत घेतला आहे." हें गुरुमहाराजांनीं दिलेलें उत्तर ऐकून व त्यांची वृत्ति पाहून शिवानंद मनांत म्हणाले कीं, 'नृसिंहसरस्वती हे साक्षात् श्रीदत्तभगवान् वासुदेवानंदसरस्वतीच आहेत. गुरुशिष्यांत मुळींच अंतर राहिलेलें नाहीं.' असें म्हणून ते गुरुपदीं नम्र झाले. इतक्यांत कृष्णंभट व शिंगणापुरकर, गंगूताई, यमूताई इत्यादि सर्वच गुरुभक्त महाराजांचे पुढें प्राप्त झाले. हरवलेली माता सांपडावी तशी गुरुमाय त्यांना मिळाली. आनंदानें ते सर्वच गुरूपुढें लोळले. तेव्हां "कृष्णा ! इतके श्रम कशाला घेतलेस ?" असा प्रश्न महाराजांनीं त्यांना केला. कृष्णंभटजी म्हणाले, "ह्या देहाचें चर्म काढून त्याचें पादत्राण करून श्रीगुरुपदीं घातलें तरीसुद्धां तें करणें अत्यंत थोडें होईल. असे अपार उपकार करणाऱ्या दयाघनाकडे नमस्कार घालीत मी आलों यांत मोठेसे श्रम ते कसले ? आपण आम्हां भक्त मंडळीला उमरावतीहून बोलवून येथें आपल्या सन्निध घेतलेत; आमचा त्याग केला नाहींत, अंगीकारच केलात म्हणून मला मोठा आनंद झाला. त्यासरशीं मी देहभान सुटल्यासारखा झालों व दंडवत घालीत आलों. आपल्याच कृपावळानें मी ते घातले. माझें तरी यांत काय आहे ?" कृष्णाचें भक्तियुक्त भाषण ऐकून श्रीगुरु हंसले व सर्वभक्तिमंतांना त्यांनीं आपल्या नेहमींच्या भक्तानंदवर्धक कूर्मदृष्टीनें अवलोकिलें. तेव्हां त्या सकळांचीं पोटें आनंदानें भरलीं व त्यांचीं दुःखें नष्ट झालीं.

आषाढी पौर्णिमेला श्रीगुरूंनीं क्षौरविधि आचरला. नर्मदेमध्यें दंडासह यथाविधि स्नान केलें. तेव्हां त्यांचे मागें राहून त्यांचेबरोबर भक्तांनीं अवभृत स्नानें केलीं. गुरुनाथांचे अंगावरून आपलें नर्मदोदक सर्वांनीं आपल्या अंगावर धारण केलें व ते अनंत जन्मींच्या दोषांतून मुक्त झाले. श्रीगुरूंनी

आपलें संध्यावंदन, व्यासपूजा, गुरुपूजा वगैरे करून घेतली व संकल्पपूर्वक ते गरुडेश्वरांत वर्षाऋतु संपेपर्यंत दोन महिने गतिनिवृत्ति करून चातुर्मासार्थ स्थिर राहिले. त्या दिवशीं गुरुभक्त परसूभाई नामक गरुडेश्वर संस्थानच्या पंचांनीं नृसिंहसरस्वती हे वासुदेवानंदसरस्वतीच आहेत या भावनेनें त्यांची भावभक्तीनें पूजा केली. पुष्पांचे हार, फळफळावळ, दक्षणा व नव्या छाटया त्यांनीं श्रीगुरुनाथांना अर्पण केल्या. महाराजांनीं पूजा घेऊन त्यांना प्रसाद दिला. सर्व भक्तांचीं भजनें व भोजनें झालीं. श्रीगुरूंनीं मात्र उपवास केला. दुसरे दिवशीं त्यांचें पारणें झालें.

श्रीनृसिंहसरस्वतीपासून गरुडेश्वरवासी पुष्कळ लोकांनीं उपदेशमंत्र घेतले. बोलणेंचालणें, प्रसाद देणें, प्रसन्न मनानें अवलोकन करणें, सर्वांवर कृपादृष्टि ठेवणें इत्यादि गुरुलक्षणें थोरल्या महाराजांप्रमाणेंच गुरुरायांमध्यें लोकांना दिसलीं. ते सर्व लोक गुरुनाथांवर फार भक्ति ठेवूं लागले. महाराजांची भक्त मंडळी व महाराज यांनीं गरुडेश्वरांत असेपर्यंत श्रीगुरुवासुदेवमहाराजांचे अन्नपूर्णागृहांतच रोज प्रसाद सेवन करावा, स्वतंत्र स्वयंपाक बनवूं नये, अशी परसूभाईप्रमुख तेथील पंचांनीं श्रीगुरूंना प्रार्थना केली. महाराज 'बरें आहे' म्हणाले. भक्तगण रोज भंडारखान्यांतच भोजन घेत. महाराजांना मात्र पुजारी नियमानें तेथून ताट वाढून आणून त्यांचे जागेवरच देत असे. महाराज व भक्तगण रोज रात्रीं वासुदेव पंचपदी, भजन, आरती इत्यादि करीत. अशी गुरुसेवा करीत आनंदानें सर्व गुरुभक्त गरुडेश्वरांत राहिले.

गुरुगृहीं गुरुदेवाचे सेवेला आपण राहिलों आहों, असा नृसिंहमुनींचा भाव होता. ते रोज आपलें अनुष्ठान समाधिमंदिरांत गुरूजवळ बसूनच करीत. गुरुमहाराजांची सेवाचाकरी त्यांनीं त्या मंदिरांत सुरू केली. ते मंदिर झाडीत, फरशी घातलेली त्यांतली जमीन रोज पाणी घालून धूत, ती छाटीनें नीट पुशीत, समाधीला स्नान घालीत, पूजा करीत. महाराज वासुदेवाचीं आरत्या-स्तोत्रें म्हणत व आपल्याला आलेल्या ताटाचा महानैवेद्य गुरुरायाला अर्पण करून तो गुरुप्रसाद आपण सेवीत. गुरुमहाराज वासुदेवानंदप्रभूंनीं स्वहस्तें ठेवलेली दत्तमूर्ति रोज सायंकाळीं पूजेला समाधिमंदिरांत घेऊन येत. रात्रौ पूजा, भजन, आरती, धूपारती, नैवेद्य वगैरे दाखवून वासुदेवमूर्तीसहित त्या

दत्तमूर्तीची एकत्र शयनारति करीत, व सकाळीं पूजा करून ती मूर्ति पुन्हां तिच्या मंदिरांत नेऊन ठेवीत. अशा तऱ्हेनें गुरुसेवाव्रतधारी नरसिंहसरस्वती गुरुभक्ति करीत गरुडेश्वरांत वास्तव्य करून राहिले.

मुमुक्षु पुरुषानें जशी गुरुसेवा करावी तशी साधकवृत्ति धरून श्रीगुरु जीवन्मुक्तमुगुटमणि सिद्धपुरुष असूनदेखील जे अनन्यभावानें गुरुसेवा करीत राहिले, ते आपण आपली गुरूबद्दलची कृतज्ञता तर प्रगटविते झालेच; शिवाय त्यांनीं गुरुभक्तीचा धडासुद्धां मुमुक्षुगणाला घालून दिला, तसा सिद्धांनासुद्धां तो घालून दिला. त्यांनीं प्रवासांत जी गुरुमूर्ति बाळगिली होती तीसुद्धां आपली कृतज्ञता सांभाळून जनतेला गुरुभक्तीचा धडा घालून देण्यासाठींच होय. त्यांचा अवतार तेवढ्याचसाठीं झाला.

गुरुभक्ति आचरोनी शिकवावी जनांप्रति ॥
यासाठीं जन्मले लोकीं नरसिंहसरस्वती ॥ १ ॥

हें अवतारप्रयोजन पूर्वी चरित्रारंभीं आम्हीं वर्णन केलेंच आहे. जगदुद्धार करणें, जगाचीं अभीष्टें पुरविणें वगैरे स्वगुरुवर्यांचेंच अवशिष्ट कार्य त्यांनीं आजपावेतों केलें व जें केलें तें सर्व गुरुचरणीं अर्पण केलें व आत्मकर्तव्य जी गुरुभक्ति ती ते आचरीत गुरुसन्निध गरुडेश्वरीं राहिले.

इंगोली वगैरेकडून कांहीं भक्त त्यांच्या दर्शनाला तेथें गेले होते. गरुडेश्वराचे झाडींत भिल्ल लोक रहातात. तेसुद्धां महाराजांचे दर्शनाला येत. त्यांना महाराज स्वहस्तें प्रसाद देत. त्यांनीं तेथें जातांच गरुडेश्वरांत असलेल्या नारदेश्वर, अक्रूरेश्वर इत्यादि देवांचें पूजन केलें. नर्मदेचें पूजन, आरती रोज सुरूच असे. त्यांनीं गरुडेश्वरक्षेत्रांत चोहोंकडे पदसंचार केला. ती क्षेत्रप्रदक्षणाच समजा. तेथलें मुख्य दैवत जें श्रीमद्वासुदेवानंदसरस्वती-दत्त त्याची तर त्रिकाळ पूजा, आरती वगैरे उपासना त्यांनीं चालविली होतीच. यात्रेसंबंधीं जें कर्तव्य करावयाचें तें सर्व त्यांनीं केलें. याप्रमाणें आपण व आपली दिंडीगण मंडळी मिळून त्यांनीं श्रीगरुडेश्वरयात्रा संपूर्ण केली. भक्तांना जें त्यांनीं पूर्वी वचन दिलें होतें कीं, " तुम्हांला आम्ही गरुडेश्वराला नेऊं व श्रीगुरुवासुदेवानंदसरस्वतीदत्तांचें दर्शन करवूं " त्या

भक्तांना दिलेल्या वचनांतून ते पार पडले. तद्वत् " गरुडेश्वरीं जाऊन आम्ही अन्न स्वीकारूं व उपोषणाचें व्रत सोडूं " या आपल्या संकल्पांतूनसुद्धां ते पार पडले. श्रीगुरुवासुदेवानंदमहाराजांची मूर्ति भजन करीत मिरवत गरुडेश्वरला न्यायची ही जी त्यांनीं हौस धरली होती तीदेखील त्यांनीं गरुडेश्वरीं मूर्ति नेऊन पुरी करून घेतली. तेव्हां आतां आपण कृतकृत्य झालों असें त्यांना वाटलें. त्यांचें पूर्ण समाधान झालें व त्यांच्या भक्तांना-देखील पूर्ण आनंद झाला.

गुरुसेवेच्या बाबतींत व गुरुमहाराजांचे उत्सव करण्याचे बाबतींत मात्र नरसिंहसरस्वती मी कृतकृत्य झालों असें समजले नाहींत. तें त्यांचें आजी-वितावधीचें कर्तव्य होतें. तें अपुरेंच आहे असें ते समजत. गुरुभक्तीचे मनोरथ ते सतत करीतच असत. वाडी, अमरापुर किंवा गाणगापुर इत्यादि स्थानीं जशी देवाची नित्य पालखी निघते तशी गरुडेश्वरांत वासुदेवदत्ताचीदेखील ती निघावी असें ते म्हणत असत. त्यांनीं भक्तगण व आपण मिळून समाधि-मंदिरापोंवतीं व समोर पालखी मिरवितां येण्याला योग्य अशी जागासुद्धां दगड वगैरे लावून हातांनीं तयार केली. श्रीवासुदेवदत्तात्रयांची मूर्ति आपल्या हस्तरूपी पालखींत बसवून ते रोज आरतीनंतर मंदिराला प्रदक्षिणा घालीत असत. त्यावेळीं चातुर्मास नसता तर पुण्याहून पालखी आणवून ते पालखीं-तून प्रभूंना मिरविणार होते. पुढें चातुर्मास होतांच त्यांना पुन्हां संचारालाच प्रभूंनीं पाठविलें. तेथें रहाते तर पालखी त्यांनीं आणविली असती, पण तो योग आला नाहीं. त्यांनीं आपली हौस वर वर्णिल्याप्रमाणेंच पुरी करून घेतली. एकंदरींत गुरूत्सवाचे बाबतींत नरसिंहसरस्वती नेहमीं उत्सव करून-सुद्धां अपूर्णकामच असत. गुरुभक्ति पुरे असें त्यांना कधींच वाटलें नाहीं, ही एक लक्षांत ठेवण्यासारखीच महत्त्वाची गोष्ट होय.

आपल्या श्रीगुरुनाथांची सेवा करीत करीत त्यांच्या चरणीं गरुडेश्वरांतच आपला देह पडावा अशी त्यांना इच्छा होऊनच कीं काय कोण जाणे, अवतार संपूर्ण करतांना त्यांच्या गुरूंनीं जें अतिसाराचें दुखणें पत्करलें होतें तें त्यांनीं-देखील आपल्या शरीरीं उद्भवून घेतलें. अतिसार होऊन त्यांची प्रकृति अतिशय क्षीण झाली. दहा-वीस वेळां शौचाला जावें लागे. तितके वेळां

नर्मदेचें स्नान ते करीत. जाववत नसे तरी गंगेवर जात व येत. आपलें संध्या-वंदन, गुरुपूजा, आरती, प्रदक्षणासुद्धां त्यांनीं तशा अवस्थेंत सुरूच ठेवल्या होत्या. गुरुसेवेंत ते खंड पाडीत नसत. दुसऱ्याच्या हातून ही गोष्ट मुळींच झाली नसती असें त्या वेळीं त्यांना पाहणारे लोक म्हणत. आपल्या गुरु-महाराजांची दुखणाइत दशा त्यांनीं पूर्वी वाडीमध्यें अनुष्ठानें करवून एक महिनाभर जी निवारली होती तीच शिल्लक राहिलेली गुरुदेहींची भोगदशा गरुडेश्वरांत जाऊन त्यांनीं स्वतः भोगायला सुरुवात केली होती असेंदेखील अनुमान निघतें. बाकीच्या गुरूंनीं करून उरलेल्या अवधूत लीलेसारख्या गोष्टी त्यांनीं उर्वरित म्हणून जशा केल्या तशीच ही अतिसारभोगाची देखील उर्वरित लीलाच ते करीत नव्हते म्हणून तरी कशावरून ? कोणतेंही कारण असो, नृसिंहसरस्वती अतिसारानें दुखणेकरी होऊन फार क्षीण झाले.

सद्गुरुनाथ, वासुदेवमहाराजांप्रमाणें दुखणाइत होतांच त्यांचे भक्त लोक फारच घाबरले. श्रीगुरु अवतारसमाप्तिच करतात कीं काय ? अशी त्यांना चिंता लागली. मागें उमरावतींत वांसा मस्तकांत शिरून श्रीगुरु दुखणाइत झाले होते तेव्हां 'ती व्याधि लवकर कशानें बरी होईल ?' असा प्रश्न भक्तांनी श्रींनाच केला होता. तेव्हां " रोज प्रत्येकानें दिगंबर मंत्राचा बारा हजार जप केल्यानें आमची प्रकृति बरी होईल " असें त्यांना नृसिंहसरस्वतींनीं उत्तर दिलें होतें. भक्तांनीं तितका जप सुरू करतांच खरोखरच श्रींची तब्बेत तेव्हां लगेच बरी झाली. अशा तऱ्हेचा दिगंबर नामजपाचा दाखला पूर्वी भक्तगणांना आला होता. तो भजनानुभव मनांत स्मरून त्यांनीं श्रीगुरु-नाथांना आराम वाटावा म्हणून " दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा " या नामाचा सप्ता तेथें सुरू केला. सुरुवात करतांना त्यांनीं श्रीवासुदेवानंद-सरस्वतींची प्रार्थना केली कीं, " हे दयाघना वासुदेव प्रभो ! नृसिंहसर-स्वतींना तुम्ही अवतार समाप्त करूं देऊं नका. त्यांचें हें दुखणें निवारण करा. आम्ही अनन्य भावानें आपलें भजन सप्ताहरूपानें करीत आहों. आम्हांला त्यांत यश द्या, " अशी प्रार्थना करून त्या गुरुप्रेमी भक्तगणांनीं निष्ठापूर्वक नामसप्ता चालू केला.

स्वभक्ताननुगृण्हाति भगवोन्भक्तवत्सलः ॥

भक्तवत्सल भगवान् वासुदेवानंद दत्तप्रभूंनीं त्या भक्तांवर तत्काळ दया केली. त्यांचे मागणीप्रमाणें नृसिंहसरस्वतींना त्यांनीं अवतार संपवूं दिला नाहीं. त्यांचा अतिसार बंद केला तेव्हां श्रीगुरुनाथांची प्रकृति पूर्ववत् निरोगी झाली. नामसप्ता करून भक्तांनीं त्यांना ठेवून घेतले जाऊं दिले नाहींत.

बरे झाल्यावर श्रीगुरु भक्तांना म्हणाले कीं, "तुम्ही महाराजांना भजन करून आळविलेंत म्हणून त्यांनीं आम्हांला तुमच्याकरितां दुसऱ्यांतून वांचविलें. नाहींतर आम्ही देह ठेवणार होतों." या ठिकाणीं श्रीगुरूंनीं भक्तांकडून आपलें देहमरण निवारण करून घेतलें. पूर्वी पुष्कळ ठिकाणीं भक्तांना आलेलें मरण आपण टाळलें. स्वतंत्र प्रभू केव्हां कशी लीला करतील तें कोणाला समजणार? भक्तांनीं दिलेल्या औषधानें व बडोद्याहून गुरुबंधु रामशास्त्री प्रकाशकर वैद्य आले होते त्यांनीं दिलेल्या औषधानें व नामसप्त्यानें श्रीगुरुमूर्तींना आराम वाटला तेव्हां सर्वांना फार आनंद झाला.

श्रीवासुदेवानंदांनीं नृसिंहसरस्वतींना अतिसारांतून वांचविलें. याचाच अर्थ त्यांना "अद्याप जगदोद्धारार्थ पृथ्वीपर्यटनच तुम्ही करा" अशी आज्ञा दिल्याप्रमाणें झालें, असें आम्ही म्हणतों. खरोखरच तशी आज्ञा वासुदेवांनीं दिल्याचा उल्लेख नृसिंहमुनींनीं केला नसल्यामुळें आम्हांला तसेंच म्हणावें लागतें किंवा "तुमच्याकरितां महाराजांनीं आम्हांला वांचविलें" असे उद्गार नृसिंहमुखांतून निघालेले आहेत. त्यांचा अर्थ जगदुद्धारार्थ पृथ्वीपर्यटनाची आज्ञाच त्यांना गुरूंनीं पुन्हां दिली, असादेखील मानायला कांहीं हरकत नाहीं. अस्तु.

चातुर्मास पुरा होतांच पर्यटनाला जातांना क्षेत्रस्थांची आपल्या श्रीगुरुभगवंतावरच भक्ति जडून रहावी, आपल्यावर ती जडूं नये, म्हणून वाडी सोडतांना नृसिंहसरस्वतींनीं तेथल्या पुजाऱ्यांचें आपणांवर जसें अप्रेम करून घेतलें, तसेंच गरुडेश्वरक्षेत्रस्थांचेंसुद्धां अप्रेम आपल्यावर व्हावें व वासुदेवानंदसरस्वती दत्तप्रभुरायावरच त्यांचें प्रेम कायम रहावें, याबद्दल युक्ति प्रारंभिली. चातुर्मास संपतां संपतां तेथले पंच व ग्रामस्थ आपल्या विरुद्ध करून घेतले. एका युक्तींत दोन कार्यें साध्य करून घेण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यांतलें एक

कार्य स्वतःवर क्षेत्रस्थांचें अप्रेम व दुसरें कार्य गुरुसमाधीजवळ आचाराची व्यवस्था. उभयकार्यसिद्धयर्थ त्यांनीं एक नियम तेथें सुरू केला. सर्वांना त्यांनीं असें बजावलें कीं, "पंचद्रविड ब्राह्मणांनींच फक्त श्रीगुरुसमाधीला शिवावें; इतरांनीं शिवूं नये. स्त्रियांनींसुद्धां समाधीला स्पर्श करूं नये." हा नियम त्यांनीं तेथें अमलांत आणला. द्राविडाशिवाय कोणालाच ते समाधीवर पाणी घालूं देईनासे झाले. सर्वांनीं प्रथम नृसिंहसरस्वतींची आज्ञा मान्य केली.

गरुडेश्वर संस्थानचे पंचांत सवनीस नांवाचे एक गौड ब्राह्मण मुख्य पंच होते. त्यांचा नेम समाधीवर पाणी घालण्याचा असे. विशेषेंकरून त्यांना हा नियम जाचक झाला. ते नाखूष झाले. ते नृसिंहसरस्वतींचा मत्सरच करूं लागले. आपणांप्रमाणें त्यांनीं सर्व पंचदेखील मत्सरयुक्त बनविले. अर्थात् बाकीचे लोकदेखील तसेच झाले. श्रीगुरुनाथांना ते तसे होणें इष्टच होतें. एके दिवशीं सवनीस क्रोधानें श्रीगुरुनाथांजवळ भांडत बसले. समाधीला कां शिवूं नये? म्हणून त्यांनीं बऱ्याच तक्रारी केल्या. श्रीगुरूंनीं त्या साऱ्या अयोग्य ठरविल्या. "यापुढें केव्हांही तुम्ही समाधीला शिवत जाऊं नका" असें श्रीगुरूंनीं सवनिसांना बजाविलें. वासुदेवानंदसरस्वतींचे हातांतला कमंडलू नृसिंहसरस्वतींनीं आपणांपाशीं ठेवला होता तो आम्हांला द्या, गरुडेश्वरांतून अन्यत्र नेऊं नका, असें सवनीस म्हणूं लागले. त्यांना महाराज म्हणाले कीं, "तुम्ही संन्यास घ्या म्हणजे आम्ही तुम्हांला तो कमंडलू देऊं; एरवीं तुम्हांला तो मागणेचा अधिकार नाहीं." सवनीस निराश होऊन गेले.

पुढें एके दिवशीं जबरदस्तीनें समाधीला शिवावें म्हणून सवनीस मंदिरांत घुसण्याचा प्रयत्न करीत होते. पण आपल्या तेजोबळानें श्रीगुरूंनीं त्यांना बाहेर रेचे बाहेर स्तंभित करून ठेवलें. मग तेथूनच त्यांनीं वाडीकर पुजाऱ्यांप्रमाणें श्रीगुरूंची वाक्पुष्पपूजा केली. श्रीगुरु सर्व तऱ्हेच्या पूजा आनंद व खेद वर्ज करून घेतच असत. त्यांनीं ती सवनीसांनीं केलेली पूजासुद्धां स्वीकारली "कोणी वंदा कोणी निंदा, आम्हां स्वहिताचा धंदा" कसलाहि प्रसंग आल तरी गुरुभक्तीला चिकटून रहायचें हें नृसिंहसरस्वतींचें शील होतें. तदनुसा ते अप्रतिकारपूर्वक शांतच राहिले. भक्तगण मंडळी अतिप्रसंगनिवारण

तयार होती. पण श्रीगुरूंनीं इष्ट तेवढाच प्रसंग आणून घेतला. समर्थांनीं अतिप्रसंग येऊंच दिला नाहीं. वाडींत चातुर्मासाअखेर झालेला प्रकारच गरुडेश्वरीं झाला. वाडीकर पुजाऱ्यांनीं क्रोधानें जशी नृसिंहमुनींना 'येथून जा' अशी आज्ञा दिली, तशीच गरुडेश्वरीं पंचांनींगुद्धां ती त्यांना दिली. वांन्ही ठिकाणीं श्रीगुरूंनीं एकसारखीच प्रेमतंतु तोडलेलीच आज्ञा घेतली. असें करण्यांत गुरुभक्तिमय असा जो हेतु धरला होता तो पूर्वी स्पष्ट केलाच आहे. स्वगुरुस्थानांत आपली महति वाढूं नये, हाच तो हेतु होय.

भक्तिशास्त्राला अनुसरून करावयाचें तें सर्व कर्तव्य श्रीगुरूंनीं गरुडेश्वर क्षेत्रांत राहून केलें. लौकिक व्यवहारशास्त्र त्यांना अवगतच नव्हतें व तें त्यांना इष्टदेखील नव्हतें. गुरुभक्तिशिवाय इतर बाबतींत ते निर्वासन असल्याचें शिफारसपत्र त्यांना त्यांच्या गुरूंनीं देऊनच ठेवलें होतें. मग ते देवस्थानासंबंधीं पंचाईत कशाला करतील ? भाद्रपदी पौर्णिमेला क्षौरविधि करून त्यांनीं यतिचातुर्मासाची सांगता केली. ते नारदेश्वरमंदिरांत जाऊन सीमोल्लंघन करून आले. दुसऱ्या दिवशीं उपासाचें पारणें केलें. तिसऱ्या दिवशीं नियमाप्रमाणें मंदिरांत बसून गुरुसमाधीची व तेथील श्रीदत्तमूर्तीची पूजा त्यांनीं केली. आपलें सर्व आन्हिक उरकलें. नंतर समाधीवरच दत्तमूर्ति स्थापून तिच्या पुढें 'शांत हो श्रीगुरुदत्ता.....' ही वासुदेवकृत करुणात्रिपदी म्हटली. त्यांच्या डोळ्यांतून तेव्हां प्रेमाश्रुधारा चालल्या होत्या. त्यांचे अंगीं अष्टसात्त्विक भाव उत्पन्न झाले होते. त्यांनीं वासुदेवानंददत्तप्रभूंना साष्टांग प्रणिपात घालून शेवटची मागणी केली कीं,

पद

[चाल : चराचरी तूं आवाहन हें काय]

वासुदेवभगवंता दत्ता विधिहरिहररूपा ।
कृपा करी मजवरी जगाच्या सदय मायबापा ॥ १ ॥
हीच माझि मागणी आपला दे मजला प्रेमा ।
ज्या योगें तवपदीं रमावा माझा जीवात्मा ॥ २ ॥

क्षेत्रिं देउळीं तुझ्या सदा मम पाय संचरावे ।
सदोदीत तव पूजन माझ्या हातांनिं करावें ॥ ३ ॥
कथासुधा तव मम जिव्हेनें सदोदीत प्यावी ।
वाहिलेलिं तुज सुमनें माझ्या नाकें हुंगावीं ॥ ४ ॥
अतिसुंदर तव मूर्ति पहावी माझ्या नयनांनीं ।
ऐकाव्या सुश्राव्य कथा तव माझ्या कानांनीं ॥ ५ ॥
तव भजकांची पायधूळ मम वहावि अंगानें ।
तवरूपीं स्थिर सदा वसावें चित्ततुरंगानें ॥ ६ ॥
तवपदकमळीं हें माझें शिर सदैव नत व्हावें ।
देहानें मग तव मूर्तीला प्रभु आलिंगावें ॥ ७ ॥
सदोदीत सर्वही प्रकारें तुज मी सेवावा ।
तुजविण मज संबंध नसावा दुजा वासुदेवा ॥ ८ ॥
गरुडेश्वरिं गुरुमंदिरिं राहुनि सद्गुरुच्या पुढती ।
शंकरगुरु नरसिंहसरस्वती मागणि ही करिती ॥ ९ ॥

श्रीवासुदेवानंदसरस्वतींनीं श्रीदत्तप्रभूंशीं जी मागणी केली, तीच नरसिंहसरस्वतींनींदेखील गुरुदेवांशीं केली व मंदिराला प्रदक्षणा करून पुन्हां नमस्कार घालून त्यांनीं गरुडेश्वरांतून प्रयाण केलें. येतांना वासुदेवमूर्ति घेऊन तिला मिरवीत दिंडीगणासह भजन करीत ते जसे तेथें आले तसेच ते तेथून जातांना भजन करीत दिंडीगणासह वासुदेवमूर्ति घेऊन निघाले. निजगुरूवर प्रेम करणारे गुरुभक्तमंडलचक्रवर्ती श्रीनृसिंहसरस्वती धन्य होत! भक्ताचे हृदयांत देव आणि देवाचे हृदयांत भक्त अखंड वसत असल्यामुळें, सद्गुरुनाथ वासुदेवासह गरुडेश्वरांत कायम राहिलेच. तद्वत् वासुदेवसुद्धां नृसिंहसरस्वतींबरोबरच असल्यामुळें, जिकडे ते जातील तिकडे गरुडेश्वरच श्रीगुरूंना होऊन

राहिलें. संपूर्ण ब्रह्माण्ड हेंच गरुडेश्वर क्षेत्र व त्यांत व्यापून राहिलेला अखंड मंडलाकार श्रीवासुदेवानंदभगवान श्रीगुरूंना सर्वत्र सुलभच होऊन राहिला होता; कारण ते नित्ययुक्त योगी होते. श्रीवासुदेवांचें अनुस्मरण ते अभेदानें करीत असत. थोडक्यांत सांगायचें म्हणजे चराचर व्यापून असलेला वासुदेव-भगवान ते स्वतःच झाले होते. वासुदेव होऊन वासुदेवाचें भजन करणारे श्रीगुरु भक्तगणांसह पायरस्त्यानें पर्यटन करीत करीत जेव्हां निघाले, तेव्हां स्त्रिया केवळ भजनच करीत होत्या. कृष्णंभटजींनीं महाराजांची वासुदेवमूर्ति घेतली होती. मध्यंतरीं शिगणापुरकरदेखील ती घेत. गोविंदराव डिग्रजकरांनीं प्रवासी सामान घेतलें होतें. अमरापुरचा काळे मास्तरांचा मुलगा त्यांना मदत करीत असे. श्रीगुरु अतिसारानें अशक्त झाले होते म्हणून त्यांना राम-चंद्र कट्टी मधून मधून उचलून घेत असत. अशा तऱ्हेनें ते महाभाग्यवान गुरुभक्त गुरुनाथांबरोबर त्यांना भजन ऐकवीत, त्यांची शुश्रुषा करीत, त्यांना त्रास पडूं नये म्हणून मध्यें मध्यें विश्रान्तीकरितां बसत बसत गरुडेश्वरा-पासून नऊ मैलांवर तिलक वाडयाला येऊन पोंचले.

तिलक वाडयांत मणिशंकर मास्तर यांनीं भक्तिपुरस्सर श्रीगुरूंना चार दिवस आपल्या घरीं ठेवून घेतलें. त्यांनीं प्रेमानें गुरुपूजा, आरती इत्यादि सर्व सेवा केली. तेथें काशीचे एक संन्यासी महाराजांचे दर्शनाला आले. त्यांनीं श्रीगुरूंनीं काशीला यावें म्हणून विनंति केली. काशीविश्वेश्वरच ते असावे. तिलक वाडयांतून महाराज नौकेंत बसून कर्नाळी नामक गांवीं आले.

कर्नाळीमध्यें सुंदर मठ आहे. त्यांत श्रीगुरुनाथांचा मुक्काम दसऱ्यापर्यंत झाला. त्यांनीं तेथें शारदा नवरात्राचा उत्सव केला. वासुदेवमूर्तीचें पूजन ते त्रिकाळ करीत. रोज सुवासिनी ब्राह्मणांना भोजन घालीत. चारी वेदांच्या संहिता त्यांनीं निरनिराळे ब्राह्मण बसवून पठण करविल्या. त्यांना नित्य सुग्रास भोजन घातलें. प्रत्येकीं ब्राह्मणांना एकेक शालजोडी, एकेक चांदीचें रामपात्र व दहा दहा रुपये दक्षणा दिली. शेवटच्या दिवशीं मंत्रजागर केला. वैदिकांना मसालेदार दूध पाजविलें. श्रीगुरुनाथ मोठे दानशूर होते. दूध प्यायला दिलेलीं चांदीचीं रामपात्रें त्यांनीं ब्राम्हणांना घरीं न्यायला सांगितलीं.

तेव्हां अनुबाई म्हणून जी मुख्य भक्तीण भक्तमंडळांत होती, ती तळमळूं लागली. तिला वाटलें, "माझ्या ट्रंकेंतला (पेटींतला) खजिना कमी झाला. आतां काय करूं ? हीं रामपात्रें महाराज ब्राम्हणांना न्या म्हणून सांगणार आहेत, असें पूर्वी मला समजतें तर मी तीं लहान बघून तरी दिली असतीं; मोठीं मोठीं दिलीं तशीं तीं दिलीं नसतीं."

महाराज आपल्यापुढें आलेले रुपये किंवा दुसरे मौल्यवान पदार्थ बहुधा अनुबाईजवळ ठेवीत व प्रसंगीं त्यांचा विनियोग तिच्याकडूनच करवीत असत. एवढ्यानेंच तिला ते पदार्थ आपलेच वाटत व ते महाराजांनींसुद्धां कोणाला तरी देऊन खर्चूं नयेत असा लोभ तिला होई. आपल्यापाशींच तें ऐश्वर्य रहावें, दुसऱ्याला न जावें असें तिला वाटे. अनसूयेच्या जागीं दुसरा कोणी असता तरी त्यालासुद्धां तसेंच वाटलें असतें. कारण तो जागेचा गुण होय. महाराजांजवळ क्रोध-लोभ-मत्सरादिक षड्रिपूंनीं ग्रस्त व षड्रिपुरहित असे कनिष्ठ व श्रेष्ठ, दोन्ही प्रकारचे लोक असत. दोघांनाही ते प्रेमानें वागवीत. दोघांचाही उद्धार झाला पाहिजे म्हणून वासुदेवाचें भजन ते त्यांच्याकडून अखंड करवून घेत. ते म्हणत, "भगवन्नामांत पापदोष दग्ध करण्याचें जेवढें प्रचंड सामर्थ्य आहे, त्याला पुरतील असे दोष म्हणजे पापें कोणी करूंच शकत नाहींत." या म्हणण्याचा अभिप्राय असा कीं, कितीही दोषी, कितीही हीन जरी जीव असले तरी त्यांना आम्ही जवळ घेऊं व त्यांचा इतरांकडून होत नसलेला उद्धार आम्ही करूं. या भावार्थानुसार त्यांचे उद्गारदेखील केव्हां केव्हां लोकांनीं ऐकलेले आहेत. श्रीगुरु म्हणत, " सर्वांनीं टाकलेले असे लोकच आम्ही जवळ घेतों. " या त्यांच्या उद्गारांवरून केवढें मोठें पतितोद्धारसामर्थ्य आपल्यापाशीं आहे, याची सूचनाच त्यांनीं दिली म्हटलें तरी शोभेल. त्या आपल्या सर्वोत्तम प्रभावानें त्यांनीं जवळ राहिलेल्या दोषी लोकांचासुद्धां सज्जनांबरोबर उद्धार केला. सर्वांनाच भगवद्भक्त त्यांनीं बनविलें. याच्यापेक्षां दयाळुपणा त्यांनीं आणखी किती प्रगट करावा ! !

श्रीगुरु कृपाळू तर खरेच; पण एकदां भक्तांचा महिमा वाढविण्यासाठीं त्यांची निष्ठा तपासण्याकरितां धौम्यरूपीप्रमाणें जीवावरची गुरुसेवादेखील

त्यांनीं त्यांना सांगितली होती. अत्यंतच जीवावरची जरी ती नसली तरीपण भक्तांना अवघड वाटण्याइतकी ती दुष्कर होती. तीच गोष्ट आतां पुढें सांगतों. नवरात्रांत कर्नाळीमध्यें एक दिवस श्रीगुरूंनीं ग्रामभोजन घातलें. त्या दिवशीं सकाळीं आरंभाला स्वयंपाक कसला करावयाचा याची वाटाघाट त्यांनीं केली. त्यावेळीं त्यांना बाया म्हणाल्या कीं, " महाराज पावसानें सर्व लांकडें भिजलीं आहेत. करितां सोपारें पक्वान्न करायचें ठरवा. " महाराज म्हणाले, " कांहीं झालें तरी आज श्रीगुरुवासुदेवानंदमहाराजांना पुरणपोळ्यांचा नैवेद्यच झाला पाहिजे व तोच प्रसाद गांवाला यथेष्ट मिळाला पाहिजे. " श्रीगुरूंनीं पुरणपोळीचा बेत निश्चित केला तेव्हां रंगूबाई जोशी व यमूताई जोशी ह्या स्वयंपाक करणाऱ्या भक्तिणी अतिशय कष्टी झाल्या. मूळच्या त्या आधीं अशक्त, त्यांत लांकडें ओलीं व गांवाला पुरेशा पोळ्या तर झाल्या पाहिजेत. त्या होणार कशा, असा विचार मनांत येतांच त्यांचे हातपाय लटपटले.

तेव्हां महाराज त्यांना म्हणाले, " तुम्हांला स्वयंपाक होत नसेल तर आम्ही तो पूर्ण करूं " हें ऐकून त्या बायांनीं उत्साहानें स्वयंपाक सुरू केला. डाळी शिजत घातल्या व दीड वाजेपर्यंत आमटी व भात तयार केला. पोळ्यांना अजून प्रारंभच केला नव्हता.

इतक्यांत कोणी एकानें त्यांना म्हटलें कीं, " जेवणारे लोक आले तरी पोळीला तुम्ही सुरुवात केली नाहींत ? मग कशाला अंगावर घेऊन एवढा मोठा स्वयंपाक प्रारंभलात ? " जणूं काय ह्या बाया म्हणजे अगदीं यःकश्चित मोलकरणीच आहेत, अशा भावानें तो असें त्यांना बोलला. त्यासरशीं त्या रुसल्या व महाराजांकडे जाऊन त्यांना म्हणाल्या कीं, " आम्ही बुद्धिपूर्वक हें कार्य पुरें करूंच करूं, असें प्रतिज्ञोत्तर बोलून का स्वयंपाकाला लागलों आहों ? आपली इच्छा मोडूं नये म्हणून प्रारंभ केला. हातून झाला तेवढा पाक तयार केला. असें असून हे दत्तूशास्त्री लाटकर आम्हांला का बरें रागें भरतात ? " याप्रमाणें बायांनीं गुरूंना गाऱ्हाणें सांगितलें व त्यांच्याजवळ डोळे पुशीत त्या बसल्या.

श्रीगुरुनाथ समजले. यांची ताकद संपली, असें ते मनांत म्हणाले. ते कृपाळुता दाखवीतच पण थट्टेखातर भक्तिणींना म्हणाले कीं, " दत्तूशास्त्री काय खोटें म्हणाले काय ? तुम्हीं कां एवढा स्वयंपाक अंगावर घेतलात ? " बाया म्हणाल्या, " महाराज, आपणदेखील तसेंच कसे बोलतां ? आपण 'आम्ही स्वयंपाक करतों म्हणालांत ' म्हणून आम्ही त्याला हात घातला. तसें न करूं तर काय तुम्हांलाच करायला लावूं ? आमचें तें शील नव्हे. " श्रीगुरु म्हणाले, " बरें तर, आम्ही करतों म्हणालों होतों ना ? चला तर, कशा पोळ्या होत नाहींत त्या आपण पाहूं. " असें म्हणून श्रीगुरु दत्तुशास्त्र्यांना रागें भरले व आपल्या शरणागतांचा पक्ष धरून त्यांना घेऊन स्वयंपाकाच्या चरीपाशीं स्वतः गेले. " ठेवा तवे, आम्ही येथेंच राहतों, कशा पोळ्या होत नाहींत त्या पाहतों " असें म्हणाले. श्रीगुरूंनीं लगेच रंगू, यमूकरबीं दोन पुरणाच्या पोळ्या करवून प्रथम त्यांनीं त्यांचा आपल्या वासुदेवमूर्तीला नैवेद्य दाखविला व प्रार्थना केली कीं, " हे गुरुसमर्था, आपल्या मुली गांवाला पोळ्या पुरवूं म्हणतात, त्यांचा हेतु आपण पुरवा. " अशी प्रार्थना श्रीगुरूंनीं वासुदेवप्रभूंना केली व दत्तुशास्त्र्यांना म्हणाले कीं, " शास्त्रीबुवा ठेवा पानें; घ्या वाढायला. झाल्या पोळ्या तयार " असें म्हणतांच पात्रें ठेवलीं. शेंकडो लोक भोजनाला बसले. त्यांना वरणभात वगैरे वाढून झाला. ' श्रीगुरुदेवदत्त ' म्हणून सर्व गांव जेवूं लागला. त्यांचा मधला भात संपे-पर्यंत या भक्तिणींनीं दहापंधरा पोळ्या तयार केल्या. महाराजांच्या परवानगीनें झालेल्या पोळ्यांतून ताट भरून भरून नेऊन दत्तूशास्त्री वगैरे अनेक भक्त आग्रह करून सर्वांना पोळ्या वाढूं लागले. त्यांच्या मनांत बायांची फजिती करावी असें आलें. ' आपली कागाळी ज्यांनीं महाराजांना सांगितली त्यांची मी फजिती उडवीन; पोळ्या पुरत नाहींत असें त्यांना मी म्हणेन " अशा हेतूनें शास्त्रीबुवा भरारा ताटें भरून नेऊन एकेकाचे पानांत पोळ्या ढकलीतच सुटले. धर्मराजाचे यज्ञांत दक्षणा देणाऱ्या दुर्योधनाची वृत्ति त्यांनीं स्वीकारली. पण भक्तांची परीक्षा घेऊन मगच सद्गुरुनाथांनीं त्यांचा कैवार घेतला होता. त्यांना आपल्या निष्ठावंत सेवकांचा अभिमान होताच. त्यांची अब्रू सांभाळणें हें त्यांचें ब्रीद होतें. शिवाय आपलें वाक्य ' आम्ही

स्वयंपाक करूं ' हेंदेखील त्यांना सत्य करावयाचें होतें. ते भक्तवत्सल भक्ताभिमानी श्रीनृसिंहसरस्वतीभगवान दत्तशास्त्र्यांच्या इच्छेप्रमाणें पोळ्यांची तूट कशी पडूं देतील ? आपल्या अद्भुत ईश्वरी सामर्थ्यानें त्यांनीं सबंध गांवाला त्याच पोळ्या म्हणजे ज्या कांहीं दोघीजणींनीं पंधरासोळा पोळ्या तयार केल्या होत्या त्या, व वरचेवर त्या ज्या एकदोन एकदोन सावकाश करीत होत्या त्या, तेवढ्याच पोळ्या पुरविल्या असें त्यांनीं आश्चर्य करून दाखविलें. पोळ्या कांहीं संपल्या नाहींत. पण जेवणारांच्या उदरांतल्या जागा मात्र भरून गेल्या, रिकाम्या उरल्या नाहींत. तेव्हां शास्त्रीबोवाच 'आतां पोळ्या पुरेत ' असें म्हणत त्या बायांजवळ गेले व आपणच खजिल झाले.

जमलेल्या शेंकडो लोकांना पोळ्या पुरल्या हें वाक्य ऐकतांच भक्तिणींना कृतार्थता वाटली व मोठें आश्चर्यदेखील वाटलें. " ही गोष्ट झाली कशी ? एवढ्या मोठ्या समाजाला आम्ही करीत असलेल्या दोनदोन पोळ्या कशा पुरल्या ? " असें त्या म्हणाल्या. गुरुमहाराज आम्हांवर प्रसन्न झाले. त्यांनीं म्हटल्याप्रमाणेंच आम्हांला निमित्तमात्र करून आपणच पोळ्या केल्या यांत मुळींच संशय नाहीं. असें म्हणून त्या महाराजांपाशीं गेल्या व त्यांचे पायांवर प्रेमानें मस्तकें ठेवून म्हणाल्या कीं—

पद

(' अगर है मोक्षकू पाना ' ; ' आमचा एक तो वाली ')

निजजनोद्धार करण्याला । प्रभो ही आपली लीला ॥ध्रु०॥

प्रगटलां या धरेवरती । स्वामि नरसिंहसरस्वती ।
धरोनी मनुजवेषाला । प्रभो० ॥१॥

असोनी ब्रह्मपरिपूर्ण । करितसां सद्गुरूभजन ।
पूजितां बासुदेवाला । प्रभो० ॥२॥

सवें घेवोनियां दिंडी । फिरतसां ह्या भरतखंडीं ।
करवितां नामघोषाला । प्रभो० ॥३॥
करोनी मीष यात्रेचें । हरीतां पाप तीर्थांचें ।
धनवितां भूमि, हे, विमला । प्रभो०॥४॥
भजक संतोषणाकरितां । अजबही गोष्ट ती करितां ।
पुरवितां दीनकामाला । प्रभो० ॥५॥
रिकामी गाईची कांस । पिळोनी दूध भजकांस ।
तुम्ही दिल्हेंत प्यायाला । प्रभो० ॥६॥
नवल केलेंत हुप्रीला । रिकामा जो डबा पहिला ।
भरोनी खारिका आला । प्रभो० ॥७॥
मांजरी आणि कर्नाळी । अशा आणीकही स्थळीं ।
मिळाली वाढ अन्नाला । प्रभो० ॥८॥
मतीनें मंद ते ज्ञानी । जहाले वांझ संतांनीं ।
मृतांना जीव तो आला । प्रभो० ॥९॥
शरण जो शंकरस्वामी । सदोदित रंगला नामीं ।
गुरूचा भाट तो झाला । प्रभो० ॥१०॥

अशी त्या भक्तिणींनीं श्रीगुरूंची स्तुति केली. या चरित्रांत श्रीगुरूंनीं शिष्यांची परीक्षा घेतली, व ते निष्ठावंत आहेत असें ठरवून, त्यांना त्यांच्या अंगीकृत कार्यांत स्वशक्तीनें यश संपादून दिलें, त्यांचा महिमा वाढविला. श्रीगुरु स्वत बायांना म्हणाले कीं, " तुम्ही अशक्त असूनदेखील ब्राह्मण जेवायला बसल्या वर त्यांना शेंकडो जणांना पुरणपोळ्या तयार करून पुरविल्यात. तुमची धन आहे! " असें म्हणून श्रीगुरूंनीं भक्तांचें कौतुक केलें, व आपला निरभिमानीपण व भक्ताभिमानीपणा व्यक्त केला. हें श्रीगुरुनाथांचें धौम्य चरित्र अतिश

मनोहर होय. या चरित्रांत रंगू व गंगू या दोन भक्तिणींवर श्रीगुरूंनी पूर्ण कृपा केली व त्यांना देवदुर्लभ अशें निजप्रेम अर्पण केलें. या भक्तिणी धन्य होत कीं ज्यांनीं तुच्छकर अशी गुरुसेवा केवळ निष्ठावंत भावानें स्वीकारली व गुरुरायाला आपलासा करून घेतला ! !

कर्नाळींत एका गरीब भक्ताची इच्छा पूर्ण करण्यासाठीं श्रीगुरु भक्तगणांसह त्याचे घरीं भोजनाला गेले. श्रीगुरुपूजा करून त्या भक्तानें घरांत, अंगणांत, झाडाखालीं व शेजारच्या देवळांतदेखील पात्रें मांडलीं होतीं. घर फार लहान म्हणून त्या त्या ठिकाणीं त्यानें सर्व भक्तांना व घरांत गुरुमहाराजांना बसविलें. आदरानें सर्वांना पक्वान्नाचें भोजन वाढलें. त्याचें प्रेम पाहून श्रीगुरु संतुष्ट झाले व ' पुत्र-पशु-क्षेत्र-धनधान्य संपन्न तूं हो, ' असा आशीर्वाद व नारळ त्याला त्यांनीं प्रसाद दिला. श्रीगुरु रायारंकीं समान प्रेम करीत असत.

कर्नाळीमध्यें श्रीगुरूंना उमरेडच्या दादासाहेब नाइकांनीं विनंतिपत्र पाठविलें कीं, " आपण मला निजसहवास द्यावा. मी शिष्य आहें. मला बोधामृत पाजून धन्य करावा. आज्ञा झाल्यास सन्निध येतों. " या पत्रावर श्रींनीं उत्तर दिलें कीं, " येथें तुम्हीं येऊं नये. जिज्ञासूवृत्तीनें श्रीगुरुचिंतन करीत रहा. ईश्वरेच्छेनें आपलें येणें तिकडे लवकरच होईल तेव्हां तुमची इच्छा पुरविली जाईल. " याप्रमाणें दादासाहेबांना श्रींनीं उत्तर पाठविलें. ते कुबेर घाटावर एक दिवस स्नान करून आले. गांवांतील मुख्य मुख्य देवांचीं पूजनें त्यांनीं केलीं. मठाचा फोटो घेतला. अमरापुरीं असा मठ असावा असें म्हणाले व चांदोदला स्वारी आली.

चांदोद येथें एक सिद्धमहात्मे श्रीगुरुभेटीला आले. त्यांनीं श्रीगुरुनाथांची स्तुति भगवद्गीतेंतील स्थितप्रज्ञ पुरुषाचें वर्णन करणाऱ्या श्लोकानें केली. ते म्हणाले—

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ॥
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ १ ॥

अर्थ—जी निशा सर्व भूतांची तेथें संयमि जागतो ॥ ती निशा ज्ञानि-मुनिची जेथें हा लोक जागतो ॥ १ ॥ अमें महाराजांचें स्तवन त्या महा-त्म्यानीं केलें. तेव्हां " आपली (तुमची) अशी स्थिति आहे " असें श्रीगुरु त्यांना म्हणाले. दोघांनींही परस्परांवर प्रेम केलें. रेवा-ओवर-संगम प्रयागाप्रमाणें आहे. त्यांत श्रींनीं दोन दिवस स्नान केलें.

चांदोद येथें सिद्धमाहात्म्यानें श्रीगुरूंची ब्राम्ही स्थिति ओळखली म्हणून त्यानें त्यांची यथार्थ स्तुति केली; तशी आम्हांला करतां येणें शक्य नाहीं. कारण आमची योग्यता त्या महात्म्याप्रमाणें नाहीं. म्हणून श्रीगुरुनाथांचें सगुणाचरण तेवढेंच आम्ही थोडेंसें वर्णन करितों. तेंसुद्धां अनंत व अगम्यच असल्यामुळें संपूर्ण वर्णन करणें शक्य नाहीं. तथापि स्वात्मशुद्धचर्थ जसें साधेल तसें वर्णन करणें, यांत कांहीं अन्याय होत नसल्यामुळें, वेडेवांकडें कसें तरी तें आम्ही वर्णित आहों. चुकले मुकले मुलाचे शब्द जननीला गोडच वाटतात. तरी माझे बालिश बोलसुद्धां गुरुमातेला आवडतील असा मला तिचा पूर्ण भरंवसा आहे. आपलें कृपास्तन्यामृत ती मला पाजीत आहे म्हणून मी बोबले तरी शब्द बोलूं शकत आहें. जिवेळ्या काष्ठाप्रमाणें निर्बुद्ध अशा मला समर्थ सद्गुरुमाय वाक्पल्लव फोडीत आहे. तिच्या चरणीं माझे अखंड अनंत प्रणाम असोत. तिचा मी जयघोष करतों. ' श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमन्नरसिंहसरस्वतीस्वामी महाराजकी जयहो, जयहो, जयहो !!

श्रीगुरुनाथांनीं पूर्वी जसा कृष्णानदींतून जलप्रवास केला तसा नर्मदा-नदींतूनदेखील तो केला. शंभर रुपये देऊन एका मोठ्या नावेंतून ते भक्त-गणांसह शुकाचार्य व व्यास यांचीं स्थानें पाहून अनसूयेच्या आश्रमाला गेले. श्रीदत्तप्रभूंची ती माताच होय. महाराजांनीं तिची पूजा, स्तुति वगैरे प्रेमानें केली. तों अकस्मात् नर्मदेला मोठा पूर आला. जणूं काय स्वपुत्राचें प्रेमच अनसूयामातेला ते पूररूपानें आलें. मातेला प्रेम आलें तसें पुत्रालादेखील आपल्या अनुमातेचें प्रेम आलें. अनसूया हीच श्रीगुरूंची मूळ माता होय. भोजनकाळीं तिच्यावर ते प्रेमानें रुसलेसुद्धां व तूं आधीं जेवल्याशिवाय मी जेवतच नाहीं म्हणून बसले. असा त्यांनीं हट्ट केला. ही बाललीलाच त्यांनीं

केली व आपल्यापुढची भिक्षा अनुमातेला तिच्या प्रेमाच्या पुरांत म्हणजे नर्मदाजळांत त्यांनीं अर्पण केली. " महाराजांची भक्तीण अनसूयाबाई त्या दिवशीं गुरुमहाराजांच्या इच्छेविरुद्ध वागली होती. तिच्यावर रुसून तिला शासन न करतां महाराज लहान मुलाप्रमाणें आपणच आपली भिक्षा नर्मदेंत सोडून देते झाले. या त्यांच्या कृतीचा अर्थ वर लिहिल्याप्रमाणें आम्ही समजलों " असें मूळ गुरुचरित्रकार श्री गोविंदराव डिग्रजकर (गोविंदगुरु) यांनीं म्हटलें आहे, तें यथार्थच आहे. श्रीगुरु दत्तच असल्यामुळें बालोन्मत्त-पिशाचवृत्ति धरीत असत. वाडीमध्यें उन्मत्त पिशाचवृत्ति त्यांनीं धरलीच होती तशी अनसूया मातेपुढें त्यांनीं बालवृत्ति धरली. असो. गोविंदगुरूंनीं लिहिलेल्या मूळ प्रतीवरूनच आम्ही हें चरित्र लिहीत आहों. आम्हांला आधार त्या मूळ गुरुचरित्राचाच आहे. गोविंदगुरूंचे आम्हांवर फार उपकार आहेत.

अनसूयास्थानांतून श्रीगुरु सिनोरला गेले. कांहीं दिवस तेथें राहिले. गणपती व मार्कंडेश्वर या देवांचें पूजन करून तेथून ' कबीरवडा ' मध्यें चक्रतीर्थांत स्नान करून भडोचला निघाले.

कबीरवडांतून रात्रीं नाव सुटली. मार्गेसुद्धां बहुतेक प्रवास रात्रींच झाला. रात्रीची वेळ असल्यामुळें सर्व भक्तांसह नावाडीसुद्धां झोपीं गेले. श्रीगुरु समाधिसुखांत निमग्न होते, अशा वेळीं तीरातीरानें प्रवाहाच्या वेगानें चाललेल्या नौकेंत चोरांनीं प्रवेश केला. चोरांचें निवारण त्या वेळीं कोणी करावें ? गुरुमहाराज समाधींतून जरी जागे झाले असते तरीदेखील चोरांना त्यांनीं मुळींच भय दाखविलें नसतें, अभयच राखलें असतें. त्यांची भूतदया तशीच होती. गृहस्थाश्रमांत ते होते तेव्हां त्यांच्या घरांत चोर शिरला होता. त्याला ते पहात असूनसुद्धां त्यावेळीं त्यांनीं गवगवा केला नाहीं व चोर अकिंचनाचे घरांतून निष्फळच परत गेला म्हणून ते हळहळले, ही गोष्ट पूर्वी येऊन गेलीच आहे. साधकदशेंत जे इतके दयाळू होते, ते सिद्धांचे राजे संन्यासी वरिष्ठ श्रीगुरु यावेळीं चोरांना कशाचें भय दाखविणार ! व कशाचा कोणाला उठविण्याचा तरी प्रयत्न करणार ! गर्भगोलाप्रमाणें श्रीगुरुवासुदेव-

पदीं जे अनन्य झाले होते, ते आपले आवडते भक्त देहभान सोडून सर्वथैव व्यापारशून्य झालेले पाहून भगवान श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वस्थ कसे बसतील ? अनन्याचे योगक्षेमाची चिंता त्यांनाच असल्यामुळें रामचंद्रप्रभूंनीं ज्याप्रमाणें तुळशीदासाचे घरीं आलेल्या चोरांचें निवारण केलें, त्याप्रमाणें नृसिंहसरस्वतींच्या नावेंत आलेल्या चोरांचें निवारण वासुदेवानंदप्रभूंनीं केलें. नर्मदाशंकर नांवाचा एक गुजराथी भक्त नावेंत होता. त्याला त्यांनीं जागा केला. ' ऊठ, ऊठ; चोर आले ' असें त्याला त्यांनीं ज्ञान दिलें. त्याबरोबर तो उठला व ' चोर चोर ' म्हणून ओरडला. त्यासरशीं चोर घाबरले व पळून गेले. इतक्यांत भक्तगण जागे झाले. सर्व वस्तु सुरक्षित आहेत, असें त्यांनीं पाहिलें, व " महाराजांचे कृपेनें आमचे वस्तूची चोरी झाली नाहीं, आमचें त्यांनीं रक्षण केलें, " असें म्हणून ते गुरुमहाराजांचेविषयीं अधिक प्रेमवंत झाले.

मागें एकदां असेच गुरु फलटणमधून नीरा नदीवर ग्रहणस्नानाला गेले होते. तेव्हां कुत्र्यानें चांदीचा दुधाचा तांब्या पळविला व तो लांब दृष्टिआड नेला. तेव्हां शिंगणापुरकरांनीं सद्गुरुनाथांचें स्मरण करीत करीत अंधाऱ्या रात्रीं पीक आलेल्या शेतांत जाऊन तो हुडकला. महाराजांचे कृपेनें ते नेमके तांब्या होता तेथेंच ओढल्यासारखे होऊन गेले. तांब्या सांपडला. असे अनेक अनिष्ट प्रसंग श्रीगुरूंच्या कृपेनें दूर झाले. तसाच हा नौकेंत तस्कर शिरलेला अनिष्ट प्रसंग श्रीगुरूंनीं स्वसन्निधानमात्रानें अनहितकारक होऊं दिला नाहीं.

सूर्योदयाला श्रीगुरुमहाराजांची स्वारी भृगुक्षेत्राला (भडोचला) जाऊन पोंचली. सर्व साहित्य घेऊन भक्तगण व महाराज उतरले. घाटावर प्रातः-स्नान करीत श्रीगुरु नर्मदेमध्यें उभे होते. त्यांचें दंडस्नान चालू होतें. त्यांच्या-बरोबर भक्तदेखील स्नानें करीत होते. त्यांत सदाशिवराव परचुरे मास्तर हेही होते. इतक्यांत त्या ठिकाणीं " वासुदेवानंदसरस्वतीकी जय " असें म्हणून एक गुजराथी भक्त स्नान करूं लागले. हे वासुदेवानंदसरस्वतींचेच भक्त आहेत असें त्यांच्या शब्दावरून ओळखून परचुरे मास्तर गुजराथी भाषेंत त्यांना म्हणाले कीं, " तुम्हीं ज्यांचा जयजयकार केलात त्या वासु-

देवानंदसरस्वतींचे पट्टशिष्य श्रीनृसिंहसरस्वती हे येथें स्नान करीत आहेत." असें म्हणतांना त्यांना मोठा आनंद झाला. मास्तरांना ते म्हणाले, "तुम्ही सांगितल्यानें मला यांचा बोध झाला. नाहींतर कोणीतरी एक संन्यासी महात्मे आहेत असें म्हणूनच मी जाणार होतों."

पहा कसा चमत्कार आहे तो! नरसिंहसरस्वती हे टेंब्येमहाराजांचे शिष्य आहेत ही गोष्ट त्या गृहस्थांना माहित होती. असें असतां ते डोळ्यांपुढें प्रत्यक्ष दिसत असूनसुद्धां त्यांचें ज्ञान त्यांना झालें नाहीं. तें मास्तरांनीं करून दिलें तेव्हां तें झालें. यावरून स्वयंप्रकाशित आत्मा असला तरीसुद्धां त्याचा साक्षात्कार सद्गुरुवांचून होत नाहीं असें सांगणाऱ्या वेदाचें भाषण अक्षरशः त्रिवार सत्य आहे असें कोणालाही पटल्याशिवाय राहणार नाहीं. गुजराथी भक्त घाटावर थांबले. महाराज जळांतून वर येतांक्षणीं त्यांनीं त्यांचे चरणारविंदीं भक्तिभावानें मस्तक ठेवलें व म्हणाले कीं, "श्रीगुरु-वासुदेवानंदसरस्वतींच्या मुखानें मी आपली ख्याति ऐकिली होती. वाडीमध्यें आपण एक मूर्ति स्थापून ठेवली आहे. ते पूर्ण स्थितीला पोंचलेले आहेत. इ. आपला गौरव त्यांनीं आम्हां सर्वांपुढें केला होता. ते आपण आज माझ्या भाग्यानें येथें आलां व मला मास्तरांच्या कृपेनें हा आपला लाभ झाला. आपण वासुदेवानंदांच्या मठांत चलावें." असें म्हणून त्या सद्गृहस्थांनीं महाराजांना गांडाबुवा ब्रह्मचाऱ्यांनीं बांधलेल्या 'वासुदेव गुरुभुवनां'त नेलें. आपल्या भक्तगणांसहवर्तमान श्रीगुरु वासुदेवमंदिरांत जाऊन राहिले.

मठांत श्रीगुरु स्वस्थ वसल्यानंतर त्या भक्तोत्तमानें नजराणा अर्पण करून श्रीगुरुहस्तें प्रसाद घेतला. त्यांचे मुखांतून आशीर्वाद ग्रहण केला. त्यांच्या कृपादृष्टीचा अनुभव घेतला. तेव्हां त्यांचे मुखानें असे उद्गार निघाले कीं, श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीचें व आपलें (नृसिंहसरस्वतीचें) अत्यंत ऐक्य माझे अनुभवाला आलें. दोघांचें कृपामय अवलोकन व प्रसादमय भाषणही समान आलें. दोघांही श्रीगुरुमूर्तींच्या दर्शनानें मला समान समाधान झालें.

वासुदेवानंदांचे पट्टशिष्य आल्याची बातमी क्षणांत चोहींकडे पसरली. भक्त लोक दर्शनाला येऊं लागले. महाराजांना रोज मठांत पुडी होऊं लागली,

रोज समाराधना, गुरुपूजा, नवीं नवीं पक्वानें होत राहिलीं. महाराजांचे भक्तांबरोबर गुरुपंगतीचा प्रसादलाभ घ्यायला तेथले पुष्कळ भक्त येत असत. गुरुमुखानें पुष्कळांनीं मंत्रोपदेश घेतले. 'वेदान्ततत्त्वज्ञान श्रवण करवा' म्हणून पुष्कळजणांनीं श्रींना विनंति केली. तेव्हां जिज्ञासूंच्या समाधानार्थ सद्गुरुराजांनीं त्यांना बोध केला. त्याचें सार असें—श्रीगुरु म्हणाले कीं, "वेदान्तशास्त्रांत ब्रह्म हें सत्यतत्त्व सांगितलें आहे. तें तुम्हीच आहां असें वेद जिज्ञासूंना म्हणतो व सच्चिदानंद असें ब्रह्मलक्षण सांगून देतो. तें लक्षण तुम्ही आपल्यामध्यें ओळखून घ्या. तें असें—तुम्ही आपण आहों असें म्हणतां म्हणून 'सत्', सर्व वस्तू जाणतां म्हणून 'चित्' व सुषुप्तींत विषयेंद्रियांवांचून आनंदित राहतां म्हणून 'आनंद.' असे तुम्ही सच्चिदानंद या लक्षणाचे आहां अर्थात् ब्रह्मच आहां. विचार करून हा बोध दृढ करून ठेवा म्हणजे झालें. विचारपूर्वक बोधोत्पत्ति होण्याला सद्गुरुकृपेची आवश्यकता आहे. करितां दयाघन श्रीगुरुवासुदेवानंदसरस्वती यांचें प्रेमपुरस्सर भजन चालू ठेवा म्हणजे ते तुम्हांवर पूर्ण कृपा करतील. आम्ही सांगितलेला विचार गुरुभक्ताला फलद्रूप होईल." इत्यादि प्रकारें श्रीगुरुनाथांनीं त्या भाविकांना उपदेश केला.

गांडावुवा ब्रह्मचाऱ्याचे मेहुणे मणिभाई यांनीं महाराजांना आपल्या घरीं नेलें. तेथें त्यांची पूजा, आरती केली, फराळ दिला व श्रीगुरुवासुदेवानंदांचे हातून मिळालेली छाटी व नारळीपात्र या दोन वस्तू त्यांनीं गुरूंना दाखविल्या. आपल्या गुरुकरस्थित वस्तू पाहून श्रीगुरूंना प्रेमोर्मी आली. त्यांचें हृदय द्रवलें व नेत्रद्वय स्रवलें, अशी त्यांची अवस्था झाली.

दत्तूशास्त्री लाटकर यांना श्रींनीं गुरुद्वादशीसाठीं नृसिंहवाडीला पाठविलें. दरसालचा आपला नेम चुकवूं नये असें ते त्यांना म्हणाले. शिंगणापुरकर रामभाऊंनादेखील महाराजांनीं घरीं जायला सांगितलें. दोन भक्त स्वारींतून येथून गेले तों वामनराव इंगळीकर येऊन दाखल झाले. ते महाराजांबरोबर परमार्थश्रवणार्थ रहावें म्हणून मुद्दाम गेले होते.

गुरुद्वादशीचा उत्सव श्रीगुरूंनीं भडोच येथें वासुदेवानंदांचे मठांत केला. तेव्हां वासुदेवमूर्तीची पूजा मोठ्या थाटानें ते करीत असत. महाराजांचे पूजेचा थाट प्रसिद्धच आहे. मुख्य अर्चनभक्तीच त्यांची होती. ती पाहून तद्देशियांना मोठें समाधान होई. उत्सवांत भजन, ब्राह्मणभोजन रोज होत असे. द्वादशीला मुक्तद्वार भंडारा झाला. श्रीगुरूंनीं आपला भक्तीचा झेंडा तेथें फडकविला. दिगंबराचें भजन भक्तगण अहोरात्र करीत असत. आनंदी-आनंद झाला. भडोच नगर दुमदुमून गेलें. जशी गरुडेश्वरयात्रा तशी श्रीगुरूंची नर्मदातटाकयात्रादेखील येथें पुरी झाली. तेव्हां आपण आणलेले भक्तगण दक्षिणेंत परत पाठवून उत्तरभागांतच आतां रहावें, परत दक्षिणेंत जाऊं नये, असा विचार श्रीगुरूंनीं केला. वामनराव इंगळीकरांना ते म्हणाले कीं, " तुम्ही या स्त्रीपुरुष भक्तगणाला त्यांच्या देशीं नेऊन पोंचवा. म्हणजे आम्हांला परत तिकडे येण्याचें कारण नाहीं. " वामनराव कांहीं न बोलतां स्वस्थ राहिले. त्यांनीं भक्तगणाला ही गुरुभाषा सांगितली. तेव्हां ते भक्त घाबरले. गुरुमाउली आपला अव्हेर कां बरें करते, असें त्यांना वाटलें. " आम्ही श्रीगुरु सोडून तुम्हांबरोबर येणार नाहीं. आम्हांला गुरुविरह सोसवणार नाहीं. जिकडे महाराज जातील तिकडे आम्ही जाऊं. " याप्रमाणें भक्तांचीं मनें ओळखून महाराजांपुढें येऊन वामनराव म्हणाले कीं, " आपण भक्तांची माउली आहां. त्यांना तुम्हांवांचून गमत नाहीं. ते मातेला सोडून मजबरोबर यायला तयार नाहींत. करितां भगवंतांनीं जसें येथपर्यंत त्यांना सांभाळून आणलें तसें त्यांना त्यांच्या मूळ ठिकाणीं आपणच पोंचतें करावें; मजसंगें धाडूं नये. आपण इकडे राहण्याचा बेत करूं नका. अमरापुरांत येऊन रहा, ही आमची सर्वांची प्रार्थना आहे " असें म्हणून सर्व भक्तगण व वामनराव यांनीं श्रीगुरूंपुढें प्रेमाश्रु व शोकाश्रु गाळले. सर्वांनीं साष्टांग नमस्कार घातले. तेव्हां भक्तवत्सल नृसिंहसरस्वती फारच द्रवले. त्यांना भक्तशोक पाहवेना. बरें तर ! आम्हींच तुम्हांला कृष्णा-तीरीं नेऊन सोडतों असें त्यांनीं त्यांना अभिवचन दिलें. तेव्हां भक्तांना जो आनंद झाला तो अवर्णनीय होय. येथून कृष्णातीरीं अमरापुरीं येण्याचें ठरलें व महाराज भक्तांना घेऊन भडोच सोडून निघाले. तेव्हां त्यांना स्टेशनवर

पोंचवायला भडोचकर भक्तांचा मोठा समाज आला होता. सर्वांचीं वंदनें घेऊन व त्यांना आशीर्वाद प्रसाद देऊन श्रीगुरु दिंडी घेऊन अग्निरथानें थेट मुंबईला आले.

प्रकरण १७ वें

फलटण मुक्कामीं श्रीगुरुनाथांची सेवा भडकमकर नांवाच्या प्रसिद्ध इंग्रजी वैद्यांनीं केली होती. त्यावेळीं त्यांनीं श्रींना प्रार्थनादेखील केली होती कीं, " सद्गुरुवर्यांनीं मुंबईला आल्यावर माझे घरीं आपला मुक्काम ठेवावा, व ह्या दासाला कृतार्थ करावा. " ह्या त्यांच्या प्रार्थनेला मान देऊन ' होय ' म्हटल्याप्रमाणें मुंबईंत येतांच श्रीगुरु भडकमकरांकडेच उतरले. डॉक्टर इंग्रजी शिकलेले असूनसुद्धां आर्यसंस्कृतीला आदरानें धरून राहिले होते. मग श्रीगुरुनाथ त्यांचेवर कां प्रसन्न होणार नाहींत ? भडकमकरांची पुण्याई मोठी म्हणून गुरुभगवान् त्यांचे घरीं गेले. तेव्हां आनंदित झालेल्या त्या वैद्यांनीं स्वागतपर भाषण केलें. ते म्हणाले, " योगी, मुनी, ऋषी व देव यांनासुद्धां दुर्लभ असणारे योगींद्रचूडामणि भगवान नृसिंहसरस्वती सदय होऊन मज दीनाचे सदनीं आले. तेणेंकरून मी आपल्या पूर्वजांसहित धन्य झालों." असें म्हणून सहकुटुंब सहपरिवारें डॉक्टरसाहेब श्रीगुरुचरणाला साष्टांग नमस्कार घालते झाले. दिवाळीचे चार दिवस त्यांना गुरुसेवा करण्याची सुसंधि मिळाली. आपल्या मातोश्रीसह ती त्यांनीं साधली. नानाविध उपचार अर्पण करून वैद्यराजांनीं श्रीगुरुनाथांची रोज पूजा केली. तो उत्सव-समारंभ चाललेला पाहून मुंबापुरीवासी लोकांना मोठें कौतुक वाटलें. तेसुद्धां श्रीगुरुदर्शनाला येऊं लागले.

भडकमकरांची भक्ति पाहून श्रीगुरु त्यांचेवर सुप्रसन्न झाले. भवरोगविनाशक असा आपला कृपाप्रसाद त्यांनीं त्यांना दिला. अज्ञान, पाप, ताप, जन्म, कर्म इत्यादि संसार नष्ट करणारें श्रीगुरुचरणोदक प्राशन करून डॉक्टर व

इतर लोकसुद्धां मुक्त झाले. संसाररोग नष्ट करणारे श्रीगुरु हेच खरे वैद्यराज होत. भवरोग–वैद्य असें त्यांना ग्रंथांतरीं म्हटलेलेंच आहे. नवविधाभक्तीच्या अनुपानांतून श्रीगुरु वैद्येश्वर आपली कृपारूपी गुटिका सर्व जनतेला पाजीतच सर्वत्र संचार करीत होते. मुंबावासी भक्त गुरुदर्शनानें व त्यांचे हातच्या प्रसादानें संसारसागरांतून तरून गेले. अंतःकरणांत एक भक्ति मात्र पाहिजे. ती असली म्हणजे कोणत्याही काळीं, कोणत्याही ठिकाणीं, कोणालाही परमात्मा लाभतोच लाभतो यांत संशय नाहीं. म्हणूनच मुंबईसारख्या शहरांत डॉक्टरांसारख्यांनासुद्धां श्रीनृसिंहसरस्वतींचा अपूर्व लाभ झाला. भडकमकर डॉक्टरांनीं व इतरही पुष्कळ लोकांनीं श्रीगुरु वैद्येश्वरांकडून भवौषधरूपी गुरुमंत्राचा तारक उपदेश घेतला. बांबुलनाथ, भुलेश्वरप्रसिद्ध देवांचीं दर्शनें श्रीगुरु रोज घेत. समुद्राचें स्नान त्यांनीं आपल्या दिंडीगणासह केलें. सरदारगृहाचे मालक बाबुराव साळवेकर यांनीं आपल्या दत्तमंदिरांत महाराजांना नेऊन भक्तिभावानें दत्तात्रेय समजून त्यांची महापूजा केली. श्रीगुरुनाथांनीं प्रेमानें त्यांना स्वकृपाप्रसादरूपी नारळ दिला. बाबुराव धन्य झाले.

वाडीमध्यें असतांना महाराजांपासून गुरुमंत्रोपदेश घेतलेली पार्वतीबाई रोमडे नांवाची भंडारी जातीची एक गुरुभक्तीण मुंबईत रहात असे. अमरापुरांतील वासुदेवानंददत्तामरेश्वराला तिनें नंदादीपाकरितां दोन समया दिल्या. त्यांत हल्लीं नंदादीप सुरू आहे. सदलगा मुक्कामीं महाराज असतांना मुंबईहून मोसंब्यांचा नजराणा घेऊन ही भक्तीण एकदां गुरुभेटीला तेथें गेली होती. हिच्या निर्मळ भक्तीप्रमाणें श्रीगुरुमहाराजांचेंही तिच्यावर परिपूर्ण प्रेम होतें. त्या आपल्या भक्तिणीची आठवण श्रीगुरूंनीं स्वतःच मुंबईत असतां केली. त्यावेळीं त्या कोंकणांत होत्या. ज्याअर्थीं श्रीगुरु भगवंतांनी त्यांचें आपण होऊन स्मरण केलें त्याअर्थीं पार्वतीबाई मोठी भाग्याचीच म्हटली पाहिजे. परमेश्वरानें आपणांला विसरूं नये, दयेनें स्मरण करावे इतकेंच भक्तानें प्रयत्नानें मिळवायचें असतें. पार्वतीबाईनीं तें गुरुप्रेम मिळविलें म्हणून त्या त्रिभुवनांत धन्य होत!!

श्रीनृसिंहसरस्वती आपल्या सद्गुरुनाथांचे अतिशय थोर भक्त असल्या कारणानें त्यांना कोठें कोणतीही वस्तु देवाला अर्पण करण्याला योग्य अशी

दिसली कीं ते ती विकत घेऊन आपल्या गुरुदेवाकरितां अमरापुरला पाठवीत असत. सद्गुरुप्रेम त्यांना तसें करायला लावी म्हटलें तरी चालेल. प्रेमाची जातच कांहीं निराळी आहे. पुण्यांतून पालखी; नणदींतून घंटा, तास वगैरे; काशींतून रुद्राक्षमाळा, गंगा, देव्हारा, जरीचीं वस्त्रें इत्यादिक पाठविल्याचें वर्णन पुढें येईल. हे पदार्थ जसे त्यांनीं अमरापुर येथें पाठवून दिले, तसे मुंबईतून आठ नऊ फूट उंचीचे दोन आरसे व कांहीं मोत्यांचे हार, असे जिन्नस वासुदेवामरेश्वरदत्ताला त्यांनीं प्रीतीनें पाठवून दिले. श्रीगुरुमुनी धर्माचरण केवळ लोकसंग्रहार्थच करीत होते. पण त्यांची गुरुभक्ति मात्र स्वाभाविकपणानेंच चालू असे. तो त्यांचा सहजस्वभाव होता. ज्ञानोत्तर कर्में नष्ट होतात; पण गुरुप्रेम नष्ट होत नाहीं तर उलट अधिकच वाढतें, ही गोष्ट नृसिंहसरस्वतींच्या वागण्यावरून कळून येते.

मुंबईकर भक्तांचें समाधान करून गुरुराजस्वामी पुण्यांत परांजप्यांकडे तुळशीविवाहाला राहून तेथून कृष्णातीरीं औदुंबरक्षेत्राला आले. येथें कार्तिक पौर्णिमेला त्यांचें क्षौरविधान झालें.

औदुंबरांत श्रीगुरूंनीं श्रीदत्ताची महापूजा, अभिषेक, पालखी, ब्राह्मण-भोजन इत्यादि केलें. पुष्कळ रुपये खर्चले. क्षेत्रस्थ ब्रह्मवृंद खूष झाला. श्रीगुरूंची देवब्राह्मणांवरील श्रद्धा, भक्ति, प्रीति पाहून औदुंबरवासी जन म्हणाले कीं, " परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमन्नरसिंहसरस्वती हे फार मोठे महात्मे आहेत. अशा सदयहृदय ब्रह्मनिष्ठ पुरुषाचा लाभ आम्हांला पूर्व-सुकृतानें झाला. यांचा अधिकार वाडीकरांना कळला नाहीं, असेंच म्हणावें लागतें. इत्यादि. त्यांनीं नृसिंहसरस्वतींचा योग्य असा सन्मान केला, त्यांची भक्ति केली व गुरुकृपा संपादिली. ' जिथें गांव तिथें काक ' या न्यायानें त्यांत कोणी दुर्जन असल्यास तो कांहीं कोणाला आढळून आला नाहीं. ' क्षेत्रे क्षेत्रे निर्मलं ब्रह्मवृन्दं ' या उक्तीला अनुसरूनच तेथील ब्रह्मवृंद स्वामि-भक्त असाच दिसला. असो.

सांगलीचे देवधर, अमरापुरचे कुलकर्णी व वठारचे ब्रह्मचारी योगी अष्टेकर इत्यादि भक्तांना महाराज आलेले समजतांच त्यांना स्वस्वग्रामीं

नेण्यासाठीं ते भक्त औदुंबरीं आले व त्यांनीं महाराजांना आपापल्या गांवीं यावें म्हणून विनंति केली. त्यावर श्रीगुरु 'होय' म्हणाले.

भक्तमनोरथपूरक श्रीगुरु औदुंबराहून ब्रह्मनाळ नांवाच्या क्षेत्रीं आले. वेदावती (वेरळा) व कृष्णा यांच्या संगमांत स्नान करून आपल्या दिंडीगणासह रघुनाथस्वामी व आनंदमूर्ति यांच्या समाधीपुढें येऊन उतरले. आपलें आन्हिककर्म, गुरुपूजा वगैरे करून श्रीगुरूंनीं त्या गुरुशिष्यांच्या समाधीची पूजा केली. आनंदमूर्ति हे गुरुभक्तीनें डोलतात तेव्हां त्यांची समाधिदेखील डोलते. तद्वत् त्यांच्यापुढें बसून श्रीगुरुवर्य नृसिंहसरस्वती गुरुभक्तीनें जेव्हां रंगून जाऊन वासुदेवानंदमूर्तीचें ध्यान करीत बसले तेव्हां त्यांची समाधि लागली व ती डोलत राहिली. सर्व भक्तांना तो गुरुसमाधीचा डोल पहायला मिळाला. श्रीगुरु हे ब्रह्मानंदाचीच मूर्ति होते. तेच आनंदमूर्ति होत. त्यांची समाधि सर्वकाळच लागलेली असे व ती नुसती डोलतीच नव्हे तर बोलती, चालती, हंसती, खेळती अशी सर्व भाविकांचे दृष्टीला पडत असे. समाधान हीच समाधि होय. ब्रह्मनिष्ठाग्रणी श्रीगुरुनाथ अखंड समाधानीच होते. त्यांची सर्व हालचाल समाधीमध्यें राहूनच होत असे. ही श्रीगुरूंची अखंड बोलती चालती समाधि पाहणारे त्यांचे सेवकगण धन्य होत. आनंदमूर्ति संस्थानचे चालक गंगाधरराव गोसावी यांनीं भावभक्तीनें श्रीगुरूंना मठांत नेलें, पूजा केली व आपला पंक्तिप्रसाद आनंदमूर्तीच्या पंक्तिप्रसादासह आम्हांला मिळावा अशी गुरुनाथांना त्यांनीं प्रार्थना केली. तेव्हां आपल्या भक्तगणांसह श्रीगुरुनाथांनीं आनंदमूर्तिप्रसाद सेवन केला व आपला प्रसाद सर्वांना दिला. गंगाधरराव आनंदित झाले. वासुदेवमूर्तीपुढें श्रीगुरुवर्यांचा भजनाचा नित्यक्रम रात्रौ झाला. तो पाहून ब्रम्हनाळ क्षेत्रच आनंदरूप बनलें. श्रीगुरूंच्या दर्शनानें सर्वांना अपूर्व आनंद झाला.

औदुंबरांत भक्तांना भाक दिल्याप्रमाणें श्रीगुरु तेथून पुढें चालू झाले. गोविंदराव डिग्रजकर हे महाराजांचे शिष्य स्वारींतच होते. त्यांनीं प्रथम महाराजांना आपल्या गांवीं डिग्रजला नेलें. शके १८४६ कार्तिक वद्य नवमीला तेथील विठ्ठल मंदिरांत महाराजांनीं आपला मुक्काम केला. दुसरे दिवशीं

मारुतिमंदिरांत जाऊन दोन दिवस राहिले. तेथें गोविंदाचे चुलते नारायण भटजी चावडेकर यांनीं रुद्राभिषेकासह श्रीगुरुमहाराजांची पूजा केली, दिंडीगणासह-गुरुमूर्तींना भोजन दिलें व कृतार्थ झाले. भजनप्रिय श्रीगुरुमूर्तीपुढें तीनही दिवस गांवकऱ्यांनीं रागरागिणींसह सुस्वर व सप्रेम भजन केलें. त्यानें महाराज संतुष्ट झाले. गोविंदरावांनीं आपल्या चुलत्याला गुरुभगवंताचा लाभ करून दिला व आपल्यासह कुळाचा उद्धार केला.

देवधरांच्या इच्छेस्तव श्रीगुरु नंतर सांगली येथें जाण्याचा विचार करूं लागले. तेव्हां गोविंदरावांनीं विनंति केली कीं, "महाराजांनीं सांगलींत येऊन कांहीं दिवस तेथें राहून माझ्या घरीं अन्नाची भिक्षा घ्यावी. पूर्वीच्या खेपेला आपण अन्न घेत नव्हतां, करितां माझी अन्नभिक्षा देण्याची इच्छा पुरली नाहीं. ती या खेपेला श्रींनीं पुरवावी." महाराज म्हणाले. "गोविंदा ! तुला निधि सांपडला आहे कीं काय म्हणून आम्हांला असें म्हणत आहेस ?" गोविंदा म्हणाला, "होय. आपणच आमचे निधि. एकच निधि नव्हे, तर नवनिधीच सांपडलांत." हें उत्तर ऐकून श्रीगुरु हंसले व "तुझी तृप्ति करून घे, आम्ही येतों." असें म्हणाले. इतक्यांत नंदगांवकर मास्तर तेथें गेले. नमस्कार करून गुरुमहाराजांना ते म्हणाले, "सांगलींत मला काल असा दृष्टांत झाला आहे कीं, नरसिंहसरस्वती असतील तेथें जा व त्यांची पूजा कर. नव्या छाटचा व पंचवीस रुपये दक्षणा देऊन त्यांना भिक्षा दे." या देवाच्या सांगण्याप्रमाणें मी आपल्याला भिक्षा देण्यासाठीं (भोजन देण्यासाठीं) आलों आहें. यावर महाराज नंदगांवकरांना म्हणाले, "तुम्ही आतां आमच्याबरोबर सांगलीला चला. तेथेंच काय करायचें तें करा." असें सांगून श्रीगुरु आपल्या दिंडीगणासह सांगलीला आले.

सांगलींत कृष्णातीरीं विष्णुमंदिरांत महाराजांची स्वारी उतरली. ही वार्ता ऐकून गुरुभक्त गवई देवधर आनंदानें येऊन श्रीगुरूंचे पायां पडले. माझ्यावर समर्थांनीं मोठा अनुग्रह केला, असें ते श्रींना म्हणाले. नंतर श्रीगुरूंनीं स्नान, सायंपूजा व भजन केलें. गोविंदराव, नंदगांवकर मास्तर व देवधर हे तिघे भक्त सन्निधच होते. त्यांना श्रीगुरु म्हणाले कीं, "आम्ही तुम्हां तिघांकरितां

तीन दिवस या गांवीं राहणार आहों." हें ऐकून तिघे भक्त आनंदित झाले. दुसऱ्या दिवशीं प्रथम गुरुभक्त नंदगांवकर यांनीं श्रीगुरूंना आपल्या घरीं नेऊन दृष्टान्ताप्रमाणें भावभक्तीनें त्यांची पूजा केली, जरीच्या छाट्या दिल्या, पंचवीस रुपये गुरुरायाचे पुढें गुरुदक्षणा म्हणून ठेवले व गुरुभक्तांसह गुरुनाथांना सप्रेम भोजन घालून संतुष्ट केलें. आपल्या मुलानातवंडांकरवीं श्रींचे पाय धरविले. तेव्हां प्रसन्न झालेल्या श्रीगुरुभगवंतांनीं त्या सर्वांना कृपादृष्टीनें अवलोकन करून आशीर्वाद व स्वहस्तें प्रसाद दिला. नंदगांवकर गुरुरायांपुढें प्रेमानें लोळले व 'मी आज धन्य झालों' असें म्हणाले. तेव्हां त्यांचे नेत्र पाण्यानें भरून आले. वाडींत असल्यावेळेपासूनचे महाराजांचे हे भक्त होते. यांची वेदान्ताची आवड श्रीगुरूंनीं येथें पुरी केली.

नंतर दुसरे दिवशीं गुरुभक्त गोविंदराव डिग्रजकर यांनीं महाराजांना आपल्या घरीं नेलें. गोविंदराव हे अकिंचन होते पण गुरुपदीं त्यांची भक्ति मोठी होती. त्यांनीं गांवांत भिक्षा मागून सामानसुमान जमविलें व श्रीगुरूंची महापूजा करून भक्तगणांसह त्यांना स्वादिष्ट भोजन घातलें. गुरुप्रेमी गोविंदरावांनीं भिक्षा मागून केलेली गुरुसेवा एखाद्या राजानें केलेल्या सेवेपेक्षां अधिक महत्त्वाची होय. आपल्या रंगू आईसह गोविंदराव गुरुकृपा संपादून कृतार्थ झाले.

नंतर तिसरे दिवशीं गुरुभक्त देवधर यांनीं श्रीगुरुमुनींद्रांना आपल्या घरीं नेलें. भावभक्तिपूर्वक षोडशोपचारांनीं श्रीगुरुदेवांचें त्यांनीं पूजन केलें व शिष्यगणासह श्रीगुरूंना पंचपक्वान्नांची स्वादिष्ट भिक्षा अर्पण केली. देवधर हे गायनपटु होते. भोजनाचे वेळीं रागरागिणींत श्लोक म्हणून 'गायनीं प्रीती मज बहू' म्हणणाऱ्या दत्तरूपी नृसिंहमुनिवर्यांना त्यांनीं संतुष्ट केलें. विष्णुमंदिरांत गुरुमूर्ति आपल्या वासुदेवमूर्तीचें पूजन करीत तेव्हां हे देवधर गवई रोज तेथें गायनसेवा करीत असत.

वर वर्णिलेले तीन गुरुभक्त गुरुसेवा करून धन्य झाले, पण तेवढ्यानें ते संतुष्ट झाले नाहींत. उदार मनाचे महात्मेच ते. सर्व सांगली शहराला भगवंतांचा लाभ झाला पाहिजे, असा उदात्त विचार त्यांनीं केला व हस्तपत्रकें

छापून त्यांनीं सर्व जनतेला असें कळविलें कीं, " नरसोबाचे वाडीहून श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीमत् नरसिंहसरस्वती सद्गुरुनाथांची स्वारी येथें भाग्यवशात् आली आहे. तरी परमार्थेच्छु लोकांनीं त्या ब्रम्हनिष्ठमुकुटमणीयोगिवर्यांचें दर्शन घ्यावें, इष्ट प्रश्न त्यांना विचारून त्यांचेकडून आत्मज्ञान संपादन करावें व संसारसागर तरून जावें. ही अपूर्व गुरुभेटीची संधी वांया घालवूं नये. " याप्रमाणें मजकूर लिहून छापील हस्तपत्रिका त्या भक्तत्रयीनें शहरभर वांटल्या व एक पत्रिका गुरुमहाराजांनाही त्यांनीं दाखविली. तेव्हां गुरुवर्य हंसले, आणि त्यांना म्हणाले, " तुम्ही हें काय केलेंत ? आतां इतके लोक येऊन जर आम्हांला प्रश्न करूं लागले तर आम्ही व्याख्याते नसल्यानें त्यांचीं समाधानें कशीं करावीं ? " मन पाहण्यासाठीं हें असें श्रीगुरूंनीं भक्तांना विचारलें. तेव्हां श्रीगुरुसमर्थांचा प्रभाव जाणणारे ते गोविंदप्रमुख भक्त त्यांना म्हणाले कीं, ' मायामुक्तावधूत ' नामक अवतारांत आपण श्वानाचे मुखानें वेद पढविलेत व गाणगापुरीं अंत्यजाचे मुखानें तसेच पुन्हां वेद वदविलेत, तसेच आज आम्हां तिघां भक्तांचे मुखानें निजकृपादृष्टीनें नुसतें पाहूनच जनांचीं समाधानें करणारे वेद बोलवूं शकाल व असंख्य लोकांचीं समाधानें सहज कराल. बरें. अशी लीला आपणांला कर्तव्य नसेल तर मोठमोठया व्याख्यात्यांकडूनसुद्धां न होऊं शकणारें जनसमाधान आपण आपल्या सामर्थ्यपूर्ण वाणीनें एकेका शब्दासरसेंदेखील करूं शकाल. फार काय सांगूं ? आपल्या दिव्य दर्शनानेंच अगोदर लोकांचें पूर्ण समाधान होणारें आहे, अशी आमची पूर्ण खात्री आहे. म्हणून आम्ही सर्वांना हीं पत्रकें वाटलीं आहेत. " याप्रमाणें गुरुभक्तांचा संवाद झाला.

अज्ञानांधस्य लोकस्य ज्ञानांजन शलाकया ॥
चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ॥ १ ॥

असें म्हणून भक्तत्रयीनें श्रीगुरुचरणीं आपलीं मस्तकें ठेवलीं.

हस्तपत्रिका वाचून स्त्रीपुरुष आबालवृद्ध लोक विष्णुमंदिरांत जमूं लागले. श्रीगुरुनाथांचें दर्शन होतांच त्या लोकांना मोठा आनंद झाला. लोकांनीं उपायन म्हणून पुढें ठेवलेल्या पदार्थांतूनच कांहीं खाण्याच्या वस्तू म्हणजे फळें, पेढे

वगैरे आपल्या हातानें श्रीगुरु सर्वांना प्रसाद देत होते. कित्येक लोक परमार्थ विचारून गुरुमुखें समजूत घेऊं लागले. श्रीगुरुमुनी शांतपणें आपल्या अनुभव-युक्त वाणीनें सर्वांचीं समाधानें करते झाले. सर्वत्र आनंदीआनंद झाला. कॉलेजांतल्या सुशिक्षित विद्यार्थ्यांनीं गीतारहस्य व शांकरभाष्य हया दोन ग्रंथांपैकीं आपणांला कोणता ग्रंथ मान्य आहे, असा प्रश्न श्रीगुरूंना केला. त्यावर श्रीगुरु त्यांना म्हणाले कीं, " आमच्या श्रीवासुदेवानंदसरस्वती सद्-गुरुनाथांनीं शांकरभाष्याविरुद्ध बोलणेंसुद्धां कोणाचें ऐकून घेतलें नाहीं. शंकराचार्यांचा सिद्धान्तच त्यांना मान्य होता. आम्हांलादेखील तोच मान्य आहे. श्रुतिसिद्धांताच्या विरुद्ध असलेला जो ज्ञानकर्मसमुच्चयवाद तो आचार्यांनीं खोडून टाकला आहे आणि ' केवळ ज्ञानानेंच मोक्ष लाभतो ' हा वेदसिद्धांत जगांत प्रस्थापित केला आहे. हाच शंकराचार्यांचा वैदिक सिद्धान्त आमच्या अनुभवाला पटतो. म्हणून आम्हांला शांकरभाष्य असलेला गीताग्रंथ मान्य आहे. हाच आचार्यसिद्धांत गीतारहस्यांत प्रतिपादिला असल्यास तोही ग्रंथ आम्ही मान्य करूं. " याप्रमाणें श्रीगुरुमुनींची स्वानुभव वाणी ऐकून ते विद्यार्थी शांकरभाष्याबद्दल श्रद्धा व आदर बाळगते झाले.

नंतर त्या श्रद्धाळु विद्यार्थ्यांनीं व इतर देवधर, नंदगांवकर, गोविंदराव वगैरे अनेक मुमुक्षु सज्जनांनीं श्रीगुरुनाथांना जिज्ञासू वृत्तीनें पुष्कळसे परमार्थ-पर असे प्रश्न भावार्थानें विचारले. श्रीगुरुवर्यांना ज्ञानदानाची आवड मोठी होती. त्यांनीं अधिकारी, अनधिकारी वगैरेंची चिकित्सा केली नाहीं. उदार-पणानें जगदुद्धारार्थ संचार करणारे ते असल्यानें, करुणापूर्ण हृदयानें त्यांनीं सर्वांच्या शंका शांतचित्तानें ऐकून घेतल्या व त्यांना मोकळ्या मनानें समा-धानकारक उत्तरें दिलीं व सर्वांचें पूर्ण समाधान केलें. ते प्रश्न व तीं उत्तरें गुरुभक्त देवधर यांनीं ग्रंथरूपानें लिहून घेतलीं आहेत. प्रश्न सोडून गुरुमुखींचीं उत्तरें तेवढीं आम्ही येथें देत आहों. श्रीगुरुनृसिंहसरस्वतीभगवान् म्हणाले, " हटयोगसमाधि हा किमयेनें बनविलेल्या सोन्यासारखा आहे. कालान्तरानें त्याची स्थिति पालटते. पण राजयोगसमाधि म्हणजेच ज्ञानसमाधि, हा मात्र कधीं नाश पावत नाहीं. मूळचें जातिवंत सोनें जसें सदोदित सोनेंच असतें, तसा तो अखंडैकरस असाच असतो. आत्मसाक्षात्कार झाला असतां हा समाधि-

साध्य होतो. ध्यानयोगानें आत्मसाक्षात्कार होतो. तो साधकाच्या मुमुक्षूच्या तीव्रतेवर अवलंबून आहे. त्याला कालमर्यादा नाहीं. मनुष्यत्व व सत्संग हे जसे, तसेंच तीव्र मुमुक्षुत्व हेंसुद्धां ईश्वरी कृपेनेंच प्राप्त होत असतें. सद्गुरुकृपा हीदेखील ईश्वरी कृपाच होय. सद्गुरुप्रसाद झाला असतां प्रारब्धाचा किंवा कालान्तराचा प्रतिबंध दूर होतो. साधकानें रोजच ध्यानाभ्यास केला पाहिजे. आमरण अभ्यास करण्याचा निश्चय असावा लागतो. 'अभ्यास-सारिणी विद्या' अशी म्हणच आहे. गर्भाप्रमाणें कालानें अभ्यास परिपक्व होतो. गुरुकृपेनें फलसिद्धि लौकर होते. अनन्यभावानें निःसीम भक्ति करणारावर सद्गुरु प्रसन्न होतात. क्षुधेनें व्याकूळ होऊन आई, आई म्हणून रडणाऱ्या मुलाची उपेक्षा आई कधींतरी करते काय? मग सद्गुरूच ती कशी करतील? तेही भक्तवत्सलच असतात.

ज्ञान हें सद्गुरुसहाय्यावांचून सम्यक् (चांगलें) होत नाहीं व तें झालेलें ज्ञानसुद्धां अभ्यासावांचून दृढ होत नाहीं. याला दृष्टांत शुकाचार्यांचा घ्या. ते जनकराजाच्या साहचानें निःसंशय ज्ञानवान झाले व तें ज्ञान स्थिर व्हावें म्हणून म्हणजे स्थितप्रज्ञता प्राप्त व्हावी म्हणून त्यांनीं नंतर दहा हजार वर्षें ज्ञानसमाधीचा प्रचंड अभ्यासदेखील केला इत्यादि कथा प्रसिद्धच आहे. पांडुरंगाबरोबर प्रेमसंवाद करणाऱ्या नामदेवाला संतांनीं कच्चा ठरविल्यावर तो विसोबा खेंचराला शरण गेला. तेव्हांच त्याला पांडुरंग परमात्म्याचें सम्यक् ज्ञान झालें. हें सद्गुरुमहिमा दाखविणारें दुसरें उदाहरण आहे. एकंदरींत अत्यंत गहन आत्मसाक्षात्कार गुरुकरुणेवांचून कोणालाहि होत नाहीं, हा इत्यर्थ होय. गुरु हें साक्षात् परब्रम्हच आहे. गुरुमयच सर्व देव व जीवदेखील आहेत. गुरूवांचून दुसरें परतत्त्वच नाहीं.

जो सत्य आहे परिपूर्ण आत्मा ॥ जो नित्य राहे उदित प्रभात्मा ॥
ज्ञानें जयाच्या नर हो कृतार्थ ॥ तो पूर्ण आनंद गुरू समर्थ ॥१॥

इत्यादि गुर्वष्टकांत गुरुनाथांचें लक्षण व गुरुमाहात्म्य श्रीवासुदेवानंदसरस्वती सद्गुरुमहाराजांनीं वर्णिलें आहे. स्वतः ब्रह्मानुभवप्रवीण असून शिष्यप्रबोधीं समर्थ व दयाळू असतात तेच सद्गुरु होत. आमचे गुरुमहाराज तसेच

होते. ज्या लाभाहून अधिक असा दुसरा लाभच नाहीं, तो परम उच्च परमात्मस्वरूपाचा लाभ करून घेतलेले जे महात्मे म्हणजे सद्गुरु त्यांना स्वतःकरितां कांहींच मिळवावयाचें राहिलेलें असत नाहीं. ते आपल्या लाभाचा फायदा जगाला देण्यासाठीं म्हणजे आपल्याप्रमाणेंच अत्युत्तम आनंदसंपन्न जग व्हावें म्हणून कर्मयोग, भक्तियोग आणि ज्ञानयोग ह्या साधनांचें अनुष्ठान स्वतः परोपकारबुद्धीनें करीत असतात. त्यांना 'मी कर्ता' अशी बुद्धि नसते; 'मी ब्रह्म' अशीच बुद्धि असते. तथापि लोककल्याण करण्यानें वळण त्यांचे प्रकृतीला लागलेलें असतें. त्या प्रकृतिगुणानुसार त्यांची कायिक, वाचिक, मानसिक प्रवृत्ति होत असलेली लोक पाहतात. ते ज्ञानी पुरुष तर परमात्मस्वरूपच सर्व देखतात. ज्ञान्याचे हातून सहजगत्या लोककल्याणच होतें. तें असें कीं, त्यांची प्रवृत्ति पाहून लोकहि तसेच वागतात. मिठाचे खडे जसे समुद्रांत मिसळले म्हणजे समुद्रच होतात; तसेच ते लोक जीवभाव टाकून ज्ञानानें परमात्मस्वरूपच होतात. असा परमोच्च लाभ सत्पुरुष त्यांना मिळवून देतात. लोकांना महापुरुषांपासून असा फायदा होतो.

कित्येक ब्रह्मज्ञानी पुरुष जनसंसर्ग टाळण्यासाठीं बाह्यात्कारी बालोन्मत्तपिशाचवृत्ति धरून राहतात. कित्येक तशी वृत्ति धरूनदेखील त्यांच्या परीक्षेंत उतरणाऱ्या भाविकांवर अनुग्रह करतात. श्रीदत्तमहाराजांनीं बालोन्मत्तपिशाचवृत्ति धरून पुष्कळांना भय दाखविलें व जे कोणी कसोटीला उतरले, त्यांच्यावर पूर्ण अनुग्रह केला. याबद्दलच्या कथा वासुदेवानंदकृत दत्तमाहात्म्यनामक ग्रंथांत वाचायला मिळतील. त्रिगुणात्मक त्रैमूर्तीचा अवतार दत्त होत. म्हणून तीन शिरें त्यांना आहेत, असें वर्णितात. वस्तुतः एकमुखीच दत्त आहेत तथापि भक्तांच्या भावनेप्रमाणें तीनमुखीसुद्धां ते दिसूं शकतात. जसें परमेश्वराचें ध्यान करावें तसा त्याचा साक्षात्कार होतो. साक्षात्कार दोन तऱ्हेचे आहेत. सगुण साक्षात्कार आणि निर्गुण साक्षात्कार. त्यांपैकीं पहिला सतत ध्यानाच्या अभ्यासानें होतो व दुसरा गुरुमुखानें वेदान्त श्रवण करून आत्मानात्मविवेक केल्यानें होतो. तोहि दोन प्रकारचा आहे. परोक्ष आणि अपरोक्ष दोन्ही साक्षात्कार वेदान्तविचारानेंच होतात. मन जेव्हां देह विसरून आत्माकारच झालेलें असतें, तेव्हां तें समाधि होय व जेव्हां तें देहावर येतें, तेव्हां

उत्थान असें त्याला म्हणतात किंवा देहद्वयाचा मी साक्षी असें जें ज्ञान होतें, तेंही उत्थानच होय. कारण देहांतून तो साधक उठून गेल्याप्रमाणेंच असतो. हें स्वतोत्थान होय. देहद्वयसाक्षिभानदेखील संकोचितच आहे. तोहि सोडून जेव्हां साधक सर्वात्मभावाला पोंचतो तेव्हां तें त्याचें परोत्थान–परतोत्थान समजावें. ही ज्ञानाची पराकाष्ठा होय.

ज्ञानाच्या पराकाष्ठेला पोंचलेला मुक्त पुरुष हा वेदान्तप्रतिपाद्य परब्रम्ह वस्तुच होय. त्याच्यांत व परब्रम्हांत मुळींच भेद असत नाहीं. पारदर्शी महात्मे अशा पुरुषाला ब्रम्हवेत्ता असें न म्हणतां ब्रम्ह असेंच म्हणतात. बद्ध व मुक्त या दोघांमध्यें असलेलें अंतर, गृहस्थधर्मी पुरुष व संन्यासी पुरुष यांच्यामधील अंतराप्रमाणें समजावें. मुक्तीला पोंचण्याचे मार्ग दोन आहेत. उपासना करून क्रमानें सलोकता, समीपता, स्वरूपता व सायुज्यता मिळविणें हा पिपीलिका मार्ग होय व साधनचतुष्टयसंपन्न होऊन विवेकाच्या योगानें तत्काळ ब्रम्ह होणें हा विहंगम मार्ग म्हटला जातो. विहंगम म्हणजे पक्षी. त्याला जसे पंख असतात तसे गुरुकरुणारूपी पंख साधकानें मिळवावेत, ते मिळण्यासाठीं त्यानें पराकाष्ठेची गुरुभक्ति करावी, गुरुकरुणावंत होऊन चिद्गगनांत उड्डाण करावें आणि गारेप्रमाणें गुरुजळनिधीमध्यें मिसळून तद्रूप व्हावें. पाण्याची गार जशी पाणीच होते, तद्वत् चिद्रूपी जीवानें गुरुपरब्रम्हच व्हावें. पूर्णानंदरूपी गुरु आपल्या शिष्याला आपलें पूर्णानंदस्वरूपच बनवितात, असा सद्गुरु महिमा मोठा अगाध आहे. सद्गुरुनाथांना द्यायला ह्या त्रिभुवनांत दृष्टान्तच मिळत नाहीं, म्हणून ते निरुपम होत.

ज्या जीवांना सद्गुरुसहवासांत राहण्याचा अखंड योग येत नाहीं, गुरुसेवा मिळत नाहीं व प्रपंच–धंद्यामुळें दिवसभर आत्मचिंतनाच्या अभ्यासालासुद्धां वेळ मिळत नाहीं, पण संसारांतून सुटण्याची मात्र त्यांना इच्छा आहे, अशा मुमुक्षूंनीं आपला प्रापंचिक व्यवहार दिवसभर करावा, पण रात्रीं मात्र नियमित वेळीं नेमानें रोज कांहीं काळ आत्मानात्मविचार करण्याचा परिपाठ ठेवावा म्हणजे तेहि मुक्त होतील. मी व माझें हया दोन वृत्ति बंधाला कारणीभूत आहेत. त्यांचा त्याग केला असतां जीव मुक्त होतो. तो

त्याग विवेकानें घडतो. विवेक म्हणजे देहत्रय व अवस्थात्रय यांचा द्रष्टा म्हणजे साक्षी आत्मा मी, त्या देहत्रयाहून व अवस्थात्रयाहून भिन्नस्वभावाचा सच्चिदानंदरूपी आहें, असें जाणणें ही तुर्या अवस्था होय. तुर्या अवस्थेंत मन तालुस्थानीं असतें. सुषुप्तींत हृदयामध्यें, स्वप्नांत कंठामध्यें आणि जागृतींत नेत्रामध्यें असतें. बाह्येंद्रियांनीं विषय घेणें ती जागृती. देहाला विसरून मनानेंच कल्पित विषय घेणें तें स्वप्न. अज्ञानांत मनाचा लय होणें ती सुषुप्ति व आत्मग्रहण करणें ती तुर्या. तुर्या हा महाकारणदेह, सुषुप्ति कारणदेह, मन हा सूक्ष्मदेह व अन्नमय शरीर हा स्थूलदेह होय. असे हे चार देह, व चार अवस्था मिळून सर्व अनात्मा समजावा. अनात्मा म्हणजे आपण नव्हे. अर्थात् आपणांहून निराळा तो असत्, जड, दुःखरूपी मिथ्या आहे. त्याचा साक्षी सद्रूप, चिद्रूप, आनंदरूप असा स्वप्रकाश आत्मा मी सत्य आहें. अनात्म्याचे विकार मज आत्म्याला कालत्रयीं स्पर्शसुद्धां करीत नाहींत. मी नित्य शुद्धबुद्ध अर्थात् नित्य मुक्तच आहें. असा हा आत्मबोध ज्याला झाला, तो मी व माझें इत्यादि बंधांतून सुटला, असें समजावें.

आपली आनंदरूपता जीवाला सुषुप्तीचे ठायीं अनुभूत असते. पण त्यावेळीं ती अज्ञानानें आवृत अशीच अनुभवाला येते म्हणून कृतार्थपणा वाटत नाहीं. अज्ञान नष्ट झाल्यावर तो वाटतो. सुषुप्तिकालीन स्वरूपज्ञानानें अज्ञानाचा नाश होत नाहीं. कारण तें त्याचें ज्ञान विरोधी नाहीं. पण तेंच स्वरूपज्ञान वृत्तींत प्रतिबिंबित होऊन अज्ञानाचा नाश करूं शकतें. ज्याप्रमाणें सूर्यकिरण स्वरूपें-करून कापसाला जाळीत नाहींत पण सूर्यकान्तमण्यांत प्रविष्ट झालेले तेच किरण त्याचा दाह करूं शकतात, त्याप्रमाणें वृत्तिज्ञान हें अविद्येचा निरास करतें व तें ज्ञान पूर्वी सांगितलेल्या आत्मानात्मविवेकानें उत्पन्न होतें. ज्ञान होतांच अविद्याकल्पित जन्म, मृत्यु वगैरे सर्व बंध अविद्येबरोबरच लयाला जातात व मुक्त असलेलाच जीव मुक्त झाला, असा नुसता उपचार मात्र होतो. तो कांहीं नवीन मुक्त होत नाहीं. तर मुळचाच तो मुक्त असतो रज्जूवर भासलेला साप जसा त्रिकाळींहि रज्जूच असतो, तद्वत् परब्रम्हावर भासलेला हा जीवदेखील त्रिकाळीं परब्रम्हच असतो. त्याला आपली मूळची

ओळख पटते, इतकेंच. नवीन कांहीं होत नाहीं.व जातहि पण नाहीं. वास्तविक कांहीं उत्पन्न झालेलेंच नाहीं; मग जाणार तें काय ? अस्तु.

पूर्वी सांगितलेलें ज्ञान, तें जर परिपक्व नसेल तर प्रारब्ध परिप्रापित सुखदुःखांचा भोग नष्ट होत नाहीं. तो नष्ट होण्याला ज्ञान दृढ व्हावें लागतें. ज्ञानदाढर्याकरितां वासनामनांच्या नाशाचा अभ्यास करावा व त्याबरोबर ज्ञानाभ्यासाचीदेखील अनुवृत्ति ठेवावी. तत्त्वज्ञान, मनोनाश व वासनाक्षय या त्रयीचा अभ्यास अंगप्रधान रूपानें करावा. ज्ञानाभ्यासाला प्राधान्य दिल्यावेळीं वासनाक्षयमनोनाशांचे अभ्यासालां अंगत्व म्हणजे गौणत्य द्यावें. तसेंच वासनाक्षयादिकांचे अभ्यासकालीं ज्ञानाभ्यासाला अंगत्व द्यावें. याप्रमाणें तिघांचाहि एकदम अभ्यास करावा. ज्ञानाभ्यास म्हणजे आत्मचिंतन. वासनाक्षयाभ्यास म्हणजे प्रतिकूल वासनोत्पादन व मनोनाशाभ्यास म्हणजे वृत्तिनिरोध होय. या अभ्यासानें देहात्मज्ञानाप्रमाणें ब्रह्मात्मज्ञान बळकट होतें व तेणेंकरून प्रारब्धाचादेखील नाश होतो. दृढज्ञानवान् पुरुषाला जीवन्मुक्त, स्थितप्रज्ञ, ब्राह्मण, भगवद्भक्त इत्यादि नांवें दिलीं जातात. 'जीवन्मुक्तिविवेक' नामक ग्रंथांत या विषयाचा खुलासा सविस्तर पहावा.

मुक्तीच्या उपायांना योग म्हणतात हे योग पुष्कळ आहेत. कर्मयोग, हटयोग, भक्तियोग, ज्ञानयोग इत्यादि त्यांचीं नांवें होत. हे योग परस्परांना सहाय्यकारक असून यांचें अखेर ज्ञानयोगांत पर्यवसान होतें. निर्हेतुक, निरहंकार होऊन वर्णाश्रमविहित धर्माचें अनुष्ठान ईश्वराराधनबुद्धीनें करणें, हा कर्मयोग होय. यम, नियम, आसन, प्राणायाम इत्यादिकांनीं चित्तवृत्तिनिरोध करणें हा हटयोग होय. परमात्मस्वरूपाच्या सप्रेम अनुसंधानाला भक्तियोग म्हणतात व शम, दम, उपरति, तितिक्षा, वैराग्य इत्यादि साधनांसह आत्म्याचें श्रवण, मनन, निदिध्यास करणें याला ज्ञानयोग ही संज्ञा आहे. अविद्येची निवृत्ति ज्ञानावांचून होत नाहीं. तें ज्ञान हटयोगानें किंवा भक्तियोगानें चित्ताचें ऐकाग्र्य झाल्यावांचून होत नाहीं व तें चितैकाग्र्य कर्मयोगाचरणानें चित्त शुद्ध झाल्यावांचून होत नाहीं. म्हणून परंपरेनें हया सर्व योगांची मुक्तीला जरूरी आहे. सर्व योगांचें पर्यवसान मुक्तीमध्येंच आहे.

जो पूर्ण विरक्त असेल त्यानें सर्वकर्मसंन्यास करून ज्ञानयोगी व्हावें. आसक्त पुरुषानें कर्मयोगाचा अवलंब करून आसक्तीच्या त्यागाचा अभ्यास करावा आणि जो पूर्ण विरक्तहि नाहीं व अत्यंत आसक्तहि नाहीं त्यानें भक्तियोग आचरावा, आपला अधिकार ओळखून वागावें. अमुकच योग मी आचरीन, असा अविचारानें आग्रह धरूं नये. कारण आग्रह हाच बंध होय व कोणत्याही गोष्टीचा आग्रह नसणें हाच मोक्ष होय. हें सांगण्याचें प्रयोजन इतकेंच कीं, बाह्यत्याग ज्या पुरुषांना घडत नाहीं त्यांना अंतस्त्यागानेंदेखील परमार्थ साधतो. बाह्यत्याग करावाच लागतो असें नाहीं. पण बाह्यत्याग मी करणारच नाहीं असें म्हणणाराचा आग्रह कायम राहतो. तो मोक्षाला प्रतिबंधक असल्यामुळें कोणीहि धरूं नये. आग्रहावांचून प्रपंचव्यवहार म्हणजेसुद्धां तो संन्यासच होय, यांत मुळींच संशय नाहीं. अर्थात् कर्मयोग व संन्यासयोग हीं नांवें मात्र भिन्न आहेत. त्यागबुद्धीनें ते पाहूं गेल्यास एकरूपीच आहेत. असो.

परमार्थ साधणाराला ब्रह्मचर्याची अत्यंत जरूरी आहे. वीर्यच्युति न करणारांना ज्ञानग्रहणाला समर्थ अशी बुद्धि लाभते; मेधा वाढते. म्हणून ब्रह्मचर्य पाळावें. जागृतींत तसे स्वप्नांतसुद्धां विषय मनांत वावरतात. ते वावरूं नयेत यासाठीं उपायभूत जें ब्रह्मकर्म तें द्विजांनीं अवश्य करावें. शाळेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांनासुद्धां स्नान, संध्यावंदन व ब्रह्मयज्ञ करायला वेळ मिळूं शकतो. पंधरावीस मिनिटांतदेखील हें ब्रह्मकर्म होत असतें. सोंवळ्याची अडचण असेल तर स्नान करून झाल्यावर ओलें वस्त्र पिळून वाऱ्यावर धरून तीन वेळां झाडलें असतां तें शुष्क मानलें जातें. तसें ते शुष्क वस्त्र नेसून आपलें धर्मकृत्य आटपून घ्यावें म्हणजे झालें. मनांत खरोखर कर्तव्यबुद्धि बाळगणारांना सर्व कांहीं साधतें व सर्व उपाय सुचतात. ब्रह्मयज्ञांत देव, ऋषि व पितर यांचें स्मरण द्विजांनीं कृतज्ञतेनें करावयाचें असतें. ज्यांच्या कृपेनें आपण सुख, ज्ञान व सर्वेंद्रिययुक्त शरीर यांनी संपन्न होऊन वावरतों आहों त्यांचें उतराई होण्यासाठीं त्यांचें स्मरण करणें हें मनुष्यपणाचें द्योतक होय."

जीवन्मुक्त होण्याचे उपाय श्रीगुरु पुन्हां सांगते झाले. ते म्हणाले, " तत्त्वज्ञान, मनोनाश व वासनाक्षय ह्या त्रयीचा अभ्यास एकदम केला असतां पांच फळें सिद्ध होतात. तीं हीं—ज्ञानरक्षण, तपःसिद्धि, सर्वसमत्व, दुःखनिवृत्ति व सुखाविर्भाव. जीवन्मुक्त हया पांचांनीं युक्त असतो. हटयोगी पुरुष समाधि लावतो पण त्याचा वासनाक्षय झालेला नसतो व अज्ञाननिवृत्तीही झालेली नसते. म्हणून त्याचे जन्ममृत्यु टळत नाहींत. ते टळण्याला त्याला आत्मज्ञान व वासनाक्षय संपादावे लागतात. ज्ञानयोग्याला अज्ञाननिवृत्तिरूप ज्ञान असल्यामुळें जन्ममृत्यु नाहींत. पण दृढज्ञान नसेल तर जीवन्मुक्तिसुखार्थ त्याला वासनाक्षयादिकांचा अभ्यास करावा लागतो. असंभावना, संशयभावना व विपरीतभावना यांनीं रहित जें तें अपरोक्षज्ञान होय. यानें कैवल्य लाभतें. नुसतें वेदान्त ऐकतांच झालेलें ज्ञान म्हणजे साक्षात्काररहित ज्ञान तें परोक्षज्ञान होय. यानें ब्रम्हलोकाची प्राप्ति होते. अज्ञान म्हणजेच बंध व विज्ञान म्हणजेच मोक्ष. मोक्ष म्हणून कांहीं एखादा प्रदेश नाहीं किंवा ग्राम, शहर वगैरेहि नाहीं. वासनांसह अविद्यानिवृत्ति जी पूर्ण विज्ञानस्थिति तिलाच मोक्ष अशी संज्ञा आहे. चित्त साहय झालें असतां मोक्ष सुलभ आहे. चित्त साहय होण्याचा उपाय शंकराचार्यकृत ' योगतारावलि ' नामक ग्रंथांतदेखील आहे. नादानुसंधानानें चित्त वश होतें. नामस्मरण हा तर चित्त स्वाधीन होण्याचा उत्कृष्टच उपाय आहे. नामोपासक महर्लोकादिक्रमानें ब्रम्हलोकाला जाऊन ज्ञानवान होत्साते मुक्त होतात. म्हणून कलियुगांत नामसंकीर्तन श्रेष्ठ आहे. याज्ञिक लोक स्वर्गापर्यंत जाऊन परततात. निष्कामबुद्धीनें कर्में करणारे चित्ताची शुद्धि मिळवून विवेकानें ज्ञानवान होतात व ज्ञानवान पुरुष येथेंच मुक्त होतात. तपानें ब्रम्ह जाणावें, असें म्हटलेलें आहे. तेथें तप या शब्दाचा अर्थ आलोचन म्हणजे ब्रह्मविचार असा समजावा. प्राणस्पंदनिरोध, वासनाक्षय, शास्त्रश्रवण व साधुसमागम हे मनोजयद्वारा परमार्थप्राप्तीचे उपायच आहेत. यांत सत्संग हा उपाय सर्वोत्तम होय. म्हणून सद्गुरु करून त्यांची सेवा करावी. गुरुकृपेनें सर्व प्रतिबंध दूर होऊन अनायासानें ज्ञान होतें. त्यांच्या दयादृष्टींत मोठें सामर्थ्य आहे. त्याचा फायदा घेऊन मनुष्यानें शीघ्र कृतार्थ व्हावें. श्रीगुरुनाथांचा सहवास

भाग्यवंतांनाच मिळतो. तो गुरुसहवास ज्यांना मिळत नसेल, त्यांनीं सर्वगुरु जो परमेश्वर त्यानें केलेल्या वेदान्तशास्त्रावरच पूर्ण श्रद्धा ठेवून त्याचें श्रवण, मनन, निदिध्यासन करावें. तेंसुद्धां फलदायी होईल. शास्त्रांत ईश्वरानें आपलें तेज ठेवलेलें असतें. किंबहुना शास्त्रस्वरूपानें ईश्वरच अवतीर्ण झालेला आहे, असें समजा. " याप्रमाणें श्रीगुरुनाथांचा उपदेश आहे.

लहानपणीं कोमल तरुतुल्य बुद्धि लावावी तिकडे लागते, असें जाणणाऱ्या श्रीगुरुमहाराजांनीं त्या तरुण विद्यार्थीवर्गाला वरील उपदेश केला. प्रत्येकाच्या शंकांचीं उत्तरें दिलीं व त्यांचें समाधान करून त्यांना आचार-विचारसंपन्न केलें. जगदुद्धाराच्या दृष्टीनें ही महत्त्वाची कृति गुरुपरमेश्वरांनीं सांगलींत केली. तरुणांबरोबर पुष्कळसे वृद्ध स्त्री-पुरुषसुद्धां ज्ञानश्रवण करीत होते. सर्वांनाच श्रीगुरूंनीं तो बोध दिला. एक महिनाभर हा ज्ञानयज्ञ विष्णुमंदिरांत सुरू होता. शहरवासी विद्वज्जन ऐकायला येत असत. एके दिवशीं संस्थानाधिपति चिंतामणराव पटवर्धन राजेसुद्धां आपल्या अधिकारी मंडळासह श्रवणाला आले होते. त्यांनींदेखील आपल्या कांहीं शंका फेडून घेतल्या, व समाधान पावून श्रीचरणीं कांहीं द्रव्याचा नजराणा अर्पून नमस्कार केले. त्यांना श्रींनीं प्रसाद दिला. विद्यावंत छापखाने वकील श्रीगुरूंना म्हणाले कीं, " आपण जाहीर व्याख्यानें द्यावींत. " त्यावर श्रीगुरूंनीं त्यांना असें सांगितलें कीं, " जाहीर व्याख्यान देतांना श्रोत्यांच्या सर्व शंका ऐकायला मिळत नाहींत व त्यांचें समाधान करतां येत नाहीं म्हणून आम्हीं ही प्रश्नोत्तररूपानें बोलण्याची रीत ठेवली आहे. हिच्या योगानें प्रत्येक प्रश्नकर्त्याचा अभिप्राय ओळखून त्याचें योग्य समाधान करतां येतें. शिवाय आमच्या श्रीवासुदेवानंद सद्गुरुमहाराजांप्रमाणें जाहीर प्रवचन करण्याची शक्तीदेखील आम्हांला नाहीं व संवयही नाहीं. प्रश्नोत्तररूपानें बोलण्याचीच संवय आहे. " इत्यादि.

श्रींनीं येथें दत्तजयंतीचा उत्सव केला. नवरात्रभर कथा, पुराण, गायन, वादन, वेदपठण, ब्राह्मणभोजन होत असे. अखेरच्या दिवशीं चारी वर्णांना भोजनप्रसाद देण्यांत आला. नवरात्रांत एक दिवस स्त्रियांनीं हळदकुंकवाचा

समारंभ केला. सांगली मापानें एक मण हरभरे भिजवून स्त्रियांच्या ओंट्या भरण्यांत आल्या. त्या दिवशीं सौभाग्यवती कृष्णाबाई आपटे यांनीं 'परमार्थ' या विषयावर विद्वत्ताप्रचुर व्याख्यान दिलें. श्रीगुरुसमर्थांनीं जणूं कृष्णाबाईच्या मुखानेंच स्त्रियांना बोध केला. सर्व स्त्रियांनीं श्रीगुरूंची पूजा व आरती केली आणि गुरुमुखानें उपदेशश्रवणाची इच्छा दाखविली. तेव्हां प्रसन्न मनानें श्रीगुरूंनीं त्यांना बोध केला कीं, " पातिव्रत्य पाळून भगवद्भक्ति करावी, आत्मानात्मविचार करावा व प्रपंचांत राहूनच जन्माचें सार्थक करून घ्यावें. यापेक्षां जास्त काय सांगायचें आहे ? " असा थोडक्यांत उपदेश करून स्त्रीवर्गाला श्रींनीं स्वहस्तें प्रसाद दिला. तेव्हां आनंदित झालेल्या स्त्रियांनीं श्रीगुरुचरणीं मस्तकें ठेवलीं व पुनर्दर्शन व्हावें व असाच वरचेवर बोधामृताचा लाभ मिळावा म्हणून श्रींना प्रार्थना केली. उत्सव संपल्यानंतर एके दिवशीं गुरुभक्त गोविंदराव डिग्रजकर यांना श्रीगुरूंनीं बोध केला कीं, " रोज रात्रौ निजण्यापूर्वी निर्विकार मनानें परमात्मचिंतन करावें. दिवसभर केलेलीं कायिक, वाचिक, मानसिक कर्में ईश्वराला अर्पण करावींत. आपण अकर्ता, अभोक्ता आत्मा आहों असा विचार करावा. म्हणजे कांहीं काळानें साक्षात्कार होईल " इत्यादि. गोविंदराव धन्य झाले.

सांगली शहरांत प्रत्येक दिवशीं भक्तलोक आपल्या घरीं श्रीगुरूंना भक्तगणांसह भोजनाला (भिक्षेला) नेत असत. नागरिकवर्ग मंदिरांत येऊन रोज श्रीगुरूंची सेवा करी. कोणी फुलें देत, कोणी गायन करीत, कोणी झाडलोट करीत, कोणी सारवीत व रांगोळ्या घालीत, कोणी भजन करीत. दिगंबराचें भजन सतत चालूच असे. दत्तजयंतीचे नवरात्रांत तर नामसप्ताच झाला. सांगलीकर राजे पटवर्धन हे एके दिवशीं श्रींना पुडीला (भोजनाला) वाड्यांत नेणार होते. पण महाराज पुढें राहिले नाहींत. म्हणून तो योग त्यांना आला नाहीं. तरी पण गुरुसेवेकरितां खर्च करण्याचें द्रव्य वगैरे साहित्य त्यांनीं पुढें श्रींचा मुक्काम शरद्वाडला होता तेथें पोंचतें केलें आणि ते कृतार्थ झाले.

श्रीगुरुनाथांच्या सर्वज्ञपणाची ओळख पटण्यासारखी तेथें एक गोष्ट झाली ती अशी—नरसोबाचे वाडीहून लक्ष्मणराव बोठे फुलारी यांनीं दिलेली फुलांची करंडी घेऊन वळवंतराव नंदनवाडकर नांवाचे ब्राह्मण सांगलीला महाराजांना फुलें देण्याकरितां निघाले. रस्त्यांत नदी लागली. पाणी पितांना करंडी बाजूला ठेवली व नंतर ती उचलतांना तिला बळवंतरावांचा पाय चुकून लागला. त्यांना वाईट वाटलें; पण लक्ष्मणराव रागें भरतील म्हणून तीं फुलें त्यांनीं टाकलीं नाहींत. बचकभर फुलें टाकून देऊन बाकीचीं तशींच घेऊन ते सांगलीला गेले. गुरुमहाराज वासुदेवमूर्तीची व गुरुपादुकांची पूजा करीत बसले होते. त्यांचे पुढें " लक्ष्मणानें हीं फुलें दिलीं आहेत " असें म्हणून ती करंडी त्यांनीं ठेवली. महाराजांनीं करंडी उघडली. त्यांना तीं फुलें चरणस्पर्शानें अशुद्ध झालेलीं समजलीं. पण भक्तानें लांबून धाडलेलीं तीं फुलें त्याच्या प्रेमास्तव त्यांनीं हातीं घेतलीं आणि गुरुमूर्तीवर व गुरुपादुकांवर घातलीं. पण तीं हातांत घेऊन पादुकांवर घालतांना प्रत्येक वेळीं ते बळवंतरावांकडे पहात व " हीं फुलें कृष्णानदींत अर्पण करावीशीं वाटतात " असें म्हणत आणि तीं पादुकांवर घालीत. तीनचार वेळ वरील वाक्य उच्चारलें गेलें. त्याचा अर्थ बळवंतरावांनाच कळत होता; इतरांना तो कळत नव्हता. " पायाचा स्पर्श झाल्यामुळें अशुद्ध झालेलीं हीं फुलें त्याज्य आहेत; पण भक्ताच्या प्रेमानें हीं शुद्ध असल्यामुळें आम्ही यांचा त्याग न करतां अंगीकारच केला आहे असा भक्तिप्रियतारूपी गुरुवचनार्थ बळवंतांना गुरुकृपेनेंच कळला.

दुसरी एक अंतर्ज्ञानाची गोष्ट अशीच आहे. ती अशी—गुरुभक्त लक्ष्मणराव बोठे हे वाडींत रहात. वाडीकर ग्रामस्थ हे नृसिंहसरस्वतींचा द्वेष करणारे. अर्थातच कोणी एका पुजाऱ्यानें त्यांची निंदा लक्ष्मणरावांपुढेंच केली. त्याला उत्तर द्यायचें तें त्यांनीं दिलेंच; पण गुरुनिंदाश्रवणाचें दुःख त्यांना फार होऊन राहिलें. अशा स्थितींतच ते एकदां आपली फुलांची करंडी घेऊन सांगलीला गेले. श्रीगुरुवर्यांपुढें त्यांनीं फुलें ठेवलीं व ते एक दिवस गुरुसहवासांत राहिले. त्यांच्या मनाची खिन्न दशा श्रीगुरुमुनींनीं अंतर्ज्ञानानें कारणासह जाणली व भक्तवत्सलांनीं भक्ताला आनंदित करण्यासाठीं विणु-

मंदिरांत शतपावली करीत इकडून तिकडे व तिकडून इकडे बराच वेळ फिरत राहिले. लक्ष्मण जवळ होताच. फिरतांना श्रीगुरु एक पदाचें कडवें घोकीत होते कीं,

कोणी कांहीं म्हणोयासाठीं । बळकट प्रेम असावें गांठीं ।
निंदास्तुतिवरि लाउनि काठी ॥ मी तुं हरारे ।
आपुलासा देव करारे । भाव धरारे ॥ १ ॥

हें एकच कडवें दहा बारा वेळ त्यांनीं म्हटलें. तेव्हां लक्ष्मणराव त्यांचा भाव समजले. त्यांच्या मनाचा खेद गेला. तो जातांच लगेच श्रीगुरूंनीं तोही ओळखून पद म्हणणें बंद केलें. लक्ष्मणराव समजले कीं, माझ्या खेदाचें कारण ओळखूनच मला हा उपदेश श्रीगुरूंनीं केला. "श्रीगुरु पूर्णब्रम्ह–सर्व जाणणारे आहेत." अशी लक्ष्मणाची गुरुश्रद्धा बळकट झाली. भक्ताचें रक्षण श्रीगुरु असें करीत. श्रींचा वरील उपदेश सर्वांनाच आहे. सांगलींत श्रीगुरु महिनाभर होते. सर्वांना ते प्रिय झाले. सर्वांवर प्रेम करणारे गुरुमहाराज सर्वांना कां आवडूं नयेत ? व सर्वांना आपले हितकर्ते मायबाप गुरु कां वाटूं नयेत ? आबालवृद्ध श्रीगुरुनाथांचा जयजयकार करीत राहिले. येथून पुढें श्रीगुरु अष्टें ग्रामीं गेले.

अष्टेकर ब्रम्हचारीबुवा त्यावेळीं देवयानपंथ नामक ग्रंथकर्ते भाऊराव वैद्यांचे घरीं इस्लामपुरांत होते. महाराजांची स्वारी आलेली ऐकून वैद्यांना घेऊन ते गांवीं आले. श्रीगुरुमुनींद्र केशवनाथाचे मंदिरांत होते. तेथें भावभक्तीनें जाऊन ब्रम्हचारीबुवांनीं गुरुचरणीं साष्टांग वंदन केलें. "माझ्यावर प्रभूंनीं मोठी कृपा केली. देवदुर्लभ असें आपलें दर्शन देऊन महाराजांनीं मला धन्य केला," असें सगद्गद कंठानें बुवा श्रीगुरूंना स्तविते झाले. नंतर तेथून त्यांनीं बैलगाडींतून महाराजांना त्रिबकवाडीला भजनाच्या समारंभांत नेलें. तेथें भक्तगणासह महाराजांनीं स्नान, पूजन, भजन केलें. नंतर स्वस्थपणानें बसले. वैद्य व ब्रम्हचारीबुवा या दोघांनीं जिज्ञासा प्रगट केली. त्यांना श्रीगुरुमूर्तीनीं ब्रम्हप्राप्तीचा मार्ग सांगितला. नादानुसंधान कसें करावें तें सांगून त्याचें माहात्म्यदेखील गुरुयोगींद्रांनीं वर्णिलें. ते दोघेही मुमुक्षु समाधान

पावले. नंतर परत अष्टयाला येऊन श्रीगुरु मार्गशीर्ष अमावास्येला पुन्हां सांगलीला परत आले. त्यांचेबरोबर अष्टेकर ब्रम्हचारी गुरुसहवास घडावा म्हणून आले. त्यांचेसह श्रीगुरु पौषशुद्ध प्रतिपदेला अमरापुरांत येऊन 'वासुदेवानंद सरस्वतीपीठ' नामक आपल्या गुरुस्थानीं विराजमान झाले.

प्रकरण १८ वें

गुरुभक्तशिखामणि श्रीमन्नरसिंहसरस्वतीमुनी दिंडी घेऊन भजन करीत जसे गरुडेश्वरच्या यात्रेला श्रीवासुदेवानंद सद्गुरुवर्यांची मूर्ति घेऊन गेले तसेच पुन्हां ते ती यात्रा पुरी करून दिंडीगण स्त्रिया-पुरुष मंडळीसह भजन करीत व ठिकठिकाणीं ज्ञानभक्तीच्या दानानें भक्तोद्धार करीत करीत कृष्णा-तीरीं अमरापुरांत स्वयंस्थापित **'श्रीवासुदेवानंदसरस्वती पीठ'** नामक निजगुरुस्थानीं परत येऊन विराजित झाले. भडोचला भक्तांनीं प्रार्थिल्या-प्रमाणें त्यांना श्रीगुरूंनीं स्वदेशीं आणून सोडलें. वासुदेवदत्तामरेश्वराची स्थापना व गरुडेश्वरयात्रा पुरी होतांच श्रीगुरु आनंदानें पूर्ण भरले. आनंद-स्वरूप असलेल्या त्यांना गुरुसेवेनें समुद्राप्रमाणें भरती आली. गुरुप्रेमाच्या लाटा त्यांचे हृदयांत उसळूं लागल्या व आपण धन्य झालों असें त्यांनीं मानलें. श्रीवासुदेवानंदसरस्वतींनीं अद्वैतज्ञानाचा पूर्ण बोध देऊन आत्मपदीं पट्टाभि-षिक्त केलेले, वासुदेवस्वरूपीं एकरूप झालेले सिद्धाधिपति नृसिंहयोगी वासु-देवाचे एकान्तिक भक्त होत्साते, वासुदेवाचे स्थानांतच म्हणजे श्रीक्षेत्र अमरा-पुर येथेंच नित्य वास्तव्य करून राहिले. अंबामाधवनंदन श्रीगुरुचरित्रांतले नृसिंहसरस्वती जसे कृष्णापंचगंगासंगमीं आपली आपणच स्थापना करून तेथें पादुकारूपानें राहिले तद्वतच अहिल्यालक्ष्मणनंदन नृसिंहसरस्वती हेसुद्धां श्रीवासुदेवदत्तामरेश्वर स्वरूपानें अमरापुरांत राहिले. लक्षांत ठेवण्याची गोष्ट ही कीं, त्यांनीं ज्या निजगुरुपादुका स्थापिल्या, त्या एकाच सिंहासनावर चार पावलें व एक शिवलिंग अशा आहेत. अर्थातच दोन पावलें हे वासुदेव व दुसरीं दोन पावलें हे नरसिंह होत. तद्वतच तिसरें जें शिवलिंग तें सीताराम होय. वासुदेवानंदसरस्वती, नरसिंहसरस्वती आणि सीतारामयोगी हे गुरु-

शिष्य स्वरूपानें अवतरलेले त्रैमूर्ति श्रीदत्तच होत. म्हणूनच श्रीवासुदेवानंद-सरस्वती हे श्रीदत्ताचे पूर्णावतार आणि नरसिंह व सीताराम हे अंशावतार मानले गेले. जरी व्यवहारदृष्ट्या गुरुशिष्यरूपी भेद यांच्यांत दिसला तरी हे तिघे एक दत्तरूपीच आहेत. तिघांतील भेद खरा नाहीं; एकत्वच खरें आहे. हा एकत्वबोध प्रथमावतारीं अत्रिऋषींना त्रिमूर्तींनीं दिला. एकाचे तीन, तिघांचे एक; पुन्हां एकाचे तीन व तिघांचे एक, प्रत्यक्ष वनून दाखवून भगवंतानें अत्रींच्या शंकेचें निरसन केलें व त्यांना पुढील उपदेश केला. तो श्लोक असा—

अस्माकं मुनिशार्दूल भेदो न परमार्थतः ॥
कर्तव्योऽत्र न संदेहो यत एकात्मका वयं ॥ १ ॥

अर्थ:—" हे मुनिश्रेष्ठा अत्रे, आम्हां त्रिमूर्तीमध्यें वास्तविक भेद नाहीं, अभेदच आहे या विषयीं तूं मुळींच संदेह धरूं नको. कारण आम्ही ब्रह्मा-विष्णुमहेश्वर, एक सच्चिदानंदपरब्रह्म वस्तूच आहों, " असा बोध त्रिमूर्तींनीं अत्रींना दिला. तिकडे लक्ष दिलें म्हणजे वासुदेवसरस्वती, नरसिंहसरस्वती व सीताराम योगी हे तिघे एकच होत. यांच्यामध्यें खरोखर भेद नाहीं, ही गोष्ट सर्वांनाच पटेल. तिघेहि श्रीगुरुवर्य श्रीदत्तात्रेय भगवंतच होत, अशी आमची त्यांच्यावर अढळ श्रद्धा आहे. गरुडेश्वर, बढणेरी व अमरापुर हीं तिघांचीं स्थानें होत. तिघे एकात्मक असल्यामुळें प्रत्येक स्थानीं ते तिघे आहेतच. फार काय सांगूं ? जगन्निवास प्रभू ते; जेथें जेथें भक्त त्यांची आठवण करतील तेथें तेथें त्यांना ते भेटतील. मायबापांपेक्षां स्नेहाळू होऊन ह्या त्रैमूर्तींनीं अखिल भारतवासी लोकांचें कल्याण केलें आहे. या गोष्टीचा अनुभव सर्वांना असल्यामुळें सर्व जनता स्वानुभवानेंच यांना श्रीगुरुदत्त समजूं लागली व यांची प्रेमपुरस्सर भक्ति करूं लागली. भक्तीप्रमाणें फलभागीदेखील ती झाली. अस्तु.

गुरुभक्तिधर्म आचरणारे श्रीनृसिंहसरस्वती गुरुस्वरूप असून भक्तिमार्गानुसार आपणांला वासुदेवानंदांचे शिष्य किंवा भक्त मानीत व त्या मार्गानुसारच आपले व सद्गुरूंचें ऐक्य, देवभक्त व गुरुशिष्य हें नातें राखून प्रगट

करीत असत. ते म्हणत, "**दासस्ते नरसिंहसरस्वती याचे श्रीचरणं**" असें आपणांला गुरुदास म्हणवून पुढें दुसऱ्या एका पद्यांत "**तो आनंदमयचि गुरुगुरु मद्हृदिं गमला.**" पूर्णानंदरूपी परब्रह्मच श्रीगुरु माझ्या हृदयांत मला दिसतात, असें त्यांनीं अभेदानेंच पण भेदाच्या भाषेनें म्हटलें आहे. भक्तिप्रेमसुख भोगण्यासाठीं जीवन्मुक्तशिरोमणींचें अद्वैतांत कल्पित द्वैत असतें म्हणून जें म्हणतात, तें नृसिंहसरस्वतींच्या 'दासस्ते' म्हणण्यांतील द्वैताप्रमाणेंच समजावें. गुरुचरित्रग्रंथांत "**सदागुरोरस्य च सन्निकर्षः**" असें सिद्धमुनींचें वचन आहे. गुरूंचें व माझें सदैव सान्निध्य आहे, असें ते म्हणाले. तद्वतच "**तो हा आनंदमयचि गुरुगुरु मद्धृदिं गमला**" हें नृसिंहसरस्वतींचें भाषण अभेदगर्भभेदाचें म्हणजे भक्तिभावाचें आहे. निज-गुरुनाथांच्या चरित्रामृतपानानें निरिच्छ, गुरुकृपाकटाक्षलाभानें आनंदित, विधिवशात् मिळेल त्या अन्नानें संतुष्ट, आणि सद्गुरुसन्निध राहून भूपृष्ठ-चारी असणें ही सिद्धमुनीश्वरांची व नृसिंहसरस्वतींची रहाटी एकसारखीच होय. सारखी म्हणजे ज्ञानोत्तर प्रेमलक्षण भक्तीचीच होय. असो.

श्रीवासुदेवानंदसरस्वतींची मूर्ति पूजनार्थ बरोबर घेऊन गरुडेश्वरयात्रा करून श्रीनृसिंहसरस्वती येतांक्षणीं अमरापुरकर भक्तमंडळीला अतोनात आनंद झाला. अमरेश्वराचे मंदिरांत येऊन ते भक्त श्रीगुरुनाथांच्या पायां पडले. त्यांच्याजवळ लडिवाळपणानें बसले व प्रेमानें कुशल विचारूं लागले. श्रीगुरूंनीं प्रेमवीक्षणानें व अमृतमधुर भाषणानें त्या सर्वांचें समाधान केलें. गरुडेश्वरचा प्रसाद त्यांना दिला. कांहीं वेळ यात्रेच्या गोष्टी बोलून महाराज भक्तांसह श्रीकृष्णेचें स्नान करून आले. महाराजांनीं अनुष्ठान करून श्रीवासु-देवानंद दत्तामरेश्वराची पूजा स्वहस्तें केली व सर्व भक्तांना तीर्थप्रसाद दिला. पौष शुद्ध द्वितीया दुसरे दिवशींच होती. महाराजांनीं श्रीनृसिंहसर-स्वती दत्तप्रभूंचा जन्मोत्सव थाटानें केला. या उत्सवाला 'घेवड्याचे शेंगांचा उत्सव' असें महाराजांनीं नांव दिलें. नृसिंहसरस्वतींनीं पूर्वी येथें भक्ताचे घरीं येऊन घेवड्याची भाजीच खाल्ली व त्याला सोन्यामाणकांनीं भरलेला हंडा जमिनींत असलेला सांपडून दिला. तेव्हांपासून श्रींच्या दयेला पात्र

झालेल्या भक्ताचे वंशज असे जे हल्लीचे कुलकर्णी ब्राह्मण त्यांना पूर्वेतिहासाची जाणीव वरील उत्सवाचे नांवानें होऊं लागली. त्यांना तें नांव फार आवडलें व त्यांना नरसिंहसरस्वती पुन्हां रूपान्तरानें येऊन आपणांला लाभले म्हणून मोठा आनंद झाला. त्यांनीं महाराजांना आपापल्या घरीं नेऊन प्रीतीनें स्नानें घातलीं, पूजा केली, छाटघा दिल्या व भोजन करविलें. सर्वांवर महाराजांनीं पूर्ण कृपादृष्टि केली. सर्वांना शुभ आशीर्वाद दिला. कुलकर्णी मनांत म्हणाले कीं, पूर्वी श्रीगुरु नुसती भाजी सेवन करून गेले, जेवले नव्हते; ती आपल्या सेवेची उणीव ह्या नृसिंहप्रभूंना जेवूं घालून आपण भरून काढली.

श्रीगुरुनाथ भक्तांना आनंद देत अमरापुरांत राहिले आहेत. गरुडेश्वराहून ते परत आले. ही वार्ता ऐकून त्यांना आपापल्या गांवीं पुन्हां न्यावेत या हेतूनें शरद्वाड, सदलगा, इंगळी, हेरवाड, इचलकरंजी, खचनाळ, कारदगा, कोल्हापूर, चिकोडी, नणदी इत्यादिक गांवचे गुरुभक्त प्रेमानें अमरापुरला आले. त्यांनीं श्रीगुरूंची प्रार्थना केली कीं, " आपल्या आगमनानें, भाषणानें, दर्शनानें, वीक्षणानें, स्पर्शानें वगैरे सर्वांगानें संसारसागरांतून आमचा उद्धार करणारे भक्तोद्धारा श्रीगुरो ! कृपाळू व्हा व पूर्वीप्रमाणें पुन्हां एकदां आमच्या गांवीं येऊन आम्हांला आपल्या समागमसेवासौख्याचा लाभ द्या. आम्ही आपणांला नेण्यासाठीं आलों आहोंत. दयाळांनीं कृपा करावी. " ही भक्तप्रार्थना श्रवण करून जगदोद्धारी श्रीगुरुमुनी त्यांना म्हणाले कीं, " ठीक आहे. श्रीगुरु वासुदेवानंदसरस्वतींच्या पुण्यतिथिमहोत्सवाला पांच महिने अवधि आहे. करितां तोंपर्यंत आम्ही तुम्हां भक्तांच्या इच्छेस्तव क्रमाक्रमानें तुमच्या गांवीं येऊं व तुमचे मनोरथ पुरवूं. सध्यां तुम्हीं आपापल्या गांवीं जावें." गुर्वाज्ञा होतांच भक्त स्वग्रामीं गेले.

संतांना परेच्छाप्रारब्ध असतें म्हणतात, तें असें. श्रीगुरूंना अमरेश्वरस्थापना व गरुडेश्वरयात्रा कर्तव्य होती ती करून ते मोकळे झाले होते. त्यांना आतां अमरापुर सोडून अन्यत्र संचार करण्याची इच्छा नव्हती. हा आपला अभिप्राय ते गुरुभक्त लक्ष्मणराव बोठे फुलारी यांजपाशीं बोललेही होते. ते म्हणाले होते कीं, " सदाशिवब्रह्मेंद्रांप्रमाणें अवधूतवृत्तीनें दिगंबर होऊन नदी-

तीरीं वाळवंटांत पडून असावें, असें आम्हांला वाटतें. " या भाषेवरून ते पूर्ण निरिच्छ झाले होते, असें स्पष्टच होतें. आत्मरति, आत्मतृप्त व आत्मसंतुष्ट असे ब्रम्हज्ञचूडामणि ते अखंड ब्रम्हानंदांतच निमग्न असत. त्यांचीं सर्व तऱ्हेचीं उत्थानें संपलीं होतीं. मदिरामदांधासारखे स्वानंदरसोन्मत्त होऊन ते डोलत असलेले सर्व लोकांना दिसत असत. तर मग त्यांना प्रारब्ध तरी कोठचें ? असा प्रश्न उत्पन्न होतो. त्याचें उत्तर विश्वरूपाचार्यांनीं असें दिलें आहे कीं, "हा तत्त्वज्ञानी महात्मा सर्वदा स्वानुभवानें मुक्तच असतो. प्रारब्धाची अनुवृत्ति त्याला आभासमात्र असते." **" विश्व नव्हे मीच आहें सखया तुझी आण रे "** हा कृष्णदेवाचा अनुभव व जीवन्मुक्त शिरोमणींचा अनुभव एकच असतो. श्रीगुरुनाथांचा अनुभव तोच होता. जीवांच्या कर्मानुसार सृष्टिकर्त्या परमेश्वराची प्रवृत्ति जशी होते म्हणजेच परेच्छेनें होते. " मला भक्तांनीं नामरूपधारी बनविला आहे," असें भगवान स्वतःच म्हणतात. त्याप्रमाणें नित्य मुक्त असलेल्या नरसिंहसरस्वतीमहाराजांना भक्तांची इच्छा हेंच परेच्छाप्रारब्ध होय. तें आपलें परेच्छाप्रारब्धसुद्धां त्यांनीं लक्ष्मणरावांपाशीं बोलून दाखविलें. जीवाविषयीं दया बाळगणाऱ्या परम कारुणिक श्रीगुरूंनीं असे उद्गार काढले कीं, " ज्याच्या प्रारब्धांत हचा देहाकडून लाभ मिळावयाचा असेल, तो आपला उपयोग करून घेवो बिचारा." हचा श्रीगुरूंच्या भाषणावरून त्यांचा असा भाव दिसतो कीं, अवधूतवृत्तीनें वेडचा खुळ्याप्रमाणें उघडें नागडें फिरावेंसें आम्हांला जरी वाटतें, व तशी शक्तीदेखील आहे, तरीपण तसें वेड धरून राहण्यांत जगत्कल्याण कांहीं होत नाहीं. तें व्हावें म्हणून आम्ही तसे न होतां लोकानुसारी आश्रमधर्माप्रमाणेंच वागत आहों. ज्याचें दैव असेल तो हचा शरीराकडून आपला फायदा करून घेईल, हा भाव त्यांचा दिसतो. **" नमे पार्थास्ति कर्तव्यं वर्त एवच कर्मणि " अर्थ–** " पार्था, मला कांहींच कर्तव्य नाहीं. तरीहि मी शास्त्रीय कर्मेंच करतों " असें म्हणणाऱ्या श्रीकृष्ण भगवंताप्रमाणेंच श्रीगुरूंचें वरील म्हणणें आहे व जगत्कल्याण हा कृष्णभगवंताचा व त्यांचा हेतुसुद्धां तुल्यच आहे. या एकंदर गोष्टीचा विचार करतां **श्रीगुरुनृसिंहसरस्वती हे साक्षात् भगवानच होत.** जगत्कल्याणार्थ त्यांचा अवतार आहे, ही गोष्ट उघडच सिद्ध झाली. श्रीगुरुमूर्ती म्हणजे ब्रह्मानंदाचीच

केवळ ती मूर्ति होती. म्हणून त्यांचेवर सर्व लोक–मधावर जशा मधुमक्षिका तसे–लुब्ध झाले होते. या गोष्टीचें प्रत्यंतर हेंच कीं एकेकदां, दोनदोनदांसुद्धां श्रीगुरु पूर्वी भक्तांकडे गेले असतां तेवढ्यानें तृप्त न होऊन ते भक्त पुन्हां त्यांना आपल्या घरीं नेण्याकरितां अमरापुरला धांवत आले. भक्तेच्छापूरक श्रीगुरुवर्यांनींसुद्धां दयाळूपणानें त्यांना 'येऊं' म्हणून अभिवचन दिलें.

वठारचे अष्टेकर ब्रह्मचारी योगाभ्यासी श्रींचे सहवासांत होते. त्यांनीं पौष शुद्ध द्वितीयेच्या उत्सवांत घेवडग्याच्या शेंगा दत्तमहाराजांनीं अमरापुरच्या कुलकर्ण्यांकडे खाल्ल्याची गोष्ट असलेला गुरुचरित्रांतला अठरावा अध्याय पुराणरूपानें महाराजांपुढें सांगितला. अतिशय रसाळ व प्रेमळपणानें त्यांनीं श्रीगुरुनरसिंहसरस्वतींचें भक्तवात्सल्य वर्णन केलें. तें ऐकून श्रीगुरुमुनी खूष झाले. त्यांनीं बुवांना प्रसाद दिला. योगाचीं आसनें करून दाखविलीं. योग कसा तोही सांगितला व त्यांना आपल्या स्वारींत कांहीं दिवस ठेवून घेतले.

भक्तांना अभिवचन दिल्याप्रमाणें श्रीगुरुनाथ आपल्या दिंडीगणासह वासुदेवानंदांची मूर्ति घेऊन भजन करीत पूर्वीप्रमाणेंच संचाराला निघाले. ते प्रथम शिरटीला गेले. हरिबाळ नांवाच्या भक्तानें त्यांना आपल्या घरीं नेऊन, पूजा करून भक्तांसह महानैवेद्य केला. आपल्या शेतांत जोंधळ्याचा हुरडा खायला त्यानें श्रीगुरूंना प्रेमानें नेलें. अष्टेकर योगीबुवा संगें होतेच. त्यांना श्रीगुरु म्हणाले कीं, "बुवा! तुम्ही आतां संन्यास घ्या व आमचा सांप्रदाय स्वीकारा." त्यावर बुवा म्हणाले, "आम्ही यति होण्याइतके विरक्त अद्याप झालों नाहीं." त्यावर महाराज म्हणाले, "तुम्ही आतां सांभाळून वागा. नाहींतर एखादा लुटारू तुमची तपश्चर्या लुटून तुम्हांला मोकळा करील." पहिल्या भाषणांत श्रीगुरूंनीं बुवांचें वैराग्य तपासलें व तें कच्चें आहे असें ठरतांच त्यांना जपून राहण्याचा इशारा दुसऱ्या भाषणानें दिला. हें त्यांनीं त्यांच्यावर आपलें प्रेमच व्यक्त केलें. शिरटीहून पुन्हां अमरापुरीं येऊन तेथून कृष्णराव कुलकर्ण्यांचे भक्तिस्तव श्रीगुरु शरद्वाडला गेले.

या ठिकाणीं सांगलीकर राजेसाहेबांनीं श्रीगुरूंच्या भिक्षेचें साहित्य देऊन उंट पाठविला. त्या साहित्याचा श्रीगुरूंनीं सर्व गांवाला भंडारा घातला.

अष्टेकरबुवांना भक्तिज्ञानाचा उपदेश केला. "योगानेंच केवळ परमार्थ दुर्लभ आहे, कलियुगांत तर भक्तीसारखें सोपें साधनच नाहीं," अशी त्यांची खात्री करून देण्याकरितां नामावरच केवळ उद्धरलेल्या विष्णुपंत टाकळीकर इत्यादि भक्तांचीं उदाहरणेंही सांगितलीं तेव्हां समाधान पावून योगीबुवा अष्टेकर येथून परत अष्टग्राला गेले.

शरद्वाडांतून महाराज इंगळीला गेले. तेथें गुरुभक्त दत्तोबा इंगळे मास्तर यांनीं त्यांचें स्तोत्र केलें तें पुढीलप्रमाणें—

स्तोत्र

श्रीवासुदेवशिष्याय गुरवे ब्रह्मरूपिणे ।
नरसिंहसरस्वत्यै तस्मै भगवते नमः ॥१॥
काषायवस्त्रसद्रस्मधारिणं योगिनं सदा ।
तं वंदेऽहं श्रीनृसिंहं श्रीकृष्णातटवासिनं ॥२॥
नारायणेति दत्तेति स्मरंतं नामनी गिरा ।
तं वंदेऽहं श्रीनृसिंहं दंडकुंडीविधारकं ॥३॥
गुरुवासुदेवमूर्तौ दत्तरूपप्रदर्शकं ।
मायासरित्तारणार्थं भक्तानां मार्गदर्शकं ॥४॥
दत्तामरेश्वरस्थानपुनरुज्जीवनप्रदं ।
स्थापकं गुरुपीठस्य श्रीनृसिंहं नमाम्यहं ॥५॥
आचार्यभक्तेरादर्शं जितेंद्रियगणाग्रगं ।
तं वंदेऽहं श्रीनृसिंहं दत्तरूपं परात्परं ॥६॥
शाब्दे परेच निष्णातं तत्त्वबोधप्रबोधकं ।
नमाम्यहं श्रीनृसिंहं गुरुदत्तावतारिणं ॥७॥

कृपया शूळहर्तारं भाविसत्यार्थवादिनं ।
नमाम्यहं श्रीनृसिंहं सर्वज्ञं भक्तवत्सलं ॥८॥
सद्भक्तयवनाधीनं सर्वेषु समदर्शिनं ।
अयोध्यापुरगंतारं श्रीनृसिंहं नमाम्यहं ॥९॥
श्रीपादादीनिरूपाणि स्वीकुर्वंतं गुरूत्तमं ।
नमाम्यहं श्रीनृसिंहं साक्षाद्ब्रह्म सनातनं ॥१०॥
कूटस्थं सच्चिदानंदं नित्यमुक्तं निरामयं ।
ध्यायाम्यहं श्रीनृसिंहं साक्षिभूतं हृदिस्थितं ॥११॥
श्रीनृसिंहयते रूपं मद्धृनेत्रेषु तिष्ठतु ।
विराजतां वाचि नाम श्रद्धाभक्तिसमन्वितं ॥१२॥
श्रीनृसिंहसरस्वत्याः स्तोत्रमेतत्पठेन्नरः ।
गुरुदत्तकृपापात्रं शीघ्रं भवति भाविकः ॥१३॥

येथें पौष पौर्णिमेला आपलें क्षौरविधान सारून श्रीगुरु सदलग्याला गेले. तेथें विठ्ठलाचे मंदिरांत भक्तांच्या प्रेमास्तव दोन महिने रमले. देव भक्तगणांतच रमायचे. फाल्गुनी पौर्णिमेला क्षौर झालें. भक्तानुग्रहार्थ संचरणाऱ्या श्रीगुरु भगवंतांचा दुर्लभ लाभ ज्या भाग्यवंतांना मिळाला ते सर्व धन्य होत. आपल्या पूर्वजांसह ते सर्व संसारसागरांतून कायमचे उद्धरले गेले, यांत मुळींच संशय नाहीं. श्रीगुरु प्रत्येक भक्ताकडे गेल्याचें किंवा भक्तांनीं केलेल्या गुरुसेवेचें आम्ही वरचेवर तेंच तेंच वर्णन जें केलें आहे तें सर्व श्रीगुरूंचें भक्तवात्सल्य व भक्तांचें गुरुप्रेम कसें व केवढें मोठें होतें तें दाखविण्याकरितांच होय, थाटमाट दाखविण्याकरितां नव्हे. अस्तु.

सदलग्यांत असतांना श्रीगुरुमूर्ति अप्पाशास्त्री दंडगे यांचे घरीं उष्णोदकानें स्नान करण्यासाठीं रोज जात असत. अप्पांवर महाराजांचें फार प्रेम होतें

कसें तें पहा. अप्पांचे घरांत असलेलें पुरातनचें पिशाच एके दिवशीं अनसूयाबाईंचे अंगांत शिरून अप्पांवर असलेला आपला राग तें तिच्या मुखानें बोलूं लागलें. महाराजांना तें म्हणालें, " मी अप्पांचे घरावर नांगर फिरवीन. यांचे पोटीं कन्या–पुत्र होऊं देणार नाहीं." इत्यादि. त्यावर भक्तपाळ श्रीगुरु त्याला म्हणाले कीं, " आम्ही अप्पाला नवें मोठें घर बांधून देणार व त्याला कन्यापुत्रसुद्धां देणार. त्याचा सर्वतोपरि भार आम्ही आपल्या शिरावर घेणार. तूं कसें त्याचें अकल्याण करणार तें पाहूं. ध्यानांत ठेव." इत्यादि. हा महाराजांचा व अनसूयाबाईचा तंटा आहे असें इतरांना वाटलें. पण अप्पा मात्र समजले कीं, श्रीगुरु माउलीनें भुतापाशीं माझा कैवार घेऊन हें भाषण केलें. गुरुनाथांची दया आपलेवर अशी आहे हें मनांत येतांच भक्तीच्या उद्रेकानें अप्पांचें हृदय भरून आलें. प्रेमाश्रूंनीं त्यांनीं श्रीगुरुचरणकमळें भिजविलीं. नंतर नित्याप्रमाणें त्यांना उष्णोदकाचें स्नान घातलें. भावभक्तीनें त्यांची पूजा केली व हात जोडून विनंती केली कीं, " श्रीचरणीं माझी अशी मागणी आहे कीं, " आजच्याप्रमाणें श्रीगुरुमूर्तीचें पूजन, कृपावलोकन, भाषण, दर्शन इत्यादिकांचा लाभ मला पुढेंदेखील अखंड मिळावा. अशी कृपा महाराजांनीं मजवर करावी." ही अल्पवयस्क अप्पांची पारमार्थिक मागणी ऐकून श्रीगुरुराजांना त्यांच्याबद्दल किती कौतुक वाटलें असेल बरें !! श्रीगुरुभगवंत अशा प्रेमी भक्तांवर अनुग्रह करण्यासाठीं किंबहुना अशा भक्तांच्या संग्रहासाठींच सर्वत्र संचरत होते. अप्पा हा आपला पुरातन भक्त आहे म्हणून पूर्वसंस्कारांनीं याची बुद्धि अशी आहे असें श्रीगुरुसर्वज्ञांनीं जाणलें. भक्तिप्रिय भगवंत अप्पांना म्हणाले, " अप्पा ! आमच्या ह्या दृश्यस्वरूपाची भक्ति तुला जी आज पूजनादिकानें करतां आली, ती सतत घडणें शक्य नाहीं. आमचें अदृश्य असें दुसरें स्वरूप आहे. त्याची भक्ति सतत तुला पुढेंही करतां येईल." यावर अप्पांनीं विचारलें, " महाराज तें स्वरूप कोणतें ?" " महाराज म्हणाले, " आत्मा हें तें स्वरूप होय. या स्वरूपानें आम्ही सर्वांचे हृदयांत राहतों." अप्पा म्हणाले, " त्याची पूजाभक्ति कशी करायची ? " श्रीगुरु म्हणाले, " त्याची पूजाभक्ति सर्वकाळ घडतच असते. सर्वेंद्रियांनीं तत्तद्विषय ग्रहण करणें हीच ती पूजा होय

आणि आपल्यावर आपलें जें सर्वोत्तम प्रेम, हीच ती भक्ति समज. आत्मा निराळा नाहीं. म्हणून त्याचा वियोगदेखील होणें नाहीं. स्वात्मभेट अखंड आहेच. येथें फक्त एक ज्ञान मात्र पाहिजे. तें असलें म्हणजे आमचा समागम, पूजा, भक्ति वगैरे सहजच सर्वकाळ घडत राहील." यावर अप्पा म्हणाले, "मला सगुण व निर्गुण हीं आपलीं दोन्हीं स्वरूपें आवडतात. दोघांचीही भक्ति सतत घडण्याचा उपाय आपण मला सांगा. कामधेनूला कोणता काम पुरविणें अशक्य आहे ?"

मुलाचा हट्ट माउली जशी पुरविते, तद्वत् अप्पाशास्त्र्यांची मागणी भक्त-कामकल्पद्रुम भगवान नरसिंहसरस्वती पुरविते झाले. ते म्हणाले, "अप्पा ! तुझी इच्छाच आहे तर तो उपायदेखील आम्हीं सांगतों. ऐकून घे." श्रीगुरूंनीं आपली एक छाटी घडी करून अप्पांचे हातांत दिली आणि प्रेमानें त्यांना सांगूं लागले, "अप्पा ! ही आमची छाटी शुद्धस्थळीं मृगासनावर ठेव. अंतर्बाह्य पवित्र होऊन वेळोवेळीं हिची पूजा तूं सर्वोपचारांनीं करीत जा. पूजेचे वेळीं आम्ही हिच्यावर बसलों आहों अशी भावना कर व सर्व पूजोपचार घेत आहों, असें मनानें पहात जा. पाहतां पाहतां दृढ भक्तीनंतर आम्ही तुला प्रत्यक्ष होऊं, बोलंचालूं वगैरे सर्व करूं. तुझ्या मनांत आम्हांविषयीं जेव्हां जेव्हां प्रेम उत्पन्न होईल तेव्हां तेव्हां जें सुख तुला भासेल, तोच परमानंदघन आत्मा असें समजून तदाकार होऊन रहात जा म्हणजे ज्ञान होऊन आमचें अखंड भजन घडत राहील. या उपायानें तुला आमची दोन्ही स्वरूपें सतत भजायला मिळतील." सद्गुरुनाथ पुन्हां अप्पांना म्हणाले, "अप्पा ! आणखी एक गोष्ट सांगतों. ऐक. "निजायचे वेळीं रोज रात्रीं, दिलेल्या छाटीपुढें बसून, आम्हांला प्रिय असलेलें वासुदेवानंदसरस्वतीकृत पंचपदी भजन करून आमची शेजारति नेमानें करीत जा."

श्रीगुरुनाथ अप्पांच्या निर्मळ भावाला भुलले, यांत तिळमात्र संदेह नाहीं. ते तसे भुलले नसते तर त्यांनीं आपला, मी सगुणनिर्गुण भगवान म्हणून उल्लेख केला नसता. बहुतेक प्रसंगीं ते आपणांपेक्षां निराळाच भगवान वासुदेव

श्रोत्यांना ऐकविते झाले. परोक्षपणानेंच ते भगवदुल्लेख करीत. तसा आज अप्पांजवळ परोक्ष व्यवहार त्यांनीं केला नाहीं. आमचें सगुणनिर्गुण स्वरूप अशा उपायानें तुला लब्ध होईल, आमची अखंड भक्ति तुला घडेल इत्यादि प्रत्यक्ष आपणच भगवान आहोंत असा त्यांनीं उल्लेख केला. यावरून अप्पांची योग्यता फार मोठी असली पाहिजे, यांत संशय नाहीं. श्रीगुरुनाथांनीं वर वर्णिल्याप्रकारें अप्पांना उपदेश करतांच अप्पा आनंदानें नाचूं लागले. त्रिभुवनांत मीच एक धन्य आहें, असें त्यांना वाटलें. खरोखरच ते धन्य होत म्हणून श्रीगुरुपरमेश्वर त्यांना इतके भाळले. अप्पा गुरूपदेशाप्रमाणें वागून कृतार्थ झाले. महाराजांनीं पिशाचापुढें म्हटल्याप्रमाणें आपलें भाषण पुढें अप्पांच्या अनुभवाला आणून दिलें. त्यांचें जुनें घर लहान होतें तें नवें टोलेजंग झालें व अप्पांना कन्यापुत्रदेखील झाले. भक्तवत्सल भक्ताभिमानी श्रीगुरु प्रसन्न झाल्यावर कोणाला काय दुर्लभ आहे ? व त्यांच्या भक्ताला कोण वांकड्या नजरेनें पाहील ? अस्तु.

परोक्षपणें आपणांहून वेगळा भगवान वासुदेव मानून त्याचा महिमा वाखाणल्याचेंदेखील श्रीगुरूंचें उदाहरण सदलग्यांतच घडलें. तें असें. श्रीगुरूंनीं गुरुप्रतिपदेचा उत्सव माघमासीं तेथें केला. दीक्षितांच्या मूळ पुरुषाला मिळालेल्या त्रैमूर्ति नरसोबाचाच तो उत्सव होय. कागलचा एक ब्राह्मण त्या उत्सवांत वेदपारायण करता झाला. पुढें महिनाभर महाराजांचे सहवासार्थ तो तेथेंच राहिला. महाराजांनीं त्याला दक्षणा, वस्त्रें वगैरे दिलीं. तेव्हां त्यानें गांवीं जातांना श्रीगुरुवर्यांना नम्रपणें प्रश्न केला कीं, " महाराज ! आपल्या सहवासांत राहून मी काय मिळविलें म्हणून गांवच्या लोकांना जाऊन सांगूं ?" ब्राह्मण ऐहिक वैभवाला कंटाळून पारलौकिक श्रेयाची मागणी पर्यायानें करीत आहे, हें महाराजांनीं अंतर्ज्ञानानें जाणलें. याचक विन्मुख न पाठविण्याचा बाणा पुर्वाश्रमापासून बाळगणारे दीनवत्सल गुरुभगवान ब्राह्मणाला म्हणाले कीं, " आमच्या वासुदेवानंदसरस्वती सद्गुरु भगवंतांचा तीर्थप्रसाद महिनाभर तुम्ही सेविला आहे. त्याच्या महिम्यानें तुमची दक्षिण दिशा कायमची बंद झाली आहे. वासुदेवकृपेनें दक्षिण दिशा आपली बंद झाली असें छातीला हात लावून तुम्ही आपल्या ग्रामस्थांना

सांगा." श्रीगुरूंची निश्चय स्वरूपाची ही वरदवाणी ऐकून ब्राह्मण संतुष्ट झाला. सत्यभाषणी श्रीगुरु यदले तें सत्यच होणार. मी यमजाचांतून कायम मुक्त झालों. नरसिंहसरस्वती केवढे उदार महात्मे हे ! असे उद्‌गार काढून आनंदानें कागलकर ब्राह्मण गांवीं गेला. या उदाहरणांत श्रीगुरूंनीं, आम्ही भगवान आहों, आमच्या तीर्थप्रसादानें तुम्हीं उत्तरपंथाने शाश्वतसुखभागी गात्रिक झालां, असे शब्द उच्चारले नाहींत. परोक्ष भाषा वापरली. नेहमींची त्यांची रीत अशीच असे.

गुरुमहाराजांचें अम्पाशास्त्र्यांप्रमाणें सर्वच सदलगेकर भक्तांवर प्रेम होतें. सर्वांवरच भावानुसार समान प्रेम करणारे श्रीगुरु होते. त्यांचे दर्शनाला नृसिंह-वाडीहून बालभक्त बापू कोडणीकर गेले होते. ते अंगानें पुष्ट होते. त्यांना महाराज विनोदानें म्हणाले, " बापू ! ब्रह्मनिष्ठाचें शरीर आनंदानें पुष्ट असतें. तसें तुझें व आमचेंदेखील आहे. करितां आम्हां दोघांना ब्रह्मनिष्ठ म्हणायला कांहीं हरकत नाहीं. " बाळभक्तांत महाराज बाळ होत असत. दिगंबर श्रीपाद हवळे पुजारी व दत्तात्रेय धुंडिराज कवीश्वर हे दोघे श्रीगुरूंचे वाडींतले बालभक्तच होते. त्यांना श्रीगुरु प्रेमानें म्हणत कीं, " ही दत्त-दिगंबराची जोडीच आहे. " हे दत्त-दिगंबर पुढें गुरुकृपेनें शास्त्री होऊन अध्यापक झाले व बापू कोडणीकर प्रख्यात पुराणीक झाले. गुरुकृपा कोणतें ऐश्चर्य देणार नाहीं ?

कोणाला तरी निमित्त करून सर्वांनाच गुरुमहाराज सदुपदेश करीत असत. गोविंदराव डिग्रजकर जटा, दाढी राखीत असत. त्यांना श्रीगुरूंनीं सांगितलें कीं, " लग्न होईपर्यंत व्यवहाराला धरून वाग. नोकरी किंवा दुसरा कांहीं द्रव्यार्जनाचा धंदा कर. लग्न झाल्यावर स्मार्ताग्निहोत्र ठेव. वेदशास्त्राध्ययन-युक्त उपासना कर. शुक्लवृत्तीनें राहून पंचमहायज्ञ कर. संतती झाल्यावर प्रपंच पुत्राचे हवालीं कर व नंतर मग आमचेकडे ये. सध्यां येथें राहूं नको. " स्वत: श्रीगुरूंनीं यथायोग्य कर्मउपासना पुरी करूनच संन्यास घेतला होता. तोच स्ववर्तनक्रम त्यांनीं गोविंदाला सांगितला व त्याला सांगलीला रवाना केला.

महाराजांचें देवतार्चन सांभाळणारे रामचंद्र कट्टी यांनासुद्धां श्रीगुरूंनीं विवाह करून प्रपंच करावा व प्रपंच सांभाळून आमची भक्ति करावी, असा उपदेश केला. तो ऐकून कट्टी मुंबईला गेले व वंधूला भेटले. नंतर श्रीदत्ताच्या दृष्टान्तावरून एका कुलीन बाईनें त्यांना आपली कन्या दिली व त्यांना गृहस्थ केलें. ते गुरुभक्त रामचंद्र कट्टी गुरुकृपेनें प्रपंच साधून परमार्थाचा लाभ घेत आहेत. गुर्वाज्ञा पाळणाराचें उभयविध कल्याण होतें.

पूर्वीच्या खेपेप्रमाणें येथें वेधगंगानदीमध्यें अपूर्व स्नान-सोहाळा झाला. ग्रामस्थांनीं श्रीगुरुभक्ति पूर्ववतच केली. नागराळ गांवीं श्रीगुरु एकदां जाऊन आले. बी. ए. पर्यंत शिकलेला एक उमरावतीचा विद्यार्थी गुरुभेटीसाठीं येथें आला. त्याची सात्त्विक वृत्ति पाहून व ब्रह्मजिज्ञासा जाणून श्रीगुरुनाथ त्याला आत्मज्ञानाचा उपदेश रोज करीत व प्रेमानें प्रसाद देत. प्रसादाबरोबर आत्मज्ञानसुद्धां त्याला त्यांनीं दिलें. " आचार्यांचें प्रस्थानत्रयी भाष्य पहात जा. म्हणजे सर्व शंका जाऊन पूर्ण समाधान बाणेल, " असा त्याला गुरूत्तमांनीं आशीर्वाद दिला. कोणी मुमुक्षु भेटला कीं, श्रीगुरु त्याला कृपावलोकनानेंच आत्मज्ञान देत असत. त्यांचा संचार एवढ्याचसाठीं होता. अग्नीचा स्पर्श होतांच कापूस जळतो त्याप्रमाणें श्रीगुरुसमर्थांच्या सान्निध्यांत राहतांच अधिकारी मुमुक्षूंचें अज्ञान दग्ध होत असे. श्रीगुरु दर्शनमात्रें जीवांचा उद्धार करीत म्हणून त्यांना जगदोद्धारी पुरुष म्हणून सर्व नांवाजीत असत.

कृष्णंभटजी पुजाऱ्यांचे धाकटे बंधू ' बाळु ' हे सदलग्यांतच श्रीगुरुनाथांचे सन्निध आले. गुरुसेवा करीत पुढें ते अयोध्येपर्यंत होते. अखेरची गुरुसेवा यांनाच मिळाली. अक्षतृतियेपर्यंत श्रीगुरु सदलग्यांत राहिले.

नंतर श्रीगुरूंची स्वारी कृष्णातीरीं कहोळ (कल्होळ) नामक क्षेत्राला गेली. व्यंकोबाचे मंदिरांत मुक्काम होता. हेरेकर व इतर ग्रामस्थ ब्राम्हणांनीं श्रीगुरूंना घरीं नेऊन श्रीदत्त समजून त्यांची पूजा केली. तेथें कित्येक नास्तिकही लोक होते. आस्तिक जशी साधुसज्जनांची पूजास्तुति करितात तशी नास्तिक निंदा करतात. आस्तिकांकडे म्हणजे स्तुति करणारांकडे सत्पुरुषांचें पुण्य जातें व निंदकांना पाप लागतें, असें श्रुतीनें म्हटलें आहे. सत्पुरुष

आत्मरूपीं आनंदानें तल्लीन असतात. स्तुति किंवा निंदा त्यांना दोन्ही तुल्यच असतात. ते दोन्ही मनावर घेत नाहींत. श्रीगुरु पूर्ण जीवन्मुक्त. त्यांना कशाचेंच भान नव्हतें. ' सर्वं खल्विदं ब्रह्म ' ही त्यांची बुद्धि होती. निंदक किंवा स्तावक हो आम्हां अज्ञजनांची कल्पना होय, श्रीगुरुनाथांची नव्हे. ' नमेद्वेष्योऽस्ति न प्रियः ' ही त्यांची वृत्ति होय.

वाडीमध्यें योगीचर्येच्या वेळीं जिच्या मस्तकावर महाराजांचे कमंडलूंतला जलाभिषेक झाला होता त्या कुरुंदवाडच्या काशीबाई येथें गुरुदर्शनाला भीत भीत गेल्या. प्रथम दूरच उभ्या राहिल्या. त्यांच्यानें पुढें जाणें होईना. तेव्हां भक्तानुकंपी भगवान हंसत हंसत म्हणाले कीं, "आम्ही व्याघ्रचर्म पांघरलें म्हणून आम्हांला हे लोक भितात. त्याला आम्ही काय बरें करावें?" रामचंद्र बडवे शिंगणापुरकर जवळच होते. गुरुवरांची प्रसन्नता त्यांनीं ओळखली व काशीबाईला म्हणाले कीं, " काशीबाई ! तुम्ही भिऊं नका; वाडींत असतांवेळची सिंहवृत्ती यावेळीं नसून महाराज कामधेनु झाले आहेत. पूर्वीच ते तसे होते; पण सिंहचर्म पांघरून सिंहासारखे दिसत होते. योगीचर्येंत महाराजांनीं सर्वांना भयभीत केल्याची कथा पूर्वी येऊन गेलीच आहे. काशीबाईंना धैर्य आलें. त्या पुढें गेल्या. प्रेमानें श्रीगुरुमूर्तीच्या चरणीं त्यांनीं मस्तक ठेवलें. स्नेहाळ मातेप्रमाणें मधुरवाणीनें गुरुमाउलीनें त्यांचें समाधान केलें. काशीबाईंचें पोट आनंदानें पूर्ण भरलें. सच्छिष्य श्रीगुरूंची प्रसन्नताच वांछीत असतात. नंतर श्रीगुरु रामचंद्र धोंडो कुलकर्णी यांच्या आग्रहास्तव चिकोडीला गेले. रामभाऊंनीं आपल्या वाड्यांतच त्यांना ठेवून घेतलें. महाराजांनीं वाडींत असतांना अंगारा देऊन आशीर्वाद दिला होता. तेणेंकरून रामभाऊंच्या पत्नीच्या अंगांतला समंध निघून गेला होता. हा गुरुमहाराजांचा अनुभव आलेला असल्यामुळें कृतज्ञतेनें रामभाऊंनीं श्रीगुरूंना भक्तिपूर्वक घरीं नेऊन पूजन, आरति, भिक्षा वगैरेंनीं त्यांची सेवा केली व नंतर उभय पतिपत्नींनीं श्रीचरणीं विनंति केली कीं, "आपल्या कृपेनें मी लक्ष्मीवंत झालों आहें. मिळालेल्या धनांतून गुरुसेवेला कांहीं धन खर्च करावें म्हणतों. आज्ञा होईल ती सेवा या दासाकडून होईल. धनापासून धर्म संपादावा अशी शास्त्राज्ञा आहे. करितां श्रींनीं आज्ञा करावी. " भक्तिभावानें रामभाऊंनीं सेवा सांगा

म्हणून विनविलें. तेव्हां श्रीगुरु त्यांना म्हणाले कीं, "आम्ही ज्येष्ठ वद्यांत अमरापुरीं जाऊं. तोंपर्यंत आमच्या गुरुमहाराजांच्या नूतन मंदिराचा लांकडी मंडप तुम्हीं बांधून ठेवा. याप्रमाणें नृसिंहमहाराजांची आज्ञा होतांच रामभाऊ चिकोडीकर यांनीं ज्येष्ठमासापर्यंत श्रीवासुदेवदत्तामरेश्वराचे मंदिराला त्या मंदिराचे सभोंवतीं चौफेर लांकडी मंडप बांधून पत्र्याचें आच्छादनही वर घातलें व ते धन्य झाले. चिकोडींत शहाडे वकिलांनीं महाराजांना घरीं नेलें व वैदिक ब्राह्मण मंत्र म्हणायला बसवून विधिपूर्वक महाराजांची पंचामृत अभिषेकपूर्वक सोळा विधीनें पूजा केली. त्यांच्यावर श्रीगुरु प्रसन्न झाले. साक्षात् वाडीचे श्रीदत्तभगवानच हे स्वामीमहाराज आहेत, असा त्यांना त्यांचा प्रत्यय आला होता. म्हणून त्यांनीं वाडींत जशी दत्ताची पूजा करतात तशी महाराजांची महापूजा भावानें केली व भवतारक महामंत्र गुरुमुखानें घेतला. श्रीगुरुकृपेनें त्यांचा भवसागर कोरडा झाला.

नंतर महाराज मांजरी नामक गांवीं गेले. तेथें वैशाख पौर्णिमेला कृष्णातीरीं क्षौरविधि करून कोल्हापुरला लक्ष्मीचें दर्शन घेऊन कडगांवला अनुताईच्या इच्छेस्तव श्रीगुरु निघाले. त्यावेळीं दिंडीगणांतील भक्त तानुआका वाडीला जाण्याकरितां स्वारींतून निघाल्या. त्यांना मनापासून गुरुविरह नको होता. पण जाणें जरूर पडलें म्हणून त्या जात असतां, महाराजांना त्यांनीं असा प्रेमाचा प्रश्न विचारला कीं, " आपणांला अनेक मोठमोठे भक्त आपापल्या घरीं घेऊन जाणार व आपली भक्ति करणार. त्या भक्तांपुढें माझी आठवण येथून गुरुमाउलीला राहील ना ? " ह्या प्रश्नांत अनुताईवर कटाक्ष नसेल ना ? कांहीं असो. भक्तीचा प्रश्न आहे खास. भगवंतानें आपणांला विसरूं नये असें भक्तोत्तमांना वाटत असतें.

" तूं माय मी लेंकरूं दयाळा नको विसरूं रे नको विसरूं "

या पद्यांतल्या मागणीप्रमाणेंच तानुआकांची प्रेममय मागणी गुरुभगवंतापाशीं झाली. तेव्हां प्रसन्न मनानें श्रीगुरु त्यांना जें म्हणाले तें त्यांचें भाषण म्हणजे भगवत्प्राप्तीचा किंवा भगवत्प्रीतीचा तो अत्युत्तम उपायच आहे.

समोहं सर्व भूतेषु नमे द्वेष्योस्ति न प्रियः ॥
ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषुचाप्यहं ॥१॥
ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहं ॥१॥

अर्थ—" मला प्रिय किंवा द्वेष्य वस्तुतः कोणीच नाहीं. सर्वांना मी सारखाच आहें. जे माझें स्मरणादिकानें भजन करतात, ते माझ्या हृदयांत व मी त्यांचे हृदयांत राहतों. भक्त जरी माझें सान्निध्य करील तसा मीही त्याला सन्निध होतों." या श्लोकभावार्थाप्रमाणें आपला स्वभाव व आपलें प्राप्तीचें साधन श्रीगुरूंनीं तानुआकांच्या निमित्तानें सर्वांनाच विदित केलें. श्रीगुरु म्हणाले, "तुम्ही जशी आमची आठवण ठेवाल, तशी आम्हांलादेखील तुमची आठवण होईल, यांत मुळींच संशय नाहीं." हा श्रीगुरूंनीं तानुआकांना स्मरण-भक्तीचा इषाराच दिला. वस्तुतः सर्वांचा आत्मा सर्वसाक्षी श्रीगुरुराणा कधींच कोणाला विसरलेला नाहीं. भक्तानेंच फक्त त्याला स्मरायचें आहे. अस्तु.

वरील उपदेश करून श्रीगुरुनाथ अनुताईबरोबर गारगोटी गांवीं मुक्काम-माला गेले. बरीच भक्त मंडळी अद्याप श्रीगुरुनाथांबरोबर होती तशीच होती. शिंगणापुरकर, कट्टी, गोविंदा व तानुआका इत्यादि मंडळी मात्र कमी झाली होती. गारगोटीपासून कडगांवपर्यंत बैलगाडींतून प्रवास चालू झाला. कांहीं भक्तगण भजन करीत पायानेंच चालले होते. श्रीगुरुनाथांची स्वारी देवां-सह गाडींत होती. त्यांना भक्तवर्ग अरण्यांत परिपक्व झालेलीं वृक्षावरचीं करवंदें काढून प्रेमानें सेवन करायला देत व आपणदेखील भक्षण करीत. तशींच जांभळें, तोरणें इत्यादिक नानाविध फळांचा मधुर आस्वाद घेत घेत भक्त-गणांसह सद्गुरुराज कडगांवच्या सीमेवर जातांच ग्रामस्थ सामोरे आले. त्यांच्यासह स्वारी गांवांत प्रविष्ट झाली. गुरुभक्त अनुताई यांनीं महाराजांना आपल्या घरींच ठेवून घेतलें, देवळांत उतरविलें नाहीं. आपले महाराज आपल्या घरीं आले म्हणून त्यांना अति आनंद झाला. रोज महाराजांना त्या स्वतः मंगलस्नान घालीत. नानाविध उपचारांनीं त्यांची पूजा करीत. रोज नवीं नवीं मोदकादिक कोकणी पक्वान्नें व आंबे, फणस श्रीगुरूंना अर्पण

करीत. नव्या छाट्या प्रभुराज स्वामीसमर्थांना तिनें दिल्या. दिंडीगण स्त्री-पुरुषांना प्रेमानें वागवून त्यांनीं त्यांचादेखील संतोष केला. रोज रात्रीं गांवकर भजनी मंडळीचें भजन श्रीगुरुदेवापुढें करविलें. प्रेमळपणानें सर्वांबरोबर वागल्या व सर्वांकडून असें म्हणवून घेतलें कीं, "अनसूयाबाई हचा वरून फणसासारख्या कंटकमय, पण आंतून अगदीं गोड रसमय आहेत." श्रीगुरुनाथांनीं दहा दिवस दशाहारांत पंचगंगेचें पूजन, आरती, नैवेद्य, स्तोत्रें वगैरे करून उत्सव केला. कडगांवांतील कित्येक भक्तांनीं आपापल्या घरीं श्रींना पूजेला नेलें. सर्वांना श्रीगुरूंनीं आपल्या सेवेचा लाभ देऊन अनसूयेच्या निमित्तानें तिच्यासहित गांवाचा उद्धार केला. श्रीगुरु आजपर्यंत जे ठिकठिकाणीं गेले ते एखाद्याच्या भक्तिस्तवच गेले. पण त्याजबरोबर सर्वांनाच त्यांनीं आपला लाभ दिला. देवाला अवतार धरायला लावणारा भक्तवीर एखादाच असतो, पण भगवान जगाचे उपयोगी पडतो.

नंतर महाराज कोल्हापुरला आले. चार दिवस भक्ताग्रहास्तव तेथें राहिले. कृष्णंभटजींचे मामा गुरुभक्त पंडितराव यांनीं आपल्या घरीं नेऊन पूजा करून महाराजांकडून गुरूपदेश घेतला. हे महाराजांचे प्रेमळ भक्त होते. सोन्याचा किरीट यांनीं महाराजांचे वासुदेवदत्तामरेश्वराचे मूर्तीला घातला. देवाला मुगुट देऊन आपण भक्तांचे मुगुटमणि झाले. ते पंडितराव धन्य!

नंतर श्रीवासुदेवानंदसरस्वती गुरुराजांची पुण्यतिथि जवळ आली असें जाणून श्रीगुरु अमरापुरला आले. श्रीवासुदेवानंदमूर्ति व त्यांच्या पादुका हेच श्रीगुरूंचे देव होत. ते त्यांचेपाशीं देहावसान होईपर्यंत होते श्रीगुरुपूजनाचें व्यसनच त्यांना होतें. गुरूबरोबर आपण त्याचे चरणदास यात्रा करीत आहों असें ते मानीत. गुरुभक्ति हेंच त्यांचें ध्येय व शील होतें. ज्येष्ठ वद्य नवमीपासून आषाढ शुद्ध प्रतिपदेपर्यंत पुण्यतिथीचा उत्सव सुरू होता. रोज भजनपूजन, ब्राह्मणभोजन, वेदशास्त्रपठण, पुराण, कीर्तन, पालखी मिरविणें इत्यादिक उत्सव सुरू होता. महाराज स्वत: वासुदेवानंददत्तामरेश्वराची महापूजा स्वहस्तें करीत. आषाढ शुद्ध प्रतिपदेला यतींसह सोळा ब्राह्मणांची पूजा यथाविधि गुरुशिष्य हरिभाऊ कडेकरांनीं केली. पुढें गुरुभक्त अप्पा कारदगेकर हल्लीं ती करीत असतात. गुरूंनीं सर्व गांवाला भोजन घातलें. वाडींतून प्रेमी भक्त तेवढे

प्रसादाला व श्रीगुरूंचे दर्शनाला आले होते ते फार थोडे होते. कंसाच्या मथुरेंतसुद्धां श्रीकृष्णाचे भक्त कांहीं होतेच.

कायरच्या गंगूताई देशपांडे हया पूर्वी वाडींत राहिल्या होत्या. श्रीवासुदेवानंदसरस्वतींच्या त्या शिष्य. नृसिंहसरस्वती हे गुरूचे आवडते शिष्य, आणि महान् ज्ञानी म्हणजे साक्षात् वासुदेवच होत ही ठाम बुद्धि गंगूबाईंची होती. आपल्या घरीं यांनीं एकवार यावें, असें तिला वाटे. तिनें श्रीगुरुनाथांना वाडींत तशी विनंतीदेखील केली होती. तेव्हां श्रीगुरु तिला म्हणाले कीं, "योग येईल तेव्हां येऊं." गंगूबाईंनीं उपास सुरू केले. "ज्या दिवशीं नृसिंहसरस्वतीमुनिराज आपल्याकडे येतील त्याच दिवशीं अन्न मी स्वीकारीन, तोंवर उपोषणें करीन," असा त्यांनीं कडक नियम केला व आपल्या गांवीं गेल्या. त्याला सोळा वर्षें झालीं. आपल्या गुरुमहाराजांना त्या रोज प्रार्थना करीत कीं, "नृसिंहसरस्वतींना माझ्याकडे आणा." त्या वासुदेवभक्त गंगूबाई यावेळीं पुण्यतिथीला अमरापुरला आल्या व महाराजांना वऱ्हाडांत कायरला चला म्हणून हट्ट धरून बसल्या. त्यांना 'ठीक आहे, तुमच्या इच्छेस्तव आम्ही तिकडे येतों' असा रुकार गुरुवर्यांनीं दिला. तेव्हां त्यांना आनंद झाला; पण अमरापुरकर भक्तांना खेद झाला. लांब गेल्यावर महाराज आपणांला पुन्हां केव्हां भेटतील, असें त्यांना वाटलें. तुम्ही तिकडे जाऊं नका, असें ते महाराजांना म्हणाले. तेव्हां भक्तवत्सल श्रीगुरूंनीं त्यांना सांगितलें कीं,

श्रीवासुदेवदत्तामरेश्वर ।। कल्पतरु हे साचार ।। भजा यांसी निरंतर ।। पुरुषार्थचारही लाधाल ।।१।। अमरेश्वराचे मंदिरांत ।। आम्ही राहिलों आहों सतत ।। भजन भक्तांचें ऐकत ।। आनंदानें गुप्तपणें ।।२।। अमरापुरीं सर्वदाहि ।। राहिलों आम्ही भाक घ्या ही ।। अन्यत्र येथून जात नाहीं ।। चिंता कांहीं करूं नका ।। ३ ।। असतील कोणी सुकृती नर ।। त्यांच्या हितार्थ हें कलेवर ।। करीत राहील संचार ।। तरी अमरापुर क्षेत्रीं वसों ।।४।। श्रीवासुदेवानंदगुरुपदकमळीं ।। अभिरत आम्ही सर्व काळीं ।। श्रीकृष्णेच्या पूर्वकूळीं ।। बाळगोपाळीं नांदतों ।।५।।

याप्रमाणें भक्तांना आश्वासन देऊन श्रीगुरु योगिराजांनीं अमरापुरमाहात्म्य त्यांना सांगितलें.

श्रीनृसिंहसरस्वती गुरुभगवानुवाच–

प्रयागः संगमः ख्यातः काशिकात्वमरापुरी ॥
गया तु गोपुरी ज्ञेया दाक्षिणी त्रिस्थली स्मृता ॥१॥

इत्यादिक बारा संस्कृत श्लोक आहेत. त्यांचा संक्षिप्त अर्थ येथें देतों. तो असा —

श्रीगुरु म्हणाले, " भक्तजनहो ! तुम्हांला श्रीक्षेत्र अमरापुराचें माहात्म्य सांगतों तें ऐका. श्रीकृष्णापंचगंगासंगम, अमरापुर व गोपुर अशी ही दक्षिणेंतली त्रिस्थळी आहे. संगम हा प्रयाग. अमरापुर ही काशी व गोपुर (गौरवाड) ही गया समजा. हचा गोपुरांत शुक्लतीर्थाचे वरती कृष्णाप्रवाहांत, तीन तीर्थें आहेत. गोतीर्थ, रुद्रतीर्थ व पितृतीर्थ. हे तीर्थराज होत. येथें अष्टवसु, अर्यमादि पितर व रुद्रादिक सर्व देव नित्य वसतात. येथें स्नान, दान, जप, तर्पण इत्यादि अनुष्ठानें केल्यास मोठें पुण्य लागतें. तीर्थांसह येथील देवांचें पूजन केल्यानें ब्रम्हज्ञान होऊन मनुष्य सर्वज्ञ होतो. या गोपुरामध्यें राधेवर प्रेम करणारा मुकुंद परमात्मा श्रीगोपालकृष्ण सदासर्वकाळ गोलोकांतील कामधेनूंसह वास्तव्य करतो. गोतीर्थावर या गोविंदाला सर्व कामधेनु आपल्या दुग्धाचा अभिषेक करतात व त्याला आपलें अमृतमय दुग्ध त्या पाजतात. तो गोपालकृष्णहि त्या धेनूंचें योग्य परिपालन करतो. गोविंद, गोपाल व गोवृंद गोपुरांत सतत क्रीडा करीत राहिलेले आहेत. असें हें गोपुर मोठें महत्त्वाचें आहे.

हे गोपुरांत वर्णिलेले वसुरुद्रपितर इत्यादिक व इंद्रप्रभृति देव अमरापुरांत येऊन श्रीवासुदेवानंददत्तामरेश्वराची पूजा भक्तीनें करतात. तेथील प्रयागाख्य सर्वतीर्थांमध्यें ते राहतात. अमरेश्वराचे पूजनानें ते सर्व देव अभीष्टाला पावले म्हणून त्यांना अमरापुरांतच रहावेंसें वाटतें. अमरेश्वर हा सर्व देवांचाही देव आहे. भक्तांना तो कल्पतरूप्रमाणें इच्छितप्राप्ति करून देतो. त्या

भक्तेष्टपूरकाला आम्ही अभिवंदन करतों. सत्यज्ञानानंदपूर्ण प्रभु श्रीदत्तामरेश्वर वासुदेवगुरुराज सर्वकाळ अमरापुरांत विजय पावत आहेत. श्रीअमरेश्वराहून श्रेष्ठ दुसरा गुरु नाहीं. सर्वतीर्थांहून श्रेष्ठ असें दुसरें तीर्थ नाहीं व अमरेश्वरासन्निध राहणाऱ्या अन्नपूर्णा व योगिनी ह्यांच्यासारख्या भुक्ति, मुक्ति, विराग देणाऱ्या दुसऱ्या देवता नाहींत हें निश्चित होय. ह्या अमरापुरामध्यें ब्रह्मांडांतलीं सर्व तीर्थें, सर्व सिद्ध व सर्व देव राहतात. प्रत्यक्ष परमेश्वर जे हरि आणि हर तेच मुख्य येथें वसतात. जे गिरिजाविलासी कैलासाधिपति काशीपुरवासी श्रीशंकर, तेच हे अमरापुरांत अमरेश्वर आहेत. म्हणून अमरापुर ही काशी होय व येथें वाहणारी महानदी हीच गंगा होय. सर्वतीर्थांत मणिकर्णिकाप्रमुख सर्व तीर्थें आहेत हो गोष्ट निःसंशय समजा. अमरापुर हें सर्व देवांचें व सर्व तीर्थांचें आश्रयस्थान आहे, ही गोष्ट आम्ही वारंवार सांगतों. श्रीमहालक्ष्मी, श्रीअन्नपूर्णा व चौसष्टयोगिनी यांसहवर्तमान विधिहरिहरमूर्ति श्रीदत्तभगवान ह्या अमरापुरक्षेत्रांत सर्वकाळ नांदत आहेत. ऋद्धिसिद्धि ह्या त्यांच्या पदकिंकरीं आहेत. ते दत्तदेव भक्तांना इहपराचा लाभ देणारे भक्तकामकल्पद्रुम होत. तेहतीस कोटि देव त्यांचे आज्ञाधारी होऊन तत्सन्निध राहतात. हे श्रीदत्तात्रेय अमरेश्वर भगवान सर्व श्रुतींचें व सर्व शास्त्रांचें सार आहे. हे अमरेश्वरच सर्वव्यापक सच्चिदानंदकंद परब्रह्म समजा. हे अमरेश्वरच कमळलोचन, कमलचरण वनमाली श्रीविष्णु होत. हे अमरेश्वरच गजचर्मांबरधर पन्नगभूषण गिरिजापति श्रीशंकर होत. अमरेश्वर हे नीलांग म्हणजे नीलकंठ हर आणि नीलांग म्हणजे घनश्यामसुंदर हरिदेखील आहेत. ह्या हरिहरमूर्तीला सुनंद, नंदी, गणेश व कुमार हे तनय प्रिय आहेत. अर्थात् ते सुनंदादिक अमरेश्वरासन्निध राहतात. ह्या हरिहरमूर्ति अमरेश्वराला चारा, गाई, गोप, गोपी, अन्न, वस्त्र, घृतदुग्ध, धनादिक प्रिय आहेत. अर्थात् या सर्वांची समृद्धि येथें राहील. अमरेश्वर हे मोक्षलक्ष्मीचे व भोगलक्ष्मीचे कान्त, भक्तांना भोग व मोक्ष देणारे श्रीपाद श्रीवल्लभ श्रीनरसिंहसरस्वती श्रीवासुदेवानंदसरस्वती श्रीदत्त भगवान् होत. ह्या अमरेश्वरप्रभूची सुखाची राजधानी असें अमरापुर महाक्षेत्र चतुर्विध पुरुषार्थाचें मूळ पीठ होय. म्हणून याला 'श्रीवासुदेवानंदसरस्वती पीठ' अशी संज्ञा आम्ही

दिली आहे. येथें राहणाऱ्या भक्तांना चतुर्विध पुरुषार्थाचा लाभ अनायासें केवळ भजन, पूजन, सेवन मात्रानें होईल. कारण भक्तकामधेनु भगवान् श्रीदत्तगुरुराज या स्थानांत अखंडित विराजमान झालेले आहेत. अमरापुर-माहात्म्य असें मोठें गहन आहे."

वर वर्णिल्याप्रमाणें क्षेत्रमाहात्म्य सांगून झाल्यावर श्रीगुरूंनीं 'श्रीवासुदेवानंदसरस्वतीपीठ अमरापुर' हीं अक्षरें लिहिलेला एक लांकडी फळा मठाला लटकावून दिला व आम्ही येथेंच असतों असें ते भक्तांना म्हणाले. मंडप बांधणाऱ्या रामचंद्र धोंडो कुलकर्ण्यांना श्रीगुरूंनीं संतुष्ट होऊन प्रसाद दिला व गंगूताईबरोबर पुण्यतिथि होतांच ते कायरला जाण्यासाठीं निघाले. तेव्हां शोकान्वित मनानें अमरापुरवासी जनता रडूं लागली. गुरुमातेनें लौकर परत यावें अशी प्रार्थना त्यांनीं केली. तेव्हां भक्तशोकहारी भगवान त्यांना आश्वासन देते झाले कीं, " आम्ही,पुन्हां लौकरच परत येऊन तुम्हांला भेटूं." 'परित्राणाय साधूनां.....संभवामि युगे युगे' असा श्रीगुरुनाथांच्या आश्वासनाचा अर्थ समजावा. सखाराम बापू गेंडे पुजारी (वाडीचे) यांनीं सर्व भक्तांच्या इच्छेस्तव गुरुमहाराजांच्या (एक उभी व दुसरी बैठी अशा) दोन छायामूर्ति यंत्रानें काढून घेतल्या. त्या फारच मनोहर आहेत.

येथून पुढें आतां श्रीगुरुनाथांचें उत्तरेकडील महाप्रयाण वर्णन करायचें आहे. गरुडेश्वरीं जाऊन ते जसे परत महाराष्ट्रांत आले, तसे कायरला जाऊन ते परत आले नाहींत. पुढें जात जात अयोध्येलाच अखेर गेले. म्हणून त्यांचें हें महत्प्रयाण होय. येथें कोणीं मनांत शंका घेतील कीं, स्वयंनिर्मित मंदिर, मठ, घर वगैरे प्रत्येक व्यक्तीला अभिमानास्पद व ममतास्पद होत असल्याचा सार्वजनिक अनुभव आहे. असें असतां श्रीगुरुस्वामी स्वयंनिर्मित वासुदेवानंदसरस्वतीपीठांतच कायम कां राहिले नाहींत ? फक्त एक चातुर्मासच राहिले. एरवीं उत्सवापुरतेच येत व परत अन्यत्र जात. याचें कारण काय ? पुढें तर कायम ते उत्तरेंतच गेले. इत्यादि शंकांचें उत्तर श्रीगुरुवर्यांनीं सहज बोलत असतां पूर्वी दिलें आहे तेंच सांगतों. एकदां अमरापुरकर भक्त त्यांना म्हणाले कीं, " महाराज ! आपण संस्थापिलेल्या स्थानांत तुम्हीं आतां नित्य रहाणें

करा म्हणजे स्थानाचें वैभव वाढेल." यावर गुरुमहाराज त्यांना म्हणाले; "आम्ही ज्यांच्या आज्ञेनें ही स्थापना केली तेच श्रीदत्त अमरेश्वर वासुदेव भगवान ह्या स्थानाचे मालक आहेत. त्यांचें हें स्थान आहे व तेच याचें वैभव वाढवायला समर्थ आहेत. तेच तें वाढवितील. आम्ही साधक यति एके ठिकाणीं राहिल्यास स्थळादिकांचा अभिमान वाढून त्यांत गुंतून पडूं कदाचित्. तसें होऊं नये म्हणून आम्ही येथें रहात नाहीं." या उत्तरांत श्रीगुरूंनीं साधकांना बोध, आणि आपलें निर्ममत्व व निरहंवादित्व प्रगट केलें. ब्रम्हज्ञानबलानें आपल्या देहावरचासुद्धां मीपणा व माझेपणा ज्यांनीं झुगारला, ते मठादिकावर तो कसचा धरणार !! पूर्णज्ञानी महात्मे सर्वत्र अनासक्तच असतात. लोकांना वाटत होतें कीं, श्रीगुरु मठाभिमान धरून उपाधी वाढवितील. पण तो त्यांचा समज वरील उत्तरानें चुकीचा ठरला. सर्वत्र आस्यापरित्यागी मुक्तमंडलचक्रवर्तीच असे श्रीगुरु त्यांचे अनुभवाला आले.

प्रकरण १९ वें

" अमरापुर हें ज्यांचें स्थान आहे, ते श्रीवासुदेवानंददत्तामरेश्वर आपल्या स्थानाचें वैभव वाढवितील," असें जनतेला सांगून सर्वसंगपरित्यागी श्रीगुरु निर्मम होऊन परब्रम्हैकहृदय होत्साते अमरापुरांतून संचार करीत निघाले. आजपर्यंत जवळ बाळगलेले भक्तगणसुद्धां त्यांनीं बरोबर घेतले नाहींत. कांहीं पूर्वीच सोडले होते. बाकीच्यांना " तुम्ही आतां बरोबर येऊं नका " म्हणून सांगितलें. अमरापुरांतील भक्तांना अमरेश्वराचें भजनपूजन भक्तीनें करायला सांगितलें. सर्वांना आशीर्वाद दिला. नंतर गंगूबाई आणि अनसूयाबाई ह्या स्त्रिया व कृष्णंभट आणि तासगांवकर हे पुरुष असे कांहीं भक्त व आपण श्रीवासुदेवानंदांची रौप्यमूर्ति घेऊन ते श्रीकृष्णेच्या वाळवंटांत अमरेश्वराच्या अनुज्ञेनें गेले. तेथें पूर्वीच्या दिंडीगणांतील नको म्हटलेल्या भक्तांनीं रडून आकान्त केला. " आम्हांला सोडून गुरुमातेनें जाऊं नये; आम्ही भजन करीत आपल्याबरोबर येतों " म्हणतांच दयार्द्र कोमल मनाच्या गुरुभगवंतांनीं त्यांना बरोबर चला म्हटलें. त्यांना घेऊन वाडींतील दत्तासमोर वाळवंटांतच ते उभे राहिले. तेथूनच प्रभूला त्यांनीं प्रेमानें साष्टांग नमन केलें व एक स्तोत्र म्हटलें. त्यांतील अखेरचा श्लोक असा—

(योगिनी)

अमराख्य पुरेच योगिनीवरदोयोऽखिलदोस्ति योगिनीः ॥
स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान्मेऽस्ति परावरागतिः ॥ १ ॥

प्रेमाश्रुप्रवाहासहित दत्ताची स्तुति करून श्रीगुरु कृष्णापंचगंगासंगमांतील नौकेंत बसले. जलदेवतांना श्रीगुरुवियोग सहन होईना म्हणूनच कीं काय,

नौका प्रयत्नानेंदेखील चालू होईना. तेव्हां सर्वज्ञ श्रीगुरूंनीं कृष्णापंचगंगेचें पूजन केलें व उदकांत रुपया टाकला. देवतांचा असा संतोष करतांच, गुरुप्रसादानें संतुष्ट होऊन देवतांनीं मार्ग मोकळा केला. लगेच नाव चालू झाली. नावाडयांनीं मग ती सहज कुरुंदवाडला नेऊन लावली. कुरुंदवाडांत देव घडविणारा गवंडी नारायण माळी होता. त्यानें भावार्थानें श्रीगुरूंना आपल्या घरीं नेलें व त्यांची पूजा केली; फलाहार दिला. भक्तार्पित पदार्थांचा स्वीकार करून त्याला प्रसाद आणि आशीर्वाद देऊन श्रीगुरु पुढें चालले. त्यांना सदलगेकर भक्तांनीं बैलगाडीनें सदलग्याला नेलें.

पूर्वीच्या खेपेला श्रीगुरूंनीं विष्णुपंत दीक्षितांना तेथील लक्ष्मीचें मंदिर पुन्हां बांधायला सांगितलें होतें, तें तयार झालें होतें. विष्णुपंतांनीं महाराजांचे हस्तें श्रीलक्ष्मीचें पूजन वगैरे समारंभ करविला. महाराज मंदिर पाहून खूष झाले. विष्णुपंतांना त्यांनीं शाश्वत विष्णुपद प्राप्त करून दिलें. सुबाहु प्रभृति ब्रम्हनिष्ठांनीं स्वबंधु अलर्काचा जसा संसारांतून उद्धार केला, तद्वत् श्रीगुरूंनीं आपल्या पूर्वाश्रमबंधूंना संसारबंधांतून सोडविलें. देवकाजीं त्यांचें धन वेंचायला लावलें. जें बंधन तेंच मोक्षसाधन करविलें व आपण आगगाडींतून कायरला जाण्यासाठीं चिकोडीला गेले. तेथें दिंडीगणांपैकीं गुरुभक्त गंगूताई टांकळीकर यांना श्रीगुरूंनीं असा उपदेश केला कीं, "गंगूताई! आम्हांपाशीं राहण्यांत जरी तुम्हांला आनंद होत असला, तरीपण गांवोगांव उन्हातान्हांतून वेळींअवेळीं फिरण्यांत काय सुख आहे हें तुम्ही पाहतांच. तुम्हांला प्रवास झेंपणार नाहीं. आम्हीं सांगतों तें तुम्हीं आपल्या ऐका. यापुढें आम्हांबरोबर न येतां अमरापुरला परत जा. तेथें मठांत रहा व श्रीवासुदेवानंद दत्तामरेश्वराला महानैवेद्य बनवून अर्पण करीत जा. आमच्या आज्ञेनें तेथें राहून तुम्हीं जी गुरुसेवा कराल तीच आमचीदेखील सेवा होय." अशी गुर्वाज्ञा होतांच संभावित वृत्तीच्या सुशील गंगूताई चिकोडींतून परत अमरापुरांत येऊन गुर्वाज्ञापालन करून राहिल्या. पांच संतिणी सांगतांना पूर्वी यांचें वर्णन केलेंच आहे. लहानपणापासून हया विरक्त व विचारी आहेत. नरसोबाचे वाडींत असल्यावेळेपासून यांना गुरुसमागम व वेदान्ताचें श्रवण–मनन–निदिध्यास घडला. गुरुकृपेनें हया ब्रह्मज्ञानी झाल्या. गुरुसेवक मंडळींत गंगूताईची योग्यता कोणालाच नाहीं म्हटलें

तरी शोभेल. आज पंचवीस वर्षे झालीं. अमरेश्वरापुढें सायंकाळीं सांप्रदायिक आरत्या, स्तोत्रें वगैरे गंगूताईच म्हणत असतात. नैवेद्य तर त्या बनवितातच. अलीकडे त्या वृद्ध झाल्या आहेत तरी काळजीपूर्वक सर्वांची विचारपूस करून आल्यागेल्याला मठांत अन्न वाढतात. त्यांची सेवा श्रीगुरूंना फार आवडलेली दिसते. बाकीच्या चार संतिणीदेखील गुरुसेवेला गंगूताईंना मदत करतात.

महाराज गंगूताईंना गुरुसेवेला अमरापुरला पाठवून आपण चिकोडींतून पुण्याला गेले. पुण्यांत लागवणकर यांनीं श्रीगुरूंची भक्ति केली, मंत्रोपदेश घेतला. त्यांनीं ' द्रव्य आपणांला कसें मिळेल ? कर्ज कसें फिटेल ?' म्हणून श्रींना प्रार्थिलें. तेव्हां ऋणमोचनार्थ द्रव्यप्राप्तीचा मंत्र महाराज यांनीं त्यांना दिला.

दरिद्रविप्रगेहे यः शाकं भुक्त्वोत्तमश्रियं ॥
ददौ श्रीदत्तदेवः स दारिद्र्याच्छीप्रदोऽवतु ॥१॥

ह्या मंत्राचें अनुष्ठान करा म्हणजे संपत्ति मिळेल असा आशीर्वाद श्रीगुरूंनीं त्यांना दिला. घरांत पिशाचबाधा होती. त्यांनीं तिच्या निवारणार्थ उपाय विचारला. श्रीगुरूंनीं त्यांना श्रीगुरुचरित्राचे सप्ते चालू ठेवायला सांगितले. तसें करतांच त्यांचा पिशाचत्रास पुढें बंद झाला व द्रव्य मिळालें. लागवणकरांनीं श्रीनृसिंहसरस्वती, श्रीवासुदेवानंदसरस्वती व श्रीसीतारामम्हाराज यांच्या मोठ्या रंगीत तसबिरी त्रिमूर्ति दत्त समजून पूजनार्थ ठेवल्या आहेत. संकटकालीं त्यांची भावजय लक्ष्मीबाई त्यांची प्रार्थना करतात. त्यांना लगेच दृष्टान्त मिळतो व मनकामना पुरते. भाव तेथें देव.

नंतर श्रीगुरु नाशकाला गेले. काळेराम मंदिरांत आपलें उपासनाकर्म करून पुढें भुसावळला गेले. नाशिकच्या टप्प्यावर आगगाडींत बसतांना एक कमंडलु विसरून राहिला होता. तो मागाहून शिंगणापुरकर कायरला गेले त्यांनीं गुरुवरांना नेऊन दिला. भुसावळींत श्रींनीं तापीनदीचें स्नान केलें. पुढें वर्ध्याला कांहीं वेळ उतरून तेथून वणीला गेले. येथें आगगाडीचा प्रवास पुरा झाला. वणींत नानाजी दीक्षित यांनीं गुरुमहाराजांचें स्वागत करून त्यांना आपल्या घरीं नेऊन भक्ति केली. नंतर तेथून बैलगाडीनें श्रीगुरु

भक्तांसह कायर गांवीं जाऊन पोंचले. त्यांना गांवांत नेण्यासाठीं वाद्यें, दिवे घेऊन भजनी लोक सीमेवर सामोरे आले. त्यांनीं वाजतगाजत, भजन करीत मिरवीत श्रीगुरुमहाराजांना गंगूबाईंच्या घरीं आणलें. घरीं गुरुनाथ येतांच, गंगूबाई देशपांडे यांनीं त्यांची सर्वोपचारानें पूजाआरति केली व आनंदानें स्वागत करीत श्रीगुरूंना ती म्हणाली कीं, " तपोयज्ञदानादिकांनीं प्राप्त न होणारे भावलभ्य भगवान श्रीनरसिंहसरस्वती तुम्ही माझ्या घरीं आलांत, ही माझ्या पूर्वजांची भाग्यसंपत्ति फळाला आली, असें मी समजतें. कारण माझी इतकी कुठें भक्ति आहे ? कीं परमात्मा स्वतः मजकडे चालून यावा ? आपल्या स्वागमनानें मी आज धन्य झालें. माझ्या सोळा वर्षांच्या तपश्चर्येचें फळ मी पावलें असें तरी मी कां म्हणूं नये ?" इत्यादि. सर्व गंगुबांधवांनीं व गंगूबाई यांनीं भक्तीनें श्रीगुरूंना नमनें केलीं. त्यांना श्रींनीं नारायण म्हणून आशीर्वाद दिला.

शके १८४७ ' कायर ' येथें चातुर्मासार्थ श्रीगुरु राहिले. गंगूबाई देशपांडे वाडींत गुरुमहाराज असतांना दरसाल त्यांना ' दिवाळीला माझ्या घरीं यावें ' म्हणून भाड्याबद्दल रुपये पाठवून तार पाठवीत असत. त्यांचा हेतु या वर्षी पुरा झाला. दिवाळीला जरी गुरुराज तेथें नसले तरी " संत येती घरा तोचि दिवाळी दसरा ' या भावनेच्या गंगूबाई होत्या. त्यांनीं गुरुमहाराज आले ही आपली दिवाळीच मानली. आषाढी पौर्णिमेपासून श्रीगुरूंचा चातुर्मास सुरू झाला. श्रीगुरूंनीं व्यासपूजा गंगुबाईचे घरांतच केली. नेहमींप्रमाणें रोजची त्यांची दिनचर्या, गुरुपूजा, ध्यानधारणा समाधि, गुरुग्रंथावलोकन, रात्रौ भजन इत्यादि सुरू असे. एकनाथी भागवत किंवा मूळ एकादशस्कंध वाचणें हा येथें त्यांचा विशेषक्रम सुरू होता. कित्येक ग्रामस्थांनीं गुरूपदेश घेतले. रात्रौ ग्रामस्थ भजन करीत. केव्हां केव्हां चारआठ दिवसांनीं गोदावासी ब्राह्मण गुरुदर्शनाला येत. त्यांना श्रीगुरु पंक्तीला भोजनाला घेत व दक्षणार्थ प्रत्येकाला रुपरुपया देत. एका ब्राह्मणानें गुरुमुखें उपदेश घेतला, व त्यानें गायनसेवा केली. गुरुभक्त गंगूबाई देशपांडे यांनीं मनःपूर्वक श्रीगुरुस्वामींची सर्व प्रकारें शुश्रूषा केली. प्रत्येक भक्ताला रोज नवी नवी स्फूर्ति होते व तदनुरूप तो भक्त भगवत्सेवादेखील रोज नवीन-

नवीन प्रकारची करतो. तोच प्रकार गंगूबाईंचा समजावा. तद्वतच पूर्वी किंवा पुढें वर्णिलेल्या गुरुभक्तांची प्रीति व गुरुसेवादेखील भक्तलोकांनीं जाणावी. तिचें वर्णन होणें शक्य नाहीं.

प्रेमळ गंगूबाईसारख्यांचा तर गुरुमहाराजांनीं संसारसमुद्रांतून उद्धार केलाच; पण नास्तिक कुटिल बुद्धि धरून त्यांच्याकडे पाहणाऱ्या एका इसमाचादेखील सद्गुरूंनीं स्वभाव पालटून त्याचा उद्धार केला, तीच आश्चर्याची कथा सांगतों ऐका. गुरुमुनीश्वर लोकांत आपलें माहात्म्य स्वगुरूपेक्षां न वाढूं द्यावें म्हणून नेहमीं आपल्याबरोबर स्त्रिया बाळगीत असें पूर्वी सांगितलेंच आहे. आपण झांकून असावें, लोक फारसे आपल्या सन्निध न यावेत म्हणून योगीचर्येचा अवलंब करून व त्यांच्या उद्धारार्थदेखील पूर्वी वर्णिलेल्या अनसूया वगैरे चारपांच स्त्रिया महाराजांनीं जवळ पाळल्याच होत्या. गंगूताईच्या बापूजी नांवाच्या दिराला ही गोष्ट आवडली नाहीं. महाराजांच्या हेतूप्रमाणें बापूजी अश्रद्ध झालाच. तो मनांत म्हणे, " मी पूर्वी वाडीला गेलों होतों, तेव्हां हे वासुदेवानंदांचे पट्टशिष्य कडकडीत वैराग्यवान होते. पण आतां यांचा हा प्रकार कांहीं मला रुचत नाहीं. " असें म्हणून तो त्यांच्या दर्शनाला किंवा त्यांच्या हातचा तीर्थप्रसाद घ्यायला इतरांप्रमाणें गेला नाहीं. गंगूबाई बिचारी भोळी. तिला वाटलें आपल्या दिराचादेखील उद्धार व्हावा, म्हणून मुद्दाम त्याचे घरीं जाऊन त्यांनीं त्याला पुष्कळ उपदेश केला. श्रीगुरुवर्यांचा थोरपणा त्याला सांगितला व विनंती करून म्हणाल्या कीं, " बापूजी ! स्वामीमहाराजांकडे विचाराचे दृष्टीनें पहा. बाह्य उपाधीकडे नजर देऊं नका. वासुदेवानंद गुरुमातेचें कृपास्तन्यामृत पोटभर पिऊन निजानंदानें तृप्त व पुष्ट असे हे नृसिंहसरस्वती यतिवर्य साक्षात् श्रीदत्तच आहेत बरें ! त्यांच्याजवळ जा. त्यांच्याकडे पहा. त्यांच्या वचनाचें श्रवण करा, मनन करा व आपला उद्धार करून घ्या. यापेक्षां मी अबलेनें तुम्हां पुरुषांना जास्त काय सांगावें ! ! " बापूजी म्हणाले, " वहिनीसाहेब ! त्या नादिष्ट स्त्रियांप्रमाणें तुम्हीसुद्धां मला वेडयाच दिसतां. मला तुम्ही कांहींच शिकवूं नका. माझ्या परीक्षेला स्वामी

उतरले तरच मी त्यांच्याशीं संबंध ठेवीन, एरवीं नाहीं. तुम्हीं आपल्या जा. " गंगूबाई परत आल्या.

कुटिल मनुष्याला सदुपयोग केव्हांच रुचणें शक्य नाहीं. एक दिवस बापूजी मनांत म्हणाले, ' मी घरीं बसतों त्यापेक्षां वहिनींचे घरींच जर बसत गेलों तर मला स्वामींच्या वर्तनावर लक्ष ठेवतां येईल व त्यांचा दोष नजरेला आल्यावर वहिनीला बजावतांदेखील येईल कीं, " गतानुगतिको लोको न कश्चित्पार-मार्थिकः ॥ " एकीला पाहून दुसरी, दुसरीला पाहून तिसरी, याप्रमाणें तुम्ही स्त्रिया अविचारानें स्वामीच्या नादीं लागलांत. इत्यादि. हा बेत मनांत धरून कुटिल बुद्धीनेंच म्हणा किंवा पुढें त्यांनीं श्रीगुरु आपलेसे करून घेतले म्हणून चिकित्सक बुद्धीनें म्हणा, महाराजांचा दोष पाहण्याच्या बुद्धीनें बापूजी गंगूबाईकडे जाऊन महाराजांपासून बऱ्याच अंतरावर एका भिंतीपाशीं मुका-ट्यानें बसून राहूं लागले. त्यांनीं श्रीगुरुनाथांवर नजर व मन एकाग्रतेनें लावलें. जणूं काय साधक लोकांनीं परमेश्वराचें ध्यान अनन्य भावानें कसें करावें तें सर्वांना ते शिकवूंच लागले. संतांचे जे पक्के विरोधक असतात ते पुढें त्यांचे तसे पक्के भक्त बनतात. गुरुचरित्रांत त्रिविक्रम भारती, व तुका-रामचरित्रांत रामेश्वर शास्त्री इत्यादि पुष्कळ उदाहरणें याबद्दल सांपडतील. बापूजी हे त्यांतलाच एक मासला समजा. एका परीनें ते प्रथमपासूनच भक्त म्हणायलासुद्धां योग्य आहेत. परमेश्वराशीं विरोध करणाऱ्या हिरण्यकश्यपु, रावण इत्यादिकांनासुद्धां भक्तच गणलेले आहेत. असो.

बापूजी डोळ्यांत तेल घालून सकाळपासून भोजनाची वेळ होईपर्यंत आणि भोजनोत्तर मध्यरात्रीं श्रीगुरुनाथांची शेजारति होईपर्यंत दक्षतेनें त्यांचे वर्तनांत छिद्र कोठें दिसतें काय पाहूं लागले. श्रुतिशास्त्रानें ज्या श्रीगुरुपर-ब्रह्माला " निश्चलं निर्मलं शान्तं निरवद्यं निरंजनं " म्हणून नित्यशुद्ध ठरविलें, त्या परमपवित्र गुरुस्वरूपीं मी दोष पाहीन, हा बापुजींचा आग्रह किंवा हेतु होय. पण तो सफळ कसा व्हावा ? गुरुकामधेनूजवळ बसून जरी त्यांनीं ती कामना धरली, तरी ती पूर्ण होणें शक्य नाहीं. मग श्रीगुरु कामधेनु कसे म्हणून विचाराल तर ऐका. ईश्वर जसा सर्वज्ञ आहे तसे ते

कामधेनु आहेत. ईश्वराला आपला अंत समजलेला नाहीं, तरी तो जसा सर्वज्ञच, तद्वत् दोष देखण्याचा हेतु पुरवितां आला नाहीं तरी श्रीगुरु भक्त-कामधेनुच ठरतात. ईश्वराला अंत नाहींच म्हणून तो त्याला समजत नाहीं असें म्हणाल तर श्रीगुरुपरब्रह्मालादेखील दोषच मुळीं नाहीं म्हणून तो पाहूं इच्छिणाऱ्याला ते दाखवूं शकत नाहींत, असें समजा. ईश्वर निजान्त सोडून बाकीचें सर्व जाणतो, म्हणून सर्वज्ञ होय. तसेच श्रीगुरूही आत्मदोष दर्शनेच्छा सोडून बाकीच्या सर्व भक्तेच्छा पूर्ण करतात; म्हणून ते कामधेनूच होत, ही गोष्ट सिद्ध झाली. असो.

बापुजींचा कुटिल हेतु कीं मी श्रीगुरुयतींचा दोष पाहीन. गंगूबाईला तो काय माहीत ? ती आपली खूष झाली. बापूजी महाराजांना पहात व त्यांचें भाषण ऐकत बसूं लागले. बरें झालें. आज ना उद्यां त्यांना धैर्य आल्यावर ते महाराजांचें तीर्थ घेतील व त्यांच्याशीं बोलतील. बरें, नाहीं तसें त्यांनीं केलें, तरीदेखील चालेल. नुसतें गुरुदर्शन किंवा त्यांच्या स्वैर गोष्टीसुद्धां एखाद्या वेळीं ऐकायला मिळाल्यास तेवढ्यानेंसुद्धां मनुष्य मुक्त होतो. तसे आमचे भावोजीदेखील कृतार्थ होतील, यांत मुळींच संशय नाहीं. झालें माझें कार्य, असा आनंद गंगूबाईना झाला. आपल्यासारखे सज्जनच बापूजी त्यांना भासले. संतांची दृष्टीच निर्मळ असते. बापूजी सत्संगी झाले म्हणून त्या हर्षित झाल्या. बापूजी भवसमुद्र तरलेच म्हणाल्या, आणि श्रीगुरूंनींदेखील त्यांना तसाच अनुभव पुढें दिला. तोच आतां वर्णून सांगतों.

'ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहं' म्हणजे 'भक्ताचें अनुकरण करणें, भक्त भजेल त्याप्रमाणें त्याला भजणें' हा गुरुपरमेश्वराचा स्वभाव होय. श्रीगुरूंनीं ओळखलें होतें कीं, पूर्वी वाडीमध्यें आपला परिचय त्यांना झाला असतांदेखील ज्याअर्थीं बापूजी आपणांशीं बोलत नाहींत, त्याअर्थीं यांचे मनांत आपणांबद्दल कांहींतरी विपरीत आलें असलें पाहिजे व ते जे दूर बसून राहतात, ते आपली परीक्षा पहात आहेत. ठीक आहे. हा भक्त जशा पद्धतीनें आपणांशीं वागतो, त्याच पद्धतीनें आपण त्याच्याशीं वागूं. तो बोलत नाहीं, तर आपण अबोलाच धरूं. बोलणें इच्छील तेव्हांच

बोलूं. आपण होऊन दूर असलेली उपाधि जवळ कशाला ओढून घेऊं ? असा श्रीगुरूंनीं विचार केला. त्यांना खरोखर कोणाची उपाधि नकोच होती. एका गुरुभक्तिवांचून ते सर्वत्र उदासीनच होते. गरुडेश्वरीं वासुदेवानंदांनीं स्वतःच असे उद्‌गार काढलेले आहेत कीं, " नरसिंहसरस्वती हे निर्वासन पुरुष आहेत. " ते त्यक्तोपाधी गुरुमुनि बुद्धिपूर्वक बापूजींना आपण होऊन या वगैरे कशाला म्हणतील ? आपलें अखंड गुरुध्यान कशाला सोडतील ? बापूजींप्रमाणें तेही तटस्थच राहिले. बापूजी परीक्षा पाहतात ना ? ठीक आहे. ती पुरी झाल्यावर ते बोलतील तेव्हांच आपणही बोलूं, असा निश्चय करूनच जणूं श्रीगुरु त्यांच्याशीं बोलले नाहींत. आपला नित्यक्रमच ते करीत राहिले. यतींचा चातुर्मास आठ आठवड्यांचा असतो. त्यांपैकीं सात आठवडे होऊन गेले. तरी बापूजी गुरुमहाराजांपाशीं जाईनात व कांहीं बोलेनातहि. महाराज काय बोलतात, काय करतात इत्यादिकच ते लक्षपूर्वक पहात होते. स्त्रियांबरोबर ते कसे वागतात इकडेच बापूजींचें सर्व लक्ष होतें. पण सातही आठवड्यांत त्यांना पाहायला जें पाहिजे होतें तें एकदांसुद्धां दिसून आलें नाहीं. गुरुमहाराजांचा तोच तोच नित्यक्रम त्यांना रोजचे रोज पहायला मिळे. महाराजांनीं स्नान केलें. छाटी, भस्म परिधान करून त्यांनीं आश्रमकर्म अनुष्ठिलें. गुरुपादुकांची पूजाआरती त्यांनीं केली. स्तोत्रें म्हटलीं. जपध्यान केलें. कोणाला मंत्रोपदेश दिला. कोणाला वेदान्त निरूपिला. केव्हां केव्हां वेदपठण ऐकलें. परमार्थाविषयींच्या कोणाच्या शंकाच दूर केल्या. रात्रौ अभंग, स्तोत्रें वगैरे म्हटलीं. भागवत वाचलें, शेजारती, पद्यें म्हटलीं. इत्यादि महाराजांचा चाललेला रोजचा भक्तिक्रम व भक्तोद्धारक्रमच बापूजी सातही आठवडे पहात होते. इच्छा नसतांदेखील त्यांना असें सहज गुरुमूर्तीचें ध्यान घडत होतें. त्यांच्या मुखांतली उपदेशसुधा बळेंच त्यांच्या उदरीं जात होती. असा प्रकार सतत चालू होता.

कोणाची इच्छा असो वा नसो, जाणून अथवा नेणून ' अमृत पोटांत गेलें कीं प्राणी हा अमर व्हायचाच ' ह्या नियमानुसार बापुजींची इच्छा जरी नव्हती, तरी पण त्यांना गुरुपरब्रह्माचें ध्यान, श्रवण, मनन वगैरे सतत घडत होतें. त्याचा परिणाम असा झाला कीं, धुंधुकारी (भूत) भागवताच्या

सप्ताहश्रवणानें प्रत्येक दिवशीं पापमुक्त होऊन, ज्या वेळवांत तो रहात असे त्या वेळवाचें रोज एक एक पर्व फोडून सातवे दिवशीं सातही पर्वांतून तो जसा बाहेर पडला, तद्वत् बापूजी प्रत्येक आठवड्यांत गुरुदर्शन, श्रवण इत्यादिकानें पापमुक्त होत होत सातव्या आठवड्याचे अंतीं आपल्या कुटिल बुद्धीचीं सर्व पर्वें फोडून तिच्यांतून ते पूर्ण बाहेर पडले. अर्थात् ते शुद्ध सत्त्व-गुणी सद्बुद्धिवान् झाले. जसजसें बापूजींना गुरुध्यान वगैरे घडूं लागलें तसतसें त्यांचें पाप जाळणारा अनुताप त्यांना होतच राहिला होता. शेवटीं पुरा पश्चात्ताप त्यांना झाला तेव्हां ते स्वगत म्हणाले, " निष्कलंक पावन अशा आपल्या चिन्मय किरणांनीं सर्व जगाला पवित्र करणाऱ्या श्रीगुरुसूर्यावर थुंकून त्याला मालिन्य लावूं पाहणाऱ्या मज अधमाचा धिक्कार असो !! श्रुतिशास्त्रांत वर्णिल्याप्रमाणें नित्य शुद्ध बुद्धमुक्त ब्रह्मच हे यतिराज आहेत, अशी माझी पूर्ण खात्री झाली. वासुदेवानंद गुरुमहाराजांनीं ही आपलीच दुसरी मूर्ति बनविलेली आहे. हे परम कारुणिक जगदुद्धारी पुरुष आहेत. मी यांची निंदा करून स्वतःच दोषी झालों. असें असून ह्यांनीं खरोखर माझा आज दुर्बुद्धींतून उद्धार केला. मला आपल्या सहवासानें पावन केला. ज्यांच्या भाषणामृतानें माझा नास्तिकत्वरूपी मृत्यु निवृत्त झाला ते श्रीगुरुमूर्ति धन्य होत. " इत्यादि. स्वतःची निंदा व श्रीगुरूंची स्तुति बापूजी मनांत करूं लागले.

आठव्या आठवड्यांत श्रीगुरुमूर्तीच्या पुढें ते आपण होऊन गेले. डोळ्यांतून दुःखाश्रु गाळीत, " चुकलों, चुकलों; क्षमा करा, क्षमा करा " असें म्हणत ते जमिनीवर महाराजांपुढें लोळूं लागले व म्हणाले, " मी अन्यायी आहें, आपला सन्मान मी केला नाहीं. उलट माझ्या वहिनींजवळ मी आपली निंदा केली. मला अनुतापाग्नी जाळतो आहे. पापपंकांत मी बुडून गेलों आहें. मज पतिताचा उद्धार दयावंतांनीं करावा. मला आपला दास बनवावा. " इत्यादि बापूजी जेव्हां बोलूं लागले. तेव्हां सद्गुरुनाथ हंसले. कोमल मनाचे प्रेमळ श्रीगुरुमुनी बापूजींना म्हणाले, " बापूजी ! आमच्या गुरुमहाराजांवर आपण कां बरें रुसलां होतां ? त्यांचा प्रसाद घ्यायला इतर भक्तांप्रमाणें बरेच दिवसांत कां बरें आलां नाहीं ? " बापूजी निरुत्तर झाले. महाराज म्हणाले,

" बरें, झालें तें झालें. आतां तरी हा प्रसाद घ्या. " असें म्हणून गुरुमाउलीनें एक फळ वासुदेवमूर्तीला अर्पण करून प्रेमानें बापूंकडे पहात त्यांच्या हातांत घातलें. त्यांना गुरुतीर्थ दिलें. त्याचा स्वीकार बापूजींनीं केला. तेव्हां दोघांनाही परम आनंद झाला. जीव पापबुद्धींतून सुटला म्हणून श्रीगुरु सुखी झाले व भक्त-देखील त्याच कारणानें म्हणजे सुखाला प्रतिबंधक जी पापरूपी दोषबुद्धि ती गुरुमहिम्यानें नष्ट झाली म्हणूनच सुखी झाला. सत्पुरुषांचा संग कोणत्याही बुद्धीनें जरी केला तरी त्याचें फळ सुखप्राप्तीच होय. याबद्दल बापूजी हेंच उदाहरण समजा. शुद्ध, सत्त्वगुणी बनलेले बापूजी मनुष्याचे देवच झाले म्हटलें तरी शोभेल. देवचसे काय, पण श्रीगुरूंना त्यांनीं आपल्या घरीं नेऊन भक्तीनें त्यांची पूजा केली. त्यांच्या मुखानें मंत्रोपदेश घेतला व गुरुरायाचा दयाहस्त जेव्हां त्यांनीं आपल्या मस्तकावर ठेवून घेतला तेव्हां अष्टभावांनीं युक्त होत्साते ते परब्रह्मच झाले व गुरुमहाराजांचे अनन्य भक्त होऊन ज्या स्त्रियांना ते पूर्वी मूढ समजले त्याच मोठ्या भाग्यवान् गुरुकृपापात्र संतिणी आहेत असें ते मानते झाले. निरभिमानानें त्यांचीसुद्धां ते गुरुनाथांप्रमाणें सेवा करूं लागले. महाराज जेव्हां पुढें गांव सोडून जाऊं लागले तेव्हां तर त्यांनीं गुरुविरह सोसवेना म्हणून रडून आकान्त केला. असा श्रीगुरुनाथांचा त्यांना प्रेमा आला. सत्पुरुषांचे सहवासानें स्वभाव पालटतो तो असा. अस्तु.

गंगूबाईचे घरीं देवपूजा करणारा नानाजी नामक एक ब्राह्मण होता. श्रीगुरु हे साक्षात् महाविष्णूच होत, अशी त्याची दृढ बुद्धि झाली. विष्णूला अलंकार प्रिय आहेत, हें जाणून प्रभुरायाच्या संतोषार्थ नानाजी त्यांची भक्ति करूं लागले. अर्चनभक्तीच त्यांनीं केली. ती अशी–ते रोज स्वतः बगीचांतली जुईचीं फुलें काढून आणीत. तीं मोजून त्यांचे हार बनवीत व श्रीगुरुभगवंतांच्या गळ्यांत घालीत. पंधरा दिवसांत या प्रमाणें करतां त्यांच्या मनाप्रमाणें फुलांचा एक लक्ष श्रीविष्णुमूर्ति नृसिंहसरस्वतींना अर्पण झाला. सुमनाबरोबर मनःसुमनसुद्धां नानाजींनीं श्रीगुरूंना अर्पण केलें. त्यानें प्रसन्न झालेल्या प्रभूंनीं भक्ताला स्वकंठाभरण मानला. फुलांचें कंठाभरण घालणारा नानाजी स्वतःच गुरुकंठभूषण झाला. म्हणजे श्रीगुरूंना अत्यंत प्रिय

झाला. धन्य तो नानाजी, जो गुरुमुखें उपदेश घेऊन संसारसमुद्रांतून तरून गेला !

नर्मदातीरीं कर्नाळी ग्रामीं गुरुमहाराजांना ज्यांनीं विनंतिपत्र पाठवून समागमाची मागणी केली होती व ज्यांना श्रीगुरूंनीं " योग आल्यावर, आम्ही तुमचे गांवींच येऊन तुमची इच्छा पुरवूं " असें कळविलें होतें, ते उमरेडचे दादासाहेब नाईक कायर मुक्कामीं येऊन गुरुराजांना भेटले. कांहीं दिवस त्यांचे सहवासीं राहून त्यांनीं परमार्थ ऐकला, व चातुर्मास होतांक्षणीं आपल्याकडे येण्याला त्यांना प्रार्थून ते गांवीं गेले. नंतर चातुर्मास पुरा झाल्यावर भाद्रपदी पौर्णिमेला सीमोल्लंघन करून श्रीगुरु आले व गुरुभक्त गंगूबाई देशपांडे यांना प्रसाद देऊन त्यांचें समाधान करून उमरेडला निघाले तेव्हां नास्तिकाचा आस्तिक व टवाळाचा सज्जन बनलेला बापूजी देशपांडे गंगूबाईचा दीर सद्गुरु नृसिंहसरस्वतींच्या वियोगव्यथेनें मोठ्यानें रडूं लागला. " गुरुमहाराज ! आपण गेल्यावर मी कोणाकडे पाहून समाधानांत राहूं ? कोणाचा अमृतमधुर हितोपदेश ऐकूं ? माझ्या जीवाला कोण शान्ति देईल ? " असें म्हणून रस्त्यांत महाराजांपुढें आडवा पडला. त्यांची समजूत श्रीगुरुमाउलीनें दयादृष्टिपूर्वक अमृतवाणीनें केली. बापूजीला भक्तमानस-सरोवर-विहारी श्रीगुरु परमहंस म्हणाले, " आम्ही भक्ताला सोडून केव्हांही रहात नाहीं बरें ! विवेकदृष्टीनें अंतरांतच पहा म्हणजे आमची अखंड भेटच आहे, असें तुम्हांला कळून येईल. सकळांचा बुद्धिसाक्षी जो आत्मा तेंच आमचें सत्यस्वरूप आहे. शोक करूं नका. आत्मचिंतनांत असा. म्हणजे सर्व दुःखें जाऊन पूर्ण शान्ति तुम्हांला मिळत राहील. " इत्यादि तात्त्विक विचार सांगून श्रीगुरुमूर्तीनीं भक्ताचें समाधान केलें व आगगाडींत बसण्यासाठीं वणी गांवीं आले. तेथें गंगूबाईची नणंद होती. तिनें श्रींना दोन दिवस आपल्या घरीं नेऊन ठेवून घेतलें. त्यांची भक्ति केली. नंतर पुराणिक म्हणून सद्भक्त तेथें होते. त्यांनीं आपल्याकडे दोन दिवस श्रींना ठेवून घेतलें. पुराणिकांची भक्ति मोठी. त्यांनीं श्रींना नव्या छाटद्या दिल्या व त्यांच्या भक्तगणांतील पुरुषांना धोतरें दिलीं. पूजा, भजन, भोजन वगैरे समारंभ करून आपण स्वतः गुरुमहाराजांपुढें प्रेमळपणानें कीर्तन केलें. महाराज खूष झाले. आपला

दिव्य प्रसाद त्यांना त्यांनीं दिला. पुराणिक धन्य झाले. कृष्णंभट, बाळू, कमळा व ताई असे चार शिष्यगण वणींतून स्वदेशीं आले. त्यांतले बाळू (बाळकृष्ण श्रीपाद जेरे पुजारी वाडीकर) हे पुढें काशीला जाऊन अध्ययन करीत राहिले. हे बाळु ब्रह्मचारीच अखेरीला श्रीगुरूंची सेवा अयोध्येमध्यें करते झाले. वणीहून गुरुमहाराज निघाले. त्यांनीं आपल्या संगें तासगांवकर, यमुताई जोशी, अनुताई आणि आपल्या वृद्ध भगिनी आत्याबाई इतकी मंडळीच घेतली व त्यांच्यासह उमरेडला ते गेले.

दादासाहेब नाईक यांनीं स्टेशनावरून श्रीगुरूंची स्वारी दिव्यांच्या लखलखाटांत वाजतगाजत समारंभानें आपल्या वाड्यांत नेली. वाड्यांत जातांक्षणीं सुवासिनी स्त्रियांनीं महाराजांचे पाय धुऊन त्यांना आरत्या ओंवाळल्या. माडीवरील दिवाणखान्यामध्यें श्रींना नेऊन दादांनीं विराजित केलें. दादा हे व्यापारी श्रीमंत सावकार होते. गांवोगांवीं त्यांच्या पेढ्या होत्या. श्रीगुरुमूर्ति हे साक्षात् प्रेमूर्ति भगवान श्रीदत्तात्रेयच आहेत, आपल्या वाडवडिलांच्या पुण्याईनें यांचा मला लाभ झाला. मी आतां यांच्या कृपेनें यांची सेवा करून संसारसमुद्र तरेन असा निश्चयात्मक भाव दादांचा होता. आपल्या घरदार मालमत्तेचे मालक श्रीनृसिंहसरस्वतीच आहेत. मी त्यांचा दास आहें, असें ते समजत. गुरुमहाराजांची सेवा त्यांनीं मोठ्या प्रेमानें केली. दोन महिने श्रीगुरूंना त्यांनीं आपल्या घरीं ठेवून घेतलें. रोज महाराजांना सुवासिक अत्तरें लावून ते अभ्यंगस्नान घालीत. स्त्रिया, मुलेंबाळें व आपण सर्वच मिळून गुरुमूर्तीचे अंगाला ते तेलें, अत्तरें वगैरे लावीत. सर्व मिळूनच त्यांचें अंग चोळीत व त्यांना चांदीचे घंघाळांतून चांदीचे तांब्यांनीं उष्णोदक घालीत. रंगवल्ली काढून चांदीच्या फुल्या मारलेल्या रंगीत चंदनी पाटावर सगुणसुंदर नरसिंहसरस्वतींना बसवून पंचामृतस्नानपूर्वक जेव्हां ते त्यांच्यावर अभिषेक करीत तेव्हां मुखानें रुद्रसूक्त म्हणून श्रीदत्तप्रभूलाच तो अभिषेक ते करीत. नंतर नव्या उमरेडी जरीच्या छाट्या ते त्यांना नेसवीत. त्यांना केशरकस्तुरीमिश्रित चंदन लावीत सुवासिक फुलांचे हार त्यांच्या गळ्यांत घालीत, त्यांना उदबत्त्यांचा सुवास देत, तुपाचे दिवे ओंवाळीत. नैवेद्य म्हणून नित्य नवी फलहारी मधुर उंची पक्वानें त्यांना अर्पण करीत. आपण आरती म्हणून निरांजनें ओंवाळीत

मंत्रपुष्प वाहीत, स्तोत्रें म्हणून सर्व मंडळी 'श्रीगुरुनृसिंहसरस्वती दत्त-महाराजकी जय' असा जयजयकार करीत व सर्व श्रीगुरुचरणीं आपलीं मस्तकें ठेवीत. गुरुमहाराजांचा पद्महस्त आपल्या शिरावर ठेवून घेत. त्यांच्या हातचें तीर्थ घेऊन पीत. प्रसाद मागून घेऊन सेवन करीत व धन्य झालों असें म्हणत. रोज दुपारी भिक्षेला गवें गवें पंचवीस करून विशेष ब्राह्मण आप्तइष्टमित्रांसमवेत श्रीगुरूंना पंक्तीस भोजन घेण्याचें देत. गुरुमहाराजांचा नियम की, जेवतांना सर्वांनीं भजन करीत जेवावें. त्याला अनुसरून पंगती-मध्यें 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' हया भजनाचा गजर जेवतांना चालूच असे. भोजनोत्तर महाराजांना वेलची वगैरे मुखवासार्थ देत. एकंदरींत राजथाटानें नाइकांनीं श्रीगुरुमुनींची सेवा चालविली. श्रीगुरूंना राजथाट किंवा वनवास दोन्ही तुल्यच होते. निजानंदानें नित्य तृप्त असणाऱ्या योगीश्वरांना सर्व जगच जिथें नाहीं असें झालें, तेथें दादासाहेबांचें मोजकें ऐश्वर्य तें काय ? श्रीगुरु गरिबाच्या घरीं कण्या खाऊन जो आनंद मानीत तोच आनंद श्रीमंताच्या पंचपक्वानांतदेखील मानीत. चांदीसोनें, दगडमाती, त्यांना समानच होय. राजवाडा किंवा झोपडी त्यांना सारखीच भासे. मृदु-मंचकशयन किंवा तृणभूमिशयन त्यांना सारखेंच सुखदाई गमे. ज्यांच्या स्वानंदाला कधींच कमीजास्तपणा होणें नाहीं, तिन्ही अवस्थेंत त्रिकाळीं जे निरतिशय परिपूर्ण ब्रह्मानंदच होऊन राहिले होते, त्यांच्या आनंदाला कोणत्या अन्य मिथ्या वस्तूची जरूर असणार !! केवळ भक्तलोकांच्या प्रेमास्तव ते त्यांनीं दिलेले उपचार घेत असत. भगवान भक्तिप्रियच आहे. भक्तिभावावांचून श्रीगुरु दुसऱ्या कशाचाही अंगीकार करीत नव्हते.

दादासाहेबसुद्धां श्रीमंतीला विटलेच होते. त्यांना श्रीगुरुकृपालभ्य अशी शाश्वत सुखशान्तिच पाहिजे होती. म्हणून तर त्यांनीं गुरूंची वर सांगितलेली सर्वस्वार्पण भक्ति केली. त्यांनीं अनन्यभावानें शरण जाऊन श्रीगुरुनाथां-जवळ आत्मज्ञानाची मागणी केली. तेव्हां प्रसन्नमन झालेले भगवान नृसिंहप्रभु त्यांना म्हणाले कीं, " दादा ! तुमच्या भक्तीला वश होऊन श्रीवासुदेवानंद गुरुराज येथें आले. ते तुमची इच्छा पुरी करतील. " नंतर रोज महाराजांनीं 'जीवन्मुक्तिविवेक' नांवाचा संस्कृत ग्रंथ त्यांना सांगायला सुरुवात केली.

चौथ्या प्रहरीं सायंसंध्येची वेळ होईपर्यंत रोज दोन महिनेपर्यंत श्रीगुरूंनीं दादांना ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला. झालेलें ज्ञान दृढ व्हावें म्हणून वासनाक्षय व मनोनाश यांचा करायला पाहिजे असलेला अभ्यासदेखील त्यांना गुरूंनीं सांगितला. जनकाचे पुढें याज्ञवल्क्यमुनी अथवा परीक्षितापुढें शुकाचार्ययोगी, तसे गुरुभक्त नाइकांपुढें श्रीनृसिंहयोगींद्र उपदेश करतांना शोभत होते. श्रीमंतकुळीं जन्मलेले दादासाहेब नाईक पूर्वीचे योगभ्रष्टच होते म्हणून आणि ब्राह्मानुभवप्रवीण श्रीगुरुमुनी पूर्ण समर्थ होते म्हणून गुरुशिष्यांचा विद्यादान-ग्रहणाचा हव्यास पुरा व्हायला उशीर लागला नाहीं. श्रीगुरूंच्या कृपेनें दादासाहेब नाईक (लक्ष्मणपंत) पूर्ण ज्ञानी झाले. ब्रह्मानंद त्यांना मिळाला. कृतार्थ होऊन स्वतः पथें रचून त्यांनीं कृतज्ञतापूर्वक श्रीगुरूंची स्तुति केली. श्रीगुरूंनीं दादांकडून नवीन 'नित्यपाठक्रम' नांवाचें पुस्तक छापविलें. त्यांत दादांचीं पदें आहेत. 'दत्तमाहात्म्य' नांवाचा टेंब्येमहाराजांचा ग्रंथदेखील श्रीगुरूंनीं दादांकडून छापविला.

श्रीगुरुनाथ एकदां दादासाहेबांबरोबर पवनीला गेले. तेथें वासुदेवानंद गुरुमहाराजांचा बसायचा पाट पूजा करून ठेवलेला आहे. त्याची भक्तिभावानें पूजा करून श्रीपाद श्रीवल्लभाची पुण्यतिथि म्हणजे गुरुद्वादशी श्रीगुरूंनीं उत्सव करून साजरी केली व ते परत उमरेडला आले.

नंतर दादासाहेबांनीं त्यांना माढळ नामक गांवीं नेलें. तेथें चमत्कार झाला. मारुतिमहाराज नांवाच्या सत्पुरुषांनीं तेथें मारुतीच्या मंदिरांत उंच ठिकाणीं एक दगडी पाळणा सांखळदंडांनीं बांधून ठेवला आहे. सत्पुरुष तपासण्याची ती कसोटीच होय. तो पाळणा कधींच हालत नसतो; पण श्रीगुरुनाथ त्या मंदिरांत पाय टाकतात तोंच तो झोंके खाऊं लागला हाच तो चमत्कार झाला ! पाळणा हालतांना जेव्हां ग्रामस्थांनीं पाहिला, तेव्हां सर्व ग्रामस्थ धांवत येऊन महाराजांचे पायां पडले व महाराजांना म्हणाले कीं, " आपण परमेश्वरी विभूति महासत्पुरुष आहांत म्हणून हा पाळणा आज तुम्ही येतांक्षणीं डोलूं लागला. आज मारुतिमहाराज समाधिस्थ होऊन पुष्कळ वर्षें झालीं. कोणी आपल्यासारखा महापुरुष आला, तरच हा पाळणा असा डोलतो, एरवीं कधींच

हालत नाहीं, असा याचा रिवाज आहे. मारुतिमहाराजांनीं याला असाच वर दिला आहे कीं, ' जेव्हां कोणी भगवद्विभूति येईल तेव्हां तुला डोल उत्पन्न होईल.' कित्येक वर्षांत हा हालला नव्हता, तो आज हालला. यावरून आम्हांला आपण ईश्वरच दिसतां. असें म्हणून माढळकर लोक श्रीगुरूंच्या पायां पडले. महाराज त्यांना म्हणाले कीं, " तुमचे मारुतिमहाराज येथें जागृत असल्याची ही खूण होय. आमचा यांत कांहीं संबंध नाहीं. त्या सत्पुरुषांची भक्ति तुम्ही करीत जा. म्हणजे ते तुमचें कल्याण करतील." श्रीगुरूंना आपलें महत्त्व ऐकणें आवडत नसे. येथून श्रीगुरु पुन्हां उमरेडला आले.

कार्तिकी पौर्णिमेला श्रीगुरूंचा क्षौरविधि-समारंभ उमरेडांत झाला तसा दुसरीकडे झालेला नाहीं. उमरेडहून तीन मैल दूर आमगंगा व वांझोटी या नद्यांचा संगम आहे. तेथें लक्ष्मणराव ऊर्फ दादासाहेब नाइकांनीं श्रीगुरूंना पुष्पहारांनीं सुशोभित करून शृंगारलेल्या रथांतून ध्वजापताकादिकांनीं शृंगारलेल्या रस्त्यानें नाना वाद्यें वाजवून भजन करीत मोठ्या समारंभानें नेलें. संगमाचे घांटावर सुशोभित मंडपांत यतिवर्यांचा क्षौरविधि झाल्यावर स्नानाचे वेळीं सर्व भक्तांनीं गुरुवर्यांबरोबर अवभृत स्नानाचा अपूर्व लाभ साधला. गुरुचरणोदकांत बुडया मारून त्यांनीं आपल्या भवसमुद्रांतल्या बुडया चुकविल्या व गुरुहस्तोदक अंगावर घेऊन परमामृताचा लाभ करून घेतला. यथाविधी स्नानानंतर श्रीगुरु आसनावर बसून संध्या करूं लागले असतां एक चमत्कार तेथें झाला तो असा—

एक सोनारीणबाई बहु दिवसांची दुखणाईत होती. औषधादिकांनीं तिला कांहीं गुण आला नव्हता. गुरुपरमेश्वरांविषयीं त्या बाईनें ऐकिलें होतें कीं, हे श्रीदत्ताचे अवतार आहेत. त्याचा अनुभव घ्यावा म्हणून ती बाई भक्तीनें उमरेडांतून यात्रेबरोबरच संगमावर आली. सर्वांसंगें ती गुरुसवें गंगेंत स्नानाला मात्र उतरली नाहीं. तिच्या अंगांत गुप्तरीतीनें पिशाच रहात असे. त्यानें तिला तसें दूरच रहायला लावलें. बाई मात्र मनांतून श्रींची प्रार्थना करीत होती कीं, ' भक्तवत्सल दीनदयाळ श्रीगुरुस्वामींनीं मजवर दया करावी, व मला दुस्सह दुःखांतून वर काढावी. ' ही त्या दुःखीकष्टी

बाईची प्रार्थना सर्वज्ञ श्रीगुरूंना ऐकूं गेली. त्यांना तिची दया आली व त्यांनीं आपण संध्येचें पाणी सांठविलेलें पात्र पाणी टाकण्याच्या उद्देशानें वर उचललें व दयाळूपणानें तें पाणी दुसरीकडे न फेंकतां सोनारीणबाईंच्या अंगावरच फेकलें. समंधाला तो त्यांनीं मारच दिला. त्यासरशीं गुप्त असलेला तो पिशाच त्या बाईच्या अंगांतून प्रगट झाला. तेव्हां ती बाई किंकाळली व महाराजांपुढें नाचून म्हणूं लागली कीं, " मी जातों. मला मारूं नका. आतां या बाईला मी छळणार नाहीं. " असें म्हणून तो दुष्ट पिशाच महाराजांचे पायां पडला व निघून गेला. त्याबरोबर सोनारीणबाई शुद्धीवर आली. तिला आनंद झाला. तिच्या रोगपिडा नष्ट झाल्या. तिनें महाराजांची स्तुति केली. " तुम्ही साक्षात् श्रीदत्तभगवान आहांतच. मला आपला आज अनुभव आला. " असें ती म्हणाली. सर्व लोकांना महाराजांचा मोठा चमत्कार वाटला. त्यांनींसुद्धां, ' श्रीदत्तभगवान श्रीनरसिंहसरस्वतीस्वामीमहाराजकी जय ' असा जयघोष केला. नंतर गुरुमहाराजांनीं गुरुपूजा केली. सर्वांचे फलहार झाले व जसें वाजतगाजत भजन करीत महाराजांना दादासाहेबांनीं संगमावर नेलें तसें परत रथांतून त्यांना आपल्या वाडयांत आणलें. येतांना नागरिकांनीं गुरुरथावर फुलें, लाह्या, बत्तासे, खारका, बुक्के, रुपये वगैरे उधळले.

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिता : ।
भजंत्यनन्य मनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययं ॥

अर्थ—दैवी प्रकृतीचा आश्रय केलेले महात्मे मला अव्यय जगदीश्वराला अन्यय भक्तीनें जाणून भजतात.

श्रीकृष्णाचा हा अनुभव होय. हाच अनुभव श्रीगुरूंनादेखील मागें वर्णिलेल्या लक्ष्मणरावांच्या भक्तीनें आला. तद्वत्—

अवजानन्ति मां मूढ मानुषीं तनुनमाश्रितं ॥
परंभावमजानंतो मम भूत महेश्वरं ॥ १ ॥

अर्थ—मनुष्यशरीर धारण केल्यामुळें मला ईश्वर न समजतां मूढ लोक माझी अवज्ञा करतात.

हा दुसरा कृष्णानुभवदेखील श्रीगुरूंना वाडी किंवा गरुडेश्वर सोडतांना आलेल्या पूर्वी वर्णिलाच आहे.

उमरेडकर नाईक किंवा अन्य भक्त हे सर्व दैवी प्रकृतीचे पुरुष महात्मेच होत म्हणून ते अनन्य भावानें श्रीगुरु परमेश्वराला जाणून भजत होते. त्यांच्या भक्तीचें फळ जे श्रीगुरु ते त्यांना कृपेचें शीड पालाणून ज्ञाननौकेंतून स्वयें कर्णधार बनून भवसिंधूच्या पार आत्मपदीं नेते झाले.

नंतर दादासाहेबांनीं श्रीगुरूंना आपल्या 'कुही' नामक मूळ गांवीं नेलें व त्यांना दहा बारा एकर जमीन अर्पण केली. तेथून वेलतूर, मालची इत्यादि गांवीं नेऊन आपलीं दुकानें दाखवून त्यांना परत उमरेडला आणलें.

नंतर भागवतवार नामक भक्ताबरोबर श्रीगुरु तळोधीला जातांना वाटेंत कडोशीचा पाटील त्यांचा शिष्य झाला. त्यानें प्रेमानें महाराजांना पांडवांचीं स्थानें दाखविलीं. तेथें तळांत पाऊलभर पाणी असलेलें एक तीर्थकुंड होतें. तीर्थस्नानार्थ श्रीगुरु त्यांत उतरले. तों चमत्कार असा झाला कीं, एकाएकीं आंतून बुडबुडे सुरू झाले व बुडी मारतां येईल इतकें पाणी कुंडांत वाढलें. त्यांत महाराजांनीं स्नान केलें. सर्व लोकांना तो प्रकार मोठाच आश्चर्यजनक झाला. श्रीगुरूंचा सत्कारमानच तो तीर्थदेवतेनें केला.

श्रीगुरुयोगींद्रांचे मनांत स्नान करण्याचें येतांच सत्यसंकल्पाचें फळच असें तीर्थोदक भरपूर तयार झालें. संकल्पसिद्धीचा चमत्कार आणखी एकदां श्रीगुरुनाथांनीं दाखविल्याची गोष्ट मागें सांगायची राहिली. ती यावेळीं स्मरली म्हणून सांगतों. ती अशी—महाराष्ट्रांत सांगलीनजिक अष्टें नांवाच्या गांवीं श्रीगुरुमुनी होते. त्यांना ग्रामस्थांनीं एकेक दिवस आपल्या घरीं भिक्षेला नेलें. पुढें श्रीगुरु अमरापुरीं जाणार असल्यामुळ कोणी त्यांना भिक्षेला या म्हणून विनंति केली नाहीं. श्रीगुरुनाथांबरोबर तेव्हां दहाबारा भगवद्भक्त दिंडीगण होतेच. त्यांच्यासह एका मोटारींतून ते निघणार होते. सर्व मंडळी प्रवासाची तयारी करून आपापलीं गांठोडीं बांधून बसली. पण बराच वेळ वाट पाहून-देखील त्या दिवशीं मोटारच आली नाहीं. दुपार होत आली. मोटार नाहीं. ग्रामस्थांचें श्रीगुरूंना आमंत्रण नाहीं. स्वतःशीं कोणत्याही गोष्टीची तयारी

नाहीं. आतां माध्यान्हकाळीं सर्वांचीं भोजनें कशीं व्हायचीं ? असा भक्तांना मोठा विचार पडला. ही गोष्ट गुरुमहाराजांपुढें त्यांनीं काढली. तेव्हां " तुम्ही कांहीं काळजी करूं नका. आपले गुरुमहाराज आम्हांला सोडून ग्रामस्थ ब्राह्मणांना जेवूं देणार नाहींत. ते आम्हांला सोडून कसे जेवतात तें आम्ही पाहूं !! " असे उद्‌गार श्रीगुरूंनीं काढले. एकदां मनांत एखादी गोष्ट श्रीगुरूंनीं ठरविली कीं ती घडून आलीच पाहिजे असा नियमच होता. " ग्रामस्थ आम्हांला सोडून करो जेवतात तें आम्ही पाहूं. " ह्या श्रीगुरूंच्या भाषेचा अर्थ असा होता कीं, " आम्हीच आज ग्रामस्थ ब्राह्मणांना आपल्या पंगतिप्रसादाला बोलावूं आणि त्यांच्यासहितच भिक्षा करूं " असा संकल्प श्रीगुरु करून बसले. योगाचीं आसनें ते अष्टेकर ब्रह्मचारीबुवांना करून दाखवूं लागले. इतक्यांत अर्धघटिका होते न होते तोंच एक मनुष्य शें-दोनशें मनुष्यांना पुरावा इतक्या पाकाचा सर्व शिधा भरलेली गाडी घेऊन तेथें आला. श्रीगुरुनाथांना त्यानें येऊन नमस्कार केला व म्हणाला, " महाराजांनीं आपल्या भक्तगणांसह आज माझी भिक्षा स्वीकारावी. " महाराज म्हणाले, " ठीक आहे. ग्रामस्थ ब्राह्मणांनासुद्धां मुलाबाळांसह आमंत्रण द्या. " अशी गुर्वाज्ञा होतांच त्यानें ग्रामस्थांना गुरूपाशीं प्रसादाला बोलाविलें व गुरुभक्तगणांत स्त्रिया होत्याच, त्यांचेकरवीं सर्व स्वयंपाक एक तासांत सिद्ध केला. केळीच्या पानापासून सर्वच सामान त्याचे गाडींत होतें. गुलाल, रांगोळी घालून त्यानें पानें मांडलीं. पाक वाढून तयार झाल्याबरोबर गुरुमहाराजांनीं ग्रामस्थांना घेऊन त्यांच्या स्त्रियापुत्रांसहित आनंदानें आपल्या भक्तगणांसह लाडवांचा व तुपाचा आग्रह भोक्त्यांना करीत करीत आपण भिक्षा केली. भिक्षा देणाराही नंतर आनंदानें प्रसाद घेता झाला. सर्वांना मोठा चमत्कार वाटला. ह्या चमत्काराचे दिवशीं गुरुभक्त लक्ष्मणराव बोठे फुलारी वाडीहून गुरुमहाराजांना फुलें घेऊन तेथें गेले होते. त्यांनीं ही गुरुलीला प्रत्यक्ष पाहिली. अस्तु.

श्रीगुरूंनीं उपासनापद्धत घालून छापविलेली ' नित्यपाठक्रम-दत्त-भजन माला ' नांवाचीं पुष्कळशीं पुस्तकें उमरेड येथून अमरापुरला शंकरराव कुलकर्ण्याचें नांवावर पाठविलीं व हीं पैसा न घेतां मोफत सर्वांना द्यावीं

अशी त्यांना आज्ञा केली. श्रीगुरूंनीं सांगितल्याप्रमाणें ते मागणारांना पुस्तकें फुकट देऊं लागले. वस्तु महत्त्वाची का असेना ? पण ती फुकट मिळूं लागली कीं लोक तिचा अनादर करतात, या गोष्टीचा अनुभव शंकररावांना आला. एकाचे घरीं त्यांनीं वरील पुस्तक बेपर्वाईनें अयोग्य स्थळीं टाकलेलें पाहिलें. तेव्हां त्यांच्या मनाला फार वाईट वाटलें. लगेच त्यांनीं श्रीगुरूंना पत्रानें ती हकीगत कळविली व थोडें तरी मोल घेण्याची परवानगी म्हणा किंवा कांहीं तरी दुसरी तोड विचारली कीं जेणेंकरून लटर फटर अभक्तांना-सुद्धां तीं पुस्तकें घेतां येऊं नयेत. त्यावर श्रीगुरूंनीं त्यांना मोलाची परवानगी तर दिली नाहींच पण योग्य मनुष्यालाच तें पुस्तक मिळावें अशी तोड मात्र सांगितली. ती ही कीं, " अमरेश्वराला अमुक इतक्या प्रदक्षिणा घालायला किंवा एखादा गुरुचरित्र सप्ता वाचायला सांगून तसें करणारालाच तुम्ही पुस्तक देत जा. देवाची कोणती तरी सेवा करवून घ्या व नंतर तें पुस्तक भक्ताला देत जा." असें उत्तर श्रीगुरूंनीं शंकररावांना पाठविलें. तेव्हांपासून मग ते तसे करूं लागले. पुढें एकदां असें झालें कीं, एक मनुष्य शंकररावांपाशीं तें पुस्तक मागूं लागला. दास नांवाचा तो मनुष्य होता. त्याला " तूं गुरुचरित्राचा एक सप्ता अमरेश्वरासन्निध वाच म्हणजे मी तुला तें नित्यपाठक्रमाचें पुस्तक देईन, " असें शंकररावांनीं सांगितलें. त्या भोळ्या भक्तानें सप्ता प्रारंभला. श्रीगुरुनाथ अमरापुरांतचसे काय, सर्वत्र व्यापून आहेतच. त्यांना ते सप्ता-वाचनानें भक्ताला होत असलेले कष्ट पहावेनात. त्यांचें मन कोमल होतें. इतके कष्ट आपण याला देऊं नयेत असें त्यांचे दयार्द्र हृदयाला वाटलें. तीन दिवसांचा वाचनक्रम पुरा होतांच त्याच रात्रीं शंकररावांना, त्यांच्या स्वप्नांत साक्षात् जाऊन, भक्ताकडे बोट दाखवून, 'याला तें पुस्तक तूं दे' अशी आज्ञा श्रीगुरूंनीं केली. महाराजांनीं प्रत्यक्ष येऊन असें सांगतांच गुरुदर्शनाचा लाभ मला झाला म्हणून आनंदित होऊन शंकररावांनीं दुसरे दिवशीं म्हणजे सप्त्या-पैकीं चौथे दिवशीं गुरुचरित्र भक्त वाचीत बसला असतां, त्याचे पुढें पुस्तक नऊन ठेवलें व झालेला दृष्टान्त त्याला सांगितला. तो ऐकून श्रीगुरुमहाराजांचें भक्तवात्सल्य जाणून त्याचे नेत्र प्रेमाश्रूंनीं भरले. दयाळू, दीननाथांच्या भक्तानें तर तो सप्ता पुराच केला. पण श्रीगुरुनाथांना मात्र तो भक्त कष्ट-

लेला सहन झाला नाहीं. सप्ता पुरा होण्यापूर्वीच त्यांनीं त्याची इच्छा पूर्ण केली. श्रीगुरु हे कल्पतरूच होत. नुसते कल्पतरु नसून सर्वज्ञ व दयाळू कल्पतरु होत.

प्रकरण २० वें

उमरेडांतून श्रीगुरु नंतर गुरुभक्त ताम्हन यांच्या भक्तिस्तव भिवापुरला गेले. पौष शुद्ध द्वितीयेला अमरापुरांत जो घेवडयाचे शेंगांचा उत्सव होतो, तो उत्सव म्हणजे गुरुचरित्रग्रंथांतील माधवनंदन श्रीनरसिंहसरस्वती दत्त-भगवंतांचा तो जन्मोत्सव होय. ताम्हन यांनीं तो उत्सव केला. श्रीगुरुवर्य हे साक्षातच नरसिंहसरस्वती त्यांना मिळाले. आनंदानें त्यांनीं महाराजांचीच सर्वोपचारांनीं महापूजा केली. श्रीगुरुमहाराज पौषी पौर्णिमेपर्यंत ताम्हन यांचेकडे राहिले. तेथें पौर्णिमेला जो क्षौरविधि–समारंभ झाला, तो उमरेड-प्रमाणेंच झाला. एका भक्तानें गुरुमहाराजांना परावाणीचें स्वरूप विचारलें. महाराज म्हणाले, " ती वाणी आत्म्याप्रमाणें अनुभवगम्य आहे, तोंडानें सांगतां येणारें तिचें स्वरूप नाहीं. याशिवाय वेदान्तविषय महाराजांकडून भक्तांनीं बहुत ऐकला. गुलाबराय महाराजांच्या बाबाजी नांवाच्या शिष्यांनीं तो ऐकून आपणांला मोठा अपूर्व लाभ झाला, असे उद्‌गार काढले. येथून श्रीगुरु परत उमरेडला आले.

ज्या ज्या गांवीं श्रीगुरुनाथांची स्वारी गेली, तेथें तेथें पुष्कळांनीं त्यांच्या-कडून गुरूपदेश घेतले व ते परमार्थाला लागले. श्रीगुरुनाथ एवढयाकरितांच कोण बोलावील त्यांच्याकडे जात होते. जगदुद्धाराशिवाय त्यांना दुसरें कर्तव्य-च उरलेलें नव्हतें व तें कर्तव्यसुद्धां त्यांचें सहजच चालू असे. प्रयत्नपूर्वक ते कांहींच करीत नव्हते. गुरुभक्ति हीसुद्धां त्यांची वळणाचीच झालेली होती. त्यांचें सहज बोलणें हितोपदेशाचेंच असे, व सहज चालणें हें भक्तिधर्माचेंच असे. त्यामुळें सर्वत्र सर्वकाळ जगदुद्धारच त्यांचेकडून होत राहिला होता. ते

स्वतः आत्मानंदांतच सदोदित समरस होऊन राहिलेले असत. देह असतांनाच ते विदेहमुक्ती उपभोगीत होते. ही जीवन्मुक्तीची पराकाष्ठा होय.

शान्तसंसारकलनः कलावानपि निष्कलः ॥
यः सचित्तोपि निश्चितः स जीवन्मुक्त उच्यते ॥१॥

"लोकदृष्टचा बोलतो, चालतो वगैरे सर्व कांहीं करतोसा दिसत असून जो आपल्या ब्रम्हस्वरूपाव्यतिरिक्त कांहींच जाणत नाहीं, तो पराकाष्ठेच्या जीवन्मुक्तिपदाला म्हणजेच विदेह मुक्तिपदाला पोंचलेला महात्मा होय, असा भावार्थ वरील श्लोकाचा आहे. श्रीगुरुनाथ हे तसेच होते. मोठ्या भाग्यवान पुरुषांनाच अशांची संगति घडते व सेवा मिळते. महाराजांना आपापल्या गांवीं नेऊन त्यांच्या सेवेचा लाभ मिळविणारे भक्त धन्य होत !!

नंतर चिमूर गांवचे आबाजी नाईक यांनीं श्रीगुरुनाथांना आपल्याकडे नेलें. या गांवीं एक डॉक्टर रहात असत. महाराजांचा लौकिक त्यांनीं ऐकला. इंग्रजी शिकलेल्या कांहीं लोकांचा साधुसत्पुरुषांवर फारसा विश्वास नसतो. "स्वामींना लोक अंतर्ज्ञानी ईश्वरच समजतात. पण मला त्यांनीं अनुभव दिला तरच मी तसें समजेन, एरवीं नाहीं," असें आपल्याशीं म्हणून महाराजांचे परीक्षेकरितां ते डॉक्टर आबाजी नाइकांकडे आले. महाराजांना त्यांनीं नमस्कार केला. तेव्हां 'नमो नारायणाय' असे शब्द मात्र व्यवहार सांभाळण्यासाठीं म्हटले. सद्गुरूंनीं तेवढेंच घेतलें. हा मनुष्य पुरा नास्तिक नाहीं, असें त्यांनीं जाणलें व त्याला प्रसाद, तीर्थ दिलें. तें डॉक्टरांनीं श्रद्धेनेंच घेतलें व श्रीगुरूंच्या सर्वज्ञतेची परीक्षा ते करूं लागले. 'मला त्यांनीं शंभर रुपये जर मी न मागतां दिले तर हे ईश्वरच मी मानीन, नाहीं तर भोंदू म्हणेन,' असा मनांत संकल्प करून ते गुरूंपुढेंच बसून राहिले. श्रीगुरुमुनी आपल्या महतीकरितां हपापले नव्हते. 'मी सर्वज्ञ आहें,' असें म्हणवून घेणें म्हणजे लोकेषणाच आहे. ती तर श्रीगुरूंना मुळींच नव्हती. त्यांची बुद्धि उलटच होती कीं, आपणांला लोकांनीं तुच्छ मानावें. याबद्दलचें वर्णन पूर्वी येऊन गेलेंच आहे. श्रीगुरूंनीं डॉक्टरांची शंभर रुपयांची इच्छा ओळखली व ती पुरविण्याचादेखील संकल्प केला. पण तो लोकेषणेनें मात्र केला नाहीं तर

कारुण्यानेंच केवळ केला. ते मनांत म्हणाले, "वैद्यांना मदत केली असतां दीनदुबळचा रोगग्रस्तांना दुःखमुक्त केल्याप्रमाणेंच होणार आहे. करितां यांना यांच्या इच्छेप्रमाणें रक्कम द्यावी." असें म्हणून आबाजींकडून आपल्या पुढच्या द्रव्यांतील एकशेंएक रुपये गुरुमहाराजांनीं वैद्यांच्या पदरांत घातले. तेव्हां वैद्येश्वरांना महाराजांच्या सर्वसाक्षित्वाबद्दलची पूर्ण खात्रीच झाली. त्यांना मी अपराध केला असें वाटलें. ते महाराजांना म्हणाले, "आपण सर्वज्ञ परमेश्वरच आहांत. आपली परीक्षा मी पाहिली. हें मजकडून मोठें पाप घडलें. गुरूचा अंत पाहूं म्हणणाऱ्यांना यमशिक्षा होते. ती मला होऊं नये. मी न मागतां मला अभक्ताला जर आपण पूर्णमनोरथ केलात तर याचक अशा भक्ताला तसा करालच कराल. भक्तकामकल्पद्रुम भगवान दत्तच आपण आहांत. मला उपदेश द्या व कृतार्थ करा." असें म्हणतांच श्रीगुरूंनीं त्यांना उपदेश दिला व दिलेल्या रकमेचा विनियोग गोरगरीबांना मोफत औषधें देण्याकडे करायला सांगितला. वैद्य तसेंच करूं लागले. महाराजांचे उपदेशानें ते पुढें सदाचारसंपन्न व भक्त होऊन मुक्त झाले. कोणत्याही बुद्धीनें जवळ आलेल्याचा उद्धार श्रीगुरुपरमेश्वर करीतच असत. हा त्यांचा उदारपणा होय. आपल्या गुरुमहाराजांपुढें आलेलें द्रव्य सर्वांकरितांच आहे, असें ते म्हणत असत. ते स्वतः निर्लोभीच होते म्हणून त्यांचे हातून वरील गोष्ट झाली.

श्रीगुरूंनीं चिमूर येथें दुसरें एक नवल केलें ते असें– दादासाहेब नाइकांनीं उमरेडींत असतां श्रीगुरुवरांचे करांगुलींत हिऱ्याची आंगठी घातलेली होती. ती महाराजांचे बोटांत सतत असे. एक दिवस महाराज नदीवर स्नानाला गेले. त्यांचेबरोबर त्यांचा चिमूरकर भोपे नांवाचा भक्त होता. स्नानाला उतरतांना ती आंगठी गुरूंनीं भोप्यांजवळ दिली. त्यानें ती आपल्या बोटांतच घालून ठेवली व महाराजांबरोबर स्नान करूं लागला. विसरून आंगठीचें भान त्याला राहिलें नाहीं व स्नानाचे वेळीं ती बोटांतून नदींत पडली. दोघेही देव व भक्त तीरावर येऊन अंग पुसूं लागले. इतक्यांत भोपे पाहतात तों हातांत आंगठी नाहीं. मुकाट्यानें ते पुन्हां पाण्यांत शिरले. पुष्कळ हुडकून पाहिली पण वाळूंत रुतून पुरली गेलेली आंगठी सांपडली नाहीं. निराश झाले. त्यांची मुद्रा

कष्टमय झाली. ते गुरूंना म्हणाले, " महाराज, मी मोठी चूक केली. आपली आंगठी जळांत कोठें पडली, ती सांपडत नाहीं. " हें ऐकून व भक्ताची अतिशय कष्टी मुद्रा पाहून श्रीगुरु आंगठीबद्दल नाहीं पण कष्टी भक्ताबद्दल विचारांत पडले कीं याची चिंता कोणत्या उपायानें जाईल ? आंगठी गंगार्पण झाली तिचा आनंदच माना, असें सांगून हा भक्त ऐकणारा नव्हे. बरें, दुसरी द्या म्हणजे झालें, असें सांगण्याच्या ऐपतीचादेखील हा नाहीं. मग कसें करावें ! असा विचार करून श्रीगुरूंनीं ती आंगठीच पुन्हां निर्माण करण्याचें ठरविलें. संकल्प करतांच कमंडलूंतच ती आंगठी तयार झाली. ती पाहून भोप्याला मुनी म्हणाले, " ही पहा आंगठी आहे, हरवली नाहीं." भोपे आश्चर्यानें पाहातो तों खरोखरच ती कमंडलूंत दिसली. तेव्हां मात्र त्याला महाराजांची मोठीच नवलाई वाटली. मी स्वत: बुडी मारतांना जी आंगठी बोटांतून पडून हरवली, पुन्हां हुडकली तरी जी दिसली नाहीं ती महाराजांचे कमंडलूंत आली कशी ? यांनीं तर ती हुडकलीदेखील नाहीं. काय आश्चर्य हें !! असें म्हणून त्यानें " आपण इच्छावशें वाटेल ते निर्माण करणारे प्रभू दत्तच आहां " असें म्हणून गुरुचरणीं मस्तक ठेवलें व पुन्हां ती आंगठी कशी निर्माण झाली म्हणून विचारूं लागला. महाराज म्हणाले, " आंगठी आहे ना ? झालें तर. कशी आली ती तुम्हांला कळून काय करायचें आहे ?" असें म्हणून ती गोष्टच त्यांनीं सोडून दिली. आपला महिमा व्हावा असें त्यांना वाटतें तर त्यांनीं ती आम्ही संकल्पबळानें आणली असें म्हटलें असतें. पण ती गोष्टच सोडून दिली. लोकेषणा त्यांना नसल्याचेंच हें उदाहरण होय. भक्तचिंतानिवारणासाठीं त्यांना तो चमत्कार करणें भागच पडलें. म्हणून तो त्यांनीं केला, इतकेंच. येथून श्रीगुरु परत उमरेडला आले.

जनार्दन डबरी, खोटपाळ व लक्ष्मणराव नाईक असे तीन कवी महाराजांवर कविता करीत असत. यांच्या कविता नित्यपाठक्रम-पुस्तकांत छापल्या आहेत. कवीलोकांवर श्रीगुरु प्रेम करीत व त्यांचें कौतुक करून त्यांना ईश्वराचे गुणानुवाद गायला लावीत. उमरेड शहरच श्रीगुरुवर्यांचे भजनीं लागलें होतें. सर्वांनीं गुरुमुखें तारकोपदेश घेतले. सर्व उमरेडकर भक्तांचा श्रीगुरूंनीं उद्धार केला.

येथून श्रीगुरूंनीं भजनाचीं पुस्तकें अमरापुरला पाठविलीं म्हणून पूर्वी सांगितलें. त्या पुस्तकांबरोबर वरींचशीं उमरेडी धोतरेंगुद्धां त्यांनीं श्रीवासुदेवानंद दत्तामरेश्वराचे पुजाऱ्यांना प्रेमानें पाठवून दिलीं. अमरापुरकर भक्तांवर त्यांचें फार प्रेम असे. कारण ते श्रीगुरुभगवान् वासुदेवाचे संस्थानिक सेवकगण आहेत. श्रीगुरुनाथांना सर्व जगच प्रिय वाटत असे. म्हणून तर ते त्याच्या उद्धारार्थ संचार करीत राहिले व सर्वांना भजन पूजन, विवेक करण्याचें शिक्षण देत राहिले.

उमरेडच्या भक्तगणांचें कल्याण करून श्रीगुरु पौष महिन्याचे अमावास्येला सूर्यग्रहणार्थ प्रयागला जाण्याला निघाले. तेव्हां उमरेडकर जनतेला गुरुविरहव्यथा असह्य झाली. गुरुभगवंतांनीं परत उमरेडला लौकरच आलें पाहिजे, पुनर्दर्शन आम्हांला दिलें पाहिजे, असा हट्ट त्यांनीं धरला. " आम्ही तुमच्या स्वाधीनच आहों. भावभक्तीनें भजन चालवा म्हणजे आम्ही पुन्हां शीघ्र तुम्हांला भेटूं, " असें आशीर्वादपूर्वक अभिवचन श्रीगुरूंनीं त्यांना दिलें. दादासाहेब नाइकांनीं डोळ्यांतून शोकाश्रु काढले. त्यांना तर श्रीगुरु जातात म्हणून फारच वाईट वाटलें. चार महिने त्यांना गुरुरायाचा सुखकर सहवास मिळाला होता. सत्संग हा सर्व दुःखें वारणारा व सर्व सुखें देणारा असल्यामुळें दादांना तो अंतरतो म्हणून दुःख होणें साहजिकच होतें. पण गुर्वाज्ञा पालन करणें जरूर पडल्यामुळें त्यांनीं रथ आणून उभा केला. त्या शृंगारलेल्या रथांत श्रीगुरु आपल्या भक्तगणांसह बसले व नागपुरला निघाले. तेव्हां उमरेडकर भक्तसमाज भजन करीत त्यांना पोंचवीत बराच लांब आला. श्रीगुरुनाथांनीं आपल्या अभयवरद करकमळानें त्यांना परत जा अशी खूण केली व आपण नागपुरला गेले.

उमरेडकर भक्तांना भक्तिप्रेमसुखाची व आत्मज्ञानाची दिवाळी करून देऊन भक्तवत्सल श्रीनृसिंहसरस्वती सद्गुरुनाथ नागपुरलासुद्धां उमरेडकर नाइकांचेच वाड्यांत राहिले. तेथें त्यांना उमरेडकर भक्त वरचेवर जाऊन भेटत. प्रेमसुखाला लांचावल्यामुळें त्यांनीं नागपूरची यात्राच सुरू केली. प्रत्येकानें जावें; महाराजांना भेटावें; त्यांच्याशीं बसावें, प्रेमानें बोलावें,

हंसावें, खावें, प्यावें; भजन करावें; गुरुमुखींची उपदेशसुधा प्यावी व परत उमरेडला आपल्या मुलाबाळांत येऊन रहावें पुन्हां कांहीं तरी निमित्त करून नागपूरला जावें व पूर्ववत् गुरुसहवास करावा, आनंद लुटावा व घरीं परत जावें, अशी श्रीगुरुयात्रा त्या भक्तांनीं सुरू केली. श्रीगुरुभगवान् त्यांना किती प्रिय झाले असले पाहिजेत, याची थोडीशी तरी कल्पना त्यांच्या ह्या वर्तनावरून वाचकांना आल्याशिवाय राहणार नाहीं.

श्रीगुरुमुनींना नागपुरांतसुद्धां बरेच प्रेमळ भक्त भेटले. आत्मारामाचा मुलगा जनार्दन डबरी हा पहिला भक्त होय. त्यानें श्रीगुरूंना आपल्या घरीं नेऊन त्यांची पूजा, आरती, भिक्षा वगैरे सर्व सेवा प्रीतीनें केली. दुसरे भक्त गोविंदराव चिंचळकर हे आपल्या प्रेममय मधुर आवाजानें 'करुणात्रिपदी' म्हणजे 'शान्त हो श्रीगुरुदत्ता' इत्यादि तीन पदें रागरागिणीमध्यें म्हणून रोज श्रीगुरूंना ऐकवीत. त्यांचेवर श्रीगुरु फारच संतुष्ट झाले. त्यांना ती करुणात्रिपदी फार आवडली. ते चिंचळकरांना म्हणाले, "गोविंदराव! तुम्ही म्हणत असतां ही त्रिपदी फोनोमध्यें भरून घ्यावी व अमरापुरांत नेऊन लावावी, असें आम्हांला वाटतें. म्हणजे ती ऐकून अमरेश्वर तर संतुष्ट होईलच, पण वाडीचे लोकसुद्धां खूप होतील व ती कशी म्हणायची तें त्यांना समजेल." या उद्गारांवरून वाडीकरांवरील व वाडीवरील आपलें प्रेम श्रीगुरूंनीं अर्थात् सर्वांना कळविलें. सर्वांवर सारखें प्रेम करणारे समदर्शी श्रीगुरुनाथ वाडी सोडून अमरापुरांत जरी राहिले, तरी त्यांचें प्रेम दोन्हीही स्थानांवर सारखेंच होतें व दोन्ही स्थानीं ते आहेतच. फार काय? पण भक्तांना ते अशी प्रचीति देतात कीं,

ज्या ज्या स्थळीं हें मन जाय माझें ।
त्या त्या स्थळीं हें निजरूप तूझें ॥
मी ठेवितों मस्तक ज्या ठिकाणीं ।
तेथें तुझे सद्गुरु पाय दोन्ही ॥१॥

असा आपण सर्वत्र व्यापून असल्याचा अनुभव ते भक्तांना देतात. मग ते नाहींत कोठें? सर्वत्रच आहेत व 'समोहं सर्वभूतेषु' या वचनानुसार सर्वांवर सारखेंच प्रेमदेखील ते करीत आहेत, याबद्दल मुळींच संशय नाहीं. असो.

काशीला जाण्याच्या उद्देशानें राहिलेल्या गुरुभगिनी आत्याबाई व अखेरपर्यंत राहण्याची इच्छा धरलेल्या अनसूयाबाई, अशीं दोनच माणसें वाडीपासून जवळ असलेल्या भक्तांपैकीं गुरूंचे जवळ आतां राहिलीं. पूर्वीची सर्वच प्रेमी मंडळी त्यांनीं दूर केली. देहावसानकाळ जवळ आलेला त्यांना दिसत होता. "त्याकाळीं प्रेमी मनुष्य जवळ नसावा, असल्यास दोघांनाही म्हणजे त्या प्रेमी माणसाला व देहत्याग करणारालादेखील अस्वास्थ्यरूपी अपाय होण्याचा संभव असतो," असा बोध साधकवर्गाला देण्यासाठींच श्रीगुरूंनीं आपली प्रेमी भक्तमंडळी दूर केली. त्यांना स्वतःला कोणतेंच भय नव्हतें. कारण ते सिद्धाधिपति अभय ब्रह्मच होते.

श्रीगुरुनाथ सर्वत्र सकारणच जात होते. त्यांना कोण मुमुक्ष कोठें आहे, तो दिसतच असे व त्याचे उद्धारार्थच ते तेथें जात. त्याच्या अधिकारानुसार ते त्याला उपदेश देत. नागपुरांत थोरल्या महाराजांचा म्हणजे श्रीगुरूंच्या गुरूंचा एक शिष्य रहात होता. थोरल्या महाराजांनीं ज्ञानाची बीजपेरणी त्याचे मनोभूमींत केली होती. पण तिचा अद्याप फलकाल आला नव्हता. तो नृसिंहसरस्वती तेथें जातांच आला. तो असा—गुरुभक्त केशवराव ताम्हन हेच ते गुरुशिष्य होत. हे संस्कृत पंडित होते. त्यांनीं आपल्या घरीं श्रीगुरूंना नेलें. त्यांचो एक दिवस पूर्ण भक्ति केली व अद्वैत बोध व्हावा म्हणून जिज्ञासुवृत्तीनें त्यांनीं गुरुमहाराजांना विनयानें एकवीस प्रश्न केले. ते सर्व ऐकून घेऊन श्रीगुरूंनीं एकच खुणेचें वाक्य उच्चारलें व दयादृष्टीनें केशवरावांकडे पाहिलें. त्यासरशीं त्यांची हृदयग्रंथी तुटली, व आत्माकारवृत्ति बनली. त्या क्षणीं त्यांना जीव व ईश्वर यांच्यामधील ऐक्य समजलें. 'मी जीव नव्हे तर ईश्वरच आहें. सच्चिदानंदस्वरूपी मजहून निराळी दुसरी वस्तूच नाहीं,' असा दृढबोध त्यांना श्रीनृसिंहसरस्वती-देशिकेंद्रांच्या दयावीक्षणानें झाला. तेव्हां त्यांनीं नृसिंहसरस्वती हे साक्षात् आपले गुरुराज श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीदत्तच होत असे सप्रेम उद्गार काढले. श्रीगुरूंनीं उमरेडला नाइकांना बोध दिला, तसा नागपुरांत केशवराव ताम्हन यांनाही तो दिला. दोघांनाही मुक्त केलें. शास्त्री पंडित असला तरी गुरुकरुणावीक्षणावांचून त्याचें मूळ अज्ञान दूर जात नाहीं, हेंच सत्य होय.

नागपुरांत काळीकर भाऊसाहेब यांनीं श्रीगुरूंची भक्ति त्यांना घरीं पुडीला नेऊन केली. यांनीं महाराजांना रथांतून सर्व नागपूर दाखविलें व जनतेला गुरुदर्शन दिलें.

श्रीगुरुनाथ रामटेकला गेले व रामाची पूजा करून त्याला भेटून परत नागपुरला आले. बऱ्याच ग्रामस्थ भक्तांनीं श्रीनृसिंहसरस्वतींचा उपदेश घेतला. आपापल्या घरीं नेऊन त्यांनीं त्यांची पूजनादि भक्ति केली. त्यांत नृसिंहवाडीचे पुजारी अंतु केशवाचे चिरंजीव रामभट हे एक होते. नागपुरांत श्रीगुरूंचा मुक्काम आठ दिवस होता. नंतर ते प्रयागला ग्रहणासाठीं जायला निघाले. महाराज निघाले तेव्हां उमरेडकर दादासाहेब नाइकांनीं श्रीचरणीं आपलें मस्तक ठेवलें. नंतर गुरुभक्त बाबुराव नाईक यांनींसुद्धां आपलें मस्तक ठेवलें व दोन्ही हातांनीं गुरुपाय घट्ट धरून हट्ट धरून बसले कीं, "श्रीगुरूंनीं माझ्या मस्तकावर आपला कृपाहस्त ठेवल्याशिवाय मी हे चरण सोडणार नाहीं." पुष्कळ वेळ श्रीगुरूंनीं आढेवेढे घेतले. "आम्ही आजपर्यंत कोणाचे मस्तकावर हात ठेवला नाहीं, तुम्ही हा हट्ट धरूं नये." इत्यादि जरी गुरुमहाराज बोलले तरी कृतनिश्चयी बाबुराव त्यांचे पाय सोडीनात. त्यांची ती निश्चयाची चरणमिठी सुटत नाहीं असें जेव्हां गुरुकृपाळांनीं पाहिलें, तेव्हां 'ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहं' हें बिरुद बाळगणारे प्रभु द्रवले. भक्त सुरद्रुमांनीं आपला दयेचा पद्महस्त उचलला व करुणासिंधूंनीं अनन्यदास जो बाबुराव त्याचे मस्तकीं तो प्रेमवीक्षणासह ठेवला. सद्गुरुसमर्थांचा वरदपाणि शिरीं लाभतांच बाबुराव ब्रह्मानंदाचे तुडुंब सागर बनले. त्यांना देहभान उरलें नाहीं. श्रीगुरुनाथांनीं आपला पूर्ण प्रसाद त्यांचेवर केला. 'भावेन देवं वशमानयंति' या वचनानुसार बाबुरावांनीं दृढतरभावानें श्रीगुरूंना स्वाधीन करून घेतलें व कृतकृत्य झाले. त्यांनीं श्रीगुरुमहिमा वर्णन केला. तेव्हां ते म्हणाले,

पद

(चाल—त्यजि भक्तांसाठीं लाज)

मी धन्य झालों आज। किति थोर हा गुरुमहिमा ॥ धृ० ॥

नरसिंह मुनिवर्यांनीं । ठेवोनि ममशिरिं पाणि ॥
आनंद मज देवोनी । केली दयेचि सीमा ॥ मी० ॥ १ ॥
नाना प्रयत्न योगें । सहसा, न हातिं लागे ।
श्रीरंग तो मज वेगें । हा लाधला परमात्मा ॥ मी० ॥ २
संसारिंचा निघालों । मीं मोक्षधामिं आलों ।
परिपूर्ण ब्रह्म झालों । नासोनि जीव-धर्मा ॥ मी० ॥ ३ ॥
ऐसें गुरूंचें देणें । सुरधेनुहुनि कोटिगुणें ।
हें शंकरें मिळविणें । गावोनियां गुरुनामा ॥ मी० ॥ ४ ॥

बालकाचे पोटांत दोन घांस गेले म्हणजे आईला जसा अत्यानंद होतो तसे बाबुराव आनंदित झालेले पाहून श्रीगुरुसुद्धां सुखावले. भक्तांवर श्रीगुरु असें निरुपम प्रेम करीत असत. भोळे महादेवच ते. दादासाहेबांना कित्येक दिवस परिप्रश्न व सेवा तरी करावी लागली, पण बाबुराव एक क्षणभरच श्रीगुरुचरणीं मिठी देऊन बसले व तेवढ्या मुदतींतच कृतार्थ झाले !! भक्तिप्रेमाला भुलणारे श्रीगुरु कोणाला केव्हां व काय किती देतील याचा अंदाज कोण करूं शकेल ?

नंतर पौषमासाचें अमावास्येपूर्वी दोन दिवस श्रीगुरुमूर्ति प्रयागला गेले. त्यांच्याबरोबर नागपुर प्रांतांतले शेंकडों भक्तदेखील आपापलीं तिकिटें काढून गुरुसमागमाकरितां गेले. वासुदेवानंदांचे शिष्य नरसिंहसरस्वती-महाराज आलेले ऐकून संस्कृत पंडित रा. ब. केशवराव गोरे यांनीं प्रेम-भक्तिपुरस्सर त्यांना आपल्याकडे नेलें. पंडित दारागंजांत रहात. हे श्रीगुरु-मुनींचे गुरुबंधुच होते. त्यांनीं आदरानें श्रीगुरुवर्यांची पूजा वगैरे भक्ति केली. सर्व भक्तदेखील त्यांचे घरींच उतरल्यामुळें मोठा यात्रोत्सवच तो झाला. अमावास्येला गंगा-यमुना-सरस्वती संगमांत म्हणजे त्रिवेणी संगमांत श्रीगुरूंनीं भक्तांसह ग्रहणनिमित्तक स्नानें केलीं. श्रीगुरुनाथांचा नित्यक्रम जो गुरुपूजा, ध्यानधारणा, भजन वगैरे तो तर सुरूच होता. काठकोप-निषद्भाष्य श्रीगुरु वाचीत व केशवरावप्रमुख विद्वान लोक ऐकण्यासाठीं

बसत. त्यांना त्यांचे इच्छेस्तव श्रीगुरु त्याचा अर्थ सांगत. श्रीगुरुनाथांचा बहुमान क्षेत्रस्थांनीं केला. क्षेत्रदेवतांचीं पूजनें, दर्शनें करून श्रीगुरूंनीं तेथें ब्राह्मणभोजन घातलें. ते लोकादरास पात्र झाले. नंतर विश्वेश्वराचे दर्शनार्थ श्रीगुरु काशीला निघाले असतां, चिटणीस नांवाचा एक सारस्वत ब्राह्मण उपदेश द्या म्हणून त्यांना शरण आला. "काशीमध्यें तुम्हांला उपदेश देऊं" असें वचन त्याला गुरुवर्यांनीं दिलें व पुढें निघाले. 'अग्निरथाचा सर्वांचा खर्च मी एकटा देणार आहें. माझ्याकडूनच श्रींनीं ही सेवा घ्यावी,' अशी प्रार्थना चिटणीस यांनीं केली. 'तथास्तु' असें श्रीगुरु त्यांना म्हणाले. चिटणिसांनीं सर्व भक्तांसह श्रीगुरुवर्यांना आपल्या खर्चानें अग्निरथांत बसवून प्रयागहून श्रीक्षेत्र काशी येथें नेलें.

श्रीकाशी क्षेत्रांत श्रीगुरु आले तेव्हां शके अठराशें सत्तेचाळीसचा माघमास होता. भोंगले यांच्या रामगंदिरांत प्रथम कांहीं दिवस श्रीगुरु राहिले. तेथून पुढें गणेश घांटावर श्रीगणपतीचे मंदिरांत दुसऱ्या मजल्यावर त्यांनीं आपला मुक्काम ठेवला. तेथें महाराजांना खिडकींतून गंगादर्शन होई व सातआठ पायऱ्या उतरतांच गंगास्नानाचा लाभ होई. म्हणून ही जागा त्यांना सुखसोयीची वाटली. नाहींतर काशींत गंगेवर जायचें म्हणजे शेंकडों पायऱ्यांवरून चढउतर करावी लागते. तो त्रास येथें नव्हता.

प्रयागांत कबूल केल्याप्रमाणें श्रीगुरूंनीं एका चिटणीसांनाच येथें गुरुमंत्रोपदेश दिला; इतरांना दिला नाहीं. पुष्कळांनीं तो मागितला, पण त्यांना श्रीगुरूंनीं एकच उत्तर दिलें कीं, "काशीक्षेत्रांत श्रीविश्वेश्वर स्वतःच तारकोपदेश देतात. करितां आम्हीं येथें तो कोणाला देत नाहीं." वस्तुतः श्रीगुरु साक्षात् विश्वेश्वरच होते; पण स्थानमाहात्म्य प्रगट करण्यासाठीं त्यांनीं वरील उत्तर दिलें. प्रत्येक क्षेत्राचें, तीर्थाचें, देवतेचें, वेदाचें, शास्त्राचें, पुराणाचें, ब्राह्मणाचें, भक्तीचें, कर्माचें, ज्ञानाचें, व्रताचें, दानाचें, तपाचें इत्यादि सर्वांचेंच माहात्म्य श्रीगुरु वाढवीत असत. सद्गुरुचूडामणि श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीमहाराजांचाच कित्ता नृसिंहसरस्वती गिरवीत असत. त्यांचें करणें मोठ्या प्रमाणांत होतें व यांचें अल्प प्रमाणांत असे, इतकेंच. पण कर्तव्य दोघां गुरुशिष्यांचें एकच. 'ज्योपयेत्सर्व कर्माणि विद्वान्युक्तः

समाचरन् ' म्हणजे ' ब्रह्मज्ञानी योगीश्वरानें सर्व साधनजाताचें अनुष्ठान आपण करून दाखवावें व त्यावर लोकांची प्रीति उपजवावी ' हेंच तें कर्तव्य होय. श्रीगुरुनाथ तेंच करूं लागले.

प्रथम भक्त मंडळीसह त्यांनीं गंगास्नान विधिप्रमाणें केलें. गृहस्थानीं करण्याचा क्षेत्रविधि त्यांचेकरवीं करविला. आपला गुरुपूजाप्रमुख संध्यावंदन, दंडतर्पण इत्यादि नित्य आश्रमधर्म तोही चालविला, क्षेत्रदेवतांची दर्शनें घेतलीं, काशीविश्वेश्वराची महापूजा शिवरात्रीला त्यांनीं अतिरुद्र करवून थाटानें केली. विश्वेश्वराला स्वतः आपल्या हातांनीं पंचामृत वगैरे घालून सर्वोपचारांनीं सुपूजित केला. चांदीचें अभिषेकपात्र व इतर रौप्य उपकरणेंदेखील शिवाला अर्पण केलीं. ब्राम्हणभोजन मोठ्या प्रमाणांत घातलें. क्षेत्रांतील सर्व संन्यासी व वैदिक शास्त्री, पुराणिक, हरिदास वगैरे सर्व गुणी विप्रसमाज, सुवासिनींसह मोतीचूर लाडवांचा बेत करून, यथेष्ट भोजन घालून, भरपूर दक्षणा देऊन, प्रभूंनीं संतुष्ट केला. अतिरुद्राचे सांगतेचे दिवशीं हा पहिला भोजनसमारंभ श्रीगुरूंनीं काशींत केला.

पुन्हां अधिक चैत्रांत महादेवाला दुसरा अतिरुद्राभिषेक केला. तेव्हांदेखील सांगतासमारंभ पूर्वीप्रमाणेंच झाला. संन्याशांना आसनें, कमंडलु, छाट्या, दक्षणा व ब्राह्मणांनासुद्धां वस्त्र–पात्र–दक्षणा विपुल दिली गेली. श्रीगुरूंचें औदार्य प्रसिद्धच आहे. त्यांना थोडें व साधें देणें आवडत नसे. चांगलें व मुबलक असेंच त्यांचें देणें नेहमीं असे. वैशाखांत नरसिंहजयंतीचा उत्सव करून वसंतपूजा केली. वैदिकांना वेद म्हणायला लावून पन्हें, कोशिबीर व दक्षणा त्यांना दिली. ज्येष्ठांत दशाहारांत दहा दिवस गंगालहरी म्हणून गंगापूजन केलें. तुपाचे असंख्य दिवे द्रोणांत लावून गंगेंत सोडले. सुवासिनीपूजा वस्त्राभरणांनीं केली व आषाढ शुद्ध प्रतिपदेला आपल्या गुरुवर्य वासुदेवानंदांचा पुण्यतिथिमहोत्सव मोठ्या थाटानें केला. तेव्हां सर्व क्षेत्रस्थ संन्यासी बोलावून आसन, कमंडलू व छाटी लंगोटी प्रत्येक यतीला देऊन श्रीगुरूंनीं त्यांचें पूजन केलें व त्यांच्यावरोबर वैदिक शास्त्री, पुराणिक, हरिदास, सुवासिनी इत्यादिकांनासुद्धां जिलबी वगैरे पक्वान्न करून यथेष्ट भोजन

घातलें. सर्वांनाच रुपरुपाया दक्षणा दिली. श्रीगुरुमुनी उमरेडकर नाइकांकरवीं दक्षणा वगैरे देववीत असत. महाराज काशींत असेपर्यंत व पुढेंसुद्धां त्यांना लागणारा द्रव्यखर्च उमरेडकर नाईकच पुरवीत असत.

आषाढी पौर्णिमेला चातुर्मासनिमित्तक क्षौरविधि व व्यासपूजेचा उत्सव श्रीगुरूंनीं केला. त्या दिवशीं क्षेत्रस्थ तारकमठांतील सर्व संन्यासी बोलवून श्रीगुरूंनीं त्यांची पूजा केली, व प्रत्येकाला विधियुक्त दहाबारा साष्टांग नमस्कार घातले. ते सर्व संन्याशांना केलेले विधियुक्त साष्टांग प्रणाम असंख्य झाले. श्रीगुरूंचा भक्तिप्रेमा जबरदस्त होता. म्हणून त्यांचे हातून हा प्रकार घडला. विशेष नवल हेंच कीं, श्रीगुरूंचे शरीरांत त्याबेळीं ज्वर आलेला होता. त्यांची प्रकृति क्षीण झाली होती. तरी पण शरीराकडे दुर्लक्ष करून दुःखाची पर्वा न करतां त्यांनीं 'क्षेत्रस्थ यति हे साक्षात् विश्वेश्वर म्हणजे सर्व गुरूंचे देखील गुरु होत' हचा दृढतर भक्तिभावानें असंख्य दंडवत त्यांना घातले. ते पाहून त्या सर्व यतीश्वरांना मोठें आश्चर्य वाटलें. श्रावणांत श्रीवासुदेवानंद व श्रीकृष्ण यांच्या जयंत्या व भाद्रपदांत श्रीपादवल्लभ व गणपति यांच्या जयंत्या श्रीगुरूंनीं उत्सव करून साजऱ्या केल्या. आपला म्हणजे यतींचा चातुर्मास भाद्रपदी पौर्णिमेला संपला. त्या दिवशीं क्षौरस्नान करून गंगेपलीकडे व्यासकाशीला सीमोल्लंघनाला श्रीगुरु गेले व व्यासोनारायणांचें दर्शन, पूजन करून परत गणपतिमंदिरांत आले. आश्विनांत योगिनीचा उत्सव, व गुरुद्वादशी केली. कार्तिकांत दीपोत्सव केला. मार्गशीर्षांत दत्तजयंती, पौषांत नृसिंहसरस्वतीजयंती व माघांस गुरुप्रतिपदेचा उत्सवदेखील श्रीगुरूंनीं केला. प्रत्येक उत्सवाला अभिषेक, पूजा, भजन, ब्राह्मण संतर्पण वगैरे महाराज प्रीतिपुरस्सर करीत. कीर्तन, पुराण, वेदपठणदेखील करवीत व आपण ऐकत बसत. दक्षणा दिल्यावांचून कोणाकडूनच ते सेवा घेत नसत. अन्नवस्त्र, पात्र, दक्षणा, तांबूल देऊनच ब्राह्मणांकडून ते पूजन पठणादिक सेवा घेत.

अधिक चैत्राचे अखेर पंचक्रोशी यात्रा श्रीगुरूंनीं जशी केली तशी आजपर्यंत कोणीच केली नव्हती, असें तारकमठांतले काशिवासी संन्यासी सांगतात. नाग-

पुर प्रांतांतले शेंकडो भक्त श्रीगुरूंच्याबरोबर काशीला गेले होतेच. त्याशिवाय काशींतील शास्त्री, पुराणिक, वैदिक, हरिदास व अवांतर ब्राह्मण शिष्य व मुलें, तसेंच तारकमठांतले व दुसऱ्या कांहीं मठांतले मिळून पन्नास एक संन्याशी, असे शें-दीडशेंच्यावर जनसमुदाय बरोबर घेऊन भजन करीत महाराजांची स्वारी यात्रा करीत निघाली. सामानसुमानाच्या बऱ्याच गाड्या बरोबर होत्या. पंचक्रोशी यात्रा एका दिवसांत होणारी यात्रा नव्हे. पांच दिवस तिला लागतात. प्रत्येक मुक्कामावर केलीं जाणारीं धार्मिक कृत्यें सर्वांकडून आश्रमानुसार श्रीगुरु करवून घेत. पूजन, भोजन, पुराण, कीर्तन, वेदपठण वगैरे सर्वहि उत्सवांगभूत कार्यक्रम दर मुक्कामावर करवीत. महाराजांना पायीं चालण्याची व यात्रा करण्याची आवड फार होती. पण त्यांचें शरीर नाजूक होतें. तरीपण योगबळानें ते वाटेल तितकें चालू शकत. स्वत: जरी ते असे रागर्थ होते, तरीपण कनवाळूपणानें आबालवृद्धांकडे पाहून सर्वांच्या सुखार्थ ते आपण थकल्याचें निमित्त करून ठिकठिकाणीं बसत व स्वामीलोकांना व इतर सर्व भक्तांना मेवामिठाई खायला देत, सरबतें पाजीत व आपणदेखील प्राशन करीत. अशा रीतीनें सुखासमाधानानें सर्वांना रमवीत रमवीत श्रीगुरूंनीं पंचक्रोशी यात्रा आनंदानें पुरी केली. काशीकर मंडळीला मोठें कौतुक वाटलें. यात्रेंत दिगंबराचें भजन श्रीगुरूंनीं सततच चालू ठेवलेलें असे.

श्रीगुरुनाथ काशींत होते तों रोज आपल्यापुढें पुराण, कीर्तन व भजन करवीत असत. काशीखंडग्रंथ त्यांनीं सर्व ऐकला व स्वत:देखील वाचला. रोज पंगतीला हरिदास, पुराणिक, वैदिक ब्राह्मण, संन्यासी साधु, ब्रह्मचारी वगैरे घेऊनच ते भिक्षाग्रहण करीत. अमरापुरमाहात्म्य नांवाचा संस्कृत ग्रंथ त्यांनीं स्वत: काशीखंडग्रंथाचे आधारानें तयार केला व चौसष्टयोगिनींचें स्तोस्त्र छापून प्रसिद्ध केलें. श्रीगुरूंनीं भजन पूजन करून व दक्षणावस्त्रादिकांचें दान करून व पुराण, कीर्तन, वेदपठणादिक करवून सर्व काशीपुरी अगदीं दुमदुमून सोडली. आपल्या उदार व मृदु स्वभावानें स्वत:कडे सर्वांचीं मनें ओढून घेतलीं व भक्तिधर्माचरणानें सर्वांना सन्मार्गगामी केलें. काशीकर मंडळी श्रीगुरुनाथांना नृसिंहवाडीचे दत्तच समजूं लागली, व नित्यनेमानें

आबालवृद्ध नरनारी भक्तिभावानें गणपतिमंदिरांत येऊन त्यांचें दर्शन रोज घेऊं लागली. महाराजांनीं मंत्रोपदेश देण्याचें बंदच केलें होतें. तरीपण लोकांनीं त्यांच्या सहज गोष्टीच उपदेश समजून प्रेमानें ऐकण्याचा नेम धरला. आपले आप्त व आपले सद्गुरूहि हेच आहेत असें त्यांनीं मानलें व ते श्रीगुरूंचे भक्त बनले. विद्वान् धार्मिक ब्राह्मण श्रीगुरूंना फारच मान देत असत, तसा श्रीगुरूसुद्धां त्यांचा आदरसन्मान त्यांना महत्त्व देऊन करीत. सर्वांवर श्रीगुरूंची प्रसन्न दृष्टि असे. परमार्थाचें सत्रच श्रीगुरुदरबार होय. तेथें ज्ञान, भक्ति, वैराग्या-शिवाय अन्याचें वर्णन होत नसे. श्रीगुरुनाथांच्या सन्निध नेहमीं सत्ययुग असे; कलीवास तेथें नसे. तो अभक्त दुर्जनांचेजवळ असायचा. तिकडेच तो असे. श्रीगुरूंच्या सहवासानें लोकांच्या दुर्बुद्धि लयाला जात व त्यांचे ठिकाणीं सद्बुद्धीचा उदय होई.

चमत्कार असा झाला कीं रोज एक शास्त्र शिकलेले गृहस्थ ब्राह्मण श्री-गुरूंना पहायला येत असत. 'सत्कर्म केल्यावांचून सुखशान्तीचा लाभ नुसत्या शास्त्रपाण्डित्यानें होत नसतो' इत्यादिक श्रीगुरुमुखींची सहज भाषा त्या ब्राह्मणाला परिणामकारक झाली. त्याची मति पालटली. तो श्रीगुरूंना शरण आला व म्हणाला, "सर्वसाक्षी परमेश्वरा! मी दरिद्री ब्राह्मण आहें. आपण लक्ष्मीरमण नरसिंहसरस्वती दत्तप्रभुच आहांत. मला आपल्या दर्शनानें व उपदेशश्रवणानें ब्रह्मकर्म असें अग्निहोत्र ठेवण्याची वासना झाली आहे. आपण मला दयाळुपणानें साहच कराल तर माझा उद्धार होईल." श्रीगुरुमूर्ति ब्राह्मणाची सद्वासना जाणून त्याच्यावर प्रसन्न झाले व अग्निहोत्राबद्दल जितके रुपये त्या ब्राह्मणानें मागितले, तितके आपल्या सेवकाकरवीं त्याला त्यांनीं दिले. ब्राह्मणानें अग्निहोत्र ठेवून महाराजांना आपल्या घरीं पूजेला नेलें व त्यांची चरणसेवा केली. प्रसन्न होऊन श्रीगुरूंनीं त्या अग्निहोत्री ब्राह्मणाचे मुलाची मुंजदेखील आपल्या खर्चानें करविली. श्रीगुरूंच्या सहवासाचा परि-णाम कसा झाला तो पहा. काशीकर ब्राह्मणाला स्वधर्माची आवड उपजली व तो आहिताग्नि झाला म्हणून सत्संग हा फार महत्त्वाचा मानलेला आहे. श्रीगुरूंनीं ही धर्मसंस्थापनाच काशींत केली.

भक्तिधर्माची स्थापना तर श्रीगुरु स्वत: भजन, पूजन करून व करवून करीतच होते. ती पाहून एका राधाकिसन नांवाच्या पुराण सांगणाऱ्या ब्राह्मणाचे मनांत भक्ति उत्पन्न झाली. त्याला भागवताचा सप्ता महाराजांपुढेंच करावासा वाटला. श्रीगुरुनाथांनीं त्याच्या इच्छेप्रमाणें त्याला साह्य केलें. शंभर रुपये व उंची पीताम्बर देऊन त्याचेकडून सात दिवस भागवत वाचवून श्रीगुरूंनीं भगवद्गुण स्वत: श्रवण केले व इतरांना ऐकविले. ही श्रीगुरूंनीं भक्तीचीदेखील स्थापनाच केली असें समजा. धर्म म्हटला म्हणजे त्यांत कर्म, भक्ति व ज्ञान हया काण्डत्रयीचा अंतर्भाव होतोच व तो धर्म प्रवृत्ति व निवृत्ति असा उभयलक्षणांचाच शास्त्रांत सिद्ध आहे. श्रीशंकराचार्यांनीं पूर्वी हा उभयविध धर्म प्रस्थापित केला. कलियुगांत अग्निहोत्र व संन्यास पामरांनीं निंद्य मानला होता. पण " वर्णविभाग व वेदप्रवृत्ति जों पावत आहे तोंपर्यंत अग्निहोत्र व संन्यास दोन्हीही स्वीकारावेत; त्यानंतर मात्र वर्ज्य " असें सांगून जसा शंकराचार्यांनीं दोन्ही लक्षणांचा धर्म प्रस्थापित केला तसाच तो वासुदेवानंदसरस्वतींनीं हल्लींच्या काळांत पुन्हां प्रस्थापित केला. त्यांचेच शिष्य नृसिंहसरस्वती यांनींसुद्धां स्वगुरूंचें अंगीकृत कार्यच पुढें चालविलें. त्याचेंच हें एक उदाहरण होय कीं, त्यांनीं काशीकर ब्राह्मणाला अग्निहोत्री आणि त्याचे मुलाला ब्रह्मचारी प्रथमाश्रमी केला.

संन्यासधर्माची संस्थापनादेखील त्यांनीं स्वत: चतुर्थाश्रम स्वीकारून आणि टांकळी नामक ग्रामीं एका विरक्ताला संन्यासाश्रम स्वत:च्या खर्चानें देऊन केली. भगवान नांवाचे एक संन्यासी नरसोबाचे वाडींतूनच " आपणांला तुम्ही दंड द्या " असें म्हणून त्यांचेबरोबर आजपर्यंत होतेच. " तुम्ही गडबड करूं नका, योग्य समय पाहून तुम्हांला आम्ही दंड देऊं, " असें वचन श्रीगुरूंनीं त्यांना दिलेंच होतें. पण श्रीगुरूंना इष्ट असलेला योग्य समय म्हणजे महावाक्यश्रवणाची पात्रता ती त्या स्वामींच्या ठिकाणीं आली नसावी. पात्रतेवांचून श्रीगुरूंनीं तरी ब्रह्मज्ञानाचा उपदेश त्यांना कसा द्यावा ? खरोखर ब्रह्मसाक्षात्कार करून देणारे श्रीगुरु होते म्हणून ते पात्र पहात होते. अपात्रीं दिलेलें ज्ञानदान व्यर्थ जातें. तसें तें व्यर्थ जाऊं देणें त्यांना कसें आवडावें ? म्हणून काशीला येईपर्यंत त्यांनीं भगवान स्वामींना ज्ञानोपदेश व दंड दिला

मव्हता. त्यांच्या पात्रतेची ते वाट पहात होते. पण तिच्या अभावामुळें काशींत येतांच भगवान स्वामी हट्ट धरून वसले व म्हणाले कीं, " मला सर्व लोक बिनदंडी यति म्हणून हंसतात, करितां दंडीयती करा. " तेव्हां श्रीगुरूंनीं तारकमठांत जाऊन पुरुषोत्तमाश्रम नांवाच्या महंतांना सांगितलें कीं, " तुम्ही या यतींना दंड द्या." ते " होय " म्हणाले. भगवानस्वामीदेखील त्यांचेकडून दंड घ्यायला कबूल झाले. मग शुभ दिवशीं त्यांना पुरुषोत्तमश्रमाकडून महाराजांनीं दंड व महावाक्योपदेश देवविला. मठभिक्षा वगैरेचा सर्व खर्चदेखील आपणच पुरविला. श्रीगुरूंनीं संन्यासधर्मदेखील काशींत असा प्रस्थापित केला.

श्रीवासुदेवानंदसरस्वती म्हणाले होते कीं, " सर्व हिंदुस्थान फिरलों. त्यांत ज्ञानोपदेशाला व दंड देण्याला सत्पात्र असे नृसिंहसरस्वतीच एक आपणांला संन्यासी शिष्य मिळाले." आम्ही म्हणतों त्यांना एक तरी सच्छिष्य मिळाला, पण नृसिंहसरस्वतींना एकहि सत्पात्र संन्यासी दंड व महावाक्योपदेश देण्यास मिळाला नाहीं. त्यामुळें त्यांचेपुढें त्यांच्या परंपरेचा संन्यासी शिष्य कोणीच राहिला नाहीं. टांकळींत त्यांनीं नुसता आश्रमच एकाला दिला, दंड वगैरे दिला नाहीं. अन्य आश्रमांतले पुष्कळ पुरुष व स्त्रियादेखील त्यांचे उपदेशित शिष्य आहेत व ते भक्तिज्ञानानें संपन्नदेखील आहेत, ही एक आनंदाची गोष्ट होय. काशीमध्येंसुद्धां चतुर्थाश्रम द्या म्हणून कित्येक विप्रांनीं श्रीगुरुमुनींपाशीं मागणी केली. तेव्हां त्यांनीं आपल्या गुरुमहाराजांचा कित्ता गिरविला. " दत्तात्रेय भगवंताची आज्ञा आम्हांला झाल्याशिवाय कोणालाही आपण संन्यास देणार नाहीं " असें सांगतांच विप्रांचा नाइलाज झाला. पण त्याला श्रीगुरूंनीं काय करावें ?

ज्ञानोत्तर प्रेमलक्षण भक्ति करणारे श्रीगुरुराज काशींत असतां, त्यांनीं तेथें संचार करतांना एकादी चांगली वस्तु दिसली म्हणजे असें म्हणावें कीं, " ही वस्तु अमरापुर येथें पाठवावी. " आपल्या गुरुनाथांवर त्यांचें अलोट प्रेम असल्याचें चिन्हच तें समजा. वरील भाषण करतांना ते मनांतून ती ती वस्तु तात्काळ श्रीदत्तवासुदेवामरेश्वराला अर्पणच करीत असत. रामदास-

स्वामींच्या भक्तीचा नमुनादेखील असाच होता. कोणत्याही महाभागवताचा असाच स्वभाव असतो. वस्तु दिसली कीं ती ईश्वरार्पण करायची. प्रापंचिक लोक चांगली वस्तु दिसतांच ही आपल्या स्त्रीपुत्रादिकांना असावी म्हणतात; पण महात्मे भक्त ती आपल्या उपास्य देवाला असावी असें इच्छितात. विषयासक्त विषयांवर प्रीति ठेवतो, तसे भक्त भगवंतावर ती ठेवतात व देवापाशीं मागतदेखील असतात कीं, " हे भगवन् ! लक्ष्मीपते ! संसारी लोकांची दृढतर प्रीति जशी विषयांवर असते तशी किंवा तीच दृढतर प्रीति आमची तुझ्यावर अचल राहो. " विषयासक्ताप्रमाणें मी तुज सगुणसुंदरावर अतिशय लुब्ध-आसक्त व्हावें, अशी मागणी ज्ञानी भक्तांनीं करावी. अशा गुणांचाच तो करुणाघनप्रभु आहे. श्रीदीक्षितस्वामीमहाराज ती निरतिशय प्रीति वासुदेवानंददत्तामरेश्वरावर ठेवीत असत. म्हणून त्यांनीं काशींतून दोन डबे भरून गंगा व काशींतले ' लंगडे ' आंबे आगगाडीनें वासुदेवानंदांच्या पुण्यतिथीकरितां अमरापुरला प्रथम पाठवून दिले. नंतर अमरापुरच्या मंडळींनीं आपणांला काशींतला प्रसाद व अमरेश्वराला अलंकार मागितले. लगेच श्रीगुरूंनीं पुन्हां दोन डबे गंगा पाठविली व अमरेश्वराला बहुमोलाचे वस्त्रालंकार व रुद्राक्षमाळा पाठविल्या. पुजाऱ्यांना व त्यांच्या स्त्रियांना वस्त्रालंकार, कुंकुम, भैरवाचे गंडे वगैरे पदार्थ व भजनी मंडळीला रेशमी पटके पाठविले. मुसलमान पाटीलसाहेबांनासुद्धां रेशमी पटके श्रीगुरूंनीं काशींतून पाठवून दिले. त्या सर्व वस्तूंचा उपयोग देवाचा देवाला व मनुष्यांचा मनुष्यांना करून सर्व अमरापुरकर आनंदित झाले. श्रीशैल्य पर्वताला जातांना श्रीगुरुदेवांनीं पुष्पप्रसाद आपल्या भक्तांना पाठविल्याची कथा श्रीगुरुचरित्रग्रंथांत आहे. तद्वतच श्रीगुरूंनीं त्या काशींतल्या वस्तु आपल्या भक्तांना आपण अयोध्येला जातांना प्रसादच पाठविल्या, असेंच आम्ही मानतों.

श्रीगुरुनाथांच्या वृद्ध भगिनी आत्याबाई काशींत कांहीं दिवस राहून तेथेंच मुक्त झाल्या. आतां महाराजांपाशीं एकल्या अनुताई मात्र शुश्रूषेला राहिल्या. महाराजांनीं काशींत जातांच कोणाकडेहि पुडीला जाणें बंद केलें होतें. गणेश मंदिरांतच आपल्या गुरुमहाराजांच्या महानैवेद्यांतला प्रसाद सर्वांबरोबर ते घेत असत. दुसऱ्या वर्षाच्या प्रारंभापासून तर ते उपोषणेंच करूं लागले.

फलाहार थोडासा घेत. बापटशास्त्री नांवाचे एक भाविक ब्राह्मण होते. श्रीगुरुनाथांवर त्यांचें अतिशय प्रेम. त्यांनीं महाराजांना महिनापंधरादिशीं गाडगेंभर मीठ आणून द्यावें, आणि म्हणावें कीं, "माझी गरिबाची ही सेवा श्रीपतींनीं मान्य करून घ्यावी." प्रेमाचे भुकेले भगवान श्रीगुरु सुदाम्याच्या पोह्यांप्रमाणें किंवा शबरीच्या बोरांप्रमाणें तें मीठ मोठ्या आनंदानें घेत आणि अनसूयाबाईंकरवीं फराळाच्या पदार्थांत तें घालवीत. फराळाचे वेळीं आपण ते पदार्थ सेवन करतांना मोठ्या प्रीतीनें म्हणत कीं, "बापटशास्त्र्यांचें मीठ फारच गोड आहे. त्याच्या योगानें सगळे उपहारपदार्थ रुचकर झाले आहेत." भक्ताचें मीठसुद्धां भगवंताला गोड लागतें, मग बोरें किंवा पोहे गोड लागतीलच लागतील. श्रीगुरुनाथांनीं पूर्वाश्रमीं आपल्या भगिनीनें प्रीतीनें वाढलेली कडू दोडक्यांची भाजीसुद्धां गोडीनेंच खाल्ली होती. 'भक्तिप्रियः श्रीपतिः', 'भक्तकौतुकी श्रीगुरुराणा'.

श्रीगुरुमहाराज काशींत फार दूरदेशीं जाऊन राहिले. म्हणून महाराष्ट्रांतील भक्तांना गुरुविरह दुःसह होऊं लागला. शिवाय महाराजांनीं आपल्याला घरींच रहायला सांगितलें असल्यानें, काशीला जावें तरी ते रागें भरतील कीं काय, असें भय देखील त्या भक्तांना वाटत होतें. भक्तवत्सल सर्वांतर्वासी सद्गुरुनाथांना आपल्या अनन्य भक्तांची तळमळ समजली. त्यांना त्यांची दया आली. म्हणून त्यांनीं कित्येकांना स्वप्नांत दृष्टांत दिले कीं, "या. दर्शन देऊं." कित्येकांना स्ववचनाप्रमाणें त्या अर्थाचीं कृपापत्रेंदेखील त्यांनीं पाठविलीं. मग काय! मरणोन्मुखाला अमृत मिळाल्याप्रमाणें श्रीगुरुनाथांची आज्ञावाणी त्या प्रेमी भक्तांना नूतन जीवित देणारीच झाली. ते लगेच एकत्रित होऊन महाराष्ट्रांतून काशीला आनंदानें गेले व श्रीगुरूंची ते सेवाभक्ति करीत राहिले. महाराज प्रसन्न मनानें सर्वांबरोबर प्रेमसंवाद करीत व सर्व भक्तांना आनंद देत त्यांचे मायबाप शोभले.

श्रीगुरुनाथांनीं उमरेड वगैरे ठिकाणचे भक्त घेऊन पूर्वी पंचक्रोशी जशी केली तशी ह्या नव्या महाराष्ट्रीय भक्तांना घेऊन पुन्हां पंचक्रोशी यात्रा केली. ती यात्रा करीत असतां कपिलधारातीर्थावर त्यांची प्रकृति बिघडली. तेव्हां

त्यांनीं तेथील एका वैद्यानें औषध घेतलें व त्यास त्याबद्दल बीस रुपये दिले. तेव्हां अतिशय आनंदित होऊन तो वैद्य महाराजांना म्हणाला, " मी परवां एका संस्थानिकाला येथें हेंच औषध देऊन असाच बरा केला. त्यानें शब्दानें-सुद्धां माझे आभार मानले नाहींत. पण आपण संन्यासी असून मला वीस रुपये दिलेत याचें मला मोठें नवल वाटतें. मी मोफत औषध देत असतों. आपण खुषीनें वीस रुपये दिलेत हे मला जहागीर दिल्याप्रमाणें वाटतात. श्रीगुरु-मूर्ति आपण खरे उदार आहां.

श्रीगुरुमुखें परमार्थश्रवण करण्याची आवड धरूनच महाराष्ट्रांतले भक्त त्यांचेकडे गेले होते. त्यांना महाराज वेदान्तशास्त्राचें रहस्यज्ञान सहज बोलतां बोलतां पटवून देत असत. ही त्यांची हातोटी जाणून महाराजांकडून आप-णांलादेखील तो ज्ञानलाभ व्हावा म्हणून मुद्दाम एक सुशिक्षित संन्यासी या यात्रेचे वेळीं महाराजांबरोबर राहिले होते. " मला अपरोक्ष ब्रह्मसाक्षा-त्कार केव्हां होईल ?" असें त्यांनीं गुरुमहाराजांना वरचेवर विचारावें. महा-राज एक दिवस त्यांना म्हणाले कीं,

तद्विद्धि प्रणिपातेन, परिप्रश्नेन, सेवया ॥

हा गीतेंतला श्लोक महाराज उच्चारून म्हणाले कीं, " अनन्य भावानें सद्गुरूंना शरण जाऊन प्रणिपात करावा. त्यांची निरभिमानानें सेवा करावी व मग आत्मविषयक प्रश्न त्यांना करावा. असें केल्यानें ते प्रसन्न होऊन ज्ञानो-पदेश करतील व तेणेंकरून तुम्हांला अपरोक्ष ब्रम्हसाक्षात्कार होईल." इत्यादि. ज्याअर्थीं श्रीगुरूंनीं त्या संन्याशांना प्रणिपात व गुरुसेवा करायला सांगितली, त्याअर्थीं ते नम्रपणानें गुरुसेवकवृत्ति धरलेले नसावेत. म्हणून त्यांना वरील साधनांचा उपदेश त्यांनीं केला. नाहींतर आपल्या रसाळ व प्रभावी वाणीनें ज्ञानोपदेशच केला असता. अधिकाराप्रमाणें श्रीगुरु उपदेश करीत असत.

या यात्रेमध्यें पुराणें, कीर्तनें होत. त्यांत गोविंदराव डिग्रजकर यांनीं-देखील एक दिवस कीर्तन केलें. कृष्णंभटजी, बाळू, आपा बडवडे वगैरे भक्त महाराजांचे देव आळीपाळीनें घेत. अशी आनंदरूप पंचक्रोशी यात्रा पुरी करून श्रीगुरु काशीला पुन्हां आले. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय

व आनंदमय असे हे पांच कोश विवेकानें ओलांडून आपण स्वयंप्रकाश आत्माच होऊन पूर्णानंदानें देहांत राहणें यालाच देहरूपी काशीची पंचक्रोशी यात्रा म्हटलेली आहे. श्रीगुरुनाथांनीं आपल्या भक्तांना ही पंचक्रोशी यात्रादेखील आपल्या सहवासानें घडविली व त्यांना असा बोध दिला कीं,

श्लोक

(अध्यात्म काशीयात्रा)

काशीक्षेत्रं शरीरं त्रिभुवनजननी व्यापिनी ज्ञानगंगा ॥
भक्तिश्रद्धे गयेयं निजगुरुचरणध्यानयोगः प्रयागः ॥
विश्वेशोऽयं तुरीयः सकलजनमनःसाक्षिभूतोंतरात्मा ॥
देहे सर्वं मदीये यदि भवति पुनस्तीर्थमन्यत्किमस्ति ॥१॥

श्रीगुरुनाथ जेव्हां ही दुसरी पंचक्रोशी यात्रा करायला निघाले होते तेव्हां त्यांचे, गोड मीठ देणारे प्रेमळ भक्तराज बापटशास्त्री यांना असें वाटलें कीं, महाराज ज्याअर्थीं दुसऱ्यांदां पंचक्रोशीला निघाले आहेत त्याअर्थीं हे आतां यात्रेहून आल्यावर काशीवास पुरा करून ह्या नव्या भक्तांबरोबर महाराष्ट्रांत परत जातील. ते जाऊं नयेत, कायमच येथें रहावेत असें चिंतून त्यांनीं यात्रेला निघतांना महाराजांचे चरण घट्ट धरले. " आपण आणखी एक वर्ष राहतों " असें वचन दिल्याशिवाय मीं पाय सोडणार नाहीं, असें ते महाराजांना म्हणाले. तेव्हां भक्ताधीन श्रीगुरूंनीं ' होय ' म्हटलें, व एक वर्ष राहण्याचा करार त्यांनीं जरी स्पष्टपणें केला नाहीं तरी पण बापटांना तसा भास त्यांनीं करून दिला. तो असा-श्रीगुरु म्हणाले, " इतर लोक पंचक्रोशी होतांच जसे काशी सोडतात, तसे आम्ही कांहीं लगेच काशी सोडणार नाहीं. पंचक्रोशी करून काशींतच राहूं " कांहीं काळ तरी आणखी राहूं, असा भावार्थ. बापट या गुरुवचनानें खूप झाले व त्यांनीं गुरुचरण जे धरले होते ते सोडले. मग श्रीगुरु यात्रा करून आले. ती हकीगत पूर्वी सांगितलीच. एकंदरींत महाराज या पुढें जे काशींत आणखी राहिले, ते काशीकर भक्तांच्या आग्रहानें त्यांच्या भक्तिस्तव ते राहिले, ही गोष्ट सत्य होय. सर्व दुनिया,

महाराजांवर असें पराकाष्ठेचें प्रेम करीत होती. असे ते सर्वांनाच आवडले होते. जीवन्मुक्तोत्तमाला त्यांतले त्यांत जगदोद्धारपरायण जीवन्मुक्तोत्तमाला उद्देशून वसिष्ठांनीं असें म्हटलें आहे कीं,

पेशलाचारमधुरं सर्वे वांच्छंति तं जनाः ॥
वेणुं मधुरनिध्वानं वने वनमृगा इव ॥१॥

अर्थ–"वनांत मुरलीचे मधुर स्वर काढीत बसणाराजवळ वन्यमृग, हरिणें वगैरे जसे आवडीनें गोळा होतात, तद्वत् लोककल्याणार्थ धर्माचरण करणाऱ्या अर्थात् लोकमित्र अशा मुक्त महात्म्याजवळ येण्याची, त्याच्या दर्शनाची, त्याच्या भाषणश्रवणाची, त्याच्या सेवेची वगैरे आवड सर्व लोक धरतात." श्रीगुरुमहाराजांची आवड सर्वांनाच लागली होती, ही गोष्ट त्यांच्या ठिकठिकाणच्या भक्त लोकांनीं केलेल्या आदरसत्कारासहित सप्रेम पूजनादिकांवरून कळून येत आहे. झोंपीं गेलेल्या मनुष्याचे अंतःकरणाप्रमाणें प्रशान्त मन ठेवून श्रीगुरुयोगींद्र जागृतीमध्यें व्यवहरत होते. आर्यता, हृद्यता, मैत्री, सौम्यता, ब्रह्मनिष्ठता, दया, क्षमा इत्यादि सद्गुण, अंतःपुरांत पुरुषाला जशा स्त्रिया आलिंगितात, तसे श्रीगुरु पुरुषोत्तमांना अखंड आलिंगन देऊन राहिले होते. म्हणून ते लोकांना अतिशय मधुर भासत असत. श्रीगुरूंचें रूप, तसेंच त्यांचें बोलणें, चालणें, पाहणें वगैरे सर्वच अत्यंत मधुर होतें. त्यांची सर्वांना मोठी चटकच लागून राहिली. त्यांच्याजवळून हलावेंसेंसुद्धां कोणाला वाटत नसे. आपापलें घरदार, स्वजनबांधव वगैरे सोडून त्यांच्या समागमांतच रहावेंसें सर्वांना वाटे. म्हणूनच पुष्कळसे भजक त्यांच्याबरोबर संचारांतदेखील रहात असत. कोठें वाडी व कोठें काशी ? पण इतक्या लांबूनसुद्धां कृष्णंभट, बाळू वगैरे भक्त, तसेंच नागपुर, उमरेड, कारंजा वगैरे ठिकाणचे भक्त जे त्यांना जाऊन तेथें भजूं लागले, किंवा श्रीगुरूंनीं ज्यांना पूर्वी स्वदेशीं पाठवून दिले ते भक्त, ज्या अर्थी सगळेच ते अगदीं वेडे होऊन त्यांच्या भजनीं लागले किंवा अमरापुरादिक ठिकाणीं असलेले कुलकर्ण्यादिक भक्त ज्यांची ध्यानपूजनादिक भक्ति मनापासून करीत राहिले त्या सर्वजनप्रिय सर्वभूतहितैषी नृसिंहसरस्वतीमहाराजांची आवड सकळांना किती लागून राहिली होती ती

सहजच दिसून येते, अनुमान करण्याचें कारणच नाहीं. असे श्रीगुरु सर्वांना प्रिय झाले होते. मग काशीकरांना ते प्रिय झाले यांत आश्चर्य नाहीं. काशीतले संन्यासी तर कित्येक वर्षेपर्यंत श्रीगुरुमुनीश्वरांची आठवण प्रेमानें काढीत व त्यांचा गुणगौरव करीत. आत्मनिष्ठ असणाऱ्या संन्याशांनासुद्धां ज्यांनीं असें आपलें प्रेम लावलें, त्यांच्या अद्भुत गुणांचा अंतपार कोणाला लागणार !

महाराष्ट्रांतून गेलेल्या मंडळीला हिताचा उपदेश श्रीगुरूंनीं केला, तेव्हां त्यांच्या मनाला आनंद झाला. यमूताई काकतकरणीनें, "माझें पुढें कसें होईल" म्हणून श्रीगुरूंना विचारलें, तेव्हां ते तिला म्हणाले कीं, "घरदार, दौलत वगैरेची सर्व आशा जर तुम्ही सोडाल, तरच तुम्हांला सौख्य लाभेल." सर्वैषणात्याग हाच श्रीगुरूंनीं खऱ्या सुखाचा उपाय सांगितला. सर्वांनींच तो लक्षांत ठेवला पाहिजे. 'आशायाः परमं दुःखं नैराश्यं परमं सुखं' हाच सिद्धान्त खरा आहे, असें श्रीगुरूत्तमांच्या उपदेशावरून मुमुक्षूंना समजून येतें.

दुसऱ्या वर्षापासून श्रीगुरुमुनी अन्न सोडून फलाहारच घेऊं लागले. भक्त त्यांची सेवा करीत म्हणून पूर्वी सांगितलें. ती सेवासुद्धां आतां भक्तांकडून ते घेईनासे झाले. स्वतःच ते आपणच आपलें सर्व काम करूं लागले. ही त्यांची स्वयंदासवृत्ति पाहून त्यांच्या भक्त लोकांना बरें वाटेना. त्यांत आणखीं उपोषणें आणि शरीरांतर्गत व्याधींनीं प्रकृति क्षीण झालेली पाहून तर भक्तांचा जीव अर्धा होई. त्यांनीं एका वेळीं नम्रपणानें असें त्यांना विनविलें कीं, "गुरुमहाराज ! अशक्त देहानें गंगेचें उदक आणणें इत्यादि आपल्या करण्यानें आपणांला त्रास होतो. हा आम्हीं पहावा काय ? आमचें निवारण करून आपणच स्वतः ही स्वगुरुसेवा व आपली सेवा कां करितां ?" यावर श्रीगुरु त्यांना म्हणाले, "आम्ही आजपर्यंत लोकांकडून पूजा करून घेऊन आपलें तप त्यांना देऊन घालविलें, तें पुन्हां संपादन करतों. त्याशिवाय दुसऱ्या भक्तांना आम्ही काय द्यावें ?" श्रीगुरु असें म्हणाले. यावरून ते आपल्या भजकांना आपली तपश्चर्या देत असत ही गोष्ट जशी सिद्ध झाली, तशीच दुसरीही एक गोष्ट सिद्ध झाली. ती हीच कीं, "साधकानें लोकांकडून सेवा किंवा मानपान, पूजा वगैरे करून घेऊं नये. घेतल्यास आपलें तपोधन त्या

लोकांकडे जाऊन स्वतःची हानी होण्याचा संभव असतो." असा बोध श्रीगुरूंनीं वरील भाषणानें सर्वांना दिला. स्वतः ते महासिद्ध होते. त्यांचें ज्ञानमय परम तप अव्यय असेंच होतें. तें संपणारें नव्हतें. म्हणून लोकशिक्षणार्थच त्यांनीं भक्तांना वरील उत्तर दिलें खास.

अमरापुरांतून अमरेश्वराचे पुजारी महाराजांना देवपूजा, भजन वगैरे नीट चाललें असल्याचें वर्तमान पत्रद्वारां काशींत कळवीत असत. त्यांना उत्तर घातलें त्यांत श्रीगुरूंनीं असा उपदेश केला कीं, "पूजाअर्चा त्रिकाळ चांगली चालते, असें सर्वांचे पत्रांतून वाचून आम्हांस फारच संतोष होत आहे. कारण मुख्य त्रिकाळ देवतापूजन चांगलें झालें म्हणजे ईश्वरीकृपा होते. ईश्वरीकृपा झाली म्हणजे प्रपंच व परमार्थ हे दोन्ही आनंदानें चालतात." हा उपदेश प्रत्येक देवपूजकानें हृदयकागदांत लिहून ठेवण्याला योग्य असा आहे. प्रपंच चांगला चालायलासुद्धां ईश्वरीकृपेची जरूर लागते. श्रीगुरूंनीं चौसष्ट योगिनीचें स्तोत्र छापलें. त्यांत त्यांचीं चौसष्ट नामें कोणतीं तीं दिलेलीं आहेत. ह्या स्तोत्राच्या प्रती अमरापुरच्या पुजाऱ्यांना त्यांनीं पाठविल्या व आज्ञा केली कीं, " हें स्तोत्र तुम्ही आश्विन मासीं नवरात्रांत रोज सर्वांनीं म्हणावें. देवाच्या पूजेबरोबर नित्य मंगलस्नान तुम्ही योगिनींना घालावें. अन्नपूर्णेची मूर्ति पालखींत ठेवून उत्सव करावा. दहा दिवस सुवासिनी स्त्रियांनीं नारळ घालून योगिनींची ओटी भरावी. दसऱ्याचे दिवशीं सर्व बायकांनीं त्यांची ओटी भरावी, आरत्या ओंवाळाव्या, वगैरे संपूर्ण उत्सव करावा. क्षेत्रस्थ सर्व पुरुषांनीं व त्यांच्या स्त्रियांनीं योगिनींचा हा समारंभ करावा. पुढें योगिनीस्थान बहुत प्रसिद्ध होईल. " वगैरे वगैरे. चौसष्ट योगिनी ह्या देवकन्या श्रीवासुदेवानंददत्तामरेश्वराच्या मुख्य भक्तिणी आहेत. गुरुचरित्रग्रंथांत याबद्दलचा उल्लेख पहावा. आपल्या पूजेपेक्षां देवाला भक्तांची पूजा अधिक आवडते. म्हणून श्रीगुरुदेवानें योगिनीपूजेची आज्ञा पूजकांना केलेली दिसते. असो.

श्रीगुरु स्वतः भक्तच आपणांला म्हणवीत होते. मीच देव आहें, असें ते कधींच उच्चारीत नसत. जशी योगिनींवर त्यांनीं आपली प्रीति दाखविली

तशी अमरेश्वरमूर्ति-वासुदेवानंदसरस्वती-सद्गुरुनाथांवरसुद्धां ती त्यांनीं पूर्वोक्त वस्त्राभरणें पाठवून दाखविलीच. शिवाय त्यांच्या वासुदेवानंदसरस्वतींवरील प्रीतीचें एक उदाहरण असें आहे कीं, एकदां लोक त्यांचा फोटो घेत होते. त्यावेळीं तो घेणाराला ते म्हणाले कीं, "आमच्या महाराजांचें चित्र उत्तम निघालें पाहिजे, असा आमचा फोटो घ्या." असें म्हणून एका आसनावर त्यांनीं आपल्या महाराजांची मूर्ति ठेवली व आपण तिच्या बाजूला बसले. कुशलानें तसाच फोटो घेतला. श्रीगुरूंच्या मनांतला हेतु हा कीं, "आपल्या निमित्तानें का होईना, आपल्या गुरुरायाची तसबीर सर्वांना पहायला मिळावी." असा त्यांचा प्रेमा श्रीगुरूंवर होता. त्यांचें सर्व चरित्र गुरुप्रेममयच आहे. नरसिंहसरस्वती मूर्तिमंत गुरुभक्तीच होत. त्यांचें चरित्र म्हणजेदेखील गुरुभक्तीच होय. ते जे यात्रा करीत होते ती गुरुमूर्तीची यात्रा म्हणून करीत होते. श्रीगुरुनाथांची मूर्ति त्यांचेपाशीं एवढयासाठींच ठेवलेली होती कीं, "ह्या गुरुमूर्तीबरोबर मी त्यांचा दास आलों आहें," असें सुचविण्याकरितांच ती त्यांचेजवळ असे. आम्ही यात्रेला अमक्या ठिकाणीं जातों म्हणतांना "गुरुमहाराजांबरोबर त्या त्या ठिकाणीं आम्ही जातों," असा त्यांच्या म्हणण्यांत भाव असे.

बापटशास्त्र्यांना वचन दिल्याप्रमाणें श्रीगुरु आणखी एक चातुर्मास काशींत राहिले. चातुर्मास संपतांच नवीन भक्तांना त्यांनीं स्वदेशीं जाण्यास सांगून पाठवून दिले व आपण अयोध्येला निघाले. अठराशें अठ्ठेचाळीस व एकूणपन्नास ह्या दोन सालाचे चातुर्मास श्रीगुरूंनीं काशींत काढले. तेथून नंतर ते बद्रिनारायणाला जेव्हां निघाले तेव्हां काशी क्षेत्रांतील मंडळी त्यांना तुम्ही येथेंच रहा असें म्हणूं लागली. त्यावेळीं जनतेच्या शांतवनार्थ "आम्ही नारायणाची यात्रा करून येथेंच राहण्याला येऊं" असें श्रीगुरु त्यांना म्हणाले. पण ते केवळ शान्तवनाकरितांच म्हणाले. खरोखर त्यांना अयोध्यावासच करावयाचा होता व त्या अर्थाचे म्हणजे अयोध्येंत जाऊन रामरूप होऊनच रहावयाचें होतें अशा अर्थाचे उद्गार काशींत पूर्वी भक्तांपुढें त्यांनीं काढलेही होते. ते म्हणत, "आम्ही आतां दूर जाऊन लपून बसणार आहों. आम्हांला कोण हुडकून काढतो तें पाहूं." या गुरुवचनाचा अर्थ त्या वेळीं कोणाला

समजला नाहीं, नंतर समजला. ही श्रीगुरूंचीच इच्छा होय. श्रीगुरु केव्हां केव्हां " आम्हांला काशींतच आतां कायमचें रहावेंसें वाटतें " असें म्हणत. पण हें त्यांचें म्हणणें शास्त्रानें वर्णिलेल्या काशीक्षेत्राचा महिमा प्रगट करण्याकरितांच होय. एखादा मठ बांधून महाराजांची भक्ति करीत येथेंच रहावें, असेंही ते म्हणत. पण दादासाहेब नाइकांकरवीं मठ मात्र त्यांनीं बांधविला नाहीं. अमरापुरच्या मठांतसुद्धां जे राहिले नाहींत किंवा अन्यत्र अनेक भक्त मठ बांधून द्यायला तयार होते त्यांच्याकडून मठ बांधवून त्यांतदेखील जे राहिले नाहींत, मठाची उपाधि मोक्षाला विघ्न करणारी आहे असें जे मानीत ते काशींत मठ कशाला बांधतील ? व अमुकच स्थानांत राहतों असें तरी प्राकृताप्रमाणें कसें म्हणतील ? मी हा देहच आहें, ही अज्ञबुद्धि त्यांना असती तर त्यांनीं तसें केलेंही असतें. पण पूर्णविदेही ब्रह्मनिष्ठाचे मुगुटमणि श्रीनृसिंहसरस्वती सच्चिदानंदघन, अनंत, व्यापक ब्रह्मच आपण आहों असें अनुभवीत असलेले योगीश्वर देहप्रारब्धाचा खेळ व त्याचा अंतच पहात राहिले होते; अवतारसमाप्ति अयोध्येमध्यें होणार ही गोष्ट ते जाणतच होते. पण भक्तांच्या समाधानार्थ आम्ही काशीला परत येऊं, असें ते त्यांना म्हणाले.

श्रीगुरु चालले असें पाहून काशीकर समाज गुरुदर्शनाला गणेशमंदिरांत लोटला. त्याला गुरुविरह दुःसह झाला. गुरुभक्त बापटशास्त्री तर मोठ्यानें रडून श्रीगुरूंना आळवूं लागले. ते म्हणाले, " गुरुमाउलीनें मला वर्षभर काशींत राहण्याची भाक दिली होती. ती मोडून आपण मध्येंच निघालां. आतां या दीन लेंकरावर प्रेम कोण करील ? मला आपल्यावांचून करमेल कसें ? आपल्या चरणीं सर्व तीर्थें आणि दैवतें असतांना आपण आणखी यात्रेला कशाला जातां ? येथेंच रहा. " इत्यादि प्रकारें बापटभक्तांनीं अनन्य भावानें श्रीचरणीं मस्तक ठेवून त्यांची विनवणी केली. त्यांनासुद्धां श्रीगुरूंनीं " आम्ही नारायणाचें दर्शन घेऊन परत येथेंच येऊं, " असें सांगितलें. त्यांचें समाधान केलें, व क्षेत्राधिपति श्रीविश्वेश्वरप्रमुख देवतांना वंदन करून चिटणीस नांवाच्या गुरुभक्तानें खर्च देऊन तयार राखलेल्या अग्निरथानें प्रयागक्षेत्राला ते आले. तेव्हां त्यांचेबरोबर अनसूयाबाई व एकदोन दुसरे महाराष्ट्रांतील भक्त होते.

प्रकरण २१ वें

प्रयागला आल्यानंतर पुन्हां एकदां श्रीगुरूंनीं पूर्वीप्रमाणें तेथें सर्व यात्रा आचरली. तीर्थाला, देवाला जाणें व पूजन अर्चन वगैरे करणें ही त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति होती. पण भक्तांच्या घरीं जाऊन त्यांच्याकडून स्वतः पूजन वगैरे घेणें ही मात्र त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति नसून ती भक्तांच्या इच्छेस्तवच केवळ होती. आजपर्यंत उभयविध प्रवृत्तीनें त्यांनीं जगत्कल्याणच साधलें. भक्त लोकांचें रक्षण केलें. भक्तियोगाची स्थापना केली. मुमुक्षूंचा उद्धार केला व पुढेंदेखील सर्व प्राणिमात्राचें कल्याण व्हावें म्हणून अमरापुर येथें त्यांनीं वासुदेवानंददत्तामरेश्वराची स्थापनाही केली. इत्यादिक आपलें दिव्य अवतारकृत्य श्रीगुरु नृसिंहसरस्वतीभगवंतांनीं पूर्ण केलें व प्रयागापर्यंत ते आले. काशींत गेलेले महाराष्ट्रीय भक्तही प्रयागापर्यंत महाराजांबरोबर होतेच. त्या एकंदर सर्व भक्तांना श्रीगुरूंनीं प्रेमानें सांगितलें कीं, " यापुढें आतां आमचा सहवास तुम्हांला आजपर्यंत झाला तसा होणार नाहीं; तुम्ही आतां स्वदेशीं जावें व अमरापुरांतील श्रीगुरु भगवंतांचें भजन, पूजन करीत आनंदानें रहावें. आम्ही नारायणाचे भेटीला बद्रिकाश्रमाला जातों." असें श्रीगुरूंनीं सांगतांच त्या भाविक प्रेमी भक्तांना मोठें दुःख झालें. यापुढें आमचा सहवास तुम्हांला होणार नाहीं, ह्या श्रीगुरुमूर्तींच्या भाषणानें त्यांच्या मनावर निराशेचाच परिणाम झाला. तेव्हां त्यांनीं महाराजांची प्रार्थना केली कीं,

पद

(माझा दत्त देखिला काय)

पुनरपि निज दर्शन आम्हां । श्रीगरु देतिल ना ॥ धरु० ॥

जातां आपण अतिशय दूर । लक्षुनी नरनारायणपूर ॥
जेथें थंडजळाचे पूर । दुःसह फार वाहति ॥ पुनरपि० ॥ १ ॥
आपण द्वंद्वातीत मुनी । सौख्यें रमाल त्या स्थानीं ॥
उपाधी बाहच्य नको म्हणुनी । नारायणीं मिसळाल कीं ॥
पुनरपि० ॥ २ ॥
तेथें राहुं नका बहुकाळ । कराया आमुचा या सांभाळ ॥
आपण प्रणतदासजनपाळ । दीनदयाळ गुरुमूर्ति ॥ पुनरपि० ॥ ३ ॥
आम्हां विसरुं नका गुरुनाथ । आजवरि रक्षुनियां सांगात ॥
शंकरस्वामि जोडितो हात । पदिं प्रणिपात घालतो ॥
पुनरपि० ॥ ४ ॥

असें म्हणून त्या प्रेमळ भक्तांनीं प्रेमाश्रूच्या प्रवाहांत श्रीगुरुचरण बुडवून सोडले. तेव्हां भक्तवत्सल सद्गुरुनाथांना त्यांची फार दया आली. त्यांनीं आपल्या ईश्वरस्वरूपाच्या आविर्भावांत आपले प्रतियुगी अवतार धारण करून प्रगटणेंच प्रर्यायानें भक्तांना सूचित करीत असें म्हटलें कीं, "भक्तहो ! आम्ही कांहीं काळानें लौकरच परत येऊं व तुम्हांला निजदर्शन पुन्हां देऊं; चिंता करूं नका." श्रीगुरु असें जेव्हां म्हणाले, तेव्हां त्या भक्तांना धीर आला व ते गुरुवरांची आज्ञा घेऊन त्यांना एकदां पोटभर पाहून घेऊन परत महाराष्ट्रांत आले.

श्रीगुरुमुनी चिटणीसांनीं तयार ठेवलेल्या अग्निरथांत बसले. क्षेत्रस्थांनीं त्यावेळीं श्रीगुरुनाथांना नमस्कार केले. त्यांना 'नारायण' असा आशीर्वाद देऊन श्रीगुरु अयोध्यापुराला जाऊन उतरले. दंडकमंडलुधारी श्रीगुरु अश्वरथांत बसून अयोध्येला शरयूतीरीं काळेरामाचे मंदिरांत येऊन रामरायाचें दर्शन घेते झाले. शरयूचे घांटावर भोसल्यांचें मंदिर आहे. श्रीगुरुनाथांचा बद्रिनारायणच तो समजा. कारण त्या नारायणाचे सन्निधच एका रिकाम्या मंदिरतुल्य इमारतींत श्रीगुरुनाथांनीं आपला मुक्काम ठेवला. सात आठ पायऱ्या उतरतांच शरयूचें स्नान घडावें इतक्या उंचीवर तें श्रीगुरुनाथांचें निवासस्थान होतें. त्याच्यावर अश्वत्थाची विस्तीर्ण छाया होती.

भाद्रपद वद्य अमावास्येला त्या स्थानीं श्रीगुरु रात्रीं जाऊन राहिले. काळेरामाचे पुजारीच येथील नारायणाची पूजा करतात.

दुसरे दिवशीं आश्विनांत शारदानवरात्र सुरू झालें. कोणतीही उत्सवाची संधि आली असतां श्रीगुरु आपल्या वासुदेवमूर्तीची व वासुदेवपादुकांची थाटानें पूजाअर्चा करीत असत. कोणत्याहि देवतेचा उत्सव ते निजगुरुपूजेनेंच साजरा करीत. जितक्या दिवसांचा तो उत्सव असेल तितके दिवस गुरुपूजेचा थाट ते करीत. गुरु हेच सर्व देव होत असे ते समजत. त्यांची सर्वत्र अभेददृष्टीच असे. 'वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः' असें ज्या महात्म्याचें सुदुर्लभत्व स्मृतिशास्त्र गातें तो 'वासुदेवच सर्व कांहीं आहे' असें पाहणारा सुदुर्लभ महात्मा श्रीगुरुनृसिंहसरस्वती भाग्यवशात् सर्वांना कांहीं वर्षें अतिशय सुलभ झाला होता. शारदादेवीसुद्धां आपले सद्गुरु वासुदेवानंदसरस्वती दत्तभगवान हेच आहेत, अशा बुद्धीनें त्यांनीं नवरात्र सुरू होतांच गुरुपूजोत्सवाचें नवरात्र सुरू केलें. अनुताई व यमुनाताई कवठेकर पूजेला लागणारें साहित्य, ऊन पाणी, तेल, बुक्का, पंचामृत, फुलें, धूप-दिप-नैवेद्य वगैरे भक्तीनें तयार करून देत. श्रीगुरु प्रीतीनें सर्वोपचारांनीं निजगुरुपूजा करीत. दसऱ्याचे दिवशीं मारुती, शरयु व श्रीकाळेराम यांचेंसुद्धां महापूजन, महानैवेद्य, आरती श्रीगुरूंनीं केली. ब्राह्मणांना व सुवासिनींना भोजन घातलें. वस्त्रें, अलंकार, दक्षणा त्यांना दिली. क्षेत्रयात्रा आचरले व रामरायाला पुजून चांदीचीं पूजोपकरणें त्याला अर्पण केलीं.

दसऱ्यानंतर श्रीगुरुमुनींची शरीरप्रकृति ज्वरानें क्षीण होऊं लागली. देव असो कीं मनुष्य असो, कोणाचेंहि का शरीर असेना, शरीर म्हटलें कीं त्याला व्याधि ही असायचीच. किंबहुना शरीरच व्याधिस्वरूपी आहे, असेंदेखील म्हणायला हरकत नाहीं. 'शरीरं व्रणवत् साधिव भिक्षान्नं तरव लेपनं' अशी शिरोळांत कण्वाभोजन घेतांना, सद्गुरु दत्तभगवान स्वतःच विपरिणमेला म्हणाल्याची कथा कुमारशिक्षानामक ग्रंथांत वासुदेवानंदांनीं लिहिली आहे. यावरून व्याधिरूपी शरीरच होय. त्या शरीरांत ज्वररूपी दुसरा एक व्याधि उत्पन्न होतांच श्रीगुरुमुनीश्वरांजवळ असलेल्या अनसूया साध्वीनें काशीहून

बाळूपुजारी नांवाच्या गुरुभक्ताला अयोध्येला बोलावून घेतला. तो भक्त महाराजांची देवपूजा व त्यांची सेवादेखील करीत त्यांचे सन्निध राहिला. चांगले नामांकित वैद्यदेखील अनसूयेनें काशीहून आणविले. त्यांनीं महाराजांना औषध सुरू केलें. श्रीगुरुनाथांचीच इच्छा जेथें अवतार संपविण्याची झाली, तेथें वैद्यानें तरी काय करावें! किंवा औषधानें तरी फळ काय येणार! गुर्वंगीचा ज्वर हटला नाहीं. अशा वेळीं हरिभक्त बापटशास्त्री किंवा अन्य तारकमठांतील भक्त संन्यासी यांनीं 'महाराजांनीं काशीला यावें' म्हणून अयोध्येला मनुष्य पाठवून त्यांना काशीला बोलावणें सुरू केलें. प्रसिद्ध रामभक्त विष्णु-दिगंबर पलुस्कर बुवा हे त्यावेळीं अयोध्येंत होते. वाडींत असल्यावेळचे महाराजांचे ते भक्त होते. वासुदेवजन्मोत्सवांत महाराजांपुढें गायन व कीर्तन यांनीं केलें होतें. महाराजांचे कृपेंतले हे होते. महाराजांवर त्यांचें फार प्रेम होतें. महाराज अयोध्येंत आलेले ऐकून ते गुरुदर्शन घेण्यासाठीं रोज त्यांचेजवळ येत व प्रेमानें बोलत बसत. महाराजांना काशीकर मंडळी काशीला नेऊं इच्छितात, ही गोष्ट त्यांना कळली. तेव्हां ते महाराजांना विनंति करीत म्हणाले कीं, "महाराज!, मी श्रीरामाचा दास आहें. माझें म्हणणें असें आहे कीं, ब्रह्मनिष्ठयोगीश्वराला देश, काळ व दिशा ब्रह्मरूपच आहेत. शुभ किंवा अशुभ कांहींच नाहीं. म्हणून आपण काशीस जाण्याचा बेत करूं नका. अयोध्येंतच रहा. व्यावहारिक दृष्टीनें पाहिलें तरी सात मोक्षपुऱ्यांमध्यें अयोध्या ही पहिल्या प्रतीची वर्णिलेली आहे व काशी ही चौथ्या प्रतीची आहे. शिवाय विश्वेश्वराचे उपास्य दैवत राम आहेत. त्यांची ही पुरी आहे. एकंदरींत आपण येथें राहणेंच योग्य आहे, असें मला वाटतें. मी बोलतों हा रामच बोलत आहे असें समजा."

विष्णुपंतबुवांनीं, श्रीगुरुवर्य ब्रह्मविद्वरिष्ठ पूर्ण ज्ञानी आहेत, ही गोष्ट समजूनच तुम्ही अयोध्येंतून अन्य कोठें जाणें ठरवूं नका असें त्यांना म्हटलें. देहावसान कोठल्या जरी क्षेत्रांत झालें, किंवा एखाद्या खेड्यापाड्यांत किंवा जंगलांत झालें, तरी ब्रह्मज्ञानी त्याबद्दल शुभ किंवा अशुभ समजत नाहीं. सर्व कांहीं त्याला शुभच असतें. शुभ म्हणजे पवित्र होय. "**न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते**" रामस्वरूप परब्रह्म वस्तूच एक

सर्वोत्तम पवित्र आहे. ती पवित्र वस्तूंच स्वतः ज्ञानी पुरुष असतो व **" सर्वं खल्विदं ब्रह्म "** म्हणजे सर्व चराचर हें एक परब्रह्मच आहे व मीच तें ब्रह्म होय, असा तो ज्ञानवरिष्ठ समजत असतो. मग आतां देश, काल, वस्तु, दिशा, शुभ, अशुभ इत्यादि वैचित्र्य त्या ब्रह्मज्ञपुरुषाला कुठें राहिलें ? कोणताच भेद त्याला राहिलेला नाहीं, हीच गोष्ट सत्य होय. असा अभिप्राय विष्णुबुवांनीं महाराजांबद्दल जेव्हां त्यांचेपुढें प्रगट केला, तेव्हां निजानुभव प्रगट करून दाखविणाऱ्या विष्णुबुवांना श्रीगुरूसुद्धां तदनुरूपच उत्तर देते झाले. ते म्हणाले, " रामभक्त म्हणजेच राम, असें तुम्ही जें सांगतां, तें आम्हांला मान्य आहे. आम्हांला अयोध्या काय, किंवा काशी काय, तद्वत् शिव काय किंवा राम काय, एक श्रीगुरुवासुदेव परब्रह्मच आहे. करितां आम्ही रामरायाचे राजधानींतच राहिलों. तुमच्या इच्छेप्रमाणेंच केलें. दुसरीकडे आतां जात नाहीं, " ही श्रीगुरुमुखांतली प्रियकर भाषा ऐकून विष्णुपंत आनंदित झाले.

अनुताई, यमुताई कवठेकर व बाळु पुजारी हया तीन भक्तांनीं श्रीगुरायांची शुश्रुषा काळजीपूर्वक चालविली होती. महाराजांच्या प्रकृती आराम वाटावा म्हणून अनसूया इत्यादिकांनीं प्रयत्न चालविला होता. काशींतच श्रीगुरुमुनींचे शरीरांत ज्वराचा उद्भव झाला होता. तो जाणून अनुताईनीं तेथें असतां गोविंदराव डिग्रजकर यांचेकडून महाराजांच्या आरोग्यासाठीं ईश्वरप्रीत्यर्थ एक श्रीगुरुचरित्राचा सप्तासुद्धां वाचविला होता. व्यावहारिक औषधी उपाय व दैवी उपाय, दोन्हीही त्यांनीं केले. अखेर वैद्यांना काशीहून आणवून त्यांना पुष्कळ रुपये दिले. सर्व कांहीं निजबुद्धीप्रमाणें करायचें तें त्यांनीं केलें. अखेरपर्यंत म्हणजे वाडी सोडल्यापासून अयोध्येला येईपर्यंत पांच वर्षें श्रीगुरुभगवंतांची अहोरात्र अखंड सेवा अनूनें प्रेमानें केली. अशी दीर्घ काळ अखंड सेवा दुसऱ्या कोणीच केली नाहीं. म्हणून सर्व सेवकवर्गांत गुरुभक्त अनसूया माता हया श्रेष्ठ होत. लोकांनीं कितीही जरी त्यांना वाईट म्हटलें व आम्हीसुद्धां एखादे प्रसंगीं त्यांना उणे अधिक शब्द वापरले असले तरी विचाराअंतीं अनु माउली ही सर्वांना खरोखर पूज्यच आहे. लोकांच्या दृष्टीनें दिसणाऱ्या तिच्या सर्व दुर्गुणांकडे

दुर्लक्ष करून प्रत्यक्ष श्रीगुरु योगींद्रांनींच जर तिचा अखेरपर्यंत अंगीकार केला, त्याग केला नाहीं, व आपली अमरांनादेखील दुर्लभ असलेली पावन सेवा त्यांना प्रीतीनें दिली व वाडींत त्यांना दिलेलें आपलें वचन सत्य केलें, असें ज्यांच्यावर श्रीगुरूंनीं प्रेम केलें, त्यांना क्षुल्लक मानणें म्हणजे महापाप होय, असें आम्हांला वाटतें. आम्हीं तरी त्यांना अंतरांत गुरुरूपच मानतों. अस्तु.

महाराजांचे स्वारींत असलेल्या स्त्रिया आपसांत जरी भांडत तरी प्रत्येकीची निष्ठा गुरुमहाराजांवर मात्र पूर्ण होती. माझे अनंत अपराध सहन करणारीच आपली गुरुमाय आहे, असा पूर्ण विश्वासदेखील प्रत्येकीचा सद्-गुरुवर्यांवर होता. म्हणूनच कीं काय महाराज त्यांच्या अनन्य भावानें भुलून इतके शांत रहात असत, असें मला वाटतें. भावामुळें असोत किंवा त्यांचा तो मूढपणा जाणून ते शांत रहात असोत, एवढें मात्र खरें कीं—

मातरीव शमं यांति विषमाणि मृदूनि च ॥
विश्वासमिह भूतानि सर्वाणि शमशालिनि ॥१॥

अर्थ—"आईजवळ द्वाड किंवा गरीब दोन्हीहि मुलें जशीं लीन होतात व त्या सर्वांचाही आईवर जसा पूर्ण विश्वास असतो कीं, ही मजवर प्रेम करणारीच माउली आहे. तद्वत् शमशालीयोगी ब्रह्मनिष्ठाजवळ द्वाड किंवा सालस दोन्हीहि माणसें लीनच होतात व त्या दोघांचा त्या दयाक्षमाशील ब्रह्मनिष्ठावर पूर्ण विश्वास असतो कीं, ही आपली प्रेमकर्ती स्नेहाळ माउलीच आहे." ह्या वसिष्ठवचनाचा अनुभव मात्र महाराज श्रीनृसिंह-सरस्वती निजचरित्राचा विचार करणाऱ्या सज्जन मनुष्याला देत होते. वृक्ष जसा त्याला पाणी घालणाऱ्याला म्हणजे सुख देणाऱ्याला किंवा फांद्या तोडणाऱ्याला म्हणजे त्रास देणाऱ्याला—दोघांनाही समान सुख देतो, तद्वत् श्रीगुरु पूजा, भिक्षा वगैरेंनीं सुख देणाऱ्यांना किंवा रात्र रात्र झगडा माजवून त्रास देणाऱ्यांना—दोघांनादेखील समानच सुख देत होते. सर्वांचेंच कल्याण चिंतीत होते. दोन्ही प्रकारच्या म्हणजे द्वाड व सालस, सुज्ञ व अज्ञ लोकांना अनुकंपनीयच ते समजत होते. म्हणून व्यक्तिशः प्रत्येक मनुष्य त्यांच्याजवळ

शांतपणानेंच मागे व निजोद्धार करणारे संसारसागरांतले आपले तारूच हे आहेत, अशा पूर्ण विश्वासदेखील लेनीत आगे. तीक्ष्ण आणि मृदु दोन्ही तऱ्हेचे लोक गुरूपाशीं लीनतान धरीत यानें कारण श्रीगुरु परमदयालु, सर्वभूतहितैषी, अतिशय शान्तिमान् होते, हें होय. एका ठिकाणीं हुषा स्त्रियांच्या झगड्यामुळें त्रस्त होऊन एकानें महाराजांना " आपणांला हा झगडा त्रासदायक होत नाहीं काय ?" असा प्रश्नदेखील केला. तेव्हां महाराज त्याला म्हणाले कीं," सडकेवर झगडे वगैरे चालतच असतात. त्यांचा त्रास सडकेच्या कडेवरील घरांतील लोकांना होतो काय ? किंवा त्याच सडकेनें जाणाऱ्या वाटसरूंना तो त्रास होतो काय ? त्याच्याकडे कोणी लक्षच पुरवीत नाहींत. तद्वत् आम्हीसुद्धां या झगड्याकडे लक्ष देत नाहीं. सबब आम्हांला त्रास व्हावाच कसा ? " असें उत्तर देणाऱ्यांची शान्ती केवढी असावी याबद्दल सांगायला पाहिजे का ? वाडीकरांनीं त्यांचा कमी छळ केला काय ? पण एक चकार शब्दसुद्धां ते त्यांना क्रोधानें उलट बोलले नाहींत. आपल्या गुरुदेवाच्या उत्सवाला निर्विघ्न अशा अमरापुरांत मुकाट्यानें ते येऊन राहिले, ही त्यांची शांतीच होय. शिवाय वाडींत व अमरापुरांत दोन्हीं ठिकाणीं गुरूत्सव पुढें चालावेत हादेखील त्यांचा गुरुभक्तिप्रधान हेतु अमरापुरांत येतांना असावा. कोणी एकानें त्यांना म्हटलें होतें कीं, " महाराज ! अमरापुरापेक्षां मोठा उत्सव वाडीकर करीत आहेत." त्यावर गुरुमहाराज म्हणाले कीं, " ठीक आहे. चढाओढीनें महाराजांचा उत्सव करतात तर करूं देत. चांगलीच गोष्ट आहे. " श्रीगुरूंना चढाओढीनें उत्सव होऊं लागला म्हणून आनंदच वाटला. तात्पर्य हेंच कीं, सर्वही प्रसंगीं महाराजांची शमशालिताच दृष्टोत्पत्तीला आली म्हणून—

तपस्विषु बहुज्ञेषु याजके नृपेषु च ॥
बलवत्सु गुणाढ्येषु शमवानेव राजते ॥१॥

हुषा वसिष्ठवचनाप्रमाणें तपस्वी, बहुज्ञ, याजक, नृप, बलवान किंवा गुणाढ्य या सर्वांमध्यें शमवान श्रीगुरुराजच अधिक शोभले गेले.

या शांतीच्या बळावरच स्वभावानें मत्सरी व रंगानें कोळशाला लाजविणारी अनसूयाबाई त्यांनीं अखेरपर्यंत आपणांजवळ सांभाळली, ही मायादेवीच होय. " हें मायायंत्र आम्ही लोकांच्या परीक्षेसाठींच जवळ ठेवलें आहे, यांतून पार पडून आमच्या जवळ कोण टिकतो तो आम्हांला पाहायचा आहे " असेंही ते बोलत असत. पुष्कळसे मोठे शहाणे म्हणविणारे लोकसुद्धां ह्या मायारूपी यंत्राला भिऊन किंवा कंटाळून महाराजांचा सहवास सोडून गेले. महाराज रहा म्हणत असूनसुद्धां त्यांचेजवळ राहिले नाहींत, असा अनुभव आहे. अस्तु.

अनसूयाबाईंनीं महाराजांची तब्बेत सुधारावी म्हणून बहुत खटपट केली ती पूर्वी सांगितलीच. महाराजांचा देह ज्वरानें अशक्त झाला होता. तरी आपल्या गुरुदेवाची पूजा, आरती श्रीगुरु अंथरुणावर अगदीं पडेपर्यंत स्वतःच करीत. पूजेचे वेळीं हे आजारी आहेत असें कोणालाच वाटत नसे. तद्वत् देह सुटेपर्यंत त्यांचें बोलणें प्रेममय आनंदानें जसेंच्या तसेंच चाललेलें असे. दुःखाचे उद्गार त्यांचे मुखानें मुळींच निघाले नाहींत किंवा त्यांच्या मुखपद्मावर म्लानतादेखील आली नाहीं. ध्यानस्थितिकालीं नेहमीं जसें तें निर्विकार दिसे, तसेंच पहाणाराला तें दिसत होतें. यावरून त्यांची आनंदरूपता कशी अभंग होती हें समजून येतें. शरीरांतील ज्वरानें आपण अनुसंज्वरित न होणें हें पूर्ण जीवन्मुक्त पुरुषाचेंच लक्षण होय.

आत्मानं चेद्विजानीयादयमस्मीति पूरुषः ॥
किमिच्छन्कस्य कामाय शरीरमनुसंज्वरेत् ॥१॥

याप्रमाणें श्रुतीनें त्याच्या सकळ दुःखांचा अभाव वर्णिला आहे. ज्ञानामृतानें व गुरुभक्तिसुधेनें तृप्त झालेल्या कृतकृत्य श्रीगुरुयोगीश्वरांना कोणतेंच कर्तव्य उरलेलें नव्हतें. मग ते देहावर येऊन पूर्ववत् इंद्रियांची हालचाल तरी कशाला करतील ? ते जे एकदां अखंड आनंदघन झाले ते तसे आनंदघनच राहिले, पुन्हां देहावरच आले नाहींत. अखंड समाधीच त्यांनीं लाविली. शके अठराशें एकूण पन्नास, आश्विन वद्य सप्तमीला श्रीगुरु नामरूपरहित पूर्णब्रह्मच झाले.

अनसूयेच्या सांगण्यावरून बाळु ब्रह्मचाऱ्यानें ठिकठिकाणच्या गुरुभक्तांना पत्रें पाठविलीं. त्यांना अयोध्येस बोलाविलें. उमरेडहून बाबुराव नाईक, नागपुराहून आत्माराम डवरी, उमरावतीहून सोमण व बाळाभाऊ जोशी व नरसोबाचे वाडीहून लक्ष्मणराव बोठे फुलारी यांनीं श्रीगुरूंचे पूजेचे देव अयोद्धेंतून अमरापुरांत आणिले. असे हे पांच व अनु, यमू व बाळू हे तीन असे एकंदर आठ भक्त गुरुसमाधिकाळीं अयोध्येला होते.

श्रीगुरुनाथांच्या विरहानें अयोध्येला गेलेले भक्त फार दुःखित झाले. त्याप्रमाणें गुरुसमाधि ऐकून महाराष्ट्रांतले व काशींतले संन्यासीसुद्धां सर्व भक्त अत्यंत कष्टी झाले. काशीकर संन्यासीप्रमुख गुरुभक्त आगगाडीच्या स्टेशनावर येऊन महाराजांची मार्गप्रतीक्षा करीत काशींत बसले होते. त्यांना फार आशा होती कीं, आपल्या विनंतीप्रमाणें नृसिंहसरस्वतीमहाराज काशीवास करायलाच येतील. पण जेव्हां अयोध्यावासीच ते झाल्याची वार्ता त्यांना समजली तेव्हां निराश होऊन ते परत गेले. श्रीगुरुनाथांनीं अखिल ठिकाणच्या लोकांना आपली चटक लावून ठेवली. बारां बारा वर्षें प्रयत्न करणारांनासुद्धां जी परमेश्वराची चटक लागत नाहीं, अशी जी अत्यंत दुर्लभ चटक म्हणजे आश्रित-प्रीति-भक्ति, ती श्रीगुरुपरमेश्वरांनीं प्रत्येक गांवीं एकेकदां जाऊन महिनाभरांत किंवा एखाद्या दिवसांतच नव्हे तर एखाद्या निमिषांतदेखील आपल्या सेवकांना निजकृपावलोकनानें कायमची जडवून दिली. 'प्रभु तुझीं आवड गजला देई', 'प्रेमसुख देई प्रेम सुख देई', 'भाव दे हरि तुझ्या चरणाचा' अशा प्रकारें अनेकांनीं परमात्म्यापाशीं ज्या आवडीची मागणी केली आहे, ती महत्त्वाची देणगी श्रीगुरुदयाळांनीं सर्वांना सहज अनायासानेंच म्हणजे कीणालाहि प्रयत्न पडूं न देतां दिली, हा गुरुकरुणामेघाचा उदारपणा संस्मरणीय असाच होय. प्रेमाबरोबर आत्मज्ञानाचीदेखील देणगी त्यांनीं भक्तांना देऊन ठेवली. तद्वत् धर्माचरणानें धार्मिक सद्बुद्धीसुद्धां त्यांना उपजवून दिली. याप्रमाणें प्रथम फळ हातांत देऊन नंतर त्याचें साधन आपल्या आचरणानें त्यांना शिकविलें. तें हेंच कीं—

आजीवितं त्रयः सेव्या वेदान्तो गुरुरीश्वरः ।
आदौ ज्ञानाप्तये पश्चात्कृतघ्नत्वनिवृत्तये ॥ १ ॥

अर्थ—" वेदान्त, गुरु, ईश्वर आणि धर्म प्रत्येक पुरुषाला आयुष्य असेपर्यंत सेव्य आहेत. ज्ञान होऊन परमानंदाची प्राप्ति होण्याकरितां ज्ञानापूर्वी तर त्यांची सेवा करायला पाहिजेच; पण ज्ञानोत्तरसुद्धां कृतघ्नपणा येऊं नये म्हणून त्यांचें सेवन पूर्ववत् केलेंच पाहिजे." अशा तऱ्हेचा स्वहितसाधनाचा बोध श्रीगुणपरमोदारांनीं निजाचरणानें सकळांना दिला. वेदान्त, गुरु, ईश्वर आणि स्वधर्म यांचें सेवन देह ठेवीपर्यंत श्रीगुरुमुनींद्र करीत असलेले सर्वांनीं पाहिलेच आहेत.

काशीमध्यें श्रीगुरु " आम्ही आतां दूर जाणार " असें म्हणाले. आत्मा हा दूरच आहे. ' दूरात्सुदूरं ' असें श्रुतिवचनच आहे. तद्वत् " आम्ही लपून बसणार " असेंहि ते म्हणाले. आत्मा हा लपलेलाच आहे. ' गुढोत्मान प्रकाशते ' असेंच श्रुति सांगते. " आम्हांला कोण हुडकून काढतो तें पाहूं, " असेंही ते म्हणाले. हुडकून काढणारा एखादा विरळाच असणार. असा त्या म्हणण्याचा अर्थ होय. श्रुतिदेखील ' कश्चिद्धीरः प्रत्यगात्मानमैक्षत् ' असेंच म्हणाली आहे. सर्वांचें तात्पर्य इतकेंच कीं, "आही कोठें गेलों नाहीं; सकळांचा आत्माच आम्ही आहों. अविद्येनें जरी दूर व गुप्त भासलों तरी विचारवंत भक्तांना आम्ही दूर किंवा गुप्त नाहीं तर अगदीं जवळच सकळांचा आत्माच आहों. ' तदिहांतिकेच ' " असा श्रीगुरुनाथांच्या भाषणाचा भावार्थ दिसतो. सकळांचा आत्मा म्हणजे सर्वात्मा म्हणचेच सर्व ' स सर्वमभवत् ' असें वेदानें ब्रह्मज्ञान्याचें सर्वत्व वर्णिलें आहे. सर्व नामें किंवा सर्व रूपें हीं एका मज आत्म्याचींच आहेत. घट, शराव, डेरे, रांजण इत्यादिक नामें व रूपें जशीं एका मृत्तिकेचींच आहेत म्हणजे मृत्तिकेविण दुसरें कांहीं नाहींच, या दृष्टान्ताप्रमाणें दत्त, वासुदेव, नरसिंह, राम, कृष्ण इत्यादि नामें व रूपें हीं सर्व मज एका परब्रह्माचींच आहेत, म्हणजे मजव्यतिरिक्त कांहींएकसुद्धां नाहीं. अवघा सच्चिदानंदघन श्रीगुरु वासुदेव म्हणजे आपणच आहों, असा बोध श्रीगुरु आपल्या " आम्ही आतां दूर जाणार " इत्यादि भाषणानें सर्वांना देते झाले.

" आम्ही भक्तांच्या हृदयांत राहतों " असें श्रीगुरुभगवंत म्हणाले आहेत. " अमरापुरांत आम्हीं आहों " असेंही ते म्हणाले आहेत. ज्या काशीकर,

उमरेडकर भक्तांना त्याचप्रमाणें अन्य आपल्या भक्तांना त्यांनीं "तुम्हांला आम्हीं पुन्हां भेट देऊं, किंवा तुमच्या क्षेत्रांत येऊं" असें वचन दिलें होतें तीं आपलीं सर्व वचनें श्रीगुरुनाथांनीं सर्वव्यापक सर्वात्मा होऊन सत्य केलीं. **स्वभक्तमानसराजहंसच ते होऊन राहिले.**

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीगुरुवर्य श्रीमन्नरसिंहसरस्वती
दीक्षितस्वामीमहाराज यांचें हें संक्षिप्त चरित्र
त्याच सच्चिदानंद श्रीगुरुपरमेश्वराला अर्पण असो.

श्रीनृसिंहसरस्वतीकृत आरत्या

— १ —

जय जय श्रीमद्गुरुवरस्वामिन् परमात्मन् हंसा ।
वासुदेवानंदसरस्वति आरति तदहंसः ॥ ध्रु० ॥

सोहं हंसः पक्षाभ्यां संचरसि ह्याकाशे ।
वासस्ते खलु लोके सत्ये क्रीडा तव मानसे ॥ जय० ॥१॥

मुक्ताहारो ब्रह्मवाहको वैराट्रूपधर ।
भक्तराजहृद्ध्वांततमोहृत्स्वीकुरु मांच हर ॥ जय० ॥२॥

पक्षस्यैके वातेनैते भीताः काकाद्याः ।
पलायितास्ते द्रुतं प्रभावाद्भवंति चादृश्याः ॥ जय० ॥३॥

एवं सति खलु बालस्तेहं ग्रसितः कामाद्यैः ।
मातस्त्वरया चोद्धर कृपया प्रेषितशांत्याद्यैः ॥ जय० ॥४॥

दासस्ते नरसिंहसरस्वती याचे श्रीचरणं ।
भक्तिश्रद्धे वासस्ते हृदि सततं मे शरणं ॥ जय० ॥५॥

— २ —

दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ।
आरति हे तव चरणीं राहो नतिति गुरुवरा ॥ ध्रु० ॥

दिग्भिर्वेष्टितमंबरमेव प्रत्यग्ब्रम्हेति ।
खं ब्रम्हेति श्रुतिरपि वदति दिगंबराचेति ॥ दि० ॥१॥

आरत्या

दिग्वच्चांबरमेवव्यापक पूर्ण ब्रम्हेति ।
सच्चित्सुखघनमायातीतं दिगंबरा वदति ॥ दि० ॥२॥
श्रीपादवल्लभ नाम प्रापहि नक्रगजेंद्रमिव ।
द्रौपद्यंबरीषचोरग्रसितद्विजमेव ॥ दि० ॥३॥
दिगंबरा गुरु वासुदेव दत्तस्त्वं ब्रम्ह ।
कामक्रोधग्रसितं मां लभ तथैव झटिति वह ॥दि०॥४॥

— ३ —

जयजय श्रीमद्गुरुवर देवाधिदेवा ।
पंचारति हे चरणीं घडवी मज सेवा ॥ ध्रु० ॥
वास तुझा ब्रम्हांडीं चालक तूं देवा ।
अससी तूं सर्वांचा आनंदठेवा ।
वदती वेद सरस्वती न होय हा ठावा ।
कामति माझी नमितों पदिं देई ठावा ॥ जय० ॥१॥
सद्दाता तव महिमा वर्णितसे वेद ।
मोक्षाचीं सत्रें हीं ठेविलिं बहुसुखद ।
अतिदुःखें शक्ति नसे हरि माझा खेद ।
ज्ञानामृत पाजुनि दे अखंड तव पद ॥ जय० ॥२॥
लीला अनंत तूझ्या वदतां आनंत ।
चारी साही अठरा पहातां नच अंत ।
नारद व्यास मुनींद्र ध्यातां नच येत ।

आरत्या

तो तूं देहा धरुनी देशी करिं स्वार्थ ॥ जय० ॥३॥
पदिं गंगा कटिं शोभे छाटी कौपीन ।
हृदयीं लक्ष्मी कौस्तुभ भृगुपद लांछन ।
दंडकमंडलु हातीं रवींदुसम वदन ।
राहो माझे हृदयीं हेंचि सदा ध्यान ॥जय०॥४॥
आलिंगो त्वन्मूर्ति दिसोत हे नयन ।
ऐको कर्ण गुणातें नामामृत रसना ।
त्वत्पदसुमगंध सदा लाभो ह्या प्राणा ।
दे पदभक्ति श्रद्धा सतत करूं नमना ॥जय०॥५॥

— ४ —

जयदेव जयदेव पुरुषोत्तममूर्ते जय आनंदमय मूर्ते ।
वासुदेवानंदसरस्वति गुरुकीर्ते ॥ध्रु०॥
कृष्णावेणी—पंचगंगा—संगमीं ।
येउनि सुरमुनि वंदित श्रीदत्तस्वामी ।
तो करुणासिंधु हृदयिं सांठविला नामी ।
तद्रूपाचि होउनियां विचरतसां स्वामी ॥जय देव०॥१॥
सद्विद्या संपादुनि उपनिषदीं रमला ।
तीर्थें हिंडुनि सर्वां गुरुपदिं रंगविला ॥
गुरुचरितादि ग्रंथामृत हा पाजविला ॥
यच्छ्रवणें पठणें हरि हरिभवविधिजाला ॥जय०॥२॥

श्रीमद्दत्तगुरुयशादशदिशिं गाजविलें ॥
जगदीश्वरदत्तगुरु हृदिं ज्यांच्या डोले ॥
सुरमुनि गंगा कृष्णा रेवा स्तुति बोले ॥
तो हा सद्गुरु यत्पदिं मम मानस रमलें ॥जय०॥३॥

प्रथमानंदवत्सरिं देहीसा झाला ।
अन्यानंदवत्सरिं विदेहिं हा भरला ।
मध्यें सर्वानंदमयकायाचि गमला ।
तो आनंदमयाचि गुरुगुरु मद्हृदिं गमला ॥जय०॥४॥

अठराशें छत्तिसशाकिं ज्येष्ठीं कुहु तिथिला ।
आनंद संवत्सरिं स्वानंदीं भरला ।
मंगलदिनिं सवितास्ताऊर्ध्व दिशा घटिला ।
ब्रह्मचि होउनि ब्रह्मीं गुरुपदिं हा बसला ॥जय०॥५॥

सद्विद्या देउनियां सन्मार्गीं लावी ।
धा तव पदभक्ती जी भवसिंधुस नुरवी ।
अघौघहारक नामस्मरण मनीं वसवी ।
त्वत्पदकमलरसास्पद नृसिंहहृत्करवी ॥जय०॥६॥

– ५ –

[अमरेश्वराची]

जयशंभो शशिशेखर अमरेश्वर देवा ॥
नीराजयामि योगिनियुतशंकरशर्वा ॥ध्रु०॥

आरत्या

वंदे शिवामरेश्वर नंदीश्वर सुखद ॥
गंगाधर गौरीवर हृतसुरवरखेद ॥
परशूधर मृगवासा भव हर मां परद ॥
मुदमर्पय मयि करुणासागर गुरुवरद ॥जय०॥१॥
यन्निकटेऽन्नसुपूर्णा जगदंबा माता ॥
कृष्णावेणीपंचगंगायुजिपाता ॥
पाता योऽखिलजगतां विद्यानिधिदाता ॥
वंदे तं त्वमरेश्वरलिंगं यः सविता ॥जय०॥२॥
यः श्रीदत्तात्रेयो नृसिंहयतिवेषः ॥
भूत्वाऽमरपुर्यां यः शंबाभुक् शेषः ॥
नित्यं नित्यो मूले धनदः सुतपोषः ॥
तेन स्तुतामरेश्वर वंदे धृतशेषः ॥जय०॥३॥
ईशान्यां गोतीर्थं रुद्रं पितृतीर्थं ॥
शुक्लं चामरतीर्थं त्वघनाशनतीर्थं ॥
काम्यं सिद्धं कोटिं शक्तिं परतीर्थं ॥
प्रयागतीर्थं स्नात्वा वंदेऽखिलतीर्थं ॥जय०॥४॥
द्वादशतीर्थस्नानं कृत्वा त्वमरेशं ॥
योर्चेद्यधि देवेशं शर्वं परमेशं ॥
स सर्वसुखहृच्छंकरलोकं गच्छेच्छं ॥
वंदे तं त्वमरेशं नृसिंहयति धीशं ॥जय०॥५॥

श्रीनृसिंहसरस्वतीकृत स्तोत्रें

– १ –

नमः श्रीगुरोमेशधीशे दयाब्धे । भयार्तिघ्न ते स्वात्मदो वासुदेव । यतीट्सेवितानंदपादाब्जयुग्मं । सदा मे हृदि स्थास्नुतां यातु देव ॥१॥ भक्तिश्रद्धे देहि मे ते दयालो । दासो दीनो भावतापेन तप्तः । सर्वे-स्त्यक्तो द्वारि तेऽत्र प्रसंस्थोऽहं मां मातः पालयाद्य स्वबालं ॥२॥ आलोक्य मामच्युत ईश्वरोपि । भीतोऽगमत्सागरसूरशैलान् । सत्यं तथा च तव हृत्कमले स्थितो यः । श्रांतः स्वदर्शय यते गुरुवासुदेव ॥३॥ माभीरिति वचनं मे देहि दयालो गुरो यतिश्रेष्ठ । नान्यो मे रक्षार्थं धावति भो श्रीगुरो जगन्मातः ॥४॥ त्वयि भक्तिं मे वर्धय दुर्हृत्तम ईश-नाशयाशेषं । यच्च तवेष्टं तत्कुरु मयि भोः सर्वज्ञ वक्तुमसमर्थः ॥५॥ माभीश्च भोस्तेऽस्त्वभयं सदैव । याचेऽहमेद्वचनं गुरो ते । अज्ञोहमीश करुणाघन वासुदेव । रक्षस्व मां सर्वत एव सर्वदा ॥६॥

– २ –

जगज्जन्म हेतुं दयापूर्णसिंधुं । भजत्कामधेनुं निधिं सज्जनानां । प्रसन्नं शरण्यं श्रुतेः सारभूतं । परब्रम्हलिंगं भजस्वामरेशं ॥१॥ सरित्कृष्णवेण्योस्तथा पंचगंगा । सरित्संगमेचामरैश्चामरेंद्रः । गुरुं प्रार्थ्य भक्त्याऽभज धोऽमरेशं । परब्रम्हलिंगं नमामि स्वतंत्रं ॥२॥ दयासागरोदत्त-देवः स्वभक्तान्समुद्धर्तुकामोऽवसद्यस्त्वकामः । पुरेचामरेशस्य भुक्त्वा निधिं

यो ददौ सोऽभज्च्चामरेशं स्वलिंगं ॥३॥ चतुःषष्टिदेव्याप्तकामाः परेशं भजत्कल्पवृक्षं भवाब्धेः सुनौकां । भजंतीहसर्वार्थदं विश्वनाथं परब्रम्हलिंगं भजस्वामरेशं ॥४॥ ऋषिः सर्ववित्सर्वतीर्थेऽवसत्सोऽ । भजत्सर्वतीर्थेश्वरं चामरेशं । स्वशिष्याय साक्षात्प्रदर्श्य स्वरूपं । परब्रम्हलिंगं त्वनादि स्वरूपं ॥५॥ द्विजः कुष्ठरोगी सुधीः शुक्लतीर्थे । तपस्तप्तुकामोऽवसद्द्वादशाब्दं । विकुष्ठो विशुद्धोऽभवद्विद्वदार्यः । परब्रम्हलिंगामरेशप्रसादात् ॥६॥ मृकंडर्षिसूनू रहः कृष्णवेण्योः । शिवस्याज्ञयायोऽवसद्ब्रम्हनिष्ठः । कहोळर्षिसद्व्यासवर्यादिदेवाः । परब्रम्हलिंगं भजंतीह नित्यं ॥७॥ अतिप्रेमपात्रः शिवस्यातिभक्तो । मखध्वंसकर्ता सुदक्षस्य शास्ता । शिवप्रीतये योऽवसद्वीरभद्रः । परब्रम्हलिंगं भजत्यादरात्सः ॥८॥ वसिष्ठात्रिभृग्वादयः सिद्धसाध्याः । सुनंदादिनंदीश्वरा नारदाद्याः । भजंतीह भक्त्या परब्रम्हनिष्ठाः । परब्रम्हलिंगं भजस्वा रेशं ॥९॥ अमरेश्वर ते नाम वाचि मेऽस्तु सदाशिवं । अमरेश्वर ते रूपं हृदि नेत्रे च तिष्ठतु ॥१०॥ अमरेश्वर ते भक्तिः सदा नवविधाऽस्तुमे । अमरेश्वर संसारपरपारं नयाशु मां ॥११॥

— ३ —

(श्रीअमरापुरक्षेत्रमाहात्म्यं)

प्रयागः संगमः ख्यातः काशिकात्वरापुरी । गयातु गोपुरी ज्ञेया त्रिस्थली दाक्षिणी स्मृता ॥१॥ वस्वादिदेवाः पितरोर्यमाद्या । रुद्रादिदेवा निवसंति सर्वे । शुक्लात्परं गोपुरि तीर्थराजं । गोतीर्थमेतत्त्वपरं च रुद्रं ॥२॥ तीर्थं पितृणां च हि तत्र दान- । स्नानादि पुण्यं ह्यमितं च

नित्यं । तीर्थेश्वराणामुपचारयुक्त- । पूजाफलं सत्सकलार्थवित्तं ॥३॥ गोविंदगोपालकगोविलासी । गोपुण्यतीर्थे च वसत्यकामः । गोलोक-गोभिः सहितो विलासं । नित्यं स राधारतिकृन्मुकुंदः ॥४॥ एवं देवा-श्चामरेशस्य नित्यं । पूजां कृत्वा सर्वतीर्थे वसंति । सर्वेशं तं सच्चिदानंद-पूर्णं । नित्यं वंदे स्वेष्टदं चामरेशं ॥५॥ सर्वतीर्थात्परं तीर्थं नामरेशात्परो गुरुः । नान्नपूर्णायोगिनीभ्यो भुक्तिमुक्तिविरागदाः ॥६॥ अखिलानि च तीर्थानि ब्रह्माण्डान्तर्गतानि च । देवसिद्धेश्वरादीनि । संति तान्यमरापुरे ॥७॥ कैलासवासी गिरिजाविलासी । काशीनिवासी ह्यमरेश्वरोऽसौ । श्रीकाशिगंगामणिकर्णिकाश्चा । मरापुरे सर्वतीर्थे वसंति ॥८॥ श्रीशान्न-पूर्णेशसुयोगिनीयुक् । स तिष्ठतीहामरपुर्यजस्रं । श्रीदत्तदेवोह्युभयार्द्धि-सिध्याऽ । मरापुरे काशिपुरेशदेवः ॥९॥ अनाद्यनंतः श्रुतिशास्त्रसारो । महान्परानंदचिदेककंदः । श्रीकाशिनाथो ह्यमरेश्वरो योऽ । मरापुरे देव-गणान्वितोस्ति ॥१०॥ करीशपन्नगांगोसौ हारी कमललोचनः । कमलामलपादाब्जः श्रीहरिर्गिरिजापतिः ॥११॥ नीलांगो गिरिगोगोपगोपी-चंदनगोप्रियः । सुनंदनंदीप्राणेशकुमारतनयप्रियः । गंगाशशिधरांगः श्रीमोक्षलक्ष्मीपदप्रदः ॥१२॥

— ४ —

(श्रीवासुदेवानंदगुरुचरित्रसारं)

वंदे श्रीसद्गुरुं दत्तं माधीशं साक्षिणं शिवं । तदीरितेन तत्तुष्टयै लिख्यते चरितं गुरोः ॥१॥ श्रीगुरोश्चरितं स्वल्पं रम्यं मंगलपावनं ।

सारभूतंहि तद्वच्मि ध्यादिशुद्धयै च बालधीः ॥२॥ मानग्रामे मानवा मानहीनाः । प्रत्यग्वाहा निर्मला निर्मलाभाः । बालः स्वज्ञो ब्रह्मगाणेशजोऽभू । वंदे दत्तं श्रीगुरुं वासुदेवं ॥३॥ मौंज्याबंधनमष्टमे गुरुकुलावासो व्रतानां धरो । वृत्वा सांङ्गमृचं सुशास्त्रबहुविद्विद्याकलापारगः । मंत्रज्ञो विधिवत्स्वधर्मनिरतः सर्वर्द्धिसिद्धिप्रदः । त्वत्पादं सततं नमामि च गुरो रक्षस्व मां बालकं ॥४॥ स्वार्थं भिक्षान्नपूर्णाकरसुयुजमथो शांतिदांतिप्रदानो । विद्वाङ्मेशं हि वृत्वा त्रिविधमृणमपाकृत्य सन्यस्य योगीट् । तीर्थं तीर्थेशपादो व्रजति सुजनहृत्तापदीनार्तिहर्ता । वंदे तं वासुदेवं गुरुकविसदयेड्क्षरक्षस्व बालं ॥५॥ ससुखगवज्ज्येष्ठामा प्रतिपदिचानंदवत्सरे रेमे । विरमे ब्रह्मणि सकलो विकलो भूत्वानतोस्मि तत्पद्मे ॥६॥ कृष्णाद्यपूर्णानंदावत्सरे खे जातवद्बभौ । कृष्णांत्यपूर्णानंदावत्सरे खेऽजातवद्बभौ ॥७॥ श्रीसद्गुरोश्चरित्रांतं नो जानंति सुरादयः । वागीशा बालवाचात्र प्रीणातु प्रार्थनाहि मे ॥८॥

— ५ —

(एक श्लोकी वासुदेवचरित्रं)

आदौ रूपमरूप ते गुणगणेशान्मानवं स्वीकृतं । वर्णाद्याश्रमधर्मधारणमथो श्रीदत्तदेवेड्गुरो । तत्संस्थापनतीर्थपादवपुयुक्तुर्ये कवीट् स्वार्तिहृत् । वंदे ते गुरुवासुदेव यतिराट् सेव्यांघ्रिकंजं परं ॥१॥

— ६ —

(हारबंधश्लोकः)

मेशं केशं सुशंभुं भुवनवनवहं मारहं रत्नरत्नं । वंदे श्रीदेवदेवं सुगुण-गुरुगुरुं श्रीकरं कंजकंजं । मामज्ञं मत्तमर्भं भवदवसुवहं वासनासर्वसंघे । मातः पातः सुतस्ते वह रहसि हरे देशिकेशिष्य शिष्यं ॥१॥

— ७ —

(अमरेश्वरस्तोत्रं)

नमामि देवदेवेशं श्रीकृष्णातटवासिनं । अमराख्यपुरे देवदेववृंदसुसेवितं ॥१॥ वंदेऽहं गोरुद्रपितृशुक्लतीर्थविभूषणं । स्नात्वा पूजनतस्तत्त-ल्लोकदं चामरेश्वरं ॥२॥ अमराद्यष्टतीर्थानि यदग्रे शंमयानि तं । वंदे दत्त-श्रीनृसिंहयतिराजसुपूजितं ॥३॥ कृष्णावेणीपंचगंगासंगमाग्र्याविभूषितं । साक्षात्परब्रम्हरूपं वंदेऽहं चामरेश्वरं ॥४॥ नारदादियोगिवृंदसनकादि सुपूजितं । नमामि तं चामरेशं भूवैकुंठपदप्रदं ॥५॥ यत्तीर्थस्नान-पूजातो देवत्वं प्राप्यतेऽब्दतः । वंदे तं योगिनीवृंदसुसेवितपदं सदा ॥६॥ अमरेश्वर भो देव कृपापात्रंहि मां कुरु । करुणाब्धे सुखाब्धे मां हृत्सुखं हि प्रदेहि भोः ॥७॥ वरं वरदराड्दत्तपादं हृद्भूषणं कुरु । सर्वानंदप्रदं तं त्वां नमामि सततं सदा ॥८॥ अमरेश्वरस्तोत्रमिदं शीघ्रं मुक्तिप्रदं नृणाम् । पुनातु सर्व दुरितादमरेश्वरतुष्टिदं ॥९॥